हिंदुस्थानची

राज्यव्यवस्था व लोकस्थिति.

(संक्षिप्त वर्णन).

किंमत दीड रुपया.

हिंदुस्थानची
राज्यव्यवस्था व लोकस्थिति.
(संक्षिप्त वर्णन).

पुणें

आर्यविजय छापखान्यांत छापिलें.

सन १८९९.

किंमत दीड रुपया.

न्यू इंग्लिश स्कूल

व

फर्ग्यूसन् कॉलेज, पुणें,

ह्या संस्थांचे उत्पादक व चालक

यांस

त्यांनीं स्वहितपरित्याग करून विद्यावृध्दीचे कामीं केलेल्या

अश्रांत परिश्रमाचे अभिनंदनार्थ

हा ग्रंथ परम आदरपूर्वक अर्पण केला असे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

हिंदुस्थानचे (सन १८९१–९२ अखेरचे) हालहवालीबद्दल सन १८९४ सालीं पार्लमेंट सभेस सादर झालेले रिपोर्टांचे आधारें हें लहानसें पुस्तक लिहिलें आहे; या विषयावरील इंग्रजी ग्रंथ व सरकारांतून प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें यांतून जास्त माहिती मधून मधून घालण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्रजी समजणारांस या विषयावर माहितीनें परिपूर्ण असे अनेक ग्रंथ आहेत, परंतु मराठी जाणणारांसच ती माहिती मिळविण्यास साधन नाहीं. तें त्यांस प्राप्त व्हावें ह्मणून हा अल्प प्रयत्न केला आहे.

राज्यव्यवस्था व लोकस्थिति या विषयासंबंधानें सरकारचीं मतें लोकपक्षास सर्वस्वी संमत नाहींत ह्मणून कांहीं वादग्रस्त मुद्यांचे संबंधानें लोकमत काय आहे तेंही या पुस्तकांत थोडक्यांत दाखल केलें आहे.

हें पुस्तक लिहिण्याचे व माहिती देण्याचे कामीं माझे मित्रांनीं व सद्गृहस्थांनीं माझे विनंतीवरून मोठे आनंदानें मदत केली आहे, त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे. पुस्तकाचे सुंदर छपाईबद्दल सर्व श्रय रा. रा. पाडुरंगराव शिराळकर आणि मंडळी यांस आहे.

ग्रंथकर्ता.

विषयांची अनुक्रमणिका.

भाग पहिला.

हिंदुस्थानचें क्षेत्रफळ व लोकसंख्या.

भाग दुसरा.

राज्यव्यवस्था.

भाग तिसरा.

कायदे व कायदे करण्याचे पद्धतीबद्दल.

भाग चवथा.

स्थानिक स्वराज्य.

भाग पांचवा.

दिवाणी व फौजदारी न्यायपद्धति.

भाग सहावा.

पोलीस व तुरुंग खातें.

भाग सातवा.

नोंदणीचें खातें.

भाग आठवा.

लष्कर व आरमार.

भाग नववा.

फिनान्स (जमाखर्च).

भाग दहावा.

जमेच्या मुख्य बाबी.

पोटभाग पहिला.—जमीन बाब.

पोटभाग सातवा—मीठ.

पोटभाग आठवा.—आकारलेले प्रत्यक्ष कर.

भाग अकरावा.

शेतकी व हवामान.

भाग बारावा.

जंगल खातें,

भाग तेरावा.

खाणी व कारखाने.

भाग चवदावा.

व्यापार.

भाग पंधरावा.

पब्लिक् वर्क्स.

भाग सोळावा.

टपाल व तारायंत्र.

भाग सतरावा.

जननमरण व आरोग्य.

भाग अठरावा.

सर्वे—पाहण्या.

भाग एकोणीसावा.

शिक्षण.

भाग वीसावा.

लोक स्थिति.

भाग एकविसावा.

एतद्देशीय संस्थानें.

हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिति.
संक्षिप्त वर्णन.

भाग पहिला.
हिंदुस्थानचें क्षेत्रफळ व लोकसंख्या.

हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचे राजकीय गोष्टींसंबंधानें दोन भाग आहेत; पहिल्यांत प्रत्यक्ष इंग्रजांचे अमलाखालीं असलेले प्रांत येतात व दुसऱ्यांत प्रोटेक्टेड् [संरक्षित] संस्थानें येतात. हीं संस्थानें सुमारें ६९० आहेत. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचें क्षेत्रफळ १५६०१६० चौरस मैल आहे व लोकसंख्या २८७२२३४३१ आहे. त्याशिवाय जंगली प्रांतांत ११२०००० लोकवस्ती आहे. तसेंच फरेंच व पोर्तुगीज अमलाखालीं असलेले हिंदुस्थानाचे भागांत ८४४००० लोकवस्ती आहे. एकंदर हिंदुस्थानची वस्ती २८९२००००० ह्मणजे सर्व जगांतील एकपंचमांशाइतकी आहे.

खालील कोष्टकावरून इंग्रजींतील प्रांत व संस्थानें यांत लोकसंख्येची वांटणी कशी झालेली आहे तें दिसून येईल.

	क्षेत्र.	जनसंख्या.
इंग्रजींतील प्रांत	९६४९९३	२२११७२९५२
संस्थानांतील	५९५१६७	६६०५०४७९
बेरीज	१५६०१६०	२८७२२३४३१

एकंदर लोकसंख्येपैकीं संस्थानांत शेंकडा २३ आहे व त्या संस्थानांचे अमलाखालीं एकंदर देशाचे भूमिभागापैकीं ३८ टक्के जमीन आहे. तींत क्षेत्राचे मानानें पाहतां वस्ती कमी आहे. काश्मीर, पश्चिमराजपुताना, व मध्यहिंदुस्थानांतील डोंगरी भाग व बंगाल प्रांताचे नैर्ऋत्य दिशेकडील भाग ह्यांत लोकवस्ती दाट नाहीं. मध्य प्रमाणानें इंग्रजी राज्यांत चौरस मैलास २३० लोकसंख्या पडते व संस्थानांत १११ पडते. संस्थानांत अत्यंत पातळ वस्तीचा भाग ह्मटला ह्मणजे जसलमीर आहे, तेथें मैलीं ७ माणसें पडतात; व अत्यंत दाट वस्ती रोहिलखंडांतील रामपूर संस्थानांत आहे, तेथें वस्ती मैलीं ५८३ पडते. इंग्रजी प्रांतांत ब्रह्मदेशांत उत्तरखिंडविन प्रांतांत अत्यंत पातळ वस्ती आहे, तेथें मैलीं ४ माणसें पडतात व जास्त वस्ती ह्मणजे बिहारांतील सरणांत आहे, तेथें मैलीं लोकवस्ती ९३० पडते. इंग्रजी प्रांत व संस्थानें मिळून घेतलीं तर सरासरीनें वस्ती मैलीं १८४ पडते. गंगा नदीचे कांठचे प्रांतांत दरमैलीं लोकवस्ती ८७७ आहे व त्या प्रांताची जमीनही अत्यंत सुपीक आहे. अशा प्रकारानें पाहूं गेलें असतां, सुपीक जमीन व दाट लोकवस्ती अशी स्थिति हिंदुस्थानांत दुसरे ठिकाणीं नाहीं. मद्रास व पंजाब प्रांतांत दरमैलीं ६०० वस्ती पडते असा एक जिल्हा आहे, बंगाल्यांत सोळा आहेत, व नार्थवेस्ट प्रांतांत १४ आहेत. मुंबई इलाख्यांत अत्यंत जास्त वस्ती ह्मणजे मैलीं ५४२ आहे. ब्रह्मदेश, सिंध, मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतांत कोणतेही जिल्ह्यांत २३० पेक्षां मैलीं जास्त वस्ती पडत नाहीं.

प्रांतवार लोकसंख्या कशी आहे हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

प्रांत		क्षेत्र चौरस मैल	लोकसंख्या सन १८९१ तील	मैलास मध्यम प्रमाणानें लोकसंख्या	शहरें व खेड्यांची संख्या		वस्ती असलेलीं घरें
					शहरें	खेडीं	
इलाखे	मद्रास	१४११८९	३५६३०४४०	२५२	२१४	५६८६७	६७०९९९०
	मुंबई	१२५१४४	१८९०११२३	१५१	२१६	२४९८८	३३८०६४०
लेफ्टनेंट गव्हर्नर असलेले प्रांत.	बंगाल	१५१५४३	७१३४६९८७	४७१	१४६	२२७०१९	१३५९२१५४
	वायव्य व अयोध्याप्रांत	१०७५०३	४६९०५०८५	४३६	४८४	१०५७१६	८२२५१९१
	पंजाब	११०६६७	२०८६६८४७	१८८	१७८	३४६६४	३१२७८२३
चीफ कमिशनर असलेले प्रांत.	मध्यप्रांत	८६५०१	१०७८४२९४	१२५	५२	३४३०३	२१५८६६८
	आसाम	४९००४	५४७६८३३	११२	१८	१७१४२	१११८८८५
	अपर (वरचा) ब्रह्मदेश.	८३४७३	२९४६९३३	३५	२४	१०९५७	५५४४७२
	लोअर (खालचा) ब्रह्मदेश.	८७९५७	४६५८६२७	५३	३६	१७७५२	८६९१३२
कमिशनर असलेले प्रांत.	अजमीर	२७११	५४२३५८	२००	४	७४१	१०१६५४
	वऱ्हाड	१७७१८	२८९७४९१	१६३	३७	५७८५	५९१००८
	कुर्ग	१५८३	१७३०५५	१०९	५	४९२	२६८०६
	आंदमान	० ०	१५६०९	००	००	५९	२९९७
	क्वेटा वगैरे	० ०	२७२७०	००	२	००	४५४३
बेरीज		९६४९९३	२२११७२९५२	२३०	१४१६	५३६४८५	४०४६३९६३

हिंदुस्थानांत पहिली मनुष्यगणती सन १८७२ सालीं झाली होती. ती सर्व देशभर एकच दिवशीं करण्यांत आली नव्हती तरी त्या वेळीं ब्रिटिश राज्यांतील

गणती बरीच चांगली झाली होती; संस्थानांत त्यापेक्षां कमी विश्वसनीय झाली होती. त्यानंतर सन १८८१ सालीं फिरून गणती झाली, त्या वेळीं पूर्वी मनुष्य-गणतीचे संबंधानें असलेले लोकांचे विकल्प कमी झाल्यामुळें जास्त खरी संख्या मिळाली. सन १८९१ सालची मोजदाद विशेषच खात्रीलायक झाली आहे.

पुढील कोष्टकावरून या देशाची लोकवस्ती कशी वाढत गेली आहे तें कळेल.

	लोकसंख्या.			वाढीचें प्रमाण.	
	१८७२	* १८८१	* १८९१	सन १८७१ व १८८१ चे मोजणींत	सन १८८१ व १८९१ चे मोजणींत
इंग्रजी राज्य	१८६०४११९१	१९८८६०६०६	२१८१५५११५	६.९९	९.७६
संस्थानें	५४२१११५८	५४९३२९०८	६३४५९८१९	४.४१	१५.५२
फ्रेंच व पोर्तुगीझ लोकांचे प्रदेश	६७९१७२	७४८७८३	८४४३०७	१०.२५	१२.७५
बेरीज	२४०९३१५२१	२५४५४२२९७	२८२४५९२४१	६.४२	१०.९७

* या कोष्टकांत दोन्ही सालीं जे प्रांत मोजले गेले त्यांतीलच लोकसंख्या घेतलेली आहे. ब्रिटिश मुलखांपैकीं सोडलेले भाग उत्तरलुशीप्रांत, वरचा ब्रह्मदेश व क्वेटा; संस्थानांपैकीं सोडलेलीं काश्मीर, मणिपूर, फोर्ट स्टेटमन, शान संस्थानें व राजपुतान्यांतील कांहीं भाग हीं आहेत.

फ्रेंच व पोर्टुगीझ राष्ट्रांचे भाग सोडून ब्रिटिश मुलूख व संस्थानें मिळून वाढ शेंकडा १०.९६ पडते. दरसाल दरशेंकडा वाढ ०-९३ पडते. इतर देशांत लोकसंख्येंत कशी वाढ होत आहे त्याजबद्दल कोष्टक पुढें दिलें आहे; यांत हिंदुस्थानाचा नंबर विसावा आहे.

देश	दरसाल दर-शेंकडा वाढ	देश	दरसाल दर-शेंकडा वाढ
१ न्यू साउथ वेल्स.	५.१०	१५ जर्मनी	१.०७
२ क्वीन्सलंड	४.३९	१६ कानडा	१.०७
३ व्हिक्टोरिया	३.२२	१७ ग्रीस	१.०५
४ युनायटेडस्टेट्स्	२.४८	१८ बेलजियम्	०.९९
५ साक्सनी	२.००	१९ डेनमार्क	०.९९
६ न्यूझीलंड	१.७०	२० हिंदुस्थान	०.९३
७ आलजीरिया	१.५६	२१ आस्त्रिया	०.७६
८ साउथ आस्त्रेलिया	१.४०	२२ स्वित्झरलंड	०.६४
९ इंग्लंड व वेल्स	१.२८	२३ बव्हेरिया	०.६४
१० ईजिप्त	१.२५	२४ इटली	०.६२
११ हालंड	१.१८	२५ नारवे	०.६०
१२ प्रशिया	१.१५	२६ स्पेन	०.५०
१३ पोर्टुगाल	१.१४	२७ स्वीडन	०.५०
१४ हंगारी	१.१८	२८ फरान्स	०.०६

हे आंकडे गेली मनुष्यगणती व तिचे पूर्वीची मनुष्यगणती या दोहोंतील वाढीचे प्रमाणाचे आहेत.

हिंदुस्थानांत दरमैलीं लोकसंख्या मध्य प्रमाणानें २३० आहे हें वर सांगितलेंच आहे. गंगानदीचे कांठचे प्रदेशासारखी दाट वस्ती पृथ्वीवर कोठेंही नाहीं. त्या प्रांतांत दरमैलीं वस्ती ८७७ आहे. युरोपांतील देशांत दरमैलीं किती लोकवस्ती पडते तें खालीं देण्यांत येत आहे. त्यावरून हिंदुस्थानांतील व युरोपांतील लोकवस्तीची तुलना करतां येईल.

इंग्लंड व वेल्स	[१८९१]	४९८	हंगारी	[१८८०]	१२५
स्काटलंड	[१८९१]	१३२	जर्मन राष्ट्र	[१८९०]	२३७
आयर्लंड	[१८९१]	१४४	प्रशिया	[१८९०]	२२३
फरान्स	[१८९१]	१८६	हालंड	[१८८९]	३६०
इटली	[१८८०]	२४९	बेलजम्	[१८९०]	५४०
आस्ट्रिया	[१८८०]	१९१	पोर्तुगाल	[१८७८]	१३४

वंगाल्यांत लागवडी दरएकरास दोन मनुष्यें असें प्रमाण बसतें; ह्मणजे दर-मैलीं १२८० पडतात. मैलीं ६४० वस्ती असते तोंपर्यंत साधारण ठीक असतें, परंतु त्यावर मान गेलें ह्मणजे हाल होऊं लागतात. कांहीं प्रांतांत वस्ती लागवडी जमिनीचे मानानें फार आहे व कांहीं ठिकाणीं जमीन पुष्कळ पडलेली आहे, तरी तसे प्रदेशांत जास्त वस्ती सावकाश होते, कारण हिंदूंत आपला देश सोडण्याची प्रवृत्ती फार कमी आहे. यास प्रमाण हें कीं लोकसंख्येपैकीं शें-कडा ९० इसम आपले जन्माचेच प्रांतांत रहात आहेत असें सन १८९१ चे मोजणींत दिसून आलें आहे.

सन १८७१ सालापर्यंत मनुष्यगणती पद्धतशीर अशी झालेली नव्हती. त्या सालापूर्वीचे कांहीं सालांतील जनसंख्येचे आंकडे खालीं दिले आहेत ते अज-मासाचेच आहेत. कांहीं वर्षांपूर्वींपर्यंत इंग्रजी राज्याचा विस्तारही पुरा झाला नव्हता; नवीन नवीन प्रांत वरचेवर त्यांत सामील होत होते, यामुळेंही पूर्वीचे आंकडे तुलनेसाठीं फारसे उपयोगी नाहींत. त्यांवरून फक्त स्थूल अशीं अनुमानें मात्र काढतां येतील.

	क्षेत्र—चौरसमैल	लोकसंख्या कोटींत.
१८५१—५२	७७६०००	१५·४७९
१८६१—६२	८५६०००	१७·९१३

हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यांतील प्रांत घेतले तर वाढीचें प्रमाण गेल्या दहा सालांत शेंकडा ९·७६ पडत आहे व सर्व देशाचा विचार पहातां तें शेंकडा १०·१७ पडतें हें वर सांगितलें आहे. सर्व देशभर सारख्याच प्रमाणानें लोकसंख्या वाढत नाहीं. वस्ती दाट असेल किंवा पातळ असेल त्या मानानें वाढ कमी किंवा जास्त होते. हवेचा फेरफार हा कांहीं अंशीं वाढीस उत्तेजक किंवा प्रतिबं-धक होतो, परंतु हे फरक व अशा प्रकारचीं दुसरीं कारणें बाजूस ठेऊन विचार केला असतां असें दिसतें कीं, वस्ती पातळ असेल तेथील लोकसंख्या दाट वस्तीचे भागांतल्यापेक्षां जास्त प्रमाणानें वाढते ; मैलीं १०० वस्ती असेपर्यंत

वाढीचें प्रमाण शेंकडा १५ पासून १७ पर्यंत पडतें, १०० ते २०० असेपर्यंत १० पासून १४, ४०० असेपर्यंत कांहीं कमी व त्यापेक्षां दाट वस्तीचे भागांत शेंकडा ६ ते ८ असें वाढीचें प्रमाण पडतें. साधारण प्रमाण शेंकडा ९·७६ पडल्याचें वर सांगितलें आहे, तें मैलीं ३०० पर्यंत वस्ती असेपर्यंत कायम रहातें; त्यावर वस्ती गेली ह्मणजे त्यास उतरतें मान लागतें.

प्रांतवार विचार पहातां मद्रासेंतील सर्व भागांत साधारण प्रमाण सांगितलें आहे त्यापेक्षां जास्त प्रमाणानें वाढ होत आहे; मुंबई इलाख्यांत कर्नाटक व दक्षिण भागांत जास्त प्रमाणानें वाढ आहे, त्याचें कारण पूर्वींचे मनुष्यगणतीचे वेळीं दुष्काळामुळें त्या प्रांतांतील लोकसंख्या नेहमीपेक्षां कमी झालेली होती हें आहे; खालचे ब्रह्मदेशांत तांदूळ फार पिकतो व शेतकीचीही वाढ फार झालेली आहे त्यामुळें तेथें लोकसंख्येंत वाढ जास्त आहे. पंजाव, आसाम व सिंध प्रांत यांतही वाढ जास्त आहे व गेले दहा सालांत पिकाची सुबत्ता चांगली होती. बंगाल्यांतील वेगळाले भागांत हवापाण्याचे स्थितींत फार फरक आहेत व त्याप्रमाणें वेगळाले भागांत वाढीचें प्रमाण निरनिराळें पडलें आहे. मध्यप्रांतांत वाढीचें मान साधारण प्रमाणाचे जवळ जवळ आहे; वायव्य प्रांतांत प्रमाण कमी आहे. या प्रांतांत व बंगाल प्रांतांत ज्या भागांत पाणी मुरून जमीन दलदलित व खारवट झाली आहे व उत्पन्न कमी येत आहे अशा भागांत वाढ कमी झाली आहे. या प्रांतांतून आसाम, मारिशस वगैरे ठिकाणीं मजूर फार जातात. अजमिरांत आगगाडी झाल्यानें वाढ झालेली आहे. वऱ्हाडांत वाढ झाली नाहीं. दुष्काळाचे वेळीं उदरनिर्वाहाकरितां आलेले लोक मागील खेपेचे मनुष्यगणतींत सामील झाले ते परत गेल्यामुळें गेल्या गणतीचे वेळीं संख्या कमी झाली. तेव्हां वाढ विशेष न होणें हें स्वाभाविक आहे.

वेगळाले प्रांतांत साधारण वाढ पुढें लिहिल्याप्रमाणें झाली आहे:—

१ मद्रास	१५·५८	८ खालचा ब्रह्मदेश	२४.६७
२ वायव्य प्रांत व अयोध्या	६·२३	९ बंगाल	६.७
३ वऱ्हाड	८·४१	१० मध्यप्रांत	९.६६
४ अजमीर	१७·१२	११ आसाम	११.३०
५ मुंबई	१३·७१	१२ कुर्ग	२.९४
६ सिंध	१८·९७	१३ एडन	२६.४४
७ पंजाब	३४·७४		

एकंदरींत गेले दहा सालांत पाऊसपाणी फार चांगलें होतें व त्यामुळें शेतकी-

ही वाढली आहे, या गोष्टी वाढीचा विचार करतांना ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

आतां शहरांत व बाहेरील प्रांतांत कशी वाढ झाली आहे तें पाहणें आहे. इंग्रजी राज्यांतील व संस्थानांतील शहरें घेतलीं तर शहरांतील वस्तीची वाढ सामान्य प्रमाणाचे जवळ जवळ आहे. दहा हजारांचे वस्तीचे शहरांतील वाढ ह्या साधारण प्रमाणापेक्षां कमी झाली आहे; मोठे वस्तीचे शहरांत, ज्यांचें महत्व व्यापार, कारखाने व आगगाड्या, किंवा सैन्याचे वास्तव्याचे कारणानें वाढलें आहे अशांतच वाढ जास्त झालेली आहे. उदाहरणासाठीं कांहीं शहरें पुढें दिलीं आहेत.

मुंबई	६·२८	रंगून	३४·३९	पुणें	२४·३८
कलकत्ता	८·२५	कराची	४३·०१	अजमीर	४१·२६
मद्रास	१६·५०	कानपूर	२४·६१	हुबळी	४३·४०

ज्या शहरांची पूर्वी भरभराट असून आतां खालावलीं आहेत अशा शहरांत वस्तीची वाढ झालेली नाहीं. उदाहरणार्थ पाटणा, सुरत, मिरझापूर. यावरून एकंदरींत शहरांकडे लोकांचा ओढा कमी दिसतो व जो ओढा आहे तो लहान व्यापारी व खालचे दर्जाचे मजूरदार यांत आहे.

लोकसंख्येंत वाढ कशी झाली आहे यासंबंधानें येथपर्यंत वर्णन झालें. आतां वाढ होण्यास किंवा न होण्यास कारणें काय होतात तें पाहिलें पाहिजे. विलायतेचे मानानें पहातां या देशांत लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण फार मोठें आहे. यास कारणें अशीं दिसतात कीं, या देशांत नरकोत्तारणार्थ मुलगा असणें जरूर आहे असा साधारण समज आहे व स्त्रियांची मदत प्रपंचाचे कामांत फार होते व स्त्री अविवाहित राहणें अशास्त्र समजलें जातें यामुळें विवाह फार होतात. आतां बालविवाहाचे चालीपासून प्रजा जास्त होते असें जरी नाहीं तरी होते ती अशक्त होते व त्यांच्या आया बाळंतपणांतच बरेच वेळां गचावतात किंवा त्यांचें प्रजाजननाचें सामर्थ्य लवकर कमी होतें; व या कारणामुळें या देशांत आयुर्मर्यादा विलायतेपेक्षां कमी आहे. अर्थातच त्यामुळें मृत्यूचें प्रमाणही तिकडचेपेक्षां जास्त आहे, व त्यास सदरचे कारणांशिवाय हवापाण्याचे फरक व त्यामुळें होणारा रोगोद्भव हेंही कारण आहे. या नेहमींचे कारणाशिवाय पटकी, देवी, वगैरे साथींची मदत असते व मधून मधून दुष्काळही पुरवणी करतो. देशाचे नैसर्गिक स्थितीमुळें शेतकीवर निर्वाह करणारे लोक फार आहेत व सामा-

जिक नियमही व्यापारवृद्धीस प्रतिकूळ आहेत यामुळें दुष्काळाचा परिणाम देशावर जास्त जरब होतो.

प्रजावृद्धीचे कामास हरकती आणणाऱ्या कारणांचा अंमल यापुढें कमी होण्याचा संभव आहे. वैद्यकीचे ज्ञानाचे वृद्धीपासून रोगोपशम होईल व देवी काढविण्याचा प्रचार वाढल्यामुळें देवीपासून होणारे मृत्यूंची संख्या बरीच कमी झाली आहे. पटकीची सांथ उद्भवण्याचें बंद करण्याचा उपाय जरी सांपडला नाहीं तरी तिचा फैलाव आतां पूर्वींपेक्षां कमी होतो व त्यापासून तिचे भक्ष्यस्थानीं पडणारांची संख्याही कांहीं कमी होत जात आहे. गांवगन्ना आरोग्य वाढविण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत. देशपर्यटनाचे मार्ग सुधारल्यानें व दळणवळणास साधनें जास्त झाल्यानें, कृत्रिम उपयांनीं उदकसंचय करून बागाईत वाढल्यानें, तसेंच दुष्काळाचे शमनाप्रीत्यर्थ उपायांची तयारी करून ठेवली असल्यामुळें आतां दुष्काळापासून पूर्वींप्रमाणें भयंकर परिणाम होण्याचा संभव कमी आहे. एकंदरींत पुढें जनसंख्या वाढण्यास व मृत्यूची संख्या कमी होण्यास अनुकूल असा काल दिवसेंदिवस येत आहे असें अनुमान केल्यास चुकीचें होईल असें वाटत नाहीं.

स्थानिक सरकारांचे ताब्यांत जे प्रांत आहेत त्यांसंबंधानें थोडी हकीकत सांगून हा भाग संपविण्याचा विचार आहे.

मद्रास—इलाख्यांत अग्रमान मद्रास इलाख्याचा आहे व तो इलाखा प्राप्तही पहिल्यानें झाला. हल्लीं फोर्टसेंट जार्ज आहे तें ठिकाण ईस्ट इंडिया कंपनीनें १६३९ सालीं खरेदी केलें व त्यापुढें तिनें शंभर वर्षे आणखी कांहीं मुलुख मिळविला नव्हता. नंतर मच्छलीपट्टण फरेंचांकडून घेतलें, सरकार प्रांत मोगलांकडून संपादन करण्यांत आला, टिपुसुलतानाचा पराभव झाल्यावर मलबार किनारा, सालेम व कोईमतूर प्रांत हे मिळाले व बलारी व कडापा निझामानें दिले; तंजावर व कर्नाटक त्यानंतर एक दोन वर्षांनीं प्राप्त झाले व १८३८ सालीं करनूल संपादन झाल्यावर या इलाख्याची वाढ पूर्ण झाली. लाकादीव बेटें सोडून या इलाख्याचे प्रांत सर्व एके ठिकाणीं आहेत. पश्चिम किनाऱ्याचे प्रांत, दक्षिण भाग व डोंगरी प्रांत हे शिवायकरून बाकीचे प्रदेशांत पावसाचा तोटा येतो. उत्तरेकडील भाग " दुष्काळी प्रांतांत " पूर्ण येतात. या इलाख्यांत असलेला कारवार जिल्हा मुंबई इलाख्यास १८६२ सालीं जोडला व एक लहानसें खेडें १८८४ सालीं बंगाल इलाख्यांत सामील करण्यांत आलें.

मुंबई—मुंबई इलाख्यांतही बऱ्याच काळा पूर्वींपासून कंपनीची वस्ती होती. कंपनीची हिंदुस्थानांतील पहिली वखार सन १६१३ सालीं स्थापन झाली व पुढें

बरेच दिवस गुजराथेंतील कांहीं ठिकाणचे वखारींशिवाय तिजकडे जास्त प्रांत नव्हता. सन १६६८ सालीं तिजला दुसऱ्या चार्लस राजानें मुंबई शहर व बेट विकत दिलें व या टापूस १७०८ सालीं इलाखा हें नांव देण्यांत आलें; तरी त्याचे हद्दीस मुंबई बेटाशिवाय जास्त भाग नव्हता. नंतर मराठ्यांकडून गुजराथ व १८१७ सालीं पेशव्यांचें राज्य लयास गेल्यावर दक्षिण प्रांत प्राप्त झाला व कांहीं प्रांत शिंद्याबरोबर अदलाबदल करून आला. सिंध प्रांत १८४३ सालीं जिंकण्यांत आला. एडन बंदर १८३९ सालीं घेण्यांत आलें व सोमाली किनारा व सकोत्रा येथें प्रोटेक्टोरेट स्थापण्यांत आलें. दक्षिणप्रांताचा मध्यभाग "दुष्काळी प्रांत" आहे, तेथें पाऊस पडणें फार अनिश्चित आहे. याच प्रांतांत १८७६।७७ सालचा मोठा दुष्काळ पडला होता. कोंकणांत पाऊस पुष्कळ पडतो परंतु तेथील जमीन खडकाळ आहे, सुपीक नाहीं. गुजराथेंत पाऊस फार कमी पडतो तरी उत्पन्नाचे मानानें त्याच प्रांताचा पाहिला नंबर लागेल. सिंध प्रांतांत किनाऱ्याचे भाग व पूर्वबाजूचा कांहीं भाग असे शिवायकरून बाकीचे भागांत पाऊस मुळींच पडत नाहीं. सिंधु नदीस पूर येतात त्यांचे योगानें व कालवे काढले आहेत त्यांपासून उत्पन्न होतें व लागवड सर्व नदीचे व कालव्यांचे कांठचे प्रांतांतच आहे.

ह्या इलाख्याचे सर्व भाग एकास एक लागून नाहींत. सिंध प्रांत मुंबई-इलाख्यापैकीं इंग्रजींतील मुलखास सुटून आहे, एडन तर १६६० मैल लांब आहे व तेथून पेरिम आणखी शंभर मैल लांब आहे. सकोत्रा, गारडाफुईचे भूशलाकेजवळ व झैला, बरबेरा व बुल्हार हीं तर आफ्रिका खंडांत आहेत.

बंगाल—या इलाख्यांत खरा बंगाल प्रांत व बिहार व ओरिसा हे व छोटा नागपूर व दार्जिलिंगजवळील घाटी प्रदेश हे येतात. पहिल्या तीन प्रांतांची दिवाणी मोगलांकडून ईस्ट इंडिया कंपनीस मिळाली त्या वेळीं ओरिसा व बहुतेक छोटा नागपूर हे प्रांत मराठ्यांचे अमलाखालीं होते व दार्जिलिंग हा सिकिमकडे होता. ओरिसा प्रांत सन १८०० सालीं व पुढें १०।१५ वर्षांनीं छोटा नागपूर हे प्रांत मिळाले. दार्जिलिंग १८३५ सांत आलें व त्याखालील प्रांत १५।२० वर्षांत हातीं आला.

या प्रांताचा कारभार गव्हरनर जनरलच सन १८३४ पर्यंत पाहात आले. त्या सालीं बंगालचे गव्हरनर-जनरल सर्व हिंदुस्थानचे मुख्याधिपति झाले व बंगाल इलाखा त्यांचेच हाताखालीं परंतु वेगळा झाला. या प्रांतास स्वतंत्र लेफ्टनेंट गव्हरनर सन १८५४ सालीं नेमण्यांत आला. बंगालइलाख्यांतील ओरिसा प्रांत व बिहारचा वायव्य प्रांत हे " दुष्काळी मुलखांत " येतात; इतर

भागांत पर्जन्य चांगला पडतो व दुष्काळ ही अननुभूत वस्तु आहे. एकंदर बंगाल प्रांत चांगला सुपीक आहे. छोट्या नागपुरांत वस्ती कमी असण्याचें कारण तेथील हवा वाईट आहे हें आहे.

आसाम—बंगाल इलाख्यांतून आसाम प्रांत १८७४ सालीं वेगळा करण्यांत आला. हा प्रांत ह्मणजे दोन मोठालीं खोरीं व त्यांचे भोंवतालचा व मधील डोंगराळ प्रांत मिळून होतो. सुर्मखोरें मोगलांकडून दिवाणी मिळाली त्यांत आलें. कचर प्रांत तेथील राजा मेल्यावर १८३२ सालीं खालसा करण्यांत आला. खरा आसाम प्रांत ह्मणजे ब्रह्मपुत्रेचें खोरें हें ब्रह्मी लोकांनीं १८२६ चे लढाईनंतर इंग्रज सरकारास दिलें. खासी व जंतिया हे डोंगरी प्रदेश त्या प्रदेशांतील डोंगरी लोकांचे मुख्यांचे ताब्यांत आहेत. नागा, गरो व लुशाई व दुसरे डोंगरी प्रदेश हेही त्याचप्रमाणें वहिवाटले जात आहेत तरी या सर्वांवर अंमल इंग्रज सरकारचाच आहे. या देशांत जमीन सुपीक आहे व चहाची लागवड सुरू झाल्यापासून तेथें बाहेरून मजुरीस लोक पुष्कळ येतात व तेच पुढें स्थाईक होऊन राहतात. या प्रांतांत दुष्काळ कधींही पडत नाहीं.

वायव्य व अयोध्या प्रांत—वायव्य प्रांतास अयोध्या प्रांत सन १८७७ सालीं जोडण्यांत आला. दोन्हींवर एकच लेफ्टनेंट गव्हरनर असे तरी अलीकडेपर्यंत त्यास नार्थवेस्ट प्रांताचा लेफ्टनेंट गव्हरनर व औधचा चीफ कमिशनर असें ह्मणण्यांत येत असे. या प्रांतांतील मुलूख हा कांहीं पूर्वींचे अयोध्या प्रांतापैकीं आहे व कांहीं शिंद्यांकडून सन १८०५ सालीं व कांहीं १८१६ सालीं गुरख्यांकडून व कांहीं नागपूरचे राज्यापैकीं सर करून असा घेण्यांत आला आहे. या दोन्ही प्रांतांत हवापाणी, जमिनी वगैरेसंबंधानें अत्यंत साम्य आहे. अयोध्या प्रांताचें राज्य दिल्लीचा वजीर सादत अल्लीखान यानें सन १८३२ सालीं स्थापन केलें व पुढें निजामाप्रमाणेंच तोही आपल्यास स्वतंत्र संस्थानिक असें ह्मणवून घेऊं लागला. सन १८२० सालापर्यंत संस्थानाधिपास नबाब वजीर हेंच नांव चालत असे, परंतु तें नांव जाऊन राजा हें नांव त्या सालापासून सरकारी रीतीनें देण्यांत आलें. ह्या राज्यांत बखेडे फार झाले व राजाच्यानें ते मोडवेनात ह्मणून तें राज्य १८५६ सालीं खालसा करण्यांत आलें. शिंद्यानें झांशी देऊन मुरार किल्ला मोबदला घेतला. या प्रांतांचे राजधानीचें ठिकाण अलहाबाद आहे व लखनौ येथेंही लेफ्टनेंट गव्हरनरसाहेबांची वसति दरवर्षीं कांहीं दिवस असते; या प्रांतास आतां कायदे करण्याचा स्वतंत्र अधिकार मिळून कायदेकौन्सिल स्थापन झालें आहे.

पंजाब—हें नांव व्युत्पत्तीप्रमाणें ह्मणजे पंचनद्यंतरवर्ति प्रदेशासच लावण्याचें,

परंतु लोकव्यवहारांत राजशार्दूल रणजितसिंह याचे राज्यमर्यादेंतील सर्व प्रांताचा त्या नांवांत समावेश करण्यांत येतो. या प्रांताचा बहुतेक भाग १८४९ सालीं सर करण्यांत आला, परंतु सतलजचे अलीकडील भाग १८०८ सालींच इंग्रजींत आला होता. बंडानंतर सन १८५९ त दिल्ली व तिच्याजवळचा भाग या प्रांतास जोडण्यांत आला. आतां या प्रांतांतच सिंधूचे पश्चिमेचा भाग व हिमालयाचे पायथ्याचा भाग हे सामील झाले आहेत. या प्रांतांतील बहुतेक भागांची लागवड नद्यांचे कालव्याचे पाण्यावर अवलंबून आहे, तेव्हां कालवे जास्त होऊन तें पाणी जसें जास्त पसरत जाईल, तशी वस्तीही त्याचे मागोमागच हल्लीं निर्जन असलेल्या भागांत पसरत जाईल. हा प्रांत फार प्राचीन काळापासून अनेक परकीय राजांच्या आगमन–प्रत्यागमनाचें स्थान असल्यामुळें तेथें अनेक तऱ्हेच्या लोकांचें संमेलन झालें आहे. पश्चिमेकडील भागांत बहुतेक मुसलमान जास्त आहेत, मध्यभागांत शीख जास्त आहेत, व पूर्व बाजूस धर्मपरायण हिंदु लोकांची वस्ती आहे. हिमालयाचे नजीकचे भागांत बुद्ध धर्माचे व ब्राह्मण जातीय लोक आहेत व त्या पंथाचे लोक इतर ठिकाणीं सांपडत नाहींत.

मध्यप्रांत—हा सन १८६१ सालीं वेगळा करण्यांत आला. नागपूरचे राजाचा १८५३ सालीं खालसा केलेला प्रांत व पेंढाऱ्यांचे लढाईनंतर १८१८ सालीं शिंद्यांकडून घेतलेला सागर प्रांत व नागपूरकरांकडून घेतलेला नर्मदा प्रांत हे सर्व या इलाख्यांत येतात. त्याचें मुख्य स्थान, नागपूरकरांची राजधानी, नागपूर शहर हेंच आहे. सागर प्रांत शिवायकरून बाकीचे भागांवर मृगराजाची बरीच कृपा असते; अवर्षण सहसा पडत नाहीं. या प्रांतांतील लागवडीसारखी असलेली जमीन बहुतेक लागण झालेली आहे यामुळें पूर्वी हा प्रांत दाट वस्तीचे ठिकाणाहून जाणारे लोकांस जसा आश्रयस्थान असे, तसा यापुढें होणार नाहीं.

अजमेर व मेरवाडा प्रांत–हे अजमीरचे कमिशनरचे अमलाखालीं आहेत. अजमीर प्रांत शिंद्यांकडून सन १८२० सालीं घेण्यांत आला व मेरवाडा प्रांत मेर लोकांचा बंदोबस्त करण्यासाठीं त्याचे पूर्वी दोन वर्षे ताब्यांत घेण्यांत आला होता. हे प्रांत राजपुतान्यांतील संस्थानांचे मध्यभागीं आहेत व आतां अजमीर हें आगगाडीचें एक मोठें ठिकाण झालें आहे. या प्रांतांत पर्जन्यवृष्टीचें मान फार अनिश्चित असतें व चारा व पाणी यांची फार वेळा अडचण पडते. १८९१–९२ हें साल त्यापैकींच संकटाचें गेलें.

अजमीरचे कमिशनर हे राजपुतान्यांतील गव्हरनर-जनरलाचे एजंटाचे हाताखालीं काम पहातात.

वऱ्हाड—प्रांत हा हैदराबादचे निजामानें इंग्रज सरकारास तहाप्रमाणें मद-

तीसाठीं जी फौज देण्याची तिचे खर्चासाठीं तोडून दिला. कारभाराचा खर्च व सैन्याचा खर्च हे वजा जाऊन शिल्लक उरेल ती निजामास देण्यांत येते. हा प्रांत फार सुपीक आहे. ह्या प्रांतांतील हवा-पाणी व भूमिभाग व लोकस्थिति ह्यांचें साम्य त्याचे पूर्व व पश्चिमेस असलेल्या महाराष्ट्र प्रांतांशीं आहे. दुसऱ्या प्रांतांतून ह्याही प्रांतांत पुष्कळ लोक येऊन राहिले आहेत, परंतु यासंबंधानें आतां परिपूर्ति झालेली आहे. या प्रांतांत गहूं, कापूस व गळिताचीं धान्यें वगैरे निर्गत होणाऱ्या मालाचेंच उत्पन्न फार होतें.

या प्रांताचा कारभार कमिशनर पहातो व तो हैदराबादचे रेसिडेंटाचे हाताखालीं आहे.

कुर्ग—प्रांत सन १८३४ सालीं तेथील राजानें आपल्या मांडलिकांवर फार जुलूम केल्या कारणानें खालसा करण्यांत आला. हा प्रांत ह्मैसूरचे पश्चिमेस आहे व कॉफी वगैरे विदेशीय वृक्षवर्गाचे संवर्धनास योग्य आहे. युरोपियन व एतद्देशीय लागवड करणारे लोक तेथें लागवडीसाठीं जाऊन राहिले आहेत व मजूरदार लोकांचाही गुजारा तेथें चांगला चालतो. ह्या प्रांताचा कारभार कमिशनर पाहतो व तो ह्मैसूरचे रेसिडेंटाचे हाताखालीं आहे. बंगलोर शहर सन १८८६ सालीं ह्मैसूरचे राजास त्याचें संस्थान परत देतांना ठेऊन घेतलें व तें इंग्रजी मुलखांत सामील करण्यांत आलें आहे. या शहरांत लोकवस्ती सुमारें एक लक्ष आहे.

ब्रिटिश बलुचिस्तान—संबंधानें जास्त उल्लेख पुढें करण्यांत येईल. वरील पत्रकांत क्वेटा व लोरेलाई क्यांटोन्मेंटांतील व त्या बाजूचे आगगाडीचे रस्त्यावरील लोकांची संख्या दिली आहे. या प्रांताचे चीफ कमिशनरचे ताब्यांत याशिवाय जो प्रांत आहे त्यांत लोकवस्ती १४५२१७ आहे.

अंदमान व निकोबार—यांचे संबंधानें सांगण्यासारखें कांहीं नाहीं. पोर्ट ब्लेर हें हद्दपार केलेल्या कैद्यांचें ठिकाण १८५८ सालीं ठरविण्यांत आलें व हल्लीं त्यासंबंधानें त्यांत वस्ती १५६०९ आहे. बाकीचे त्या बेटाचे भागांत रानटी लोक रहात आहेत.

लकदीव व मिनिकोई बेटें मिळून त्यांचे दोन भाग केले आहेत. उत्तरभाग दक्षिणकानारा प्रांतांत मोडतो व त्या प्रांताचे अधिकारी त्या बेटाची व्यवस्था पहातात व बाकीचा भाग मलबारचा भाग असें समजतात. या बेटांची लोकसंख्या १४ किंवा १५ हजार आहे. ते मासे मारणें व काथ्याचीं सोलें वगैरे जिन्नस करणें, हीं कामें करतात. या बेटांची देखरेख हिंदुस्थानांतून सरकारी अंमलदार जाऊन करतात ; बाकी त्या रहिवाशांस स्वतंत्रता असल्यासारखीच आहे व विशेष कांहीं झालें तर तेच येऊन सरकारी अंमलदारांस कळवितात.

आतां ब्रह्मदेशाबद्दल सांगण्याचें राहिलें. ब्रह्मदेशाचा खालचा भाग पेगूचे दोन्ही बाजूंचा सन १८२६ सालीं इंग्रजी राज्यांत सामील झाला. वरचा ब्रह्मदेश १८८६ सालापर्यंत तेथील राजाचेच ताब्यांत होता. त्या राजानें खालच्या ब्रह्मदेशावर स्वारी करण्याचा बेत केला व त्याची वर्तणूकही अन्यायाची होती, म्हणून तो प्रांत खालसा करण्यांत आला. तो प्रांत सन १८८५ चे अक्टोबर महिन्यांत इंग्लिशांचे सैन्याचे ताब्यांत आला व पुढील जानेवारींत तो कायम खालसा झाला. वरच्यापेक्षां खालचा ब्रह्मदेश फार सुपीक आहे व तेथून पुष्कळ तांदूळ परदेशास जातो. वरच्या ब्रह्मदेशास चांगली जमीन पुष्कळ आहे, परंतु पर्जन्याची कमताई व अनिश्चितपणा, मजूरदारांचा अभाव ह्या त्या प्रांताच्या उणीवा आहेत. या प्रांताचा कारभार चीफ कमिशनर पहातो व त्याचें ठाणें रंगून येथें असतें.

हा थोडका वर्णनात्मक भाग पुढील भागांस उपोद्घातादाखल दिलेला आहे. पुढें प्रांताप्रांतांतील राजव्यवस्थेचें जें वर्णन करण्यांत येईल तें समजण्यास हा उपोद्घात उपयोगी होईल.

भाग दुसरा.

राज्यव्यवस्था.

मागलि भागांत देशाचा विस्तार व त्यांतील प्रांतांचें सामान्य वर्णन दिलें आतां इंग्रजांचे अमलांत असलेल्या प्रांतांची राज्यव्यवस्था कोणत्या पद्धतीवर चालते त्याचें वर्णन करावयाचें आहे.

हिंदुस्थानांत सर्वांत श्रेष्ठ अधिकारी व्हाइसराय ह्मणजे बादशाहिणीचे प्रतिनिधि हे होत. सर्व राज्यकारभार " गव्हरनर-जनरल-इन् कौन्सिल " असे नांवानें चालतो, व त्यांचें नियंतृत्व हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी यांकडे आहे. हिंदुस्थानचे सर्व प्रांतांवर हिंदुस्थानसरकारचा अधिकार आहे, तरी तो सर्व ठिकाणीं एकाच रीतीनें चालविण्यांत येत नाहीं. कांहीं प्रांत प्रत्यक्ष त्यांचे हाताखालीं आहेत, व कांहीं प्रांतांवर गव्हरनर, लेफ्टनेंट गव्हरनर, व कमिशनर असे अंमलदार आहेत. मद्रास व मुंबई इलाख्यांचे स्थानिक सरकारांस इतर प्रांतांतील स्थानिक सरकारांपेक्षां जास्त स्वातंत्र्य आहे. त्या दोन इलाख्यांत मुख्य अधिकारी गव्हरनर असून त्यांची नेमणूक गव्हरनर-जनरल यांचेकडून होत नाहीं, ती खुद्द राजा किंवा राणी यांकडून होते; तरी ते गव्हरनर-जनरलचे

हाताखालचे आहेत असें पार्लमेंटचे कायद्यानें ठरविलें आहे. त्यांचे कामावर देखरेख करण्याचा व त्यांचें नियमन करण्याचा अधिकार गव्हरनर-जनरल यांस ठेविला आहे. (३ व ४ वुइलियम धि फोर्थचा ८५ कलम ६५.) वर सांगितल्याप्रमाणें या इलाखाधिपतींस गव्हरनर असें ह्मणतात. त्यांचे मदतीस एक कौन्सिल असतें. या गव्हरनरांचा व स्टेटसेक्रेटरी यांचा स्वतंत्रपणानें पत्रव्यवहार चालतो. तसेंच या इलाख्यांत कायदे करण्यासाठीं स्वतंत्र कौन्सिलें आहेत. या सर्व कारणांमुळें या प्रांतांत, प्रत्यक्ष हिंदुस्थानसरकारचे अमलांत असलेल्या प्रांतांपेक्षां, पुष्कळ बाबतींत भिन्न अशी राज्यव्यवस्था चालते.

हिंदुस्थानावरचे श्रेष्ठ सरकारास " हिंदुस्थानसरकार " असें ह्मणतात, व इतर प्रांतांचे सरकारांस प्रांतिक किंवा स्थानिक सरकार किंवा अड्मिनिस्ट्रेशन असें ह्मणतात. " हिंदुस्थानसरकार " या पदांत गव्हरनर-जनरल, त्यांचे एक्झिक्यूटिव्ह (कारभाराचें व अंमलबजावणीकरतां असलेलें कौन्सिल) व कायदे करण्यासाठीं असलेलें कौन्सिल व चिटणीसमंडळ या सर्वांचा समावेश होतो. या सरकारची मुख्य जागा ह्मणजे कलकत्ता येथील फोर्ट वुइलियम ही होय. त्या ठिकाणीं त्या सरकारचें ठाणें नोव्हेंबरपासून एप्रिलपर्यंत असतें; तेथून पुढें आक्टोबरपर्यंत सिमला येथें असतें.

गव्हर्नर-जनरल किंवा व्हाइसराय यांची योजना विलायतेंतील वरिष्ठ प्रतीचे मुत्सद्यांतून करण्यांत येते. त्यांचे नेमणुकीची मुदत नियत नाहीं; वहिवाटीवरून ती पांच वर्षांची ठरलेली आहे. कायद्यानें पाहतां व्हाइसराय हे फक्त कौन्सिलाचे मुख्य आहेत व कौन्सिलांत मतभेद होऊन उभय पक्षीं बरोबर मतें होतील तर मात्र त्यांस एक अधिक मत-कास्टिंग व्होट-देण्याचा अधिकार जास्त असतो. कौन्सिलांत बहुमतानें जें ठरलें असेल तें रहित करून किंवा कौन्सिलाशिवाय स्वतंत्रपणानें देशाचें संरक्षण, शांतता किंवा हिताहित यांसंबंधानें विशिष्ट काम करणें किंवा न करणें अतिशय जरूर आहे असें व्हाइसरायसाहेबांस वाटेल त्या वेळीं, आपल्या मताप्रमाणें हुकूम करण्याचा त्यांस अधिकार आहे. मात्र अशा प्रसंगीं ज्यांनीं भिन्न मतें दिलीं असतील त्या सभासदांची इच्छा असल्यास त्यांचीं मतें व कारणें दाखल केलेलीं टिपणें स्टेटसेक्रेटरी यांकडे पाठवावीं लागतात. (३३ व्हिक्टोरिया चा० ३ कलम ५). गव्हरनर-जनरल कौन्सिलबरोबर न घेतां प्रांतांत फिरत असतील तर त्या मुदतींत कौन्सिलापैकीं एकास कौन्सिलचा प्रेसिडेंट नेमण्याचा त्यांस अधिकार आहे, व त्या मुदतींत कायदे करण्याशिवाय त्यांस सर्व अधिकार स्वतः चालवितां येतात. हिंदुस्थानसरकारचे किंवा प्रांतिक सरकारांचे कौन्सिलांत मंजूर झालेले सर्व

कायद्यांस स्वतः गव्हरनरजनरलांची मंजुरी लागते; व कौन्सिलांत कायदे पास
होण्याचे वेळीं ते हजर असले तरीही संमति शिवाय द्यावी लागते. वर सांगि-
तल्याप्रमाणें जरूरीच्या प्रसंगीं कौन्सिलाशिवाय आपले स्वतःचे अधिकारानेंच
शांतता व राजकारणासाठीं हुकूम करण्याचा त्यांस अधिकार आहे, व असे
हुकूम सहा महिने अमलांत राहतात.

प्रथमतः गव्हरनरजनरलास कौन्सिलाचें मत मोडून काढण्याचा अधिकार
नव्हता. सर्व काम कौन्सिलाचे बहुमताप्रमाणें चालण्याचें असे (रेग्युलेटिंग
आक्ट १७७३), व त्या वेळेस मुंबई व मद्रास येथील गव्हरनरांवरीलही
त्यांचा अधिकार चांगला स्पष्ट रीतीनें ठरविलेला नव्हता. वारेन-हेस्टिंग्ज व
त्यांचें कौन्सिल यांचे इतिहासप्रसिद्ध भांडणापासून बहुमतावरच राज्यसूत्रें
ठेवण्याचें वैय्यर्थ्य स्पष्ट झालें व सन १७८६ सालीं लॉर्ड कार्नवालिस यांनीं प्रसंगीं
कौन्सिलाचें मत बाजूस ठेविण्याचा अधिकार दिल्याशिवाय राज्यकारभार पत-
करण्याचें नाकबूल केलें, तेव्हां तो अधिकार गव्हरनर-जनरलास देण्यांत आला.
पुढें सन १७९३ सालचे कायद्यानें तो अधिकार जास्त वाढविला व तसाच अ-
धिकार मद्रास व मुंबई येथील गव्हरनरांसही देण्यांत आला. याच कायद्यानें
गव्हरनर-जनरल यांचा अधिकार सर्व हिंदुस्थानावर आहे असें ठरलें (३ व ४
वुइलियम धि फोर्थचा ८५).

गव्हरनर-जनरल यांस खासगीसाठीं कांहीं अंमलदार ह्मणजे एक प्रायव्हेट
सेक्रेटरी, एक असिस्टंट प्रायव्हेट सेक्रेटरी, एक मिलिटरी सेक्रेटरी, सहा किंवा
आठ अडिकांप व एक सरजन (वैद्य) नेमून दिलेले आहेत; त्या अडिकांपांपैकीं
दोन नेटिव्ह असतात.

गव्हरनर-जनरलांचे एक्झिक्यूटिव्ह (राज्य कारभाराचें काम करणारें) कौ-
न्सिलांत साधारणतः पांच सभासद असतात; व कमांडर-इन्‌चीफ हेही एक्स्ट्रा
आर्डिनरी (नियमित संख्येबाहेर जास्त) सभासद असतात. सन १८७४ चे
कायद्यावरून पब्लिक वर्क्स् खात्यासाठीं एक जास्त कौन्सिलदार नेमण्याचा
अधिकार दिला आहे. प्रसंगीं मद्रास व मुंबई इलाख्यांचे हद्दींत कौन्सिल भरलें
असतां तेथील गव्हरनर हेही त्या कौन्सिलांत अडिशनल –जादा–सभासद
असतात. या कौन्सिलदारांचीही नौकरीची मुदत अनियमित आहे, तरी वहि-
वाटीवरून पांच वर्षांची ठरली आहे. गव्हरनर-जनरलाबरोबर एक कौन्सिलदार
असला ह्मणजे कोरम–काम चालविण्यास अवश्य अशी सभासदांची संख्या–होते.
या पांच कौन्सिलदारांपैकीं तीन इसम हिंदुस्थानांत दहा वर्षें नोकरी केलेले
असले पाहिजेत. शिवाय एक ब्यारिस्टर असावा लागतो व एक पब्लिक वर्क्स्

खात्यासाठीं कौन्सिलदार नेमला तरी चालतो. साधारणतः कौन्सिलांत एक लष्करी अंमलदार, एक खजिन्याची व्यवस्था पाहणारा, व इंडियन सिव्हिलसर्व्हिस पैकीं दोन किंवा तीन कौन्सिलदार इतके असतात. (२४–२५ व्हिक्टोरियाचा ६७ सन १८६१). गव्हरनर जनरल व कौन्सिलदार हे आपल्यामध्यें कामाची वांटणी करून घेतात. न्यायखातें, पब्लिक वर्क्स, फिनान्स ह्मणजे जमाबंदी खातें लष्करी खातें, शेतकी व होम–(अंतर्व्यवस्था) व मुलकी खातें ह्या खात्यांचीं कामें एक एक कौन्सिलदाराकडे असतात, व परराष्ट्रासंबंधाचें काम व्हाइसरायसाहेब बहुधा स्वतःकडे ठेवितात. या कौन्सिलांत कामाची व्यवस्था अशी असते कीं त्या त्या खात्याचे सेक्रेटरी आपले खात्याचे कौन्सिलदाराकडे काम पाठवितांना आपला अभिप्राय दाखल करितात, व त्याजवर कौन्सिलदार कायमचा हुकूम देतात. महत्वाचे कामांत कौन्सिलदार हे कागदपत्र आपले अभिप्रायासह गव्हरनरजनरलसाहेबांकडे पाठवितात. त्यांचा व कौन्सिलदाराचा अभिप्राय जुळल्यास प्रकरणाचा निकाल होतो, भिन्न मतें झाल्यास तें प्रकरण कौन्सिलापुढें ठेवण्यांत येतें. तसेंच प्रत्येक खात्याचे सेक्रेटरीवर आपआपले खात्यांतील विशेष महत्वाचीं सर्व कामें गव्हरनरजनरल यांचे नजरेस आणण्याची जबाबदारी असते.

कायदेकोन्सिल हें स्वतंत्र दुसरें कौन्सिल आहे असें ह्मणण्याचा प्रघात आहे; परंतु खरा प्रकार असा आहे कीं, गव्हरनरजनरलांचें कौन्सिल एकच असून त्यांत कायदे करण्याचे प्रसंगीं मात्र जादा सभासद असतात; या जादा सभासदांपैकीं निम्मे सरकारी नोकरींत नसलेले असावे लागतात व त्यांत कांहीं नेटिव नेमण्यांत येत असतात. जादा सभासदांची नेमणूक दोन वर्षांची असते. ज्या प्रांतांत कोन्सिल भरेल तेथील लेफ्टनेंट गव्हरनर हे त्यांत जादा सभासद ह्मणून बसतात. पूर्वींचे कायद्याप्रमाणें जादा सभासदांची संख्या ६ पासून १२ असावी असें होतें. या व प्रांतिक कौन्सिलांचे संबंधानें सन १८९२ सालीं एक नवीन कायदा झाला. त्यांत हिंदुस्थानसरकाराचे कौन्सिलांत सभासदांची संख्या दहापेक्षां कमी व सोळापेक्षां जास्त असूं नये असें ठरलें आहे. या मर्यादेप्रमाणें असावयाची संख्या वेळोवेळीं गव्हरनरजनरल यांनीं ठरवावी; सभासदांच्या नेमणुकी, जमाखर्चाचे अंदाजासंबंधानें वादविवाद, व प्रश्न विचारण्याचा अधिकार, यांसंबंधानें गव्हरनरजनरल यांणीं स्टेटसेक्रेटरी यांचे पसंतीनें नियम करावे; हल्लींचे नियमाप्रमाणें कौन्सिलांत सोळा जादा सभासद असावे, असें ठरलें आहे. त्यांपैकीं सहा सरकारी नोकर व दहा नोकरींत नसलेले असे असून नोकरींत नसलेले सभासदांची नेमणूक व्हावयाची ती अशीः—चार सभासद, चार प्रांति-

क कौन्सिलांतील नोकरींत नसलेले सभासदांनीं निवडून देण्याचे, पांचवा सभासद बंगाल्यांतील चेंबर आफ् कामर्स नामक व्यापारी मंडळीनें निवडण्याचा, बाकीचे पांचांची नेमणूक गव्हरनरजनरल यांनीं कौन्सिलापुढें येणारे कामाचे अनुरोधानें सर्व वर्गांचे प्रतिनिधि यावे अशा प्रकारानें करावयाची; कांहीं प्रसंगीं विशेष वर्गांचे संबंधाचे कायद्याचा मसुदा कौन्सिलापुढें येतो, व तशा वेळीं त्या वर्गांचा प्रतिनिधि असणें इष्ट असतें; तसेंच कांहीं प्रसंगीं विशेष प्रांतांचाच सभासद असणें किंवा विशिष्ट ज्ञानाचे लोक कौन्सिलांत असणें अगत्याचें असतें; तेव्हां प्रसंगाप्रमाणें सभासद नेमण्यास सवड रहावी ह्मणून हे सभासद नेमण्याचा अधिकार गव्हरनरजनरल यांनीं आपलेकडे ठेविला आहे. कौन्सिलापुढें जमाखर्चाचे अंदाजाबद्दल वादविवाद होण्यास एखादे करासंबंधानें कायद्याचा मसुदा कौन्सिलापुढें आला असेल तर मात्र पूर्वींचे कायद्याप्रमाणें सवड असे ; नवीन कायद्याप्रमाणें हा वादविवाद करण्यास कौन्सिलास अधिकार मिळाला असून सभासदांस टीका करण्याचा व फडणीस व व्हाइसराय यांस उत्तर देण्याचा अधिकार आहे. वादविवादानंतर मतें घ्यावयाचीं नाहींत किंवा सभासदांस योग्य दिसेल तसा ठराव पुढें आणण्याचा अधिकार नाहीं. प्रश्न विचारण्याचे संबंधानें असा नियम करण्यांत आला आहे कीं, ज्या सभासदांस प्रश्न विचारण्याचे असतील त्यांनीं त्या प्रश्नांबद्दल आगाऊ योग्य सूचना दिली पाहिजे; व माहिती मिळविण्यासाठीं विनंति अशा स्वरूपानें ते विचारिले पाहिजेत; भाषा विवादोत्पादक किंवा अपमानकारक नसावी; व प्रश्न कल्पित हकीकतीस अनुसरून असूं नयेत. प्रश्नाचें उत्तर मिळेल त्यावर वादविवाद करण्याची परवानगी नाहीं. प्रश्नाचें उत्तर देणें देशहिताचे दृष्टीनें योग्य नाहीं असें दिसून आल्यास प्रेसिडेंट यांस तो प्रश्न नामंजूर करण्याचा अधिकार आहे.

पार्लमेंट सभेनें हिंदुस्थानची राज्यव्यवस्था ज्यांत ठरविली आहे असे कायदे पालटण्याचा किंवा प्रजाधर्मासंबंधानें कायदे करण्याचा अधिकार या कौन्सिलास नाहीं. याशिवाय बाकीचे बाबतींत कायदे करण्याचा कौन्सिलास पूर्ण अधिकार आहे. सभासदांस कायद्याचा मसुदा सादर करितां येतो; परंतु जमाबंदी, कर्ज, धर्मसंबंध, लष्कर किंवा आरमार व त्यांचें शिक्षण, व परराष्ट्रांबरोबरील संबंध, या विषयांसंबंधीं कायद्याचा मसुदा कौन्सिलापुढें आणण्यास गव्हरनर-जनरल यांची मंजुरी पाहिजे. कायदे अमलांत येण्यासही गव्हरनर-जनरल यांची मंजुरी पाहिजे हें वर सांगितलेंच आहे. राजास कायदे रद्द करण्याचा अधिकार आहे. या कौन्सिलांतील वादविवाद ऐकण्यास सर्व लोकांस मोकळीक

आहे. या कोन्सिलाचें कोरम सहा सभासद व प्रेसिडेंट मिळून होतें व प्रेसिडेंटास कास्टिंग व्होट असतें.

याप्रमाणें या कायद्यानें कौन्सिलांत सुधारणा झाली आहे व त्याचे अधिकारही वाढले आहेत. सरकारी नौकरींत नसलेले इसम कौन्सिलांत जादा सभासद नेमण्याची वहिवाट गेले तीस वर्षांपासून आहे. या मुदतींत त्या सभासदांचे ज्ञानाचा व अनुभवाचा व स्थानिक माहितीचा सरकारास फार उपयोग झाला व लोकांस स्थानिक स्वराज्याचे बाबतींत, व व्यापाराचे कामीं, संघानें कामें करण्याची पुष्कळ सवय झाली, तेव्हां या दिशेनें कौन्सिलांतही सुधारणा करणें सरकारास जरूर झालें.

हिंदुस्थानसरकारचे कौन्सिलाप्रमाणें प्रांतिक कौन्सिलांतही त्याच कायद्यावरून सुधारणा झाली तिजबद्दल विशेष उल्लेख पुढें करण्यांत येईल.

हिंदुस्थानसरकारचे सात सेक्रेटरी (चिटणीस) असतात, व त्यांचेकडे (१) होम (अंतर्व्यवस्था) (२) फारिन (परराष्ट्रसंबंधीं व्यवस्था), (३) फिनान्स (जमाबंदी), (४) लष्करी, (५) पब्लिक वर्कस्, (६) मुलकी, शेतकी व व्यापार, (७) लेजिस्लेटिव (कायदे करण्याचें) या खात्यांचीं कामें असतात. त्यांचे कामाचे संबंधानें विशेष विस्तारानें सांगण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

राज्यकारभार प्रत्यक्ष रीतीनें, आठ स्थानिक सरकारांचे हातून होतो. त्यांत दोन गव्हरनर, तीन लेफ्टनेंट गव्हरनर, व तीन चीफ कमिशनर आहेत. मद्रास व मुंबई येथील गव्हरनरांचे कामांवर राणीकडून इंग्लंडांतील मुत्सद्यांपैकीं कोणाची तरी नेमणूक होते. केव्हां केव्हां हिंदुस्थानांतील अंमलदाराचीही नेमणूक झालेली आहे. गव्हरनराचे जोडीस दोन कौन्सिलदार, राणीसरकाराकडून इंडियन सिव्हिल सर्व्हिसपैकीं, नेमण्यांत येतात, व या कौन्सिलांत कमांडर-इन्-चीफ (सेनापती) हे जादा सभासद असतात. इलाख्यांतील सेनेसंबंधानें नवीन व्यवस्था करण्याचा विचार होऊन अखेर इलाख्याचे कमांडर–इन्–चीफ कमी करण्याचें ठरलें आहे, व त्यांचे जागीं जो पुढें अंमलदार नेमण्यांत येणार त्यास कौन्सिलांत जागा असणार नाहीं. कौन्सिलांत सारखीं मतें पडलीं असतां जास्त मत देण्याचा व कौन्सिलदारांचें मत एकीकडे ठेवून स्वतंत्रपणानें विशेष प्रसंगीं काम करण्याचा अधिकार गव्हरनरासही आहे. कायदेकौन्सिलांत सदरचे सभासदांशिवाय, अडव्होकेट-जनरल, व चारपासून आठ जादा सभासद असतात. नवीन कायद्याचे पूर्वी मुंबईस पांच व मद्रासेस चार नेटिव्ह सभासद असत.

सन १८९२ चे कायद्यावरून प्रांतिक कौन्सिलांत जी सुधारणा झाली तीप्रमाणें

मुंबई व मद्रास येथील कौन्सिलांत जादा सभासदांची संख्या २० ठरविण्यांत आली व या संख्येपैकीं नवापेक्षां जास्त सरकारी नोकर नसावे असें ठरलें. सभासद निवडण्याची पद्धति दोनही प्रांतांत सारखीच आहे, सबब एका प्रांताचे नियमांचा गोषवारा येथें दिला ह्मणजे पुरे होईल. उदाहरणार्थ, मुंबईइलाख्यांत सरकारी नोकरींत नसलेले इसम ११ निवडण्याचे, पैकीं मुंबईचें म्युनिसिपाल कारपोरेशन व युनिव्हरसिटीचें सेनेट एक एक सभासद निवडून त्यांची शिफारस करितात; लोकल बोर्ड, म्युनिसिपालिट्या, जाहागिरदार व मोठे जमीनदार लोकांच्या सभा, ज्यांस गव्हरनरसाहेब अधिकार देतील ते सहा इसम निवडून त्यांची शिफारस करतात; बाकी तीन राहिले त्यांची नेमणूक सरकारपसंतीनें होते. भिन्न भिन्न वर्गांचे प्रतिनिधि आणण्यास, व ज्या लोकांची स्थिति एके ठिकाणीं मिळून सभासद निवडून देण्याची नाहीं, अशा लोकांच्या इच्छा सरकारास कळाव्या ह्मणून लायक असे इसम कौन्सिलांत आणण्यास या तीन नेमणुकांचे योगानें सरकारास सवड ठेवण्यांत आली आहे.

वायव्यप्रांतांतील कौन्सिलांत १५ सभासद असावे असें या नवीन कायद्यांत ठरलें; त्यांपैकीं सातांपेक्षां अधिक सरकारी नोकर नसावे. युनिव्हरसिटी एक सभासद निवडून देते; म्युनिसिपालिट्या, लोकल बोर्डें व जमीनदारांच्या व व्यापारी-उदम्यांच्या सभा यांनीं पांच निवडून द्यावे असें ठरलें आहे. बंगालचे कौन्सिलांतील सभासदांची संख्या २० पेक्षां जास्त असण्याची नाहीं. त्यांपैकीं सात कलकत्याची म्युनिसिपालिटी, लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या, व्यापारी व उदम्यांच्या सभा निवडून देतात. बाकीच्या जागांवर सभासद लेफ्टनेंट गव्हरनर यांनीं नेमण्याचे आहेत; त्यांत एक मोठे जमीनदारांपैकीं नेमला पाहिजे, असें ठरविलें आहे. मद्रासेंतही असाच एक सभासद जमीनदारांपैकीं नेमण्याचा आहे, परंतु मुंबईप्रमाणें त्याची निवडणूक जमीनदारांनीं करण्याची नाहीं; ती सरकार करतें.

जमाखर्चाचे खर्ड्यावर वादविवादासंबंधानें व प्रश्न विचारण्याचे संबंधानें नियम हिंदुस्थानचे कौन्सिलाचे जे नियम वर सांगितले त्यांप्रमाणेंच प्रांतिक कौन्सिलांसंबंधें करण्यांत आले आहेत. जमाखर्चाचे खर्ड्यावर वादविवाद करणें झाल्यास प्रांतिक सरकारचे हातांतील जमाखर्चाचे बाबतीसंबंधानें मात्र असावा; प्रश्न विचारणें असल्यास ते प्रांतिक सरकारचे अधिकारांतील बाबीसंबंधानेंच असावे. प्रांतिक सरकार व हिंदुस्थानसरकार यांचे दरम्यान ज्या विषयांचा पत्रव्यवहार चालू असेल, तशा विषयांचे संबंधानें प्रश्न विचारण्यास अधिकार नाहीं.

बंगाल, वायव्य व पंजाब प्रांतांवर लेफ्टनेंट गव्हरनर आहेत, व हे दहा

वर्षें हिंदुस्थानांत नौकरी केलेले नौकरांपैकीं गव्हरनरजनरलांकडून राजाचे मंजुरातीनें नेमण्यांत येतात. हे बहुधा सिव्हिल सर्व्हिसपैकींच नेमण्यांत येतात. पहिले दोन प्रांतांत कायदेकौन्सिलें आहेत. वायव्यस्टप्रांतांत १८८६ सालीं कौन्सिल नवीन स्थापन झालें. या प्रांतांत एक्झिक्युटिव्ह कौन्सिल नाहीं. त्यांचें ऐवजीं बोर्ड आफ्रेविन्यू असतें किंवा (पंजाब व ब्रह्मदेशांत) फिनान्सिअल कमिशनर असतो. मद्रासेंत कौन्सिल असूनही बोर्ड आफ रेविन्यू आहे, परंतु या इलाख्यांत इतर प्रांतांत जसे कांहीं जिल्ह्यांचे समुदायासाठीं डिव्हिजनल कमिशनर असतात तसे नाहींत. ब्रह्मदेश, मध्यप्रांत व आसाम यांत कमिशनर आहेत. प्रत्येक प्रांतांत चिटणीस मंडळ असतेंच. प्रत्येक प्रांतांत वेगळाले बाबतींची वेगळालीं खातीं केलेलीं आहेत, व त्यांची व्यवस्था सर्व ठिकाणीं बहुतेक एक नमुन्यावर चालते. पब्लिक वर्क्स खात्यांत रेलवे, कालवे, व रस्ते असे तीन भाग आहेत. शिक्षण, रजिस्ट्रेशन, पोलिस, तुरुंग, जंगल, मोजणी, पोष्ट, स्वच्छता, वैद्यकी हीं खातीं सर्व प्रांतांत वेगळालीं आहेत. मोठाले प्रांतांत या शिवाय मीठ, दारू व मादक पदार्थ व अफू यांची व समुद्र काठींचे प्रांतांत कस्टम व मरीन हीं खातीं जास्त असतात. या शिवाय कांहीं विशेष कामांसाठीं, ह्मणजे शेतकीचें शिक्षण व चौकशी, नमुन्याची शेतें, बोट्या निकल (वनस्पती शास्त्रा प्रमाणें) बाग, मीटीआरालजी (हवा व पाऊस वगैरेची माहिती देणेचें) व ज्योतिष शास्त्र, या कामावर वेगळाले अमलदार असतात, व त्यांचें काम हिंदुस्थान सरकारचे होम व मुलकी खात्यांशीं चालतें.

सुधारणेंत मागें असलेले किंवा पूर्ण स्वस्थता झाली नसलेले प्रांतांत राज्य व्यवस्थेची पद्धति संपूर्ण एकदम चालू करणें प्रशस्त नसतें, ह्मणून तसे प्रांत वेगळे ठेवण्यांत येतात. असे प्रांतांस नान रेग्युलेशन प्रांत असें ह्मणतात. असे प्रांतांत कायदे मुद्दाम लागू करण्यांत येईपर्यंत, अमलांत येत नाहींत. व मुलकी व न्यायाचें काम एकच अंमलदाराकडे असतें, व त्या अंमलदारांस जमाबंदी व दिवाणी न्यायाचे संबंधानें इतर प्रांतांतील अंनलदारांपेक्षां जास्त मुखत्यारी असते. असे प्रांतांसाठीं वेगळे कायदे करण्याचा गव्हरनर-जनरल यांस अधिकार आहे. या प्रांतांतील अधिकाऱ्यांचे हुद्याचीं नांवे हीं वेगळीं असतात. सर्व कारभार पाहणारे अंमलदार मिळून एक कमिशन असें मानून तेंच नांव सर्व अंमलदाराचे हुद्यांस लागतें, व तसे प्रांतांत लष्करी अंमलदार मुलकी कामावर असतात. पंजाब वगैरे इंग्रजींत फार दिवसांपूर्वीं सामील झालेले प्रांतांत आतां वरिष्ठ अंमलदार लष्करी असत नाहींत. तेथील सर्व अंमलदारीचे जागांवर सिव्हिल सर्व्हिसचे लोक नेमण्यांत येतात.

राज्य व्यवस्थेसाठीं प्रांतांचे भाग केलेले आहेत, त्यांस जिल्हे असें ह्मणतात. असे जिल्हे २४९ आहेत. या संख्येंत ब्रिटिश बलूचिस्थान, आंदमान बेटें व लुशी लोकांचा नुकताच घेतलेला प्रांत हे येत नाहींत. जिल्ह्यावर अधिकारी कलेक्टर किंवा डेपुटी कमिशनर हा असतो, व तो न्याय खात्याशिवाय बाकीचे सर्व खात्यांचा मुख्य असतो. जमीन बाब, स्टांप वगैरेचा वसूल तो करितो; तोच मुख्य माजिस्ट्रेट असतो, व खालचे माजिस्ट्रेट व पोलीस यांचेवर त्याची देखरेख असते. तसेंच तुरुंग, शाळा, रस्ते, दवाखाने, जंगल, रजिस्ट्रेशन, वगैरेंचे स्थितीचे संबंधानेंही त्यास साधारण देखरेख करावी लागते. स्थानिक स्वराज्य व्यवस्थेप्रमाणें चालणारे कामांवर त्यास देखरेखीचा अधिकार ठेविला आहे. हे अंमलदार जिल्ह्यांत फिरतीवर जातात, त्यापासून त्यांस त्यांचे अमलांतील प्रांतांची माहिती होते, व हाताखालील लोकांचे कामांवर देखरेख होते व रयतेस दाद लागण्यास सुलभ साधन होतें. असे प्रकारानें यावरिष्ठ अंमलदारांचा रयतेशीं प्रत्यक्ष संबंध असल्यानें आणखी एक मोठा फायदा होतो, तो असा कीं, सरकारचे प्रतिनिधि ह्मणजे नुसते सह्या करणारे यंत्र नसून त्यांचें अत्यंत अगत्य बाळगणारे असतात अशी त्यांस प्रतीति येते. ह्या सर्व कामांशिवाय लोकांची सांपत्तिक, सामाजिक, राजकीय व आरोग्य संबंधानें स्थिति कशी आहे ह्याबद्दलही त्यांस सरकारास माहिती द्यावी लागते. याचे मदतीस असिस्टंट व डेपुटी–कलेक्टर असतात, व ते कलेक्टर नेमून देईल त्याप्रमाणें कामें करितात.

जिल्ह्याचे पोट विभाग केलेले असतात त्यांस तहशिल किंवा तालुके ह्मणतात. त्यांचेवर मामलेदार किंवा तहशिलदार किंवा मुखत्यारकर (सिंधप्रांतांत) असतात. त्यांचेकडे मुलकी व माजिस्ट्रेटी काम असतें. या अंमलदार लोकांचा रयतेशीं अतीशय निकट संबंध असल्यामुळें हे जिल्हाधिपतीचे खालोखाल महत्वाचे अंमलदार आहेत. तालुक्याचे खालची राज्य व्यवस्थेची पायरी ह्मणजे गांव किंवा खेडीं, यांत एक गांवचा मुख्य पाटील असतो. तो गांवचा वसूल करितो, व त्यास थोडा पोलिशीचा अधिकार असतो. त्याचे मदतीस कुलकर्णी किंवा गांवचा फडणवीस व दुसरे नौकर असतात. बंगाल्यांतील व्यवस्था थोडी वेगळी आहे. त्या प्रांतांत साऱ्याची कायमची दर ठरोती झाली असल्यामुळें जिल्ह्याचे विभाग करतांना वसुलीचे सोईचे विचारापेक्षां पोलिस किंवा माजिस्ट्रेटी कामाची सोय जास्त पाहिली जाते; व या कारणानें जिल्ह्याचे पोट विभागांची (ठाण्यांची) हद्द तहशील किंवा तालुक्यापेक्षां मोठी असते. ती व्यवस्थाही सर्वत्र सारखी नसते. ब्रह्मदेशांत तहशिलाचे साम्यतेचा भाग ह्म-

णजे मायोक याचे अमलाखालीं असतो तितका व त्याचे खालील पायरी ह्मणजे कांहीं गांवागांवाचे मेळे ही होय, व त्यांचे वर थुग्यी ह्मणून अंमलदार नेमलेला असतो.

सिव्हिल राज्यव्यवस्था चार प्रकारचे नौकर लोकांचे हातीं असतें. पहिल्या वर्गाचे काव्हेनांटेड नोकर लोक (करारनामा केलेले), दुसऱ्या वर्गाचे स्टाटयुटरी, तिसऱ्या वर्गाचे अनकाव्हेनांटेड नौकर लोक व चवथ्या वर्गाचे स्टाफ कोअर या लष्करांपैकीं दिवाणी कामांत असलेले नौकर लोक असें नौकरांचे चार वर्ग आहेत. काव्हेनांटेड (ह्मणजे करार केलेले) असें त्यांस मूळ नांव पडण्याचें कारण असें आहे कीं, त्या नौकर लोकांस नेमणूक होण्याचे वेळीं एक करार सही करून द्यावा लागे, व तसा इतर नोकर लोकांस द्यावा लागत नसे अजूनही हा करारनामा देण्यांत येतो. त्यांत व्यापार करणार नाहीं, नजर घेणार नाहीं व स्वतः साठीं व कुटुंबासाठीं पेनशनाची वर्गणी भरीन वगैरे शर्ती असतात. आतां शाळा, इंजिनियरिंग, जंगल वगैरे खात्यांत नौकर नेसून पाठवितांना त्यांचे जवळूनही करारनामा लिहून घेण्यांत येतो; तेव्हां पहिल्या वर्गाचे लोकांसच काव्हेनांटेड ह्मणजे सनदी हें नांव अन्वर्थक राहिलें नाहीं. अलीकडे काव्हेनांटेड हें नांव जाऊन सिव्हिल सर्व्हिस आफ इंडिया हें नांव देण्यांत आलें आहे. स्टाटयूटरी हें नांव सनदी नोकर लोकासाठीं राखून ठेविलेले जागांवर ३३ व्हिक्टोरिया चा० ३ या स्टाटयूट ह्मणजे कायद्याप्रमाणें नेमलेले लोकांस देण्यांत येतें.

इंडियन स्टाफ कोअरही पलटण सन १८६१ सालीं राणीचे हुकमानें (रायलवारंटावरून) स्थापन करण्यांत आली. कमिशनरी अमलांत वरिष्ट जागांवर व संस्थानांतील एजन्ट व रेसिडेंट या जागांवर या पलटणी पैकीं पुष्कळ लोक नेमण्यांत येतात. पूर्वी मद्रास व मुंबई इलाख्यांत वेगळालीं स्टाफ कोअर पलटणें असत; परंतु हल्लीं तीं सर्व एक होऊन त्यांस इंडिअन स्टाफ कोअर असें नांव प्राप्त झालें आहे.

या ठिकाणीं काव्हेनांटेड सर्व्हिसबद्दल थोडीशी हकीगत दिली असतां अप्रासंगिक होणार नाहीं. ईस्ट इंडिया कंपनी ही नुसती व्यापारी मंडळी होती तों पर्यंत त्यांचे नोकर व्यापारी, वखारीवाले व कारकून असेच असत; पुढें बादशाहाकडून त्यांस दिवाणी प्राप्त झाल्या नंतर ही सन १७७२ साल पर्यंत सर्व व्यवस्था पूर्वीप्रमाणें एतद्देशीय कामगारांकडूनच होत होती. सदरचे सालीं कंपनीनें राज्य व्यवस्था प्रत्यक्ष आपले हातीं घेतली, व नंतर सन १७९३ सा-

लांत युरोपीअन अमलदार नेमून सर्व व्यवस्था ठाम करण्यांत आली. या नौकरांसंबंधानें असे नियम करण्यांत आले कीं, कौन्सिलचे मेंबर लोकांच्या जागा शिवाय करून बाकीच्या जागा ह्मणजे सेक्रेटरी, अकौन्ट खात्याचे मुख्याची जागा, सिव्हिल व सेशन जज्ज, माजिस्ट्रेट व कलेक्टर व त्यांचे असिस्टंट, बोर्ड आफ् रेव्हेन्यूचे मेंबर व रेव्हेन्यू कमिशनर या जागा, या वर्गाचे नौकर लोकांसाठीं राखून ठेवाव्या व त्यांस बढती त्यांचे नौकरीचे मुदतीचे मानानें होत जावी. त्यानंतर नवीन सिव्हिलियन अमलदारांस देशभाषा व कायदा हे विषय शिकविण्यासाठीं कलकत्ता येथें एक कॉलेज स्थापन करण्यांत आलें. ही व्यवस्था सन १८०६ सालापर्यंत चालली. त्यानंतर विलायतेस नौकर लोक तयार करण्यासाठीं हेलबरी कॉलेज स्थापन करण्यांत आलें व कोर्ट आफ् डायरेक्टर्स हे त्या कालेजांत शिकण्यास लोक नेमून पाठवीत व तेथें शिकून तयार झाल्यावर परिक्षा घेऊन पास झालेल्या लोकांस नौकरींत नेमीत. पूर्वी नेमणूक करून नंतर कालेजांत पाठविण्याची व्यवस्था सन १८५३ सालीं बंद झाली व कांपिटिटिव्ह (चढा ओढीची) परिक्षा घेऊन या नौकरींत लोक घेण्याचें पहिल्यानें सुरू झालें. ही परिक्षा देण्यास यूरोपिअन व नेटिव्ह लोकांस सारखीच परवानगी होती. कंपनीचा अमल जाऊन हिंदुस्थानचा कारभार राणी साहेबांनीं आपले हातीं घेतल्यावरही तीच व्यवस्था कायम ठेविली. या परिक्षेस येणारे उमेदवारांचे वयाचे संबंधानें नियम वारंवार पालटलेले आहेत. हल्लीं त्यांचे वय २१ पासून २३ पर्यंत असावें लागतें. असे रीतीनें परिक्षा घेण्यांत हेतु असा होता कीं चांगले विद्यासंपन्न व उत्कृष्ट लोक, देशांत मिळणें शक्य असतील तसे नौकरींत यावे. या परिक्षेचे विषय लार्ड मेकाले यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटीनें विचार करून ठरविले होते तेच अजूनही कायम आहेत. साधारण विश्वविद्यालयांतून सन्मानानें पार पडण्यास जे विषय शिकावे लागतात तितके या परिक्षेस लागतात. या परिक्षेंत उतरल्यावर पुढील नौकरीचे कामीं उपयुक्त असे विषय शिकण्यांत कांहीं काळ घालवावा लागतो, व विश्वविद्यालयांतही कांहीं दिवस राहिल्यास अशा लोकांस उत्तेजन देण्यांत येतें. असे प्रकारें परिक्षेंत उतरलेले लोकांसाठींच दिवाणी खात्यांतील सर्व जागा राखून ठेवण्याचा नियम, नवीन नवीन प्रांत अमलांत आल्यावर व राज्यव्यवस्थेची वाढ फार झाल्यावर पूर्णपणें कायम रहाणें अशक्य झालें; तेव्हां इतर यूरोपिअन व नेटिव्ह लोकांस ही नौकरीवर घेण्यांत येऊं लागलें. या नेमणुकी २४ । २५ व्हिक्टोरिया चा० ५४ या कायद्याप्रमाणें कायदेशीर करून घेण्यांत आल्या. सिव्हिल सर्व्हिस साठीं राखून ठे.लेल्या नाहींत अशा जागांवर विलायतेंत किंवा हिंदुस्थानांत

निवड करून किंवा परिक्षा घेऊन नौकर नेमण्यांत येतात. त्यांत नेटिव्ह लोकांपैकींही कांहीं नेमण्यांत येतात.

नेटिव्ह लोकांस नौकरींत नेमण्याच्या संबंधानें गेले साठ वर्षांत पार्लमेंट सभेनें वेळोवेळीं कायदे केले आहेत. त्यांत पहिल्यानें त्यांचे धर्म व जन्माची जागा वगैरेचे कारणांनीं हरकती येणार नाहींत असें सन १८३६ सालीं ठरलें; तेंच तत्व सन १८५३ सालचे कायद्यांत व सन १८५८ चे कायद्यांत व जाहीरनाम्यांत दाखल करण्यांत आलें. असे प्रकारानें जातीची व धर्माची हरकत निघून गेली होती, तरी सन १८७० सालापर्यंत विलायतेंत परिक्षा देऊन सनदी नौकरींत एकच इसम शिरला होता. ही स्थिती अर्थातच चांगली नव्हती ह्मणून सन १८७० सालीं विलायतेंत परिक्षा न देतां सनदी नौकरासाठीं राखून ठेविलेले कांहीं जागांवर नेटिव्ह लोकांस नेमण्यास ३३ व्हिक्टोरिया चा० ३ चा कायदा करण्यांत आला; व त्याचा हेतु खालचे दर्जाचे सरकारी नौकरींत चांगली हुषारी दाखविलेले लोकांस त्या जागांवर नेमण्याचा अधिकार द्यावा हा होता. हा कायदा अमलांत आणण्यास नियम करणें अवश्य होतें, परंतु तें काम सन १८७९ पर्यंत तसेंच पडलें होतें. या सालापर्यंत या कायद्याप्रमाणें एक दोनच नेमणुका व त्याही जुडीशिअल खात्यांतच करण्यांत आल्या होत्या. सन १८७९ सालांत या कायद्यास अनुसरून नियम करण्यांत आले, त्यांत विशेष मुद्दा असा ठरविला होता कीं चांगले मोठें कुलांतील व वजनदार इसम बुद्धिमान व शिकलेले असतील त्यांस विशेषें करून नेमण्यांत यावें, व खालचे दर्जाचे सरकारी नौकरांपैकीं किंवा धंद्यांत असलेले लोकांस अशा जागा देणें झाल्यास कांहीं विशेष गुण दिसून आला असेल तरच द्याव्या. असे प्रकारचे नियम करण्यांत सरकारचा हेतु असा होता कीं पूर्वीचे राज्य कर्त्यांचे वर्गांतील लोक, जे इतर विद्याव्यासंगी वर्गांबरोबर विद्या शिकून चढाई करीत नाहींत असे लोकांस नौकरींत घ्यावे; परंतु तो हेतु सिद्धीस गेला नाहीं. कारण असे प्रकारचे लोकांत विद्वान व वजनदार असे लोक मिळत नसत; व असे लोक असत ते नौकरीची पर्वा करीत नसत. मुळचा सरकारचा बेत राजकीय कारणांनीं किंवा राज्य व्यवस्थेचे सोईसाठीं झालेला असावा परंतु तो निष्फळ झाला, तेव्हां या बाबतींत चौकशी करून कायम निकाल करण्यास साधनें मिळावी ह्मणून एक कमिशन नेमण्यांत आलें, व त्यांत नेटिव सभासदही होते. या कमिशनानें सरकारास केलेला रिपोर्ट व त्यास अनुसरून काय तजविजी करण्यांत आल्या त्याची हकीकत पार्लमेंटास सादर करण्यांत आली आहे. या कमिशनाच्या महत्वाच्या सूचना अशा होत्या कीं सिव्हिल सर्व्हिसचे दोन विभाग, ह्मणजे हिंदु-

स्थानची सिव्हिल सर्व्हिस व प्रांतिक सिव्हिल सर्व्हिस असे करण्यांत यावे, हिंदुस्थानचे सिव्हिल सर्व्हिसमध्यें विलायतेंत काम्पिटिटिव परिक्षा घेऊन लोक नेमण्यांत यावे, व त्यांची संख्या अशी ठेवावी कीं राज्य व्यवस्थेतील सर्व मोठाल्या जागा भरून कांहीं शिकणाऊ लोक ठेवण्यास सवड राहील; स्टॉटयूटरी सर्व्हिस कमी करून तिचे बद्दल प्रांतिक सिव्हिल सर्व्हिस स्थापन करण्यांत यावी, व तींत हल्लींचे खालचे दर्जाचे नौकरींपैकीं निवडक लोकांची नेमणूक करण्यांत यावी, व सनदी नौकरांसाठीं राखून ठेविलेले जागांपैकीं एक षष्टांश जागा वेगळ्या काढून त्यांवर या नौकरीपैकीं लोकांची नेमणूक करण्यांत यावी. बोर्ड आफ् रेव्हेन्यू, कमिशनर, चिटणीस या जागा त्या नौकरींतील लोकांस देण्यांत येऊं नयेत.

लॉर्ड क्रास यांनीं या कमिशनचे सूचनासंबंधानें असा ठराव केला कीं, सन १८७० चे कायद्याप्रमाणें प्रत्येक प्रांतांत सनदी नौकरांसाठीं राखून ठेविलेल्या जागांपैकीं कांहीं जागा वेगळ्या काढाव्या व त्यांजवर प्राव्हिंशिअल सरविसपैकीं लोकांच्या नेमणुका कराव्या. त्यांची संख्या प्रांताचे गरजाचे व योग्यतेचे प्रमाणें निश्चित करावी व वेगळाल्या वर्गाचे नौकरांची संख्या काय प्रमाणानें असावी हें वेळोंवेळीं ठरविण्यांत येत जावें. ही पद्धति हल्लीं अमलांत आली आहे. ब्रह्मदेश व आसाम हे प्रांत विद्येचे संबंधानें मागसलेले आहेत, व आसाम प्रांतांत यूरोपिअन लोकांची वसाहत मोठी आहे, व जंगली लोकांचे प्रांत त्याचे संनिध आहेत, ह्मणून या प्रांतांत ही व्यवस्था करण्यांत आली नाहीं. हिंदुस्थान सरकारानें या ठरावाप्रमाणें वेगळाले प्रांतांसाठीं यादी केल्या आहेत. सनदी नोकरींत नेमलेले सर्व लोक प्रत्यक्ष कामांवर असतात असें नाहीं. रजेवर जाणारे लोकांचे बदलींत काम करण्यास व शिकणाऊ ठेवण्यासाठीं ह्मणून कांहीं जास्त लोक ठेविलेले असतात; गरजेप्रमाणें दर साल नवीन लोकांची भरती करण्यांत येते. पूर्वी या भरतीचे षष्ठांशा इतके लोक या देशांत स्टाटयूटरी ह्मणून नेमण्यांत येत असत, परंतु आतां जितके नौकर कामांवर असतात ह्मणजे त्यांच्या जितक्या जागा आहेत त्या जागांचे एक षष्टांशा पर्यंत जागा प्राव्हिन्शिअल सर्व्हिसमध्यें सामील करण्याचें ठरविलें आहे. एकंदर सनदी नौकरांचे जागांची संख्या ८९८ आहे, व त्या पैकीं ७२ लोक दुसरे विशेष प्रकारचे कामांवर आहेत. कमिशनर पेक्षां वरिष्ट प्रतीच्या जागा ४६, चिटणिशीच्या जागा ६६, कमिशनर ४१, जिल्हाधिपती २३४, डिस्ट्रिक्ट जज्य १११, मुलकी व न्याय खात्यांतील खालच्या जागा २७७ किरकोळ ह्मणजे शेतकी खातें वगैरेंत ४९, आशा मिळून ८२४, आहेत. यांपैकीं ब्रह्मदेश व आसाम मिळून ११५ आ-

हेत, व हिंदुस्थान सरकारच्या संबंधानें १५ जागा आहेत. यां ८२४ जागांपैकीं ७३१ सनदी नौकरांसाठीं राखून ठेविल्या आहेत, व ९३ प्राव्हिन्शिअल नौकरींत घातल्या आहेत. ही संख्या ही कायमची अशी नाहीं, प्रांतांचे जरूरीप्रमाणें ती पुढें पालटण्यांत व वाढविण्यांत येत जाईल. या प्राव्हिंशिअल सरव्हिसमध्यें घालण्याचे लोकांची प्रांत वार वांटणी झाली आहे. ती अशी:—

मद्रास.

कलेक्टर २
जिल्हा जज्य ४
बोर्ड आफ् रेव्हेन्यू
चा सेक्रेटरी १
सब्कलेक्टर, हेडअसिस्टंट व
असिस्टंट कलेक्टर... ... ७
सरकारचा अंडर सेक्रेटरी ... १
———
१५

मुंबई.

कलेक्टर २
जिल्हा जज्ज २
जाइंट जज्ज... ... ... १
असिस्टंट जज्ज २
असिस्टंट कलेक्टर ९
तालुकदारी सेटलमेंट आफीसर... १
हायकोर्टचा रेजिस्टार १
———
१८

बंगाल.

कलेक्टर ४
जिल्हा जज्ज ६
जाइंट व असिस्टंट म्याजिस्ट्रेट...८
बोर्ड आफ् रेव्हेन्यूचा सेक्रेटरी... १
सरकारचा अंडर सेक्रेटरी ... १
———
२०

वायव्य व अयोध्या प्रांत.

कलेक्टर २
जिल्हा जज्ज ४
जाइंट व असिस्टंट
म्याजिस्ट्रेट ... ९
बोर्ड आफ रेव्हेन्यूचा जूनिअर सेक्रेटरी... ... १
असिस्टंट सेटलमेंट आफीसर ... २
डायरेक्टर आफ् लांड रेकर्डस
व आग्रिकलचरचा असिस्टंट... १
स्माल काज कोर्ट जज्ज... ... २
———
२१

पंजाब.

कलेक्टर २	असिस्टंट कमिशनर ३
डिव्हिजनल जज... ... २	फिनान्शिअल कमिशनरचा ज्यूनियर सेक्रेटरी १
जिल्हा जज... ... ... २	सेटलमेंट कलेक्टर २

१२

मध्यप्रांत.

कलेक्टर १	सेटलमेंट कमिशनरचा असिस्टंट...१
स्माल काज जज २	असिस्टंट कमिशनर २
ज्यूडिशिअल कमिशनरचा रेजिस्ट्रार १	

७

या जागांचे पगार पुढें लिहिल्याप्रमाणें ठरलेले आहेतः—

मद्रास.

पहिली ग्रेड जज ... १६००	पहिली ग्रेड कलेक्टर १६००
दुसरी ग्रेड जज ... १२००	दुसरी ——... ... ...१२००
बोर्ड आफ रेव्हेन्यूचा सेक्रेटरी... ... १०००	सरकारचा अंडर सेक्रेटरी ... ७००
असिस्टंट कलेक्टर	
२ जागा ७००	
४ जागा ५००	
१ जागा ३००	

मुंबई.

पहिली ग्रेड जज १६००	कलेक्टर पहिली ग्रेड ... १६००
दुसरी ग्रेड जज १२००	—— दुसरी ग्रेड ... १२००
तिसरी ग्रेड जज १०००	तालुकदारी सेटलमेंट आफीसर.८००
जाइंट जज्ज ८००	असिस्टंट कलेक्टर
असिस्टंट जज पहिली ग्रेड ... ६००	—— ३ जागा ६००
—— —— दुसरी ग्रेड ... ५००	—— ४ जागा ५००
हायकोर्टचा रेजिस्ट्रार... ...१२००	—— २ जागा ३००

बंगाल.

जिल्हा जज्ज पहिली ग्रेड...१६००
—— दुसरी —— ...१२००
बोर्ड आफ रेव्हेन्यूचा सेक्रेटरी.१२००
सरकारचा अंडर सेक्रेटरी ... ७००

कलेक्टर व म्याजिस्ट्रेट
पहिली ग्रेड... ... १६००
दुसरी ग्रेड १२००
तिसरी ग्रेड... ... १०००
असिस्टंट कलेक्टर
२ जागा ६००
२ ——... ... ५००
२ ——... ... ४००
२ ——... ... ३००

वायव्य प्रांत व अयोध्या.

जिल्हा जज्ज
पहिली ग्रेड २०००
दुसरी — १६००
तिसरी— १२००
चवथी— १०००
कलेक्टर व माजिस्ट्रेट
पहिली ग्रेड १६००
दुसरी ग्रेड १२००
तिसरी १०००
असिस्टंट कलेकटर ४ जागा ६००
५ जागा ४००

स्माल काज जज्ज... ८००–१०००
ज्यूनियर सेक्रेटरी बोर्ड आफ् रेव्हिन्यू
ग्रेडचे पगारावर जास्त ... १५०
असिस्टंट सेटलमेंट आफीसर
पहिली ग्रेड ... ७००
दुसरी — ... ५००
असिस्टंट डायरेक्टर लांड रेकर्ड
व आग्रिकल्चर ... ४००–५००

पंजाब.

डिव्हिजनल जज्ज
पहिली ग्रेड १६००
दुसरी ग्रेड १४००
तिसरी ग्रेड १२००
जिल्हा जज्ज
पहिली ग्रेड १०००
दुसरी ग्रेड ८००

डेपूटी कमिशनर
पहिली ग्रेड १६००
दुसरी ग्रेड १२००
तिसरी ग्रेड १०००
सेटलमेंट हापिसर
पहिली ग्रेड १०००
दुसरी ग्रेड ८००

फिनान्शिअल कमिशनरचा ज्यूनिअर सेक्रेटरी ६००

एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर	१ जागा	...	...	— ६००
	४ जागा...	...	...	— ४००
	१ जागा...	...	...	— ३००

मध्यप्रांत.

डेपुटी कमिशनर	
पहिली ग्रेड	१६००
दुसरी	१२००
तिसरी	१०००
असिस्टंट कमिशनर ...	
१ जागा ...	६००
१ जागा ...	५००
१ जागा ...	४००
१ जागा ...	३००

स्मालकाज कोर्ट जज्ज ७००–८००
ज्यूडिशिअल कमिशनरचा रजिस्ट्रार व असिस्टंट सेटलमेंट कमिशनर यां जागांवर प्राव्हिन्शिअल सरव्हिस पैकीं इसम असला तर त्यास शिवाय अलाउन्स १०० रु.

कमिशनरच्या व फिनान्शिअल कमिशनरच्या व बोंड आफ् रेव्हेन्यूच्या जागा या लिस्टांत घातल्या नाहींत. त्या जागांवर प्राव्हिन्शिअल सरव्हिसपैकीं इसमांची नेमणूक करण्यास हरकत नाहीं. जिल्हा जज्ज व जिल्हाधिपतीच्या जागांवर नेमणुका करतेवेळीं नौकरीचे मानावरच नजर न देतां गुणाचाही विचार करण्यांत येईल व प्राव्हिन्शिअल सर्व्हिसमध्यें यूरोपिअन नेमण्याचे झाल्यास ते हिंदुस्थान सरकारचें मंजुरातीनें विशेष कारणांसाठींच नेमण्यांत यावे असें ठरलें आहे.

सन १८७० सालचे कायद्याप्रमाणें स्टाटयूटरी सिव्हिल सर्व्हिसमध्यें जे लोक नेमण्यांत आले आहेत त्यांस प्राव्हिन्शिअल सर्व्हिसमध्यें जावें व त्या नौकरींत त्यांस नवीन येणारे लोकांपेक्षां जास्त हक्क देण्यांत येतील, परंतु ते सनदी नोकरींतच राहिले तर नौकरीचे मुदतीचे मानानें वढतीचे जागेवर नेमणूक न होतां त्यांचे अंगीं विशेष गुण व हुषारी दिसून येईल त्या मानानेंच नेमणूक होत जाईल, असें ठरविण्यांत आलें आहे.

प्राव्हिन्शिअल सर्व्हिस बद्दल नियम करण्याची वाटाघाट हिंदुस्थान सरकारांत चालू आहे. सध्या हे नियम न्याय व मुलकी खात्यांचे संबंधानें होत आहेत. या दोन खात्यांची व्यवस्था लागल्यावर बाकीचे खात्यांबद्दल विचार होईल.

विलायतेंत व हिंदुस्थानांत सिव्हिल सर्व्हिसची परिक्षा सम कालीं घ्यावी अशा बद्दल गेलेसालीं हाऊस आफ् कामन्समध्यें ठराव करण्यांत आला. तो ठराव अमलांत आणतां येईल किंवा नाहीं या बद्दल हिंदुस्थानांत विचार होऊन अखे-

रीस हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांणीं समकालीं परिक्षा घेणें शक्य व उचित नाहीं, परंतु राज्य व्यवस्थेचा सुरळीतपणा व ब्रिटिश राज्याचें स्वास्थ्य ह्यांचा विचार करून जितक्या जागा देववतील तितक्या प्रामाणिक व हुषार असे नेटिव्ह लोकांस देण्यांत याव्या असा ठराव केला. त्यास त्यानीं कारणें अशीं दिलीं आहेत कीं, दोन्ही देशांत एक वेळीं परिक्षा घेण्यास अडचणी फार आहेत; एज्युकेशन कमिशननें असे प्रकारानें दोन ठिकाणीं परिक्षा घेऊं नयेत असें ठरविलें आहे; व त्यांतील तीन नेटिव्ह सभासदांस हा विचार पंसत पडला नाहीं तरी एकंदरींत कमिशनच्या शिफारशी इष्ट हेतू सिद्धीस जाण्यासारख्या होत्या ह्मणून त्यानीं आपला विरुद्ध अभिप्राय दाखल केला नाहीं; एकंदरीपैकीं ६१२ जागां वर नेमण्यास प्राव्हिन्शिअल सर्व्हिस पैकीं लोक योग्य आहेत असें ह्मणता येईल, या ६१२ जागांपैकीं ९३ जागा प्राव्हिन्शिअल सर्व्हिसमध्यें दाखल करण्यांत आल्या आहेत. राज्य व्यवस्थेचे कामासाठीं कांहीं ठरीव संख्या युरोपिअन लोकांची असलीच पाहिजे व हल्लीं ठरविण्यांत आली आहे त्या पेक्षां त्यांची संख्या कमी करितां येत नाहीं; परिक्षेस येण्याचे वयाची मर्यादा वाढविण्यांत आली आहे; कांपिटिटिव्ह परिक्षा या देशांत घेतल्यानें नौकरीतील वरिष्ठ जागांवर नेमण्यास जसे गुण संपन्न लोक पाहिजेत तसे व पूर्वपीठिका व जाति यांचे संबंधानें लोकांचा त्यांचेवर विश्वास बसलाच पाहिजे असे लोक नौकरीत येणार नाहींत; शीख मुसलमान व दुसरे जातीचे लोक, ज्यांचे अंगीं चांगले प्रकारचे मनःस्थैर्यादिगुण असतात व ज्यांनीं पूर्वी राज्य केलें आहे, परंतु ज्यांना विद्या व्यासंग कमी, असे लोकांपासून सरकारास राज्य कारभारांत जी चांगली मदत घेतां येण्यासारखी आहे ती नाहींशी होईल. नौकरीत तावून सुलाखून पाहिल्यानें मनुष्याची उत्कृष्ट प्रकारची परिक्षा होते; शिवाय आतां परिक्षा घेण्याचे ठरविल्यास प्राव्हिन्शिअल सर्व्हिस मधील लोकांस जी अलीकडे आशा लागली आहे तिचा भंग होईल वगैरे.

सिव्हिल सर्व्हिसचे हल्लींचे स्थिती संबंधानें विचार पाहतां जाग्याची संख्या सन १८७४ साला पासून शेंकडा २२ कमी झाली आहे, व आणखी बारा कमी होण्याचा संभव आहे. ज्यानेवारी १८९२ त स्टाटयूटरी लोक धरून या नौकरींत ९८३ लोक होते, ८४ नेटिव लोक होते. त्यांतील पंधरा विलायतेस काम्पिटिटिव परिक्षा देऊन आले होते, व ५९ सन १८७० सालचे कायद्या प्रमाणें नेमले होते. परिक्षा देऊन आलेले १५ पैकीं १० बंगाल्यांतील विद्येंत पुढारी असलेले दोन प्रमुख जाती पैकीं होते, तीन मुंबईचे पार्शी, एक मद्रासचे व्यापारी वर्गापैकीं व एक मुबईतील मुसलमान व्यापारी वर्गापैकीं होता.

सन १८९३ चे प्रारंभास एकदंर सनदी नौकर किती होते वगैरे माहिती वर दिली आहे. कमिशनानें रिपोर्ट केला त्यावेळीं राज्य व्यवस्थेसाठीं केलेले हिंदुस्थानचे ७६५ विभाग होते व त्यांवर सिव्हिल सर्व्हिस पैकीं व स्टाफ कोअर पैकीं व नान रेग्युलेशन प्राव्हिंसेसमध्यें वरिष्ट दर्जास चढलेले विन सनदी नौकर असे लोक होते. या विभागांचे हद्दींत सन १८९३ चे प्रांरभीं साधारण प्रमाणानें लोक संख्या २९७५०१ व क्षेत्र फळ १२९० मैल असें होतें. विन सनदी नौकरींत न्याय व मुलकी खात्यांतील वरिष्ट प्रतीचे विन सनदी नौकर २५८८ होते. त्यांपैकीं २४४९ हिंदुस्थानचे नेटिव, ३५ यूरोपिअन, १०४ यूरेशिअन्स व हिंदुस्थानांतील वाढलेले यूरोपिअन लोक असे होते. या २४४९ सांत १८६६ हिंदु होतें, ५१४ मुसलमान, १८ शीक २१ पारशी, व तीस इतर धर्माचे हिंदू पैकीं ९०४ ब्राह्मण ११३ वाणी, व ६०१ इतर लेखक वर्गापैकीं होते. कमिशनानें शेवटीं असें सांगितलें आहे कीं रु. १०० च्या किंवा त्यावरील पंगाराच्या जागा एकंलक्ष चौदा हजार एकशे पन्नास, असून त्यांपैकीं शेंकडा ९७ जागांवर नेटिव लोक आहेत व शेकडा तीन जागांवर इतर लोक आहेत.

राज्य व्यवस्थेबद्दल खर्च सन १८८१–८२ सालीं रुपये १३९४३५६० होता. व सन १८९१–९२सालीं रु० १७९१३१७० होता. चालू सालच जमाखर्चाचे अंदाजांत या खर्चाबद्दल रुपये १९७९५००० घातले आहेत या सालांतील वाढ हुंडणावळ व हुंडणावळी संबंधानें सनदी व यूरोपियन नौकरांस मिळत असलेला आलावेन्स (भत्ता) यामुळें आहे.

या खर्चाबद्दल तपशील (सन १८९१–९२ सालाबद्दलचा) खालीं दिला आहे. फिस्कल ह्मणजे वसूली खात्याचा खर्च त्या त्या जमांचे बाबीचे वर्णनाचे भागांत दाखविला आहे. ब्रह्मदेशांत खर्च वाढण्याचें कारण वरचा ब्रह्मदेश खालसा करण्यांत आला हें आहे.

खर्चाचा तपशील:—(१) गव्हरनर जनरल रु. २५०८००

(२) गव्हरनर–(मद्रास रु. १२००००, मुंबई रु. १२००००)—रु. २४००००

(३) लेफटनेंट गव्हरनर (बंगाल रु. ९६०००, वायव्यप्रांत व अयोध्या रु. ९६०००, पंजाव रु. १००७३० (रु. २९२७३०

(४) चीफ कमिशनर व सिंध कमिशनर—(आसाम रु. ४४२८० मध्यप्रांत रु, ४८०००, ब्रह्मदेश रु. ७६८००, मुंबई रु. ११८४२०)—रु. २८७५००

(५) खासगी खर्च व परिवार–(हिंदुस्थान सरकार रु. २३५०२० बंगाल रु. २१६५०, आसाम रु. ३०७० वायव्य प्रांत व अयोद्या रु. ३८०२०, पंजाव

रु. २१२२०, मध्यप्रांत रु. ६०००, ब्रह्मदेश रु. १७९००, मद्रास रु. १७५२८०, मुंबई रु० २०३५२०) रु० ६८१६८०.

(६) दरबारफंड—हिंदुस्थानसरकार...रु. १६५५१०.

(७) कारभार पाहणारें एक्झिक्युटिव्ह कौन्सिल—(हिंदुस्थानसरकार रु. ३९१८२०, मद्रास रु. १२७१७०, मुंबई रु. १२५७६०) रु. ६४४७५०.

(८) कायदे कौन्सिल—(हिंदुस्थानसरकार रु. २०१८००, बंगाल रु. १८१६०, वायव्य प्रांत व अयोध्या रु. २३३०, मद्रास रु. १६१२०, मुंबई रु. १०००) ...रु. २३९४१०.

(९) मिलिटरी—लष्करी—चिटणीस व कचेरी—(हिंदुस्थानसरकार रु. ४३७९४०, मद्रास रु. ६१६३०, मुंबई रु. ८०५००) रु. ५८००७०.

(१०) पब्लिक वर्क्स सेक्रेटरी व कचेरी—हिंदुस्थानसरकार रु. २९९६९०.

(११) सिव्हिल (लष्करी शिवाय करून इतर) चिटणीसकचेरी—(हिंदुस्थानसरकार रु. १२४०७७०, बंगाल रु. ५१९३९०, आसाम रु. ८१४४०, वायव्य व अयोध्या प्रांत रु. ३०१९६०, पंजाब रु. २१३०९०, मध्यप्रांत रु. ९७६८०, ब्रह्मदेश रु. २४०५३०, मुंबई रु. ३७६२४०, मद्रास रु. ३२२०३०), रु. ३३९३१३०.

(१२) (प्रवासखर्च—हिंदुस्थानसरकार रु. १५२४९०, बंगाल रु. ३११००, आसाम रु. ६५२०, वायव्य प्रांत व अयोध्या रु. ४२२२०, पंजाब रु. ४५६३०, मध्यप्रांत रु. ११६१०, ब्रह्मदेश रु. ४७८०, मद्रास रु. १४९०, मुंबई रु. १६४७०) —रु. ३१४३१०.

(१३) रेव्हिन्यु बोर्ड व फिनानशियल कमिशनर—(बंगाल रु. २८८६३०, वायव्य प्रांत रु. २५६५३०, पंजाब रु. २३०८२०, ब्रह्मदेश रु. ७५५३०, मद्रास रु. १८४१८०) रु. १०३५६९०.

(१४) कमिशनर व कचेरीखर्च—(हिंदुस्थानसरकार रु. १२७०, बंगाल रु. ५३७४३०, आसाम रु. ५१४३०, वायव्यप्रांत व अयोध्या रु. ५१०१९०, पंजाब ३४१३६०, मध्यप्रांत रु. १९२४६०, ब्रह्मदेश रु. ३९४६५०, मुंबई रु. २२७६६०) रु. २२५६४५०.

(१५) कंट्रोलर व अकाउंटंट—जनरल व कचेरी—(हिंदुस्थानसरकार रु. ३९१५६०, बंगाल रु. ३६४९६०, आसाम रु. ५१८००, वायव्यप्रांत रु. २१२६००, पंजाब रु. १७१९३०, मध्यप्रांत रु. ७३४९०, ब्रह्मदेश रु. १९३६१०, मद्रास रु. २५३७२०, मुंबई रु. २६६३५०) रु. १९८००२०.

(१६) पब्लिक वर्क्सचा अकाउंटंट—जनरल हिंदुस्थानसरकार रु. २२५७१०.

(१७) कागदी नाण्याचें खातें—(हिंदुस्थानसरकार रु. ११०५००, बंगाल

रु. २४०, वायव्यप्रांत रु. १३४३०, पंजाब रु. ११४५०, मध्यप्रांत रु. ५०, ब्रह्मदेश रु. २०३५०, मद्रास रु. २५७८०, मुंबई रु. २८७५०) रु. २६०५५०.

(१८) शिलकी खजिना (हिंदुस्थानसरकार रु. ५०५०, मद्रास रु. ३०३०) रु. ८०८०.

(१९) प्रेसिडेन्सी व्यांका–(हिंदुस्थान सरकार रु. १६३३५०, बंगाल रु. १४३७०, मद्रास रु. ३२१६०, मुंबई रु. ७५२९०) रु. २८५१७.

(२०) लोकल फंडाचे नौकर लोक जनरल–(हिंदुस्थानसरकार रु. १२९०, बंगाल रु. २९७१७०, आसाम रु. २५९०, वायव्य व अयोध्या प्रांत रु. ५३१५०, पंजाब रु. १२४९२०, मध्यप्रांत रु. २७५६०, ब्रह्मदेश रु. ११०६०, मद्रास रु. २७५३१०, मुंबई रु. १०४९३०) रु. ८९२९८०.

(२१) विलायतेंतून आणलेलें स्टोअर (सामान) हिंदुस्थानसरकार रु. १९५६००.

(२२) विलायतेंत होत असलेला खर्च व हुंडणावळ रु. ३३८३३४०

बेरीज रु. १७९१३१७०

(१) **लोकमत व विशेष माहिती**—येथपर्यंत हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्था करणारे अधिकारीवर्गाचें वर्णन झालें व त्या वर्गांतील मुकुटमणि जे व्हॅसराय–राजप्रतिनिधि–त्यांचेपासून तों राजसत्तेचे विभागांतील कनिष्ठ पायरी जी गांवकामगार मंडळी तेथपर्यंत परिनालिका आणून पोंचविली. आतां या सर्व अधिकारांचे उद्गमस्थानासंबंधानें चार शब्द सांगणें जरूर आहे. साधारण व्यवहारांत राज्याची स्वामिणी इंग्लंड देशाची राणी व हिंदुस्थानची बादशाहीण आहे असें ह्मणण्याचा प्रघात आहे, परंतु हा सर्व उपचाराचा भाग आहे. वस्तुतः राजता (साव्हरेंटी) ह्मणजे राजकीय समाजाचे शास्त्यास असलेलें अधिकारसर्वस्व, त्याचें निधान बादशाहीण नाहीं; तें राणी किंवा राजा, दोन पार्लमेंटें ह्मणजे हाउस आफ् लार्ड्स् व हाउस आफ् कामन्स यांचे समुच्चयांत आहे. त्या अधिकाराची बादशाहीण एका प्रकारानें भोगमूर्ती आहे. व्हॅसराय ह्मणजे राजप्रतिनिधि हे फक्त राणीचेच प्रतिनिधि नसून सदरचे समस्त राजसत्तात्मक संस्थेचे प्रतिनिधि आहेत. कोणतेही राजसंस्थेस सर्व राज्यांत अधिकार स्वतः चालविणें शक्य नसतें, तेव्हां तो अधिकार कांहीं अंशानें इतरांस सुपूर्त करावा लागतो, त्याप्रमाणें हिंदुस्थानचा कारभार व्हॅसरायसाहेबांकडे सोंपविण्यांत आला आहे.

(२) **हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी**—व्हॅसरायसाहेबांचें नियमन करण्याचा अधिकार हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी यांस आहे असें वर सांगितलेंच आहे, त्या-

संबंधानें थोडा खुलासा करणें जरूर आहे. विलायतेंतील राज्यव्यवस्था तत्वतः राजा व पार्लमेंटें मिळून चालवितात असें आहे, तरी वस्तुस्थिति त्याहून थोडी भिन्न आहे. राजा व पार्लमेंटें हुकूम करतात ते अमलांत आणण्याचें काम प्रधानमंडळाकडे सोंपविलेलें असतें व ते त्या हुकुमास अनुसरून राज्यकारभार चालवितात. पूर्वीं या प्रधानमंडळाची नेमणूक राजा स्वतःच करी व तेही आपले कामाबद्दल राजासच जबाबदार असत. त्यांनीं केलेले व्यवस्थेबद्दल त्यांस जबाबदार धरण्याचा पार्लमेंटास अधिकार होता, परंतु तो बजाविणें झाल्यास फार द्राविडीप्राणायाम करावा लागे. सन १६९६ सालापासून प्रधानमंडळावरचें त्यांचें नियंतृत्व जास्त स्पष्ट व व्यवहारसुकर झालें आहे. आतां प्रधानमंडळ राजानें आपलेच पसंतीनें नेमलेलें नसतें, तर हाऊस आफ कामन्समध्यें ज्या पक्षाची सरशी असेल त्यांचेपैकीं निवडक मंडळी प्रधानमंडळांत असतात व त्या पक्षाचा नायक मुख्य प्रधान असतो. त्यांतील एक सभासद हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी असतात.

इंडियाकौन्सिल—हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरीचे मदतीस एक कौन्सिल असतें त्यास इंडियाकौन्सिल ह्मणतात. हें कौन्सिल राणीसरकारांनीं हिंदुस्थानचा राज्यकारभार सन १८५८ सालीं आपलेकडे घेतला त्या वेळीं स्थापन झालें. स्टेटसेक्रेटरीस या देशासंबंधानें माहिती असण्याचा संभव साधारण कमी, ह्मणून त्यांस इकडील माहिती देण्यासाठीं या कौन्सिलाची स्थापना आहे व त्या हेतूस अनुसरूनच कौन्सिलदारांचे नेमणुकीसंबंधानें नियम करण्यांत आले आहेत. या कौन्सिलांतील बहुतेक सभासद, ज्यांचे नोकरी संबंधानें किंवा इतरव्यवहारासंबंधानें हिंदुस्थानांत १० वर्षे वास्तव्य झालें व ज्यांस परत येऊन दहा वर्षांवर दिवस झाले नाहींत असे असावे लागतात. या कौन्सिलरांची नोकरीची मुदत १० वर्षांची आहे व जरूर वाटेल तर पार्लमेंटचे मंजुरातीनें ती आणखी पांच वर्षे वाढवितां येते. सदरचे कौन्सिलांत तीन इसम धंद्याचे किंवा दुसरे विशेष प्रकारचे गुणांसाठीं तहाहयातीचे मुदतीनें नेमण्याचाही अधिकार ठेवला आहे. साधारणतः या कौन्सिलांत लेफ्टनेंट गव्हरनराचे किंवा हिंदुस्थानसरकारचे कौन्सिलांत काम केलेले, नेटिव संस्थानांत पोलिटिकल (राजकीय) काम केलेले, लष्करांत काम केलेले, किंवा इंजिनियर खात्यांत काम केलेले अंमलदारांस, तसेंच पेढ्यांवर किंवा व्यापारांत वहिवाटलेले अनुभवी लोकांस या कौन्सिलांत नेमण्यांत येतें. या कौन्सिलास स्टेटसेक्रटरी यांचेकडून त्यांचे पुढें कोणतें एखादें काम ठेवण्यांत आल्याशिवाय त्याबद्दल विचार करतां येत नाहीं. स्टेटसेक्रेटरींनीं कोणताही हुकूम सोडण्यापूर्वीं तो कौन्सिलास सादर केला पाहिजे, किंवा त्यांस वाचनासाठीं

दिला पाहिजे. उभयतांचा मतभेद झाला तरी स्टेटसेक्रेटरींचे मताप्रमाणेंच निकाल लागण्यांत येतो; मात्र खर्च करण्यासंबंधानें किंवा कांहीं मिळकतीची विल्हेवाट करण्याची असल्यास त्यासंबंधानें हुकूम करावयाचा तो कौन्सिलांतील बहुमत त्यांस अनुकूल असल्याशिवाय करण्याचा अधिकार स्टेटसेक्रेटरींस नाहीं. हें नेहमींचे राज्यव्यवस्थेचे खर्चासंबंधानें आहे. विशेष प्रसंगीं कौन्सिलास न विचारतां खर्च करण्यास मंजुरी देण्याचा अधिकार त्यांस आहे. परराष्ट्रांबरोबर व्यवहार, युद्ध किंवा तह करणें, संस्थानांशीं व्यवहार कसे प्रकारानें ठेवावा हें ठरविणें, हीं कामें व ज्यांत गुप्तपणा ठेवणें जरूर आहे अशीं कामें स्टेटसेक्रेटरी आपले अधिकारांतच करितात. बाकीचा व्यवहार कौन्सिलापुढें येऊन त्यांचे विचारानें चालतो. वेगळाल्या खात्यांचीं कामें करण्यासाठीं या कौन्सिलांतील सभासदांच्या कमिट्या केलेल्या असतात व प्रत्येक खात्याचे कामासाठीं वेगळाले सेक्रेटरी असतात.

राणीसरकारांनीं या देशाचा राज्यकारभार आपले हातीं घेतल्यापासून विलायतसरकारचा हिंदुस्थानचे कारभारांत जास्त हात शिरला आहे व ते वाजवीपेक्षां फाजील ढवळाढवळ करतात अशी कांहीं लोकांची तकरार आहे. यास पूर्वीपेक्षां वस्तुस्थिति पुष्कळ बाबतींत पालटली आहे, हें विशेष कारण आहे. पार्लमेंट सभा पूर्वीपेक्षां हिंदुस्थानचे कारभारांत जास्त लक्ष घालूं लागली आहे, व विलायतेंतून या देशांत भांडवलही फार आलें आहे, यामुळें आतां हिंदुस्थानसरकारास पुष्कळ बाबतींत आपले अधिकारांत हुकुम करतां येत नाहींसें झालें आहे, तरी साधारणतः राज्यकारभाराचे कामांत उगीचचेउगीच विलायतसरकार ढवळाढवळ करीत नाहीं. स्टेटसेक्रेटरी हे आपण होऊन कोणतीही नवीन गोष्ट उपस्थित करीत नाहींत असा सांप्रदाय आहे.

(३) समकालीन परीक्षा—हिंदुस्थानचे राज्यकर्ते हे मोठे उत्कृष्ट प्रमाणिक, शुद्ध व उदारधी आहेत असें हिंदुस्थानांतील एका मोठे नामांकित सुधारणाग्रणीचें मत आहे. या देशाचा अलीकडील इतिहास जो निःपक्षपातबुद्धीनें वाचील त्याचाही अभिप्राय तसाच झाल्यावांचून रहाणार नाहीं. आतां तें परकीय सरकार आहे, त्यास या देशांतील लोकांचे रीतीभातींचें, विचारसरणीचें, व मनोधर्मांचें यथातथ्य ज्ञान त्यांचे जनसमाजापासून अलग राहण्यानें व स्वयंमन्यतेनें होत नाहीं, यामुळें कांहीं प्रसंगीं गैरसमज होतो; त्याच कारणामुळें त्यांचा एतद्देशीयांवर विश्वासही एकदम बसत नाहीं, यामुळें राज्यव्यवस्थेंत कांहीं अडचणी येतात. ह्या गोष्टी वजा केल्या तरी वर जें त्यांचें गुणवर्णन केलें आहे त्यांत कमीपणा येणार नाहीं.

गव्हरनर-जनरल व गव्हरनर हे विलायतेंतील मुत्सद्दी मंडळापैकीं असतात हें वर सांगितलेंच आहे. बाकीचे मुख्य अंमलदार सिव्हिल सर्व्हिसपैकीं असतात. हे अंमलदारही उत्कृष्ट गुणवान, प्रामाणिक व न्यायप्रिय असतात व या देशांतील इंग्रजांचें राज्यं हेंच या गोष्टीची साक्ष आहे. या नोकरांची नेमणूक विलायतेस परीक्षा घेऊन तींत उतरलेले लोकांस गुणबाहुल्याप्रमाणें निवडून करतात. ह्या परीक्षेंत बसण्यास जातिधर्माचा अडथळा जरी कायद्यानें काढून टाकला आहे तरी त्या नौकरींत एतद्देशीय लोकांचा प्रवेश झाला नाहीं. त्याचीं कारणें:-

(१) परीक्षा देण्याचें स्थान (विलायत) फारच लांब पल्यावर आहे.
(२) तिचे तयारीसाठीं व परीक्षा दिल्यानंतरही त्याच देशांत रहावें लागतें.
(३) तें काम मोठें खर्चाचें, ह्मणजे निदान एक हजार पाउंड (सुमारें १७।१८ हजार रुपयांचे) आहे.
[४] तो खर्च केला तरी परिक्षेंत उतरणें अनिश्चित असतें.

एतद्देशीय लोकांचा वरिष्ठ दर्जाचे नौकरींत प्रवेश न झाल्यानें होणारे परिणाम असे आहेत कीं [१] सुशिक्षित लोकांचीं मनें असंतुष्ट होतील; [२] सरकारांनीं जातिधर्माचे कारणानें भेदाभेद मानला जाणार नाहीं असें वचन देऊन तें मोडलें असें वाटेल व त्यापासून सरकारचे न्यायप्रियतेस बाध येईल. असें होईल असें लार्ड लिटन व लार्ड आर्गाइल यांनीं कबूल केलें आहे.

ही स्थिती सुधारण्यास लोकपक्षाकडून उपाय सुचविण्यांत आले आहेत ते—

[१] सिव्हिल सर्व्हिसची पहिली परीक्षा हिंदुस्थानांत घ्यावी व उतरलेले सर्व उमेदवारांची गुणांचे संख्येप्रमाणें एक यादी करावी व त्यानंतर त्यांस कांहीं मुदत विलायतेंत ठेवावें.

[२] कांहीं जागांसाठीं परीक्षा हिंदुस्थानांत घ्यावी.

या उपायांचे समर्थनार्थ कारणें:-सन १८६७ सालीं इंडियाकौन्सिलांचे सभासदांची एक कमिटी याबद्दल विचार करण्यासाठीं नेमण्यांत आली होती तिनें पहिला उपाय पसंत केला आहे व दोन्ही देशांत परीक्षा घेण्यास अडचणी येणार नाहींत असें सांगितलें आहे. तसाच अभिप्राय फासेटसाहेब व लार्ड डर्बी यांनीं दिला होता. लंडन येथील विश्वविद्यालयासंबंधानें परीक्षा इंग्रजी अमलांतील अनेक देशांत व या देशांत कलकत्ता येथें होतात; तोंडीं परीक्षेसंबंधानें कांहीं अडचण येण्यासारखी आहे, परंतु ती परीक्षा विशेष महत्वाची नाहीं व अशा किरकोळ अडचणींचे कारणानें राज्यव्यवस्थेचे संबंधाचे असे महत्वाचे प्रश्नास मोडता येऊंनये. पब्लिकसर्व्हिसकमिशननें या प्रश्नाबद्दल विचार करून ती परीक्षा या देशांत घेऊं नये असा अभिप्राय दिला आहे,

त्यास त्यांनीं कारणें दिलीं आहेत कीं, या देशांतील शिक्षण हावें तसें सुधारलेलें नाहीं व घोकंपट्टी करून लोक परीक्षेस बसतील. ह्या अडचणी दृश्यमान मात्र आहेत, खऱ्या नाहींत; कारण उमेदवार तयार नसेल तर तो परीक्षेंत उतरणार नाहीं व घोकंपट्टी बंद करणें परीक्षकांचे हातीं आहे; त्यांनीं कसून परीक्षा घेतली ह्मणजे झालें. एतद्देशीय लोक कुशाग्रबुद्धीचे असतात व ते परीक्षेंत उतरतात, परंतु त्यांस जबाबदारीचीं कामें करतां येत नाहींत, व त्यांच्यांत शरीरिक व नैतिक गुण युरोपियन लोकांपेक्षां कमी आहेत, अशा तकरारी आहेत; परंतु कांपिटिटिव परीक्षा दिलेले जे लोक मोठे जाग्यावर आहेत व होते त्यांनीं तीं चांगले प्रकारें केलीं असा अनुभव आहे. हे लोक परीक्षा न घेतां नेमलेले लोकांपेक्षां जास्त चांगले असतात असा पब्लिकसर्व्हिसकमिशननेंही अभिप्राय दिला आहे. वरील दोन उपायांपैकीं पहिला उपाय जास्त न्यायाचा व इष्ट हेतुप्राप्तीस उपयोगी आहे. न्यायानें ह्मटलें ह्मणजे परीक्षा हिंदुस्थानांतच घेतली पाहिजे; विलायतेच्या दुसऱ्या ज्या वसाहती आहेत त्यांचेसाठीं परीक्षा विलायतेस होत नाहीं, तेव्हां हिंदुस्थानांतील लोकांसच विलायतेस जाण्याचें भाग असणें हें न्यायाचें होत नाहीं. या प्रश्नासंबंधानें निकाल करतांना हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांनीं दिलेलीं कारणें वर दाखल केलींच आहेत.

हिंदुस्थानसरकारांनीं प्राव्हिनशियल सर्व्हिसमध्यें सिव्हिल सर्व्हिसपैकीं ९३ जागा दिल्याचें वर सांगितलेंच आहे. त्यासंबंधानें लोकपक्षाचें ह्मणणें असें आहे कीं, पूर्वीं २२७ जागा मिळण्यासारख्या होत्या; पब्लिकसर्व्हिसकमिशननें त्या १८१ केल्या व सरकारचे शेवटचे ठरावानें ९३ केल्या आहेत. हिंदुस्थानसरकारचें ह्मणणें कीं, पूर्वीं ज्या हिशेबानें २२७ जागा मिळण्यासारख्या होत्या ह्मणतात तो चुकीचा आहे. दरसाल एतद्देशीय लोक सामान्य प्रमाणानें ७.५६ नेमण्यांत येत असत, असें धरून त्यांचे नौकरीची मुदत ३० वर्षांची धरून, तितके मुदतींत एकंदर २२७ नेमले गेले असते असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण नेमणूक झालेले सर्वच लोक तितकी मुदत नौकरींत राहिले असते असें नाहीं. मृत्यु व पेन्शनावर जाणें यामुळें ती संख्या कमी झाली असती. पूर्वीं दरसाल नेमण्याचे इसमांतील $\frac{५}{६}$ लोक विलायतेंत व $\frac{१}{६}$ या देशांत असे नेमण्यांत येत; आतां सनदी नौकरांच्या जितक्या जागा आहेत तितक्यांचा $\frac{१}{६}$ एतद्देशीयांस देण्याचें ठरविलें आहे, असा पद्धतींतच फरक झाला आहे. हल्लीं ठरविलेली संख्या कायमची नाहीं वगैरे.

सनदी नौकरींत एतद्देशीय लोकांचा जास्त शिरकाव होण्यास काय तजविजी कल्या पाहिजेत याबद्दल उभय पक्षांचे विचार कसे आहेत ते दाखल केले आहेत.

आतां हिंदुस्थानांतील सुधारलेले लोकांचे विचाराची दर्शक जी कांग्रेस तिचा या विषयावरील ठराव दाखल करून हा विषय पुरा करतों.

" हल्लीं सिव्हिल खात्यांत प्रवेश होण्यासाठीं विलायतेस जी कांपिटिटिव्ह (ज्यास्त गुणांप्रमाणें निवड करण्याची) परीक्षा घेण्यांत येते ती या देशांत व विलायतेस समकालीं व एकाच पद्धतीनें घेण्यांत यावी, व दोन्ही देशांत उतरलेले उमेदवारांची गुणांप्रमाणें एकच यादी करण्यांत यावी; हिंदुस्थानांत परीक्षेंत उतरलेले लोकांस जास्त अभ्यासासाठीं २ वर्षे विलायतेस रहाणें जरूर आहे असें ठरवावें व तेथें पुढें योग्य त्या परिक्षा घ्याव्या वगैरे. "

[४] **प्रोव्हिन्शियल सर्व्हिस**चे संबंधानें नियम अजून बाहेर पडले नाहींत. परंतु त्याबद्दल प्रात्याहिक पत्रांतून कांहीं मजकूर आला होता त्यावरून त्या नियमासंबंधानें चर्चा सुरू झाली आहे. लोकपक्षाचें ह्मणणें १८९४ सालचे मुंबई-चे प्रांतिक सभेचे ठरावांत चांगले रीतीनें दिलें आहे, सबब तो ठराव येथें देतों.

" प्राव्हिन्शियल सर्व्हिसमध्यें प्रवेश होण्याच्या संबंधानें मुंबईसरकारांनीं जो नियमाचा मसुदा केला आहे, त्यावरून पाहतां हे नियम राज्यकारभार योग्य रीतीनें चालण्यास पुढील कारणांनीं घातुक असल्यामुळें त्याबद्दल सभेस खेद व भीति वाटत आहे. तीं कारणें (१) या सर्व्हिसमध्यें मामलेदारांचा समावेश केलेला नाहीं; (२) चढाओढीच्या परीक्षेकरितां अभ्यासाच्या इयत्ता हास्यास्पद वाटतील इतक्या हल-क्या ठेविल्या आहेत; व (३) परीक्षेच्या धोरणानें नेमणुकी करण्याच्या तत्वांपेक्षां सरकारांनीं वाटतील तशा नेमणुकी करण्याच्या तत्वास फाजील मान दिला आहे; हीं होत. (४) पब्लिक सर्व्हिसच्या जागा देतांना विशेष जातींकडे किंवा विशेष वर्गांकडे लक्ष देण्याचा जो भाग या नियमांत घातला आहे, तो सन १८३३ सालीं पार्लमेंट सभेनें एतद्देशीयांस दिलेल्या अभिवचनांस व १८५८ सालीं महाराणीसर-कारांनीं दिलेल्या आश्वासनांस साक्षात् विरुद्ध आहेत, असें या सभेचें ठाम मत आहे. "

(५) **कायदेकौन्सिल**:–कायदेकौन्सिलांची सुधारणा होण्यासंबंधानें पुष्कळ दिवस भवति–न–भवति होऊन अखेर त्या प्रश्नाचा निकाल सन १८९२ सालीं लागला. कौन्सिलांत सुधारणा कसे प्रकारानें झाली आहे तें वर सांगितलें आहे. या बाबतींत पार्लमेंटचे कायद्यास अनुसरून जे नियम हिंदुस्थानसरकारांनीं केले आहेत, त्यांत आतां कांहीं गोष्टींसंबंधानें तकरार आहे ती अशी:—

(१) बजेटावर वादविवाद झाल्यावर व चालू असतांना सभेपुढें सूचना आणून सभासदांचीं मतें घेण्याचा अधिकार नाहीं, तो असावा व कौन्सिलांस बजेट पास करण्याचा अधिकार द्यावा.

(२) कौन्सिलांत प्रश्न विचारण्याची परवानगी आहे तरी " ते विचारण्याची जी तऱ्हा आहे तींत मात्र कांहीं तरी फरक झाला पाहिजे. ज्या विषयाबद्दल प्रश्न विचारावयाचा असेल त्या विषयाबद्दलची थोडी तरी हकीकत प्रश्नास जोडूनच देण्याची सवड झाली व अपुरीं उत्तरें मिळाल्यास तीं उत्तरें कशीं अपुरीं आहेत हें दाखविण्याचा हक्क मिळाला पाहिजे. "

(३) प्रांतिक कौन्सिलांत जमेच्या बाबी व खर्चाच्या बाबी यांसंबंधानें वादविवाद करण्यास परवानगी असावी.

मुंबई इलाख्याचे कौन्सिलासंबंधानें जे नियम झाले आहेत त्यांबद्दल १८९४ सालचे प्रांतिक सभेंत ठराव झाला तो असाः—

" १ (अ) वाढविलेल्या प्रांतिक कायदेकौन्सिलांत २५ पैकीं १२ जागा बिनसरकारी नोकरांच्या निवडणुकीकरितां राखाव्या असें गेल्या सालाप्रमाणेंच आपलें मत ही सभा दर्शवीत आहे. (ब) मध्यभागासारख्या महत्वाच्या भागांतील, तसेंच सिंध येथील म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांस आपल्या तर्फेचे सभासद निवडून देण्याचा हक्क न देतां युरोपियन व्यापारी कंपन्यांसारख्या कमी महत्वाच्या मंडळ्यांस तो फाजील रीतीनें देण्यांत आला आहे याबद्दल या सभेस फार दिलगिरी वाटत आहे. (क) या सभेस अशी बळकट आशा आहे कीं, इलाख्यांतील म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांचे संबंधानें अन्याय होणार नाहीं अशी दुरुस्ती या नियमांत सरकार लवकरच करील. २ (अ) आमच्या कायदेकौन्सिलमधील सभासदांनीं विचारलेल्या प्रश्नांस अत्यंत असमाधानकारक उत्तरें दिलीं जातात आणि तेणेंकरून १८९२ च्या दुरुस्त केलेल्या कौन्सिलआक्टान्वयें प्रश्न विचारण्याचा अधिकार देण्याचा जो सद्धेतु आहे तो अगदीं निष्फल होतो, याबद्दल या सभेस फार वाईट वाटत आहे. (ब) या सभेचें असें मत आहे कीं, प्रश्न विचारण्याच्या अधिकाराबद्दल जे नियम आहेत त्यांत अशा प्रकारचा फेरफार होणें अगत्याचें आहे कीं, जेणेंकरून प्रश्न विचारणाऱ्या सभासदास आपल्या प्रश्नासंबंधानें खुलाशादाखल प्रस्तावनारूप थोडेंसें भाषण करतां येईल. (क) या सभेचें असें मत आहे कीं, कायदेकौन्सिलमधील वादविवादाचे नियमांअन्वयें प्राव्हिन्शियल बजेट सादर झाल्यानंतर जमीनमहसूल, एक्साइज कर, मीठ, असेस्ड टॅक्सेस, प्राव्हिन्शिअल रेट्स, नोंदणी, आणि जंगल यांबद्दलच्या उत्पन्नाच्या बाबतींत आणि त्यांच्या कारभाराच्या बाबतींत वादविवाद करण्यास प्राव्हिन्शियल कौन्सिल हें स्थान अगदीं योग्य आहे; आणि त्या नियमांचा संकोचित अर्थ करणें व वादविवादाचा प्रतिबंध करणें हें लोकहितास अत्यंत अपायकारक आहे."

हा भाग संपविण्यापूर्वी सन १८९४ सालचे राष्ट्रीय सभेनें या भागांत आलेलें इंडियाकौन्सिल, कौन्सिलाची सुधारणा व समकालीन परीक्षा या विषयांबद्दल जे ठराव केले आहेत ते दाखल करतों.

(१) **इंडियाकौन्सिलाबद्दल ठराव**–" या सभेचें असें मत आहे कीं, सध्याची इंडियाकौन्सिल मोडून टाकणें ही हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेच्या सुधारणेची पहिली पायरी होय; व इंडियाकौन्सिलच्या जागीं हौस ऑफ कॉमन्सच्या सभासदांची एक स्टँडिंग कमिटी नेमण्यांत यावी. "

(२) **कायदेकौन्सिलांचे सुधारणेसंबंधी ठराव**–" [अ] सभेचें पूर्वीच्या बैठकांचे वेळीं प्रदर्शित केलेल्या ठरावाप्रमाणेंच असें ह्मणणें आहे कीं, पंजाबप्रांतांतील राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालण्याकरितां तेथें कायदेकौन्सिल स्थापावें. वायव्येकडील प्रांतालाही हा अधिकार मिळाला आहे, तेव्हां असें कौन्सिल त्या प्रांतास देण्यास सरकारानें विलंब लावूं नये.

[ब] या सभेचें पूर्वीच्या सभांप्रमाणेंच असें मत आहे कीं, १८९२ च्या हिंदुस्थानच्या कौन्सिल आक्टामधील नियम जे सध्या अमलांत आहेत त्यांत उणीव आहे व सभेची अशी प्रार्थना आहे कीं व्हाइसराय-इन्-कौन्सिल यांनीं ते नियय बदलून असें नियम करावे कीं, त्या ठरावाचा उपयोग अधिक होऊन त्या त्या प्रांताला त्या कौन्सिलापासून अधिक फायदा होईल."

(३) **समकालीन परीक्षेसंबंधानें ठराव**:–" समकालीन परीक्षांसंबंधानें हिंदुस्थानसरकारच्या मताला महत्व देऊन जो खलिता स्टेटसेक्रेटरींनीं लिहिला आहे तेणेंकरून सभेची अगदींच निराशा झाली आहे. या खलित्यानें १८३३ चा चार्टरआक्ट, व १८५८ चा राणीचा जाहिरनामा यांच्या विरुद्ध असें एक नवेंच तत्व अमलांत येऊं पहात आहे, त्यामुळें जातिविशेषावर सरकारी नौकरी अवलंबून रहात आहे, व अमुक युरोपियन लोक नौकरीवर असलेच पाहिजेत, असेंही त्या खलित्यांत प्रदर्शित केलें आहे.

त्याचप्रमाणें या सभेचें असें मत आहे कीं, प्रांतिक नौकरीची पद्धत सुरू केल्यानें या प्रश्नाचा शेवटचा निकाल लागणार नाहीं, व समकालीन परीक्षांच्या योगानें खालच्या प्रतीच्या जागांचेंही कांहींच नुकसान व्हावयाचें नाहीं.

तसेंच एंजिनिअरिंग, फारेस्ट, टेलिग्राफ व पोलिस यांतील वरिष्ठ प्रतीच्या जागा समकालीन परीक्षेनें भरल्यास अडचण उत्पन्न होईल असेंही सप्रमाण दाखविलेलें नाहीं, व हौस आफ् कामन्सच्या ठरावांतील या भागासंबंधानें सेक्रेटरी

आफ् स्टेट, हिंदुस्थानसरकार व स्थानिक सरकार यांनीं अगदीं मूकभाव धरला आहे याबल सभेला फार वाईट वाटत आहे.

या सभेची आग्रहपूर्वक राणीसरकारास अशी प्रार्थना आहे कीं, ता. २ जून १८९३ रोजीं हौस आफ कामन्सनें केलेला ठराव तावडतोब अमलांत आणून यासंबंधानें हिंदुस्थानास होत असलेला अन्याय दूर करावा."

भाग तिसरा.

कायदे व कायदे करण्याचे पद्धतीबद्दल.

या भागांत सुव्यवस्थेस साधनीभूत जे कायदे त्यांचे संबंधानें व ते करण्याचे रीतीसंबंधानें विवरण करणें आहे.

शास्त्रीय रीतीनें विचार करतां हिंदुस्थानांत चालत असलेले कायदे दोन प्रकारचे आहेत; एक लेखी, व दुसरे लेखी नसलेले. लेखी नसलेले कायद्यांत (१) इंग्लंडांतील प्रचारसिद्ध नियम, (२) हिंदु, मुसलमान व त्यांशिवाय इतर जातींत चालू असलेले प्रचारसिद्ध नियम, (३) कायदा किंवा वहिवाट यांचे अभावीं न्यायाधिशांनीं न्याय देतांना जी न्यायबुद्धि, युक्तिविचार व सदंतःकरणप्रवृत्ति, यांचा आश्रय करण्याचा आहे ती या सर्वांचा समावेश होतो. लेखी कायदे ह्मणजे (१) पार्लमेंटाचे कायदे (२) सन १७७३ व १८३३ पर्यंत गव्हरनर-जनरल व कौन्सिल यांनीं केलेलीं रेग्युलेशनें (३) व त्यानंतरचे कायदे, हे आहेत.

सर्व लोकांवर कायद्याचा अंमल एका प्रकारानेंच व्हावा असेबद्दल हल्लीं तजवीज झाली आहे तरी स्थान व इसम यांचे अनुरोधानें कांहीं भिन्न व्यवस्था व्हाव्या लागतात. उदाहरणार्थ, युरोपिअन ब्रिटिश प्रजेस त्यांचे जातीचे हक्काचे (परसनल राइट्स्) बाबतींत विलायतेंतील कायदा, त्यांत हिंदुस्थानांतील कायद्यानें फरक केला असेल त्यास अनुसरून, लागू आहे. तोच कायदा सर्व लोकांस लागू करणें योग्य होईल तितका, इलाख्यांचे शहरीं व रंगून येथेंही लागू आहे. हिंदुमुसलमान वगैरेंस दायविभाग, विवाह, जातिधर्म व आचारधर्म वगैरे बाबतींतील त्यांचे नियम, कायद्यानें फरक झाले नसतील तितके बाबतींत, लागू आहेत. पार्लमेंट व हिंदुस्थानसरकार हे सर्व हिंदुस्थानासाठीं कायदे करतात व स्थानिक सरकारें स्थानिक उपयोगाचे कायदे करतात.

हिंदुस्थानांत अमलांत येणारे कायदे आपण स्वत: करण्याचें पार्लमेंट होईल तोंपर्यंत टाळतें, तरीही हिंदुस्थानांत पार्लमेंटचे बरेच कायदे लागू आहेत. हिंदुस्थानांत राज्यसंस्थेचे घटनेचे संबंधानें पार्लमेंटचे कायदे आहेतच. शिवाय सन १७२६ सालचे पूर्वीचे कायदे व लिखित नसलेले नियम स्थानिक स्थितीस लागू पडतील तितके अनुसरावे असें ठरलें आहे. हे सर्व कायदे व्हिटलेस्टोक्स साहेबांनीं एके ठिकाणीं करून छापले आहेत.

ईस्टइंडिया कंपनीस एलिझाबेथ राणीनें सन १६०१ सालीं पहिल्यानें सनद दिली, त्यांत कायदे करण्याचा अधिकार दिला होता, व पुढील सनदांतही तो अधिकार कायम करण्यांत आला होता, परंतु तो कंपनीचे अंतस्थ व्यवस्थेचे-संबंधानेंच दिलेला असावा असें दिसतें; कारण त्या वेळीं कंपनीचे ताब्यांत राज्य-च नव्हतें. कंपनीस राज्याधिकार सन १७६५ सालीं बंगालची दिवाणी मिळाल्या-नंतरच आला व त्यानंतर कायदे करण्याचा प्रारंभ सन १७७२ सालीं झाला. तो अधिकार स्पष्ट रीतीनें सन १७७३ सालीं देण्यांत आला.

मद्रासेस कायदे करण्याचा अधिकार मिळाल्याप्रमाणें पहिलें रेग्युलेशन सन १८०२ सालचें आहे. मुंबईस कायदे करण्याचें सन १७९९ सालापासून सुरू झालें होतें, परंतु त्या बाबतींतील अधिकार सन १८०७ पर्यंत स्पष्टपणें मिळाला नव्हता. सन १८३३ सालीं हिंदुस्थानचे कायदेकौन्सिलाची सुधारणा झाली त्या वेळीं गव्हरनरजनरलांनीं सर्व हिंदुस्थानासाठीं कायदे करावे व मुंबई व मद्रास येथील गव्हरनरांनीं कायद्यांचे मसुदे मात्र पाठवावे असें ठरविलें होतें. सन १८५३ सालचे कायद्यावरून कायदेकौन्सिलांतील सभासदांची संख्या वाढविण्यांत आली, परंतु ते सर्व सरकारी नोकरच असत. याच कायद्यावरून सर्व लोकांस कौन्सिलांत वादविवाद ऐकण्यास जाण्याची मोकळीक मिळाली व वादविवाद छापण्याचेंही ठरलें. हल्लींची कायदे करण्याची व्यवस्था व अधिकार हे सन १८६१ सालचे कायद्याप्रमाणें आहेत. या कायद्यावरून मुंबई व मद्रासचे गव्ह-रनरांस कायदे करण्याचा फिरून अधिकार मिळाला व लोअर (खालचे) बं-गाल्यासाठीं एक कायदेकौन्सिल स्थापन करण्यांत आलें; तसेंच गव्हरनरजनरल यांचे कौन्सिलानें सर्व हिंदुस्थानासाठीं ह्मणजे हिंदुस्थानचे हद्दींतील सर्व ब्रिटिश किंवा नेटिव्ह किंवा परस्थ व इतर लोक यांचेसंबंधानें, सर्व कोर्टांस लागू होणारे व तहनाम्यानें बांधलेले संस्थानांत असलेले इंग्रजसरकारचे नोकरांस लागू होणारे, कायदे करावे असें ठरलें.

हिंदुस्थानाचे राज्यपद्धतीची घटना, विलायतेंत पैसे कर्ज काढणें, वर्चस्व व अंकितत्व या व इतर कांहीं बाबतींत कायदे करण्याचा अधिकार पार्लमेंटानें

आपलेकडे ठेवला. तसेंच सरकारचें कर्ज व जमाबंदी, धर्मसंबंध, लष्करी कवाईत, व परराष्ट्रांशीं संबंध, या बाबतींत कायद्याचे मसुदे गव्हरनर-जनरलाचे मंजुरातीशिवाय कौन्सिलापुढें आणण्याची मनाई करण्यांत आली; कायद्याचा अंमल होण्यास त्यांची संमति अवश्य आहे असें ठरविलें व कायदे रहित करण्याचा अधिकार राजास ठेविला; जरूरीचे प्रसंगीं गव्हरनर-जनरलांस शांतता व देशाचें संरक्षण यांसाठीं स्वतःच हुकूम करण्याचा अधिकार दिला. याच कायद्यावरून मद्रास व मुंबई इलाख्यांचे कायदेकौन्सिलांत एक्झिक्युटिव कौन्सिलांतील सभासदांशिवाय आडव्होकेट जनरल व चारपासून आठपर्यंत जादा सभासद असावे व त्यांतील निम्मे सरकारी नौकरींत नसलेले असावे, असें ठरविण्यांत आलें. या कौन्सिलांस सर्व देशांत लागू होणारे कर, नाणीं, टपाल व तारहापिसें, व पीनलकोड (अपराध्यास शिक्षेचा कायदा) व पेटंट व कापीराईट (क्लृप्त्या व ग्रंथ यांवरील मालकी) या विषयांचे संबंधानें कायदे करण्याचा अधिकार ठेवला नाहीं. ह्याही कौन्सिलांचे कायद्यांस गव्हरनर-जनरलांची संमति अवश्य ठेविली आहे. तसेंच बंगाल्यांतही कौन्सिल स्थापन करण्यांत आलें व वायव्य प्रांत व पंजाब व इतर लेफ्टनेंट गव्हरनर असलेले प्रांतांत कौन्सिलें स्थापण्यास अधिकार दिलेला होता; त्याप्रमाणें वायव्य व अयोध्या प्रांतांत सन १८८६ सालीं कौन्सिल स्थापन करण्यांत आलें आहे.

कंपनीकडून राणीसरकाराकडे राज्यव्यवस्था येईपर्यंत कायद्यांची स्थिति फार वाईट होती. फौजदारी कायद्यांत मुसलमानी कायद्याची भेसळ होती व त्यांतील वाईटपणा जरी विलायतेंतील व या देशांत केलेले कायद्यांनीं कमी झाला होता, तरी एकंदरींत कायद्यांत गोंधळच होता. दिवाणी कायद्यांचे बाबतींत तर याहीपेक्षां वाईट स्थिति होती. एका मोठे ग्रंथकारानें त्या वेळची स्थिति वर्णन करतांना असें ह्मटलें आहे कीं, त्या वेळचा दिवाणी कायदा ह्मणजे मोठा पाल्हाळिक, थोडा या ठिकाणीं थोडा, दुसरे ठिकाणीं असा गुंतागुंती झालेला व गोंधळांत घालणारा असा होता. एखादे बाबतीबद्दल नियम पाहाण्याचें असल्यास पुष्कळ ग्रंथ व रद्द झालेले व चालू असलेले कायदे चाळून शोधून काढावे लागत व तें करण्याचे कोणी फारसें भरीस पडत नसे व त्यामुळें वारंवार चुक्याही होत.

ही स्थिति सुधारण्यासंबंधानें कंपनीचे अमलांत प्रयत्न झाले नाहींत असें नाहीं, परंतु राणीसरकारचे अमलांत राज्य येईपर्यंत त्यापासून उपयुक्त असें कांहीं निष्पन्न झालें नव्हतें. सन १८३३ सालीं कायदे करण्यासाठीं ह्मणून गव्हर-

नर-जनरलांचे कौन्सिलांत एक जास्त सभासद नेमण्यांत आला व त्यानें त्या वेळीं नेमण्यांत येणारे कमिशनाचे मार्फत कायदे तयार करण्याचें काम करावें असें ठरविण्यांत आलें व त्याप्रमाणें लार्ड मेकाले यांची पहिल्यानें त्या जागीं नेमणूक झाली. त्यांनीं पहिल्यानें पीनलकोड–अपराध्यांस शिक्षा करण्याचा कायदा–करण्याचें हातीं घेतलें व तें काम सन १८३४–३८ पर्यंत पुरें केलें. तो मसुदा पुढें २० वर्षे तसाच होता व त्या मुदतींत त्यांत सर पीकाक नामक कायदेपंडितांनीं चांगल्या सुधारणा केल्या. शेवटीं तो कायदा सन १८६० सालीं पास झाला. हा कायदा त्यांतील तत्वांचे व भाषेचे संबंधानें फारच चांगला वठला आहे असा कायदेपंडितांचा अभिप्राय आहे. त्या वेळचे कमिशनानें व पुढें नेमलेले कमिशनांनीं विविध विषयांचे संबंधानें कायद्याचे मसुदे केले व या कमिशनाचे व कायद्याचे कामासाठीं नेमलेले कौन्सिलदारांचे श्रमाचा परिपाक हिंदुस्थानांतील सुंदर कायदे हा होय. असे उत्कृष्ट, पद्धतशीर, सुबोध, व व्यापक, असे कायदे दुसरे कोणतेही देशांत अजून झालेले नाहींत. सन १८६१ सालांत फौजदारी काम चालविण्याचे रीतीचा कायदा झाला. याच कायद्याचे अनुरोधानें देशांतील स्वस्थता राखण्याचें व गुन्हेगारांस शासन करविण्याचें व गुन्ह्यांचा निरोध करण्याचें काम होत आहे, तेव्हां एकंदर सर्व कायद्यांत महत्वाचे मानानें याचेचकडे अग्रेसरत्व आहे.

फौजदारी संबंधाचा कायदा सर्व एके ठिकाणीं झाला आहे. दिवाणी न्यायाचे संबंधानें सर्व बाबतींत कायदे झाले नाहींत. हिंदु व मुसलमानांचीं धर्मशास्त्रें आहेत त्यांत इस्टेट, दायभाग व नात्यांचे संबंध या विषयांसंबंधानें नियम आहेत, ते नियम न्याय व मानवी धर्म यांस विरुद्ध नसतील तितके पाहण्याचें इंग्रजसरकारास भाग आहे. हिंदु धर्मशास्त्राचे नियम प्रांताप्रांतांत वेगळे आहेत व त्यांत प्राचीन स्थानिक किंवा जातीचे प्रचारसिद्ध नियमांनीं फरक होतात. असे प्रकारचीं बंधनें किंवा हरकती नाहींत असे इतर विषयांसंबंधानें कायदे झाले आहेत, किंवा करण्याचें काम चालू आहे.

कायदे करण्याचें काम पहिल्यानें मसुदा तयार करण्यापासून सुरू होतें. नंतर तो मसुदा प्रथम एक्झिक्युटिव्ह कौन्सिलांत विचारासाठीं येऊन, पुढें कायदेकौन्सिलांत सादर करण्यांत येतो. नंतर तो स्थानिक सरकारांकडे पाठविण्यांत येतो. तसेंच तो मसुदा व त्याचें भाषांतर हीं ग्याझिटांत छापण्यांत येतात. सर्वांचे अभिप्राय आल्यावर त्यांचा विचार कौन्सिलाचे कमिटीकडे होतो, व त्यानंतर त्याजवर कौन्सिलांत वादविवाद होऊन बहुमतानें तो पसंत झाल्यास पास होतो.

कायदेकौन्सिलांचे संबंधानें मागील भागांत सविस्तर सांगण्यांत आलें आहे, तेव्हां त्या विषयाबद्दल येथें द्विरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

कायद्यांचे पांच वर्ग सर जेम्स स्टीफन यांणीं केलेले आहेत, ते असे कीं (१) ब्रिटिश राज्यपद्धतीचे मुख्य तत्वांसंबंधानें केलेले कायदे ह्मणजे सती, बालहत्या व गुलामगिरी हीं बंद करणें व ख्रिस्ती धर्म स्वीकारलेले लोकांचा विवाह व दायप्रकर्ण, या विषयांचे संबंधानें केलेले कायदे; (२) लिखित नाहीं असे कायद्याचे भागांचे संबंधानें केलेले कायदे; (३) न्यायपद्धतीचे संबंधानें केलेले कायदे; (४) जमेचे व विशेषेंकरून जमीनबाबीचे संबंधानें कायदे; (५) किरकोळ कायदे.

गैरउपयोगी झालेले कायदे रद्द करण्यास काढणें व उपयोगी कायदे छापून प्रसिद्ध करणें हें काम लेजिस्लेटिव (कायदे करण्याचे) खात्यांतूनच होतें. याप्रमाणें कायद्याचीं पुस्तकें, सर्व हिंदुस्थानास लागू असणारे कायद्यांचीं व प्रांतिक कायद्यांचीं अशीं वेगळालीं छापण्यांत आलीं आहेत.

सुधारणेंत मागसलेले व नवीन संपादन झालेले प्रांतांसाठीं गव्हरनर जनरल यांस आपण स्वत: किंवा स्थानिक सरकाराचे मार्फत, विशेष कायदे करण्याचा अधिकार असल्याचें मागील भागांत सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें असे प्रांतांसाठीं "रेग्युलेशन" नामक कायदे करण्यांत येतात, किंवा शेड्यूल डिस्ट्रिक्ट आक्ट (१८७४ चा १४ वा) प्रमाणें इतर प्रांतीं चालू असलेले कायदे लागू करण्यांत येतात.

या सर्व कौन्सिलांतून वेळोवेळीं निघालेले कायद्यांचे विषय इतके विविध आहेत व संख्या इतकी मोठी आहे कीं त्यांसंबंधानें येथें उल्लेख करणें अशक्य आहे.

भाग चवथा.

स्थानिक स्वराज्य.

स्थानिक स्वराज्याचा पाया इंग्रज सरकारांनीं घातला त्यास सुमारें ४०-४२ वर्षें झालीं आहेत. सन १८५० पर्यंत कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीन ठिकाणींच काय त्या म्युनिसिपालिट्या होत्या. त्या सालीं बाहेरील प्रांतांतील शहरांतही सार्वजनिक आरोग्य व सुख यांची व्यवस्था लोकांवरच त्यांबद्दलचा खर्चाचा

योजा विशेषतः वसवून, त्यांचेच सल्लामसलतीनें करविण्याचें ठरविण्यांत आलें. सन १८४२ सालीं म्युनिसिपालिट्यांचे संबंधाचा कायदा प्रथम झाला, परंतु १८५० पर्यंत त्याची अंमलबजावणी झाली नव्हती; तेव्हां म्युनिसिपालिट्यांचे व्यवस्थेस प्रारंभ सन १८५० सालींच झाला असें म्हटलें पाहिजे. या सालचा कायदा लागू करून घेण्याचें लोकांचे खुषीवर ठेविलें होतें. लोकांचे कबूलीनें तो कायदा लागू झाल्यावर पुढील व्यवस्थेसाठीं माजिस्ट्रेट व रहिवाशांपैकीं कांहीं लोकांची कमिटी नेमण्याचा अधिकार सरकारास होता. रस्ते व गटारें करणें व तीं साफ ठेवणें व घाण नाहींशीं करणें, तळीं वगैरे बांधणें व शहर सुधारणें हीं कामें या कमिट्यांकडे सोंपविलेलीं होतीं, आणि उत्पन्नासाठीं त्यांस घरपट्टी किंवा शहरपट्टी वसविण्याचा अधिकार दिला होता. या कायद्याप्रमाणें आक्टाय (थळमोड-थळभरित) जकात हिंदुस्थानांत पहिल्यानें कायदेशीर रीतीनें घेण्याचें सुरू झालें. पुढें सन १८६५ सालीं चौकीदारी संबंधानें कायदा करण्यांत आला. पोलिसाचा खर्च गांवकऱ्यांकडून व्हावा हा ह्या कायद्याचा हेतु होता. या कायद्याचा अंमल करण्याचें लोकांचे खुषीवर ठेवलें नव्हतें. या कायद्याप्रमाणें पांच पंच नेमण्यांत येत असत व ते खर्चासाठीं घरांवर किंवा घरांतील मनुष्यांचे संख्येवर कर घेऊन पोलीस नेमीत व पोलिसाचा खर्च भागून ऐवज शिलक राहील तो गांवचे सफाईकडे लावीत. या कायद्याचा अंमल बंगाल व वायव्य प्रांतांतच झाला होता.

पुढें वीस वर्षांनीं स्थानिक स्वराज्यव्यवस्थेचा जास्त विस्तार करण्यांत आला तो असा कीं, शाळा व दवाखाने घालणें, रस्ते बांधणें व असेच दुसरे स्थानिक उपयोगाचे कामांसाठीं जिल्ह्याचे व तालुक्यांचे कमिट्यांकडे जमीन महसुलपैकीं कांहीं भाग देण्यांत आला व या कामींही लोकांची सल्लामसलत म्युनिसिपालिट्यांत सुरू असलेप्रमाणें, घेण्याचें ठरविलें. इलाख्यांचे शहरांतील व कराची व रंगून येथील बंदरांचे व धक्यांचे संबंधानें व्यवस्था करण्यास, तसेंच क्यांटनमेंटांचे व्यवस्थेसाठीं कमिट्या नेमून, व अशा दुसऱ्या कमिट्या नेमून, सरकारांनीं किरकोळ स्थानिक व्यवस्थेचे कामांतील आपलें अंग पुष्कळसें कमी करून घेतलें. सन १८८२ सालापासून ह्या व्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा करण्यांत येऊन लोकांस काम करण्यास आस्था उत्पन्न व्हावी अशा प्रकारच्या पुष्कळ तजविजी योजिल्या आहेत. त्यांत सभासद निवडण्याची लोकांस परवानगी दिली व खर्चाचे कामांत त्यांस बरेंचसें स्वातंत्र्य दिलें ह्या गोष्टी विशेष आहेत. स्थानिक स्वराज्यव्यवस्थेचा विस्तार करण्यांत सरकारचा आपलेवरील जबाबदारी कमी करावी एवढाच हेतू नव्हता, तर लोकांस राज्य-

कलेचें शिक्षण मिळावें हाही होता. (यासंबंधानें आणखी कांहीं माहिती फिनान्सचे भागांत दिली आहे.) या देशांतील जनसमाजाचा बहुतेक भाग अगदीं अशिक्षित असलेमुळें, त्यांस जानपदत्वाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्यकर्में यांचा परिचय करून देण्यास, त्यांचा ज्यांत प्रत्यक्ष संबंध आहे असे बाबतींत पैशाचा विनियोग करण्याचे कामीं त्यांस एके ठिकाणीं बसून सल्लामसलती करण्यास लावणें यासारखें दुसरें साधन नव्हतें. अशा प्रकारचीं कामें सामान्य लोकांवर पूर्वींचे कारकीर्दींत फार क्वचितच सोंपविण्यांत येत असत. हल्लींही विद्येकडे ज्यांची प्रवृत्ति आहे असे लोकांवरच त्या कामांचा भार घालण्याचा लोकांचा क्रम आहे, परंतु गेले दहा वर्षांपासून या स्थितींत कांहीं पालट पडत चालला आहे व इतर लोकही या कामांत जास्त मन घालूं लागले आहेत. पूर्वीं जे अधिकार कधींच चालविण्याचा प्रसंग नव्हता असे अधिकार लोकांकडून बजाविले जातांना ज्या चुक्या होतील त्या दुरुस्त करण्यास व त्यांस योग्य मार्ग दाखविण्यास, सरकारांनीं आपले देखरेखीचे अधिकारही जरूर तितकेच ठेविले आहेत. निवडणुकीचें तत्व पूर्णपणें अमलांत आलेलें आहे, तत्रापि या देशांतील लोकांत अनेक जाति व भेद आहेत त्यामुळें एखादे मागसलेल्या वर्गाचे सभासद लोकांकडून निवडले गेले नसल्यास, त्या वर्गाचे लोक यावे व दुसरेही चांगले लोक या सभांत आणण्यास सवड व्हावी ह्मणून, कांहीं सभासद नेमण्याचें सरकारांनीं आपलेकडे ठेवलें आहे. ही स्थानिक स्वराज्यव्यवस्था अमलांत आल्यापासून बरीच चांगली चालली आहे व सभासदही काम अगत्यानें करतात. ही जी लोक कल्याणेच्छा हे लोक दाखवितात ती विद्यावृद्धि होईल त्या मानानें वाढत जाणारी आहे. ह्या व्यवस्थेप्रमाणें लोकल बोर्डांचीं कामें जितकीं चांगलीं होतात तितकीं म्युनिसिपाल्ट्यांत दुहीचा व खासगी संबंधाचा पगडा जास्त असल्यानें होत नाहींत, असें अनुभवास आलेलें आहे.

म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड व इतर दुसऱ्या कमिट्या, यांचे मार्फत किती व्यवहार होतो हें पुढील पत्रकावरून दिसून येईल. या रकमांशिवाय वैद्यकी खात्याचे व शिक्षणाचे संबंधानें खर्चांचा कांहीं भाग या मंडळ्यांचे मार्फत खर्च होत असतो.

संस्थांचीं नांवें.	१८८२–८३	१८९१–९२
म्युनिसिपालिट्या.	२३९१५०००	३३९५६०००
लोकलबोर्ड.		
प्रांतिक कर.	२००००००	२४२१८०००
कांटोन्मेंट फंड.	१२११०००	१७८८०००

शहर, व बाजारावरील कर.	१२२३०००	८३००००
इतर.	१८९५०००	१५८००००
पब्लिक वर्क्स खात्याकडून.		
टोल वगैरेबद्दल येणारा पैसा.	१२७२०००	२५५२०००
पोर्टट्रस्ट फंड.	९७८४०००	१३८२४०००
बेरीज.	३९३०००००	५४५०००००

यांत कर्ज काढून खर्च झालेल्या रकमांचा समावेश केलेला नाहीं. एकंदरींत मुनसिपालिट्या व पोर्टट्रस्ट यांचे मार्फत खर्च होणारे रकमांत पुष्कळ वाढ झालेली आहे असें या पत्रकावरून दिसून येईल.

मुनसिपालिट्या.

ह्या संस्था अगदीं आलीकडील आहेत हें वर सांगितलेंच आहे. मुळच्या गांवकीच्या ज्या व्यवस्था असत त्याच सुधारून ही व्यवस्था चालू झाली असेल असें कदाचित वाटण्याचा संभव आहे; परंतु व्यवस्थित रीतीची गांवकीची व्यवस्था उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं भागांतील गांवांत मात्र दृष्टीस पडे; इतर ठिकाणीं गांवांतील भिन्न वर्गांचे सर्व लोकांचा समवाय संबंध कांहीं नसे. प्राचीन व्यवस्था चालू असले ठिकाणींही पूर्वींचे वहिवाटीस अनुसरूनच ह्मणजे पूर्वींचे स्थितींतबदल न करितां व्यवहार चाले, परंतु हल्लींचे व्यवस्थेचें मूळ बीज सुधारणा व फायदा हें आहे.

म्युनसिपालिट्यांबद्दल हिंदुस्थानसरकारानीं सन १८५६ चे पुढें कायदे केले नाहींत. त्या नंतर त्याबद्दल व्यवस्थेचे कायदे स्थानिक सरकारांकडूनच होत गेले. तेव्हां आतां प्रांतवार त्यांचा विस्तार कसा होत गेला तें पाहिलें पाहिजे. मुनसिपालिट्यांबद्दल विचार करून नंतर लोकल बोर्डासंबंधानें विचार करण्यांत येईल.

मद्रास–मद्रास शहरा बाहेरील प्रांतांत हल्लींची मुनसिपालिट्यांची व्यवस्था सन १८८४ चा कायदा ४ प्रमाणें होत आहे. सन १८५० चे कायद्याचा अंमल या इलाख्यांत झाला नाहीं. पहिला कायदा सन १८६५ सालीं "शहर सुधारणेचा कायदा" ह्मणून झाला. त्यांत पोलीसचा खर्च ज्या त्या शहरांवर बसविण्यांत आला व इतर सुधारणांसाठींही कर बसविण्याचा कमिट्यांस अधिकार दिला होता. त्या वेळीं सरकार चौथाई खर्च देत असे. पुढें १८७१ सालीं कायदा झाला

त्याप्रमाणें शाळा व दवाखाने घालणें, व देवी काढविण्याची व जनन मरण नोंदविण्याची व्यवस्था करणें, हीं कामेंही मुनसिपालिट्यांकडे सोंपविलीं होतीं. या कमिट्यांत सरकार नौकरींत नसलेले निंमे लोक असत व कलेक्टर चेरमन असे. १८७९ सालीं निवडणुकीचें तत्व पाहिल्यानें सुरू झालें. आक्ट्राय (थळमोड थळभरित) जकाती या इलाख्यांत घेत नाहींत; तरी तसेच प्रकारचा एक कर गाड्या जनावरें वगैरेंवर घेतात. घर पट्टी, धंदेपट्टी, वाहनावर वगैरे कर घेण्याचा त्या कमिट्यांत अधिकार आहे व मुनसिपालिट्यांच्या प्राप्तीचीं साधनें ह्मटलीं ह्मणजे हे करच होत.

१८७१ चा कायदा रद्द होऊन हल्लीं १८८४ चा ४ था कायदा सरू आहे; त्याप्रमाणें एकचतुर्थांश कमिशनर नेमणुकीचे असतात (व त्यांतच प्रांताचा मुलकी अधिकारी येतो व तो अधिकाराचे नात्यानें सभासद असतो) व बाकीचे $\frac{3}{4}$ निवडलेले असतात व नेमणुकीनंतर त्यांचे अधिकाराची मुदत ३ वर्षे असते. चेरमन सरकारांतून नेमण्याचा असतो, तरी ५५ पैकीं ३६ मुनसिपालिट्यांस चेरमन निवडण्याचा अधिकार दिलेला आहे. कमिशनर होण्यास लागणारे गुण ठरविण्याचा अधिकार सरकारचा आहे व सरकारच कर बसविणें व त्यांत बदल करणें, ह्यांची व्यवस्था पाहतात. ५५ पैकीं ३२ मुनसिपालिट्यांत सन १८९१ सालीं व ३३ मुनसिपालिट्यांत सन १८९२-९३ सालीं निवडणुकीचें तत्व लागू होतें, बाकीच्यांची स्थिति तें तत्व सुरू करण्यासारखी अजून झाली नाहीं.

या मुनसिपालिट्यांत सभासदांची संख्या ८६३ आहे, पैकीं ३८३ लोकनियुक्त व ४८० सरकारनेमणुकीचे आहेत. युरोपिअन एकषष्ठांशापेक्षां कमी आहेत. सभासद निवडण्यासंबंधानें लोकांनीं चांगली आस्था दाखविली आहे; तसेंच मुनसिपालिट्यांच्या सभा भरविण्यासंबंधानें व त्यांस सभासद हजर राहण्यासंबंधानेंही स्थिति चांगली आहे, पाणी आणणें व गटारें बांधणें यांत बराच खर्च करण्यांत आला आहे, दवाखाने जास्त लोकप्रिय होत चालले आहेत, शहरसफाईसाठीं नवीन कामें जास्त झालीं पाहिजेत, प्राथमिक शिक्षणास हरकत येण्यासारखी मध्यम वर्गाचे शिक्षणावर खर्चांत वाढ झाली हें बरोबर झालें नाहीं, तेव्हां या व इतर बावतींत सुधारणा झाली पाहिजे असा स्थानिक सरकारचा अभिप्राय आहे.

जमाखर्च सन १८९१-९२. जमा रु. २४८४६३०. तपशीलः—दस्तुऱ्या रु. ३५०४६०, कर घरांवर व जमिनीवर रु. ६०६४६०, गाड्या व जनावरांवर रु. १५१९७०, धंदेरोजगारांवर रु. १८८७२०, पाण्यावर रु. १५३१०, दंड, फी, व किरकोळ रु. ४९११८०, सरकारांतून, लोकलफंडांतून आलेली रु. ४१७५५०, कर्ज व ठेवी रु. २६२१८०.

खर्च रु. २१९१७००. तपशीलः—कर वसूल करणें व व्यवस्था रु. १६८७६०, सार्वजनिक संरक्षण रु. ९२९८०, आरोग्य रु. ८४२६८०, सोई रु. ४३२५१०, शिक्षण रु. २८२६२०, किरकोळ रु. १०६४६०, व्याजीं किंवा ठेवींत ठेवले किंवा कर्जाचे फेडीस लावलेले रु. २६५६९०.

जमाखर्च सन १८९२-९३ सालीं— जमा रु. २४६३९३०. तपशीलः—कर रु. १२९५०००, कराशिवाय इतर बाबी, रु. ९५३६४०. कर्ज रु. २१५२९०.

खर्च रु. २४४०७६.

कराचा बोजा मद्रास शहरांत सन १८९१-९२ सालीं रु. १.९४ व प्रांतांत रु. ०.७९.

मुंबई इलाख्यांत **१**८५० चे कायद्याचा फायदा पुष्कळच घेण्यांत आला होता, व तोच कायदा १८७३ पर्यंत असलांत होता. त्या सालीं दिस्ट्रिक्ट मुनसिपल आक्ट झाला; त्यांत मुनसिपालिट्यांचे शहर व गांवमुनसिपालिटी असे दोन वर्ग केले होते. शहरमुनसिपालिटींतील मेंबर निवडून देण्याचा अधिकार लोकांस देण्यास कायद्यावरून परवानगी होती व गांवमुनसिपालिटींत सर्व मेंबर लोकांची नेमणूक सरकारांतून होण्याची असे. कलेक्टर दोन्ही वर्गांचे मुनसिपालिट्यांचे प्रेसिडेंट असत व असिस्टंट किंवा डेपुटीकलेक्टर हे गांवमुनसिपालिटीचे व्हैस प्रेसिडेंट असत.

१८७३ चे कायद्यांत १८८४ सालीं दुरुस्ती करण्यांत आली; त्यांत पूर्वी जे प्रेसिडेंटास अधिकार **असत** ते सर्व मुनसिपालिट्यांस देण्यांत आले व शहर व गांवमुनसिपालिटी हा **भेद** काढून **टाकण्यांत** आला. मेंबर लोकांचे संख्येसंबंधानें असें ठरविण्यांत आलें कीं सरकारी नौकर एक चतुर्थांशापेक्षां जास्त नसावे, निमे सभासद लोकांनीं निवडलेले असावे, प्रेसिडेंट सरकारांनीं नेमावा किंवा सरकारांनीं अधिकार दिल्यावर कमिश्र्यांनीं निवडावा, तो सरकारी अंमलदार असेल तेव्हां व्हैस प्रेसिडेंट कमिशनर लोकांनीं निवडलेला असावा. निवडणुकीचें तत्व पूर्णपणें मोठाले शहरांसच लागू करण्यांत आलें व प्रेसिडेंट बहुधा सरकारांतून नेमण्यांत येतात.

या इलाख्यांत सन १८९१–९२ सालीं १७४ व सन १८९२–९३ सालीं १७६ मुनसिपालिट्या होत्या. सन १८९२ सालीं मुनसिपल कमिशनरांची संख्या २४३० होती पैकीं ९०९ लोकांनीं निवडलेले होते व बाकीचे सरकारनेमणुकीचे होते. युरोपिअन लोक शेंकडा १० होते.

उत्तर व मध्य भागांत वाटेनें जाणारे मालावर व मुनसिपालिट्यांचे हद्दींचे बाहेर खपणारे मालावर कर घेण्यांत येतो असें खपाचे व लोकसंख्येचे प्रमाणाव-

रून दिसून आलें. सन १८९२–९३ सालीं कमिट्या नियमाप्रमाणें भरल्या व त्यांस सभासदही बरेच येत असत. आरोग्य व सोईचे कामांकडे जरूरीप्रमाणें खर्च करण्यांत आला होता व पाण्याची सोय करण्यासंबंधानें मध्यम प्रतीचे गांवांचा नंबर बराच वर लागेल. एकंदरींत खासगी द्वेष व तट या कारणानें लोकसेवेचे जबाबदारीकडे मेंबर मंडळींचें कांहीं प्रसंगीं दुर्लक्ष होतें तरी, पुष्कळ ठिकाणची व त्यांत कर्नाटक व सिंध प्रांतांतील व्यवस्था फार चांगली असते असा स्थानिक सरकारचा अभिप्राय आहे.

सालोसाल जमा व खर्च कसा होतो हें बाबवार दिलें तर फार विस्तार होईल, सबब जमा व खर्चाच्या बाबी साधारण तपशीलवार सन १८९१–९२ सालाबद्दल देऊन सन १८९२–९३ सालाबद्दल आंकडे संक्षेपानें दिले आहेत.

जमा सन १८९१–९२ सालीं रु. ४३४३८३०. तपशील:—आक्ट्राय रु. १५३०२१०, दस्तुऱ्या रु. २१२८००, घरावर व जमीनीवर कर रु. ४६३५४०, गाड्यांवर व जनावरांवर रु. ८९२५०, धंदेरोजगारांवर रु. १०८१०, पाण्यावर रु. ९९३००, दिवे लावणें रु. १००, शहरसफाई रु. १९६१७०, इतर रु. १२६४१०, भाडें, फी, दंड व किरकोळ रु. ८०४६४०, सरकारांतून आलेले रु. १६१६९०, लोकल फंडापैकीं रु. ८०५००, इतर रु. ३०१७०, कर्ज रु. ५३८२४०.

खर्च रु. ४४४९३१०. तपशिल:–कर वसूल करणें व व्यवस्था रु. ५१०७८०, संरक्षण रु. २२५५२०, आरोग्य रु. १६६६५१०, सोईकडे रु. ६६२७१०० शिक्षणाकडे रु. ६३५३५०, किरकोळ रु. २८२२६०, कर्जाची फेड किंवा व्याजी ठेवली रु. ४६६१८०.

जमाखर्च सन १८९२–९३ सालीं. जमा रु. ४७१४४२०. तपशील:–कर रु. २७५८८२०, कर्ज रु. ८०५००, इतर रु. ११५४६००, खर्च रु. ३९६७९३०.

या इलाख्यांत आक्ट्रायकर ही मुनासिपालिट्यांचे उत्पन्नाची बाब पूर्वीपासूनच आहे.

कराचा बोजा सन १८९१ सालीं मुंबई शहरांत दरमाणशीं रु. ६.२९ व बाहेरील प्रांतीं रु. १.१७ असा होता.

बंगाल इलाख्यांत १८५० चा व १८५६ चा असे दोन्ही कायदे चालू होते. त्यापुढें बंगालकौंसिलांत सन १८६४, १८६८ व १८७३ व १८७६ सालीं कायदे झाले. सन १८६४ चा कायदा मोठाले शहरांसाठीं ह्मणून मुख्यत्वें करून करण्यांत आला होता; म्युनिसिपालिटी सुरू करण्यास लोकांची अर्जी येण्याची जरूर या कायद्यानें ठेविली नव्हती ; सरकारास म्युनिसिपाल कमिशनर नेमण्याचा अधिकार दिला होता व कमिशनर, माजिस्ट्रेट, इंजिनिअर व पोलीस

सुप्रिंटेंडेंट हे अधिकाराचे नात्यानें सभासद असत व दुसरे गांवचे लोक नेमण्यांत येत असत ; असे लोक सातापेक्षां कमी नसत. घरें व जमिनी यांजवर व वाहनांवर कर बसवून उत्पन्न करण्याचा त्या कमिट्यांस अधिकार दिला होता व सार्वजनिक उपयोगाचे कामांसाठीं कर्ज काढण्याची त्यांस परवानगी होती ; पोलीसचा सर्व खर्च म्युनिसिपालिट्यांवरच ठेवला होता. लहान शहरांसाठीं १८६८ चा ६ वा कायदा करण्यांत आला होता, त्यांत लोकमतास तत्वतः जास्त मान दिला होता, तरी व्यवहाररीत्या त्या कमिट्यांस माजिस्ट्रेट चेरमन असत, कमिट्यांकडे सल्लामसलत देणें, कराची आकारणी करणें, व खर्चाची तपासणी करणें, हींच कामें होतीं. सन १८७३ चे कायद्यानें मोठे शहरांतील म्युनिसिपालिट्यांत मेंबर व व्हैसचेरमन निवडण्याची परवानगी देण्याचा अधिकार सरकाराकडे आला ; व दोन्ही वर्गांचे म्युनिसिपालिट्यांस पोलीस, गांवसफाई, व इतर गांवचीं कामें भागवून उरलेले रकमेंतून शाळांचा खर्च करण्याची परवानगी ह्या कायद्यानें मिळाली. सन १८७६ चे कायद्यानें पूर्वीचे सर्व कायद्यांचें एकीकरण केलें व त्यांत मोठासा फरक झाला तो एवढाच कीं, कर घरांवर किंवा लोकांवर बसवून वसूल करण्याचा कमिशनरांस अधिकार ठेविला होता. ह्या कायद्यांत म्युनिसिपालिट्यांचे चार वर्ग केले होते ; त्यांतील पहिले दोन वर्गांस मात्र म्युनिसिपालिटी हें नांव शोभण्यासारखें होतें; बाकीचे दोन वर्ग ह्मणजे लष्करी किंवा हवेचीं ठाणीं व लहान लहान खेड्यांचे जमाव यांस तें नांव शोभलें नसतें. सन १८८४ सालीं शेवटचा जो कायदा झाला त्यांत खेड्यांचे जमाव व ठाणीं हीं म्युनिसिपालिटीचे वर्गांतून काढून टाकण्यांत आलीं. अधिकार चालविण्यास लायख ठरविलेले म्युनिसिपालिट्यांस $\frac{2}{3}$ सभासद निवडण्यचा अधिकार देण्यांत आला व तसे प्रकारचे अधिकारदानास अयोग्य असलेल्यांची, व ज्यांत सरकारचे देखरेखीची पुष्कळ जरूर होती, असे ठिकाणांची एक यादी करण्यांत आली. मत देण्याचा अधिकार येण्यास जो म्युनिसिपालिटीस कर देण्याचा, त्याची मर्यादा फार कमी ठेविली. बहुतेक मोठाले गांवीं चेरमन निवडण्याचा अधिकार म्युनिसिपालिट्यांस दिला आहे. या कायद्यांत म्युनिसिपालिट्यांचे अधिकार पुष्कळ वाढविले आहेत व त्या अधिकारांचा दुरुपयोग होऊं नये ह्मणून देखरेखीचा अधिकार सरकारांनीं आपलेकडे ठेवला आहे.

या प्रांतांत सन १८९१–९२ सालीं म्युनिसिपालिट्यांची संख्या १४५ होती व सन १८९२–९३ सालीं आणखी एक म्युनिसिपालिटी स्थापन झाली. सन १८९१–९२ सालीं ११७ व सन १८९२–९३ सालीं ११८ म्युनिसिपालिट्यांस $\frac{2}{3}$ सभासद निवडून देण्याचा हक्क होता. कर देणारे लोकांपैकीं सुमारें ६

लोकांस सभासद निवडण्याचे कामीं मत देण्याचा अधिकार होता. कमिशनर लोकांत जमीनदार, वकील, ह्या वर्गांचे लोक जास्त असतात; धंदेवाले कमी असतात. ह्या प्रांतांत म्युनिसिपल कराचें ओझें फार थोडें आहे. प्राथमिक शिक्षणापेक्षां मध्यम प्रतीचे शिक्षणावर खर्च जास्त होतो व शहरसफाईचीं व आरोग्यरक्षणासंबधानें कामें कमी होतात, तेव्हां त्या बाबतींत सुधारणा करावी व कराचा बोजा सर्वांवर योग्य प्रमाणानें पडेल असें करावें, असा त्या-प्रांताचे स्थानिक सरकारचा अभिप्राय आहे. कराचा बोजा कलकत्ता शहरांत माणशीं रु. ५·७५ व बाहेरील प्रांतांत रु. ०·७७ पडतो.

जमा व खर्च सन १८९१–९२. जमा रु. २९०४२३०, तपशीलः–दस्तुऱ्या रु. १२११९०, कर–घरांवर व जमिनींवर रु. ८०७७९०, गाड्या व जनावरांवर रु. १८३५६०, धंदे व रोजगार रु. २३०८०, कर—पाण्यावर रु. २९५८०, दिवाबत्ती रु. ३५९९०, शहरसफाई रु. ३५९३२०, इतर रु. ५३५५५०, भाडें, फी, दंड व किरकोळ रु. ४४५३५०, सरकारांतून व लोकल फंडांतून दिलेलीं रु. १११६७०, कर्ज व ठेवी रु. २५११५०.

खर्च रु. २८७०१२०. तपशीलः—कर वसूल करणें व व्यवस्था रु. ३३५८४०, सार्वजनिक संरक्षण रु. १९०६६०, आरोग्य रु. १२६११८०, सोई रु. ५८५०७०, शिक्षण रु. १३००७०, किरकोळ रु. १५५३६०, व्याजीं किंवा ठेवी ठेवलेले व कर्जाची फेड रु. २११९४०.

जमा व खर्च सन १८९२-९३. जमा रु. २९२४०५०, तपशीलः–कर रु. २१७५३७०, कराशिवाय इतर रु. ६९३६८०, कर्ज रु. ५५०००.

खर्च रु. २९०६०८०.

वायव्यप्रांत व **अयोध्या** या प्रांतांत मुनसिपालिट्यांची व्यवस्था वेगळाल्या वेळीं अमलांत आली. वायव्य प्रांतामध्यें सन १८५० चा कायदा व १८५६ चा चौकीदारी कायदा हे पुष्कळ ठिकाणीं लागू करण्यांत आले होते व मुनसिपालिट्यांची व्यवस्थाही फार चांगली चालली होती. लोकांचे कबुलीशिवाय मुनसिपालिट्या स्थापन करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारचे १८६८ चे कायद्यावरून आला व या कायद्यावरून निवडणुकीचें तत्व लागू करण्यांत आलें व $\frac{2}{3}$ निवडलेले व $\frac{1}{3}$ सरकारी नेमणुकीचे असे सभासद असावे असें ठरविलें होतें; घरें, धंदे व वाहनें यांचेवर कर व आक्ट्राय कर ह्या उत्पन्नाच्या बाबी ठरविल्या होत्या. अयोध्याप्रांत सन १८५६ सालीं इंग्रजी राज्यास जोडण्यांत आला. १८६७ सालापर्यंत त्यांत मुनसिपालिट्या स्थापन झाल्या नव्हत्या; त्या सालीं पंजाबचा कायदा ५ वर्षांचे मुदतीपुर्ता

सुरू करण्यांत आला. सन १८७३ सालीं १८६८ चे कायद्याची दुरुस्ती करून तो वायव्य व अयोध्या प्रांतांस लागू करण्यांत आला. अयोध्येपेक्षां वायव्य प्रांतामध्यें निवडणुकीचे तत्वाची चहा जास्त आहे. याशिवाय लहान गांवांत १८५६ चे कायद्याप्रमाणें व्यवस्था होत आहे. अशा गांवांची संख्या १८९१-९२ सालांत ३३८ होती. सभासद निवडण्याचा अधिकार लोकांस जास्त देण्याचे लार्ड रिपन यांनीं ठरविल्यावर त्यास अनुसरून पहिला कायदा या दोन प्रांतांचें संबंधानें झाला. कमिशनरांपैकीं चतुर्थांश सरकारांनीं नेमावे; बाकीचे कमिशनर लोकांनीं निवडलेले असावे; गांवचे मानानें निवडणारे लोकांची योग्यता ठरविण्यांत यावी व मत देणारापेक्षां कमिशनर होणारे इसमाची प्राप्ती किंवा तो देत असलेला कर तिप्पट असावा असें ठरविण्यांत आलें; बहुतेक मोठाले गांवीं चेरमन निवडण्याचा अधिकार मुनसिपालिट्यांस देण्यांत आला.

या प्रांतांत सन १८९१-९२ व १८९२-९३ सालीं १०३ मुनसिपालिट्या होत्या. सातांशिवाय बाकीच्या मुनसिपालिट्यांत सभासद लोकांनीं निवडून दिलेले होते. निवडलेलें सभासद १२४८ व नेमलेले ३१४ होते. ९७ मुनसिपालिट्यांनीं चेरमन निवडून नेमलेले होते. निम्म्यापेक्षां जास्त सभासद सभांस हजर असतात. शिक्षणावर खर्च करण्यासंबंधानें साधारण बंगाल्याप्रमाणेंच स्थिति आहे. एकंदरांत मुनसिपालिट्यांचें काम चांगलें चालतें असें सरकारांनीं मत दिलें आहे.

जमा व खर्च सन १८९१-९२. जमा रु. ५९५३३५०. तपशील:—आक्ट्राय रु. २०८०७७०, दस्तुऱ्या रु. २७९५०, कर—घरांवर व जमिनींवर रु. ७४८००, गाड्या व जनावरांवर रु. ३०९४०, धंदे रोजगारांवर रु. ११४४७०, कर पाण्यावर रु. ६९३०, शहरसफाई रु. १६५८०, इतर रु. ४४६८०, भाडें, फी, दंड व किरकोळ रु. ६८४३२०, सरकारांतून, लोकलफंडांतून रु. १०९९०९०, कर्ज रु. १७७२८२०.

खर्च रु. ५२७१९९०. तपशील:—कर वसूल करणें व व्यवस्था रु. ४१४४७०, सार्वजनिक संरक्षण रु. ५३०५७०, आरोग्य रु. २७३९३६०, सोई रु. ५९७८६०, शिक्षण रु. १२३६५०, किरकोळ रु. ४३१८२०, कर्जाची फेड व व्याजीं लावणें रु. ४३४२६०.

जमाखर्च सन १८९२-९३. जमा रु. ४९९५३२०. तपशील:—

कर रु. २६४०७६०, कर्ज रु. १३००३६०, इतर बाबींपासून रु. १०५२००, खर्च रु. ५३२९४३०.

सन १८९१-९२ सालीं कराचें दरमाणशीं प्रमाण रु. .७३.

पंजाब १८४९ सालीं खालसा झाला. या इलाख्यांतील गांवसफाईची

व्यवस्था १८६७ चा कायदा होईपर्यंत सरकारांनीं नेमलेल्या कमिट्यांकडून होत असे व त्या कामास आक्ट्राय व दुसरे कर बसवून पैसा उत्पन्न करण्यांत येत असे. ही व्यवस्था १८६७ सालीं कायद्यानें बांधली गेली व तोच कायदा अयोध्या व मध्यप्रांतासही लागू करण्यांत आला. पुढें ह्या कायद्यांत सन १८७३ सालीं दुरुस्ती करण्यांत आली. या इलाख्यांत मुनसिपालिट्या तीन वर्गांच्या असत. पहिल्या वर्गांच्या मुनसिपालिट्या चार मुख्य शहरांत व चार गिरिशिखरस्थ हवेचे ठिकाणीं होत्या व त्यांस सरकार मंजुरातीशिवाय वाटेल तितका खर्च करण्याचा अधिकार होता; दुसरे वर्गाचे कमिट्यांस दोन हजारांपेक्षां जास्त रकम एका कामावर लावण्यास कमिशनरची मंजुरात घ्यावी लागे, व तिसरे वर्गाचे मुनसिपालिट्यांस सर्वच खर्च सरकारी अमलदारांचे मंजुरातीनें करावा लागे. कमिट्यांत सरकारी नौकर व नौकरींत नसलेले सभासद असत; त्यांत सरकारी सभासद $\frac{3}{5}$ शापेक्षां जास्त नसत. एकंदर सभासदांची संख्या पांचापेक्षां जास्त असावी लागे. जिल्ह्याचा डेपुटी कमिशनर चेरमन असे. आक्ट्राय, धंद्यावर कर घरांवर व गाड्या व जनावरांवर कर हे त्यांस प्राप्तीचे मार्ग होते; रस्ते, तळीं व गटारें करणें व पोलीस बाळगणें ह्या खर्चाच्या बाबी असत. शिलक राहिली तर इतर उपयुक्त कामें ह्मणजे शाळा, दवाखाने वगैरेसारखीं त्यांस करतां येत असत सन १८८४ चे कायद्यापासून कांहीं सभासद लोकनियुक्त असण्यास सुरुवात झाली. सन १८९१ सालीं या कायद्यांत दुरुस्ती झाली व या कायद्यावरून पूर्वीं कांहीं गोष्टी करण्याचे अधिकार सरकारानीं आपलेकडे ठेविले होते ते जिल्ह्याचे अधिकाऱ्यांस दिले; सरकारी सभासद $\frac{1}{3}$ असावे व त्यांची मुदत तीन वर्षें असावी असें ठरविलें. प्रेसिडेंटाची निवडणूक कमिट्याच करतात व कारणपरत्वें हा अधिकार सरकार आपलेकडे ठेवितात. या इलाख्यांत सभासद निवडण्याचे नियमांत एक मोठी विशेष गोष्ट आहे ती ही कीं, लाहोर शहरांत निरनिराळे धर्मांचे लोकांस आपले तर्फे वेगळाले सभासद निवडण्याचा अधिकार देण्यांत आला आहे, व हिंदु, मुसलमान, शीख, व ख्रिस्ती हे आपल्या तर्फेनें एक एक सभासद निवडून देतात. इतर शहरांतही बरेच वेळीं सभासदांची निवडणूक करण्यांत धर्माचें घोडें प्रधानत्वानें पुढें येतें.

या प्रांतांत सन १८९१-९२ व १८९२-९३ सालीं १४९ मुनसिपालिट्या होत्या, त्यांपैकीं ११ कमिट्यांस $\frac{2}{3}$ सभासद निवडण्याचा अधिकार होता व ११ कमिट्यांतील सर्वच सभासद सरकारांनीं नेमलेले होते. या प्रांतांतील कमिट्यांत एकंदर सभासद १६५६ होते, पैकीं ८०५ लोकनियुक्त होते. सभा भरविण्यासंबंधानें सर्व ठिकाणीं स्थिति सारखी नव्हती; कांहीं ठिकाणीं त्या कमी

झाल्या व कांहीं ठिकाणीं जरूरीप्रमाणें झाल्या. अलीकडे व्यवस्थेचे कामाचा भाग पुष्कळसा पोटकमिट्यांकडे सोंपविण्याची वहिवाट सुरू झाल्यापासून व्यवस्था चांगली चालली आहे. कराचा बोजा दरमाणशीं रु. १.४३ पडतो.

जमा व खर्च–सन १८९१–९२, जमा रु. ४४२८११०, तपशील:–आक्ट्राय रु. २७०३४८०, कर घरांवर व जमिनीवर रु. १२२१५०, गाड्या व जनावरावर रु. २६२७०, पाण्यासंबंधानें रु. १०५०, शहरसफाई रु. ६७६०, इतर रु. १६२५०, भाडें, फी, दंड व किरकोळ रु. ८०३१५०, सरकारांतून व लोकलफंडांतून रु. २८२७८०, कर्ज रु. ४६६२२०.

खर्च रु. ४३५४४१०, तपशील:–कराचा वसूल व व्यवस्था रु. ५६७९८०, सार्वजनिक संरक्षण रु. ६०४९४०, आरोग्य रु. १५४५६०, सोई रु. ५९६२२०, शिक्षण रु. ५३१८७०, किरकोळ रु. ३७२९४०, कर्जाची फेड व ठेवींत रु. १३४८६०.

जमाखर्च सन १८९२-९३. जमा रु. ४३२९१८०. तपशील:–करापासून रु. २७६५४६०, करा शिवाय दुसऱ्या बाबींपासून रु. १०७८२००, कर्जापासून रु. ४८५५२०, खर्च रु. ४४८८९५०.

मध्यप्रांतांत १८६९सालचा पंजाबा साठीं केलेला कायदा लागू करण्यांत येईपर्यंत मुनसिपालिटयांची व्यवस्था कायद्यानें बांधलेली नव्हती. या प्रांतासाठींच १८७३ सालीं कायदा करण्यांत आला. निवडणुकीचें तत्व पूर्वी पासूनच प्रचारांत होतें. १८८९ सालांत नवीन तत्वांप्रमाणें कायदा करण्यांत आला. या प्रांतांत सरकारी सभासदांचें प्रमाण जास्त आहे व ते जास्तीत जास्ती ह्मणजे तीनपंचमांशापर्यंत वाढवितां येतें.

सन १८९१–९२ सालीं ५७ मुनसिपालिटया होत्या व त्यांपैकीं १ त्या सालीं बंद करण्यांत आली; तेव्हां सन १८९२–९३ सालीं ५६ राहिल्या. सन १८९२–९३ सालीं ६२९ सभासदांपैकीं ४४० लोक नियुक्त व १८९ नेमणुकीचे होतें. युरोपिअन सभासद $\frac{१}{७}$ सुमारें होते. सभासद निवडण्याचें कामीं लोक बरीच आस्था दाखवितात. नागपूरमुनसिपालिटीची व्यवस्था फारच चांगली असते व इतर मुनसिपालिटयांतही सभासद चांगले लक्ष घालतात. आक्ट्राय कराचा वसूल नियमितपणानें घेण्यांत येतो; आरोग्याचीं कामें करण्याकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे, असा स्थानिक सरकारचा अभिप्राय आहे. कराचा बोजा दरमाणशीं रु. १.४५ आहे.

जमा व खर्च सन १८९१–९२, जमा रु. १७१५७६०, तपशील:–आक्ट्राय रु. ८०२१६०, दस्तुऱ्या रु. ७०५०, कर घरांवर व जमिनीवर रु. २९६००,

गाड्या व जनावरांवर रु. ६८०, धंदे-रोजगारावर रु. १४७९०, कर पाण्यासंबंधानें रु. २९२८०, शहर सफाई रु. ८५७९०, इतर रु. ५१४८०, भाडें, फी, दंड व किरकोळ रु. १५६१७०, सरकारांतून व लोकल फंडांतून रु. २६४५२०, कर्ज रु. ७७४२४०.

खर्च रु. १३८७७१०. तपशीलः—कराचा वसूल व व्यवस्था रु. ३३५०५०, सार्वजनिक संरक्षण रु. १००१०, आरोग्य रु. ६१६६५०, सोई रु. १४६०८०, शिक्षण रु. ११३४५०, किरकोळ रु. ६०८४०, कर्जाची फेड व ठेवी रु. १०५६३०.

जमाखर्च सन १८९२–९३. जमा रु. १३४४०४०, तपशीलः—करांपासून, रु. ९५९५६०, कराशिवाय दुसऱ्या बाबींपासून रु. २८४४८०, कर्ज रु. १०००००,

खर्च रु. १५२९४२०.

आसाम—बंगाल्यांत चालू असलेले सन १८५० व १८५६ व १८७६ चे कायदे आसाम प्रांतांत लागू होते. १८७३ सालीं हा प्रांत वेगळा करण्यांत आला. हल्लीं तीन म्युनिसिपालिट्यांचें, बंगालचें सन १८७४ चे तिसरे कायप्रमाणें व आणखी तिहींचें १८७६ चे कायद्याप्रमाणें काम चालतें. या म्युनिसिपालिट्यांशिवाय आणखी खेड्यांचे जमाव तीन आहेत व त्यांची व्यवस्था पूर्वीप्रमाणें आहे व तीन हवा खाण्याचे ठिकाणीं स्थापलेल्या कमिट्या आहेत.

सन १८९१–९२ सालीं या प्रांतांत १२ म्युनिसिपालिट्या होत्या. त्यांत सभासद १२६ होते. त्यांपैकीं ७५ सरकारांनीं नेमलेले व ५१ लोकनियुक्त होते. सन १८९२–९३ सालीं यांत कांहीं फरक झाला नाहीं.

एकंदरींत मुनसिपालिट्यांचे कामांत लोकांचें लक्ष साधारणच आहे. कराचा बोजा दरमाणशीं. रु. १.२० पडतो.

जमा व खर्च—सन १८९१-९२. जमा रु. १५६१२०. तपशीलः— दस्तुऱ्या रु. २३८४०, कर घरांवर रु. ४५५१०, गाड्या व जनावरांवर रु. ४९३०, पाण्यावर रु. १२३१०, शहरसफाई रु. ६५५०, भाडें, फी, वगैरे रु. ४०२१०, सरकारांतून व लोकलफंडांतून रु. २१५२०, कर्ज रु. १२५०.

खर्च रु. १४८२६०, तपशीलः—कराचा वसूल व व्यवस्था रु. १९६४०, सार्वजनिक संरक्षण रु. ३६२०, आरोग्य रु. ७४७५०, सोई रु. ३९९५०, शिक्षण रु. ४६७० किरकोळ रु. ६१०, कर्जाची फेड व ठेवी रु. ५०२०.

सन १८९२-९३, जमा रु. १५३२५०. तपशीलः—करापासून रु. ८७०९०, इतर बाबींपासून रु. ६२३६०, कर्ज रु. ३६००.

खर्च रु. १५१६००.

ब्रह्मदेशांत—मुनसिपालिटीची व्यवस्था फार उशिरा सुरू झाली, परंतु पुढें तिचा प्रसार जारीनें झाला. पहिल्यानें सरकारी हुकूमाप्रमाणें व्यवस्था चालत असे. सन १८७४ सालीं या प्रांतासाठीं कायदा करण्यांत आला. त्यावरून सरकारास ५००० पेक्षां जास्त वस्तीचे गांवीं कमिट्या स्थापन करण्याचा अधिकार मिळाला. रंगूनमुनिसिपालिटीचे विनंतीवरून तिजला सभासद निवडण्याचा अधिकार १८८२ सालीं पहिल्यानें देण्यांत आला व त्यामुळें लोकांत चांगली चळवळ दिसून आली, तेव्हां पुढें एक वर्षानेंच तीनचतुर्थांश सभासद व प्रेसिडेंट निवडण्याचा अधिकार आणखी ५ मुनसिपालिट्यांस देण्यांत आला. पोलिसचा खर्च पूर्वी मुनसिपालिट्यांवर असे तो कमी करण्यांत आला, व यांचेकडे शाळा व दवाखाने यांची व्यवस्था देण्यांत आली. शिवाय इतर ठिकाणीं मुनसिपालिटीचे नमुन्यावर कमिट्या नेमण्यांत आल्या, परंतु त्यांस कर बसविण्याचा अधिकार दिलेला नव्हता. या प्रांतांत आक्ट्राय कर कधींच नव्हता. १८७४ चा कायदा सन १८८४ चे १७ वे कायद्यानें रद्द झाला व त्यावरून मोठाले शहरांत तीन चतुर्थांश सभासद निवडण्याचा अधिकार आला. अपर (वरचा) ब्रह्मदेशास निवडणुकीचें तत्व लागू करण्याची स्थिति अजून आली नाहीं. त्यांत मध्यप्रांताचे नमुन्यावर, १८८७ चे रेग्युलेशन-५ प्रमाणें कमिटया नेमण्यांत येतात. या कमिटयांस कांहीं कर बसविण्याचा अधिकार दिलेला आहे व त्यांणीं आपलीं कामें करून शिवाय पोलीसखर्चही आपले उत्पन्नांतून भागवावा असें ठरविलें आहे.

जमाखर्च सन १८९१-९२. ९२-९३.

जमा	वरचा ब्रह्मदेश—१८९१-९२	—खालचा ब्रह्मदेश
दस्तुऱ्या	१८२०	३६१९०
कर घरावर व जमिनीवर.	१९१९००	४६२१८०
गाड्या व जनावरें	१८३०	९९८०
धंदे—रोजगार.	७९०	—
पाणी.	—	१५२९९०
दिवाबत्ती.	—	४९३९०
शहरसफाई.	—	११२८९०
भाडें, फी व किरकोळ.	३५५०५०	८६२२१०
सरकारांतून व लोकल फंडांतून	२६८०	६०९५४०

कर्ज	४१३६०	४५८८२०
	५९५४३०	२७५४२९०
खर्च		
कराचा वसूल व व्यवस्था	७८१६०	२२८२४०
सार्वजनिक संरक्षण, आरोग्य व सोई	५११५१०	१६००४६०
शिक्षण	३०००	२२८४३०
किरकोळ	३०७५०	२३०३६०
कर्जाची फेड व ठेवी	१७४७०	६७७४८०
	६४०८१०	२९६४९७०

वरचा ब्रह्मदेश—१८९२–९३—खालचा ब्रह्मदेश.

जमा रु.	६६३८२०	२२९४५९०
कर्ज	— —	३६२३३०
	६६३८२०	२६५६१२०
खर्च नेहमींचा	६४०२४०	२१२३३७०
कर्जाची फेड व ठेवी.	—	४४४०९०
	६४०२४०	२५६७४६०

सन १८९१–९२ सालीं खालचे ब्रह्मदेशांत २५ म्युनिसिपालिट्या होत्या व त्यांचे ३२१ सभासदांपैकीं २१० सरकारांनीं नेमलेले व १११ लोकनियुक्त होते. यांत सन १८९२–९३ सालीं ३२२ सभासद होते, त्यांपैकीं १०५ लोकनियुक्त व २१७ नेमणुकीचे होते. यांशिवाय १० टौनकमिट्या होत्या. कराचा बोजा सन १८९१–९२ सालीं दरमाणशीं रु. १·६० पडला होता. महत्वाच्या म्युनिसिपालिट्या दोनच रंगून व मालमीन येथील आहेत. रंगून येथें शास्त्रीय पद्धतीनें पाण्याचा निकाल करण्याची तजवीज झाली आहे.

वरचे ब्रह्मदेशांत सन १८९१–९२ सालीं १६ म्युनिसिपालिट्या होत्या. त्या

सन १८९२–९३ सालीं १५ झाल्या. मांडले येथील म्युनिसिपालिटीच काय ती महत्वाची आहे. कराचा बोजा माणशीं ०५९.

वऱ्हाड—या प्रांतांत १८७३ चे पंजाबचे कायद्याप्रमाणें मूळ कमिट्या स्थापन करण्यांत आल्या. सन १८८६ सालीं फारीन खात्यांतून इतर प्रांतांप्रमाणें याही प्रांतांतील मुनसिपालिट्यांची व्यवस्था करण्यासाठीं हुकूम देण्यांत आला आहे. ह्या व्यवस्था इतर प्रांतांतल्याप्रमाणेंच असल्यामुळें त्यांचा विशेष विस्तार करण्याची जरूर नाहीं.

वऱ्हाडांत सन १८९१-९२ सालीं आठ मुनासिपालिटया होत्या व त्यांत १२९ सभासद होते, त्यांपैकीं ९० लोकनियुक्त व ३९ सरकारांनीं नेमलेले होते. निवडणुकीचे वेळीं शेंकडा १७ पासून ४९ मतदार वेगळाले शहरांत मत देण्यास गेले होते. मुनासिपालिटयांचे हद्दींतील लोकांपैकीं शेंकडा ४½ लोकांस मत देण्याचा अधिकार आहे.

सन १८९१-९२ सालचे दशवार्षिक रिपोर्टांत या प्रांतांबद्दल जमा व खर्चाचा तपशील वेगळा नाहीं. लहान प्रांतांचा एके ठिकाणीं तपशील दिला आहे. तेव्हां पुढें सन १८९२ सालाचे रिपोर्टांतीलच तपशील घेतला आहे, परंतु तोही पुरा नाहीं.

जमा १८९२–९३. रु. २०७९९०. तपशील:—धंदे व रोजगारांवर कर रु. ४४५००, पाण्यावर कर रु. १२७५०, सफाईसंबंधीं कर रु. १९२३०, कापूस व धान्यांचे खरेदीविक्रीवर कर (दोन मुनसिपालिट्यांत) रु. २५७३०, मार्कॆटें व इतर मुनसिपालिटींचे मिळकतींचें भाडें रु. ७३७१०.

खर्च रु. १९४७८० तपशील:—सार्वजनिक सोई व आरोग्य रु. १४४२५०, संरक्षण रु. ७९२०, शिक्षण रु. १७३३०, कर वसूल करणें व व्यवस्था रु. १३६३०.

अजमीर व कुर्ग प्रांतांसंबंधानें विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. या प्रांतांतील व्यवस्था इतर प्रांतांतील नमुन्याप्रमाणेंच चालते.

पार्लमेंटास सादर झालेले रिपोर्टांत अजमीर, कुर्ग व वऱ्हाड, या प्रांतांचे आंकडे एकवट दाखल झाले आहेत; व त्याबद्दल जमा व खर्चाचें पत्रकही एकच दिलें आहे तें पुढें लिहिल्याप्रमाणें:—

हे तीनही प्रांत मिळून सन १८९१-९२ सालीं जमा रु. ५५९०५०. तपशील:—आक्ट्राय रु. २०८३३०, घरें व जमिनींवर कर रु. ११०९०, गाड्या व वाहनांवर रु. ६००, धंदे–रोजगारावर रु. ७६६०, शहरसफाईसंबंधीं कर

रु. १००५०, दंड, फी वगैरे रु. १११३६०, सरकारांतून व लोकलफंडांतून आलेली जमा रु. २०४००, कर्ज रु. १८९५६०.

खर्च रु. ५६१२८०. तपशील:-कर वसूल करणें व व्यवस्था रु. ५४०७० सार्वजनिक संरक्षण रु. ३८१५०, आरोग्य रु. २७८३३०, सोई रु. १०४२६०, शिक्षण रु. २३४४०, किरकोळ रु. ४३७१०, कर्जाची फेड व व्याजीं लावणें रु. १९३२०.

जमाखर्च १८९२-९३. जमा रु. ४९९९७. तपशील:-करापासून रु. २८७४३०, कराशिवाय इतर रु. ११७२४०, कर्ज रु. ९५३००.

खर्च रु. ५२२९७०.

सन १८९२-९३ सालीं या तीनही प्रांतांत मिळून मुनसिपालिटया १० होत्या. सन १८९१-९२ सालीं या मुनसिपालिटयांतील लोकांवर कराचा बोजा माणशीं रु. ०.९७ पडला.

स्थानिक स्वराज्यव्यवस्था सुरू होऊन फारच थोडीं वर्षे झालीं असल्यामुळें, ते अधिकार ठिकठिकाणचे लोकांस दिल्यापासून व निवडणुकीचें तत्व प्रचारांत आणल्यापासून फायदा किती झाला आहे हें निश्चयात्मक सांगतां येण्यासारखें नाहीं. हा सर्व काल अनुभव येण्यांतच गेला आहे; तरी एकंदरींत मागें पाऊल गेलें असें वाटत नाहीं. या देशांत संपत्ति व विद्वत्ता यांशीं लोकमान्यतेचा संबंध फार वेळां कमी दृष्टीस पडतो, व सरस्वतीचें व लक्ष्मीचें बद्ध वैरही प्रसिद्धच आहे, तेव्हां निवडणुकीनें सभासदत्व प्राप्त झाल्यानें, लोकमान्यता वाढली असें लोकांस वाटत नाहीं. या कारणानें वरचे दर्जाचे लोकांस जनसमाजाची खुशामत करून लोकनियुक्त सभासदत्व प्राप्त करून घेण्यापेक्षां, सरकारांतून नेमणूक होऊन येणें हें जास्त मा्तिदायक वाटतें. आणखीं दहा पांच वर्षांनीं राजनीतितत्वांच्या ज्ञानाचा फैलाव वरचे व खालचे दर्जाचे लोकांत सामान्यतः जास्त होईल व तें ज्ञान हल्लीं मधले दर्जाचे लोकांतच जसें अडकून राहिलें आहे, तसें रहाणार नाहीं; व तसें झाल्यानंतर कालांतरानें लढवय्या हा साळी-कुंभाराचा प्रतिनिधि होऊन कलमबहाद्दरांस अधिकारच्युत करील असा अजमास आहे. [श्रेष्ठ दर्जाचे लोक म्युनिसिपालिटयांत येण्यास नाखुष असण्याचें कारण जें वर दिलें आहे तें सर्वांसच मान्य होईल असें नाहीं. प्राचीन लेखकवर्गास प्राचीन तरवारबहाद्दरवर्गापैकीं लोक अंशतः तरी पदच्युत करतील, ही गोष्ट खरी आहे; परंतु ती स्थिति, ज्या तऱ्हेनें होऊं पहात आहे तिचेकडे व एकंदर परिणामाकडे लक्ष दिलें ह्मणजे ती मोठी स्पृहणीय होईल असें ह्मणवत नाहीं. कलमवाल्यांनीं आपले कलमांस विश्रांति देऊन व्यापारांत पडले, किंवा तरवार-

बहाद्दर आपलें कसब न सोडतां विद्यासंपन्न झाले, व आपले वर्तनानें स्वातंत्र्य-प्रियतेचा धडा इतरांस घालून देऊं लागले, तर ती स्थिति सर्वतोपरी देश-कल्याणकारक होईल. हल्लींचे मानावरून पाहतां सर्वच वर्ग नेभळ्या लेखक-वर्गांत येऊन वरील उक्तीची प्रतीति दाखवील अशी भीति आहे.]

खालील पत्रकावरून एकंदर मुनसिपालिट्यांचे हातून केवढी घडामोड होते हें दिसून येईल; तुलनेसाठीं सन १८८१-८२ सालचे आंकडे दिले आहेत. मुन-सिपालिट्यांची संख्या कमी दिसते याचें कारण पूर्वीच्या पुष्कळ लहान मुन-सिपालिट्या कमी होऊन त्यांची व्यवस्था लोकल बोर्डाकडे गेली आहे हें आहे. पाणी व कंदील लावणें यासंबंधाचे कर सार्वत्रिक झाल्यानें व सरकारी मदत किंवा पूर्वी सरकारांत जात असलेले स्थानिक कर हे मुनसिपालिट्यांकडे दिले गेल्यानें आयांत वाढ झाली आहे. एकंदरींत शेंकडा ४४ टक्के ऐवज आरोग्याकडे, २१ टक्के रस्ते वगैरे सोईचे कामाकडे, संरक्षणाकडे ८ टक्के, शिक्षणाकडे ६ टक्के, कर वसूल करणें व व्यवस्था करणें या कामांकडे १० टक्के असा खर्च सन १८९१-९२ सालीं होता; बाकीचे ११ टक्के इतर किरकोळ सदरीं खर्च झाला होता. आक्ट्रायचें उत्पन्न सर्वांत मोठें आहे. वीस टक्के सुमारें स्थावरावरचे करा-पासून येतें; पाणी, उजेड वगैरेंचें तजविजीबद्दल सुमारें १५ १/२ टक्के येतें; दस्तु-ऱ्यापासून २ ३/४ येतें. सामान्यतः ७६ १/३ टक्के करापासून उत्पन्न होतें; बाकी २३ २/३ इतर किरकोळ बाबीपासून येतें. एकंदरींत दरमाणशीं कर १ १/२ रुपाया बसतो, हा फार आहे असें नाहीं.

	१८८१–८२	१८९१–९२
एकंदर मुनसिपालिट्याची संख्या...	७९४	७५५
त्यांचे अधिकारांतील लोकसंख्या	१४२९५५०२	१५७४२५८१
	रु.	रु.
आक्ट्राय कर	७०३६२७०	८४५९९६०
आकारलेले कर	२५२३६६०	२५५४१५०
इतर कर.	७१६३८३०	१२४८६३६०
करापासूनचे जमेची बेरीज ...	१६७२३७६०	२३५००४७०
इतर उत्पन्नाच्या बाबी	५९३९६९०	१०४५५४७०

एकूण नेहमीचें उत्पन्न.. ...	२२६६३४५०	३३९५५९४०
कर्ज व ठेवी	६३९८९७०	६४८०७८००
एकूण जमा...	२९०६२४२०	९८७६३७४०
चालू खर्च...	२४५९३६७०	३९०२४०९०
कर्जाची फेड व ठेवी... ...	६५१९९६०	५८२२२३६०
एकूण खर्च	३११९३६३०	९७२४६४५०
दरमाणशीं सरासरी कराचें प्रमाण.	रुपये १·१३	रुपये १·४९

या पत्रकांतील आकड्यांचा प्रांत वार तपशील वर दिलाच आहे त्यावरून वेगळाले प्रांतास वेगळाले कर कसे पसंत आहेत तें दिसून येईल.

आक्ट्राय—एकंदरींत हिंदुस्थानांत प्रत्यक्ष करास लोक नाखुष असतात. तेव्हां आक्ट्राय कर हा अप्रत्यक्ष असल्यानें लोकांस आवडता असणें हें स्वाभाविकच आहे. ह्या कराचा भार फार अल्प असतो व पूर्वींचे अमदानीपासून तो कर घेण्याचा परिपाठ असल्यामुळें, लोकांस तो देण्याची सवय आहे, व त्यामुळें तो करसा वाटतही नाहीं.

हा कर अर्थशास्त्राचे तत्वांप्रमाणें योग्य नाहीं. तो गांवांत खपणारे मालावरच घेण्याचा नियम राहणें अशक्य आहे. फक्त शहर वलांडून जाणारे मालावर हा कर बसणें ह्मणजे तो व्यापारास व्यत्ययकारक होतो; कारण शेजारचे खेड्यापाड्यांत खपासाठीं जो माल खरेदी होऊन जातो त्यावर कर घेणें ह्मणजे तो कर त्या गांवांवर, त्यांस फायदा नसतां, बसविण्यासारखें होतें. या कारणांसाठीं सरकार या हरकती वारंवार मुनासिपालिट्यांचे नजरेस आणून तो कर कमी करविण्याविषयीं लक्ष ठेवतें व त्या कराचे अंमलबजावणीवर सक्त देखरेख करतें. हा कर घेण्याचे व तो कसा वसूल होतो हें पाहण्याचें संबंधानें सरकारांनीं कांहीं नियम ठरविले आहेत. स्थानिक खपाचे मालावर कर घेण्यांत यावा, तसा माल नसून व्यापारासाठीं जो वाहेर जाणारा माल असेल त्यावर, व ज्यावर सीकस्टम कायद्याप्रमाणें दस्तुरी घेण्यांत येते असे मालावर, कर घेण्यांत येऊं नयेत व शहर वलांडून जाणारे मालावर घेतलेला कर परत देण्यांत यावा असें ठरविलें आहे. ज्या त्या प्रांतांत माणशीं वेगळालीं धान्यें व इतर पदार्थ किती लागतात यांचे अजमासाचा आंकडा ठरविण्यांत आला आहे व त्या मानानें विवक्षित शहरांत कर देणारे मालाचा खप किती झाला हें पाहण्यांत येतें; व त्या प्रमाणापेक्षां विशेषसा जास्त

खप झाला असेल तर त्यावरून बाहेर गेलेले मालावर कर घेण्यांत आला असें अनुमान करण्यांत येतें. परंतु हाही अडाखा कांहीं प्रसंगीं नीट जुळत नाहीं; मोठे रस्त्यावर नसलेले गांवांत किंवा मध्यम गांव असून जेथें देवस्थानासंबंधानें यात्रेकरू फार येतात असे ठिकाणीं हें लोकसंख्येचे मानानें काढलेलें खपाचें प्रमाण चुकतें. एकंदरींत सर्व साधक बाधक गोष्टींचा विचार होऊन कराचा दर कमी केल्यानें व बाहेर जाणारे मालावर घेतलेली जकात परत देत गेल्यानें कार्यभाग बराच साधतो, असें ठरलें आहे.

आतां इलाख्याचे तीन शहरांतील मुनसिपालिट्यांचे संबंधानें माहिती दिली ह्मणजे मुनसिपालिट्यांचें वर्णन पुरें होईल.

कलकत्ता, मद्रास व मुंबई या राजधान्यांत स्थानिक स्वराज्यव्यवस्था फार पूर्वीपासून आहे. सन १६८७ सालीं कोर्ट आफ डायरेक्टर्स यांनीं प्रत्येक इलाख्याचे शहरीं स्थानिक व्यवस्थेचे कामांसाठीं कर बसविणें व वसूल करणें, यासाठीं युरोपिअन व नेटिव यांची एक सभा स्थापन केली होती; परंतु ती फार दिवस टिकली नाही. रेग्युलेटिंग आक्टावरून (३३ जार्ज दि थर्ड, चापटर ५२) गव्हरनर-जनरल यांस स्थानिक कामांसाठीं कर बसविण्याचा स्पष्टपणें अधिकार मिळाला. त्या कायद्याप्रमाणें नेमलेले जस्टिस आफ धी पीस हे रस्ते करणें, गांवसफाई करणें, गस्तीची तजवीज करणें वगैरे कामें पहात. पुढें सन १८५६ सालांत हीं कामें पगारदार मुनसिपल कमिशनरांकडे देण्यांत आलीं. हे कमिशनर तीन असत व त्यांपैकीं एक प्रेसिडेंट असे. येथपर्यंत हिंदुस्थानसरकारचे कायद्याप्रमाणें तीनही शहरांत एका नमुन्यावरच व्यवस्था होत गेली. त्यानंतर तीनही इलाख्यांकरितां कौन्सिलांतून वेगळाले कायदे होऊन त्या-त्याप्रमाणें वेगळाल्या व्यवस्था होत गेल्या.

कलकत्ता मुनसिपालिटीचे संबंधानें सन १८६३, १८७६, १८८८ सालीं कायदे झाले व प्रत्येक वेळीं तिचे व्यवस्थेंत फेरबदल झाला. पहिले कायद्याप्रमाणें मुनसिपल कारपोरेशनमध्यें चेअरमन सरकारनेमणुकीचा असे व शहरांत राहणारे सर्व जस्टिस आफ धी पीस हे सभासद असत. सन १८७६ चे कायद्यानें लोकांनीं सभासद निवडण्याचें सुरू झालें. या कायद्यावरून ठरलेले कारपोरेशनांत एक चेरमन व ७२ कमिशनर असत व त्यांपैकीं $\frac{2}{3}$ कर देणारे लोकांनीं नेमलेले असत; त्यांचीं मतें मत देण्याचे कागद घरीं पाठवून ते भरून घेण्यांत येत असत. सन १८८८ सालचे कायद्यावरून कागद घरीं भरून पाठवून मतें घेण्याचें बंद झालें व मतदारांनीं मतें स्वत: पोलिंग आफिसरकडे येऊन द्यावीं असें ठरलें व त्यांस कांहीं प्रसंगीं एकापेक्षां जास्त मतें देण्याचा अधिकार मिळाला.

कलकत्ता शहरांत व्यवस्थेचे कामीं फार अडचणी येतात. तें अगदीं सपाटीवर आहे यामुळें पाणी पुरविणें, व त्याचा निकाल लावणें, हीं कामें मोठे श्रमाचीं व खर्चाचीं आहेत. त्या शहरचे हद्दींत खासगी जमिनी झोंपडीं बांधून राहण्यास दिल्या आहेत; त्या ठिकाणीं गलिच्छपणा फार असतो. शहराचे उपांत-भागांत पुष्कळ वाड्या आहेत व त्यांतील सफाईची व्यवस्था सन १८८९ साला-पर्यंत स्वतंत्रपणें होत असे. पुढें त्यांचे अस्वच्छतेबद्दल फार तक्रारी झाल्या-वरून अखेर त्या वाड्या शहरचे म्युनिसिपालिटीचे हद्दींत सामिल केल्या व त्या हद्दींत म्युनिसिपालिटीनें अमुक रकम खर्च केलीच पाहिजे असें ठरविलें. हल्लीं त्याप्रमाणें व्यवस्था चालू आहे. ह्या शहरांत महामारीचें वास्तव्य काय-मचें असतें, तरी अलीकडे पाणी शुद्ध करून देण्यांत येऊं लागल्यापासून पूर्वी-पेक्षां स्थिति पुष्कळ सुधारली आहे.

पैशासंबंधानें म्युनिसिपालिटीची स्थिति चांगली आहे. ह्यास प्रमाण ह्मणजे दोन वर्षांपूर्वी म्युनिसिपालिटीनें कर्जासाठीं जाहिरात दिली होती, तेव्हां हवी होती तिचे सहापट रकम लोकांनीं देण्यास कबुली दर्शविली होती. कमिशनर लोक काम लक्ष लाऊन काळजीनें व फार चांगलें करतात, परंतु कर वसूल कर-ण्यांत थोडी कसुरी होते असें स्थानिक सरकारांनीं सन १८९२–९३ सालीं मत दिलें आहे.

दरमाणशीं कराचा बोजा शहरांत ७.२५ टक्के व उपांत भागांत २·६९ टक्के बसतो. सन १८८२ सालीं कर्जाची रकम रु. १२४०२२७० होती व सन १८९२–९३ सालीं रु. २३००६११७० होती.

या मुनसिपालिटीची जमा व खर्चाचे बाबतींत स्थिती पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

या मुनसिपालिटीची जमा सन १८९१–९२ सालीं रु. ४५६५०८० होती. त्यांत मुख्य बाबती, कर रु. ३२२३५८०, व धंद्यावरील कर रु. ५२५११० ह्या होत्या. खर्च रु. ४४९८८६० होता. शिक्षणावर खर्च रु. २९२० काय तो होता.

सन १८९२-९३ सालीं जमा रु. ४३९०४३०. पैकीं कर रु. ३३११९९० व धंद्यावर कर रु. ५३६६१०.

खर्च रु. ४३६३६३०. शिक्षणावर या सालींही खर्च फारच कमी झाला.

सन १८८२-८३ सालीं जमा रु. २७०७१२० होती. त्यांत कर रु. १६१६७१० व धंद्यावर कर रु. ४५०१८०.

खर्च रु. २२६५६०० होता.

मुंबईशहर–म्युनिसिपालिटीचे संबंधानें मुंबईसरकारचे कायदे सन १८६५–

१८७२–१८७८ सालीं झाले व त्यानंतर हल्लींचा कायदा झाला. सन १८६५ चे कायद्यानें शहरासाठीं नेमलेले जस्टिस आफ धी पीस व एक पगारी म्युनिसिपाल कमिशनर यांचेकडे व्यवस्था ठेवली होती. कमिशनर याजवर व्यवस्थेची व जमाखर्चाची सर्व जबाबदारी होती; जस्टिस लोकांस बजेटाची तपासणी करण्याचा अधिकार असे, परंतु तो नांवाचा मात्र होता. सन १८७२चे कायद्यावरून निवडणुकीचें तत्व प्रथमतः लागू झालें व हल्लीं आहेत त्याप्रमाणें कारपोरेशन व टौनकौन्सिल ह्या दोन सभा स्थापन झाल्या. त्यानंतर सन १७७८ सालीं त्या कायद्यांत कांहीं सुधारणा झाल्या, व त्यानंतर हल्लीं सुरू असलेला कायदा सन १८८८ सालीं झाला. त्याप्रमाणें कारपोरेशनांत ७२ सभासद असतात, त्यांपैकीं ३६ वार्डांतील लोकांनीं, १६ जस्टिस आफ धी पीस यांनीं, दोन युनिव्हर्सिटीचे सेनेटनें व दोन चेंबर आफ कामर्स नामक व्यापारी सभेनें निवडण्याचे आहेत. कमिशनर सुद्धां १६ सभासदांची नेमणूक सरकार करतें. पूर्वीचे टौनकौन्सिलाचे बदलीं हल्लीं कारपोरेशनची स्टांडिग कमिटी आहे. तींत १२ सभासद असतात व तीच आपला चेअरमन निवडते; व कमिशनर या कमिटींत सभासद असतो. शिक्षणाचें व दवाखान्यांचे व्यवस्थेचें काम कारपोरेशन व सरकार यांनीं नेमलेले संयुक्त कमिट्यांकडून करविण्याचें व वेगळालीं कामें वेगळाले कमिट्यांकडे वांटण्याचें याच कायद्यावरून सुरू झालें.

या शहरांत खर्चाच्या बाबी अनेक आहेत. गोद्या व कापसाच्या गिरण्या झाल्यानें रस्त्यांचा विस्तार फार वाढला आहे; पाणी लांबून आणावें लागलें आहे व शहर सपाटीवर असल्यामुळें घाणीचा निकाल लावण्यास अनेक हिकमती कराव्या लागल्या आहेत. क्षेत्र मर्यादित असलेमुळें वस्ती वाढण्यास मार्ग राहिला नाहीं. वरचे वर्गाचे लोक आतां शहराबाहेर जवळ जवळ असलेले गांवांतून राहूं लागले आहेत; तरी धंदा रोजगार करणारे मंडळीस गांवांतच रहावें लागतें, यामुळें शहरचे मध्यभागांतील वस्ती अतोनात दाट झाली आहे. गटारें करण्यासंबंधानें पद्धतशीर अशी व्यवस्था पूर्वींच ठरविलेली नसल्यामुळें तें काम झपाट्यानें झालेलें नाहीं. हल्लीं मि. बाल्डविन लाथाम यांनीं या प्रश्नाचा विचार करून दोन उपाय सुचविले आहेत व त्यांचा अनुभव पहाण्याचें काम चालू आहे.

पाण्याचे पुरवठ्याचे संबंधानें प्रयत्न जास्त सफल झाला आहे. या कामास मूळ प्रारंभ विहाडचे तलावापासून झाला, तें काम सन १८६० सालीं पुरें झालें. १८७२ सालीं तुळशी तलाव बांधण्यांत आला; तरीही पाण्याचा पुरवठा पुरेसा होईना, तेव्हां मुंबई पासून ५४ मैलांवर घाटांतील एका खोऱ्यांत नदीस धरण बांधून पाणी आणलें आहे. ह्या तानसा तलावाचें पाणी शहरांत सोडण्याचा समा-

रंभ व्हाइसराय साहेबांनीं मुद्दाम येऊन साजरा केला (१८९२). हें काम पुरें होण्यास ६ वर्षें लागलीं व खर्च दीड कोटि रुपये झाला. या तलावाचें बांधीव धरण २ मैल लांब आहे व सर्व जगांत याचे पेक्षां मोठें धरण नाहीं. या तलावाचा विस्तार ६ चौरस मैल आहे. या मुनसिपालिटीचे इष्टेटीची किंमत सुमारें ५ कोटि २८ लक्ष रुपये आहे व देणें ३ कोटि ७० लक्ष आहे. जमाखर्चाबद्दल माहिती आतां देतों.

जमा	१८८१	१८९१-९२
	रु.	रु.
८ टक्के कर एके ठिकाणीं केलेला	१०५८८१०	१९१९३४०
टौन ड्यूटि	६३७४८०	८४०२२०
गाड्यांवर कर	२३३३७०	३४२९७०
भंगी पट्टी...	२८१८००	५५५८८०
पाण्याचा कर	५२४८२०	११८१४३०
परवाने	३०५३८०	३२९९००
इतर बाबी	८३२०३०	९१४९६०
	३८७३५९०	६०८४७००
खर्च.		
व्यवस्था व कर वसूल करणें	२८६३००	४६५९२०
पोलिस व आग विझविणें	३८६९९०	३४६९५०
शहरसफाई	८०१४४०	१७९२५३०
सार्वजनिक कामें...	९६६७००	*१५८५७१०
दवाखानें...	२०४३०	५०२८०
विद्यादान...	१७५००	८०७२०
कर्जाची फेड	७४७२१०	१६३७४१०
इतर खर्च	६२२३००	२१११५०
	३७९८८७०	५६७०६८०

जमा सन १८९२-९३ रु. ६६६५११०
खर्च ,, ,, रु. +९२१११९०

* शिवाय कर्ज काढून कामें रु. ३४२०५४० चीं या सालीं झालीं.
\+ यापैकीं रु. २६६५६८० कर्ज काढलेले आहेत.

कराचा बोजा दर माणशीं सन १८८१ सालीं रु. ३-९० होता व सन १८९१-९२ सालीं रु. ६-२९ होता.

मद्रास शहर मुनसिपालिटी संबंधानें तेथील कायदे कौन्सिलांतून तीन कायदे सन १८६७, १८७८, व १८८४ सालीं झाले. पहिले कायद्यानें ३२ सभासदांची सभा स्थापन झाली; तिचा प्रेसिडेंट पगारी असे. सभासद निवडण्याची लोकांस परवानगी देण्यासंबंधानें कायद्यांत ठराव होता, परंतु तो जागचे जागींच राहिला होता. सन १८७८ सालचे कायद्यावरून निम्मे सभासद निवडण्याचा अधिकार कर देणारे लोकांस मिळाला. सन १८८४ सालीं हा कायदा रद्द होऊन नवीन कायदा झाला त्यांत २४ सभासद कर देणारांनीं निवडण्याचे व ११ सरकारांनीं नेमण्याचें ठरलें. लोक संख्येचे मानानें शेंकडा सुमारें एक मनुष्यास मत देण्याचा अधिकार आहे.

या शहराचा गेले १० वर्षांचा इतिहास ह्मणजे पाणी व त्याचा निकाल यासंबंधानें असलेले नैसर्गिक अडचणींचा परिहार करण्यासाठीं केलेले प्रयत्नांचें वर्णन होय. हें शहरही अगदीं सपाटीवर आहे यामुळें, ज्या भागांतील घाणेरें पाणी समुद्रांत जात नाहीं त्या भागांतील पाणी बाहेर नेण्यास कृत्रिम उपायांची व यंत्रांची योजना करावी लागली आहे. पाणी आणण्यासंबंधानें विलायतेहून मुद्दाम आणलेले एका तच्छास्त्रज्ञाकडून पाहणी व अंदाज करण्याचें चालू आहे. या शहरांत मैला काढण्याचे संबंधानें व्यवस्था असावी तशी नाहीं. मृत्यूचें प्रमाणही जास्तच आहे.

या शहरांत व्यापार मोठा नसल्यानें बाहेरचे लोक फार येत नाहींत. सन १८९१ चे मनुष्य गणपतीचे वेळीं शेंकडा ७० लोक या शहरांतच जन्मलेले आहेत असें दिसून आलें. या कारणानें या शहरांत जन्मभरणाचे दाखले बरोबर रहातात. मृत्यूंचीसंख्या वाढण्यास कारणें उपरी वस्तीचा अभाव व लहान वयाचे मरणारे मुलांची मोठी संख्या हीं आहेत. मुंबईसारखे व्यापारी शहरांत उपरी वस्ती फार असल्यानें सडे रहाणारे लोक जास्त असतात, त्यामुळें त्यांचे कुटुंबांतील जन्म मृत्यूमुळें त्या शहरचे संख्येवर परिणाम होत नाहीं.

या शहरास पाण्याची अजून टंचाईच आहे. या शहरावर कराचा बोजा फार कमी आहे, याचें कारण असें आहे कीं व्यापार फारसा नसल्यामुळें मिळकतीची किंमत वाढलेली नाहीं व त्यामुळें अल्पप्रमाणाची कराची आकारणी होते. सन १८८१ सालीं कराचा बोजा दरमाणशीं रु. १.८७ होता व सन १८९१ सालीं रु. १.९४ होता. कर्ज सन १८९१ सालीं रु. २८७०००० व सन १८९२–९३ झालीं रु. २७००००० होतें.

जमा.	१८८१-८२	१८९१-९२
	रु.	रु.
कर घरें व जमीनीवर.	३४१८४०	३६९५४०
—गाड्या व जनावरांवर...	६७९३०	७२१७०
—घंदेरोजगारावर	४७२५०	६५४८०
दस्तुऱ्या.	४०३८०	४९१००
पाण्याचा कर.	११९०२०	१४४४३०
दिवाबत्तीचा कर.	४१४६०	४५८१०
किरकोळ	१२०१८०	३२४८६०
	७७८६६०	१०७१३९०

खर्च.		
व्यवस्था	१०३७१०	९२९६०
शिक्षण	१०४९०	१००१०
रस्ते	१९३६४०	२७३४५०
सफाई	२२९८००	३५६०३०
दवाखाने	२१७२०	५७६१०
दिवाबत्ती	४१८१०	४७७५०
दुसरीं कामें	२९२६०	११९५८०
कर्जाची फेड	९१५२०	१९६२८०
	७११९५०	११५३६७०

सन १८९२–९३ सालीं जमा रु. १३६९४७०, खर्च १०९८६५०.

लोकल बोर्डें.

लोकल बोर्डें—स्थानिक कामांसाठीं बसविलेल्या करांच्या पैशाची व्यवस्था ठिकठिकाणीं मंडळ्या नेमून त्यांचे हातून कराविण्याचें सुरू झाल्यास सुमारें २५ वर्षें झालीं असतील. वेगवेगळाल्या प्रांतांतील व्यवस्था निरनिराळ्या नमुन्यावर चालत आहेत. या खात्याच्या जमेच्या बाबी, दस्तुऱ्या, नावांवरील व इतर प्रकारची फी व जामिनीवर जो एक वेगळा कर घेण्यांत येतो तो, ह्या आहेत; शिवाय सरकारांतूनही कांहीं मदत देण्यांत येते. रस्ते, दवाखाने व शाळा यांबद्दलचा पुष्कळसा खर्चही या स्थानिक मंडळ्यांकडून होतो. जिल्ह्यांत वसूल झालेल्या पैशाचा खर्च त्याच जिल्ह्यांत व्हावा असा ह्या पद्धतीचा हेतु

आहे. पूर्वी दर जिल्ह्याची व्यवस्था जिल्ह्याची एक कमिटी असे तिचे हातून होते असे. मुंबई व मद्रास इलाख्यांत जिल्ह्याचे पोटभागांत वेगळाल्या कमिट्या असत परंतु त्यांचें काम ह्मणजे जिल्हाकमिटी हुकूम करील त्याप्रमाणें कामें वठवून देणें इतकेंच असे. सन १८८३ सालापासून या कमिट्यांची रचना मुनसिपालिटयांचे धरतीवर करण्यांत आली आहे. आतां जिल्ह्यांचे व तालुक्यांचे बोर्डांत त्या त्या हद्दींत रहाणारे, किंवा जमीन धारण करणारे लोकांकडून, किंवा इतर कारणांवरून मत देण्यास लायख ठरविलेल्या लोकांकडून, प्रतिनिधि निवडले जातात. जिल्ह्याचे बोर्डांत तालुक्यानिहायचे कमिटयांतून निवडून दिलेले कांहीं सभासद असतात, व त्याशिवाय जिल्ह्यांतील मोठाले शहरांचे तर्फेही सभासद असतात. या नवीन कायद्यानें तालुक्याचे बोर्डास स्वतंत्र रीतीनें कामें करण्याचा अधिकार बराच दिला आहे व शिवाय त्या बोर्डांचे व जिल्हेबोर्डांचे संबंध निश्चित केलेले आहेत.

लोकल बोर्डांत सरकारनमणुकीचे व सरकारी नोकरींत असलेले सभासद लोकनियुक्त सभासदांपेक्षां मुनसिपालिट्यांचे प्रमाणानें जास्त असतात. असे प्रकारें या दोन प्रकारचे संस्थांत फरक असण्याचें कारण असें आहे कीं, लोकलबोर्डांचीं कामें ठिकठिकाणीं व अंतरा-अंतरावर होण्याचीं असतात व त्यांत वेगळाले ठिकाणचे लोकांचे भिन्न भिन्न प्रकारचे हितसंबंध असतात; तसेंच या बोर्डांचे जमेचा मोठा भाग जमीनबाबीशीं अतिनिकट संबंध असणारे व तिचे बरोबरच वसूल होणारे करांचा असतो, तेव्हां या बोर्डांचीं कामें सरकारी नौकरांवरच जास्त पडतात, व याच कारणांसाठीं जिल्ह्याचे व जिल्ह्याचे पोटविभागाचे मुख्य अधिकारीही या कमिट्यांचे प्रेसिडेंट असावे लागतात.

मद्रास इलाख्यांत लोकलबोर्डांची स्थापना सन १८७१ सालीं झाली. त्यापूर्वींही ह्मणजे सन १८५७ सालापासून वेगळाल्या कायद्यांवरून कांहीं कर वगैरे बसविले होते, परंतु त्या करांची व्यवस्था विशेष बोर्डांकडे सन १८७१ सालींच पहिल्यानें सोंपविण्यांत आली. त्या सालीं जिल्ह्यांचे विभाग करून त्या प्रत्येकांत ह्या कामांसाठीं एक एक कमिटी नेमण्यांत आली; त्यांचा प्रेसिडेंट कलेक्टर असे व निम्मे सभासद सरकारी नौकरींत नसलेले इसम असत. या सर्व सभासदांची नेमणूक सरकारांतून होत असे. हल्लींची व्यवस्था सन १८८४ चे ५ वे कायद्याप्रमाणें चालू आहे. आतां प्रत्येक जिल्ह्यांत एक बोर्ड असतें व त्यांत चोविसांपेक्षां कमी नाहींत इतके सभासद असतात व त्यांचे कलेक्टर प्रेसिडेंट असतात. सरकारी नौकरीपैकीं इसम सभासद किती असावेत याचें प्रमाण पूर्वींचेपेक्षां कमी करण्यांत आलें. आतां $\frac{1}{4}$ सभासद सरकारी नौकरीं-

तील असूं शकतात. हल्लीं जिल्हाबोर्डांतील निम्मे सभासद पोटविभागांचे बोर्डांनीं निवडलेले असतात. योग्य वाटेल त्या भागांत या बोर्डांचे तीनचतुर्थांशापर्यंत सभासद निवडण्याची परवानगी लोकांस देण्यास स्थानिक सरकारास अधिकार आहे. तालुक्यासाठीं सदरचे बोर्डांचे नमुन्यावरच बोर्डें स्थापन झालीं आहेत. त्यांतील सभासदांची नेमणूक अजून (१८९२–९३) सरकारांतूनच होत असते. या बोर्डास उत्पन्न जमीनबाबीवर एक अणा, रस्त्यावर, दस्तुऱ्या, मार्केटांवर फी यांपासून होतें.

या दोन प्रकारचे बोर्डांशिवाय तिसरे प्रकारचीं बोर्डें लहान लहान खेड्यांचे मेळे करून त्यांसाठीं नेमलेलीं आहेत. या सभांतील पंच सरकार नेमतात. तालुक्यांचे व मेळ्यांचे बोर्डांचे सभासद निवडण्याची परवानगी लोकांस देण्यास सरकारास अधिकार आहे.

सन १८९१-९२ सालीं जिल्ह्याचे व तालुक्याचे बोर्डांत १७९५ सभासद होते व सन १८९२-९३ सालीं १७७२ सभासद होते. तालुकाबोर्डांनीं जिल्ह्याचे बोर्डांसाठीं २७७ सभासद निवडले होते. खेड्यांचे मेळे ३२० होते.

सर्व वर्गांचे बोर्डांचीं कामें चांगलीं चाललीं आहेत व खेडेगांवांत सफाई संबंधानें चांगलें लक्ष पुरविलें जातें असा स्थानिक सरकारचा अभिप्राय आहे.

मुंबई इलाख्यांत लोकल बोर्डांची स्थापना मद्रासेपेक्षां दोन वर्षें पूर्वीं झाली. सन १८६९ सालीं या बाबतींत पहिल्यानें कायदा झाला, त्यांतच जिल्हा व तालुकाबोर्डें वेगळीं केलीं होतीं. जिल्हा बोर्डांत कलेक्टर प्रेसिडेंट असे व जमीन धारण करणारे व इनामदार यांचेपैकीं सभासद सरकारांतून नेमण्यांत येत असत. तालुक्यानिहायही असेच तऱ्हेचीं बोर्डें स्थापिलीं होतीं, परंतु त्यांचेकडे निवडक कामें करविण्यास सुचविण्याचा मात्र अधिकार होता; कामें करविण्याचा अधिकार व जबाबदारी ही सर्व जिल्ह्याचे बोर्डांकडे असे. सन १८८४ चे कायद्यावरून निवडणुकीचें तत्व सर्व बोर्डांस लागू झालें. आतां तालुकाबोर्डांत निंमे सभासद निवडणुकीचे व बाकीचे नेमणुकीचे असतात. एकंदर सभासदांपैकीं $\frac{1}{4}$ शापेक्षां जास्त नाहीं अशी संख्या सरकारी नौकरांची असली तरी चालते. निम्मे सभासद गांवचे समुदाय, ५००० पेक्षां जास्त लोकवस्तीच्या मुनसिपालिट्या व इनामगांवें यांचे तर्फे निवडलेले असतात. डिस्ट्रिक्टबोर्डांत दरतालुकाबोर्डांपैकीं एक एक सभासद असतो; ज्या गांवांत १८००० पेक्षां जास्त वस्ती आहे असे गांवांचे तर्फे ही सभासद निवडून पाठवितात. प्रेसिडेंट सरकारनेमणुकीचा असतो, परंतु प्रेसिडेंट निवडण्याची परवानगी बोर्डांस देण्याचा अधिकार स्थानिक सरकारास आहे. प्रेसिडेंट पगार-

दार सरकारी नौकर असेल तर व्हाइस प्रेसिडेंट बोर्डानें निवडलेला असतो. एंजिनिअर व वैद्यकी खात्यांचे अंमलदार यांची मदत पाहिजे असेल तेव्हां त्यांस सभेस आणविण्याची परवानगी ठेवली आहे. या बोर्डास उत्पन्न ह्मणजे जमिनीवरील कर, (सिंधेंत दुकानांवर कर), दस्तुऱ्या व नावांवर फी या बाबींपासून होतें. जमिनीवरील कराचा दर पालटण्याचा किंवा दुसरा जास्त कर बसविण्याचा बोर्डास अधिकार नाहीं. या इलाख्यापैकीं तीन जिल्हे व दुसरे दोन जिल्ह्यांचे कांहीं भाग यांत त्यांचे सुधारणेच्या कामांत मागें पाऊल असलेमुळें, या कायद्याप्रमाणें अंमल अजून चालू झाला नाहीं. सभासद सभांस येण्याचे संबंधानें पूर्वीपेक्षां आतां स्थिति सुधारत आहे. एकंदरींत व्यवस्थाही चांगले प्रकारची असते असा स्थानिक सरकारचा अभिप्राय आहे.

या प्रांतांत २३ जिल्हाबोर्डें व २०१ तालुकाबोर्डें आहेत; त्यांत सन १८९२–९३ सालीं एकंदर सभासद ३४२१ होते. त्यांपैकीं १५४४ लोकांनीं निवडलेले व १८७७ सरकारांनीं नेमलेले असे होते.

बंगाल इलाख्यांत सन १८७१ सालापर्यंत स्थानिक कामांसाठीं कर नव्हता. त्या सालीं रस्ते करणें व दुरुस्त ठेवणें या कामांसाठीं कर रोडआक्ट या कायद्यावरून बसविला व त्या कामांची व्यवस्था पाहण्यासाठीं जिल्ह्याचीं व तालुक्याचीं बोर्डें स्थापन करण्यांत आलीं. सन १८७७ सालीं इतर सुधारणांसाठीं आणखी एक कर बसविण्यांत आला, परंतु या पैशाची व्यवस्था सरकाराकडून होत होती. १८८० सालीं हे दोन्ही कायदे एक करण्यांत येऊन, त्यांत सुधारणा करण्यांत आली, परंतु ह्या वेळींही या कमिटयांकडे रस्त्यांचेंच मात्र काम सोंपविलें होतें; मद्रास व मुंबई इलाख्यांप्रमाणें शाळा, दवाखाने यांची व्यवस्था त्यांचेकडे दिली नव्हती. इतर इलाख्यांचे नमुन्यावर व्यवस्था सन१८८५ चे तिसरे कायद्यावरून सुरू झाली. त्याप्रमाणें निवडणुकीचें तत्व लागू करण्यांत आलें, व तालुकाबोर्डांत सरकारी नौकरांची संख्या $\frac{1}{3}$ व जिल्हाबोर्डांत $\frac{1}{2}$ यापेक्षां जास्त असूं नये असें ठरलें. या कायद्यावरून प्राथमिक व मध्यम वर्गाचे शिक्षणाचें काम व सरकारांतून त्या कामावर खर्च होण्याचा पैसा हाही या बोर्डाकडे देण्याचें ठरलें. सन १८९२–९३ सालांत एकंदर ३८ डिस्ट्रिक्ट बोर्डें व १०४ लोकल बोर्डें होतीं. जिल्हेबोर्डांत ७९३ व लोकल बोर्डांत १२३० असे सभासद होते व त्यांपैकीं अनुक्रमें ३०९ व ३६५ लोकनियुक्त होते. सर्व जिल्हेबोर्डांचे चेरमन जिल्हाधिपतीच होते. लोकल बोर्डांचे अधिकार जिल्ह्या-जिल्ह्याचे स्थितीचे मानानें वेगळाले होते. मध्यम वर्गाचे शिक्षणाचें काम अजून या बोर्डाकडे

देण्यांत आलें नाहीं. दिस्ट्रिक्ट बोर्डाकडून काम चांगलें होतें व तालुकानिहायचे बोर्डांत लोकांचें लक्ष नाहीं, सुधारणा होणें जरूर आहे असा स्थानिक सरकारचा अभिप्राय आहे.

वायव्य व अयोध्या प्रांतांत स्थानिक कर घेण्याचें फार दिवसांपासून चालू आहे, व त्या पैशाचे व्यवस्थेचे कामांत कलेक्टरांस मदत करण्यासाठीं जिल्हाकमिटयाही फार दिवसांपासून आहेत. हे कर जमीनदारांपासून जमीनमहसुलाबरोबरच वसूल करण्यांत येत असत. सन १८७१ सालीं या दोन प्रांतांत स्थानिक कारणास्तव कर घेण्यासाठीं दोन कायदे करण्यांत आले. त्याप्रमाणें कायमचे धारे ठरले होते असे भागांत लागण जमीनीवर पूर्वी जमीनबाबेवर एक टका घेण्यांत येत असे. त्याशिवाय दरएकरास दोन आणेप्रमाणें जमीनदारांकडून कर घेण्याचें ठरलें, व त्यांपैकीं निम्मे कुळाकडून त्यांस वसूल करून घेतां येत असे; व कांहीं मुदतीपुरती दर ठरोती झालेल्या भागांत जमीन बाबीवर १० टके घेण्यांत येत. अयोध्या प्रांतांत पूर्वी जमीनबाबेवर शेंकडा १$\frac{1}{2}$ टका होता तो या कायद्यानें २$\frac{1}{2}$ टके झाला. हे कर जिल्ह्याचे जिल्ह्यांतच खर्च होत असत. सन १८८२ सालीं स्थानिक सरकारांनीं लोकल बोर्डाचे अधिकार वाढविले व सरकारी नौकरींत नसलेले लोकांस या कमिटयांत जास्त नेमावें असें ठरविलें. पुढें त्या सुधारणा सन १८८३ चे १४ वे कायद्यांत दाखल करण्यांत आल्या. या कायद्याचे पूर्वी जिल्हाबोर्डें मात्र होतीं व या कायद्यानें जिल्हा बोर्डें व पोटविभागाचीं बोर्डें अशीं दोन प्रकारचीं बोर्डें स्थापन केलीं. पोटविभागाचे बोर्डांत सभासद तीनचतुर्थांश निवडणुकीनें व $\frac{1}{4}$ श नेमणुकीनें येतात, व या बोर्डांचे सर्व सभासद जिल्हाबोर्डांचे सभासद असतात; तरी सर्व सभासद जाण्याचे बदली जिल्हे बोर्डांस कांहीं प्रतिनिधी पाठविण्याचा पोटविभागांचे बोर्डांस अधिकार आहे. हीं बोर्डें आपला चेअरमन निवडतात; व जिल्हेबोर्डांचे संबंधानें असें ठरलें आहे कीं, त्या बोर्डांनीं आपला चेअरमन पाहिजे तर सरकारमंजुरातीवर निवडावा, किंवा पाहिजे तर ती नेमणूक सरकारांवर सोंपवावी. सुधारणेंत मागसलेल्या भागांस हा कायदा लागू नाहीं, तेथील व्यवस्था पूर्वीचे नमुन्याचे कमिटयांकडून होते. सन १८९१-९२ सालीं चार जिल्हे शिवायकरून बाकी सर्व जिल्ह्यांत बोर्डें होतीं व चार जिल्ह्यांत पूर्वीचे नमुन्याच्या कमिटया होत्या. कलेक्टर सर्व ठिकाणीं चेरमन होते. सालोसालचे निवडणुकीसंबंधानें लोकांत उत्साह दृष्टीस पडत नाहीं. तसेंच सभेसही सभासद पुष्कळसे हजर असत नाहींत. या बोर्डांचीं कामें बरेच चांगले प्रकारानें होतात असा स्थानिक सरकारचा अभिप्राय

आहे. या प्रांतांत सन १८९२।९३ सालीं दिस्ट्रिक्ट कमिटया चार होत्या व ४४ जिल्हेबोर्डें होतीं. एकंदर सभासद १६३८ होते. त्यांपैकीं १२८६ लोकनियुक्त व ३५२ सरकारनेमणुकीचे होते.

पंजाब प्रांतांतही लोकल बोर्डांची व्यवस्था पहिल्यानें साधारण वायव्य प्रांताप्रमाणेंच होती. सन १८७१ सालापासून १८८३ पर्यंत या बोर्डांस उत्पन्नाची मुख्य बाब म्हणजे जमिनीवरील कर हीच होती. सन १८७१ चे कायद्यानें जिल्हेकमिटया स्थापन झाल्या; त्यांचे प्रेसिडेंट डेप्युटी कमिशनर असत व $\frac{2}{3}$ सभासद सरकारी नौकर असत. सन १८८३ सालीं दिस्ट्रिक्ट बोर्डांचा कायदा अमलांत आला व तो २१ जिल्ह्यांस लागू करण्यांत आला. त्यांत जिल्हेबोर्डांशिवाय पोटविभागांचीं बोर्डें स्थापन झालीं; व त्या बोर्डांचे सभासदांचे संबंधानें निम्मेपेक्षां जास्त सभासद लोक नियुक्त असावेत असें ठरविण्यांत आलें. दिस्ट्रिक्ट बोर्डें डेपुटी कमिशनर यांसच प्रेसिडेंट नेमून घेत आलीं आहेत. पश्चिमेकडील १२ जिल्ह्यांत अजून सभासद सरकारांतून नेमण्यांत येतात. सन १८९१।९२ सालीं नेमणुकीचे सभासदांची संख्या पूर्वींचे पेक्षां वाढली, कारण रुळीप्रमाणें नेमणुकीच्या जागा ठरलेल्या होत्या, तितके सभासद या सालीं नेमण्यांत आले. कांहीं ठिकाणीं निवडून घेण्यास सभासदच पुढें आले नाहींत व दिल्लीस तर लोकनियुक्त सभासदांनीं आपले जागेचे राजीनामे देऊन सरकारतर्फे आपली नेमणूक करून घेतली. ४ जिल्ह्यांत निवडणूक झाली त्यांत लोकांची कोणत्याही प्रकारची आस्था दिसून आली नाहीं. एकंदरींत जिल्हेबोर्डांचे संबंधानें सरकारचा अभिप्राय अनुकूल आहे; परंतु पोटविभागांचे बोर्डांचे हातून कामें करविण्यास फारच अडचण पडते असें त्यांचे अनुभवास आलें आहे.

सन १८९२।९३ सालापर्यंत सरहद्दीवरील १२ जिल्ह्यांत सभासदांची नेमणूक सरकार करीत आहेत; बाकी १ बोर्डांत कांहीं सरकारांनीं नेमलेले असतात व कांहीं तालुका बोर्डांतून नेमून देतात अशी स्थिति आहे. जिल्हा बोर्डांचे खालचे दर्जाचीं बोर्डें ८३ होतीं, त्यांपैकीं १५ सभांत सभासद सरकार नेमतें, वाकीच्या बोर्डांत अंशतः लोक नियुक्त असतात.

मध्यप्रांतांत लोकल बोर्डांची स्थापना सन १८८३ सालांत पहिल्यानें झाली. पूर्वीं रस्ते व शाळा यांचेसाठीं कांहीं कर घेण्यांत येत असत, परंतु त्यांची सर्व व्यवस्था सरकारी अंमलदारांचे हातूनच होत असे. १८८३ चे पहिले कायद्यानें भागाभागांचे समुदायांसाठीं एक एक लोकल बोर्ड व त्यांचेवर जिल्हा बोर्ड अशीं दोन बोर्डें स्थापन केलीं. लोकल बोर्डांतील सभासदांचे तीन वर्ग आहेत. (१) मुकादम (म्हणजे गांवचे प्रमुख इसम) गांवांचे तर्फे निवडलेले,

व (२) धंदेवाले व व्यापारी यांचे तर्फे निवडण्यांत आलेले, व (३) सुमारें $\frac{1}{3}$ शापर्यंत सभासद स्थानिक सरकारांनीं नेमलेले. दिस्ट्रिक्ट बोर्डांत लोकल बोर्ड आपलेपैकीं सभासद नेमतात, व शिवाय व्यापारी व धंदेवाले यांचे तर्फे सभासद सरकार नेमणुकीचे किंवा लोकांनीं निवडलेले असे असतात, व $\frac{1}{3}$ शापेक्षां जास्त नाहींत असे सरकारांनीं नेमलेले असतात. दोन्हीही बोर्डांस आपले चेरमन निवडण्याचा अधिकार आहे. लोकल बोर्डें हीं दिस्ट्रिक्ट बोर्डांचे अंकित अशीं ठरविलीं आहेत. शाळांचेसाठीं विशेष कमिट्या नेमण्याचा व अनेक दिस्ट्रिक्टांचा किंवा लोकल बोर्डांचा एखादे कामांत संबंध असेल तर त्या सर्वांचे तर्फे संयुक्त कमिटी नेमण्याचा अधिकार ठेवला आहे. या बोर्डांकडे रस्ते करणें, शाळा, दवाखाने घालणें, व त्यांची व्यवस्था पाहणें, मार्केट व धर्मशाळा वगैरेसारखीं सार्वजनिक कामें करणें, किंवा तलाव किंवा विहिरी बांधणें, झाडें लावणें, वगैरे कामें सोंपविलीं आहेत.

सन १८९१।९२ सालांत शेंकडा ४० सभासद सभांस हजर होते. जिल्हे बोर्डांपेक्षां पोटविभागाचे बोर्डांत कमी हजर असत; याचें कारण जिल्हे बोर्डा-कडेसच महत्वाचे सर्व अधिकार ठेवले आहेत हें आहे. या बोर्डांचे मार्फत या सालीं पुष्कळ रस्ते दुरुस्त करण्यांत आले. पुढें व्हिलेज सानिटेश-नचे (गांवगंनाची सफाई) कामासाठीं दरसाल कांहीं रकम खर्च करण्याचें ठरलें आहे. प्राथमिक शिक्षण या बोर्डांकडेसच सोंपविण्यांत आलें आहे, व त्या शिक्षणाचा प्रसार होण्यासाठीं खासगी शाळांस मदत देण्याची वहिवाट जास्त वाढविण्याचेंही ठरलें आहे.

आसाम प्रांतांतही स्थानिक स्वराज्यव्यवस्था सन १८७९ चे रेग्युलेशन-प्रमाणें चालू झाली. त्या कायद्यांत १८८२ सालीं कांहीं दुरुस्ती करण्यांत आली व इतर प्रांतांत जशी सुधारणा होऊन बोर्डें स्थापन झालीं तशींच याही प्रांतांत स्थापण्यांत आलीं. निवडणुकीचें तत्व प्रचारांत आहे व कांहीं सभासद सरकारनेमणुकीचे असतात. चहा पिकणारे जिल्ह्यांत युरोपिअन चहा लावणारे लोकांस आपले तर्फे सभासद निवडतां येतो व बाकीचे सभासद नेटिव कर देणारांचे तर्फे निवडलेले असतात किंवा त्यांचेपैकींच सरकार नेमतें. जंगली प्रांतांत याप्रमाणें व्यवस्था अमलांत आली नाहीं. एकंदरींत या बोर्डांकडून पाण्याचे बाबतींत व्यवस्था चांगली झाली आहे, परंतु सफाईचे कामाकडे त्यांनीं फारच कमी लक्ष दिलें आहे. चहाचे लागवडीचे जि-ल्ह्यांत युरोपिअन सभासद रस्त्याचे कामावर फार चांगली देखरेख करतात.

वऱ्हाड प्रांतांत हैदराबाद येथील रेसिडेंटाचे मार्फत व्यवस्था होतें व

इतर प्रांतांप्रमाणेंच त्यांत बोर्डें स्थापिलेलीं आहेत व जमाखर्चाची पद्धति सुरू आहे. सभासदांपैकीं $\frac{2}{3}$ निवडलेले असतात. सन १८९१--९२ सालीं एकंदर बोर्डांत सभासद ४३४ होते, पैकीं १३७ सरकारांनीं नेमलेले व २९७ लोकनियुक्त असे होते.

ब्रह्मदेशांत स्थानिक कामासाठीं कर घेण्याची पद्धति हिंदुस्थानांतलेपेक्षां वेगळी आहे व त्या बाबतींत व्यवस्थाही सरकारमार्फतच होते.

हिंदुस्थानांतील लोकल बोर्डांची सन १८९१-९२ सालची जमा व खर्चाची माहिती खालीं देतों. त्यानंतर सन १८९२-९३ सालाबद्दल ठोकळ आंकडे दिले आहेत. पूर्वींचे व्यवस्थेंत व हल्लींचे व्यवस्थेंत महदंतर असलेमुळें, पूर्वीं या कामांवर खर्च होणारी रक्कम समजल्यापासून तुलना करण्यास कांहीं उपयोग होण्यासारखा नाहीं, सबब ती दिली नाहीं.

(१) मद्रासइलाखा. जमा रु. ६९८८११०; खर्च रु. ७७०१२८०.

प्रांतिक कर रु. ४५२३१२०	शिक्षण रु. १०५६१९०
सरकारांतून रु. ५८२२५०	सफाई व दवाखाने रु. १६००६७०
इतर जमा रु. १८८२७४०	रस्ते व इमारती रु. ६६१६१२०
सन १८९२-९३ जमा रु. ८२८२६३०	व्यवस्था रु. ४२८३००
——— खर्च रु. ८२२९९६०	

(२) मुंबईइलाखा–जमा रु. ६४०९५००; खर्च रु. ४३०१०७०

प्रांतिक कर रु. २४८९६२०	शिक्षण रु. १३९६४००
सरकारांतून रु. ९१९०४०	सफाई व दवाखाने रु. १८८७२०
इतर रु. १२००८४०	रस्ते व इमारती रु. २३८५७८०
सन १८९२-९३ जमा रु. ४४२६०२०	व्यवस्था रु. १३३६००
——— खर्च रु. ४६७५७००	इतर रु. १९६५७०

(३) बंगालइलाखा–जमा रु. ५४४३९४०; खर्च रु. ५६६८५५०.

प्रांतिक कर रु. ३५१०२३०	शिक्षण रु. ११०५३७०
सरकारांतून रु. ८०१५१०	सफाई व दवाखाने रु. ७६३२०
इतर जमा रु. ११३२२००	रस्ते व इमारती रु. ४०४३९४०
सन १८९२-९३ जमा रु. ७१९३८००	व्यवस्था रु. २८२९००
——— खर्च रु. ७०२३३५०	इतर खर्च रु. १६०७२०

(दुष्काळामुळें जास्त रक्कम सरकारांतून आली व खर्च झाली.)

(४) वायव्यप्रांत–जमा रु. ४०५२०१०; खर्च रु. ४००६४२०.

प्रांतिक कर रु. २०२५०८०	शिक्षण रु. १२५५६४०
सरकारांतून रु. १४१४०९०	सफाई व दवाखाने रु. ४८११६०
इतर जमा रु. ६१२८४०	रस्ते व इमारती रु. २११५०४०
सन १८९२।९३ जमा रु. ३८३७०६०	व्यवस्था रु. ५२२५०
———खर्च रु. ३८७७९४०	इतर रु. १०२३३०

(५) पंजाब–जमा रु. २७७७९२० ; खर्च रु. २४७१९००.

प्रांतिक कर रु. २१७५५३०	शिक्षण रु. ५७१७८०
सरकारांतून रु. १५२८०	सफाई व दवाखानें रु. ३०५९६०
इतर जमा रु. ५८७११०	रस्ते व इमारती रु. ११५१०३०
सन १८९२।९३ जमा रु. २७८६०७०	व्यवस्था रु. ११९५२०
———खर्च रु. २९२२६८०	इतर रु. २२३६१०

(६) मध्यप्रांत–जमा रु. ७४२०५०; खर्च रु. ६९२८५०.

प्रांतिक कर रु. ३१५४४०	शिक्षण रु. २०५४५०
सरकारांतून रु. १०००३०	सफाई व दवाखाने रु. ५८१५०
इतर जमा रु. ३२६५८०	रस्ते–इमारती रु. ३३३४००
सन १८९२।९३ जमा रु. ७७०८००	व्यवस्था रु. २७५५०
———खर्च रु. ६२८३००*	इतर रु. ७६३००

*ही बेरीज खर्चाचे मुख्य मुख्य रकमांची आहे.

(७) आसाम–जमा रु. ९०२१५०; खर्च रु. ७९०१२०.

प्रांतिक कर रु. ५४८१३०	शिक्षण रु. १६१६९०
सरकारांतून रु. १८९९८०	सफाई व दवाखाने रु. ३६७९०
इतर जमा रु. १६४०४०	रस्ते व इमारती रु. ५१९३२०
सन १८९२।९३ जमा रु. ११५७९२०	व्यवस्था रु. २५९०
———खर्च रु. ९०२१४०	इतर रु. ५९७३०

पोर्टट्रस्ट.

स्थानिक स्वराज्य व्यवस्थेचे संबंधानें ज्या सभा स्थापन करण्यांत आल्या आहेत त्यांपैकीं पहिल्या दोन वर्गांच्या सभांचे संबंधानें येथपर्यंत हकीकत सांगितली. आतां तिसऱ्या वर्गाच्या सभासंबंधानें ह्मणजे इलाख्यांतील तीन शहरांतील व कराची व रंगून येथील बंदरांचे संबंधानें व्यवस्था करण्यासाठीं नेमलेल्या बोर्डांची हकीकत सांगण्याची आहे.

या बोर्डाकडे वर सांगितलेले शहरांचीं बंदरें, व त्यांसंबंधाच्या मिळकती यांचीं व्यवस्था असते. या बोर्डाचीं कामें व महत्व हीं दिवसेंदिवस वाढत चाललीं आहेत. या बोर्डासही निवडणुकीचें तत्व लागू करण्यांत आलें आहे. व्यापार व धंदे यांच्या हिताहिताचा संबंध या कामांत फार असलेमुळें तद्व्यवसायी लोकांचे तर्फे या बोर्डांत सभासद असतात. चेंबर ऑफ कॉमर्स, ट्रेड्स् असोसिएशन्, त्या त्या शहराचे मुलकी कामगार, तेथील म्युनिसिपालिटिचे चेअरमन अथवा प्रेसिडेंट व एंजिनिअर हे या बोर्डांत सभासद असतात. या बोर्डाचे ताब्यांत दिलेली इष्टेटही फार मोठी व किंमतीची असते व त्याच प्रमाणानें त्यांचे अधिकारही असतात. नवीन गोद्या बांधणें, जुन्या दुरुस्त करणें, तसेंच धक्के बांधणें, दीपगृहें बांधणें, व समुद्रांत खुणेसाठीं बोयरें टाकणें, हीं व अशा तऱ्हेचीं कामें बोर्डाकडे असतात. याप्रमाणें व्यापाराच्या सोयीसाठीं व तो वृद्धिंगत होण्यासाठीं या बोर्डास मोठीं खर्चाचीं कामें करावीं लागतात, व म्हणूनच या बोर्डास कर्ज काढण्याची परवानगी दिलेली आहे.

कलकत्ता ट्रस्ट हें १८७० सालांत स्थापन झालें. त्याबद्दलचा कायदा दुरुस्त करून नवीन कायदा १८९० सालीं करण्यांत आला. या बोर्डांत पंधरा सभासद असतात व त्यांपैकीं आठ सभासद वर सांगितलेप्रमाणें व्यापारी मंडळींचे व मुनसिपालिटीचे तर्फे निवडलेले असतात. या पंधरा सभासदांशिवाय चेरमन व व्हाइस चेरमन असतात त्यांची नेमणूक सरकारांतून होते.

सन १८८१-८२, १८९१-९२,१८९२-९३ सालीं या बोर्डाचे जमा व खर्चाचे ठोकळ आंकडे दिले आहेत.

	जमा रु.	खर्च रु.
१८८१-८२	२०९६७०	१५९०२५०
१८९१-९२	३२२२६१०	२२९७४१०
१८९२-९३	३०३००००	२८३००००

कर्ज व मिळकतीची किंमत खालीं लिहिलेप्रमाणें होती.

कर्ज	मिळकत
१८८१-८२ रु. ७९१७८३०	१८८१-८२ रु. १३४३३६९०
१८९१-९२ रु. ११७५९३८०	१८९१-९२ रु. २२८१७१४०
१८९२-९३ रु. ४०३७००००	

गेल्या १० वर्षांत या बोर्डानें कामें केलीं आहेत त्यांत किडरपूर येथील गोदी हें मुख्य आहे. ह्या कामास रु. २८७६०००० खर्च झाले आहेत.

मुंबई पोर्ट ट्रस्ट या बोर्डाची स्थापना सन १८७३ चे कायद्यावरून झाली

त्या वेळीं मोदीबंदर, एल्फिन्स्टन कंपनीची इष्टेट, व दुसरे लहान धक्के व बेसिन्स, या मिळकती त्या बोर्डाचे ताब्यांत आल्या व त्या वेळीं कर्जाची रकम रु० २११७०७५० त्यांचेकडे आली. पहिल्यानें त्या बोर्डात १२ ट्रस्टी व एक चेरमन असे सरकारांतून नेमण्यांत येत असत; पुढें सन १८७९ सालीं बोर्डाचे संबंधानें नवीन कायदा झाला, त्याप्रमाणें ५ ट्रस्टींची नेमणूक चेंबर ऑफ कॉमर्सनें करावी व बाकीचे पांच सभासद व चेरमन यांची नेमणूक सरकारांनीं करावी व सभासदांपैकीं ३ सभासद मुंबईचे राहणारे नेटिवांपैकीं असावे असें ठरलें.

या पोर्ट ट्रस्टानें केलेलीं मोठीं कामें ह्मणजे दोन गोद्या, प्रिन्सिस डाक व व्हिक्टोरिया डाक बांधल्या हीं होत. पहिली गोदी सन १८७५ सालीं शाहाजादे प्रिन्स ऑफ वेल्स हे मुंबई शहरांत आल्या वेळीं बांधण्यास सुरवात झाली व ती १८८० चे जानेवारींत पुरी झाली. या गोदींत पाण्याचें क्षेत्र ३० एकर आहे, व धक्याची लांबी ६९५० फूट आहे, ती बांधण्यास खर्च रु. ८७२७००० लागला. दुसरी गोदी १८८८ सालीं बांधून पुरी झाली व तीस राणी साहेबांचे जुबिलीचे संस्मरणार्थ " व्हिक्टोरिया डाक " असें नांव देण्यांत आलें. १८९१।९२ सालचे अखेरीपर्यंत या गोदीवर रु. ८५७४२६० खर्च झाला. ह्याशिवाय व्यापाराचे सोईसाठीं दुसरीं पुष्कळ कामें करण्यांत आलीं आहेत.

या बोर्डास सन १८८१-८२ व सन १८९१-९२ व सन १८९२-९३ सालीं जमा व खर्च किती झाला त्याचा तपशील येणेप्रमाणें:—

	जमा.	खर्च.
सन १८८१-८२	रु. ३६६०८००	रु. ३०९८५९०
,, १८९१-९२	रु. ४८१०३१०	रु. ४६२३९६०
,, १८९२-९३	रु. ४५०००००	रु. ४६५००००

सन १८९२।९३ अखेर कर्ज रु. ४९३९०००० होतें.

कराची बंदरासाठीं बोर्डाची नेमणूक सन १८८० सालीं झाली. त्यांत पांच सभासद असत व प्रेसिडेंट कलेक्टर असे. पुढें सन १८८६ सालीं पूर्वीचें बोर्ड बदलून रंगूनचे नमुन्यावर पोर्टट्रस्ट स्थापन करण्यांत आलें. या बोर्डांत सभासद ९ असतात, पैकीं ३ सभासद व चेरमन व व्हैसचेअरमन हे सरकार नेमतात व कराची मुनसिपालिटी दोन व चेंबर ऑफ कामर्स दोन सभासद निवडून देतात. गेले ५ वर्षांत नवीन धक्का बांधला आहे, जुना धक्का सुधारला आहे, व बंदरांत येण्याच्या वाटा खोलगट केल्या आहेत. या बंदराचा उत्तर हिंदुस्थानाशीं आगगाडीनें संबंध जुळल्यानें तिकडील माल परदेशीं जाण्यास मोठी सोय झाली आहे.

सन १८९२–९३ अखेर या बोर्डास कर्ज रु० ४४००००० होतें.

सन १८८७–८८।१८९१–९२ व १८९२–९३ सालीं या बोर्डाचा जमा व खर्च येणेंप्रमाणें होता:—

	जमा रु०	खर्च रु० (नेहमींचा).
१८८७–८८	४६३७००	२९३२५०
१८९१–९२	९५६९६०	५१३९८०
१८९२–९३ *	६४००००	४९००००

* या सालीं पीक कमी झाल्यानें व्यापार कमी झाला व त्यामुळें उत्पन्न व खर्चही कमी झाला.

एडन येथील **पोर्ट** फंडाची व्यवस्था सन १८८९ सालापर्यंत रेसिडेंटच पाहत असत. त्या सालचे एप्रिल महिन्यांत पोर्ट ट्रस्ट स्थापन झालें, त्यांत असिस्टंट रेसिडेंट चेरमन असतो व पांच सभासद सरकारांनीं नेमलेले असतात.

	सन १८८८–८९	सन १८९१–९२
जमा रु.	१८६६००	१९२७७०
खर्च रु.	११८९४०	२५६३५०

रंगून बंदरासंबंधानें कामिशन सन १८८० सालीं स्थापन झालें. या कमिशनांत सभासद व चेरमन व व्हाइस चेरमन हे तेथील कमिशनरसाहेब नेमतात व त्यांपैकीं १/३ शापासून निम्मेपर्यंत सभासद सरकारी नौकर असावेत असें आहे.

सन १८८० सालीं या बंदराची व्यवस्था बोर्डाचे ताब्यांत आली तेव्हां त्यांचे हातीं शिलक रु० २३२८०० आली व त्या वेळीं कर्ज कांहीं नव्हतें. या बोर्डानें नवीन धक्के बांधले व तरते धक्के वगैरे मोठीं खर्चाचीं कामें केलीं आहेत. हें बोर्ड सुरू झाल्यापासून या बंदराचें महात्म्य वाढत चाललें आहे.

	सन १८८१–८२	सन १८९१–९२
	रु.	रु.
जमा	६६५६६०	११०६२००
खर्च	६६०८४०	११४९३४०

कर्ज सन १८९१।९२ अखेर रु० ७९४०४०.

मद्रास बंदराचे संबधानें पोर्टट्रस्ट सन १८८६ चे दुसरे कायद्यावरून स्थापन झालें. त्याचे पूर्वी बंदरची व्यवस्था सरकारांतून होत असे. या सभेचे चार सभासद लोकनियुक्त असतात, दोन सरकारी नोकर व चार नोकरींत नसलेले असे एकंदर ६ सभासद सरकार नेमतें. या बंदरांत मुख्य जरूरीच्या गोष्टी ह्मणजे गलबतें भरतांना किंवा रिकामीं करतांना पाणी संथ असणें व धक्या-

शेजारील जमिनीची सुधारणा करून धक्क्यावरील ट्रामगाडीची व आगगाडीची जोड घालून देणें ह्या होत्या. पाणी संथ सांपडावें ह्मणून समुद्रांत १२०० फूट लांबीचे दोन धक्के बांधून सुमारें २५० एकर पाण्याचें क्षेत्र बंद करून द्यावें असें ठरलें व त्या कामास सन १८७६ सालीं सुरुवात झाली. सन १८८१ सालीं जें भयंकर तुफान झालें त्यांत झालेलें काम सर्व ढासळून गेलें. पुढें तें काम लागलीच चालू झालें व सन १८९२-९३ अखेर त्या कामावर रु. ११:४०००० खर्च झाले होते.

सन १८९१-९२ सालीं जमा रु. ५७४००० व खर्च रु. ४८८५४०.
सन १८९२-९३ सालीं जमा रु. ५१६००० व खर्च रु. ४९६०००.

बंगाल्यांत चितागांग येथें पोर्टट्रस्ट सन १८८८ सालीं स्थापन झालें. त्याचे पूर्वी त्या बंदराची व्यवस्था जिल्हाधिपाकडे असे. या बंदरांत बहुतेक व्यापार देशांतले देशांत व्यापार करणारे गलबतांचाच होतो.

सन १८९१-९२ सालीं जमा रु. ५९१५० व खर्च रु. ७६८२०. आसामांतील पूर्वभागांत आगगाडी होण्याची आहे ती झाली ह्मणजे या बंदराचा व्यापार पुष्कळ वाढेल.

मुंबई, मद्रास, कलकत्ता, रंगून, व कराची येथील बंदरांतून परदेशांशीं व्यापार किती होतो हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल व त्यावरून या बंदरांचें महत्वही कळून येईल. वरील चार शून्यें गाळून रुपयांचे आंकडे दिले आहेत.

	१८८३।८४	१८९१।९२	१८९३।९४
मुंबई.	५३२५७	६६३५२	६५६७४
कलकत्ता.	५७३३५	६३९३२	६३६४०
रंगून.	७८१०	१२६१५	१२५२५
मद्रास.	७८२३	८९१८	९०६८
कराची.	५०४८	११३११	७५४६

स्थानिक मंडळयांस कर्ज वगैरे देण्याबाबत—म्युनसिपालिट्या, लोकल-बोर्ड, व पोर्ट व हारबरट्रस्ट, या मंडळयांस कर्ज देण्याचे संबंधानें कशी काय पद्धति आहे हें सांगून हा भाग पुरा करण्याचा आहे. सन १८७६ सालापर्यंत वर सांगितलेल्या मंडळयांस लोकोपयोगी व सार्वजनिक सोईचे कामांसाठीं कर्ज सढळ हातानें देण्यांत येत असे. त्या सालांत सोन्याचे मानानें रुप्याचा भाव उतरल्यामुळें, कर्ज देण्यासंबंधानें निर्बंध घालावा लागला. त्यापुढें अत्यंत जरुरीचे कामांसाठीं मात्र सरकारांतून मदत देण्यांत येऊं लागली; इतर प्रसंगीं ह्या मंडळयांस बाजारांत मिळेल त्या दरानें सरकारचे देखरेखीखालीं, रकम कर्जाऊ घ्यावी लागे. नंतर सन १८७९ सालीं, लहान लहान म्युनसिपालिट्यांच्या संबंधानें तरी

हा निर्बंध शिथिल केल्याशिवाय सुधारणेचे कामांस पैसा मिळणार नाहीं व इतर मोठ्या मंडळ्यांसही भारी व्याज दिल्याशिवाय बाजारांत कर्ज मिळत नाहीं, असें दिसून आल्यावरून या बाबतींतील नियम थोडेसे सढळ करण्यांत आले. हें कर्ज देण्याचेसंबंधानें आतां तीन नियम आहेत. १ ला. कर्ज ज्या कामासाठीं देण्याचें तें सार्वजनिक हिताचें असावें. २ रा. कर्ज देण्याची मुदत विशेष मंजुरी घेतल्याशिवाय वीस वर्षांपेक्षां जास्त असूं नये. ३ रा. सरकाराकडून कर्ज काढल्यानंतर त्या रकमेस योग्य तारण आहे अशी स्थानिक सरकारची खात्री केल्याशिवाय दुसरेकडून कर्ज काढूं नये. लोकल बोर्डांसही म्युनिसिपालिट्यांप्रमाणेंच सरकारांतून कर्ज देण्यास ज्या कांहीं हिशेबाचे पद्धतीसंबंधानें अडचणी होत्या त्या आतां नाहींशा झाल्या आहेत; व कर्ज देण्याचे संबंधानें दोहोंची स्थिति सारखी झाली आहे.

भाग पांचवा.

दिवाणी व फौजदारी न्यायपद्धति.

मागील एका भागांत कायद्यांबद्दल व ते करण्याचे रीतीबद्दल सांगण्यांत आलें आहे. आतां त्या कायद्यांचे अंमलबजावणीची शिस्त कशी आहे, तें सांगण्याचें आहे. हल्लींची पद्धति कशी आहे हें सांगण्यापूर्वी कंपनीचा अंमल सुरू असतांना कशी व्यवस्था होती, तेंही समजणें जरूर आहे, ह्मणून ती हकीकत प्रथमतः देतों.

पहिल्या जेम्सच्या कारकीर्दीपासून कंपनीस ज्या सनदा मिळत गेल्या त्यांत कंपनीचे, किंवा तिचे अमलाखालीं असलेले लोकांचे दिवाणी किंवा फौजदारीसंबंधानें न्यायमनसुबे तोडण्याचा अधिकार तीस दिलेला होता; परंतु सन १७२६ सालांत मुंबई, मद्रास व कलकत्ता या शहरांत मेयरचीं कोर्टें स्थापन होईपर्यंत इंग्रजी न्यायपद्धति या देशांत सुरू झाली नव्हती. या कोर्टांत एक मेयर व नऊ आल्डरमन् असे असत, व तीं स्थापन होण्याचे वेळीं विलायतेस जे कायदे चालू होते त्यांप्रमाणें त्यांनीं चालण्याचें होतें. या कोर्टांवर अपील गव्हरनर व कौन्सिलाकडे असे, व ४००० रुपयांचे वरचे दाव्यासंबंधानें अखेर अपील राजाकडे असे. गव्हरनर व कौन्सिल यांस राजद्रोहाचे गुन्हे शिवाय करून बाकीच्या

फौजदारी गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार होता. पुढें सन १७५३ सालांत लहान लहान दाव्यांची चौकशी करण्यासाठीं कोर्टें स्थापन करण्यांत आलीं.

सन १७७२-७३ सालचे रेग्युलेटिंग आक्टानें गव्हरनर जनरलास कायदे करण्याचा अधिकार मिळाला, व त्याच कायद्यानें बंगाल्यासाठीं एक वरिष्ठ कोर्ट (सुप्रीम कोर्ट) स्थापन झालें. त्या कोर्टास दिवाणी, फौजदारी, धर्मसंबंधाचा, समुद्रावरील व इक्किटीचा असे अधिकार होते. दिवाणी अधिकार इंग्रजी प्रजा, कंपनीचे नोकर, व इतर लोक, जे त्या कोर्टास आपल्या दाव्याचा निकाल करण्याची परवानगी लेखी देतील, त्यांजवर चालविण्याचा होता; व फौजदारी अधिकार इंग्रजी प्रजा व कंपनीचे नोकर यांनीं बंगाल्यांत केलेले गुन्ह्यांचे संबंधानें चालविण्याचा होता. हें सुप्रीम कोर्ट राजाचे प्रतीनिधित्वानें न्यायाचे बाबतींत मुख्य अधिकारी असावें असा हेतु होता, परंतु त्यांचे सनदेंत संदिग्धपणा असल्यामुळें तें कोर्ट व गव्हरनर–जनरल यांच्या मुलकी कामाचे संबंधानें उभयतांचे अधिकाराचे बाबतींत वारंवार जिकीरी होत. तेव्हां अखेरीस सन १७८१ सालीं नवीन कायदा करण्यांत आला, त्यांत गव्हरनर जनरल यांचेवर व जमाबंदीचे मक्तेदारांवर त्या कोर्टाचा अधिकार चालूं नये असें ठरविण्यांत आलें. मद्रास व मुंबई येथें मेयरचीं कोर्टें सन १७९७ पर्यंत होतीं; पुढें त्यांचे जागीं रेकार्डरचीं कोर्टें आलीं व सन १८०० सालीं मद्रासेस व सन १८२३ सालीं मुंबईस सुप्रीम कोर्टें स्थापन झालीं.

बंगाल्यांत जी न्यायपद्धति वारेनहेस्टिंग्स व लार्ड कार्नवालिस् यांनीं चालू केली होती, तीच पुढें इंग्रजींत आलेले इतर प्रांतांसही लागू करण्यांत आली, सबब तीं कोर्टें कोणचे नमुन्यावर स्थापन केलीं होतीं, हें सांगणें जरूर आहे. पूर्वीं बादशाही अमलांत दिवाणी, फौजदारी, मुलकी व लष्करी हे सर्व अधिकार बादशहाचे सुभेदारास असत, तोच दिवाण व नाझीम असे. दिवाणी अधिकारानें तो मुलकी व दिवाणी न्यायखात्याचें काम, व नाझीमीचे अधिकारांत फौजदारी गुन्ह्यांचा तपास व पोलिसावर देखरेख अशीं कामें करीत असे. सुभेदाराचे हाताखालीं जमीनदार म्हणजे मुलकीची जमाबंदी करणारे अंमलदार असत, त्यांस दिवाणी व फौजदारी अधिकार असत. याशिवाय नायब नाझीम व फौजदार यांचीं वरिष्ठ फौजदारी कोर्टें सुभेदाराचे हाताखालीं असत. फौजदारी इनसाफ सर्व मुसलमानी कायद्याप्रमाणें चाले, व दिवाणी न्याय मुसलमानांच्या बाबतींत मुसलमानी कायद्याप्रमाणें व हिंदूंच्या बाबतींत हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें चाले. सन १७६५ सालीं शहाअलम बादशहाचे फर्मानावरून कंपनीस दिवाणीचा अधिकार प्राप्त झाला तरीही फौजदारीचा अधिकार बंगालचा सुभेदार नाझीम म्हणून चालवीत असे.

पुढें सन १७७१ सालीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनीं जमाबंदी व दिवाणी व फौजदारी हीं सर्व कामें आपले नोकर नेमून चालविण्याचें ठरविलें; व हा ठराव अमलांत आणण्यास बंगालचा गव्हरनर वारेन हेस्टिंग्स यास सांगितलें. त्यानें व्यवस्था केली ती अशी कीं प्रत्येक प्रांताचें काम एक एक कलेक्टर व त्याचे हाताखालीं एक एक नेटिव्ह दिवाण नेमून त्यांजकडे दिलें. तेच दिवाणी कामही चालवीत. या कोर्टास अदालत असें नांव होतें. फौजदारी कामासाठीं फौजदारी कोर्टें स्थापन केलीं त्यांत एक काजी, एक मुफती, व दोन मौलवी असे असत, व त्यांचेबरोबर कामावर देखरेख करण्यासाठीं कलेक्टर वसे. या कोर्टांवर अपील सदर निझामत अदालतीकडे असे. या कोर्टांत एक दरोगा, एक काजी, एक मुफती व तीन मौलवी असे असत. दिवाणी अदालतीवर अपील कलकत्त्याचे सदर दिवाणी अदालतीकडे चाले; त्या अदालतींत गव्हरनर व कौन्सिल हे नेटिव्ह अंमलदारांच्या मदतीनें काम करीत. या कोर्टांसाठीं वारेनहेस्टिंग्स यानें कायदे केले, व हेच इंग्लिशांचे हिंदुस्थानांतील पाहिले कायदे होत. या व्यवस्थेंत मुलकी व न्यायाचे अधिकार एकाच अंमलदाराकडे ठेवले होते. पुढें कांहीं दिवसांनंतर न्यायाचें काम वेगळे अंमलदारांकडे देण्याचा क्रम चालू झाला. सन १७७४ सालीं दिवाणी काम कलेक्टरांकडून काढून तें अमील यांजकडे देण्यांत आलें, व जमाबंदीचे कामासाठीं एक प्रांताचें कौन्सिल किंवा कमेटी ऑफ रेव्हेन्यू नेमण्यांत आली त्यापुढें सहा वर्षांनीं सोळा दिवाणी अदालती स्थापन केल्या व त्यांजवर सनदी नोकरीपैकीं इसम नेमण्यांत आले, व त्यांचेसाठीं सर इलिजाइंपी यांनीं एक कायद्याचें पुस्तक केलें. हीं कोर्टें सन १७८१चे कायद्यानें कायदेशीर ठरविण्यांत आलीं व त्याच कायद्यानें गव्हरनर–जनरल इन्‌कौन्सिल किंवा त्यांनीं नेमलेली कमेटी यांनीं दिवाणी अपिलें ऐकावीं व ५०००० रुपयांचे वरील दाव्यांत अखेरचें अपील राजाकडे असावें असें ठरविलें होतें. गव्हरनर–जनरल इन्‌-कौन्सिलांस प्रांतांतील कोर्टांसाठीं कायदे करण्याचा अधिकार याच कायद्यावरून आला होता.

लार्ड कार्नवालिस यांनीं न्यायपद्धतींत पुष्कळसा फरक केला. सदर निझामत अदालत या कोर्टाचे घटनेंत फरक करून तींत गव्हरनर–जनरल इन्‌कौन्सिल, एक काजी, व दोन मुफती इतके असावे असें ठरविलें व गुन्ह्याचे चौकशीसाठीं चार फिरतीं कोर्टें स्थापन केलीं. दिवाणी २६ जज्ज व त्यांचे मदतीस हिंदु व मुसलमान आफिसर असे नेमिले. त्यांचेवर अपिलें वर सांगितलेल्या फिरते कोर्टांकडे व अखेर अपील सदर दिवाणी अदालतीकडे चालण्याचें असे. त्या दिवाणी न्यायाधिशांसच साधारण गुन्ह्यांचा निकाल करण्याचा व मोठाल्या

गुन्ह्यांचा प्रथमची चौकशी करण्याचा अधिकार दिलेला होता. पुढें मार्क्विस आफ् वेल्स्ली यांनीं सदर दिवाणी अदालत व सदर निझामत अदालत यांत गव्हरनर-जनरल न बसतां, तीन किंवा जास्त सनदी नौकरांपैकीं जज्ज असावे असें ठरविलें; व हीच व्यवस्था सन १८६२ सालीं हायकोर्ट स्थापन होईपर्यंत होती. पुढें लार्ड विलियम बेंटिंक यांनीं प्रांतांतील चार अपीलकोर्टें होतीं तीं काढून टाकलीं व दिवाणी जज्जांस सेशन जज्ज हें नांव देऊन, त्यांस फौजदारीचे पूर्ण अधिकार दिले व त्यांचेकडे असलेलें माजिस्ट्रेटी काम कलेक्टर लोकांस दिलें.

खालचे दर्जाचीं दिवाणी कोर्टें लार्ड कार्नवालिस यांचे कारकीर्दीत स्थापन झालीं. त्यांनीं अमीन, सलीसन, व मुनसफ असे तीन दर्जाचे अंमलदार नेमले. त्यानंतर सन १८०३ सालीं सदरअमीन नेमण्यांत आले, त्यांस पहिल्यानें रु. १०० पर्यंतचे दाव्यांचा निकाल लावण्याचा अधिकार असे; पुढें तो हजार रुपयांपर्यंत वाढविण्यांत आला. लार्ड विलियम बेंटिंक यांनीं नवीन तऱ्हेचे प्रिन्सिपाल सदरअमीन नेमले. त्यांनीं अमुक रकमेपर्यंत किंमतीचे दावे चालवावे असें पहिल्यानें ठरविलें होतें, तोही निर्बंध पुढें काढून टाकला व त्यांस वाटेल त्या रकमेबद्दल दावा घेण्यास अधिकार दिला. सन १८६८ सालीं सदरअमीन कमी झाले व प्रिन्सिपाल सदर अमीनांस सबार्डिनेट जज्ज असें नांव दिलें व त्यांचे ठरावांवर अपील, पांच हजारांचे आंतील दाव्यांवर डिस्ट्रिक्ट जज्जांकडे, व त्यावरील दाव्यांवर हायकोर्टाकडे चालावें, असें ठरविण्यांत आलें. सन १८७१सालीं ५००रुपयांपर्यंत सबार्डिनेट जज्जांस, व पन्नासपर्यंत मुनसफांस स्मालकाजचा अधिकार देण्यांत आला.

इलाख्यांचे शहरीं खालचे दर्जाचीं दिवाणी कोर्टें सन १७५३ सालीं स्थापन झाल्याचें वर सांगितलेंच आहे. पहिल्यानें या कोर्टास वीस रुपयेपर्यंत रकमांचे दावे घेण्याचा अधिकार असे, तो पुढें चारशेंपर्यंत वाढविण्यांत आला. सन १८५० सालीं या कोर्टांचे जागीं स्मालकाज कोर्टें स्थापन झालीं व त्यांतील तीन जज्जांपैकीं एक बारिस्टर असावा असें ठरलें. सन १८८२ सालाचे कायद्यानें या कोर्टांचे घटनेंत आणखी फरक झाला आहे.

सन १८५८ त कंपनीचा अंमल जाऊन राणीसरकारचा अंमल चालू झाल्यानंतर पीनलकोड, व दोन प्रोसीजर—काम चालविण्याचे रीतीचे कायदे—करण्यांत आले. त्यानंतर सन १८६२ सालीं हायकोर्टें स्थापन करण्याचा कायदा करण्यांत आला व त्यांत राजास सनदेनें तशीं कोर्टें स्थापन करण्याचा अधिकार देण्यांत आला. या नवीन स्थापन केलेले कोर्टांत पूर्वींच्या दोनी अदालती सामील केल्या व त्यांस दिवाणी, फौजदारी, समुद्रावरील व मृत्युपत्राचे बाबतींचा न्याय कर-

ण्याचा अधिकार देण्यांत आला. या कोर्टांत इलाख्यांचे शहरांचे टापूंतील अवल दावे चालतात व अपीली व विशेष न्यायाचे अधिकारांत खालचे सर्व दिवाणी व फौजदारी कोर्टांवर त्यांचा अंमल चालतो. पूर्वी तीन ठिकाणीं हायकोर्टें होतीं. वायव्य प्रांतांत १८६६ त एक नवीन हायकोर्ट स्थापन करण्यांत आलें. पंजावांत हायकोर्टांचा अधिकार चीफ कोर्ट ह्मणून आहे तें चालवितें. या हायकोर्टांत एक मुख्य जज्ज बहुशा विलायतेंतील चांगले प्रख्यात बारिष्टरांपैकीं असतो व कांहीं प्यूनी जज्ज असतात; त्यांत कांहीं सनदी नौकरांपैकीं व कांहीं बारिष्टर किंवा आडव्होकेटपैकीं असे असतात. सन १८९३ सालीं सर्व हायकोर्टांत मिळून चीफ जज्जासुद्धां एकंदर ३२ जज्ज होते व त्यांत ६ नेटिव्ह होते. अलीकडे कराची, रंगून व एडन येथील कोर्टांस आडमिरल्टीचे (समुद्रावरील) खटल्यांचा अधिकार दिला आहे. मद्रासेस अडीच हजारांपर्यंत रकमांचे दाव्यांचा निकाल करण्यासाठीं एक कोर्ट स्थापन करण्यांत आलें आहे; या नवीन व्यवस्थांमुळें हायकोर्टांत पूर्वीं चालत असलेलीं कांहीं कामें या कोर्टांत चालतील. वायव्य प्रांतांतील हायकोर्टांस अयोध्या प्रांतांतील कज्जयांत येथील दोन जुडिशियल कमिशनरांत मतभेद झाला असतां त्यांचा निकाल करण्याचा अधिकार आहे.

नानरेग्युलेशन प्रांतांत न्यायखात्यांतील मुख्य अधिकारी जुडिशियल कमिशनर असतो. हे अंमलदार बहुतेक सनदी नौकरांपैकींच असतात. अलीकडे अयोध्या प्रांतांत कमिशनरची जागा एक जास्त करण्यांत आली आहे, तिजवर १० वर्षे काम केलेला बारिस्टर नेमला तरी चालेल असें ठरलें आहे. हल्लीं त्या जागेवर बारिस्टराचीच नेमणूक झालेली आहे.

या वरिष्ठ कोर्टांचे खालचे पायरीचे न्यायाधिकारी जिल्ह्याचे जज्ज, त्यांचेकडे दिवाणी व फौजदारी अशीं दोन्ही कामें चालतात. फौजदारी कामें त्यांचेकडे खालचे माजिस्ट्रेट लोक प्रथमची चौकशी करून पाठवितात, व खालचे दिवाणी कोर्टांवर अपिलें त्यांचेकडे चालतात. अवल दावे चालण्याचें अखेरचें कोर्ट हेंच आहे. पंजाबांत चीफ कोर्ट व जिल्हा जज्ज यांचे दरम्यान एक डिव्हिजनल जज्ज असतो. ब्रह्मदेशांत दिवाणी कामें मुलकी अंमलदाराकडेसच चालतात व डिव्हिजनल कमिशनर हे सेशनजज्ज असतात. योग्य वाटेल त्या प्रसंगीं डेपुटी कमिशनरांस सेशनजज्ज नेमण्याचा अधिकार ठेवला आहे.

अयोध्या प्रांतांत दिवाणी काम मुलकी कामगारांकडून सन १८९० सालीं काढण्यांत आलें आहे. दिस्ट्रिक्ट जज्जाचे खालचे दिवाणी अधिकारी सबार्डिनेट जज्ज हे आहेत व त्यांच्यांत निरनिराळे वर्ग आहेत. याशिवाय लहान दाव्यांचा निकाल करण्यासाठीं कांहीं प्रांतांत मुनसफ आहेत. पंजाबांत आनररी

दिवाणी जज्ज आहेत व मद्रास, मुंबई व लोअर (खालचा) ब्रह्मदेश या प्रांतांत गांव-मुनसफ आहेत. मध्य प्रांतांत मुलकी कामगारांकडेच दिवाणी काम आहे; तें काम वेगळे अंमलदारांकडे देण्यास सुरवात झाली आहे. डेप्युटी कमिशनर हे जज्जाचें काम पहातात व त्यांचे व जुडिशियल कमिशनरांचे दरम्यान, डिव्हिजनल कमिशनरचें कोर्ट (पंजाबांतलेप्रमाणें) असतें. बंगाल्यांत जमीनीचे धाऱ्याच्या फिर्यादी दिवाणी कोर्टांत चालतात, बाकीचे प्रांतांत त्या मुलकी कामगारांकडे चालतात.

लहान लहान दाव्यांचा लवकर निकाल लागण्यासाठीं इलाख्यांचे शहरीं व बाहेर प्रांतांत स्मालकाज कोर्टें स्थापिलीं असल्याचें वर सांगितलेंच आहे. या कोर्टांचे अधिकाराचा विशेष असा आहे कीं, त्यांचे ठरावांवर अपील चालत नाहीं. अलीकडे या कोर्टांसंबंधानें नवीन कायदे करण्यांत आले आहेत, त्यांत या कोर्टांत कोणते दावे चालावे हें स्पष्टपणें सांगितलें आहे. पूर्वी याबद्दलचे नियमांत संदिग्धपणा असल्यानें हक्कसंबंधाबद्दल या कोर्टांत परोक्ष रीतीनें निकाल मिळविण्यास सवड सांपडत असे, ती हा नवीन कायदा झाल्यापासून बंद झाली आहे.

आतां फौजदारी कामाचे संबंधानें कशी व्यवस्था आहे तें सांगण्याचें आहे. इलाख्याचे शहरांतील गुन्ह्यांची चौकशी हायकोर्टांत चालते व बाहेरचे फौजदारी कोर्टांचे ठरावांवर अपिलें चालतात. पंजाबांत चीफ कोर्ट व जुडिशियल कमिशनर आहेत. त्या प्रांतांत ते हायकोर्टांचे अधिकार चालवितात. हायकोर्टांचे खालचे दर्जाचे अंमलदार दिस्ट्रिक्ट जज्ज, तेच सेशन जज्ज असतात. यांनीं दिलेले फांशीचे शिक्षेस हायकोर्टांची मंजुरी लागते. नानरेग्युलेशन प्रांतांत हें काम साधारणतः डिव्हिजनल कमिशनर करतात. माजिस्ट्रेट तीन वर्गांचे असतात व जिल्ह्याचा मुख्य मुलकी अधिकारी मुख्य माजिस्ट्रेटही असतो. तिसरे वर्गाचे माजिस्ट्रेटास ५० रुपये दंड व एक महिन्याची कैद व दुसरे वर्गास २०० रु. दंड व सहा महिन्यांची कैद व पहिले वर्गास दोन वर्षांची कैद व हजार रुपये दंड अशा शिक्षा देण्याचा अधिकार असतो. याशिवाय कांहीं माजिस्ट्रेटांस फटक्याची शिक्षा देण्याचाही अधिकार असतो. इलाख्यांचे शहरीं विशेष अधिकाराचे माजिस्ट्रेट असतात. कांहीं ठिकाणीं आनररी माजिस्ट्रेटांचीं बेंचें मुनसिपालटीचे पुष्कळ कज्जांचा निकाल करतात व कांहीं आनररी माजिस्ट्रेट स्वतंत्र एकएकटेच काम पहातात. माजिस्ट्रेटांचीं कामें जिल्हा माजिस्ट्रेट तपासतात व पहिले वर्गाचे माजिस्ट्रेटाचीं कामें सेशन जज्ज तपासतात, व त्याबद्दलचीं पत्रकें सेशन जज्जाचे मार्फत जाऊन त्याजवर अखेरची तपासणी हायकोर्टांत होते. असे रीतीनें दिवाणी व फौजदारी कामांत खालील कोर्टांचीं कामें तपासलीं जाण्याविषयीं पूर्ण तजवीज करण्यांत आलेली आहे.

येथपर्यंत न्यायखात्यांतील वेगळाले अंमलदारांत अधिकाराची वांटणी कशी झाली आहे हें सांगितलें. आतां या खात्यांत साधारण काम किती असतें या-संबंधानें सांगण्याचें आहे.

खालचे पत्रकावरून सन १८९१–९२ सालीं एकंदर फिर्यादी किती दाखल झाल्या तें दिसून येईल.

हायकोर्ट व चीफ कोर्ट	१९९०
जिल्ह्याचीं व डिव्हिजनल कोर्टें	६६५३४
विनपगारी कोर्टें	१४१४७
गांव मुनसफ कोर्टें...	८७५३७
प्रोव्हिन्शियल स्मालकाझ कोर्टें.	१७६४२५
प्रेसिडेन्सि „ „	८५७४०
पगारी खालचीं कोर्टें	१०९३१०३
मुलकी कोर्टें	३२५४८४
वेरीज १८९२.	१८५१३६०

आतां वेगळाले सालीं कोर्टापुढें चौकशीसाठीं किती मुकदमे आले होते त्याचे आंकडे देतों, त्यावरून काम कसें वाढत गेलें आहे तें दिसून येईल.

१८७७	१५४१२७६
१८८२	१७३४८५७
१८८५	१८७५५७०
१८९१	२००२६६४
१८९२	२०९५८८४

दाव्याचे किमतीचे मानानें विचार पाहतां गेले दहा सालांत ही किंमत वाढली आहे. सन १८८१।८२ सालांत दाव्याचे किमतीचें सरासरीचें प्रमाण रु.११७ होतें तें सन १८९१।९२ सालीं रु. १२३ झालें. दहा रुपयांखालील दावे कमी झाले आहेत व पन्नास रुपयांपर्यंतचे थोडे जास्त वाढले आहेत. पन्नासपासून १०० रुपयांपर्यंतचे दावे थोडे कमी झाले आहेत. शंभर रुपयांवरील दाव्यांचीही संख्या थोडी जास्त वाढली आहे. सन १८९१।९२ सालीं पंनास रुपयांचे आंतील दाव्यांचें प्रमाण शेंकडा ६८ होतें व ५०० रुपयांवरील दाव्यांचें प्रमाण शेंकडा २.४९ होतें.

लोकसंख्येचे मानानें दाव्यांचे संख्येचा विचार पहातां दरदहा हजार लोकसंख्येस दाव्यांची संख्या ६१ पडते, ती दहा वर्षांपूर्वी ६० होती; गेले दहा

सालांत भाड्याचे दाव्यांशिवाय इतर दाव्यांचें प्रमाण लोकसंख्येचे मानानें वाढत्या कलावर नाहीं; लोकसंख्येची वाढ ९¾ (दरशेंकडा) पडली तर दाव्यांची वाढ शेंकडा ९ टक्के झाली.

पुढील पत्रकावरून दाव्यांत कोणते प्रकारचे दावे साधारण काय प्रमाणानें होतात हें दिसून येईल. शेवटीं तुलनेसाठीं सन १८८१–८२ सालचे आंकडे दिले आहेत. या पत्रकावरून बंगाल व वायव्य प्रांतांत जमीनीचे धाऱ्याच्या फिर्यादी फार आहेत असें दिसून येईल. मद्रासेकडे या तऱ्हेचे दावे बहुतेक सालोसालचे पट्ट्यावरून आणलेले असतात व मुंबई इलाख्यांत मुलकी कोर्टांत दावे स्थावरांचे ताब्याबद्दल होतात.

प्रांत	रोखीचे दावे	जंगममिळकतीबद्दल दावे	भाडें व साऱ्याबद्दल दावे	स्थावर मिळकतीबद्दल व हकस्थापनेबद्दल दावे
बंगाल	४०·३९	७·६०	३८·८८	७·४४
वायव्यप्रांत	२४·६६	२·२३	६५·३४	४·९०
पंजाब	६७·५९	२·४८	९·२३	१२·३८
मध्यप्रांत	६३·२०	८·६७	११·६३	९·४५
आसाम	४६·२६	१७·५४	१२·३४	१४·६४
मद्रास	६१·०४	७·६६	२·५२	१५·८४
मुंबई	६५·९१	९·२६	९·१६	८·५७
वऱ्हाड	८०·५२	१·६७	——	१३·७०
खालचा ब्रह्मदेश	४५·१६	२२·९०	——	७·७८
वरचा ब्रह्मदेश	३५·६४	१८·५४	——	२१·४८
हिंदुस्थानची सरासरी १८९१-९२	४८·२८	६·२८	२९·०९	९·२२
	इतर जंगमाचे दावे	६·११		
सन १८८१-८२	५७·६२	४·९५	१६·०५	——

दाव्यांचे निकाला संबंधानें पहातां सन १८९१–९२ त शेंकडा ३२ दावे

चौकशी न होतां निकाल झाले, वादीतर्फे ६० झाले, व प्रतिवादीतर्फे ७ झाले. वादीतर्फेचे दाव्यांत शेंकडा ११ टक्के कबुलीनें, २८ गैरहजीरीनें, १९ तक्रारी होऊन, पंचमार्फत ०·४१ निकाल झाले व प्रतिवादी तर्फेचे दाव्यांत वादीचे गैरहजीरीनें १·३४, तकरारीनें ६·२५, पंचमार्फत ०·१८ असे निकाल झाले. दहा वर्षांचे पूर्वीचे संख्येचे मानानें पाहतां या प्रमाणांत विशेषसा फरक पडलेला नाहीं. खालचे ब्रह्मदेशांत व आसामांत फिर्यादी काढून घेण्याची व मुंबईत आपसांत तोडजोडीची व पंजाबांत, व मद्रासेंत दोन्ही तऱ्हेनें आपसांत निकाल करण्याची प्रवृत्ति जास्त आहे. कबुलीनें दावे पूर्वीपेक्षां शेंकडा दोन कमी होतात; या तऱ्हेनें निकाल करण्यांत वऱ्हाडाचा नंबर पहिला आहे व मध्य प्रांताचा त्याचे जवळ जवळ येतो.

आतां निकालावर अपिलें किती होतात याचा विचार करून दिवाणी प्रकर्ण संपविण्याचें आहे. एकंदर दाव्यांचे संख्येचे मानानें पाहतां शेंकडा ७ दाव्यांत अपिलें होतात; ह्मणजे दुतर्फी चौकशी होऊन निकाल झालेले दाव्यांत साधारणतः सुमारें $\frac{1}{4}$ शावर अपिलें होतात. अपिलांपैकीं सन १८९१ सालीं शेंकडा ६१ ठराव कायम झाले, १७ फिरले व २१ सांत ठराव पालटण्यांत आले किंवा अपिलें रद्द करण्यांत आलीं किंवा इतर रीतीनें निकाल लागले. सन १८८१ चे प्रमाणाशीं ताडून पाहतां कायम झालेले ठरावांचें मान शेंकडा ९ वाढलें आहे व अपील काढून टाकण्याचें वगैरे तितकेंच कमी झालें आहे.

वर दिलेले सर्व आंकडे सर्व हिंदुस्थानाचे सरासरीचे प्रमाणानें दिलेले आहेत. प्रांतवार माहिती असणें इष्ट आहे, परंतु विस्तारभयास्तव ती गाळावी लागली. तसेंच सालोसालीं कोणते कारणांनीं दाव्यांची संख्या कमी होते किंवा वाढते व पीकपाणी चांगलें किंवा वाईट झाल्यानें दाव्याचे संख्येवर परिणाम कसा होतो, वगैरे गोष्टींचे संबंधानें माहिती देणें जरूर आहे, परंतु त्याबद्दल सरकारी रिपोर्टांतही विशेषसा विचार केलेला नसतो यामुळें निरुपाय आहे.

सन १८९२।९३ सालांत न्यायपद्धतींत कांहीं फरक झालेला नाहीं. या सालीं ज्या कांहीं विशेष गोष्टी झाल्या त्या मात्र दाखल करतों. बंगाल्यांत सन १८९१-९२ सालापेक्षां जास्त फिर्यादी दाखल झाल्या. एकंदरींत पूर्वीपेक्षां काम फार वाढलें असल्यामुळें ५९ नवीन सबार्डीनेट जज्ज व मुनसिफ नेमण्यांत आले. वायव्य प्रांतांत सन १८९१-९२ सालचे पूर्वी कांहीं सालें फिर्यादी कमी दाखल झाल्या होत्या, परंतु सन १८९२-९३ सालीं त्या पूर्वी प्रमाणें दाखल झाल्या. या प्रांतांत हल्लीं असलेले न्याय क-

रणारे अंमलदार पुरेसे नाहींत, यामुळें काम तुंबलें आहे. पंजाब प्रांतांत या सालीं फिर्यादी कमी दाखल झाल्या व त्याचें कारण महामारीचा उपद्रव व तापाची सांथ या प्रांतांत होती, हें देण्यांत आलें आहे. ब्रह्मदेशांत या सालीं काम फार दाखल झालें व हल्लीं असलेले न्यायाधीश पुरेसे नसल्यामुळें काम तुंबलें आहे. मध्यप्रांतांत सन १८९१-९२ सालीं नेहमींपेक्षां कमी फिर्यादी दाखल झाल्या होत्या परंतु सन १८९२ सालीं पूर्वीप्रमाणेंच दाखल झाल्या. दहा रुपयांचेपेक्षां कमी किमतीचे दावे मात्र कमी दाखल झाले. या सालीं अपिलांचें काम दिपुटी कमिशनरकडून नवीन अपिलें ऐकण्यासाठीं नेमलेले जज्जांकडे देण्यांत आलें. आसाम प्रांतांत सन १८९१–९२ सालीं फिर्यादी दाखल झाल्या होत्या त्यापेक्षां या सालीं जास्त दाखल झाल्या, परंतु या दोन्ही सालीं दाखल झालेल्या फिर्यादी पूर्वीपेक्षां कमीच होत्या. वऱ्हाडांत या सालीं फिर्यादी दाखल जास्त झाल्या परंतु त्या सर्वांचा सालाचे सालांत निकाल झाला. मद्रास इलाख्यांत खुद्द इलाख्याचे शहरीं एक सिटी सिव्हिल कोर्ट स्थापन झालें, प्रांतांत जास्त डिस्ट्रिक्ट मुनसिफ नेमिले, हायकोर्ट नवीन इमारतींत गेलें अशा विशेष गोष्टी झाल्या आहेत. मुंबई इलाख्यांत इतर प्रांतांप्रमाणेंच दाखल झालेले फिर्यादींत वाढ आहे, सिंध प्रांतांत सन १८९१-९२ पेक्षां कमी फिर्यादी दाखल झाल्या.

गुन्हे व गुन्ह्यांची चौकशी.

फिर्यादींचे संख्येचे मानानेंच पाहिलें तर सन १८८१ पेक्षां आतां त्या वाढत आहेत. सन १८८१ सालीं दरदहा हजार माणशीं ५५ फिर्यादी होत होत्या, तर सन १८९१ सालीं त्या ५९ पडल्या. दिवाणी फिर्यादींची तशी वाढ झालेली नाहीं; याचें कारण असें दिसतें कीं दिवाणी दावा दाखल करण्यास जसा खर्च लागतो तसा फौजदारींत फिर्याद करण्यास पडत नाहीं. आतां या संख्येपैकीं अगदीं निखालस खोट्या फिर्यादी ह्मणून पोलिसाकडून काढून टाकण्यांत येतात त्या वजा केल्या पाहिजेत; त्या वजा केल्या ह्मणजे दरदहा हजार माणशीं ४० फिर्यादी पडतात.

गुन्ह्यांचे दोन वर्ग केलेले आहेत. एका प्रकारचे गुन्ह्यांचा तपास पोलिस आपले अधिकारानें सुरू करतात. हे जास्त महत्वाचे गुन्हे असतात. दुसरे प्रकारचे गुन्ह्यांचा तपास करण्यास माजिस्ट्रेटाचा हुकूम लागतो. सन १८९१ सालीं एकंदर ९३०११०० फिर्यादी झाल्या, त्यांपैकीं पहिल्या वर्गाच्या शेंकडा ५६ व दुसरे वर्गाच्या ४४ होत्या. दुसरे वर्गात साधारण अपक्रिया वगैरे हलके गुन्हे व महत्वाचे गुन्ह्यांपैकीं खोटा दस्तऐवज करणें व खोटी साक्ष देणें हे गुन्हे

येतात. गेले १० सालांत ह्या गुन्ह्यांचें प्रमाण वाढलें आहे, तरी शिक्षा झालेल्या लोकांचे संख्येंत तशी वाढ झालेली नाहीं. फिर्यादीचे मानानें शिक्षांचें प्रमाण सन १८८१ सालीं ४२ होतें, तें आतां ४१ झालें आहे. फिर्यादींत वाढ झालेली आहे ती घरफोडी चोरी व सार्वजनिक अपक्रिया या गुन्ह्यांत झाली आहे. इतर गुन्ह्यांच्या फिर्यादीचे संख्येंत कमजास्तपणा होतो, तसा शिक्षा झालेले गुन्ह्यांचे संख्येंत झालेला नाहीं. शिक्षा झालेल्या गुन्ह्यांचें प्रमाण सन १८८० सालीं ४२ होतें, सन १८८६ सालीं ४३ होतें व सन १८९१ सालीं ४१ होतें. सार्वजानिक अपक्रियेचे फिर्यादीपैकीं शेंकडा ९० इसमांस शिक्षा होतात. हे गुन्हे कमी केले तर शिक्षा झालेले (शाबित झालेले) गुन्ह्यांचें प्रमाण पुष्कळ कमी होतें. चोरी व घरफोडीचे गुन्हे फारच कमी शाबित होतात. याचें कारण असें दिसतें कीं, फार वेळा असे प्रकारच्या फिर्यादी त्या मालाचे हक्क संबंधाच्या तंट्यावरून किंवा आकसानें झालल्या असनात व दुसरें कारण असें कीं, माल सांपडल्यावरही दागिने एकच नमुन्याचे असले मुळें ते ओळखण्याची अडचण पडते. दंगे या सदरांत साधारण घरगुती भांडाभांडीमुळें चार लोकांचे जमावानें झालेले तंटे येतात, तसेंच अलीकडे हिंदुमुसलमानांचे धर्मसंबंधावरून तंटे होतात तेहि येतात. सन १८८५ सालापासून हिंदु व मुसलमानांचे धर्मविधी कालमानानें एकच वेळीं पडल्यानें हे तंटे जास्त होऊं लागले आहेत. खुनाबद्दल फिर्यादी सन १८८० सालीं ११०००० लोकसंख्येस १ या प्रमाणानें झाल्या, त्यांचें प्रमाण सन १८८६ सालीं नव्वद हजार लोकसंख्येस एक व सन १८९१ सालीं ८६ हजारांस एक असें पडलें. या फिर्यादीपैकीं शेंकडा ३७ पासून ४४ शाबीत झाल्या. दरोड्याचे गुन्ह्याचे संबंधानें विचार पाहतां, त्यांत साधारण संधी सांपडल्या वेळीं एखादें घर लुटणें किंवा रस्ता लूट करणें ही एक तऱ्हा व कांहीं मंडळी एखादे नायकाचे हाताखालीं मिळून हम्मेष हे गुन्हे करणें ही दुसरी तऱ्हा असे या गुन्ह्यांत दोन पर्याय आहेत. पहिल्या प्रकारचे गुन्हे साधारण पीकपाणी बरोबर झालें नाहीं ह्मणजे वाढतात. दुसरे प्रकारचे गुन्ह्यांस चांगला नायक, संस्थानिकांचे हद्दींचें सांनिध्य, ह्या सोई जुळाव्या लागतात ह्मणून हे गुन्हे नियमितपणानें होत नाहींत. ब्रह्मदेश खालसा करण्यांत आल्यावर त्या देशांत व शेजारचे डोंगरी प्रांतांत हे गुन्हे फार होत होते, परंतु खरें ह्मटलें असतां ते राजकीय कारणांनींच उपस्थित झालेले होते. संख्येचे मानानें पाहतां हे गुन्हे मद्रासेस जास्त होतात, व त्यांचे खालोखाल बंगाल्यांत होतात, त्यांचे नंतर वायव्य प्रांत, मुंबई व पंजाब यांचे नंबर लागतात. मद्रासेंत हे गुन्हे अन्नपाण्याची ददात झाली ह्मण-

जे गांवांतील कनिष्ठ दरजाचे लोक करतात, परंतु उत्तर हिंदुस्थानांतील दरोडे पूर्वीचे याच वर्गाचे लोक किंवा पर ठिकाणांहून आलेले फिरस्ते गुन्हेगार लोक करतात. बंगाल्याकडे या गुन्ह्यांस जमीनदार लोक सामिल असतात. मध्य प्रांतांतील दरोडे नेहमीं हाच धंदा करणारे डोंगरी लोक असतात ते मिळून घालतात. हे गुन्हे सांपडण्यास रयतेकडून भीतीनें किंवा सुस्तीनें किंवा इतर कारणांनीं मदत होत नाहीं. गुन्हे करणारे कनिष्ठ दर्जाचे लोक गांवोगांव आहेतच, त्यांस नायक मिळाला किंवा पोलिसाचे वंदोवस्ताची थोडी ढिलाई झाली कीं हे लोक गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात. असे गुह्यांची शाविती शेंकडा सुमारें पंचवीसपासून तीस कज्यांत होते. हे गुन्हे सन १८८० सालीं सर्व हिंदुस्थानांत ९८१ झाले होते व सन १८९१ सालांत सुमारें १६१३ झाले होते, मध्यंतरीं ती संख्या २३२८ पर्यंत वाढली होती.

पुढील पत्रकांत पहिले वर्गाचे गुन्ह्यांची संख्या व त्यांत शाबितीचें प्रमाण कसें होतें तें दिलें आहे.

गुन्ह्याचें नांव	फिर्यादींची संख्या.		फिर्यादींपैकीं दरशेंकडा शाबितीचें प्रमाण.	
	१८८०	१८९१	१८८०	१८९१
खून	१७७९	२५४६	४४	३७
शरीरासंबंधीं इतर मोठे गुन्हे	१८०१४	२७३४३	४९	४३
लोकांचे स्वस्थतेसंबंधीं गुन्हे	७८२५	११०६६	५७	५०
दरोडे	९८१	१६१३	३२	२३
गुरांची चोरी	२१५७७	२६८६७	३८	३०
इतर प्रकारच्या चोऱ्या	१५२७४२	१७८७३८	३२	३१
घरफोडी	७९५२७	१५३५८१	१६	१२
सार्वजनिक अपक्रिया.	८१२६८	१३६७१६	९०	९१
व्हेग्रन्सी (भटकणें)	११०२४	१७२५३	७८	७३
	५८५९०४	७३२८३२		
गुन्ह्याचे शाबितीचें सामान्य प्रमाण.			...४२	४१

पोलिसास माजिस्ट्रेटाचा हुकूम असले शिवाय तपास करतां येत नाहीं असे गुन्ह्यांचें प्रमाण शेंकडा ४४ आहे हें वर सांगितलेंच आहे. हे गुन्हे विशेष महत्वाचे नसतात. सन १८९१।९२ सालीं ५९२३०० फिर्यादी आल्या होत्या, त्यांपैकीं सुमारें एक चतुर्थांश म्युनिसिपालिटीच्या वगैरे संबंधानें होत्या. अप-

क्रियेच्या फिर्यादी सुमारें शेंकडा ५ होत्या ; शिविगाळ, मारमारी किंवा दुखापत यांबद्दल शेंकडा ४५ झाल्या होत्या व बाकीचे उरलेले एकचतुर्थांशांत फसवणें, खोटी साक्ष देणें, किंवा खोटे दस्तऐवज करणें, ह्या गुन्ह्यांबद्दल फिर्यादी होत्या. या प्रकारचे सर्व गुन्ह्यांबद्दल शिक्षा शेंकडा सुमारें २५ पासून ३३ खटल्यांत झाली होती.

सन १८९१ सालांत एकंदर आरोपी चौकशीसाठीं किती आले होते व त्यांपैकीं शाबिती शेंकडा किती लोकांवर झाली याबद्दल माहिती पुढील पत्रकांत आहे. तुलनेसाठीं सन १८८० सालचे आंकडे दिले आहेत.

प्रांत	आरोपितांची संख्या.		त्यांपैकीं शेंकडा किती लोकांवर गुन्ह्याची शाबिती झाली त्याचें प्रमाण	
	१८८०	१८९१	१८८०	१८९१
बंगाल	२२६३६६	२७६४८३	६८.९	६७.५
वायव्य प्रांत	१८६४६५	२०३४२२	५६.६	५३.१
पंजाब	१७६४५३	१९१२१०	४८.८	४१.८
मध्यप्रांत	४४५९५	४३३६७	६४.४	५८.३
आसाम	१६३४४	२१३२१	६७.७	६०.०
मद्रास	३१२१५६	४२३३३१	५५.९	४८.२
मुंबई	१२०७६६	२३६५८७	४९.४	३९.९
वऱ्हाड	२३४१५	२१०१५	५२.६	४५.८
अजमीर	५४३९	८३८०	४४.१	५९.९
कुर्ग व बंगलूर	२११३३*	९२२७	४२.१	२६.६
खालचा ब्रह्मदेश	४१६८५	६८०५५	६६.८	६१.७
वरचा ब्रह्मदेश	—	२३२२४	—	६७.२
	९७८५१६	१५२५६२२	५७.५	५१.६
आरोपितांची संख्या सन १८९२		१६५१९९०		४८.५

* ह्या सालीं ह्मैसूर संस्थानाचे आंकडे आहेत.

सन १८९२।९३ सालांत बंगाल प्रांतांत चोरीचे गुन्ह्यांची वाढ पीक गेल्यामुळें झाली होती. वायव्य प्रांतांत या सालीं गुन्हे कमी झाले होते. पंजाब, व ब्रह्मदेश व आसाम प्रांतांत या सालीं विशेष असें कांहीं नाहीं. मध्यप्रांतांत मिळकतीसंबंधाचे गुन्हे जास्त झाले होते. मद्रासेंतही पीक वाईट आल्यानें हे गुन्हे जास्त झाले होते. या सालीं मुंबई इलाख्यांत विशेष कांहीं झालें नाहीं.

अपिलांचे व त्यांतील निकालासंबंधानें पाहतां सन १८८० सालीं ६१३८७ इसमांनीं अपीलें केलीं होतीं, त्यांपैकीं ११४७५ इसमांच्या शिक्षा रद्द झाल्या होत्या. सन १८९१ सालीं १४७१७७ अपिलें झालीं त्यांपैकीं २१६१२ इसमांच्या शिक्षा रद्द झाल्या. सन १८९२ सालीं १५२८०९ इसमांनीं अपीलें केलीं, त्यांपैकीं २३२६८ लोकांच्या शिक्षा रद्द झाल्या. ह्मणजे साधारणपणें अपिलांपैकीं शेंकडा ३५ पासून ४४ अपिलांत शिक्षा कायम झाल्या व शेंकडा १८ पासून १५ पर्यंत लोकांच्या शिक्षा रद्द झाल्या.

गुन्हा शाबित झालेले लोकांस कोणत्या शिक्षा किती झाल्या होत्या याचें प्रमाण असें दिसून येतें कीं, सन १८९१-९२ सालीं दंडाची शिक्षा शेंकडा ७४·४२ लोकांस, कैदेची शिक्षा २२·७३, फटक्यांची शिक्षा २·५५, फांशीची शिक्षा०·०६ व हद्दपार करण्याची शिक्षा ०·२४ लोकांस याप्रमाणें शिक्षा झालेल्या होत्या. सन १८८१ चे आंकड्यांशीं तुलना करून पहतां फांशीच्या शिक्षा सन १८९१ सालीं कमी झाल्या व दंडाचे शिक्षेचे संख्येंत थोडी वाढ झाली.

याप्रमाणें गुल्ह्यांची व त्यांचे चौकशीची हकीकत आहे. पूर्वीपेक्षां आतां पोलीस ठाणीं जास्त झाल्यानें, व त्यांवरील अंमलदारही पूर्वीपेक्षां चांगले असल्यानें, व गांवचे पोलिसांतही सुधारणा झाल्यानें, पूर्वीपेक्षां आतां गुल्ह्यांचा स्फोट जास्त होतो, तरीही पुष्कळ गुन्हे छपले जातात व हिंदुस्थानांतील लोक जरी शांतताप्रिय व कायद्याप्रमाणें वागणारे आहेत तरी लोकसंख्या फार मोठी असलेमुळें बंदोबस्तास नौकरांची संख्याही फार मोठी लागते. खेडेगांवचे जागले किंवा पाहरेकरी लोक हे पुष्कळ प्रसंगीं चोरटे वर्गाचे असतात, यामुळें गुन्ह्यांची परिस्फुटता होण्यास अडचण पडते व लोकमतही गुन्ह्यांचे चौकशीस मोठेंसें मदतीचें होत नाहीं. पूर्वी गांवचे मुख्यांस गुन्ह्यांच्या वगैरे सर्व खबरा असत, परंतु अलीकडे त्या मुख्यांचें महत्व कमी होत चाललें आहे असें ह्मणतात व त्यामुळें सर्व तपासाचा भार पोलिसावरच पडतो; व पोलीस तर लोकांचे मर्जीतलें नाहीं. शिवाय नेहमीं गुन्हे करणाऱ्या जाती या देशांत पुष्कळ आहेत; त्यांचा बंदोबस्त करण्याचेंही कांहीं प्रांतांत पोलिसास एकमोठें काम असतें.गांवगंना गैरचालीचे लोकांचें रजिष्टर ठेवणें व असे लोकांचे मुख्यापासून मुचलके घेणें हें जास्त जारीनें झाल्यावर, हल्लींपेक्षां जास्त चांगला बंदोबस्त होईल असा अजमास आहे. कोर्टांवरही असा शक आहे कीं, तीं पुराव्यावर वाजवीपेक्षां फाजिल गैरभरवसा ठेवतात व अपीलकोर्टांत आपला ठराव फिरेल या भीतीनें, त्यांचे मनाची आरोपीचे गुन्हेगारीबद्दल खात्री झाली तरी, आरोपीस सोडून देतात; व गुन्हे शाबीत झाले तरी शिक्षा जरब देत नाहींत. न्यायाधीश चांगले शिकलेले असतात यामुळें

व आरोपितांस वकिलांची मदत जास्त मिळूं लागल्यानें, पुरावा वजन करण्याचा कांटा थोडा जास्त धारवाडी होत चालला असावा असें वाटतें. खालील कोर्टांत चौकशीचें काम शास्त्रोक्त पद्धतीनें चाललें आहे किंवा नाहीं या बाबतींतही अपीलकोर्टांत वाजवीपेक्षां फाजील कसोशी होते अशीही तकरार आहे. हल्लीं गुन्ह्यांस शिक्षा करण्याचे बाबतींत जो कायदा आहे त्याचा उद्भव येथील देशस्थितीपासून झालेला नाहीं; इंग्लंडांत जेथें राजापासून प्रजेचें संरक्षण करणें हेंच राजनीतीचें मुख्य बीज धरलेलें आहे, व न्याय व युक्तिविचार यांस अनुसरून न्यायपद्धति असलीच पाहिजे असा जेथें सांप्रदाय आहे, असे देशांत प्रचलित असलेले कल्पनांस अनुसरून तो करण्यांत आलेला आहे; तेव्हां त्यामुळें त्या कायद्यापासून आरोपीस सुटका होण्यास फुरसत सांपडते अशी कल्पना होण्याचा संभव आहे. या बाबतींत सुधारणा होण्यास काम लवकर व चांगले प्रकारानें होत आहे किंवा नाहीं हें वरिष्ठ कोर्टांनीं जास्त कसोशीनें पाहिलें पाहिजे असें हिंदुस्थानसरकारांनीं कळविलें आहे.

न्यायखात्याची जमा व खर्च या बाबतींत स्थिति कशी आहे हें हा भाग संपविण्यापूर्वी सांगणें जरूर आहे, सबब त्याबद्दलचा सन १८९१-९२ चा तपशील देण्यांत येत आहे.

जमा	रु.	खर्च	रु.
बैतनमालविक्री	१८६५४०	हायकोर्टें व चीफ कोर्ट	३०२२९२०
कोर्टफी रोख जमा	३१२११०	जुडिशियल कमिशनर	३४७४१०
दंड, फी, फारफीचर	३०९०८१०	रिकार्डर	६७२७०
इतर	१६८९७०	सरकारी वकील	८७७९७०
		सिव्हिल व सेशन कोर्टें	१२५०६८१०
	३७५८४३०	फौजदारी कोर्टें	१००८६०७०
		प्रेसिडेन्सि माजिस्ट्रेट	१९८७४
		स्मालकाझ कोर्टें	७०९०६०
		इतर	...५७४६६०
			२८३९०९१०

लोकमत—न्यायखात्यासंबंधानें विचार करण्यासारखे प्रश्न आहेत त्यांत राज्यकारभार पहाणारे अंमलदारांकडे न्यायाचें काम ठेवावें किंवा कसें हा महत्वाचा आहे व त्यासंबंधानें पुष्कळ दिवसांपासून सरकारांत व लोकांत विचार चालू आहेत व न्यायाचें काम मुलकी कामगारांकडे ठेवूं नये असा उभयतांचाही अभिप्राय

झाला आहे. इंग्रज सरकारचे असदानीपूर्वी दिवाणी, फौजदारी, मुलकी व बंदोबस्त ठेवण्याचे हे अधिकार एकाच अंमलदाराकडे असत; इंग्रजी अमलांतही ते अधिकार पाहिल्यानें एकच अंमलदाराकडे होते; पुढें ती स्थिति पालटत गेली ती कशी व वेळोवेळीं कशा व्यवस्था होत गेल्या तें वर सांगितलेंच आहे. आतां दिवाणी काम व फौजदारी महत्वाचे गुन्ह्यांसंबंधानें चौकशीचें व अपिलाचें काम, हीं कामें न्यायाचेच कामासाठीं नेमलेले अंमलदारांकडे आहेत. फौजदारी अव्वल चौकशीचें काम बहुतेक (ह्मणजे सेशन कोर्टाचे अधिकारांतील गुन्हे शिवायकरून, इतर गुन्ह्यांचे संबंधाचें) ज्यांचेकडे राज्यव्यवस्थेचें काम आहे असेच मुलकी अंमलदारांकडे असतें, हीच या खात्यासंबंधानें तकरारीची मुख्य बाब आहे.

असें प्रकारें राज्यव्यवस्थेचें व न्यायाचें काम एकाच अंमलदाराकडे असण्यांत अनेक अडचणी व भानगडी उत्पन्न होतात. मीठ, अफू, जंगल, मादकपदार्थांचे कर, हत्यारें यांसंबंधाचे व जमीनमहसुलाचे कायदे यांत पदोपदीं शिक्षा ठेवल्या आहेत, व त्या कायद्याप्रमाणें करण्याचे कामांची व्यवस्था ज्या अंमलदारांकडे असते, त्याच अंमलदारांकडे त्या कायद्याविरुद्ध केलेले गुन्ह्यांची चौकशी करून निकाल करण्याचें काम असतें. हे कायदे जरी त्रासदायक आहेत तरी, त्यांची अंमलबजावणी ज्या तऱ्हेनें होते त्यामुळें ते फारच उपद्रवकारक होतात. त्या व्यवस्था पाहण्याचें व न्याय करण्याचें काम एकाच अंमलदाराकडे असण्यानें कसेही तऱ्हेची फिर्याद असो, शिक्षाही होतेच; व साधारण समज असा आहे कीं असे गुन्हे सोडले तर तसें करणारे अधिकाऱ्यांस त्यांचे वरिष्ठांकडून दपटशा येतो. यापासून निरपराधी लोकांस फार वेळा त्रास होतो व एकंदर लोकांचे मनावर परिणाम वाईट होतो.

न्याय करण्याचे व राज्यव्यवस्थेचे कामांत असलेले अंमलदारांस अगदीं भिन्न प्रकारचीं कामें करावीं लागतात. न्यायाचें काम नियमित वेळीं व नियमांस अनुसरून एकेच ठिकाणीं बसून करावें लागतें. राज्यकारभाराचे कामांस काळ व स्थळ यांची मर्यादा नाहीं, तें सर्व काळ व वेगळाले ठिकाणीं जाऊन केलें तरच चांगलें होतें. राज्यव्यवस्थेचें काम पहातांना अंमलदारांची मुख्य नजर, त्यापासून होणारे नफ्यातोट्यावर असते; न्यायाचें काम करणारे अंमलदारांचे परिणामासंबंधानें पूर्ण औदासिन्य असतें. या कारणांसाठीं हीं दोन कामें करणारे अंमलदारांचीं मनें वेगळाले प्रकारचीं बनतात. न्यायाचें काम नीट रीतीनें करतां येण्यास एका विशेष प्रकारचें मन बनावें लागतें; कायद्याचा पहिल्यानें चांगला अभ्यास करावा लागतो व त्याचा व्यासंग सारखा कायम ठेवावा लागतो. मुलकी

कामगारांस कायद्याचें ज्ञान मूळ कोठें असतें व त्याचा त्यांस सारखा व्यासंग ठेवण्यास सवडही नसते. राज्यकर्त्यांकडून अन्यायाचरण झालें तर त्याचें नियमन न्यायाधिशांकडून होण्याचें आहे, व अशी व्यवस्था जेथें जारी आहे, तेथें लोकांत स्वातंत्र्यप्रियताही जास्त असते. राज्यकारभार करणाऱ्या अंमलदारांचे कृत्यांचा न्याय करण्याचें काम जर त्याच वर्गाचे अधिकाऱ्यांकडेस असलें, तर रयतेचे हक्कांचा सांभाळ बरोबर होत नाहीं. प्राचीन काळच्या एतद्देशीय राज्यव्यवस्थेंत सर्व कामें एकाच अधिकाऱ्याकडे असत हें खरें, परंतु त्याच कारणामुळें लोकांतील स्वातंत्र्यप्रियता नाहींशी होऊन ते परावलंबी झाले, तरीही त्या वेळीं राजा व प्रजा हे उभयतां एकदेशीय व एक धर्माचे असले कारणानें राज्यकर्त्यांचे वर्तनास कांहीं अंशीं तरी आळा पडे; तीं बंधनें परकीय राज्यकर्त्यांचे अमदानींत असत नाहींत, यासाठीं इंग्रजी अमदानींत न्यायाचे कोर्टास पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे व तसें मुलकी व न्यायाचीं कामें वेगळाले अंमलदारांकडे दिल्याशिवाय घडणार नाहीं.

या व्यवस्थेचे विरुध्द असें सांगण्यांत येतें कीं, इंग्रज सरकारचें राज्य कायम रहाण्यास हल्लीं जिल्हाधिपतीस जे अधिकार आहेत ते तसे कायम ठेवले पाहिजेत व सर्व प्रकारानें ते खरे राज्यकर्ते आहेत असें लोकांस वाटण्यासारखी त्यांची स्थिति राखली पाहिजे; व सनदी लोकांस न्यायाचे अधिकार देण्यापूर्वी मुलकी खात्यांत त्यांनीं काम केलेंच पाहिजे; कारण त्याशिवाय त्यांस लोकांची व रीतिरिवाजांची माहिती होत नाहीं. यासाठीं जिल्ह्याचे अंमलदारांस हल्लीं असलेले फौजदारी अधिकारही असले पाहिजेत. यासंबंधानें विचार पाहतां असें दिसतें कीं, जिल्ह्यांचे मुख्य अधिकारी स्वस्तः फौजदारी काम फारच थोडें करतात. या अधिकाऱ्यांनीं काम न चालविल्यामुळें जर त्यांचे महत्वांत कांहीं अंतर पडलें नाहीं, तर आतां पुढें तें काम त्यांनीं आपले एका असिस्टंटास सांगितल्यानेंही त्यांचे स्थितींत बदल होणार नाहीं; व त्यांस इतर काम फार झाल्यामुळें, त्यांचेकडील फौजदारी काम काढून घेतलें तर त्यांचें महत्व कमी होण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. तरी साधारणपणें इतर माजिस्ट्रेट लोकांत व सनदी नौकरींतलि माजिस्ट्रेट लोकांत कांहीं बाबतींत फरक आहे हें कबूल केलें पाहिजे. राजकीय कारणांसाठीं या लोकांकडे हे अधिकार ठेवणें जरूर असेल तर, जिल्ह्याचे कलेक्टराचा माजिस्ट्रेटी अधिकार त्याचे हाताखालील एका असिस्टंटास देण्यास त्यास परवानगी ठेवावी, व एकाच वेळीं दोन्ही अधिकार खालचे दर्जाचे असिस्टंट कलेक्टरांस देण्यांत येऊं नयेत असें ठरवावें, ह्मणजे हल्लींची अडचण दूर होईल.

आतां कलेक्टर व त्याचे असिस्टंट हे राज्यकर्ते आहेत व राज्याचे सुस्थितीसाठीं त्यांचें महत्व लोकांस उघड दिसण्यासारखें ठेवलें पाहिजे, व त्यांचेबद्दल लोकांचे मनांत वचक राहण्यासाठीं त्यांस माजिस्ट्रेटी व मुलकी आधिकार ठेवले पाहिजेत, ही एकदेशी विचारसरणी जरी मान्य केली तरी, ते अधिकार खालचे माजिस्ट्रेट, जे एतद्देशीयच असतात, त्यांचेकडे ते मुलकी अधिकारांस जोडून ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं. त्या आधिकारापासून त्यांचें महत्व वाढवून ठेवल्यानें ब्रिटिश राज्याचे पायास मजबुती येते असें नाहीं; फक्त त्यांचेकडे इतर कामें फार असल्यानें न्यायाचें काम मात्र बरोबर होत नाहीं व लोकांस त्रास भोगावा लागतो. मामलेदारांकडे तर इतकीं कामें आहेत कीं, अमुक एक काम त्यांचेकडे नाहीं असें दाखविणेंच कठीण आहे, तेव्हां त्यांचे हातून न्यायाचें काम बरोबर न होणें हें स्वाभाविकच आहे. एकंदरींत न्यायाचें व मुलकी काम एका अंमलदाराकडे असणें इष्ट नाहीं.

आतां तसे दोन्ही अधिकार एका अंमलदाराकडे असणें इष्ट नाहीं ही गोष्ट नुकताच हाउस आफ लार्ड्स सभेंत वादविवाद झाला त्यांत हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरींनीं व एका माजी स्टेट सेक्रेटरींनीं कबूल केली, तेव्हां आतां त्याबद्दल वाद राहील असें वाटत नाहीं. या प्रश्नासंबंधानें ऐतिहासिक माहिती इंडिया मासिक पुस्तकाचे जुलई सन १८९३ चे अंकांत आहे ती पहावी.

ही व्यवस्था अमलांत आणण्यासंबंधानें काय काय तजविजी केल्या पाहिजेत, ह्याबद्दल सरकार स्वतःच विचार करूं लागल्याशिवाय निश्चित होणार नाहीं. कारण जिल्ह्या–जिल्ह्यांत मामलेदार, माजिस्ट्रेट, सबार्डिनेट जज, असिस्टंट व डेपुटिकलेक्टर यांस किती काम असतें, हल्लीं माजिस्ट्रेटी काम करणारे अधिकारी वर्गाकडून तें काम निघालें तर त्यांचें बाकीचें काम किती अंमलदारांकडून होईल, व त्यांपैकीं फक्त न्यायाचेच कामावर ठेवण्यास किती अंमलदार सांपडतील, किंवा तितके कमी केले व दुसरे न्याय करणारे अंमलदार नेमले तर पूर्वीचे खर्चांत किती नेमतां येतील, हें पाहण्यास जी माहिती पाहिजे ती सरकाराशिवाय इतरांस दुष्प्राप्य आहे. लोकांस फक्त सुधारणेची इष्ट दिशा मात्र दाखवितां येईल. या बाबतींत दोन प्रकारांनींही सुधारणा अमलांत आणणें शक्य आहे असें दाखविण्यांत आलें आहे. जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांचे मामलेदार कमी करावे व त्यांचे पगाराचे रकमेंतून जास्त सबार्डिनेट जज नेमावे, व सर्व माजिस्ट्रेटी काम सबार्डिनेट जज्जांकडे सोंपवावें ; मामलेदार कमी केल्यानें कांहीं अडचण होईल ती लहान तालुक्याचें काम त्याचे शेजारचे मामलेदाराकडे सांगून दूर करावी, अशी एक सूचना आहे. याच

प्रकारची दुसरी एक सूचना आहे ती अशी कीं, प्रत्येक जिल्ह्यांत असिस्टंट कलेक्टर व डेपुटी कलेक्टर असतील त्यांपैकीं निंमे लोकांकडे माजिस्ट्रेटी काम सोंपवावें व ते जिल्हाजज्जाचे हाताखालीं द्यावे व बाकीचे निम्मे अंमलदारांनीं मुलकी काम करावें.

दुसरे प्रकारची एक सूचना आहे ती अशी कीं, सबार्डिनेट जज्जांकडील स्थावराचे व हक्कसंबंधाचे वगैरे भानगडीचे दावे काढून जिल्ह्याचे मुख्य ठिकाणचे कोर्टांकडे द्यावे व त्यांचेकडील हें काम कमी होईल त्याचेबद्दल त्यांचेकडे त्या तालुक्यांतील दुसरे वर्गाचें माजिस्ट्रेटी काम सांगावें; जिल्ह्याचे ठिकाणीं मोठे व भानगडीचे स्थावराचे व हक्कसंबंधाचे दावे चालविण्यासाठीं एक कोर्ट असावें, त्यांत चार अथवा पांच जज्ज असावेत व त्यांपैकीं दोन सनदी नौकरींतील असून तीन बिनसनदी नौकरींतील असावे; हल्लीं हायकोर्टांत पाठ आहे त्याप्रमाणें या जज्जांनीं दोघ-दोघांनीं किंवा तिघांनीं एके ठिकाणीं बसून मुकद्दमे चालवावे; यांचे ठरावावर कायद्याचे मुद्या-शिवाय इतर करणांसाठीं अपील असूं नये; पक्षकारांनीं विनंति केल्यास या कोर्टांनीं कज्जाची हकीकत हायकोर्टास कळवून त्या कोर्टाचा कायद्याचे मुद्यासंबंधानें अभिप्राय घ्यावा. ज्या कज्जांत अपील ठेवलें नाहीं अशांत हायकोर्टास खालील कोर्टांचे ठराव तपासून पाहण्याचा अधिकार असावा. पहिले वर्गाचे माजिस्ट्रेटाचे अधिकारांतील गुन्ह्याची चौकशी एक किंवा दोन असिस्टंट किंवा डेपुटी कलेक्टर यांनीं करावी व त्यांनींच सेशन कोर्टास खटले कमिट करावे.

न्यायखात्यांत सुधारणा झाली पाहिजे किंवा कसें यासंबंधानें सन १८९४ सालचे कांग्रेसमध्यें प्रेसिडेंट मि. वेब यांनीं जें भाषण केलें त्यांतील थोडा उतारा येथें देतो व त्यानंतर कांग्रेसमध्यें जे या बाबतींत ठराव करण्यांत आले ते देतो.

मि. वेब ह्मणाले कीं:—" कायदे चांगले असणें जितकें अवश्यक आहे, त्याचप्रमाणें त्यांची अंमलबजावणी योग्य रीतीनें होणें हेंही अवश्यक आहे. यासाठीं मुलकी आणि फौजदारी हे दोन अधिकार एकाच मनुष्याच्या हातांत असतां कामा नये. मुलकी अंमलदारांस लोकांशीं मिळून मिसळून वागावें लागतें; नानातऱ्हेच्या गोष्टी ऐकाव्या लागतात; न्यायाधिशाचें वर्तन यापेक्षां अगदीं निराळ्या तऱ्हेचें असलें पाहिजे; त्याणें आपल्यासमोर येतील तेवढ्याच गोष्टी पाहिल्या पाहिजेत व त्यांवरच आपला निकाल दिला पाहिजे. हे दोन्ही गुण अगदीं भिन्न आहेत व याकरितां या दोन्ही कामीं भिन्न भिन्न माणसांची नेमणूक झाली पाहिजे. जूरीचा प्रश्न अशांतलाच आहे. जूरी एखादे वेळेस गुन्हेगार सोडून देते येवढ्याकरितां ती वाईट ह्मणून उपयोग नाहीं. नव्याण्णव गुन्हेगार सुटले तरी

हरकत नाहीं, पण एक निरपराधी मनुष्य गुन्हेगार ठरला जाऊं नये असें जें कायद्याचें तत्त्व आहे तें या प्रकरणीं नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. जूरीच्या पद्धतीनें कायद्याचें सर्व लोकांस ज्ञान होऊन तो परका वाटत नाहीं हा एक मोठाच फायदा आहे. फौजदारी काम चालविण्याच्या कायद्याची सुधारणा झाली पाहिजे."

कांग्रेसचे ठराव.

१२ वा ठराव–"न्याय व अंमलबजावणी हीं एकाचेच हातीं असणें हा या देशाच्या राज्यपद्धतींत एक मोठा दोष आहे व त्यामुळें सर्व प्रकारचे जुलूम सर्व देशभर होतात. याविरुद्ध सभेनें कैक वेळा स्टेटसेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार यांजकडे अपील केलें आहे, परंतु तो दूर झाला नाहीं. हा दोष लॉर्ड किंबर्ले व लॉर्ड क्रास या दोघांहीं स्टेटसेक्रेटरींनीं कबूल केला आहे ही समाधानाची गोष्ट होय. त्याचप्रमाणें हे अधिकार एकमेकांपासून तोडून टाकणेंही अगदीं शक्य आहे असें आर. सि. दत्त, एम. एम. घोस व पी० मेथा यांनीं दाखविलेंच आहे. तेव्हां सभा अशी विनंति करीत आहे कीं, सरकारानें प्रत्येक प्रांतांत एकेक कमिटी नेमावी. या कमिटींत हिंदुस्थानांतील सरकारी नोकर नाहींत असे निम्मे तरी लोक असावेत, व हे सर्व शिक्षण व कामाचा अनुभव यांच्या योगानें वादमूलक प्रश्नांचा विचार करण्यास लायक असे असावेत, व त्यांच्याकडे अधिक खर्च न पडतां न्याय करण्याचें खातें व अंमलबजावणीचें खातें हीं एकमेकांपासून पूर्णपणें विलग होतील अशी त्या प्रांतांला लागू पडण्यासारखी पद्धत तयार करून होईल तितके लवकर आपल्याकडे पाठवून देण्याचा सरकारानें अधिकार द्यावा."

७ वा ठराव–न्यायखात्यांतील वरिष्ठ प्रतीच्या जागा रिकाम्या झाल्यावर अगदीं नवीन मनुष्यांनीं त्या भरून काढण्याची पद्धत या सभेस अगदीं अमान्य आहे, व बंगाल, वायव्यप्रांत, औधप्रांत, मुंबई, व मद्रास या इलाख्यांतील डि० जज्ज व सेशन्सजज्ज व दुसऱ्या न्यायखात्यांतील वरिष्ठ प्रतीच्या जागांवर नेमावयाच्या लोकांना योग्य असें शिक्षण मिळण्याविषयीं नियम करावे. ह्या जागांवर मुख्यत्वेंकरून त्या खात्यांत काम करणाऱ्या लोकांचीच नेमणूक करावी असें या सभेचें मत आहे.

११ वा ठराव–[अ] ज्या प्रांतांत सेशन्सजज्जांकडून चालविल्या जाणाऱ्या खटल्यांत ज्यूरीची पद्धत सुरू नाहीं, अशा पुष्कळ प्रांतांत ती बिनधास्तपणें सुरू करण्यास आतां हरकत नाहीं असें सभेचें मत आहे.

[ब] १८७२ सालीं ज्यूरीचें मत एकीकडे ठेवण्याचा सेशन्सजज्ज व हायकोर्टें यांना जो नवीनच अधिकार देण्याचा प्रकार सुरू झाला तो घातुक आहे असें आढळून आलें आहे, ह्मणून हा अधिकार एकदम काढून घ्यावा.

[क] सेशन्सकोर्टांनीं निर्दोषी ह्मणून केलेल्या ठरावांवर अपील करण्याचा सरकारला जो अधिकार ठेवला आहे तो काढून घेणें अत्यंत इष्ट आहे असें या सभेचें मत आहे.

१५ वा ठराव–(ड) वारंटाच्या खटल्यांत आरोपीला आपली चौकशी माजिस्ट्रेटापुढें न होतां सेशन्स जजापुढें व्हावी असें सांगण्याचा अधिकार देणारा नियम क्रिमिनल प्रोसिजर कोडमध्यें घालावा.

भाग सहावा.

पोलीसखातें व तुरुंगखातें.

अपराध्यांस न्यायासनापुढें आणण्याचे संबंधानें पोलिसाचे कर्तव्य कर्माचा न्यायखात्याशीं अतिनिकट संबंध असल्यामुळें त्याबद्दल मागील भागांत जरूर तितका विचार करण्यांत आला ; आतां पोलीसखात्याचे व्यवस्थे संबंधानें सांगण्याचें आहे.

साधारण पोलिसाचे दोन वर्ग आहेत, एक गांवचें पोलीस व एक दिस्ट्रिक्ट (जिल्ह्याचें) पोलीस. दुसऱ्या वर्गाचे पोलिसांत कांहीं प्रांतांत दोन पोटवर्ग, ह्मणजे साधें पोलीस व लढाऊ पोलीस, असे असतात; या दुसऱ्या वर्गाचे पोलिसाचा उद्गम ब्रिटिश सरकारचे अमदानीपासूनच आहे. पहिल्या वर्गाचें पोलीस हें मात्र प्राचीन एतद्देशीय व मुसलमानी राजांचे कारकीर्दीपासून आहे.

गांवचें पोलीस—प्राचीनकाळीं जमाबंदीचें काम करण्यास जे अंमलदार नेमण्यांत येत असत, त्यांचेकडेसच गुन्ह्यांचा बंदोबस्त करण्याचें काम असे. तशीच गांवांवर त्यांचे हद्दींतील गुन्ह्यांबद्दल जबाबदारी असे. ही गांवांवरील जबाबदारी वेगळाले प्रांतांत वेगळाले तऱ्हेनें अमलांत येत असे. त्यांत मराठ्यांची तऱ्हा मोठी सोपी व व्यापक अशी होती ती अशीः—दुसरे ठिकाणीं गुन्हा करून पळून आलेले इसमाचा ज्या गांवांत माग येऊन पोंचेल त्या गांवानें तो गुन्हेगार पकडून द्यावा, किंवा ज्या ठिकाणीं गुन्हा झाला असेल त्या गांवास, रूढीनें ठरलेलें नुकसान भरून द्यावें, किंवा तो गुन्हेगार आपले गांवाहून दुसरे ठिकाणीं गेल्याचा माग लावून द्यावा. हा माग लावण्याची वहिवाट ब्रिटिश अमलांत बंद पडून फार दिवस झाले आहेत तरी अजूनही गांवचा मुख्य व गांवचा जागल्या यांचेवर बंदोबस्ताची जबाबदारी बरीच मोठी ठेवलेली आहे.

अलीकडे गांवचें पोलीस व डिस्ट्रिक्ट पोलीस यांचा संबंध सुधारून गांवचे पहारेकऱ्यांची स्थिति सुधारावी, यासंबंधानें स्थानिक सरकार व हिंदुस्थानसरकार यांचे प्रयत्न चालू आहेत. या लोकांस गांवची जमीन मुषाहिऱ्याबद्दल देण्याची वहिवाट असे ती मोडून वायव्य प्रांतांत नक्त पगार देण्याचें सुरू केलें आहे; तसेंच अयोध्या प्रांतांतही पगार देण्याचें सन १८९२ सालापासून सुरू झालें आहे. या दोन्ही प्रांतांत चांगलें काम करणारे लोकांस बक्षिसादाखल कांहीं रकम देण्याची वहिवाट आहे. बंगाल प्रांतांत गांवपोलिसाची स्थिति सुधारण्यासाठीं सन १८९२ सालीं कायदा करण्यांत आला आहे. गांवपोलिसाची नेमणूक गांवचे पंच करीत असत, व तो अधिकार या कायद्यावरूनही त्यांचेकडेसच ठेवण्यांत आला आहे, परंतु त्यांनीं केलेल्या नेमणुका जिल्ह्याचे अधिकारी यांनीं पसंत कराव्या असें ठरविलें आहे. हेच अधिकारी त्यांचा पगार व संख्या किती असावी हें ठरवितात. या गांवकामगारांची नेमणूक जिल्हाधिपतींनीं करावी असें ठरविण्याचा हेतु असा आहे कीं, चांगले इसमांची नेमणूक व्हावी व दिस्ट्रिक्ट पोलिसांनीं त्या लोकांस सरवराईचे नौकरासारखें समजूं नये.

मुंबई इलाख्यांत माग काढण्याची वहिवाट बंद झाली तरी, गांवचे जागल्यांच्या नेमणुकी व त्यांस दिलेल्या जमीनी ह्या कायम ठेवण्यांत आल्या आहेत.

डिस्ट्रिक्टपोलीस—हें पोलीस प्रथमतः लार्ड कार्नवालिस यांनीं १७९२ सालीं सुरू केलें. त्यापूर्वी वसुलाचें काम करणारे जमीनदारच गुन्हे पकडण्याचें काम करीत असत. त्या सालीं तें काम जमीनदारांकडून काढून जिल्ह्याचे अधिकाऱ्यांकडे सोंपविण्यांत आलें व त्यांचे हाताखालीं त्या कामासाठीं दरोगे नेमण्यांत आले. पुढें वायव्य प्रांतांतही हीच व्यवस्था सुरू करण्यांत आली. मद्रास इलाख्यांत प्राचीन पद्धत चालू होती व गांवचे मुख्य गुन्हेगार पकडून तहशीलदाराकडे पाठवीत असत. मुंबई इलाख्यांतही तशीच पद्धत चालू होती. पुढें जिल्ह्याचे अधिकाऱ्यांचें इतर काम वाढत गेल्यामुळें त्यांचे हातून पोलिसचें काम होत नाहींसें झालें तेव्हां पुढें पोलीसचें काम वेगळे अंमलदारांकडे देण्याचें ठरलें. डिस्ट्रिक्ट पोलीसचा हल्लींचा नमुना सर चार्लस नेपिअर यांनीं पहिल्यानें सिंध प्रांतांत आयर्लंड देशांतील पोलीसचे धर्तीवर चालू केला, व त्यांनीं या लोकांस कांहीं युद्धकलेचें शिक्षण देण्यासही प्रारंभ केला.

नेपियरसाहेबाचे नमुन्यावर पोलिसाची व्यवस्था हळू हळू सर्व हिंदुस्थानांत सुरू झाली. हल्लीं प्रत्येक प्रांतांत या खात्याचा मुख्य इन्स्पेक्टर जनरल असतो. जिल्ह्यांत पोलीस कोठें किती ठेवावें व त्यांनीं गुन्हे पकडणें, व गुन्हेगारांस न्यायासनापुढें आणणें, हीं कामें कशा रीतीनें करावीं, याबद्दल मुख्य हुकमत

डिस्ट्रिक्ट माजिस्त्रेटाकडे असते. सर्व प्रांतांत पोलीस लोकांस लष्करी कवाईत, जिल्ह्याचे सुपरिंटेंडेंट यांचे देखरेखीखालीं, किंवा त्या कामासाठीं काढलेले विशेष संस्थांत, देण्यांत येते. सुपरिंटेंडेन्ट व त्यांचे असिस्टंट हे बहुतकरून युरोपिअन लोक असतात व त्यांचे हाताखालीं इन्स्पेक्टर वगैरे नेटिव अंमलदार असतात. ब्रह्मदेश, आसाम वगैरे प्रांतांत लष्करी पोलीसही ठेवलेलें आहे.

अलीकडील सुधारणा—गेले दोन चार वर्षांत पोलिसखातें सुधारण्यासंबंधानें हिंदुस्थानसरकार व स्थानिक सरकार यांचा पत्रव्यवहार चालू आहे. या विषयाकडे हिंदुस्थानसरकारचें लक्ष सन १८८६ सालीं हिंदुमुसलमानांचे दंग्यामुळें गेलें. स्थानिक दंगे व गुन्हे करणाऱ्या जातीपासून होणाऱ्या उपद्रवापासून लोकांचें संरक्षण करणें हेंही नेहमींचें पोलिसाचेंच काम आहे व अशा प्रकारचीं कामें करण्याची योग्यता पोलीसचे लोकांचे अंगीं यावी ह्मणून त्यांस लष्करी शिक्षण द्यावें, योग्य प्रसंगीं त्यांस हत्यारें वापरण्याची परवानगी द्यावी, व गुन्ह्यांचे तपासाचे कामास नेहमीं लागणारे पोलिसांशिवाय कांहीं जास्ती लोक वेगळाले ठिकाणीं किंवा हेडक्वार्टरांत ठेवण्यांत यावे, असें हिंदुस्थानसरकारांनीं सन १८५० सालीं ठरविलें होतें; परंतु त्या ठरावाप्रमाणें पुष्कळ प्रांतांत व्यवस्था ठेवलेली नव्हती, ह्मणून पूर्वींचे ठरावाप्रमाणें व्यवस्था करावी व दंगे वगैरे झाले असतां उपयोगी पडण्यासाठीं युद्धकलेंत निष्णात असे पोलीस लोक प्रत्येक जिल्ह्यांत शिलकेंत ठेवावे, असें हिंदुस्थानसरकारांनीं स्थानिक सरकारांस फिरून सुचविलें. त्यानंतर पोलिसास युद्धकलेचें शिक्षण देण्याचें सर्व प्रांतांत चांगले प्रकारानें चालू झालें आहे.

पोलिसाचे बाबतींत हिंदुस्थानसरकारांनीं चौकशी केली, तींत असें निष्पन्न झालें कीं, राज्यव्यवस्थेचे कामासाठीं पूर्वींपेक्षां चांगले नेटिव अंमलदार मिळूं लागले आहेत, विद्येचा प्रसार झाला व उपजीविकेचा खर्च पूर्वींपेक्षां वाढला, या व इतर कारणांनीं पोलिसांत चांगले लोक शिरतनासे झाले व त्यामुळें पोलिसाची मान्यताही कमी होत चालली आहे. ही स्थिति अर्थातच चांगली नव्हती, तेव्हां ती सुधारण्यासाठीं गुन्ह्याची चौकशी करणारे वरिष्ठ अंमलदार व इन्स्पेक्टर यांचे पगार वाढविण्याबद्दल व कांहीं ठिकाणीं खालचे दर्जाचेही नौकरांचे पगार वाढविण्याबद्दल विचार सुरू झाला. आतां कांहीं प्रांतांतील पोलीस सुधारण्याबद्दलच्या सूचना स्टेटसेक्रेटरीकडून मंजूर झाल्या आहेत. कांहीं प्रांतांबद्दल विचार अजून चालू आहे. आणखीही एक सुधारणा ह्मणजे पोलीसचे तर्फे काम चालविण्यास वकीलीची किंवा दुसरी कायद्याची परीक्षा दिलेले लोक नेमण्याचेंही सुरू करण्याबद्दल प्रयत्न चालू आहेत.

सन १८९२-९३ सालांत विशेष असें कांहीं झालें नाहीं, फक्त पंजाबांत व खालचे ब्रह्मदेशांत पोलीस लोकांस शिक्षण देण्यासाठीं शाळा स्थापन करण्यांत आल्या.

पोलीस खात्यांत सन १८८१, १८९१ व १८९२ सालीं पोलीस लोक किती होते हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

	१८८१	१८९१	१८९२
१ एकंदर पोलीसची संख्या			
अंमलदार	११५६	१४६७	१५१९
शिपाई	१४६३८८	१५१०३२	१४८९९७
२ कोणते कामांवर होते त्याचा तपशील			
तुरुंगाकडे पाहऱ्यावर	४९९८	२३१६	२१५१
कच्चे कैदीवर पाहरा व खाजिन्यावर पाहरा	११९८०	३७१४८	३६३७१
मुनसिपालिट्यांचीं व बंदराचीं कामें	२७२२२	२६८३७	२७२४३
कान्टोन्मेंटांत	२१८४	२५०६	२४५१
पोलीस कामांवर	९८२२७	८५१६१	८३४३६

लोकसंख्येचे मानानें पोलीसची संख्या कशी पडते, व प्रत्येक पोलीस शिपायास हद्द किती होती, तें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

प्रांत	दहा हजार लोकसंख्येस पोलीसची संख्या		प्रत्येक पोलिसास किती चौरस मैल हद्द होती ती	
	१८८१	१८९१	१८८१	१८९१
बंगाल	४	३	६	६
वायव्यप्रांत	८	७	३	३
पंजाब	११	१०	५	५
मध्यप्रांत	९	८	१०	९
आसाम	८	१२	११	९
मद्रास	८	६	५	६
मुंबई	१२	१२	६	५
खालचा ब्रह्मदेश	१९	२०	१२	९
वरचा ब्रह्मदेश	—	७४	०	४

वऱ्हाड	१०	१०	६	६
सर्व हिंदुस्थान	७	७	६	६

सन १८९१–९२ सालीं पोलीसखात्याची जमा किती होती व खर्च किती झाला ह्याबद्दल माहिती खालीं दिली आहे. तुलनेसाठीं पूर्वीचे सालचे आंकडे दिले आहेत, त्यांवरून या खात्याचा खर्च कसा वाढत गेला आहे तें दिसून येईल.

जमा व खर्चाच्या बाबी.	रकम हजाराचे आंकडे आहेत
जमा	
सार्वजानिक खातीं, खासगी कंपन्या वगैरेंस दिलेले पोलिसाबद्दल आलेली जमा	२६६
म्युनिसिपालिट्या, टौनफंड वगैरेंस दिलेले पोलिसाबद्दल आलेली जमा	८१३
इलाख्यांचे शहरांतील पोलिसाबद्दल	२८४
गांवचे पोलिसाबद्दल	१९७
फी, दंड वगैरे	११२१
पेनशनफंडाबद्दल	७१
इतर	२६३
एकूण जमा	३८१५
खर्च	
प्रेसिडेन्सी (इलाख्याचे शहरचें) पोलीस...	१३१८
डिस्ट्रिक्ट पोलिसावरील इलाख्यांतील देखरेख करणारे अंमलदार	७७६
डिस्ट्रिक्ट एक्झिक्युटिव (जिल्ह्यानिहाय कामगिरीवर असलेले) पोलीस	
डिस्त्रिक्ट सुपरिंटेंडेंट व त्यांचे असिस्टंट... ...	२४०३
इन्स्पेक्टर व कान्स्टेबल...	१६४२३

ऑफिस व इतर खर्च	३२२
पोलीस, दवाखाने वगैरे	८७
कपडे	१०१७
हत्यारें	२९७
किरकोळ	२४८५
रेलवे पोलीस	५२४
म्युनिसिपाल व क्यान्टोन्मेंट पोलीस	७०३
गांवपोलीस	३७८६
कस्टम व मीठ खात्यांतील पहारेकरी	५
स्पेशल पोलीस	७६७७
कोंडवाडे	६१५
स्टीम बायलरची तपासणी	४८
थगी व डॅकाइटी खातीं...	११३
किरकोळ	७
रकमा परत देणें...	८०
एकूण खर्च... ...	३८६८६
निवळ खर्च सन १८९१–९२	३४८७२
१८९२–९३	३४७८०
१८८९–८२	२३०५८
१८९४–९५ अंदाज	३६४४२

तुरुंग.

हिंदुस्थानांतील तुरुंगांचे तीन वर्ग आहेत. सेंट्रल (मध्यठिकाणीं असलेले), डिस्ट्रिक्ट (जिल्ह्याचे), व सब्सिडिअरी (मदततुरुंग). पहिले वर्गाचे तुरुंगांत एक वर्षाचे व वरील शिक्षेचे लोक, १५ दिवसांवरील शिक्षेचे दुसरे वर्गाचे तुरुंगांत व गुमानी कैदी व १५ दिवसांचे आंतील शिक्षेचे कैदी मदतीचे तुरुंगांत ठेवावे असा नियम आहे. डिस्ट्रिक्ट ह्मणजे जिल्ह्याचे तुरुंगावर सुपरिंटेंडन्ट साधारणतः वैद्यकी खात्यांतील सनदी नोकरांपैकीं असतात, व ते अंमलदार त्या हुद्यावर नसले तर, वैद्यकी खात्याचे अंमलदारांकडून कैदखान्यांची तपासणी

करण्यांत येते. तुरुंगांत चांगले वर्तणुकीचे कैद्यांस वार्डर नेमण्याची वहिवाट आहे. वेगळाले प्रांतांतील तुरुंगांत भिन्न भिन्न प्रकारची वहिवाट सुरू आहे ती मोडून सर्व तुरुंगांत एका नमुन्यावर वहिवाट करण्यासाठीं एक कायदा १८९४ सालीं झाला आहे.

हद्दपार करण्याचे शिक्षेचे कैदी अंदमान बेटांत पोर्ट ब्लेअर येथें पाठविण्यांत येतात. इतके लांब पाठविण्याचें कारण असें आहे कीं, गुन्हेगारांस गुन्हा केल्यास परदेशवास भोगावा लागेल ही भीति रहावी व गुन्ह्याचे ठिकाणापासून लांब नेऊन ठेऊन वर्तन सुधारण्यास त्यांस सवड द्यावी. या देशांत कैदेंत रहाण्यापेक्षां त्या ठिकाणीं कमी त्रास होतो अशी कैद्यांची सर्वसाधारण समजूत झालेली आहे असें सरकारास समजलें व असें होण्याचें कारण असें दिसून आलें कीं त्या ठिकाणीं कैद्यांस थोडी जमीन देऊन घर बांधण्यास परवानगी मिळते व मोठे सुखानें रहाण्यास सांपडतें, अशा बातम्या तेथें राहून आलेले कैद्यांकडून इकडे पसरलेल्या होत्या. या बाबतींत विशेष चौकशी करण्यासाठीं एक अंमलदार नेमण्यांत आला होता, त्यानें अशा सूचना केल्या आहेत कीं जन्मठेपेशिवाय इतर कैद्यांस तिकडे पाठवूं नये व तिकडे गेल्यावर पाहिल्यानें कैद्यांस थोडा सक्तीचा जाच असावा व कारागिरीचे वगैरे कामावर असलेले कैद्यांस बक्षिसें देण्यांत येत असतात तीं बंद व्हावीं. त्यांनीं आणखी असें कळविलें कीं थोडे मुदतीचे कैदी तिकडे गेल्यानें त्यांचे वर्तनांत विशेषसा फरक होत नाहीं, परंतु ते तिकडील स्थितीचा चांगलेपणा मात्र इकडे वर्णन करीत फिरतात; बक्षिस दिल्यानें त्या लोकांस स्वतंत्रपणें रहाण्यास परवानगी मिळाल्यावर जरूरीपुरते पैसे मिळतात इतकेंच नाहीं, तर आपले घरीं पाठविण्यासही पैसे उरतात व त्यामुळें तिकडील स्थितीचे संबंधानें इकडे गैरसमज मात्र होतो. ह्या हरकती दूर होण्यासाठीं त्यांनीं वर लिहिलेले उपाय सुचविले. अंदमान बेटांत सन १८९२ सालीं ११३५६ कैदी होते त्यांपैकीं शेंकडा ७१ जन्मठेपेचे होते. नेहमीं गुन्हे करणारे लोकांस वेगळे बेटांत ठेवण्यांत आलें होतें. या सर्व कैद्यांत पोट भरून स्वतंत्र रहाणारे इसम २९२५ होते. सन १८८१-८२, १८९१-९२ व १८९२-९३ सालांत हिंदुस्थानांत तुरुंग किती होते, व त्यांत कैदी किती असत, त्यांस खर्च किती लागे, याबद्दल तपशील खालीं दिला आहे. कैद्यांची संख्या पूर्वीपेक्षां आतां वाढलेली आहे. त्यांत बायकांच्या संख्येची मात्र वाढ झालेली नाहीं. कैद्यांचें मृत्यूचें प्रमाण सन १८८१ पेक्षां अलीकडे पुष्कळ कमी होत गेलें आहे, व हें कैद्यांचें मरणाचें प्रमाण देशांत मृत्यूचें प्रमाण जें पडतें, त्यापेक्षां पुष्कळ कमी आहे. याचें कारण असें आहे कीं, तुरुंगांत औषधाची व शुश्रूषेची व्यवस्था

फार चांगली असते. पूर्वी कैद भोगलेले लोक फिरून तुरुंगांत येण्याचें प्रमाण सन १८८१ सालीं शेंकडा १७ होतें, तें सन १८८४ सालीं १२ वर आलें. तसेंच प्रमाण अजूनही आहे. कैदी कामावर लावण्यासंबंधानें पहातां असें दिसतें कीं, सन १८९१-९२ सालीं शेंकडा अडतीस कैदी कारखान्यांत कामावर लावलेले होते. बाकीचे कैदी तुरुंगांतच किंवा बागेचे कामावर लावण्यांत आले होते. जे जिन्नस साधारण भोंवतालचे गांवांत होत नाहींत, अशा तऱ्हेचे जिनसांचे कारखाने तुरुंगांत असतात. कांहीं तुरुंगांत छापण्याचेंही काम शिकविण्यांत येतें. बरेच प्रांतांत कैद्यांचे पोटगीचा खर्च त्यांचे मजुरीचे किंमतींतून निघतो. वायव्य प्रांत व मद्रास या प्रांतांत कैद्यांचे मजुरीचे उत्पन्नाचें प्रमाण फार थोडें आहे.

तुरुंगांची व त्यांतलि कैदी लोकांची संख्या व तुरुंगांसंबंधीं व कैद्यांचे पोटगीसंबंधीं खर्च यावद्दल माहितीचें कोष्टक (स्टाटिस्टिकल् आब्स्ट्राक्टावरून).

	१८८१-८२	१८९१-९२	१८९२-९३
तुरुंगांची संख्या सेंट्रल............	३४	३६	३६
जिल्ह्याचे तुरुंग	२०६	१८२	१८१
मदततुरुंग	२३८	५२७	५२४
दररोज तुरुंगांत कैदी असत त्यांची सरासरीची संख्या	९१६१५	९३३५७	९६६६१
तुरुंगांतील कैद्यांचे पोटगीचा व देखरेखीचा खर्च रु.............	४८१९८२१०	५३९३९२१०	५७६३०५८०
दरकैद्यास खर्च किती येतो ...रु....	५२-९-९	५८-११-०	६०-८-०
,, पैकीं खाण्याचाच खर्च ,,	२७-७-०	२४-१२-०	२७-०-०
दररोज असलेले कैद्यांत सरासरी दरहजारीं मृत्यूचें प्रमाण	४२	३०	३६
कैद्यांपैकीं पूर्वी शिक्षा झालेले किती होते........... ... ...पुरुष...	१७-९	१२·६	...
स्त्रिया...	९·१	६·३	...

रेफॉर्मेटरीची (सन्मार्गप्रवर्तकस्थानांची) पद्धत या देशांत चांगलीशी प्रचारांत आलेली नाहीं, तरी या शाळा वाढत जात आहेत. बंगाल्यांत दोन, मुंबईस एक, व वायव्य प्रांतांत एक अशा चार शाळा आहेत, व त्यांत अनुक्रमें ४९८,१०५ व १२८ अशीं शिक्षा झालेलीं मुलें होतीं.

सन १८९११९२ सालाच्या जमाखर्चाच्या बाबी खालीं देण्यांत येत आहेत.

सदरें	रक्कम–हजाराचे आंकडे
जमा	
तुरुंगांत तयार झालेले मालाचे विक्रीचें उत्पन्न... ...	२३४७
थग लोकांसाठीं घातलेल्या उद्योगशाळेचें उत्पन्न... ...	१०५
कैदीमजुरी	३२३
इतर जमा...	५९
अंदमान येथील कैद्यांपासून उत्पन्न	२७८
एकूण जमा	३११२
खर्च	
देखरेख–सर्व साधारण	२३८
इलाख्याचे शहरांतील तुरुंग	२४५
सेंट्रल (मध्यतुरुंग)	२१८०
जिल्ह्यांतील	२६४०
सब्सिडियरी (मदत) तुरुंग	४२०
उद्योगशाळा	१११
कैदखान्यांतील कारखाने...	१८२३
इतर	१९४
एकूण खर्च	७८५१
अंदमान व स्ट्रेट्‌स्‌सेटलमेंट येथील हद्दपार कैद्यांचीं ठिकाणें	११४६
एकूण खर्च १८९११९२	८९९७
निवळ खर्च १८९११९२	५८८५
१८९२।९३	६०८८
१८८२।८३	४७२५
१८९४।९५ अंदाज	६३६०

भाग सातवा.

नोंदणीचें खातें (रेजिस्ट्रेशन)

या देशांत दस्तऐवज नोंदण्याचें, सन १७९९ सालीं मुंबईसरकारानें त्या बाबतींत पहिल्यानें कायदा केला तेव्हांपासून सुरू झालें. दस्तऐवज नोंदल्यापासून मिळकतीचे हक्कसंबंध दृढ होतात, व मूळचे दस्तऐवज गाहाळ झाले तरी त्या दस्तऐवजाचा पुरावा होण्यास सवड होते, हे व दुसरे नोंदणीचे फायदे आतां सर्वांचे अनुभवास आले आहेत, तेव्हां त्याबद्दल येथें विशेष कांहीं लिहिणें नको.

मुंबई इलाख्यांत सन १८२७ सालीं नोंदण्याचे बाबतींत विशेष तपशिलवार कायदा करण्यांत आला होता; परंतु हिंदुस्थानचे इतर भागांत सन १८६४ सालापर्यंत या बाबतींत कांहीं तजवीज झालेली नव्हती. त्या सालीं गव्हरनर-जनरलांचा पहिला कायदा झाला. त्यानंतर सन १८६५।६६।६८।७१ व अखेरीस १८७७ सालीं कायदे झाले. अखेरचा कायदा अजून अमलांत आहे. या कायद्याप्रमाणें दस्तऐवजांचे दोन वर्ग, ह्मणजे अवश्य नोंदण्याचे, व ज्यांचें नोंदणें खुषीवर आहे, असे आहेत. पहिले वर्गांत स्थावरसंबंधानें १०० रुपयांवरील किमतीचे दस्तऐवज व लांब मुदतीचे भाडेपट्टे हे दस्तऐवज येतात. यांशिवाय बाकीचे दस्तऐवज व मृत्युपत्रें व दत्तक घेण्यास अधिकारपत्रें हे व असे कागद दुसरे वर्गांत येतात.

सन १८८२ च्या चवथ्या कायद्यावरून १०० रुपयांचे व वरील स्थावराचे सर्व प्रकारचे व्यवहारांबद्दल दस्तऐवज झालेच पाहिजेत असें ठरविलें आहे; व हा कायदा हिंदुस्थानांतील बहुतेक भागांस लागू झाला असल्यामुळें अवश्य रजिस्टर होणारे दस्तऐवजांचें मान जास्त वाढत चाललें आहे.

या खात्याचा मुख्य प्रत्येक प्रांतांत एक इन्स्पेक्टर जनरल असतो. दस्तऐवज नोंदण्याचें काम सबरजिस्टर हे करतात, साधारण दरतालुक्यास एक सबरजिस्टर असतो. मोठाले ठिकाणीं स्पेशल (विशेष) सबरजिस्टर नेमलेले असतात. जिल्ह्याचा मुख्य अधिकारी कलेक्टर हा जिल्ह्याचा रजिस्टर असतो. तो सबरजिस्टरांचे कामावर देखरेख करणें, अपिलें ऐकणें वगैरे कामें करतो. मुंबई इलाख्याचे कांहीं भागांत शेतकऱ्यांचा कायदा चालू आहे त्या ठिकाणीं गांवरजिस्टर नेमले आहेत. कंपन्या रजिस्टर करण्याचें कामही याच खात्याकडून होतें.

मुंबई इलाख्यांतील नगर, सोलापूर, पुणें व सातारा या चार जिल्ह्यांत सन १८७९ सालापासून शेतकरी कायदा लागू झाला. या चार जिल्ह्यांत शेतकऱ्यांच्या संबंधाचे सर्व दस्तऐवज रजिष्टर करावे लागतात. सन १८७७ चे कायद्याप्रमाणें जे दस्तऐवज रजिष्टर करणें जरूर आहेत ते सबरजिष्टरांकडे रजिष्टर करण्यांत येतात, व बाकीचे गांवरजिष्टरांकडे रजिष्टर होतात. सन १८९१-९२ सालीं या कायद्याप्रमाणें १२७५६० दस्तऐवज रजिष्टर झाले; त्यापासून उत्पन्न रु. ४७३४० झालें व खर्च ५९१५० रुपये झाला.

पुढें पत्रक दिलें आहे त्यावरून रजिष्टर झालेल्या दस्तऐवजांची संख्या, त्यांपासून आलेलें उत्पन्न, व खर्च, व रजिष्टर झालेल्या दस्तऐवजांची किंमत, हीं दिसून येतील. हें पत्रक सन १८८१-८२, १८९१-९२ व १८९२-९३ सालांबद्दल आहे.

	१८८१।८२	१८९१।९२	१८८२।९३
१ नोंदणीच्या कचेऱ्या	१६०७	१८६३	१८८९
	(हजाराचे आंकडे आहेत)		
२ नोंदलेले कागदांची संख्या	१३५५	२३६९	२५९६
तपशील			
अवश्य नोंदण्याचे	७५६	१५६९	१७२९
खुषी असल्यास नोंदण्याचे	३९२	५२२	५८२
इतर नोंदलेले कागद	२०५	२७७	२८४
	(हजार रुपयांचे आंकडे आहेत.)		
३ नोंदलेले दस्तऐवजांत असलेले मालाची किंमत हजार रुपये	४२८३६९	५८१८९६	६३५२२५
तपशील स्थावराचे दस्तऐवज	३७८६९८	५२९६९५	५७७०५०
जंगमाचे	४९६७१	५२२०१	५८१७५
४ नोंदणी खात्याची जमा	२४१२	३९९०	४२९३
खर्च	१५७०	२२३१	२३०१

ही माहिती स्टॅटिस्टिकल आब्स्ट्राक्टावरून घेतली आहे.

भाग आठवा.

लष्कर व आरमार.

या भागांत हिंदुस्थानांतील लष्कर व आरमार यांची हल्लींची स्थिति कशी आहे हें सांगण्याचें आहे; व विषयप्रवेशासाठीं प्राचीन स्थितीची थोड-क्यांत माहिती देण्यांत येत आहे. सन १६८१ सालीं इंग्रजांची बंगाल्यांत काय ती फौज २० शिपायांची होती; त्याच सुमारास मद्रासेकडे एत्तद्देशीय शिपाई नोकरीस ठेवण्यास सुरवात झाली होती. सैन्याची वाढ होत होत सन १८८१–८२ सालीं संख्या ६०००० युरोपिअन व ११०००० एत्तद्देशीय शिपाई अशी झाली होती. सन १८९१–९२ अखेर युरोपिअन फौज ७३००० व नेटिव फौज १४७५०० होती. हल्लींची लष्कराची पद्धत सन १८५९ साला-नंतर चालू झालेली आहे. सन १८५६ सालीं युरोपिअन फौज ३८००० व नेटिव फौज ३४८००० होती, व त्याशिवाय संस्थानिकांचे खर्चानें ठे-वलेली तैनाती फौज होती. युरोपिअन सैन्यापैकीं दहा हजार पायदळ हें कंपनी-चे अंमलदार विलायतेंत तयार करून पाठवीत व बाकीचें सैन्य विलायतेंतील सैन्यापैकीं हिंदुस्थानांत नौकरीसाठीं दिलेलें असे. बंगाल, मद्रास व मुंबई या प्रांतांतील सैन्यावर त्या त्या प्रांतांतील सेनाधिपतीचा अधिकार असे, परंतु विलायतसरकाराकडून आलेले सर्व सैन्यावर, तें नौकरीस कोणतेही प्रांतांत असलें तरी, बंगालचा सेनापती,ज्यास हिंदुस्थानचा मुख्य सेनापती असें नांव असे त्याचा अधिकार असे. बंगालचें सर्व नेटिव सैन्य व मुंबईपैकीं कांहीं पलटणें हीं बंडांत सामिल झालीं होतीं; तेव्हां पुढें सैन्याची भरती कसे प्रकारें करावी व त्यांत युरोपिअन शिपायांची संख्या किती असावी, याबद्दल विचार करण्या-करितां एक कमिशन नेमण्यांत आलें होतें; व त्या कमिशनानें सुचविलेले नि-यमाप्रमाणें हल्लींपर्यंत सैन्याची व्यवस्था आहे; फक्त किरकोळ बाबतींत फरक झाला आहे. त्या कमिशनाच्या सूचनांपैकीं महत्वाच्या सूचना अशा होत्या कीं तोफखान्यावर सर्व युरोपिअन शिपाई असावेत; सर्व किल्ले युरोपिअन सै-न्याचे हातीं असावेत, व युरोपिअन व नेटिव शिपायांचें प्रमाण बंगालचे सैन्यां-त एक युरोपिअन शिपायास दोन नेटिव शिपाई व इतर इलाख्यांत एकास तीन पेक्षां जास्त असूं नये; हिंदुस्थानासाठीं युरोपिअन सैन्य वेगळें ठेवण्यांत न येतां विलायतेंतील सैन्यापैकींच कांहीं भाग या देशांत नौकरीसाठीं आणीत

जावा. या सूचना अमलांत आल्या व त्याप्रमाणें सैन्य तयार करण्यांत आलें तेव्हां त्यांत युरोपिअन सैन्य ६२००० व नेटिव १३५००० असें झालें. पुढें सन १८७९ सालांत लष्कराचें युद्धसामर्थ्य कमी न होतां संख्या किती कमी करितां येईल याबद्दल विचार करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें होतें. त्याचे सूचनेप्रमाणें बंगाल व मद्रास येथील सैन्यांचे मुख्य सेनापतींच्या जागा कमी करून सर्व सैन्य हिंदुस्थानचे मुख्य सेनापतीचे ताब्यांत असावें असें नुकतेंच ठरलें आहे; व त्याबद्दलचा कायदा सन १८९३ सालीं पार्लमेंट सभेंत पास झाला आहे. तो ठराव अमलांत आणण्याची तयारी चालू आहे. त्या कायद्यांतील मुख्य मुद्याच्या गोष्टी अशा आहेत कीं, प्रांतिक कमांडर-इन्चीफच्या जागा कमी व्हाव्या, व त्यांचे अधिकार गव्हरनर जनरल यांचे पसंतीनें कमांडर-इन्चीफ हे अंमलदार नेमतील त्यांचेकडे असावे;हिंदुस्थानचे कमांडर-इन्चीफचा अधिकार सर्व हिंदुस्थानभर चालावा, मुंबई व मद्रास येथील गव्हरनरांस सेनेसंबंधाचा अधिकार राहण्याचा नाहीं, तो सर्व गव्हरनर जनरल व कौन्सिल यांणीं चालवावा, व प्रांतांतील सैन्यावरील मुख्य अमलदार प्रांतिक कौन्सिलाचे सभासद असण्याचे नाहींत वगैरे. त्या कमिशनानें सुचविल्याप्रमाणें सैन्यांतील कांहीं लोक त्या वेळीं कमी करण्यांत आले होते, परंतु पुढें लागलीच सन १८८५ त लढाईची गडबड दिसूं लागल्यामुळें व हिंदुस्थानचे बंदोबस्ताचे संबंधानें नवीन व्यवस्था अमलांत आणण्याचें ठरल्यामुळें सैन्याची संख्या पुनः वाढविण्यांत आली. या वेळीं १०६६० युरोपिअन सैन्य, २१२०० नेटीव सैन्य असें ज्यास्त वाढविण्यांत आलें. सन १८९२-९३ अखेर सैन्यांत युरोपिअन सैन्य ७४०३१ व नेटिव सैन्य १४४७५५ असें होतें. या संख्येंत नेटिव्ह सैन्यावरील गोरे अंमलदार १६५६ यांचा समावेश झाला आहे.

चवथे वुइल्यमचे कायद्याप्रमाणें सैन्याचे मुख्य गव्हरनर जनरल व कौन्सिल हे आहेत. लष्कराचे व्यवस्थेचे संबंधानें अधिकारी हिंदुस्थानचे कमांडर-इन्चीफ हे आहेत. आजपर्यंत मुंबई व मद्रास इलाख्यांचीं सैन्यें वेगळीं होतीं व हिंदुस्थानचे कमांडर-इन्चीफ यांचा प्रत्यक्ष अधिकार बंगाल व उत्तरहिंदुस्थान येथील सैन्यावर होता. आतां मुंबई व मद्रास येथील सैन्यें तेथील कमांडर इन्चीफ यांच्या जागा कमी झाल्यावर, हिंदुस्थानचे कमांडर-इन्चीफ यांचेच अमलाखालीं राहतील. सर्व सैन्याचे चार विभाग करण्यांत येण्याचे आहेत व प्रत्येक विभागावर एकेक मेजर जनरल राहतील. पंजाबचे जनरलाचे ताब्यांत पंजाबचें सैन्य व सरहद्दीवरील सैन्य राहील; बंगाल प्रांतांतील जनरलाचे ताब्यांत बंगाल, आसाम व वायव्य व अयोध्या

प्रांतांतील सैन्य; व मद्रासचे जनरलाचे ताब्यांत त्या इलाख्यांतील व ब्रह्मदेशांतील सैन्य व मुंबईच्या जनरलाचे ताब्यांत मुंबई, बलुचिस्थान, सेंट्रलइंडिया व राजपुतान्याचे भागांतलि अशीं सैन्यें राहतील. कमांडर-इन्चीफ यांचेकडे कोणतेही प्रांताचे सैन्याचें काम न राहतां त्यांची सर्व सैन्यांवर देखरेख राहील. वर सांगितलेले सरकारी सैन्याशिवाय हैदराबादची तैनाती फौज, मध्य हिंदुस्थानांतील रिसाला, खैबर रायफल्स व आतां नवीन तयार होत असलेली इंपीरिअल् सर्व्हिस ट्रूप्स (बादशाही नोकरीची फौज) हीं सैन्यें आहेत. या चार सैन्यांची व्यवस्था हिंदुस्थानसरकारचे परराज्यसंबंधी खात्यांतून होते.

लष्करी खात्याचे संबंधाचीं खातीं ह्मणजे सामान पैदा करणारें खातें (कमिसारियट खातें), वैद्यकी खातें, पशुवैद्यकी खातें, दारूगोळा करणारें खातें वगैरे आहेत; परंतु यावद्दलची हकीकत विस्तारभयास्तव गाळणें भाग आहे. अलीकडे सैन्याचे संबंधाचें इमारतखातेंही वेगळें करण्यांत आलें आहे. सन १८५८ पासून बराकी, इस्पितळें व शिपायांचे सोईचे इतर कामांवर ३५ कोटि रुपये खर्च झाला आहे.

सैन्य वाढवून व इतर तजविजी करून, जमिनीवरून परशत्रूपासून रक्षणाची तजवीज करण्यांत आली आहे, तशीच समुद्रावरील शत्रूपासून रक्षण करण्याचे संबंधानेंही सन १८८५ सालानंतर चांगली तजवीज करण्यांत आली आहे. या विशेष बंदोबस्ताचे कामांवर सन १८९१-९२ सालीं रुपये ६०४८४८० खर्च झाला; व सन १८८५-८६ पासून एकंदर खर्च सुमारें साडेतीन कोटी रुपये झाला आहे.

तीन इलाख्यांत असलेलीं वेगळालीं स्टाफकोरें मोडून सर्व हिंदुस्थानची स्टाफकोरची पलटण एकच केली आहे. एतद्देशीय लष्कर सुधारण्याचे संबंधानेंही अलीकडे फार विचार करण्यांत आला आहे. एतद्देशीय लोकांचे सैन्याची कामगिरी अलीकडे थोड्या वर्षांपर्यंत देशांतले देशांतच होत होती, व त्या कामास योग्य असे लोक सैन्यांत भरण्यांत येत असत; अलीकडे त्यांचे समर विजयाचें स्थान पालटून तें या देशाचे हद्दीचे बाहेर गेलें आहे. यापुढें युद्धप्रसंग येण्याचे ते वायव्येकडील सरहद्दीवरच येणार, व आतां त्याच दिशेकडे बंदोबस्ताची तजवीज चालली आहे. दाक्षिणी किंवा मद्रासी किंवा मुसलमान लोक यांणीं सैन्याबरोबर हिंदुस्थानाबाहेरील देशांत जरी आजपर्यंत काम-

गिरी बजाविलेली आहे तरी त्या देशांतील हवापाणी पठाण, रजपूत, गुरखे, व बलूची वगैरे लोकांस जास्त चांगलें मानवतें; तेव्हां आतां लष्करांत लोक ठेवणें ते उत्तराहिंदुस्थान किंवा नेपाळचे खोऱ्यांतून भरावे असें ठरविण्यांत आलें आहे. आणखीही पूर्वीचेपेक्षां लष्कर भरण्याचे बाबतींत एक साधारण फरक झाला आहे तो असा कीं, सन १८५९ सालापासून पलटणींत सर्व जातींचे लोक एके ठिकाणीं ठेवण्याची वहिवाट होती, (ती डोंगरी लोकांचें सैन्य भरलें त्या वेळीं त्यांस मात्र लागू करण्यांत आली नव्हती ; त्या लोकांची पलटण वेगळींच ठेवण्यांत आली होती,) आतां जातवार वेगळाल्या पलटणी तयार करण्याचें ठरलें आहे, व बंगाल व मुंबई येथें वेगळाल्या जातींचीं वेगळालीं पलटणें भरण्याचें कामही सुरू झालें आहे. तसेंच लांब मुदतीच्या रजा देऊन लोक शिलकी ठेवण्याचीही पद्धति अमलांत आणण्यांत येत आहे.

आतां महत्वाचे गोष्टींपैकीं व्हालंटियर लोकांचे पलटणीसंबंधानें सांगण्याचें राहिलें आहे. खासगी लोकांस लष्करी शिक्षण देऊन त्यांस तयार करण्याची वहिवाट सन १८६० सालीं सुरू झाली. सन १८९१–९२ सालीं या व्हालंटियर सैन्यांत लोक २७००० होते व त्यांत २३००० कामत तयार होते. कलकत्ता येथील व्हालंटियर पलटणानें माणिपूरचे लढाईंत कामागिरी केली आहे.

एकंदर सैन्याची संख्या ठोक आंकड्यानें वर सांगितलीच आहे. आतां सन १८९२–९३ सालीं कोणते प्रकारची किती होती याबद्दल माहितीचीं मुख्य सदरें सांगण्यांत येत आहेत. युरोपिअन सैन्य—तोफखान्यांत १३३१२ व रिसाल्यांत ५६७९ व पायदळ ५३७१३ असें आहे. एतद्देशीय फौज–तोफखान्यांत ३८११, सापर्स व मायनर्सांत ३८२५, रिसाल्यांत २३४२७ व पायदळांत ११३६९२ अशी आहे, व यांशिवाय इरेग्युलर्स १४००० आहेत.

पुढील पत्रकावरून या सैन्याबद्दल किती खर्च येतो तें दिसन येईल.

खर्चाच्या बाबी.	सन १८८१-८२ तील खर्च.	सन १८९१-९२ तील खर्च.	सन १८९४-९५ तील अं. खर्च.
हिंदुस्थानांत खर्च.	हजार रुपयाचे	आकडे	आहेत.
इफेक्टिव सर्व्हिसिस-कामगिरी-वर असलेलें रोजीमेंटपगार व भत्ता वगैरे	६४७०१	७०८१४	७८६४५
कमिसारियट खातें-सामान पुरवठा करणारें खातें	७८८३१	३६८१०	३५८५०
आर्डनन्स--युद्धाचें सामानखातें	५७६९	७२४३	९१२२
इतर खातीं	२२२५५	३३१३४	**३३८६२
बेरीज हिंदुस्थानांतील इफेक्टिव्ह	१२४५१५	१४८००२	१५७४७९
नान-इफेक्टिव्ह	७३३४	९४०७	९२३२
अफगाणिस्थानांतील लढाई	१६३१९		
तसलमात खर्च	३३८		
बेरीज हिंदुस्थानांतील खर्चाची	१४८५०६	*१५७४१०	१६६७२१
इंग्लंदांत होत असलेला खर्च			
इफेक्टिव्ह	१४३५९	१८६६५	३०५९२
नान-इफेक्टिव्ह	२६९२३	३०८२३	४०२९४
स्टोर-सामानसंबंधीं			बजेटांत तपशील नाहीं स्टोरचा खर्च वरचेच रकमांत आला आहे असें दिसतें.
हिंदुस्थानासाठीं	६९३८	१५९०६	
अफगाणिस्थानासाठीं	६		
अफगाणिस्थानांतील लढाई ...	१५०		
स्पेशल डिफेन्सचीं कामें... ...		३००१	
बेरीज इंग्लंडांत होत असलेले खर्चाची...	४८३७८	६८३९६	७०८८६
एकंदर खर्चाची बेरीज	१९६८८५१०	२२५८०७	२३७५९७

** सन १८९४-९५ चे बजेटांत इतर खात्यांचे खर्चाचे आंकड्यांत इंग्लंड व हिंदुस्थान अशी फोड नाहीं; तो खर्च येथें सर्व हिंदुस्थानाचे सदरांत दाखल आहे.

* या सालीं सदरचे खर्चाशिवाय स्पेशल डिफेन्सचे कामावर हिंदुस्थानांत रु. ३०४७१०० खर्च झाला होता.

टीप-(१) इफेक्टिव्ह खर्चांत सैन्याचे नौकरीचा पगार, भत्ता, रजेचा पगार शिक्षणाचा खर्च, सामानाचा खर्च, कपड्यालत्त्याचा खर्च, वाटखर्च वगैरे येतात
(२) नान-इफेक्टिव्ह खर्चांत बक्षिसें, पेनशनें, नेमणुका वगैरे येतात.

आरमार.

प्राचीन काळीं ईस्ट इंडिया कंपनी ही हिंदिमहासागरांत आरमार ठेवीत असे. तें हिंदुस्थानच्या किनाऱ्याचा बंदोबस्त ठेवी व त्यानें युरोपिअन राष्ट्रांचे आरमाराशींही पुष्कळ वेळ टक्कर मारली होती, व चीन व इराण या देशांविरुद्ध झालेले लढाईचे वेळीं तें कामगिरीवर होतें. हें आरमार सन १८६३ सालीं विलायतचे सरकारी आरमारांत सामील करण्यांत आलें व पुढें हिंदुस्थानचे परशत्रूपासून संरक्षणाचें काम विलायतचे आरमारानें करावें असें ठरलें, व या आरमाराकडून न होण्यासारखे कामांसाठीं, उदाहरणार्थ लष्कर व सामान व पुरवठा नेणें, बंदरचा बंदोबस्त राखणें, व चांचेपणा व गुलामांचा व्यापार बंद करणें वगैरे कामांसाठीं, हिंदुस्थानसरकारांनीं मुंबईचे व मद्रासचे स्थानिक सरकारचे हाताखालीं जरूर तितके लोक ठेवावे असें ठरलें. हिंदुस्थानाकडून विलायतसरकारास सहा लाढाऊ गलबतें नौकरीस देण्याबद्दल सत्तर हजार पौंड देण्यांत येत असत, व वीस हजार पौंड सर्व्हेखातें ठेवण्यासाठीं देण्यांत येत असत. दोघां स्थानिक सरकारांकडे ठेविलेलें आरमार एक होऊन तें हिंदुस्थानसरकारांनीं आपले हातीं घेतलें. यांत अंमलदारांच्या नेमणुका स्टेटसेक्रेटरी करीत, व इंजनियर वगैरेच्या नेमणुका हिंदुस्थानसरकार करीत असत. त्यानंतर या लोकांचे पगार व हुद्दे विलायतचे आरमाराप्रमाणें करण्यांत आले, व त्यांची पायरी विलायतचे आरमाराचे खालची असें ठरविण्यांत आलें. अंमलदारांच्या नेमणुका करण्याचा अधिकार व्हाइसरायसाहेबांस देण्यांत आला. हिंदुस्थानचे आरमाराचा डायरेक्टर मुंबई येथें असतो, व त्याचा डेपुटी कलकत्ता येथें असतो.

वायव्येकडील बंदोबस्ताची जशी नवीन पद्धत ठरविण्यांत आली, तशीच बंदरें व किनारे यांचे बंदोबस्ताचे संबंधानेंही व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याप्रमाणें सात टारपेडो बोटी, दोन टरेट गलबतें, दोन तोफांच्या बोटी ठेवण्यांत आल्या आहेत, व त्यांवर तोफांचा पुरवठाही करण्यांत आला आहे; ह्यांचेवर अंमल हिंदुस्थानासाठीं देण्यांत आलेले आरमारावर मुख्य असतो

त्याचेकडे असतो. याशिवाय साधारण प्रसंगीं तोफा वागविण्यास उपयोगी पडतील अशा लहान आगबोटी २० ठेवण्याच्या आहेत. त्यांपैकीं कांहीं तयार झाल्या आहेत व कांहीं होत आहेत. समुद्राची सर्व्हे (पहाणी) करण्याचें कामही चालू आहे.

या खात्याचे जमाखर्चाची माहिती खालीं दिली आहे.

		१८९१।९२	१८९४।९५ अंदाज
जमा रुपये		२२२४१४०	१३८२०००
खर्च	हिंदुस्थानांत	४३६५५३०	३८२४०००
	विलायतेंत पौंड	१३३४४७८	१८४१०००
हुंडणावळ रु.		५७९५१०	१३१५०००
		६२[illegible]९५१०	६९८००००

लोकमतः—आतां लष्करी खात्यासंबंधानें लोकांच्या तकरारी आहेत त्या सांगण्याच्या आहेत.

वाद दोन मुद्यांवर आहेतः (१) सैन्याची संख्या जरूरीशिवाय ज्यास्त वाढविली आहे. (२) लष्करी खर्च विलायत व हिंदुस्थान या दोन्ही देशांत जास्त होतो.

सैन्याचे संख्येसंबंधानें असें ह्मणणें आहे कीं, सन १८८५ सालीं जें सैन्य वाढविण्यांत आलें, तें वाढविण्याची जरूर नव्हती. त्या वेळीं असलेलें सैन्य लढाईचा प्रसंग आला असतां, त्या कामास पुरून देशाचे बंदोबस्तास जरूर तितकें सैन्य शिलक राहण्यास पुरेसें होतें. लार्ड लिटनसाहेबांचे कारकीर्दींत लष्करासंबंधानें विचार करण्यासाठीं कमिशन नेमलें होतें, त्या कमिशनानें असा अभिप्राय दिला आहे कीं, पर शत्रूपासून देशाचें संरक्षण करण्यास, देशांत स्वस्थता ठेवण्यास, व संस्थानिकांवर दाब राखण्यास असलेलें सैन्य पुरेसें आहे; अफगाणिस्थानचे अमिराबरोबर, किंवा रशियाबरोबर किंवा दोघांबरोबर मिळून लढाई करण्यास ६० हजार सैन्य लागेल व बाकी राहिलेलें सैन्य देशांत प्रसंग पडल्यास पुरेसें होईल, असा अभिप्राय दिला आहे. शिवाय या कमिशननें रिपोर्ट केल्यानंतर वायव्येकडील सरहद्दीवर आगगाड्या झाल्या आहेत, किल्ले वगैरे बंदोबस्ताचीं कामें झालीं आहेत, देशांत तारायंत्र व आगगाड्या यांचा सर्वत्र प्रसार झाला आहे, सैन्यास नवीन तऱ्हेचीं हत्यारें देण्यांत आलीं आहेत, यामुळें सैन्याचें सामर्थ्य वाढलें आहे व सर्व देशांतील एकंदर सैन्याचा वाटेल तिकडे पूर्वींपेक्षां जास्त उपयोग होऊं शकतो. कमिशननें जे

विचार व स्थिति मनांत आणून सैन्याची संख्या ठरविली, त्या वेळच्या व त्यानंतरच्या स्थितींत सैन्याची संख्या वाढविण्यासारखा कांहीं बदल झाला नाहीं. सैन्य जास्त वाढविलें त्या वेळीं सर काल्व्हिन् व सर इल्बर्ट यांनीं सैन्य वाढविण्याची जरूरी नाहीं व त्यामुळें खर्चाचा बोजा देशावर वाढेल, उगीच सैन्य वाढलें ह्मणजे निष्कारण देशाची हद्द वाढविण्याकडे प्रवृत्ति होईल, असा अभिप्राय दाखल केला होता.

दुसरा विषय ह्मणजे लष्करी खर्चांतील वाढ हा आहे. यांत दोन भाग आहेत. एक लष्करासंबंधानें विलायतेस असलेला खर्च व दुसरा हिंदुस्थानांत होत असलेला खर्च. दोन्ही तऱ्हेचा खर्च कसा वाढत गेला आहे तें समजण्यासाठीं सन १८४१ पासून दहा दहा वर्षांचे अंतराचे आंकडे देतों:—

	कोटि	लक्ष रुपये	पैकीं विलायतेस कोटि	पैकीं विलायतेस लक्ष
सन १८४१।४२	९	८९		
१८५१।५२	१०	८१		
१८५८।५९	२५	१६		
१८६१।६२	१६	१९	२	२६
१८७१।७२	१५	६८	३	६४
१८८१।८२	१९	६९	४	८३
१८८४।८५	१७	६	४	९४
१८८५।८६	२०	९	४	८५
१८९१।९२	२२	१८	६	८३
१८९२।९३	२३	८७	८	३२
१८९४।९५ अंदाज	२३	७५	७	८

विलायतेस खर्च होत आहे त्यासंबंधानें असें ह्मणणें आहे कीं, सैन्याचे खर्चाबद्दल विलायतसरकारांनीं हिंदुस्थानचे वांट्याचा ऐवज ठरवितांना, वाजवी प्रकारानें खर्च द्यावा; हिंदुस्थानच्या वांट्यास यावा त्यापेक्षां जास्त घेतात; ह्या खर्च वाढण्यास सन १८५८ सालीं महाराणीसरकारांनीं हिंदुस्थानचें राज्य आपले हातीं घेतल्यावर सुरवात झाली; त्या वेळीं या देशांतील सैन्य व विलायतेंतील सैन्य हीं एके ठिकाणीं करण्यांत आलीं व दोन्ही सैन्यें एक केल्यापा

सून या देशाचा पैशासंबंधानें तोटा झाला आहे; तो असा कीं तेव्हांपासून सैन्याचे खर्चाबद्दल पैसा पूर्वी ज्या रीतीनें आकारण्यांत येत असे त्याहून दुसरे रीतीनें आकारण्यांत येऊं लागला व तो आकारतांना त्या खर्चापासून हिंदुस्थानचा फायदा आहे किंवा नाहीं व त्या खर्चांत हिंदुस्थानचा संबंध आहे किंवा नाहीं याचा विचार होईनासा झाला. विलायतेंतील सैन्यांत पगार व बढती यांसंबंधानें पूर्वी ज्या पद्धति होत्या त्या पुढें बदलण्यांत आल्या; त्या फरकांचा हिंदुस्थानाशीं कोणतेही प्रकारचा संबंध नाहीं, किंवा त्यापासून या देशास फायदाही कोणते प्रकारचा नाहीं, तरीही त्या सुधारणांमुळें जो जास्त खर्च लागूं लागला त्याचाही अंश हिंदुस्थावर घालण्यांत येतोच. दोन्ही सैन्यें एक करण्यांत आल्यावर खर्च कोणते आकारानें घेण्याचा त्याबद्दल पहिल्यानें ठराव सन १८६१ सालीं झाला, तेव्हां हिंदुस्थानांत नौकरीस असलेले प्रत्येक गोरे शिपायाबद्दल १० पौंड व नौकरीवर नसून पेनशनांत असलेले शिपायांबद्दल दरमाणशीं साडेतीन पौंड द्यावे असें ठरलें. त्याच वेळीं हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरींनीं तकरार केली होती. ह्या व्यवस्थेचा परिणाम असा झाला कीं, नौकरींतून गेलेले लोकांबद्दल खर्च (नान-इफेक्टिव्ह खर्च) पूर्वी ६० हजार पौंड होता, तो त्या सालीं २२५ हजार पौंडांवर आला. ही व्यवस्था सन १८७० सालापर्यंत चालली. पुढें या खर्चाबद्दल नवीन नियम झाले त्यांत हिंदुस्थानानें पेनशनाबद्दल रक्कम देण्याची तिची रास करण्यांत आली व त्या मानानें दरसाल देण्याची रक्कम ठरविण्यांत आली. ह्या व्यवस्थेनेंही खर्चाची पुष्कळ वाढ झाली. त्या वेळींही हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरींनीं तकरार केली, परंतु विलायतसरकारांनीं ती मनास आणली नाहीं. अजूनही हा अन्याय नाहींसा करण्यासाठीं कांहीं तजवीज करण्यांत आली नाहीं. नौकरीवर असलेले लोकांबद्दल जी रक्कम घेण्यांत येते तिचेबद्दलही अशीच तकरार आहे. ही रक्कम घेण्यांत येते ती शिपाई निवडून नेमणूक करणें व शिकवून तयार करणें यांबद्दल घेतात. या खर्चास इफेक्टिव्ह चार्ज असें ह्मणतात. सन १८६९ सालापर्यंत दरइसमास १० पौंड घेण्यांत येत असत; पुढें नक्की खर्च होईल तो द्यावा असें ठरलें. त्याप्रमाणें खर्च सालोसाल घेण्यांत येत आहे, परंतु वाजवीपेक्षां फाजील रक्कम घेण्यांत येते अशी तकरार आहे. याबद्दल हिंदुस्थानसरकारांनींही पुष्कळ वेळा तकरारी केल्या, परंतु सन १८७९ सालापर्यंत त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं; त्या सालीं विचार होऊन पूर्वीचे खर्चाचे बाबतींतील तकरारी विलायतसरकारांनीं कबूल केल्या व पुढें कसे प्रकारानें खर्च द्यावा याबद्दल विचार करण्यासाठीं एक कमिशन नेमलें, परंतु अखेरीस त्यांत त्या प्रश्नाचा विचार न होतां त्याचा अंत

झाला. खर्च हिंदुस्थानावर घालण्यांत पुष्कळ तऱ्हेनें अन्याय होतो; उदाहरणार्थ, शिपायास शिक्षण देण्यासंबंधानें खर्च फार घेण्यांत येतो. ईस्टइंडिया कंपनी पायदळ भरण्यासाठीं व तयार करण्यासाठीं माणशीं सुमारें २७ पौंड खर्च करीत असे; आतां पायदळाबद्दल माणशीं सुमारें ६४ पौंड व घोडेस्वाराबद्दल माणशीं सुमारें १३७ पौंड खर्च लागतो. या बाबतींतील खर्चही असे तऱ्हेनें आकरण्यांत येतो कीं, त्यांत इंग्लंडाच्या इतर वसाहतींसाठीं जे शिपाई तयार करण्यांत येतात, त्यांचेबद्दलही कांहीं खर्च या देशावरचे खर्चांत येतो; या देशाबाहेर ज्या लढाया करण्यांत येतात त्यांबद्दल खर्च पुष्कळ वेळा या देशावर बसतो, परंतु या देशाचे कामासाठीं विशेष मदत देण्यांत आली तर तो सर्व खर्च पैसान्‌पैसा वसूल करून घेण्यांत येतो. तसेंच हिंदुस्थानांत सैन्य आणण्यासाठीं व येथून परत नेण्यासाठीं आगबोटी बांधण्यांत आल्या आहेत, त्यांतून सैन्य नेण्याआणण्यांत येतें. या आगबोटींचा खर्च हिंदुस्थानावर घालण्यांत येतो. सुएझचा कालवा झाल्यानें जरी पूर्वीपेक्षां भाडें कमी झालें आहे तरी वेगळीं गलबतें ठेवल्यानें सैन्य नेण्याआणण्याचा खर्च पूर्वीपेक्षांही पुष्कळ जास्त लागतो. याप्रमाणें सैन्याबद्दल खर्च आकारण्याचे संबंधानें हिंदुस्थानचे स्टेटसक्रेटरी यांस विचारणा सुद्धां होत नाहीं; विलायतसरकारचें लष्करीखातें व फडणिशी खातें या दोन खात्यांत विचार होऊन रक्कम ठरते व ती हिंदुस्थानसरकारास द्यावी लागते अशी स्थिति आहे. सैन्यासंबंधानें खर्च आकारण्याचे दरांत फेरफार झाला पाहिजे ह्मणून लार्ड नार्थब्रुकसाहेबांनीं सुचविलें आहे. तो असा कीं, हल्लीं लोक तयार करण्याबद्दल जे माणशीं साडेसात पौंड घेण्यांत येतात ते पांच पौंड घ्यावे, नान–इफेक्टिव खर्चांत जी रक्कम सन १८७० पासून १८८४ पर्यंत वाढत गेली आहे तिचेपैकीं निम्मे विलायतसरकारांनीं द्यावे, कारण त्या वेळीं खर्चांत वाढ झाली ती विलायतेंतील सैन्यांतील वरिष्ठ दर्जाचे अंमलदारांचे हक्क खालचे दर्जाचे अंमलदारास विकत घेतां येत असत, ती वहिवाट बंद करण्यांत आल्यानें झाली होती.

हिंदुस्थानाकडून लष्कराबद्दल जसा सर्व खर्च विलायतसरकार घेतें तसा इतर बहुतेक वसाहतींकडून घेत नाहीं, त्यांस विलायतसरकार सैन्य फुकट देतें. तसेंच विलायतसरकार, विलायतेचे राजकारणांसाठीं लढाया करतें, त्यांत हिंदुस्थानचा संबंध नसतां, त्यांचा खर्च पुष्कळ प्रसंगीं या देशावर लादतें.

सर चार्लस डिल्के यांनीं ही स्थिति सुधारण्यास उपाय सुचविला आहे तो असा कीं, हिंदुस्थानसरकारास सैन्यांत जे युरोपिअन लोक लागतात ते आपले

आपण भरण्याची व तयार करण्याची परवानगी द्यावी, व हल्लीं सैन्यांतील लोक विलायती लष्करी खात्यांतीलच घ्यावे लागतात तशी जरूर ठेऊं नये. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, हल्लींचे पद्धतीप्रमाणें विलायतेंतील व हिंदुस्थानांतील सैन्यें एक ठेविलीं व हल्लींप्रमाणें हिंदुस्थानावर खर्चाचा बोजा ठेवला तर पुढें हिंदुस्थानावर मोठा कठीण प्रसंग येईल. हिंदुस्थानसरकारास आपले सैन्यांत युरोपिअन सैन्यभरती करण्यास परवानगी दिली ह्मणजे ते हल्लींचेपेक्षां कमी खर्चांत, विलायतेस किंवा क्यानडा देशांत लोकभरती करतील व त्यापासून जो नफा होईल त्यांतून त्यांस जरूरीप्रमाणें जास्त सैन्य ठेवण्यास सांपडेल.

सैन्यासंबंधानें हिंदुस्थानांत जो खर्च होतो त्यांत वाढ झाली आहे ती सैन्य वाढल्यामुळें व रशियाची या देशावर स्वारी होईल या भीतीनें वायव्यसरहद्दीवर जी तयारी ठेवण्यांत आली आहे त्यामुळें झाली आहे. याशिवाय त्या सरहद्दीचा इतर बाजूंचे सरहद्दींचा बंदोबस्त करण्यासाठीं ज्या लढाया कराव्या लागतात त्यांमुळेंही मधून मधून लष्करी खर्चांत वाढ होते. सैन्याची संख्या कशी वाढली आहे हें वर सांगितलेंच आहे. वायव्येकडील सरहद्दीवर रशियाचे स्वारीचे कारणानें जी तयारी ठेवण्यांत आली आहे, तिचा हिंदुस्थानाशीं जितका संबंध आहे तितकाच विलायतेचे हिताशींही आहे. मध्यहिंदुस्थानांत रशिया जीं कारस्थानें करीत आहे त्यांचा प्रत्यक्ष हिंदुस्थानाशीं कांहीं संबंध नाहीं, तो प्रश्न इंग्लंडचे राज्यकारस्थानाचे संबंधाचा आहे, तेव्हां रशियाचे वर्तनामुळें हिंदुस्थानांत जो जास्त खर्च ठेवण्यांत आला आहे तो न्यायानें ह्मणजे विलायतसरकारानें दिला पाहिजे.

याप्रमाणें हिंदुस्थानाचे लष्करी खर्चासंबंधानें जे वादविवाद झाले आहेत त्यांचा आशय आहे. त्या वादविवादांतील विचारांची सरणी दाखवावी एवढाच हा सारांश देण्याचा हेतु आहे; एरव्हीं त्याबद्दल साधारण सारांश देण्याचें मनांत आणलें तरी एक वेगळा ग्रंथच होईल.

भाग नववा.

फिनान्स–जमाखर्च.

१. या भागांत हिंदुस्थानसरकारचे जमाखर्चाबद्दल विवरण करण्याचें आहे. सन १८५९ सालापर्यंत जमेच्या मुख्य बाबी–जमीनबाब, मिठावरील कर व अफूचें उत्पन्न, ह्या होत्या; व जमीनबाबीचें उत्पन्न इतर सर्व बाबतींचे जमेपेक्षां जास्त होतें. या बाबींचे प्राप्तीची जी वाढ सालोसाल होत होती, त्यापासून चालू खर्चाची तजवीज लागत होती, परंतु बंडाचे सालीं ही स्थिति पालटली. लढाईचा व स्वस्थता करण्याचा खर्च फार झाला व तो तसाच पुढेंही चालू ठेवणें जरूर होतें. शिवाय अशा प्रसंगास उपयोगी पडण्यासाठीं पूर्वी पैशाच्या तजविजी करण्यांत आल्या नव्हत्या, त्यामुळें सरकारास पैशाचे संबंधानें फार पंचाईत पडली. त्या प्रसंगीं जमा वाढविणें हें अगत्याचें होतें, ह्मणून आयात व निर्गत मालावरील जकाती वाढवून–कांहीं प्रकारचे मालावर २० टक्के व कांहीं मालावर १० टक्के, (यांतच कापडाचा समावेश होत होता) अशा बसविण्यांत आल्या. कंपनीचा अंमल चालू असतांना जमाखर्चाची पद्धति विशेष व्यवस्थेशीर अशी नव्हती व बंडानंतर राज्यव्यवस्थेचा खर्चही फार वाढला, तेव्हां सर्व बाबतींची व्यवस्था लावण्यासाठीं विलायतसरकारांनीं आपले फडणविशी दप्तराचे चिटणीस विल्सनसाहेब यांस त्याच सुमारास हिंदुस्थानांत फडणिशीचे कामावर पाठविलें. या साहेबांनीं एकाच वर्षाचा जमाखर्चाचा अंदाज सादर केला व जमाखर्चाचे बाबतींत सुधारणा करण्यास सुरवात केली, तों त्यांचे नेमणुकीपासून एक वर्षांतच त्यांस मृत्यूनें गांठलें. या साहेबांचे कारकीर्दींत कस्टमची जकात कमी करण्यांत आली, व विलायतचे नमुन्यावर प्राप्तिवर कर बसविण्यांत आला, व स्टांपाचे कायद्यांत महत्वाचे फरक झाले; त्यांत पावत्यांस व हुंड्यांस तिकिटें लावण्याचें ठरलें. त्यांनीं सुरू केलेल्या पद्धति पुढें चालू राहून त्यांच्या पश्चात् चांगले स्थितींत आल्या आहेत.

सालोसाल करांचे दरांत कसा फेरफार होत गेला व नवीन कर कसे बसविण्यांत आले याची साद्यंत हकीकत देणें या पुस्तकाचे आकारमानानें शक्य नाहीं; साधारण सार्वत्रिक करासंबंधानें कांहीं ठोकळ गोष्टी थोडक्यांत देतों.

१८६०—६४ नवीन कर बसविण्यांत आले नाहींत. कस्टमची जकात व प्राप्तीवरील कर यांचे दर कमी करण्यांत आले.

१८६५ प्राप्तीवरील कराची पांच वर्षांची मुदत पुरी झाल्यावर तो पुनः बसविण्यांत आला नाहीं.

१८६७ लायसेन्सटॅक्स–परवान्याचा कर बसविला व कोर्टांतील स्टांपाचा दर वाढविण्यांत आला.

१८६८—६९ लायसेन्सटाक्ससंबंधानें धंदे व रोजगार यांजवर सरटिफिकेटटाक्स बसविण्यांत आला.

१८६९—७० लायसेन्सटाक्साच्या ऐवजीं शेंकडा एक टक्का, प्राप्तिवर कर बसविण्यांत आला व तो दुसरे साहामाहींत दोन टक्के करण्यांत आला.

मद्रास व मुंबई येथें मिठावर कर रु. १·८ होता तो रु. १·१३ करण्यांत आला.

१८७०—७१ प्राप्तीवरील कर ३$\frac{1}{8}$ टक्के ह्मणजे रुपयास साहा पै करण्यांत आला.

१८७१—७२ प्राप्तीवरील कर दररुपयास दोन पै करण्यांत आला, व कर देण्यास पात्रता आणणारी रकम रुपये ५०० होती ती ७५० केली.

१८७२—७३ प्रांतिक कर वसविले. प्राप्तिवरील कर देण्याचे पात्रतेची खालची मर्यादा हजार रुपयेपर्यंत वाढविली.

१८७३—७४ प्राप्तीवरील कर माफ झाला.

१८७५—७६ कस्टम जकातीची दुरुस्ती करून बहुतेक बाबतींत दर ७$\frac{1}{2}$ टक्के होता तो ५ टक्के केला व कांहीं बाबतींत तो वाढविला. मादक पदार्थांवरील कर रु. ३ होता तो रु. ४ केला.

१८७७—७८ माळव्याचे अफूवरील जकात पेटीस रुपये ६०० होती, ती रुपये ६५० केली.

१८७८—७९ नवीन लायसेन्सटाक्स व प्रांतिक कर बसले. मद्रास व मुंबई येथें मिठावरील दस्तुरी वाढली व बंगाल व वायव्य प्रांतांत ती कमी झाली. जाडे कापडावरील जकात कमी झाली.

१८७९—८० देशांतील कस्टमच्या जकाती बंद झाल्या व साखरेवरील वगैरे जकाती माफ झाल्या. कापडावरील जकाती आणखी कमी करण्यांत आल्या. माळव्यांतील अफूवरील जकात पेटीस रुपये ७०० केली.

१८८०—८१	लायसेन्सटाक्स करांत दुरुस्ती झाली व नीळ व लाख यांवरील जकाती माफ झाल्या.
१८८२—८३	पटवारी कर (वायव्यप्रांतांतील), व कापडावरील व आयात मालावरील, जकात माफ झाली. मिठावरील कर कमी करून दोन रुपये करण्यांत आला. माळवी अफूचे पेटीच्या पासाची दस्तुरी रु. ६५० करण्यांत आली.
१८८६–८७	लायसेन्स टाक्स बंद करून प्राप्तीवरील कर बसाविण्यांत आला.
१८८८–८९	पेट्रोलियमवर (ज्वालाग्राही तेलावर) दस्तुरी बसली. मिठावरील दस्तुरी रु० २–८ मणीं झाली.
१८८९–९०	वायव्य प्रांतांत पटवारी कर फिरून बसविला.
१८९०–९१	परकीय दारूवर व देशांतील बीर दारूवर जास्त कर बसला व माळवी अफूचे पेटीस दस्तुरी रु० ६०० झाली.
१८९३–९४	आयात व निर्गत मालावर–कापडा शिवाय–जकात बसविण्यांत आली.
१८९४	परदेशी कपड्यावर जकात व देशी कपड्यावर कर बसला. माळवी अफूचे पेटीवरील जकात आणखी ५० रुपये वाढली.

येथपर्यंत कराचे बाबतींत ज वेळोवेळीं कायदे झाले त्यांबद्दल साधारण माहिती सांगितली. आतां जमेच्या व खर्चाच्या बाबती कोणत्या तें सांगून, त्यांबद्दल साधारण विवरण करण्याचें आहे. सन १८८१–८२, १८९१–९२, १८९४–९५ सालांबद्दल जमाखर्चाचें पत्रक पुढें दिलें आहे. या पत्रकांत दोन भाग केलेले आहेत, पहिल्या भागांत जमेचीं सदरें व त्या बावतीसंबंधानें होत असलेला खर्च हीं दाखविलीं आहेत. दुसरे भागांत कर्ज व नफा होणारे सार्वजनीक कामावर खर्च झालेला पैसा व त्यापासून आलेलें उत्पन्न हीं दाखविलीं आहेत. हिंदुस्थानाचे संबंधानें विलायतेंत होत असलेले खर्चाचें पत्र या पत्रकाचे पुढें दिलें आहे. या पत्रकांवरून खर्च किती व कोणते देशांत होतो तें दिसून येईल. आणखी एक तऱ्हेनें, ह्मणजे इंपीरियल (बादशाही) प्राव्हिन्शियल (प्रांतिक) व लोकल (स्थानिक) यांसंबंधानें तपशीलवार जमा व खर्च कसा कसा होत आहे हें दाखविणें जरूर आहे. ती फोड या पत्रकांत न करतां स्वतंत्र रीतीनें करण्यांत येईल. १२९ पृष्ठावरील जमाखर्चाचे कोष्टकांतील पहिले सदरांत

जमेच्या खऱ्या बाबी दिल्या आहेत; त्या जमीनबाब वगैरे दहा आहेत. या बाबींपैकीं पहिले आठांबद्दल विवेचन दहावे भागांत केलें आहे, जंगलाबद्दल विवेचन स्वतंत्र भागांत येईल; नोंदणीबद्दल विवेचन पूर्वी झालेंच आहे. दुसरे व तिसरे खान्यांत सन १८८१-८२ बद्दल जमाखर्चाची माहिती स्टाटिस्टिकल आब्स्ट्राक्टावरून दिली आहे. त्यापुढील दोन खान्यांत सन १८९१-९२ सालाबद्दल माहिती दशवार्षिक रिपोर्टांतून घेऊन दिली आहे. शेवटील तीन खान्यांत सन १८९४-९५ सालाबद्दल जमाखर्चाचा अंदाज दिला आहे. १३० व १३१ पानांवर सन १८८१-८२ सालीं हिंदुस्थानासंबंधानें विलायतेस खर्च किती झाला त्याबदल माहिती दिली आहे; ती स्टाटिस्टिकल आब्स्ट्राक्टावरून घेतली आहे. सन १८९४-९५ सालीं विलायतेस होणारे खर्चाचा अंदाज करण्यांत आला आहे त्याचा तपशील १२९ पानांतील कोष्टकांत शेवटील खान्यांत दिला आहे. या कोष्टकांतील पहिले भागांत खऱ्या जमेच्या बाबी दिल्या आहेत हें वर सांगितलेंच आहे. दुसरे भागांत ज्या बाबी आहेत त्यांपैकीं कांहीं निव्वळ खर्चाच्याच आहेत व आगगाड्या वगैरे कांहीं व्यापारी तऱ्हेच्या आहेत. शिक्षण शिवाय करून सिव्हिल खातीं व लष्करी खातें यांबद्दल पूर्वी विवेचन झालेंच आहे, शिक्षणाबद्दल पुढें ओघानें वर्णन येईल. दुष्काळफंडाबद्दल वर्णन कांहीं या भागांत व कांहीं पब्लिक वर्क्सचे भागांत येईल. तिसरे भागांतील बाबी ह्या चालू जमाखर्चाच्या संबंधाच्या नाहींत, परंतु सालांतील व्यवहाराचें पूर्ण ज्ञान होण्यास त्यांची माहिती असणें जरूर असतें अशा त्या आहेत. या पत्रकांतील बाबतींचा विचार करण्यापूर्वी इतर कांहीं महत्वाचे गोष्टींचा विचार केला पाहिजे, तो करून नंतर या पत्रकांतील बाबतींचे संबंधानें विवेचन करण्यांत येईल.

हिंदुस्थानसरकारचें जमा व खर्चाचें पत्रक–सन १८८१–८२ व १८९१–९२ व सन १८९४–९५ सालाबद्दल.

सदरें	१८८१–८२.		१८९१–९२.		१८९४–९५ सालाचा अंदाज.		
	जमा रु०	खर्च रु०	जमा रु०	खर्च रु०	जमा रु०	खर्च रु०	पैकीं विलायतेंत होत असलेला खर्च
							पौंड
अ–रेव्हिन्यु व रेव्हिन्यु हिशेबीं येणारा खर्च.							
जमेच्या मुख्य बाबी व त्यांबद्दल खर्च							
जमीनबाब.	२१९४८०२२०	३००३९०४०	२३९६५७७४०	३८९९६१६०	२५७०३६०००	४१८६८०००	६००
अफू.	९८६२४४४०	२०५७५५४०	८०१२३८००	१८६१८२५०	६३९३६०००	२२५५३०००	८००
मीठ.	७३७५६२००	४८६२०९०	८६३६१८२०	४९७१४६०	८६२९२०००	५१८६०००	२००
स्टांप.	३३८१३७२०	११७४०३०	४२६२१५६०	१८५६४५०	४५६१८०००	[illegible]७९००००	४९०००
मादक पदार्थांवरील कर.	३४२७२७४०	९६८८६०	५११७२६४०	२२०४५२०	५३१७६०००	२०५२०००	...
प्रांतिक कर.	२८९५४९००	५३२२६०	३५०२८३७०	६४१६६०	३५२५३०००	५३००००	...
कस्टम जकात. ...	२३६१३८८०	१९५११३०	१७०१२८८०	१८३३४००	२८७२९०००	२०९५०००	२००
आकारलेले कर. ...	५३६८२९०	१३०७४०	१६५२८२३०	४४३०३०	१७४०९०००	३२७०००	...
जंगल.	८७४८९६०	५५८७३६०	१४९०५८२०	८४९५८३०	१६४६००००	९८४४०००	७००
नोंदणी.	२८४७१४०	१७९४०१०	३९९८०२०	२०९२२६०	४४०००००	२२९९०००	...
संस्थानांकडून येणारी खंडणी	७०६८७३०	...	७७५९६१०	...	७७५२०००	...	...
नेमणुका व कंपेनसेशन.	...	११९४४४००	...	१५३१८६००	...	१५७६६०००	...
परत दिलेल्या रकमा.	...	२७२३७००	...	*	...	२३१६०००	...
बेरीज....	५३६५४९२२०	८२२८३१६०	५९५१७०४९०	९५४७१६२०	६१६०६१०००	१०६[illegible]२६०००	५१५००
व्याज–नेहमींचे कर्जाचें.	९०८५५४०	४८५९३९५०	८७९४४३०	४३१५१७६०	८५६८०००	४६११४०००	२६८२९००
पोस्ट व तारहापिसें व टांकसाळ ...							२३४१००
सिव्हल खातीं...	१४८९९३९०	१८०४५२३०	२५७५७३६०	२४२९१८८०	२६५६५०[illegible]	[illegible]९५८०००	५१३३००
क्रि... ...	१५२३०८६०	१११३८३८१०	१६५६१५७०	१३८५३८४२०	१६११७०००	१४९[illegible]५९२०००	२०६४६००
...ा. ...	८३५३७९०	४५०२७८२०	८९७२८४०	५०४६६२२०	९८२७०००	५७[illegible]५४००००	
...काळ सिव्हिल खर्च.	...	१५६७८८६०	...	१२६८३१९०	...	[illegible]५५००००	
दुष्काळनिवारणार्थ फंड							...

हिंदुस्थानासंबंधानें विलायतेंत होत असलेला खर्च रेव्हिन्यू सदरास खर्च पडणारा सन १८८१।८२ व सन १८९१।९२ बद्दल स्टाटिस्टिकल आबस्ट्राक्टावरून.

सदरें	सन १८८१।८२	सन १८९१।९२	शेरा.
	पौंड	पौंड	
१ कर्जाचें व्याज व इतर देणीं	२५१३१२६	२६३९३४५	विलायतेंत होणारा खर्च बजटांत व स्टाटिस्टिकल अब्स्ट्राक्टांत वेगळाले सदरांत दिलेला असतो. या पत्रकांत रकमा स्टाटिस्टिकल आब्स्ट्राक्टांतून दिल्या आहेत. सन १८९४-९५ चे बजेटांतील विलायतेंतील खर्चाच्या रकमा जमाखर्चाचे पत्रकाचे शेवटील कोष्टकांत दिल्या आहेत.
२ आगगाड्या-स्टेटरेल्वेचें व हमी घेतलेले आगगाड्यांचें व्याज वगैरे	४८६१४१२	५६५३१७६	
३ पब्लिकवर्क्स-फर्लो व भत्ता वगैरे	६०१४३	४९८३३	
४ मरीन-आरमार-खर्च ...	६४१२६	५९५७१	
५ लष्कर खर्च-इफेक्टिव्ह ...	१२२६४७१	१३०१३७४	
नानइफेक्टिव्ह	२२०८३१६	२१४९०७१	
६ सिव्हिल खर्च			
(१) स्टेटसेक्रटरीचें हापीस वगैरे	१३४१३०	१३३८३४	
(२) रायल एंजिनियरिंगकालेज	२९२०४	३२५१५	
(३) विलायतेंतील किरकोळ खर्च	७८७६	६७६५	
(४) फर्लो सनदी व मिलटरी व बिनसनदी लोकांस...	२१७७४७	१९२२२८	
(५) पेनशन व नेमणुका-पोलिटिकल.	३१२६५	५४२२३	
ईस्ट इंडिया कंपनीचे नौकरांस	४४५१३	३०७१०	
विलायतेंतील हापिसें. ..	७८५६३	५३५४५	
हिंदुस्थानांतील नौकर लोकांस चांगले नौकरीबद्दल व इतर	१३६३१२	२१०३२१	

संदरें.	सन १८८१।८२	सन १८९१।९२	शेरा.
(६) इंडियन सर्व्हिस फंड	१०९९४५०	१४२५१२८	
(७) देणग्या व किरकोळ खर्च.	१८९७४	२५५३४	
७ हिंदुस्थानांतील पोस्ट, तार व जमीन वाब वगैरे खात्यांबद्दल	१४७०५२	१६०८६७	
पोलिटिकल दरबार वकील खर्च	२५५९६	२५६६५	
८ स्टोर–डायरेक्टर जनरलाचें हापीस व वखार खर्च	५०७५२	४९८०४	
—हिंदुस्थानांत पाठविण्यांत येतो तो मिलिटरी खात्यासाठी	९३९१८७	१३१८३३२	
आरमार	१३३६८८	७६८७६	
पब्लिकवर्क्स	५५७७६	११२१५९	
सिव्हिल खात्यासाठीं	९१५९६	११८४०९	
स्टेशनरी व छापखाना	११२२२०	३५१०९	
किरकोळ खर्च	३३४८३	१७७४४	
९ वर न आलेलीं इतर किरकोळ सदरें	७८१०५	४३८४७	
बेरीज	१४३९९०८३	१५९७४६९९	
हुंडणावळ दहा रुपये	२९७०५४८	६९३७२१३	
एकूण खर्च	१७३६९६३१	२२९११९१२	
जमा पौंड	२६६१३९५	२५७९१९	
निवळ खर्च पौंड	११७३७६८८	१५७१६७८०	

कोणतेही देशाचे सांपात्तिक स्थितीचा विचार करतांना ज्या गोष्टींचा विचार करणे जरूर असतें त्यांत, त्या देशांतील लोकसमाजांचे उदरनिर्वाहाचे मार्ग काय आहेत, व ते कसे चालतात, याचें निरीक्षण ही प्रधान गोष्ट आहे. या देशांत दोनतृतीयांश लोक शेतकी करून, व आणखी एकदशांश त्यांचेच संबंधाचीं कामें करून, ते सर्व जमिनीवर उदरनिर्वाह करितात. नऊदशांश लोकवास्ति खेडेगांवांत आहे व साधारण शहरांत राहणारे लोक एकंदर एक-पंचमांशही नाहींत. व्यापाराचें व धंद्याचें महत्व वाढलें आहे तें इंग्रजी राज्य चालू झाल्यानंतरचें आहे ; तेव्हां वहुतेक सर्व वस्ती खेडगांवांत व कांहीं थोडी शहरांत अशी वाढली आहे. यासंबंधानें सांपात्तिक दृष्टीनें विचार करतांना दोन गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. त्या ह्या कीं, शेतकीपासून संपत्तीचें वर्धन फार सावकाश होतें व हिंदुस्थानचे लोकांची स्थिति व विचार यांचा कल संपत्तीचा अनुत्पादक रीतीनें खर्च करण्याकडे असतो. या देशांत हिंवाळा बराच माफक असल्यानें पोषाखाचा खर्च वगैरे कमी लागतो, तरी पर्जन्याची बरेच वेळा कमताई होते व तसें झालें ह्मणजे देशांतील लोकसमाजाचे बरेच भागास हाल सोसावे लागतात, व त्यामुळें जमाखर्चाची तोंडमिळवणी डळमळूं लागते. अलीकडे शेतकरी लोक कांहीं कारखान्यांत वगैरे कामास लागतात, परंतु त्यांचा हेतु मुख्यत्वेंकरून प्राप्ती होईल त्यापासून जमीनजुमला करावा हाच असतो. कारखाने व कलाकौशल्यें पूर्वीपेक्षां कांहीं वाढलीं आहेत, परंतु त्यामुळें शेतकीवर उदरनिर्वाह करणारे लोकांचे स्थितींत फारच थोडा फेरबदल झाला आहे, व जमिनी सोडून धंद्याकडे फारच थोडे लोक आकृष्ट झाले आहेत.

सामाजिक स्थितीचे बरोबरच राजकीय स्थितीचाही विचार केला पाहिजे ; कारण तिचा जमाखर्चाशीं विशेष निकट संबंध आहे. बंडानंतर या देशाची स्थीरस्थावरता करण्यास खर्च पुष्कळ लागला व सन १८५७चें बंड मोडण्याचे खर्चाचीही पूर्वीची मोठी रकम होती. आठवे भागांत सांगितलेप्रमाणें आतां समराचें स्थान देशाचे अंतर्भागांतून सामंत प्रांतांत गेलें आहे, तेव्हां त्या प्रांतांचा बंदोबस्त करण्याचा व तेथें परशत्रूंपासून रक्षणासाठीं तयारी ठेवण्याचा खर्च पर्वीपेक्षां वाढला आहे. लष्करी खर्चासंबंधानें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, या देशाचे उष्ण हवेचे कारणानें युरोपिअन लोकांस कायम वस्ती करून येथें राहतां येत नाहीं व त्यामुळें सैन्यांत त्या लोकांची भरती करण्यास विलायतेसच जावे लागतें व सैन्य उत्कृष्ट रीतीनें शिक्षित व तयारींत ठेवण्यासाठींही विलायतेचे व इकडील युरोपियन सैन्याची नेहेमीं अदलाबदल करावी

लागते. इतर खात्यांतही देखरेख करणारे अंमलदार तिकडूनच आणावे लागतात. व्यापारवर्धनासाठीं व दुष्काळापासून रक्षणाचीं कामें करण्यासाठीं कर्ज काढावें लागतें ; व या कामीं आजपर्यंत काढलेले कर्जापैकीं दोनतृतीयांश कर्ज विलायतेंतच काढलेलें आहे. तसेंच कोळसा, लोखंड वगैरे इकडे विपुल मिळत नाहींत ते पदार्थ व लोहमार्ग, पूल, व लष्करी व आरमाराचे कामांसाठीं लागणारें सामान युरोपांतूनच आणवावें लागतें. याप्रमाणें लष्करी व इतर नौकरांचा पगार व पेनशन व कर्जाचें व्याज व इतर युरोपियन सामान यावद्दल सर्व पैसा विलायतेंत पाठवावा लागतो. तिकडील नाणें सोन्याचें व इकडील रुप्याचें आहे, व सोन्याचे मानानें रुप्याची किंमत उतरली असलेंमुळें या बावतींतील बोजा दिवसेंदिवस एकसारखा वाढत चालला आहे.

५. जमाखर्चांत अस्थैर्य येण्यास मुख्य कारणें दुष्काळ, लष्करखर्च, हुंडणावळ व अफू हीं आहेत. या देशांत दुष्काळ वारंवार पडण्याची भीति आहे व तो पडण्याचें बंद करणें जरी मानवी सामर्थ्याचे बाहेर आहे तरी, त्यापासून होणारें नुकसान व हाल कमी करणें शक्य आहे ; यासाठीं दरसाल तशा कामाकडे कांहीं खर्च करण्यांत येतो. यासंबंधानें जास्त विस्तारानें पुढें सांगण्यांत येईल; येथें त्या विषयाचें फक्त दिग्दर्शन पुरें आहे. लष्करी खर्चाचे बाबतींत अलीकडे मोठ्या लढाया जरी थोड्याच झाल्या आहेत तरी, दरसाल सरहद्दीवर लहान लहान स्वाऱ्या नेहेमीं चालू असतात, व त्या स्वाऱ्यांचा खर्च परस्पर भागत नाहीं. अफूचें उत्पन्न जरी इच्छित मर्यादेंत ठेवतां येतें, तरी तिची किंमत चिनांतील खपावर अवलंबून असते, व त्यामुळें ती वारंवार पालटते. त्या देशांत अफूची लागवड वाढत चालल्यानें व इतर देशांतून तिकडे अफू जाऊं लागल्यानें इकडील अफूचा खप कमी होऊं लागला आहे, व किंमतही उतरत चालली आहे. या कारणानें अफूचें उत्पन्न हें जमेस धोका बसविणारी बाब झाली आहे. शेवटची बाब ह्मणजे हुंडणावळ. पूर्वोक्त तीन नुकसानींच्या बाबतींत कांहीं तरी मोबदला किंवा समाधान मानण्यास जागा असते, परंतु हुंडणावळचा खर्च असा आहे कीं त्याबद्दल मोबदला कांहीं नाहीं ; परतंत्र देशास ती निव्वळ नुकसानीचीच बाब आहे. हें नुकसान गेले वीस वर्षांत फारच वाढत गेलें आहे. पुढील पत्रकांत विलायतेंत होणारा निव्वळ खर्च व त्यावरील हुंडणावळ यांचे आंकडे दिले आहेत, त्यांवरून गेले वीस वर्षांत या बाबतींतील खर्चांत किती अंतर पडलें आहे तें दिसून येईल.

साल.	विलायतेंतील खर्च. पौंड *	हुंडणावळीची रक्कम. रुपये.	हुंडणावळीचा दर. रुपयास पेन्स.
सन १८७१–७२	१२३०४५९०	४६५०३००	२३·१२६
,, १८८१–८२	११७३७६८८	२४२१४९९०	१९·८९५
,, १८९१–९२	१५७१६७८०	६८२५९०९०	१६·७३३
,, १८९४–९५ सालचें बजेट.	१५६५७१००	११३०७४१००	१४·००

* विलायतेंतील जमेच्या रकमा वजा करून निव्वळ खर्चांच्या या रकमा आहेत.

हिंदुस्थानचें उत्पन्न सन १८७१ पासून सरासरी सवाईनें वाढलें आहे व खर्च पूर्वीपेक्षां ११ टक्के वाढला आहे. विलायतेंतील खर्च फारसा वाढला नाहीं. हुंडणावळीचा खर्च मात्र इतका वाढला आहे कीं सन १८९१–९२ सालीं निव्वळ उत्पन्नापैकीं १३$\frac{3}{5}$ टक्के या कामास जाऊं लागले. चालू सालचे बजेटाचे मानानें पहातां २१$\frac{3}{5}$ टक्के जाऊं लागले आहेत. १८९४–९५ सालचे बजेटांत या कारणामुळें तूट रु० ७९२३१००० धरली आहे व तुटीसाठीं हें बजेट करण्यापूर्वी आयात व निर्गत मालावरील जकाती, पूर्वी माफ करण्यांत आल्या होत्या, त्या बसाविण्यांत आल्या आहेत. या जकातीबद्दल कायदा सन १८९४ सालीं मार्च महिन्यांत झाला आहे. हें उत्पन्न धरून तुट रु. ३०१९००० आहे.

६. **जमाखर्चाचे पद्धतींत सुधारणा**—या देशाचा राज्यकारभार खुद्द राणीसरकारांनीं कंपनीकडून आपलेकडे घेतल्यावर जमाखर्चाची व्यवस्था लावण्यासाठीं, विलायतेहून एक फडणवीस पाठविल्याचें वर सांगितलेंच आहे. ते येण्याचे पूर्वी खर्च फार वाढला होता व खजिन्यांत तूट येऊन खर्चाची टंचाई झाली होती, तेव्हां विल्सनसाहेबांनीं सुरू केलेल्या सुधारणांत सर्व देशांतील खर्चावर हिंदुस्थानसरकारास फार सख्त देखरेखीचा अधिकार दिला होता. कोणताही खर्च करणें झाल्यास हिंदुस्थानसरकारची मंजुरी लागे व हुकमाप्रमाणें कर वसूल करणें, व ते मंजुरी देतील त्याप्रमाणें व देतील तितके रकमेचा खर्च करणें, एवढेच अधिकार स्थानिक सरकारांकडे राहिले होते. असें प्रारंभीं करणें जरूर होतें; कारण सर्व ठिकाणीं मुख्य ठिकाणचा अधिकार बरोबर बसल्याशिवाय तो वांटून देणें सोईकर झालें नसतें. या व्यवस्थेचा परिणाम चांगला झाला नाहीं. स्थानिकसरकारें आपल्यास जरूर तितकी रक्कम मिळेल न मिळेल या कांक्षेनें जास्तच रक्कम मागत, त्यांची नजर आपले अमलांतील राज्यव्यवस्था चांगले तऱ्हेनें चालावी एवढ्यावरच असे; त्या कामास खरा खर्च किती लागेल, व इतर प्रांतांच्या गरजा कशा आहेत, व

त्यांची सोय होण्यासारखी आहे किंवा कसें, याबद्दल तीं विचार करीत नसत. हिंदुस्थानसरकारची नजर जमा व खर्च यांची तोंडमिळवणी करण्याकडे जास्त असे व त्यांस स्थानिक गरजांची माहिती नसल्यामुळें पैशाची मंजुरात देण्यांत त्यांचे हातून मोठी योग्य अशी निवड होत नसे. एकंदरींत पैशाची वांटणी यदृच्छेनेंच होई व त्यामुळें स्थानिक सरकारें व हिंदुस्थानसरकार यांच्यांत वारंवार गैरसमज होत असे. ही स्थिति सुधारण्यास मार्ग ह्मणजे खर्च करणारे स्थानिक सरकारांचा जमांचे बाबींशीं संबंध घालून देऊन आदा व खर्च यांचा मेळ ठेऊन व्यवस्था करण्याचें त्यांस भाग पाडणें हा होता. अशा व्यवस्थेपासून दुसरेही उपयोग होण्यासारखे होते ते असे कीं, स्थानिक स्थितीचे संबंधानें कोणते बाबींपासून जमा चांगली होईल किंवा होणार नाहीं, स्थानिक गरजा भागविण्यासाठीं पैसे कसे काढावे, हें स्थानिक सरकारांस जास्त चांगलें समजण्यासारखें असल्यामुळें त्याबद्दल व्यवस्था त्यांचेकडून जास्त चांगली लागण्यासारखी होती; तसेंच एखादा कर एक भागास जसा सोईचा असतो तसा दुसरे भागास असत नाहीं व असे कर सर्व देशांस सारखे लागू केल्यानें असंतोष उत्पन्न होतो, परंतु तोच कर स्थानिक स्थितीचे मानानें बसविण्यांत आल्यानें ह्या अडचणी नाहींशा होतात, तेव्हां या व्यवस्थेप्रमाणें असे कर स्थानिक सरकारांचे हांतून योग्य कामासाठीं व योग्य ठिकाणीं बसविले जाण्यासारखे होते. एकंदरींत या व्यवस्थेपासून जमेच्या बाबी वाढाव्या व खर्चांत काटकसर व्हावी असा दुहेरी फायदा होण्यासारखा होता.

स्थानिक सरकारांवर जमा व खर्चाची जबाबदारी टाकण्याचे पद्धतीचा पाया लार्ड मेयो यांनीं घातला, व तिची सुधारणा लार्ड रिपन यांचे कारकीर्दींत झाली. सन १८७० सालीं प्रारंभीं नऊ खातीं–तीं सर्व खर्चाचीं खातीं–स्थानिक सरकारांकडे देण्यांत आलीं व त्यांचा खर्च भागविण्यासाठीं त्यांस रकम नियमित करून देण्यांत आली व ती खर्च करण्यासंबंधानें स्वतंत्रता देण्यांत आली. मोठी लढाई, दुष्काळ किंवा अफूचे उत्पन्नांत उतार, असे प्रकारचे विशेष आकस्मिक प्रसंग उद्भवल्याशिवाय हिंदुस्थानसरकार नेमलेले मुदतींत स्थानिक सरकारांस नेमून दिलेल्या रकमेंत फेरफार करणार नाहीं असें ठरविण्यांत आलें. ही व्यवस्था अनुभव घेण्यासाठींच सुरू करण्यांत आली असल्यामुळें प्रथमतः स्थानिक सरकारांस फार थोडे अधिकार देण्यांत आले होते व तेही शर्तीनीं अगदीं बांधून टाकले होते; तरी एकंदरींत ती व्यवस्था योग्य दिशेनें होती. या व्यवस्थेपासून खर्च काटकसरीनें होईल, तकरार नाहींशी होईल, व पैशाचे व्यवस्थेचे बाबतींत पूर्वींप्रमाणें अस्थैर्य राहणार

नाहीं, हे फायदे होतील असा हिंदुस्थानसरकारचा अजमास होता; याशिवाय स्थानिक स्वराज्यव्यवस्था वृद्धिंगत होऊन राज्यव्यवस्थेचे कामांत युरोपियन व एतद्देशीय लोकांस मिळूनमिसळून काम करण्यास सवड व्हावी, व मुनसिपाल कारभाराची उन्नति होऊन लोकांस राज्यकारभारांत शिक्षण मिळावें, हा ही व्यवस्था करण्यांत एक हेतु होता. ह्या व्यवस्थेप्रमाणें पहिल्यानें खर्चाच्या रकमा पांच वर्षांचे मुदतीनें नेमून दिल्या होत्या. ती मुदत पुरी झाल्यावर सन १८७७ सालीं पूर्वीचे व्यवस्थेत सुधारणा करण्यांत आली ती अशी कीं, पूर्वी फक्त खर्चाचींच खातीं प्रांतिक सरकारांकडे वर्ग करण्यांत आलीं होतीं, त्याशिवाय या वेळीं जमेच्याही कांहीं बाबी त्यांचेकडे देण्यांत आल्या. याही प्रसंगीं शर्ती ठेवण्यांत आल्या होत्या व त्या पूर्वीपेक्षांही सख्तही होत्या. स्थानिक स्वराज्यव्यवस्था वाढविण्याचा जो मूळचा हेतु तो या प्रसंगीं तसाच एका बाजूस राहिला.

प्रांतिक जमाखर्चासंबंधानें तिसरा करार सन १८८२ सालीं लार्ड रिपन यांचे कारकीर्दीत झाला, व त्यांनीं आपले नेहमींचे उदार वर्तनक्रमास अनुसरून या खेपेस पूर्वीचे व्यवस्थेत पुष्कळ सुधारणा केली. त्यांनीं प्रांतिक सरकारांकडे वर्ग केलेले खर्चाची व जमेची तोंडमिळवणी करण्यासाठीं ठोक रकम न देतां हिंदुस्थानसरकारांनीं आपले हातीं ज्या जमेच्या बाबी ठेविल्या होत्या, त्या बाबींचे उत्पन्नापैकीं कांहीं अंश प्रांतिक सरकारांकडे लावून दिला. कांहीं जमेच्या बाबी सर्वस्वी वर्ग केल्या व कांहींचे उत्पन्नांत वांटणी ठरविली, व कांहीं खात्यांचे खर्चांतही उभयतांची वांटणी ठरविली, व या उत्पन्नांतून न भागतां जी खर्चाची तूट उरेल ती भरून काढण्यासाठीं जमीनबाब, जी हिंदुस्थानसरकारांनीं आपलेकडे राखून ठेविली होती, तिचेपैकीं कांहीं नियमित अंश देण्याचें ठरविलें. अफू, मीठ, कस्टम, खंडण्या, पोष्ट, टेलिग्राफ व टांकसाळ, कर्ज, आगगाड्या, लष्कर वगैरे खातीं हिंदुस्थानसरकारांनीं आपलेकडेच ठेविलीं होतीं; कारण स्वभावतःच हीं खातीं प्रांतिक नव्हत. हे ठराव प्रांताप्रांतांशीं वेगळाले रीतीनें झाले, त्यांचा तपशील देण्याचें कारण नाहीं; मुंबईसरकारास जंगल, मादक पदार्थ, आकारलेले कर, स्टांप व नोंदणी या बाबींचे उत्पन्नापैकीं निमे भाग, प्रांतिक कर, किरकोळ खातीं, न्यायखातें, मरीन, पोलीस, शाळाखातें, वैद्यकी खातें, स्टेशनरी व छापखाना, या खात्यांची जमा सर्व, तसेंच कस्टम, मीठ या बाबींच्या किरकोळ जमा सर्व, व व्याज, पेनशन, किरकोळ व पब्लिकवर्क्स बाबींच्या जमेपैकीं कांहीं रकमा ह्या सर्व, मिळाल्या होत्या. या जमेनें न भागतां राहणारी तूट भरून येण्यासाठीं जमीनबाबेपैकीं ५९·८२ अंश देण्यांत आला होता. विशेष भयंकर

दुष्काळाशिवाय दुसरे कोणतेही कारणानें प्रांतिक सरकारांस हिंदुस्थानसरकाराकडून मदत मिळण्याची नाहीं, असें ठरविण्यांत आलें होतें; व तसेंच विशेष संकट येऊन हिंदुस्थानसरकारची सर्व शिलक खर्च झाल्याशिवाय व प्राप्तीचे मार्ग खलास झाल्याशिवाय, हिंदुस्थानसरकार प्रांतिक सरकारचे शिलकी रकमांस हात घालणार नाहीं, असेंही ठरविण्यांत आलें. याप्रमाणें ठरविण्यांत आलेले व्यवस्थेपासून मुख्य फायदा असा होता कीं, पूर्वी प्रांतिक सरकारांस पूर्णपणें सुपूर्त केलेले जमा व खर्चाच्या बाबींपुरतेंच मात्र त्यांस अगत्य वाटे, इतर बाबींचे नफ्यातोट्याशीं संबंध नसले कारणानें तसें वाटत नसे, तें आतां पालटून हिंदुस्थानसरकारांनीं राखून ठेवलेले जमेचे बाबींतही त्यांचा प्रत्यक्ष हिताहिताचा संबंध उत्पन्न झाल्यानें, त्यांस अगत्य वाळगणें जरूर झालें.

या प्रांतिक कराराचे उजळणीचे वेळीं वर सांगितलेप्रमाणेंच व्यवस्था होऊन संपलें नाहीं, तर सन १८७० सालीं लार्ड मेयोनीं प्रांतिक सरकारांस जमाखर्चाचें स्वातंत्र्य देतांना त्या व्यवस्थेपासून स्थानिक स्वराज्यव्यवस्थेचा पाया घालण्यास सुखकर व्हावें, व नेटिव्ह व युरोपियन यांचें राज्यव्यवस्थेचे कामीं जास्त संघट्टन व्हावें, असा जो हेतु योजला होता तो ह्या प्रसंगीं लार्ड रिपन यांनीं सिद्धीस नेला. हिंदुस्थानसरकारांनीं जमाखर्चाचे बाबतींतील आपलेवरील जबाबदारी ज्याप्रमाणें प्रांतिक सरकारांवर टाकली, त्याप्रमाणेंच स्थानिक सोईच्या व उपयोगाच्या कामांच्या व्यवस्था सरकारचे मार्फत न होतां स्थानिक कमिट्यांचे मार्फत व्हाव्या, व त्यासाठीं त्या कामीं खर्च होणाऱ्या जमेच्या बाबींचें उत्पन्न त्या कमिट्यांचे हातीं द्यावें, असें ठरविलें, व त्याप्रमाणें घडवूनही आणिलें. या स्थानिक व्यवस्थेचा पाया घालणारा जो त्यांनीं महत्वाचा ठराव प्रसिद्ध केला त्याचा सारांश एका सन्माननीय वर्तमानपत्रांतून उतरून घेतों. त्यानंतर स्थानिक स्वराज्याची वाढ कशी झाली आहे तें चवथे भागांत सांगण्यांत आलेंच आहे.

" हिंदुस्थानसरकारचे ठरावांत प्रथम स्थानिक, म्युनिसिपाल, आणि जिल्ह्या-
" च्या कमिट्या किंवा बोर्ड्स् कोणत्या तऱ्हेनें नेमाव्या हें सांगितलें आहे. सर्व
" हिंदुस्थानभर एकच नियम लागू करण्याचा इरादा नाहीं. ज्या ठिकाणीं ज्या
" गोष्टींची गरज असेल त्या ठिकाणीं तशा सोई असाव्यात हेंच इष्ट आहे. परं-
" तु या कमिट्या नेमण्यांत मुख्य जीं तत्वें आहेत, तीं सर्वत्र सारखींच असलीं
" पाहिजेत. कांहीं झालें तरी त्यांत अंतर पडतां कामा नये. याकरितां
" स्थानिक सरकारांना अशी सूचना आहे कीं, ज्या ज्या ठिकाणीं सरकारी अधि-
" काऱ्यांखेरीज बाहेरचे हुषार लोक मिळण्याचा संभव असेल त्या त्या ठिकाणीं

" त्या लोकांचे बोर्ड्स् करून त्यांच्याकडे विवक्षित कामें आणि विवक्षित जमेची
" व्यवस्थाही सोंपवावी. हे बोर्ड्स् करितांना ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, ज्या
" लोकांना जेथली माहिती असेल त्या लोकांना तेथलें काम करण्यास ठेवावें;
" त्याच्या बाहेर जाण्याची गरज पडूं नये. सर्व जिल्ह्यांसाठीं फक्त जिल्ह्या-
" च्या शहरांत बोर्ड्स् असल्यामुळें दूरदूरच्या लोकांस त्या बोर्ड्समध्यें येतां
" येत नाहीं, व पैशाचा विभागही व्यवस्थेनें केला जात नाहीं; ही नड दूर
" होण्यासाठीं ठिकठिकाणीं निरनिराळे बोर्ड्स् असणें जरूर आहे. फार झालें
" तर अशा प्रकारच्या बोर्ड्समध्यें बसण्यासाठीं जिल्ह्याच्या बोर्ड्समधून कांहीं
" लोक पाठवावेत. म्युनिसिपाल कमिट्या आणि सब्डिव्हिजनल किंवा जिल्हा-
" बोर्ड्स् यांच्यांत जे संबंध असावयाचे ते स्थानिक स्थितीवर अवलंबून राह-
" तील. सर्व प्रकारच्या कमिट्यांत स्वतंत्र (सरकारचे नोकर नाहींत) अशा
" लोकांची संख्या निदान दोनतृतीयांश असली पाहिजे; त्यांची नेमणूक निदान
" दोन वर्षे चालली पाहिजे; व ते पुनः पुनः पाळीपाळीनें नेमण्यांत आले पाहि-
" जेत. ज्या ठिकाणीं जमेल त्या ठिकाणीं कमिट्यांचे मेंबर, लोकांनीं नेमावे हें
" बरें; पण हा नियम सर्वत्रच लागू करतां येणार नाहीं. मेंबर पसंत करण्याचा
" अधिकार सर्व शहरांस द्यावा व तो उत्तरोत्तर मागें मागें हटवीत नेऊन लहान-
" सहान गांवांस आणि खेड्यांस देखील पोंचेल असें करावें. कोणत्या प्रकारचे लोक
" नेमावयाचे यासंबंधानें स्थानिक व्यवस्था स्थानिक सरकारांनीं त्या त्या इलाख्यां-
" तील प्रसिद्ध नेटिवांच्या सल्ल्यानें आणि विचारानें करावी. चोहोंकडे एकाच तऱ्हेनें
" लोक पसंत केले तरी हरकत नाहीं; कारण लोकांना आपलीं कामें करितां यावीं हा
" काय तो मूळचा हेतु आहे, आणि ही गोष्ट तडीस जाण्यासाठीं हरप्रयत्न करून
" पाहवा. आजपर्यंत या कामांत जें यश आलें नाहीं, त्याचें कारण लोकांतच कांहीं
" अपूर्व गोम आहे असें नाहीं; तर सरकारी अधिकाऱ्यांनीं या बाबतींत म्हणण्या-
" सारखे, आणि हवे होते तेवढे परिश्रम कधींच केले नाहींत. सध्या येवढाच
" हेतु आहे कीं, ज्या तरुण सुशिक्षित नेटिव लोकांना आपलें काम आपण पा-
" हण्याची उमेद आहे, त्यांना तें करण्याची संधि देऊन ते स्वराज्याचें काम
" पाहण्याला तयार होतात किंवा नाहीं, हें पहावयाचें. कमिट्या काम करीत
" असतां मेंबरांना उत्तेजन येण्यासाठीं रा० ब० आणि रा० सा० या सन्माना-
" च्या पदव्या द्याव्या. ज्याअर्थीं कमिट्यांचें बहुतेक काम लोकांच्या हातून
" करवावयाचें आहे, त्याअर्थीं त्यांनीं केलेल्या व्यवस्थेंत सरकारी अधिकाऱ्यां-
" नीं उगीच हात घालूं नये. फार झालें तर तीवर नजर ठेवावी, व तें चुक-
" ल्यास दोन शब्द सांगून त्यांना ताळ्यावर आणावें. नवीन कर बसवावयाचे

" असले किंवा कर्ज काढावयाचें असलें तर एक्झिक्युटिव्ह अधिकाऱ्यांची संम-
" ति घेतली पाहिजे; किंवा कित्येक बाबतींत लोकल कमिट्यांकडून आपल्या
" कामाची फारच हेळसांड झाल्यास कांहीं वेळपर्यंत मुख्य सरकाराच्या मंजरी-
" नें त्या बंद ठेवण्याचा अधिकार स्थानिक सरकारास आहे. म्युनिसिपालिट्या
" किंवा लोकल कमिट्या यांच्यावर चांगली देखरेख ठेवतां यावी ह्मणून कलेक्टर
" व मामलेदार त्या त्या कमिट्यांचे चेअरमनच झाले पाहिजेत असें नाहीं. ज्या-
" अर्थी लोकांना राज्यकला यावी असा हेतु आहे, त्याअर्थी सरकारी अधि-
" काऱ्यांना त्यांच्या कामांत ढवळाढवळ करण्याची किंवा अमुक एक मार्गानें
" त्यांस आपलें काम करण्यास लावण्याची सवड असतां कामा नये. लोकांच्या
" हातांत खरी सत्ता असून आपल्यावर कांहीं जवाबदारी आहे असें त्यांस वा-
" टलें पाहिजे. कलेक्टर वगैरेकडे देखरेख करण्याचें काम असल्यानेंच त्यांचा
" बोज राहणार आहे. आतां ज्या ठिकाणीं चेअरमन होण्यासाठीं स्वतंत्र
" मनुष्य मिळतच नसेल, त्या ठिकाणीं मामलेदाराला किंवा कलेक्टरला चेअर-
" मन नेमणें जरूर आहे. पण अशा ठिकाणीं देखील चेअरमनला व्होट (मत)
" देण्याचा अधिकार नाहीं. चेअरमन नेमण्याचा तो लोकांनीं पसंत करून
" त्याच्या नेमणुकीला सरकारची मंजुरी द्यावी. या ठरावाचा मुख्य कटाक्ष
" लोकल बोर्ड्स् यांच्याकडे उत्पन्न आणि खर्च करण्याचा अधिकार देण्याकडे
" आहे."

सन १८८७ सालीं प्रांतिक कराराची चौथी खेप झाली. हल्लीं चालू असलेला करार पांचवा आहे. दर वेळीं ठराव होतांना हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकार यांचे दरम्यान जमाखर्चाचे संबंधानें व्यवस्था कशी असण्याची याबद्दल तपशीलवार नियम होत असतात, परंतु त्याचा सारांश विस्तारभयास्तव देण्यांत आला नाहीं. आतां शेवटचा ह्मणजे हल्लीं चालू असलेला करार होतांना ज्या शर्ती ठरविण्यांत आल्या आहेत त्यांतील कांहीं मुख्य येथें देतों. त्या शर्ती पुढें लिहिल्याप्रमाणें:—सर्वसाधारण व्याप्तीचें असें नवीन काम अंगावर घेणें, कोर्टफीचे किंवा व्यापारी स्टांपविक्रीचे कमिशनचे दरांत फेरफार करणें, जमाखर्चाच्या पद्धतींत फरक करणें, अडीचशें रुपयांवरील पगाराच्या जागा वाढविणें किंवा कमी करणें, दारू व इतर पदार्थांवरील कराचे दरांत फरक करणें (तोही विशेषत: प्रांताचे हद्दींवरील भागांत करणें) वगैरे गोष्टींस हिंदुस्थानसरकारची मंजुरात पाहिजे. स्थानिक सरकारांच्या शिलकी अमुक मर्यादेचेपेक्षां कमी असूं नयेत असेंही ठरविलें आहे; त्या मर्यादा येणेंप्रमाणें आहेत:- बंगाल, मद्रास, मुंबई, वायव्य प्रांत व अयोध्या या प्रांतांचे खजिन्यांत वीस

लाख रुपये, पंजाब दहा लाख, मध्यप्रांत आठ लाख, खालचा ब्रह्मदेश साहा लाख व आसाम पांच लाख रुपये. सरकारी पैसा खासगी व्यक्ती किंवा व्यक्तींचे समुदायाचे फायद्यासाठीं खर्च करण्यांत येऊं नये; तसा खर्च करणें तो हिंदुस्थानसरकारांनीं ठरविलेले नियमांस किंवा मान्य केलेले तत्वांस अनुसरून असला पाहिजे. प्रांतिक सरकारांस कांहीं बाबतींसाठीं सरकारी पैसे कर्ज देण्यास परवानगी देण्यांत आली आहे, त्याशिवाय इतर कामासाठीं कर्ज देणें झाल्यास परवानगी घेतली पाहिजे. तशीच परवानगी शिलकेची रक्कम सरकारी नोटींत किंवा दुसरे प्रकारें व्याजीं लावण्यासही घेतली पाहिजे. जमा व खर्चाचें बजेट (अंदाज) करावें व खर्च त्यांत ठरविले रकमांचे आंत ठेवावा; दरम्यान एखादे बाबतींत जास्त खर्च करण्याचें जरूर झाल्यास, तो दुसरे एखादे सदरांसाठीं दाखल केलले रकमेंतून रक्कम वर्ग करून घेऊन त्यांतून करावा. हिंदुस्थानसरकारांनीं केलेले नौकरी, रजा, पेनशन, प्रवास वगैरेबद्दलचे नियम (सिव्हिल सरव्हिसरेग्युलेशन्स) पब्लिकवर्क्स खात्याचे कोड, अकाउंट कोड (हिशेबाचे पद्धतीचे नियम) वगैरे प्रांतिक सरकारांनीं पाळिले पाहिजेत वगैरे.

याप्रमाणें हिंदुस्थानांतील जमाखर्चाची पद्धति व कर बसविणें व त्यांचा खर्च करणें यांसंबंधानें चालू असलेली पद्धति व स्थानिक स्वराज्यपद्धति यांसंबंधाची थोडक्यांत हकीकत आहे.

७. सेविंग ब्यांका—येथपर्यंत देशाचे सांपत्तिक स्थितीशीं संबंध असणारे व त्या स्थितींत फेरबदल करणारे कांहीं कारणांचा विचार केला व कर बसविण्याचे व वसूल व खर्च करण्याचे बाबतींत जो महत्वाचा फरक मध्यंतरीं करण्यांत आला त्याबद्दल थोडक्यांत हकीकत दिली. आतां वर दिलेले पत्रकांतील बाबींचा विचार करण्यापूर्वीं एकच बाबतीचा—सेव्हिंग ब्यांकांचा—विचार करण्याचा राहिला आहे तो करून नंतर त्या बाबतींकडे वळूं.

सन १८८२।८३ त लहान व थोर सर्व प्रकारचे शेतकरी लोकांस पैसासंचय करण्याची सवय व्हावी ह्मणून, स्टाक नोटी काढण्यांत आल्या होत्या, परंतु सहा वर्षांत अनुभव पाहतां लोकांस ती सोय आवडली नाहीं असें दिसलें; तेव्हां त्या नोटी बंद करण्यांत आल्या. सेव्हिंग ब्यांकांचा मात्र प्रसार फार झाला आहे. सन १८३३ सालीं या ब्यांका तीन इलाख्यांच्या शहरीं स्थापन झाल्या व पुढें त्या पोटभागांतही स्थापन करण्यांत आल्या. सन १८८२ पासून पोष्टाकडे तें काम देण्यांत आल्यापासून तर या पेढ्यांची फारच भरभराटी झाली आहे. या ब्यांका चांगल्या चालू झाल्यावर पूर्वीं दिस्ट्रिक्ट ब्यांका होत्या त्या, इलाख्याचे शहराबाहेरील ठिकाणच्या, बंद करण्यांत आल्या. या ब्यांका किती

लोकप्रिय झाल्या आहेत तें त्यांशीं व्यवहार करणारे लोकांचे संख्येचे वाढी-वरून दिसून येत आहे. सन १८-१।८२ सालीं डिस्ट्रिक्ट सेव्हिंग ब्यांकेंत पैसे ठेवणारे १८९७७ होते व सन १८९१।९२ सालीं पोष्टाचे सेव्हिंग ब्यांकेंत पैसे ठेवणारांची संख्या ४६३४५३ झाली. ठेवींचे रकमेचे संबंधानें पाहतां, सन १८८१।८२ सालीं ती रुपये ७२७८९२० होती व ती सन १८९१।९२ सालीं रुपये ७०५९३१६९ झाली, ह्मणजे नऊपट वाढली. सन १-९२।९३ साल-अखेर पैसे ठेवणारांची संख्या ५२०९६७ व ठेवींची रक्कम रुपये ७८१८७७२७ अशी होती. तसेंच टपालखात्याकडे हें काम गेल्यानें पूर्वीं ज्या वर्गास हा संचयाचा मार्ग प्राप्त नव्हता त्यांस तो प्राप्त झाल्यानें संचय करण्याची वहिवाट पडत चालली आहे.

८. **जमीन बाब**—वरील पत्रकांतील पहिली बाब जमीन बाब आहे. दरशं-भर रुपये उत्पन्नापैकीं चाळीस रुपये या बाबीचे आहेत. त्या बाबीचें उत्पन्न फार सावकाश वाढतें, कारण जमीनबाबेचे दराचे ठराव फार मुदतीचे झालेले असतात.

सन १८८१।८२सालापेक्षां सन १८९१।९२ सालीं हें उत्पन्न शेंकडा सुमारें ७ टक्के वाढलें आहे.

अफू—या बाबीचे खालोखाल अफू ही उत्पन्नाची बाब आहे. या बाबीचें उत्पन्न गेले दहा वर्षांत कमी झालें आहे. सन १८८१–८२ सालापेक्षां सन १८९१–९२ सालीं तें २१ टक्के उतरलें.

मिठाचे उत्पन्नांत वाढ आहे. मिठावरील कर सन १८८२ सालीं सर्व देशभर एकसारखा करण्यांत आला; त्यामुळें पाहिल्यानें उत्पन्न कांहीं कमी झालें, परंतु कर कमी झाल्यानें खपही वाढला, त्यामुळें तूट बहुतेक भरून येत होती, तों सन १८८८ सालीं, खर्चाचे अडचणीमुळें कर मणास दोन रुपये होता तो अडीच रुपये करण्यांत आला, व त्यामुळें आतां उत्पन्न सन १८८२ पेक्षां वाढलें आहे. सन १८८१–८२ पासून एकंदरींत १८ टक्यांची वाढ आहे.

मादक पदार्थांवरील कराचें उत्पन्न एकसारखें वाढत आहे. साधारण गेले दहा वर्षांत वाढ ४७ टक्के झाली. ही वाढ कराचा दर वाढविल्यानें व चांगला बंदोवस्त ठेवल्यानें झाली आहे.

स्टांपाचें उत्पन्नही तसेंच सारखें वाढत आहे. सन १८९१–९२ पूर्वीं १० वर्षांतील वाढीचें प्रमाण २६⅓ टक्के आहे.

प्रांतिक करांत, लोकल फंड, पंजाब व नार्थवेस्ट प्रांतांतील परवारी कर, व मद्रास व मध्यप्रांतांतील तसेच प्रकारचा कर, बंगाल्यांतील रस्ते, शाळा व

टपालासाठीं बसविलेला कर हे येतात. सन १८९१–९२ सालाचे पूर्वीचे दहा वर्षांत वाढ २१½ टक्के आहे. हे कर जमीनबाबचि मानानें वाढत जातात.

कस्टम खात्याचें उत्पन्न सन १८८१–८२ नंतर कमी होत गेलें, कारण सन १८८२ सालीं अयात व निर्गत मालावरील जकात बहुतेक कमी करण्यांत आली होती. चालू सालीं ती फिरून बसविण्यांत आली आहे.

आकारलेले कर—कस्टमचे उत्पन्नाप्रमाणेंच आकारलेले कराची स्थिति आहे. गेले १० सालांत या करांत दोन वेळा मोठे फरक कण्रयांत आले, यामुळें उत्पन्नांत विशेष फरक झाला; तेव्हां पूर्वीचे उत्पन्नाशीं तुलना करण्यास जागा नाहीं.

फारेस्ट खात्याचे (जंगलखात्याचे) उत्पन्नांतही सारखी वाढ आहे. सन १८८१–८२ पासून १८९१–९२ पर्यंत तें दुप्पट वाढलें आहे.

रेजिस्ट्रेशन–नोंदणी–खातें :—१८९१–९२ चे पूर्वीचे १० सालांत वाढ ८४ टक्के झाली आहे.

खंडण्यांत फारसा फरक होण्यासारखा नाहीं. काय वाढ झाली आहे ती बहुतेक ब्रह्मदेश खालसा झाल्यानें झालेली आहे.

नेमणुका व कंपेनसेशन :—मोठाल्या नेमणुका मुंबई इलाख्यांतच बहुतेक आहेत, व त्यांचा संबंध बहुतेक पेशवाईशीं आहे. कंपेनसेशनची रक्कम मिठागर बंद करण्यांत आलें त्याबदल व देवस्थानासंबंधाच्या जमिनी खालसा करण्यांत आल्या त्याबद्दल, बहुतेक आहे. यांचा संबंध जमेच्या सदरांशीं असल्यामुळें निव्वळ उत्पन्न काढतांना त्या वजा करण्यांत येतात.

खर्च—आतां खर्चाचे बाबींबद्दल विचार करण्याचा आहे.

व्याज—यांत पहिलें सदर व्याजाचें आहे. त्यांत गेले दहा सालांत सुमारें १७ टक्के खर्च कमी झाला आहे. गेले तीन सालांत सरकारी कर्जाचे व्याजाचा दर कमी करण्यांत आला आहे व सरकारांतून कर्जाऊ दिलेले रकमांचे व्याजापासून जमेची रक्कम वाढत आहे. रुपयांत काढलेले कर्जाचें व्याज सन १८९१–९२ सालीं रुपये ४१६८६२२० होतें व पौंडांत काढलेले कर्जाचें व्याज पौंड—३८०३१५९ होतें व त्याचे हुंडणावळीबद्दलचा खर्च रुपये १६५११५६९० त्या सालीं आला होता. एकंदर व्याज रुपये ९६२३३५०० झालें त्याची वांटणी साधारण कर्जखातीं चाळीस टक्के व पब्लिकवर्क्सखातीं ६० टक्के अशी हिशेबीं आकारण्यांत येते. चालू सालीं चार टक्के व्याजाचें कर्ज होतें त्याचें व्याज ३½

टक्के करण्यांत आलें आहे, व त्यामुळेंही आणखी बचत होईल. १८९४–९५ चे बजेटांत व्याजाबद्दल खर्चाची रक्कम रुपये ४६११४००० धरली आहे व जमेची रक्कम रुपये ८५६८००० धरली आहे.

टीपः—विलायतेस सोन्याचें (पौंड) नाणें चालतें तेव्हां तेथें कर्ज काढलेलें पौंड नाण्याचें आहे. या देशांत काढलेलें रुप्याचे नाण्यांत आहे.

पोष्ट तारहपीस व टांकसाळी—हीं व्यापारी तऱ्हेचीं खातीं आहेत. पोष्टाचा हिंदुस्थानांत होत असलेला खर्च उत्पन्नानें भरून येतो, परंतु विलायतेंत होत असलेला स्टोर–सामान पुरवठा व सब्सिडीज् वगैरे खर्च त्या खात्यावर पडल्यामुळें तूट येते. तारखात्याचा व टांकसाळीचा खर्च उत्पन्नांतून भागतो. १८९३ सालापर्यंत लोकांस चांदी देऊन रुपये पाडून घेतां येत असत तें बंद करण्यांत आलें. हल्लीं टांकसाळीचा उपयोग नाणें व पैसे पाडण्यासाठींच होत आहे. १८९४–९५ चे बजेटांत खर्चासाठीं रुपये ६८१००० आकारण्यांत आले आहेत, व जमा रुपये ६७७००० धरली आहे, म्हणजे निवळ खर्च रुपये ४००० आहे. या तिन्ही खात्यांचा सन १८८१–८२ सालांत खर्च रुपये ३१४५८४० होता, परंतु सन १८९१–९२ सालांत ही स्थिति पालटून खर्चवेंच जाऊन शिलक रुपये १४६५४८० राहिली होती, व सन १८९२–९३ त रुपये २३१३२८० राहिली. टपाल व तारहपिसाचा स्वतंत्र भागांत विचार होईलच. सन १८९१–९२ सालीं टांकसाळीपासून जमा रुपये २००४६० व खर्च रुपये ९७१०९० झाला होता. चालू सालचे बजेटांत या तिन्ही खात्यांची जमा रुपये २६५६५००० व खर्च रुपये २५९५८००० धरला आहे.

सिव्हिल खातीं या सदरांत एकंदर नऊ खातीं येतात त्यांबद्दल खर्च किती झाला तें खालील पत्रकावरून दिसून येईल. यांपैकीं मोठाले खात्यांबद्दल सविस्तर वर्णन वेगळे भागांत आलेंच आहे. पोलिटिकल खात्यासंबंधानें एवढेंच सांगण्याचें कीं या सदरांत पोलिटिकल एजंट वगैरेंचा खर्च येऊन शिवाय पोलिटिकल कैदी व आश्रयास रहाण्यास आलेले संस्थानिक लोकांचा खर्च येतो शेवटचे सदरांत जत्रा, प्रदर्शनें, वनस्पतीचे शास्त्रीय बाग व वळू पाळणें, सिंकोनाचे बागही येतात; तसेंच सेन्सस (मनुष्यगणती) व सरव्हे म्हणजे पहाण्या व शेतकी खातें व मिटिआरालाजिकल खातें यांचाही समावेश त्या सदरांतच होतो.

खातीं.	सन १८९१–९२.		सन १८९४–९५ चें बजेट.	
	जमा.	खर्च.	जमा.	खर्च.
राज्यव्यवस्था ...	...	१७९१३१७०	...	१९७९५०००
कायदा व न्याय...	६८७१४००	३७३९७३९०	७०२६०००	४००३९०००
पोलीस	३८१५४००	३८६८६१००	३९८८०००	४०४३००००
मरीन............	२२२४१४०	६२७९५१०	१३८२०००	६९८००००
विद्याखातें	२११७२४०	१४२४७९६०	२१३३०००	१५४५३०००
इक्लिझिआस्टिकल (धर्मसंबंधीं) ...	...	१६१५९६०	...	१८६७०००
मेडिकल–(वैद्यकसंबंधीं)	६३१०६०	८८४६८४०	७०३०००	१००५६०००
पोलिटिकल (राजकीय)	...	७६७७११०	...	९८४४०००
शास्त्रीय व किरकोळ.	९०२३३०	५८७४३८०	८८५०००	५१२८०००
बेरीज...	१६५६१५७०	१३८५३८४२०	१६११७०००	१४९५९२०००
निव्वळ खर्च १८९१–९२ ...	...	१२१९७६८५०	...	१३३४७५०००
निव्वळ खर्च १८८१–८२ ...	...	९६१५२९५०	...	...

किरकोळ सिव्हिल सदरांत पोलिटिकल पेनशन, रजेंतील पगार, पेनशन, स्टेशनरी, एक्स्चेंज (हुंडणावळ), भाडें, बक्षिसें, देणग्या वगैरे येतात. कायदा न्याय या सदरांत कोर्टें व तुरुंग या दोन सदरांचा समावेश होतो.

९. **दुष्काळ निवारणार्थ फंड.**—जमाखर्चाचे पद्धतीचे वर्णनानुसारें दुष्काळनिवारणार्थ पैशाचे संबंधानें कशा तजविजी करण्यांत आल्या आहेत तें सांगण्याचें आहे.

दुष्काळापासून या देशाचे जमाखर्चास वारंवार झोंके बसतात, हें वर सांगितलेंच आहे. दुष्काळासाठीं चांगले उत्पन्नाचे सालीं कांहीं रकम काढून ठेव-

ण्याची कल्पना सूळ लार्ड नार्थब्रुक यांचे कारकीर्दीत निघाली. त्यांनीं असें ठरविलें कीं दुष्काळ वारंवार पडणारच व ते पडत जातील त्या त्या वेळीं कर्ज काढल्यापासून नुकसान होतें; त्यासाठीं शिलक राहील त्या सालीं तींतून पूर्वीचें कर्ज कमी करावें, किंवा उत्पन्न करणारीं पब्लिक वर्क्सचीं कामें करावीं, व दुष्काळ पडेल त्या वेळीं असे प्रकारानें काढून ठेवलेले रकमेपर्यंत जरूर पडेल तितकें कर्ज काढावें. या ठरावांतील बेत लॉर्ड लिटनसाहेबांचे कारकीर्दींत रंगारूपास आला व त्याप्रमाणें अंमल सुरू झाला. सन १८७३ पासून १८७८ सालापर्यंत दुष्काळप्रीत्यर्थ साडेसोळा कोट रुपये खर्च झाला होता व हीं सालेंही मोठीं अनर्थाचीं होतीं. या वेळचे व पूर्वीचे दुष्काळांचे अनभवावरून सरकारांनीं असा कयास केला कीं दहा वर्षांत या कामासाठीं साडेपंधरा कोटि रुपये लागत जातील, व या रकमेच्या तजावजीसाठीं दरसाल निदान दीड कोटि रुपये दुष्काळनिवारणार्थ ह्मणून काढून ठेवले पाहिजेत. यासंबंधानें असा ठराव करण्यांत आला कीं दरसाल दीड कोटि रुपयांची रक्कम वजेटांत दाखल करीत जावी व तिचा विनियोग कर्ज फेडण्याकडे करावा किंवा त्या सालीं पाट-बंधारे व आगगाड्यांसाठीं कर्ज काढण्याचें असल्यास तितकं नवीन कर्ज कमी काढावें; ह्मणजे या व्यवस्थेचा परिणाम असा होईल कीं, दुष्काळ पडल्या वेळीं कर्ज काढावें लागलें तरी पूर्वीपेक्षां बोजा जास्त होणार नाहीं. या व्यवस्थेंत पुढे थोडा पालट करण्यांत येऊन असें ठरलें कीं, ही रक्कम नुसती कर्ज कमी करण्याकडेच न लावतां तीपैकीं कांहीं रक्कम दरसाल दुष्काळी प्रांतांत आगगाड्या व पाट-बंधारे करण्याकडे खर्च करीत जावी, ह्मणजे त्यांचे योगानें दुष्काळाचे वेळीं लोकांचे संरक्षणास चांगली मदत होत जाईल. ही रक्कम दुष्काळचा खर्च नसेल असे सालीं काढून ठेवण्याची आहे. दुष्काळ असेल त्या सालीं पीडित लोकांस मदत देण्याकडे तिचा खर्च पहिल्यानें होण्याचा आहे. हा खर्च नसेल किंवा तो भागून शिलक राहील ती रक्कम मार्गक्रमणाचे मार्ग सुधारण्याकडे किंवा कर्ज फेडण्याकडे लावण्याची आहे. या फंडापैकीं आगगाड्या करणें त्या सरकार स्वतः करतें किंवा कंपन्यांस मदत देऊन करवितें, व त्यासंबंधानें त्या कंपन्यांस नुकसानी झाल्याबद्दल ती रक्कम सरकार या फंडांतून देतें. सरकारास पैशाची टंचाई झाली ह्मणजे या कामांवर खर्चण्याची रक्कम फारच कमी करण्यांत येते असें अनेक वेळां झालें आहे. सन १८९१।९२ सालीं व गेले दोन सालीं या कामांसाठीं सर्व नियमित रक्कम देण्यांत आली होती. १८९४-९५ सालीं खर्चाचे अडचणीमुळें पाट-बंधारे व आगगाड्यांवर खर्च करण्याची रक्कम कमी करण्यांत आली आहे. सन १८९१।९२ सालीं दीड कोटि रुपये रक्कम या सद-

रांत खर्चण्यास काढली होती, तीपैकीं दुष्काळपीडितांस मदत ह्मणून रुपये २३४२३० खर्च झाले, आगगाड्यांकडे रुपये ८४७९५० व रुपये ७७९३१० पाटबंधाऱ्यांवर खर्च झाले. बाकी रुपये २३१६८१ आगगाड्यांचे जमेचे खात्यास नेण्यांत आले; कारण, दुष्काळनिवारणार्थ उपयोगी पडण्यासारखे दोन मोठाले आगगाड्यांचे मार्ग कंपन्यांकडून करविण्यांत आले अहेत. त्या सालीं रुपये ६८२१७०० कर्ज फेडण्याकडे लावण्यांत आले. १८९४–९५ चे बजेटांत या कामांपैकीं दुष्काळपीडितांस मदत व पाटबंधाऱ्यांसाठीं ह्मणून रुपये ४२३८००० दाखल करण्यांत आले आहेत.

कांहीं आगगाड्यांचे रस्ते सरकार या रकमेंतून किंवा कर्ज काढून न बांधतां चालू जमेंतून खर्च करून बांधतात. हे रस्ते लहान लहान प्रांतिक उपयोगाचे असे असतात व हा खर्च प्रांतिक कामांत दाखविण्यांत येतो. सन १८९११९२ सालीं हैदराबाद-उमरकोटरस्ता तयार करण्यासाठीं याप्रमाणें खर्च करण्यांत आला होता. सन १८९२१९३ सालीं असे प्रकारच्या आगगाड्यांवर रुपये ३३९४८७० खर्च झाला.

१०. **पब्लिक वर्क्स** खात्याचे संबंधानें पुढें स्वतंत्र भागांत माहिती देण्यांत येईल. येथें फक्त त्या खात्याचे जमाखर्चाचे संबंधानें मात्र सांगण्याचें आहे. या खात्यांतील खर्चांत तीन पर्याय असतात; चालू उत्पन्नांतून आगगाड्यांचे रस्ते करण्याबद्दल वर उल्लेख केलाच आहे. शिवाय कर्ज काढून त्यांतून कामें होतात त्यांत त्यांस क्यापिटल (भांडवली) अकाउंट ह्मणतात, व त्याबद्दल एक रेव्हिन्यु (जमेचें) खातें असतें. येथें या शेवटचे खात्यासंबंधानेंच सांगण्याचें आहे. सन १८९११९२ सालीं या खात्यांत निवळ खर्च रुपये ३१५८६४० आला, ह्मणजे जमा रुपये १९९३८०४६० व खर्च रुपये २०२५३९१०० झाला. यांत स्टेटरेल्वेपासून थोडा फायदा झाला; मदत दिलेले कंपन्यासंबंधें बहुतेक जमाखर्चाची बरोबरी झाली. व्याजाबद्दल हमी घेतलेल्या कंपन्यासंबंधानेंच काय तो खर्च पडला होता. १८९४–९५चे बजेटांत खर्च रुपये २२५३८३००० व जमा रुपये २०४०८४००० होईल असा अजमास धरला आहे. वाढ बहुतेक हुंडणावळीचे भावामुळेंच झाली आहे. हुंडणावळीचे पैसे पडत नसते तर खर्च वजा जाऊन सरकारास चांगली बचत राहती.

पाट-बंधाऱ्याचे कामाचे दोन वर्ग आहेत. मेजर ह्मणजे जीं कर्ज काढलेले

पैशांतून होतात व ज्यांचेबद्दल जमेचा हिशेब ठेवलेला असतो तीं; दुसरा वर्ग ह्मणजे लहान कामें. १८९१-९२ सालीं मेजर (मोठीं) कामांची जमा रुपये २०७७९२६० झाली होती, पैकीं रुपये ६७३१८९० ही रक्कम जमीनबाबीपैकीं या खात्यांत हिस्सेरशी जमा करण्यांत येते ती होती. खर्च रुपये १८७११२३० झाला होता. तेव्हां या कामांत तोटा नाहीं. किरकोळ कामांत जमा रुपये १९४११४० व खर्च रुपये १०७३८९६० होता. या खात्यास हुंडणावळीचा खर्च नाहीं. विहिरी सरकारमार्फत बांधण्यांत येत नाहींत. त्या बांधण्यासाठीं लोकांस तगाई देण्यांत येते. महत्वाचे कामांसाठीं मात्र खर्चाचे रकमेचा व चालू जमेच्या रकमेचा वेगळा हिशेब ठेवण्यांत येतो. लहान कामांचा असा वेगळा हिशेब ठेवण्यांत येत नाहीं. लहान कामें बांधण्याचा खर्च चालू जमेंतून होतो.

आगगाड्या, पाट-बंधारे यांचेशिवाय या खात्याची तिसरी शाखा रस्ते व इमारती तयार करणारें खातें ही आहे. यांत लष्करी व सिव्हिल असे दोन भाग आहेत; त्यांपकीं लष्करी पब्लिकवर्क्स खात्याबद्दल पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे, व सिव्हिल भागाबद्दल पुढें पब्लिकवर्क्स खात्याचे भागांत सागण्यांत येईल. सन १८९१-९२ सालीं या खात्यामार्फत खर्च किती झाला होता व चालू साला याबद्दल किती रक्कम दाखल आहे तें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल.

	जमा रुपये.	खर्च रुपये.
मिलिटरी वर्क्स	४९७९४०	१२१४५१८०
सिव्हिल वर्क्स	५७७३३००	४९९४२३४०
	६२७१२४०	६२०८७५२०

१८९४-९५ सालचे बजेटांत या खर्चाबद्दल तजवीज केली आहे. त्याचा तपशील पुढें लिहिल्याप्रमाणें.

मिलिटरी वर्क्स	४६८०००	१००६८०००
सिव्हिल वर्क्स......... ...	५८२४०००	४४८२३०००
	६२९२०००	५४८९१०००

१८९४-९५ सालीं रस्त्याकडे रकम कमी दाखल करण्यांत आली आहे. त्याचें कारण पैशाची तूट हेंच आहे.

११. **लष्करी** खात्यासंबंधानें मागील भागांत सांगितलेंच आहे. सन १८८५-८६ सालीं सैन्य जास्त वाढविल्यानें खर्च वाढला. त्याच सालीं हुंडणावळीचाही खर्च वाढला. सन १८८३-८४ सालीं ब्रिटिश सैन्याचें पेनशन व फरलो वगैरेबद्दल पैशाची बाकी वसूल करण्यांत आली यामुळें खर्च वाढला होता. पुढील पत्रकांत सन १८९१-९२ सालाबद्दल आंकडे दिले आहेत, व तुलनेसाठीं सन १८८१-८२ सालाचे आंकडे दिले आहेत; व शिवाय मध्यंतरीं खर्चाची वाढ झाली त्या सालाचे आंकडे दिले आहेत. आंकडे दहा हजार रुपयांचे आहेत.

साल.	हिंदुस्थानांत खर्च	विलायतेंत खर्च	हुंडणावळ	बेरीज	चालू नौकरीबद्दल खर्च	पेनशन, रजा वगैरेबद्दल खर्च.
१८८१-८२ (१)	१३२१८	३९९७	८२४	१८०४०	१४६१५	३४२५
१८८३-८४ (१)	११९०४	५०१७	११४७	१८०६८	१३१४६	४९२१
१८८५-८६	१५२४७	३६८९	११६१	२००९७	१७०३८	३०५९
१८९१-९२ (२)	१५७४१	४५५९	१९८०	२२२८०	१८२५७	४०२३
१८९४-९५ (अंदाज) (२)	१६१६९	४४२८	३१६२	२३७५९	१८८०७	४९५२

(१) अफगाणिस्थानांतील लढाईचा खर्च वजा करून (२) स्पेशल डिफेन्स वर्क्सचा खर्च वजा करून.

एकंदरींत हल्लीं खर्च वाढत आहे त्यास कारणें हुंडणावळ व हुंडणावळीपासून होणारे नुकसानीचे कारणासाठीं दिलेली नेमणूक, व्हालंटिअर पलटणांची वाढ, खाण्याचे पदार्थांची महागाई, व गिलजित येथील ठाणें ठेवणें हीं आहेत. लष्करी सामान पूर्वी विलायतेहून येत असे तें या देशांत करण्याची तजवीज होत आहे, यामुळें विलायतेंत येणारा खर्च कमी होत जाऊन हिंदुस्थानांतील खर्च वाढत आहे. सन १८८६-८७ सालापासून नवीन प्रकारचीं हत्यारें देण्याचें सुरू झाल्यामुळें खर्च वाढला होता, तो आतां हीं हत्यारें देण्याचें काम झाल्यानें

कमी होईल. हा खर्च कमी होईल त्याचे मोबदला पगाराची मागील बाकी विलायतसरकारांस द्यावी लागते, ती व पेनशन व रजेचा पगार वगैरे कारणांनीं खर्च वाढत जाईल.

विशेष बंदोबस्ताचे कामावर एकंदर पांच कोटि तीन लक्ष खर्च होण्याचा, त्यापैकीं १८९३-९४ अखेर चार कोटि तीस लक्ष खर्च झाला आहे. १८९४-९५ सालीं रुपये १५२३००० खर्चासाठीं दाखल केले आहेत व बाकी रुपये ५६९८२७० पुढें खर्च होण्याचे आहेत.

१२. वर प्रांतिक सरकारांकडे खर्चास दिलेले रकमांचा पांच वर्षांचा ठराव होतो ह्मणून सांगितलें आहे. येथें खर्चाकडील शेवटचें सदर जें प्रांतिक सरकारांस देण्याची किंवा त्यांचेकडून येण्याची रकम ह्मणून दाखल आहे, त्यासंबंधानें प्रत्येक प्रांतिक सरकाराकडे खर्चास किती रकम असते हें सांगण्याचें आहे. ती माहिती येणेंप्रमाणें.

प्रांत	जमा—जमेचे कांहीं बाबींपैकीं हिस्सा.	खर्च	तूट भरतीस येण्याची किंवा फाजील देण्याची रकम.	एकंदर जमा.
	दहा रुपये	दहा रुपये	दहा रुपये	दहा रुपये.
मद्रास	२४७९३००	२८०४७००	३२५४००	२८०४७००
मुंबई	३१२३९००	३८९५३००	७७१४००	३८९५३००
बंगाल	४२४९३००	४१०५४००	—१४३९००	४१०५४००
नार्थवेस्टर्न प्रांत	३४०३५००	३१५२९००	—२५०६००	३१५२९००
पंजाब	१३७०४००	१७१८९००	३४८५००	१७१८९००
मध्यप्रांत	५६७६००	७८८१००	२२०५००	७८८१००
आसाम	६५७७००	५४५०००	—११२७००	५४५०००
खालचा ब्रह्मदेश.	१४२७५००	१८४१८००	४१४३००	१८४ ८००

वरचा ब्रह्मदेश घेतल्यावर त्या प्रांताची सन १८८६।८७ सालीं जमा रुपये २२२५००० व खर्च रुपये २२९१२००० होता ; ह्मणजे निवळ जास्त खर्च रुपये २०६८७००० चा झाला होता. तेव्हांपासून जमा वाढत चालली आहे. सन १८९१।९२ सालीं जमा रुपये १११५३००० झाली व खर्च रुपये २५०७२००० झाला, ह्मणजे निवळ जास्त खर्च रुपये १३९१९००० झाला. दुष्काळ व सामंतांतील लढाया वगैरेंनीं हा खर्च प्रसंगोपात वाढत जाणार आहे.

येथपर्यंत जमा व खर्चांचे बाबींचे संबंधानें हकीकत संक्षिप्त रीतीनें सांगण्यांत आली. आतां या विषयाशीं संबंध असणाऱ्या तीन विषयांची ह्मणजे नाणें, कराचा बोजा, व प्रांतवार जमाखर्चाची फोड यांबद्दल थोडक्यांत माहिती सांगण्याची आहे.

१३. या देशांतील नाणें कोणते प्रकारचें आहे तें सांगण्याची जरूर नाहीं. पैशापासून रुपयापर्यंत धातूचें नाणें हें सर्वांनीं पाहिलेलेंच आहे. सन १८९३ सालचे कायद्याप्रमाणें आतां पौंड हें कायदेशीर नाणें झालें आहे. त्याचें वजन व त्यांत खरें सोनें किती व हीण किती हेंही कायद्यानें नियमित झालेलें आहे. नोटा-(कागदी नाणें)-हेंही सर्वांनीं पाहिलेलेंच आहे. सर्वांत खालचे प्रतीची नोट ह्मणजे पांच रुपयांची असते व जास्त किमतीची नोट ह्मणजे दहा हजार रुपयांची असते. दरम्यान दहा, वीस, पन्नास, शंभर, पांचशें व हजार रुपयांच्या अशा नोटी असतात. कागदी नाणें जितके रुपयांचें असेल तितके किमतीची चांदी किंवा नाणें सरकारचे जवळ शिलक असावें असा नियम आहे. ह्यापैकीं कांहींच्या प्रामिसरी नोटी घेऊन ठेवलेल्या असतात. सन १८९३ सालच्या मार्चांत २६ कोटि ४० लक्ष रुपयांच्या नोटी चालू होत्या. सन १८७२ पासून १८८८ पर्यंत १२ कोटींपासून १६ कोटींपर्यंत रुपयांच्या नोटी चालू होत्या. सन १८९१ पासून नोटी वाढविण्यांत आल्या. या नोटी काढण्याचीं कलकत्ता, मद्रास, मुंबई, अलहाबाद, लाहोर, कराची, रंगून, कालिकत अशीं आठ ठिकाणें आहेत.

१४. जमेच्या बाबींपैकीं कांहीं अर्थशास्त्रदृष्ट्या कराच्या स्वरूपाच्या आहेत, व कांहीं नाहींत. कराचा बोजा माणशीं किती पडतो तें पुढील पत्रकावरून दिसून येईल; व त्याचे पुढें कराच्या स्वरूपाच्या नाहींत अशा कांहीं बाबी आहेत त्यांचा बोजा माणशीं कसा बसतो तें दाखविलें आहे.

सदर	दरमाणशीं बोजाचें प्रमाण. १८८१-८२	१८९१-९२
अ–कराच्या स्वरूपाच्या बाबी.		
(१) मीठ.	०·३७६	०·३९६
(२) स्टांप.	०·१७२	०·१९५
(३) मादक पदार्थ.	०·१७५	०·२३४
(४) प्रांतिक कर.	०·१४८	०·१६०
(५) कस्टम.	०·१२०	०·०७८
(६) आकारलेले कर.	०·०२७	०·०७६
(७) नोंदणी.	०·०१५	०·०१८
(अ) ची बेरीज.	१·०३३	१·१५७
ब–जमेच्या इतर बाबी.		
(१) जमीनबाब.	१·११९	१·०९८
(२) जंगल.	०.०४५	०.०६८
(३) अफू.	०·५०२	०·३६७
(४) खंडण्या.	०.०३६	०·०३६
(ब) ची बेरीज-	१·७०२	१·५६९
दोन्ही सदरांची बेरीज.	२·७३५	२·७२६

ही कराची सरासरी साधारण हिशेबांत दिसण्याचीच आहे; कारण सर्व लोकांवर विनचुक बसणारा कर ह्मणजे काय तो मिठाचाच आहे; त्याशिवाय बाकीचे कर कारणा-कारणानेंच द्यावे लागतात. अफू व खंडण्याबद्दलची रकम, ब्रिटिश प्रजेकडून येत नाहीं. ज्याला जमीन नाहीं, घर नाहीं, जो खेड्यांत राहतो त्याजला या बहुतेक करापासून मुक्तता आहे; तेव्हां खरा ज्यांस कर द्यावा लागतो त्यांस या पत्रकांतलेपेक्षां दरमाणशीं जास्त कर द्यावा लागतो.

१५. या विषयाशीं संबंध असणारी तिसरी बाब ह्मणजे वर ज्या जमा व खर्चाच्या बाबी सांगितल्या आहेत त्यांचा प्रांतवार कसा हिशेब आहे तें सांगण्याचें आहे. त्याबद्दल पुढें पत्रक दिलें आहे. आंकडे हजार रुपयांचे आहेत.

प्रांत	जमा हजार रुपये. १८९१-९२				खर्च हजार रुपये. १८९१-९२			
	एकंदर जमा	इंपीरियल	प्रांतिक	स्थानिक	एकंदर खर्च	इंपीरियल	प्रांतिक	स्थानिक
मद्रास...	११३६८०	७४५३४	२८७६९	१०३७६	९३९१६	५४७७०	२८५४४	१०६०१
मुंबई...	१३१९७६	८७०२६	४०४५१	४४९८	८७६४१	४२६९२	३९८३७	५११२
बंगाल...	१९८३८७	१३५३६६	५७८०१	५२१९	८९७५४	२६७३३	५६९२३	६०९७
वायव्य प्रांत व अयोध्या	११०४२६	६८६२९	३३५६४	८२६२	५१५९३	९७४६	३०९३१	१०८६१
पंजाब...	७८७१५	५७१५२	१७५००	४०६२	४८३३६	२६७७३	१७९३४	३६२९
मध्यप्रांत	२३५०३	१४२०१	८१८७	१११४	१४६०४	५३०२	८११९	११८२
आसाम...	१०३९३	३८३३	५७८८	७७१	७४९४	९३४	५५९९	९६१
ब्रह्मदेश...	५०८४८	३२६५०	१६६४९	१५४९	३९१४७	२०९४९	१६६२४	१५७४
हिंदुस्थान सामान्य	१६९८०१	१६९६५७	...	१३३	२२५१९७	२२५०६४	...	१३३
हिंदुस्थानची बेरीज ...	८८७७३३	६४३०६१	२०८७१३	३५९५८	६५८६३८	४१२९६६	२०४५१३	४०१५८
विलायतेंतील	२५७९	...	...	...	१५९७४६	...	...	...
हुंडणावळ...	११२०	...	...	...	६९३७२	...	...	...
एकंदर बेरीज	८९१४३२	६४३०६१	२०८७१३	३५९५८	८८६७५७	४१२९६६	२०४५१३	४०१५८

विलायतेंतील खर्चाचा प्रांतिक जमाखर्चाशीं संबंध नाहीं, परंतु ते आंकडे फक्त या पत्रकाचा व या भागाचे प्रारंभीं दिलेले पत्रकाचा मेळ पडण्यासाठीं दिले आहेत.

या भागांतील प्रारंभींचे पत्रकांतील तिसरे भागासंबंधानें थोडी माहिती सांगून हा भाग आटपण्याचा आहे.

१६. आगगाड्या व पाटबंधारे कर्ज काढून त्या भांडवलानें सरकार करतात हें वर सांगितलें आहे, व त्याबद्दल पब्लिकवर्क्सचे भागांत विशेष विस्तारानें सांगण्यांत येईल. याप्रमाणें कर्ज काढलेले रकमेबद्दल सदरचे पत्रकांत पहिली रकम आहे. दुसरी रकम कर्जाबद्दल आहे. हें कर्ज सन १८९३ चे मार्च महिनाअखेर हिंदुस्थानांत रुपये १०२९३७५५२ चें होतें व विलायतेस पौंड १०७४०४०१४३ इतकें होतें. रुपयांत कांहीं कर्ज आहे व कांहीं पौंडांत आहे. त्यापैकीं रुपयांतील कर्ज हिंदुस्थानांतील लोकांकडे सुमार ३० टक्के होतें. या कर्जापैकीं सन १८९१ अखेर कर्ज शिलक होतें त्याची फाळणी पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.

आगगाड्यांसाठीं रुपये	... ...	१०५७७२८५६०
पाटबंधाऱ्यांसाठीं रुपये	... ...	२८३२०७०४०
इतर कामांसाठीं रुपये	... ...	७६००२९०००
बेरीज	... ...	२१००९६४६००

आगगाड्या किंवा पाटबंधाऱ्यांसाठीं काढलेलें कर्ज खर्च होईपर्यंत कर्जाचे सदरांत दाखविलें असतें, व तीं कामें झाल्यावर तें कर्ज त्या कामाचे भांडवलाचे सदरीं जातें. प्रत्यक्ष काढलेले कर्जाशिवाय साव्हिंग ब्यांकांचे पैसे किंवा दुसरे ठेवींचे शिलकेंतून हीं पब्लिकवर्क्सचीं कामें करण्यांत येतात व त्याप्रमाणें खर्च झालेल्या रकमा त्या कामाचे भांडवलाचे सदरीं जातात. याप्रमाणें या पैशांचा विनियोग झालेले पैशाचें व्याज उत्पन्नांतून येतें व त्यामुळें कर्जाचे व्याजाबद्दलचा खर्च कमी होत चालला आहे.

लोकमत—येथपर्यंत जमाखर्चाचे संबंधानें हिंदस्थानची स्थिति कशी आहे तें सांगितलें. आतां या भागांतील कांहीं मुद्यांचे बाबतींत मतभेद आहे त्यासंबंधानें सांगून हा भाग संपविण्याचा आहे.

१ कराचे बोजासंबंधानें असें ह्मणणें आहे कीं लोकांस तो सोसण्याचें जितकें सामर्थ्य आहे तितका तो होऊन गेला आहे व हल्लीं जमेच्या मुख्य बाबी आहेत त्यांपासून जास्त वसूल होण्यासारखा नाहीं. याप्रमाणें १४ वर्षांपूर्वी फासेटसा-

हेवांनीं प्रतिपादन केलें होतें व हर्शेलकमिटींतही करांपासून आणखीं उत्पन्न होण्यासारखें आहे किंवा नाहीं याबद्दल विचार झाला ; त्यांनीं दिलेले अभिप्रायाचा गोषवारा खालीं दिला आहे तो फासेटसाहेबांचे मतास अनुसरून आहे.

" जास्त कर बसविणें शक्य आहे किंवा कसें.

जमीनबाब—हिंदुस्थानांतील जमीन धारण करणारे लोकांस चांदीचा भाव उतरल्यामुळें फायदा झाला आहे. तेव्हां त्यांचेवर कर बसविणें स्वाभाविक आहे, परंतु त्या जमिनीचा कर एकचतुर्थांश कायमचा ठरलेला आहे व बाकीचाही अलिकडेच ३० वर्षांचे मुदतीचा ठरलेला असलेमुळें जमिनीचे धारे वाढवून वसूल वाढविण्यास साधन नाहीं.

मिठ वर कर–ह्या कराचे अयोग्यतेबद्दल आतां मतभेद नाहीं. तो सर्व लोकांवर व विशेषतः गरीब लोकांवर जास्त बसतो. हल्लींचेपेक्षां तो एकपंचमांशानें वाढविला तरी उत्पन्न रु. १५०००००० होईल. लढाईचे किंवा दुसरे जरुरीचे प्रसंगीं पैसे उभारण्यास या कराचा उपयोग होण्यासारखा आहे, तेव्हां हा कर हल्लींच वाढवून त्या जरुरीच्या प्रसंगास उपयोगीं पडणारें साधन नाहींसें करून टाकणें योग्य नाहीं.

शिंपाचा कर—हा न्यायमनसुब्याचे संबंधानें कर आहे तो वाढवितां येत नाहीं.

दारू–अपकारीचा करही वाढवितां येत नाहीं; कारण कीं त्यापासून विशेष उत्पन्नही होणार नाहीं व चोरून दारू करण्यास उत्तेजन येईल व त्यामुळें त्या व्यसनाचा जास्त प्रसार होईल.

आयात मालावर जकात घेण्यास झालेले धराव्यावरून तकरार दिसत नाहीं. तरी तो कर बसविण्यास विलायतेंत हरकती घेण्यांत येतील व हिंदुस्थानांत तयार होणारे मालावर जकात बसवावी अशी उलटी तकरार करण्यांत येईल. मुंबई वगैरे ठिकाणीं होणारे गिरण्यांतील मालावरही जकात सहज घेतां येईल, परंतु देशभर जे लहान लहान कारखाने आहेत त्यांचेकडून कर वसूल करून घेणें अशक्य आहे.

निर्गत मालावर जकात—निर्गत मालावर जकात बसविण्यास हरकती पुष्कळ आहेत. अशा प्रकारची जकात हल्लीं तांदुळावर मात्र आहे ती वाढविणें अशक्य आहे.

प्राप्तीवरील कर—दुप्पट केला तरी हल्लींचेपेक्षां रु. १५०००००० जास्त उत्पन्न होतील. समजूतदार लोकांत त्यामुळें असंतोष उत्पन्न होईल व रुप्याचा भाव उतरल्यामुळें ज्या लोकांचें नुकसान होत आहे त्याच लोकांचें यांत जास्त नुकसान होईल.

नवीन कर.–ज्या वस्तूंवर कर बसवून कांहीं रकम घेण्यासारखी आहे त्या तंबाखु व साखर या आहेत. हे पदार्थ हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं थोडे थोडे करण्यांत यतात, तेव्हां तो कर वसूल करण्यांत लोकांस त्रास फार होईल व त्यास खर्चही फार लागेल. वारसा प्राप्त झाला असतां त्या इष्टेटीवर कर घेण्यास हिंदुस्थानांतील वारसाचे कायद्याची पद्धति फार तऱ्हेवाईक आहे यामुळें अडचण व त्यापासून बरीचशी रकम वसूल हाईल किंवा कसें यासंबंधानें शंकाच आहे.

एकंदरींत विचार पाहतां ज्या लोकांवर योग्य रीतीनें कर बसवितां येईल तशा लोकांवर कर बसवून व कराचे बाबतींतील तत्वांस अनुसरून कर बसवून रुप्याचे किमतींत तफावत झाल्यामुळें जें नुकसान झालें आहे तें भरून काढण्याइतकी रकम वसूल होईल असें मानण्यास अडचणी आहेत."

२. हिंदुस्थानचा खर्च वाढत चालला आहे व तो उत्पन्नाचे वाढीचे प्रमाणापेक्षां जास्त प्रमाणानें वाढत आहे, यामुळें खर्चांत तूट येत आहे. खर्चांत वाढीच्या बाबी दोन आहेत, सिव्हिल व लष्कर खर्चाची वाढ व हुंडणावळीचे खर्चांत वाढ. चालू सालचे बजेटाचे वेळेस नामदार सर वेस्टलंड साहेबांनीं जमाखर्चाचा असमाधानकारक स्थिति होण्यास हुंडणावळीचा खर्च हें एकच कारण आहे असें सांगितलें ; परंतु कांग्रेसकमिटीनें यासंबंधानें पार्लमेंटचे सभासदांस एक पत्र लिहिलें त्यांत त्यांनीं असें दाखविलें कीं (१) जमेच्या मुख्य ११ बाबींपासून होणारे उत्पन्नांत जी गेले १० वर्षांत वाढ झाली आहे, त्यांतून हुंडणावळीबद्दल जी जास्त रकम लागत आहे ती भागून, तितकीच रकम आणखी शिलक राहते. यावरून असें होतें कीं, हुंडणावळीबद्दल जास्त खर्च वाढल्यानेंच हिशेबांत तूट आलेली नाहीं किंवा तसें होण्यास तें महत्वाचें कारण आहे असेंही ह्मणतां येत नाहीं. (२) त्या दहा वर्षांचे मुदतींत सिव्हिल व लष्करी खर्चाची वाढ जवळ जवळ नऊ कोटि रुपये झाली आहे ; व तो हुंडणावळी सुद्धां एकंदर बारा कोटि सतरा लक्ष रुपयांवर वाढला आहे. या खात्यांशिवाय इतर ज्या खर्चाच्या बाबती ह्मणजे पोष्ट व दुसरीं खातीं, व्याज, आग-

गाड्या, दुष्काळनिवारण, पाटबंधारे इ० इ० यांचा खर्च चार कोटि पांसष्ट लक्षांनीं कमी झाला आहे. एकंदरींत जमेच्या बाबीपासून होणारें जास्त उत्पन्न व इतर खर्चाच्या बाबतींत होणारा कमी खर्च यापासून जो फायदा झाला आहे तो सर्व सिव्हिल व मिलिटरी खर्चाचे वाढीचे भरीस जाऊन शिवाय ९७ लक्ष रुपयांची तूट शिलक रहाते. यावरून असें होतें कीं, हल्लींच्या तुटीस कारण सिव्हिल व मिलिटरी खर्चांत वाढ हेंच आहे.

माजी फायनॅन्स मिनिस्टर सर डेव्हिड बार्बर यांनीं गेल्या मे महिन्यांत एका प्रसंगीं असें बोलून दाखविलें कीं, 'हिंदुस्थानच्या तिजोरीची त्रेधा उडण्याचीं खरीं कारणें शोधलीं असतां तीं पुढें दिल्याप्रमाणें आहेत असें दिसून येईल. १ पाश्चात्य धर्तीवरच सारी राज्यव्यवस्था चालविल्यामुळें होणारा अनावर खर्च ; २ लोकांची संख्या आधींच मोठी व तीही दरिद्री ; ३ कर बसविण्याची बहुतेक होऊन गेलेली परमावधी ; ४ उत्पन्नाची वाढ थोडी आणि त्यावर मागण्या बेसुमार ; ५ उत्पन्नापेक्षां अधिक खर्च करण्याकडे नेहमीं असलेली प्रवृत्ति ; ६ हिंदुस्थानची राज्यपद्धतीच अशी आहे कीं खर्च वाढावयाचा झाला कीं, त्यास सर्व अनुकूल, पण काटकसरीचें नांव विघालें कीं जो तो उलट ; ७ जमाखर्चावर इंग्लंडच्या किंवा हिंदुस्थानच्या लोकमताच्या दाबाचा अभाव ; ८ उत्पन्नाची नेहमीं होणारी चलबिचल ; ९ आधींच डोईजड झाला असून एकसारखा वाढत जाणारा येथून इंग्लंडास करावा लागणारा पैशाचा भरणा.' अक्टोबरच्या नाइन्टीन्थ सेंचरीमध्यें सर ऑकलंड कालव्हिन यांनींही वरच्याप्रमाणेंच आपलें मत प्रदर्शित केलें आहे.

जमेच्या बाबींचे संबंधानें वर्णन स्वतंत्र भागांत आहे. तेव्हां त्यांचे संबंधानें ज्या तकरारी आहेत त्या त्या त्या वर्णनाचे पुढें देण्यांत येतील. खर्चाचे बाबींपैकीं ज्यांचे संबंधानें इतर ठिकाणीं वर्णन नाहीं अशा कांहीं बाबी आहेत त्यांसंबंधानें मात्र या भागांत पुढें सांगण्यांत येत आहे.

३. **दुष्काळनिवारणार्थ फंड**—हा फंड काय कारणासाठीं व काय हेतु धरून काढला तें वर सांगितलेंच आहे. सरकारास पैशाची टंचाई झाली म्हणजे दुष्काळनिवारणार्थ कामांवर खर्च करण्याचा पैसा सरकार दुसरे कामांकडे लावतात, हा तकरारीचा मुख्य मतलब आहे. या पक्षाचें म्हणणें असें आहे कीं, हा फंड करण्याचें ठरविलें त्या वेळीं त्याच कामांसाठीं म्हणून नवीन कर बसविण्यांत आले होते व त्यांचें उत्पन्न याच कामांप्रीत्यर्थ खर्च होईल असें सरकारांनीं वचन दिलें होतें. या तकरारीचे पुष्टीकरणार्थ १२ मार्च १८७८ रोजीं लार्ड लिटन यांनीं मिनिट लिहिलें आहे त्याचा आधार दाखविण्यांत येतो. त्या

मिनिटांत लार्ड साहेबांनीं असें लिहिलें आहे कीं, "नवीन कर नुकताच बसविण्यांत आला त्याचें मुख्य कारण ह्मणजे दुष्काळापासून जे हाल होतात त्यांचें निवारण करावें, व हाल न होतील अशी तजवीज योजावी हें होतें, व ह्या हेतूमुळेंच हा कर बसविणें न्याय्य होतें. या कामासाठीं दरसाल दीड कोटि रुपये देण्यांत येतील असें पूर्वीं वचन दिलेंच आहे, व लोकांस असेंही सांगण्यांत आलें आहे कीं, त्या कराचे पैसे सरकारास राज्याचे चैनीचे खर्चासाठीं किंवा नित्य खर्चासाठीं नको आहेत, दुष्काळाचें निवारण करण्यास उपयोगीं होतील, अशीं पब्लिक वर्क्सचीं कामें करण्यासाठीं हे पैसे पाहिजे आहेत, व याप्रमाणें वसूल केलेले पैशांपैकीं एक रुपयाही दुसरे कामाकडे खर्च केला जाणार नाहीं."

गेले सोळा वर्षांत या कारणासाठीं वसूल केलेले पैशांपैकीं सहा वर्षें रकम दुसरे कामाकडे घेण्यांत आली, व दोन सालीं ठरलेले रकमेपैकीं एकतृतीयांश रकम खर्च झाली; ह्मणजे किरकोळ गोष्टी सोडून दिल्या तरी एकंदर सोळा वर्षांत ठरलेले रकमेपैकीं एकतृतीयांश रकम कमी खर्च करण्यांत आली, असें लोकपक्षाचें ह्मणणें आहे. सन १८९४ सालीं जमाखर्चाचे अंदाजाचा विचार लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांत झाल्या वेळीं यासंबंधानें सरकारांनीं आपले विचार प्रकट केले. त्यांतील महत्वाचे मुद्दे असे आहेत कीं (१) सर जॉन स्ट्रॉची यांनीं दुष्काळफंड सुरू करते वेळीं असें सांगितलें होतें कीं, ती रकम दुष्काळापासून संरक्षण होण्यासाठीं जरूर तितकीं सर्व कामें झालीं, असें अनुभवानें दिसून येईपर्यंत देण्यांत येईल. (२) फ्यामिनकमिशननें वीस हजार मैल आगगाडी झाली ह्मणजे दुष्काळापासून बचाव होण्यास व अन्नाचा पुरवठा होण्यास पुरे होईल, असें सांगितलें होतें; व कोणते भागांतून आगगाड्या जास्त जरूरीनें झाल्या पाहिजेत, त्या सुचविल्या होत्या; त्याप्रमाणें बहुतेक काम पुरें झालें आहे. अलीकडे जे लहान लहान दुष्काळ पडले, व त्या वेळीं जी स्थिति झाली, व जे उपाय योजावे लागले त्यांवरून पहातां आतां सन १८७७ सालचे दुष्काळाप्रमाणें प्रसंग येणारच नाहीं असें वाटतें.

(३) पूर्वींच्या इतका यापुढें खर्च करण्याचें कारण नाहीं. शिलक असेल त्या सालीं या कामावर खर्च साधेल तितका जास्त करण्यांत यावा.

(४) गेले तेरा वर्षांत या कामावर पंधरा कोटि साठ लक्ष रुपये खर्च करण्यांत आला. त्याचा तपशील—

दुष्काळपिडितांस मदत रुपये	२९४००००
दुष्काळापासून संरक्षणार्थ आगगाड्या	५४८३००००

पाटबंधारे..............	१७३२००००
बंगाल, नागपूर व मिडलंड आगगाड्यांचे रस्ते	२७७२००००
कर्ज फेडणें...........	५३२७००००
एकूण रु.......	१५६०८००००

(५) वचनें देतेवेळीं त्या वेळचे अंमलदारांचा हेतु आपलेनंतर येणाऱ्या अंमलदारांस बांधून टाकण्याचा नव्हता, व तसें बांधून टाकणें शक्यही नाहीं.

४—लष्करी खर्च वाढला आहे त्यासंबंधानें लोकमत कसें आहे तें लष्कराचे भागांत सांगण्यांत आलेंच आहे.

५—पब्लिक वर्क्स खात्याचा खर्च उधळपट्टीनें चालतो व कर्ज काढून केलेले पब्लिक वर्क्सचे कामांपासून उत्पन्न न होतां नुकसानच होतें अशा पूर्वी तक्रार होती; परंतु हल्लीं ती स्थिति पालटली आहे. हल्लीं त्या कामांपासून होणारे उत्पन्नांतन व्याजाची रक्कम भागून कांहीं थोडा फायदाही शिलक रहातो, असें पब्लिकवर्क्सचे संबंधाचे भागांत दिलेले माहितीवरून दिसून येईल.

६—एक्स्चेंज कांपेनसेशन—सन १८९३ सालचे आगस्टांत हिंदुस्थानसरकारांनीं युरोपियन व युरेशियन नौकर लोकांस (जे हिंदुस्थानचे कायमचे रहिवाशी झालेले नाहींत अशांस) हुंडणावळीचा भाव वाढल्यापासून त्यांचें होत असलेलें नुकसान भरून येण्यासाठीं कांहीं रक्कम देण्याचें ठरविलें. या नोकर लोकांस आपला निंमे पगार (त्यांस सालाची १००० पौंडांची मर्यादा करविली आहे.) विलायतेस पाठविण्यास दर रुपयास एक शिलिंग सहा पेन्स धरून जी रकम लागली असती व चालू दराप्रमाणें पाठविण्यास जी रकम जास्त लागते, या दोहों रकमांतील फरक सरकारानें देण्याचें ठरविलें आहे. या खर्चासाठीं १८९४–९५ चे अंदाजांत १११३३००० रुपये धरले आहेत.

यासंबंधानें हर्शेलकमिटीनें असे प्रकारें रक्कम देण्यास अनुकूल असा अभिप्राय दिला आहे. या बाबतींत रयतेचे तर्फेचे लोकांची तक्रार अशी आहे कीं, रक्कम देण्याची कायद्यावरून सरकारावर जबाबदारी नव्हती; ती रक्कम देतांना सन १८८६ सालापूर्वी व त्या सालानंतर नोकरींत शिरलेले लोकांत फरक केला नाहीं; हिंदुस्थानांत वाढलेले युरेशिअन लोकांसही ही रक्कम देण्याचें ठरविलें आहे. तसेंच विलायतेस पैसे पाठविण्याचे असले किंवा नसले तरी ही रक्कम देण्याचें ठरविलें आहे. विलायतेंत पूर्वीपेक्षां आतां स्वस्ताई झाली आहे, कर बसवून ही रक्कम सरकारानें आपले नोकरांस देणें

योग्य नव्हतें ; ज्याप्रमाणें रयत लोक नवीन कराचा जास्त भार सोशीत आहेत त्याप्रमाणें सरकारी नोकरांनींही नुकसान सोसणें जरूर होतें. या तकरारीस उत्तर असें देण्यांत आलें आहे कीं, वरिष्ठ प्रतीचे सर्व जागांवर व लष्करांत युरोपियन लोक असलेच पाहिजेत. त्यांचे पगार ठरविण्यांत आले त्या वेळेपेक्षां आतां रुपयाची किंमत निमेचे जवळ जवळ आली आहे ; त्यांस युरोपांतील माल पुष्कळ घ्यावा लागतो व त्यांस युरोपाशीं आपला संबंध तोडतां येत नाहीं ; हुंडीचा भाव वाढल्यानें या नोकर लोकांचें नुकसान होत होतें, व त्यामुळें पुष्कळ लोकांची निराशा झाली होती; त्यांस घरखर्चास अडचण पडे व त्यामुळें सरकारी काम करण्याचा उत्साह व स्वतंत्रता कमी झाली होती. सरकारी नौकरांचे वजनावर राज्यकारभार चालण्याचा आहे, व तें वजन खर्चीत टंचाई झालेले इसम चें रहाणार नाहीं; विलायतेस जे जिन्नस स्वस्त झाले आहेत त्यांची जरूर प्रपचखर्चांत फारशी नसते; व एकंदरींत विलायतेंतील राहण्याचा खर्च कमी झालेला नाहीं वगैरे.

६—जमाखर्चाची स्थिति सुधारण्यासाठीं उपाय सुचविण्यांत आले आहेत ते.

(१) राज्यव्यवस्थेचा खर्च कमी करणें.

(२) हल्लीं मोठाले पगारांवर युरोपियन लोक आहेत त्या जागांवर हल्लींपेक्षां जास्त नेटिव्ह लोक नेमणें.

(३) सैन्याचा खर्च कमी करणें व त्याची व्यवस्था वेगळे तऱ्हेवर करणें व हिंदुस्थानचे हद्दीचे बाहेर होणारे स्वाऱ्यांचे खर्चाचा भाग विलायतसरकारानें देणें.

(४) सारा कायम करणें.

राज्यव्यवस्थेचे खर्चाचे बाबतींत विचार करण्यासाठीं लवकरच हाऊस आफ कामन्सची एक कमिटी बसणार आहे, तेव्हां या विषयाचा सर्व विचार होईलच. तोंपर्यंत ह्या विषयावर असें वर्णनात्मक पुस्तकांत कांहीं देतां येत नाहीं.

दुसरे उपायाचे संबंधानें नुकताच निकाल झाला आहे व त्याबद्दल हकीकत राज्यव्यवस्थेचे भागांत दिली आहे.

तिसरे उपायासंबंधानें विचार आज बरेच वर्षांपासून चाललाच आहे, परंतु त्याचा निकाल लागण्याचा अजून कांहीं मार्ग दिसत नाहीं. यासंबंधानें विशेष माहिती लष्कराचे भागांत दिली आहे. चवथे उपायाचे संबंधानें पुढले भागांत सांगण्यांत येईल.

७—होम चार्जिस–हिंदुस्थानासंबंधानें विलायतेंत जो खर्च होतो त्यांत लष्करसंबंधानें होत असलेले खर्चाबद्दल विशेष तकरार आहे. या खर्चाच्या

बाबी कोणत्या त्याबद्दल पत्रक पूर्वी दिलेंच आहे. लष्करी खर्चाचे बाबतीसंबंधानें चालू असलेल्या तक्रारीबद्दल पूर्वी माहिती दिलीच आहे. लष्करी खर्चाशिवाय इतर खर्च होत आहे त्यासंबंधानें विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. एकंदरींत तो खर्च सढळ हातानें होत आहे अशी तक्रार आहे. हिंदुस्थानासंबंधानें होत असलेला सर्व खर्च त्याच देशाकडून घेण्यांत येतो, तसा इतर वसाहतींचे सरकारांकडून घेण्यांत येत नाहीं; हिंदुस्थानांत येणारे विलायतेचे सैन्याबद्दल सर्व खर्च घेण्यांत येतो तसा त्या वसाहतींकडून घेण्यांत येत नाहीं; रायल एन्जिनियरिंग कालेज हें सर्व हिंदुस्थानचे खर्चानें चाललें असून त्यांत विलायतेतील इतर विद्यार्थ्यांस फी घेऊन शिक्षण मिळतें व याप्रमाणें हिंदुस्थानचे पैशानें चाललेले संस्थेचा फायदा, विलायतेचे लोकांस होत आहे; ईलिंग येथील वेड्यांचे इस्पितळाचे खर्चांत हिंदुस्थानास नुकसान सोसावें लागतें; विलायतेंत हिंदुस्थानासंबंधानें हापिसें फार मोठालीं हिंदुस्थानचे खर्चानें बांधलीं आहेत; स्टेटसेक्रेटरांचे कान्सिलांतील मेंबर लोकांस हिंदुस्थानांत केलेले नौकरीबद्दल पेनशन मिळून शिवाय पगारही मिळतो; ईस्ट इंडिया कंपनी मोडल्यावर जे नोकर लोक मोकळे पडले त्यांची इतर खात्यांत तजवीज न करितां त्यांस पेनशन देण्यांत येतें; विलायतेस बाग व पदार्थसंग्रहालयें हिंदुस्थानचे खर्चानें विलायतचे लोकांचे गमतीसाठीं ठेवलेलीं आहेत वगैरे.

खर्चांत काटकसर होण्यास काय उपाय योजिले पाहिजेत याबद्दल १८९४ सालचे प्रांतिक सभेचे बैठकीचे वेळीं अध्यक्षांनीं जें भाषण केलें त्याचा सारांश एका संमाननाय वर्तमानपत्रावरून येथें देतों. त्यांत जे उपाय सुचविले आहेत ते फार विचार करण्यासारखे आहेत.

" हिंदुस्थानचा खर्च हल्लीं जो बेसुमार वाढूं लागला आहे, खजिन्याची विलक्षण लेधा उडून गेली असून इंग्रज व युरोजियन कामगारांच्या हुंडणावळीची भरपाई करण्याकरितां, ते कामावर केव्हां लागळे याचा विचार न करतां व त्यांस इंग्लंडांत खरोखर पैसे पाठवावे लागतात कीं कसें याचीही चौकशी न करतां, हिंदुस्थानच्या प्रजेवर आणखी एका कोटीचें जें ओझें नवीनच लादण्यांत आलें आहे, त्याला आळा पडून काटकसर होऊं लागण्यास काय उपाय योजावेत हें शोधून काढणें या घटकेस फारच अगत्याचें होऊन गेलें आहे. मला यासंबंधानें तीन उपाय सुचतात. १ ला उपाय ब्रिटिश सरकारानें हिंदुस्थानच्या कर्जांची हमी द्यावी; २ रा उपाय मुख्य व प्रांतिक कौन्सिलांतील सभासदांस बजेटावर मत देण्याचा अधिकार देण्यांत यावा; व ३ रा उपाय हिंदुस्थान हल्लींप्रमाणें ' डिपेन्डन्सी ' न मानतां ' क्राऊनकॉलनी ' प्रमाणें लेखण्यांत यावा.

पहिल्या उपायाचा असा परिणाम होईल कीं, तेणेंकरून ब्रिटिश कर देणारे लोक हिंदुस्थानच्या जमाखर्चाविषयीं कळकळ बाळगूं लागतील व त्यांच्या मताकडे दुर्लक्ष करतां यावयाचें नाहीं. दुसऱ्या उपायाचा उद्देश सध्याच्या मुख्य किंवा प्रांतिक कौन्सिलांच्या रचनेंत फेरफार व्हावा असा मुळींच नाहीं. तो अमलांत आणण्यास कौन्सिलांतील सभासदांची संख्या वाढविली पाहिजे असेंही नाहीं. निरनिराळ्या जमाखर्चाच्या रकमा कौन्सिलपुढें आल्या, ह्मणजे त्यांवर अनुकूल किंवा प्रतिकूल मतें देण्याचा अधिकार मिळावा ह्मणजे झालें. आफिशिअल सभासदांची संख्या अधिक असल्यामुळें बहुमत नेहमीं सरकाराकडेच राहील; परंतु या खर्चाच्या बाबतींत सरकार आपल्या सदसद्विवेकशक्तीस कितपत जागृत ठेवतें, हें प्रजेस कळण्यास तेणेंकरून साधन होईल. हिंदुस्थान ‘ क्राऊन कॉलनी ’ झाल्यापासून असा फायदा होण्याचा संभव आहे कीं, तसें झालें असतां ‘ इंडिया-आफिस’चा खर्च इंग्लंडास द्यावा लागेल व तेवढ्यापुरता तरी हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा प्रश्न इंग्लंडच्या बजेटाचे वेळीं पुढें येण्यास मार्ग होईल व तिकडे इंग्लिश लोकांचें लक्ष जाऊं लागेल. ”

भाग दहावा.

जमेच्या मुख्य बाबी.

पोटभाग १—जमीनबाब.

मागील भागांत उत्पन्नाच्या बाबी सांगितल्या आहेत; त्यांत खऱ्या उत्पन्नाच्या बाबी ९ किंवा १० आहेत. या भागांत जमीनबाब, अफू, एक्साईज (मादक पदार्थांवरील कर), कस्टमचें उत्पन्न, स्टांप, मीठ, व आकारलेले कर यांबद्दल सांगण्यांत येत आहे. बाकीचे जमेचे बाबतींबद्दल विचार इतर भागांत केलेला आहे.

(१) जमीनबाब व तिची व्यवस्था.

जमीनबाब ही शास्त्रीयदृष्टीनें पाहतां कराचे स्वरूपाची नाहीं. हिंदुस्थानांत

सरकार हे जमिनीचे मालक आहेत, व ती लागवडीस दिल्याबद्दल जें स्वामित्व घेण्याचें व खाजगी मनुष्यानें जमीन केली तर त्यास जें द्यावेंच लागतें, ती जमीनबाब होय (असें फासेट व मिल यांचें मत आहे). ही जमेची बाब पैशाचेच संबंधानें महत्वाची आहे असें नाहीं, तर तिचें महत्व राजकीय व सामाजिक बाजूनेंही फार मोठें आहे. जमेचे दृष्टीनें पाहतां जमीनबाबीचें उत्पन्न इतर बाबींचे उत्पन्नापेक्षां मोठें आहे तरी, आतां इतर बाबींचें उत्पन्नही पूर्वींपेक्षां वाढलें आहे, व त्यामुळें या जमीनबाबीचे उत्पन्नाचें प्रमाण एकंदर उत्पन्नाचे मानानें कमी झालें आहे. सन १८४२–४३ सालीं जमीनबाबीचें उत्पन्न एकंदर उत्पन्नांत शेंकडा साठ भाग होतें, तें सन १८९२–९३ सालीं अठ्ठावीस भागांवर आलें आहे. जमीनबाबीचें उत्पन्न पूर्वींपेक्षां कमी झालें आहे असें नाहीं; तेंही गेले पन्नास वर्षांत दुप्पट वाढलें आहे. ही वाढ झाली आहे ती राज्याचा विस्तार झाल्यानें व शेतकीची वृद्धि झाल्यानें झालेली आहे.

हिंदुस्थान हा मुख्यत्वेंकरून शेतकीवर उपजीविका करणारा देश आहे. सन १८९१ सालचे खानेसुमारीवरून असें दिसून आलें आहे कीं, एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा साठ इसम जमिनीवर उपजीविका करतात. याशिवाय गांवचे रयतेचे उपयोगी पडणारे धंदेवाले लोकांचा प्रत्यक्ष शेतकरी नसतांही बलुत्यावर ह्मणजे अर्थात अप्रत्यक्षत: जमिनीवरच निर्वाह चालतो. हे लोक जमीन धारण करणाऱ्या लोकांचे $\frac{1}{3}$ शाइतके आहेत असें अनुमान आहे. यावरून सामाजिक दृष्टीनें हिंदुस्थानांत शेतकीचें किती महत्व आहे हें दिसून येईल. राजकीय दृष्टीनें विचार पहातां शेतकीचें महत्व कमी आहे असें नाहीं; कारण प्रत्येक प्रांतांत जमीन धारण करणाऱ्यांचा व सरकारचा ज्या तऱ्हेचा संबंध असेल, त्यास अनुसरूनच त्या प्रांतांत राज्यपद्धत चालू असते. जमीनबाब वसूल करणारा अंमलदार हाच रयतेस अगोचर असणारें जें सरकार त्याची प्रत्यक्षपणानें दिसणारी मूर्ति होय, व शेंकडा ९५ भाग अशिक्षित प्रजेचे विचार व गरजा सरकारास समजण्यास तोच साधन असतो. कुळांकडून प्रत्यक्ष रीतीनें जमीनबाब वसूल करण्याचा शिरस्ता ज्या ठिकाणीं असतो, तेथें रयत व सरकार यांचा विशेष निकट संबंध रहातो, तितका जेथें इनामदार किंवा जमीनदार हे सरकारास जमीनबाबीबद्दल जबाबदार असतात, तेथें असत नाहीं. तरीही प्रत्यक्ष जमीन कसणारांचे हक्क योग्य रीतीनें संभाळले जातात किंवा नाहीं हें पाहण्याचा अधिकार सरकारचा असल्यामुळें, जमीनदारांचे स्वार्थपरैक वर्तनाचें थोडेंसें तरी नियमन करणें सरकारास जरूर पडतें.

वेगळाल्या प्रांतांत जमीनबाब आकारण्याच्या पद्धति वेगळाल्या आहेत, त्यांची

येथें अतिशय संक्षिप्त अशी माहिती मात्र देणें शक्य आहे; त्यांबद्दल पूर्ण विवेचन करण्यास एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. जमिनीच्या उत्पन्नाचा कांहीं भाग राजानें घेण्याची वहिवाट फार प्राचीन काळची आहे. राजानें द्वादशांशापासून षष्ठांशापर्यंत, जमिनीचा मगदूर व ती कमाविण्यास मेहनत किती लागत असेल त्या मानानें, पिकाचा अंश घ्यावा, व हा कर अडचणीचे वेळीं एकचतुर्थांशापर्यंत वाढवावा असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. प्राचीन ग्रामव्यवस्थेंत जमीन खासगी लोकांचे मालकीची नसून गांवचे समस्त लोकांची, व त्या जमिनीचें उत्पन्न सर्व गांवचें, असें असे. त्यांतून गांवचा मुख्य, वांटणीचे पूर्वी राजभाग काढून ठेवी, व राजास त्याबद्दल तोच जबाबदार असे. ही पद्धत मुसलमानी अंमल सुरू होईपर्यंत होती, व अजूनही उत्तरहिंदुस्थानांत कांहीं भागांत चालू आहे. मोंगल बादशहांचे वेळीं सारा घेण्याची पद्धत होती ती अकबराचे कारकीर्दींत तोडरमल्ल याणें चालू केलेली होती. या पद्धतीप्रमाणें जमिनीचे उत्पन्नाची, दहा वर्षांचे धान्याचे दराचे सरासरीप्रमाणें किंमत ठरवून, त्यापैकीं तिसरा किंवा चवथा हिस्सा सारा ह्मणून सरकारांत घेण्यांत येत असे, व साऱ्याचा ठराव दरखेपेस १० वर्षांचे मुदतीचा होत असे. मोंगलाई अंमल ज्या ठिकाणीं कायम बसला होता तेथें अकबराचीच पद्धत चालू होती; तीच रीति दादोजी कोंडदेव यांचे सल्यानें शिवाजी महाराजांचे राज्यांत चालू झाली. हा वसूल ऐनजिनशी होत असे. पुढें पेशवाईंत इ. सन १७८८ सालीं बागाईत उत्तम दरबिघ्यास ६ रुपये, मळईचे दरबिघ्यास रु. ३, व उत्तम काळीच्या दरबिघ्यास रु. २ व त्याचे खालोखाल जमिनीस सवारुपया, रुपया, बारा आणे असे दर ठरवून नक्त रीत चालू केली. दक्षिणहिंदुस्थानांत जेथें मुसलमानांचा अंमल फार दिवसपर्यंत नव्हता तेथें, रयतेकडून उत्पन्नाचा अंश दरसाल पाहणी होऊन ठरलेले दराप्रमाणें घेण्यांत येत असे. पूर्वींचे कारकीर्दींत उत्पन्नाचा कितवा अंश सरकारांत घेण्यांत येत असे यासंबंधानें पाहतां असें दिसून येतें कीं, मोंगल उत्पन्नाचा तिसरा किंवा चौथा हिस्सा घेत, मराठे निम्मे घेत, व मद्रासेकडेही तोच दर होता; शिखांचे राज्यांत निम्म्यापेक्षां कांहीं कमी किंवा निम्मे, व बंगालकडे निम्म्यावर कांहीं जास्त असा घेण्यांत येत असे. बंगाल प्रांतांत जमीनबाब मध्यस्थांचे ह्मणजे जमीनदारांचे मार्फत वसूल करण्यांत येत असे. जमीनदार हे मोंगलांचे कारकिर्दींतच प्रथमतः उत्पन्न झाले. ते कांहीं भागाचा सारा ठरवून, तो मक्त्यानें घेत असत, व कांहीं प्रसंगीं हिंदु राजे किंवा बडे लोक हेही त्यांचे अमलांतील मोंगलाई भागांचे संबंधानें मक्ते घेत. याप्रमाणें जमीनदारांत कांहीं फक्त सारा वसूल करणारे अंमलदारच होते व

कांहीं वंशपरंपरेचे हक्कदारही होते. मोंगलांचें राज्य गेल्यावर मागून जो गडबडीचा काळ चालू होता, त्यांत सर्व राजे लोक व विजयी मराठे लोक जमीनबाब वसूल करण्याचें काम मक्त्यानें देत असत, व हे मक्तेदार व त्यांचे पोटमक्तेदार या सर्वांचे फायद्याचे रकमेसुद्धां रयतेवर एकंदर फार मोठा बोजा पडे. ब्रिटिशसरकारचें राज्य सुरू झाल्यावर त्यांनीं मक्त्याची जुलमी पद्धत रद्द केली व माफक दरानें सारा घेण्याचें सुरू केलें. जमीनबाब वसूल करण्याच्या जुन्या पद्धति पुष्कळ होत्या परंतु त्यांचा ताळमेळ पाहून इंग्रजांनीं एकंदर तीन पद्धति सुरू केल्या. त्या सर्वांचें मुख्य तत्व असें आहे कीं, जमिनीची मालकी कुळास देऊन उत्पन्नाचा नियमित अंश मात्र सरकारास ठेवावा; कूळ सारा नियमितपणानें देत आहे तोंपर्यंत, ती जमीन विकणें किंवा भाड्यानें लावणें वगैरे गोष्टी त्यास मालकाप्रमाणें करितां याव्या व तो मेल्यावर जमीन त्याचे वारसाकडेही चालावी. इंग्रजसरकारांनीं चालू केलेल्या मुख्य तीन पद्धति ह्मणजे जमीनदारी, तालुकदारी, व रयतवारी या आहेत. जमीनदारी पद्धतीप्रमाणें बंगाल, बिहार, वायव्य प्रांतापैकीं बनारस जिल्हा, व मद्रास इलाख्यांतील कांहीं भाग, यांत ठराव झाले आहेत. मद्रास, मुंबई व वऱ्हाड प्रांतांत रयतवारी पद्धत चालू आहे; वायव्य प्रांत, पंजाब व मध्य प्रांत यांत मौजेवारी, अयोध्या प्रांतांत तालुकदारी अशा पद्धति चालू आहेत. रयतवारींत रयतेबरोबर, तालुकदारींत व जमीनदारींत तालुकदार व जमीनदार यांचेबरोबर, व मौजेवारींत गांवाबरोबर असे ठराव होतात.

बंगाल—बंगाल व पूर्वेकडील कांहीं प्रांत ईस्ट इंडिया कंपनीचे अमलांत आल्यावर तेथें जमिनीशीं संबंध असणारे दोन वर्ग–ह्मणजे एक जमीन कसणारीं कुळें, व दुसरा कुळांकडून वसूल घेणारे जमीनदार, तालुकदार व मालगुजार लोक असे कंपनीच्या दृष्टोत्पत्तीस आले. सारा वसूल करण्याची व्यवस्था करण्यासाठीं चालू पद्धत कशी होती याबद्दल चौकशी करण्यासाठीं कंपनीनें पहिल्यानें हुकुम केले होते, परंतु तिचे नौकरांचा खासगी व्यापार व नवीन मुलुख मिळविणें, यांतच वेळ जात असल्यामुळें हें काम तसेंच राहिलें. जमीनदार वगैरे हे चांगले ऐपतदार व उपयोगी पडणारे लोक असत, व ते सारा वसूल करीत होते, तेव्हां त्यांचेबरोबरच साऱ्याबद्दल सन १७७२ सालीं पहिल्यानें ठराव करण्यांत आले; त्याप्रमाणें रयतेकडून त्यांस आलेल्या रकमेची आठ किंवा नऊदशांश रक्कम सरकारांत घेण्यांत येत असे. हे करार सन १७९१ पर्यंत पांच पांच वर्षांचे मुदतीचे करण्यांत येत असत. या सालीं ते करार दहा वर्षांचे मुदतीचे करण्याचें ठरलें. ही वहिवाट

सुरू झाल्यावर दोनच वर्षांनीं ह्मणजे सन १७९३ सालीं लार्ड कार्नवालिस यांनीं ती बदलून, जमीनदारांकडून घेण्याचे साऱ्याचा दर कायमचा ठरवून टाकला व तेच जमिनीचे मालक असें ठरविलें. दर ठरविण्यासाठीं शेतांची मोजणी किंवा उत्पन्नाचा निमताना वगैरे कांहीं करण्यांत आलें नाहीं; तर पूर्वीं सारा येत असे त्याचेच अनुरोधानें पुढें घेण्याचा सारा ठरावण्यांत आला. हा कायमचे दराचा ठराव १७९५ सालीं वायव्य प्रांतांतील बनारस जिल्ह्यांत, व १८०२ सालीं मद्रास इलाख्याचेही कांहीं भागांस लागू करण्यांत आला.

जमीनदारांपासून घेण्याचा सारा कायमचा ठरला गेला त्याच वेळेस, त्यांचा व त्यांचे कुळांचा परस्पर संबंधही यथान्याय नियमित करावा असा हेतु होता, परंतु त्याबद्दल सेटलमेंटचे कागदांत कांहीं दाखला ठेवला नव्हता; त्यामुळें जमीनदारांचा फार फायदा झाला व त्या मानानें कुळांची स्थिति वाईट झाली. जमीनदारांचा हक्क स्पष्ट कायद्यानें ठरला गेला होता; तेव्हां, कोर्टांत त्यांचे हक्कांची अनायासें शाबिती होई; परंतु कुळांचे हक्काबद्दल दाखले नसलेमुळें ते वहिवाटीवरून शाबीत करण्याचें त्यांस जरूर पडे व त्यांत त्यांस यश येत नसे. कुळांचे हक्कांबद्दल नोंद न ठेविली जाण्यास कारणें काय झालीं तीं येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं; परंतु या बाबतींत सरकारचें दुर्लक्ष झाल्यानें व ते संबंध ठरविण्याचें दिवाणी कोर्टाकडेसच गेल्यानें कुळांचे हक्क नाहींसे होत जाऊन ते जमीनदारांचे अगदीं तावडींत सांपडल्यासारखे झाले. जमीनदारांनीं कितीही जरब सारा बसविला तरी तो त्यांस दिल्याशिवाय गत्यंतर नसे. कोर्टाकडून कुळांचें संरक्षण होत नाहींसें झालें ह्मणून सन १८५९ सालीं त्यांचे संरक्षणासाठीं एक कायदा करण्यांत आला; त्यांत असें ठरविण्यांत आलें कीं—सन १७९३ सालीं ज्या कुळांकडे जमीन होती तिजवरील सारा वाढविण्याचा हक्क जमीनदारांस नाहीं, वीस वर्षांवर एकाच दरानें ज्यांचेकडे जमीन होती तेही कदीम आहेत असें मानून, त्यांचेवर सारा वाढविण्याचे पूर्वीं, जमीनदारांनीं तीं अलीकडील कुळें आहेत असें दाखवून द्यावें; बारा वर्षांवर ज्या कुळांची वहिवाट होती, त्यांचेवर सारा वाढविणें झाल्यास कोर्टामार्फत हुकुमनामा करून घ्यावा, यापेक्षां कमी मुदतीचे कुळांनीं आपले सवडीप्रमाणें जमीनदारांबरोबर करार ठरवून घ्यावे, असें ठरविलें होतें. याही कायद्यापासून कुळांचा बचाव होत नाहीं असें दिसून आल्यावरून, सन १८७९ सालीं एक कमिशनचे मार्फत चौकशी करण्यांत आली, व त्या कमिशनचे सूचनेप्रमाणें कायदा करण्यांत आला. या कायद्याचें सार येथें देणें अशक्य व तें अवश्यही नाहीं. साधारणपणें त्या कायद्यानें काय काय विषयांवर नियम ठरविले आहेत ते सांगितले ह्मणजे पुरे

आहे. त्या कायद्यांत जमीनदार व कुळें यांचे जे वेगळाले वर्ग आहेत त्यांच्या व्याख्या देऊन जमीन धारण करण्याचे प्रकार किती आहेत हें सांगितलें आहे, व कुळांचे हक्क, व त्यांचें रक्षण, सारा वाढविणें, कमी करणें किंवा त्याचें नियमन करणें, कुळांकडून जमीन काढणें, व काढतांना कुळांस जमिनीच्या सुधारणांबद्दल किंमत देणें यांबद्दल नियम दिले आहेत ; व गैरकायदा सारा वसूल करण्याबद्दल जमीनदारांस शिक्षा ठेवण्यांत आल्या आहेत. तसेंच सर्व्हे करण्यास व हक्कांचे दाखले तयार करण्याबद्दल सरकारास अधिकार देण्यांत आला आहे. या कायद्यास अनुसरून बिहार प्रांतांत शेतांची सर्व्हे चालू झाली आहे. या कायद्याशिवाय सन १८८५ सालीं रेंट ह्मणजे भाड्याबद्दलही कायदा सुधारण्यांत आला.

जमीनदारांनींही पुष्कळ प्रसंगीं आपले हक्क कायमचे पट्टे करून कुळांस देऊन टाकले आहेत ; असे प्रकारें कायमचे पट्टे मिळालेले लोकांस पत्नीदार असें ह्मणतात. पत्नीदारांनींही पोट हक्कदार केले आहेत त्यांस दरपत्नीदार, सीपत्नीदार असें ह्मणतात.

येथपर्यंत कायमचे दरठरोतीचे पद्धतीची हकीकत झाली. आतां हीच पद्धति इतर प्रांतांत लागू करण्याचे संबंधानें कसे प्रयत्न व वादविवाद झाले त्याची थोडी हकीकत सांगतों.

लॉर्ड कॉर्नवालिस यांनीं बंगाल्याचे संबंधानें कायमचे साऱ्याचा ठराव केला ; तो पुढें नवीन मिळालेले प्रांतांस लागू करण्याचा नाहीं असें ठरविलें होतें. तरी पूर्वपद्धतीस अनुकूल असे अधिकारीवर्गांत पुष्कळ लोक होतेच. त्यांपैकीं सर चार्लस वुड हे होते. हे सन १८६२ सालीं हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी असतांना त्यांनीं ही पद्धत इतर प्रांतांस लागू करण्याबद्दल ठरविलें ; व प्रचलित असलेली साऱ्याची आकारणी योग्य असेल व जास्त वाढण्याचा संभव नसेल असे ठिकाणीं दर कायम करण्याविषयीं त्यांनीं हुकूम दिले. असा ठराव करण्यास त्यांनीं कारणें अशीं दिलीं होतीं कीं, दरठरोती कायम झाल्यानें रयत लोकांचा ओढा सरकाराकडे लागेल, त्यांस जमिनीचे सुधारणेंत पैसे जास्त घालण्यास उमेद येईल, त्यापासून शेतकरी वर्गाची अबादी होईल, व मध्यम वर्गाची सुधारणा होईल, तसेंच कुळांस जमिनीचे मालकांकडून त्रास कमी पोंहोचेल, एकंदरींत शेतकीची व तसेंच दुसरेही व्यापाराची बढती होईल, व असे प्रकारें देशाची संपत्ती वाढली ह्मणजे अप्रत्यक्ष कर सरकारास बसविण्यास सवड होईल. हा ठराव अमलांत आणण्यास अडचणी मुळापासूनच दिसूं लागल्या. पहिल्यानें ज्या गांवांतील ⅘ जमिनी लागव-

डीस आल्या असतील असे गांवांस हा ठराव लागू करावा असें ठरलें होतें व चालू असलेला सारा योग्य असेल तर तोच कायम करण्याचा होता, त्यासंबंधांत अडचण अशी येऊं लागली कीं, कांहीं भागांत, जेथें कालवा येऊन दरठरोती झाली होती तेथें, जास्त सारा बसूं लागला व ज्यांत त्या वेळीं कालवे झाले नव्हते असे भागांत कमी बसेल असें दिसूं लागलें. तेव्हां वीस वर्षांत जेथें कालवा होऊन जमिनीचें उत्पन्न वाढण्याचा संभव आहे असे ठिकाणीं कायमची ठरोती होऊं नये असें ठरलें. तसेंच सारा योग्य असेल असे भागांतच हा ठराव लागू करण्याचा होता. साऱ्याचे योग्यपणाबद्दलही तशाच अडचणी निघूं लागल्या. वायव्य प्रांतांतील सरकारानें चालू असलेला साऱ्याचा दर हलका आहे, व तो कायम झाल्यानें रयतेचा फायदा होण्याचा तो न होतां जमिनींचे माळकांचा फायदा होईल, व देशस्थितीचे सुधारणेचा फायदा सर्व जनसमाजास न होतां एका विवक्षित वर्गासच होईल, अशी तकरार काढली व ती हिंदुस्थानसरकारासही महत्वाची वाटली. पुढें सन १८७१ सालीं हिंदुस्थानांतील जमाखर्चाबद्दल विचार करण्यासाठीं पार्लमेंटची कमिटी बसली, तेव्हां तिचेपुढें या सर्व अडचणींचा व विचारांचा ऊहापोह झाला, व शेवटीं कमिटीचे सूचनेवरून सारा कायम करण्याचा बेत त्या वेळेपुरता तरी रहित झाला. त्यानंतर हें प्रकरण तसेंच भिजत पडून सन १८८२ सालीं सारा कायम न करण्याचा बेत कायमचा ठरला. असा निकाल करण्यास कारणें अशीं दाखविण्यांत आलीं कीं, ज्या प्रांतांत कायमचा धारा ठरला होता त्यांत जमीनदारांकडून कुळांस सवलती मिळाल्या किंवा त्यांचे स्थितींत मोठेंसें अंतर पडलें असें झालें नाहीं. अप्रत्यक्ष कर बसविण्यास सोईचें होईल हा एक धारा कायम करण्यापासून होणारा फायदा मानला होता, त्यासंबंधानें असें सांगण्यांत आलें कीं सारा बसविण्याचे नवीन पद्धतीप्रमाणें अप्रत्यक्ष कर बसवून विशेष उत्पन्न होण्यासारखें नाहीं, व प्रत्यक्ष कर तर नेहमीं अप्रिय असतातच.

याप्रमाणें कायमची दरठरोती करण्याची नाहीं असें ठरलें, परंतु त्याच वेळेस फिरून फिरून मोजणी व दरठरोती झाल्यानें लोकांत अस्वस्थता असते व जमिनीची मशागत चांगली होत नाहीं, अशा ज्या अडचणी मुदतीच्या मोजणीस असतात त्यांबद्दलही विचार करण्यांत आला; व विशेष कारणांशिवाय सारा वाढविण्याचा नाहीं असें ठरविण्यांत आलें. सारा कोणते कारणासाठीं वाढवावा हेंही त्याच वेळीं ठरलें आहे. तीं कारणें अशीं आहेत कीं (१) पूर्वीपेक्षां जास्त जमीन वहिवाटीस असली तर तिचेवर सारा जास्त बसवावा. (२) शेत-

कीचे उत्पन्नाची किंमत वाढली, (३) किंवा सरकारखर्चानें एखादी सुधारणा झाली व त्यामुळें जमिनीचा फायदा झाला, तर जमिनीचा सारा वाढविण्यास हरकत नाहीं. कुळांनीं आपले खर्चानें सुधारणा केल्यास त्याबद्दल जास्त सारा बसविण्याचा नाहीं असेंही ठरलें.

या प्रांतांत सर्वच जमिनींबद्दल कायमची दरठरोती झालेली नाहीं. कायम सारा ठरले जामिनींपैकीं कांहीं विशेष कारणांनीं सरकारांत आल्या, त्या कुळांस कायमचे ठराव करून न देतां, मुदतीचे करारानें दिलेल्या आहेत; किंवा त्या जामिनी सरकारचे अंमलदारांचे वहिवाटीस ठेवल्या आहेत. हे ठराव साधारण वायव्य प्रांतांतील ठरावांचे धरतीवर झाले आहेत.

या प्रांतांत एकंदर जमीन धारण करण्याचे चार प्रकार आहेत. (१) कायमचे साऱ्याचे दरठरोतीप्रमाणें. (२) कांहीं मुदतीचे ठरावाप्रमाणें. (३) सरकारचे प्रत्यक्ष वहिवाटींत असलेल्या जमिनी. (४) सरकारचे मालकीच्या जमिनी रयतवारी पद्धतीप्रमाणें कुळांस लागवडीस दिल्या आहेत त्या.

अज्ञान किंवा कांहीं कारणांनीं जमीन करण्यास नालायक झालेले जमीनदारांच्या जमिनीची सरकार कोर्ट आफ वार्ड्स् यांचे मार्फत वहिवाट करतें. या इष्टेटींचे वहिवाटीसाठीं वहिवाटदार नेमलेला असतो, तो जमिनीबद्दल योग्य सारा घेऊन त्या कुळांस लावणें, त्यांची सुधारणा करणें, व शिल्लक राहिल्यास ती रक्कम जमिनीचा कायमचा फायदा होईल असे कामांकडे लावणें, हीं कामें करतो; ह्मणजे एकंदरींत चांगला समंजस मालक ज्याप्रमाणें वहिवाट करील तशी करतो.

मद्रास—मद्रास इलाख्यांत बऱ्याच जमिनींचा सारा रयतवारी पद्धतीप्रमाणें ठरलेला आहे. या पद्धतीप्रमाणें सारा ठरविण्यासाठीं पहिल्यानें मोजणी करण्यांत येते व तींत गांवच्या व शेतांच्या हद्दी ठरविण्यांत येतात. त्यानंतरचें काम ह्मणजे सारा ठरविणें हें होय. तो ठरविण्यासाठीं पहिल्यानें देशाचें नैसर्गिक अंतर्बाह्य स्वरूप, पर्जन्यवृष्टीचें व अवर्षणाचें मान, तसेंच जमाबंदीचे स्थितीचा पूर्ववृत्तांत्त, मार्गक्रमणाच्या सोई, बाजारचें सान्निध्य व बागाइतास पाण्याचा पुरवठा वगैरे गोष्टींबद्दल चौकशी करतात. हें काम ठराव करणारा अंमलदार स्वतः करतो. त्यानंतर जमिनींचा प्रकार, त्यांचा सुपीकपणा व नैसर्गिक स्थिति यांचे संबंधानें जमिनींची प्रतबंदी करण्यांत येते. पुढें जमिनींत पीक किती येतें हें वेगळाले शेतांत निमताना घेऊन काढण्यांत येतें. वीस वर्षांचे बाजारभावाचे सरासरीप्रमाणें त्या पिकाची किंमत ठरवितात. हें काम तहशिलदार व इतर मुलकी कामगार यांचेकडून होतें. पिकाचे किमतींत खर्चाची रक्कम वजा करून

नक्की उत्पन्न निघेल त्यापैकीं निम्मे सरकारांत घेण्याचा ठराव आहे. गांवचा व प्रत्येक लागण व पड अशा सर्व शेतांचा सारा आकारण्यांत येतो. प्रत्येक शेतांत नक्की उत्पन्न होईल त्याचे निम्मे सरकारी सारा त्या जमिनींवर बसविण्यांत येतो असें होत नाहीं, तर पुष्कळ प्रकारच्या जमिनी त्यांचे सुपीकपणाचे मानाप्रमाणें एके ठिकाणीं करून व गांवांचे समुदाय, त्यांस असलेले स्वाभाविक सोईचे मानानें करून साऱ्याचा आकार ठरविण्यांत येतो. बागाईत असून दोन पिकें येणारे जमिनीवर सारा दीडपट बसविण्यांत येतो. गोदावरी व कृष्णा नदी यांचे अंतरवेंद्यांत व जमीनदारी किंवा इनामी गांवांत सरकारी पाटांचे पाण्यापासून बागाईत होत असल्यास विशेष दरानें सारा घेण्यांत येतो.

या प्रांतांत सर्वच जमीन रयतवारी पद्धतीप्रमाणें लागवडीस दिलेली नाहीं. तीशिवाय दुसरेही जमीन धारण करण्याचे प्रकार आहेत. या इलाख्याचे कांहीं भागांत साऱ्याची दरठरोती कायमची करून, जमिनीची मालकी सुद्धां जमीनदार लोकांस लार्ड कार्नवालिस यांचे ठरावाप्रमाणें दिली, हें पूर्वी सांगितलेंच आहे. जमीनदाऱ्यांत दोन प्रकार आहेत. कांहीं जमीनदाऱ्या ह्मणजे पूर्वीचे राज्याच्या तऱ्हेच्या इष्टेटी आहेत व त्यांचा वारसा वडील घराण्यांतच चालतो. कांहींच्या हिंदु किंवा मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें वांटण्या होतात. दुसऱ्या प्रकारच्या जमीनदाऱ्या ह्मणजे इंग्रज सरकारांनीं चालू शतकाचे प्रारंभास कायमचा सारा ठरवून जमिनी विकल्या त्यांपैकीं आहेत. जमीनदारीशिवाय जमीन धारण करणाऱ्यांचा दुसरा प्रकार ह्मणजे इनामी हा आहे. त्यांतही दोन प्रकार आहेत. एक प्रकारचीं इनामें इनाम कमिटीनें चौकशी करून कायम केलेलीं आहेत व त्या कमिटीचा ठराव कबूल केला नाहीं अशीं कांहीं इनामें आहेत. असे या इलाख्यांत जमीनदारी, इनामी व रयतवारी अशा जमीन धारण करण्याच्या तीन पद्धति आहेत.

सरकारचा सारा कुळांकडून नियमितपणानें येत आहे तोंपर्यंत त्यांचे ताब्यांतून जमीन काढण्याची नाहीं हें रयतवारी पद्धतीचें तत्व वर सांगितलेंच आहे. यामुळें तो जमिनीच्या मालकासारखाच होतो. लोकवस्ति वाढल्यानें शेतकीचीही वृद्धि झाली आहे व त्यामुळें साधारण उत्पन्नाच्या जमिनीही फार लागवडीस आल्या आहेत ; त्यांस सारा कमी असलेमुळें दरएकरीं सरकारचे देण्याचें प्रमाण कमी होत गेलें आहे. जमिनीची चणचण झाल्यानें उत्तम जमिनीचें भाडें वाढलें आहे, तरी मद्राससरकारांनीं तें सर्व कुळांसच सोडलें आहे. सन १८५३ सालीं साऱ्याचा सामान्य दर दरएकरीं दोन रुपये आठ आणे होता, व सन १८९०–९१ सालीं रु. १–१४ होता. गेले ४० वर्षांत पूर्वीचेपेक्षां

पाऊणपट जमीन जास्त लागवडीस आली आहे व त्याच मुदतींत लोकवस्ती शेंकडा ६१ टक्के वाढली आहे व सरकारचे साऱ्याचें उत्पन्न १/३ शानें वाढलें आहे.

मद्रासइलाख्यांतील दक्षिण व उत्तरेकडील भागांत एकंदर १/३ जमिनी कायम सारा ठरवून देण्यांत आल्या आहेत.

रयतवारी पद्धतींत जमाबंदी ही महत्वाची गोष्ट आहे. या प्रांतांत दरसाल जमाबंदी होते. सारा जरी तीस वर्षांचे मुदतीचा ठरलेला असतो तरी, जित-की जमीन कुळानें लागवडीस घेतलेली असेल त्यावरच तो द्यावा लागता व त्या रकमेंत ठरीव नियमाप्रमाणें दरसाल कांहीं कमीजास्ती करण्यांत येते. हें सर्व काम जमाबंदीचे वेळीं होतें. जमाबंदींत पाहिलें काम ह्मणजे त्या साली कुळाचे खात्यास किती जमीन होती तें पहाण्याचें आहे; क्षेत्र समजलें ह्मणजे त्यावरून जमीन धारण करणाऱ्यानें देण्याचा सारा निश्चित होतो. त्यानंतर बागाईत जमिनांत दुसरें पीक केलें असेल तर त्याबद्दल सारा ठरविण्यांत येतो व पाटबंधाऱ्याचें पाणी घेऊन पीक केलें असल्यास त्याबद्दल घेण्याचा आकार ठरविण्यांत येतो. जमाबंदीचे वेळचें महत्वाचें काम ह्मणजे प्रसंगाप्रमाणें सूट देणें हें आहे. सरकारी पाटाचें पाणी बरोबर न मिळाल्यानें किंवा दुसरे कार-णानें कुळांचें नुकसान झालें असल्यास, त्याबद्दल सारा सूट देण्यांत येतो; कांहीं ठिकाणीं पूर्वीचे ठरावाप्रमाणें बसलेले साऱ्याचे दरांत फेरतपासणी झाली नसेल असे भागांत, सूट देण्याबद्दल ठराव आहेत, त्याप्रमाणें ही सूट देण्याचा ती याच वेळीं देण्यांत येते; तसेंच फेरतपासणींत नवीन वाढलेले दर लागू करतांना ते कांहीं दिवस पूर्ण घेण्यांत येत नाहींत, त्याबद्दल वजावाट याच वेळीं होते. या-प्रमाणें जमाबंदी झाल्यावर पट्टे देण्यांत येतात.

मुंबई इलाख्यांतही साऱ्याचे ठराव रयतेबरोबर रयतवारी पद्धतीप्रमाणेंच होतात. या इलाख्यांत चालू असलेले सारा ठरविण्याचे रीतीस सर्व्हे पद्धति असें विशेष नांव आहे. पेशवाई जाऊन इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर पाहि-ल्यानें प्रिंगलसाहेब यांनीं साऱ्याचा आकार ठरविण्यास आरंभ केला, व त्या वेळीं जमिनीचें उत्पन्न व खर्च पाहून त्यावरून सारा ठरविण्यांत येत असे; परंतु जमिनीची मोजणी व उत्पन्नाचा आकार हीं दोन्हीही करण्यांत प्रथमतः चुका झाल्यामुळें त्या वेळीं साऱ्याचा दर फारच जरब बसला. त्या दराप्रमाणें सारा वसूल होत नसे व पुष्कळ कुळांनीं जमिनी सोडून दिल्या हात्या. त्यानंतर गो-ल्डस्मीड व विंगेटसाहेबांनीं सारा आकारण्याचे पद्धतींत सुधारणा करून नवीन पद्धति सुरू केली, ती अजून चालू आहे.

सर्व्हेंचे कामास प्रथमतः जमिनीचे मोजणीपासून सुरवात होते, व शेतें मोजल्यावर त्यांच्या हद्दी ठरविण्यांत येतात, व त्यांस खुणा घालण्यांत येतात. पहिली सर्व्हे झाली त्या वेळीं केलेले नकाशांत गांवें व गांवच्या जमिनी मात्र दाखविण्यांत येत असत; जिल्ह्याचा चांगला, बरोबर असा नकाशा होत नसे. आतां फेरमोजणीचे वेळीं चांगले बरोबर व पद्धतशीर असे जिल्ह्याचेही नकाशे करण्यांत येऊन, त्यांत देशवर्णनाची माहितीही चांगली देण्यात येत आहे. सारा प्रत्येक शेतावर आकारण्यांत येतो, या शेतास सर्व्हेनंबर असें ह्मणतात. साधारण दोन बैलांनीं जितकी जमीन लागवड करतां येते, तितके जमिनीचा साधारणतः एक नंबर करतात, व विशेष मोठा नंबर ह्मणजे त्याच्या दुप्पट जमिनीचा करतात. शेताच्या हद्दी बांध व वरोळ्या घालून किंवा दगड रोवून दाखवितात व जमिनी दाखविणारे गांववार नकाशे करण्यांत येतात.

मोजणीनंतरचें काम ह्मणजे जमिनींची प्रत लावणें हें होय. ती जमिनींत चांगली माती किती खोलीपर्यंत असेल त्याप्रमाणें व इतर गुणाप्रमाणें लावतात. जमिनींचे मुख्य तीन वर्ग करतात, व त्या प्रत्येकाचे नऊ पोटभेद कल्पितात; जमिनींत दोष कमी जास्त असतील त्या मानानें तिची वर्गवारींत पायरी वर खालीं होते. सभोंवारचे स्थितीचे कारणांनीं ही जमिनीची प्रत वाढते. याप्रमाणें जमिनीचे नैसर्गिक स्थितीशिवाय इतर गुणांचे कारणानें जमिनीची प्रत वाढविण्याबद्दल पहिल्या जाइंट रूलींत तजवीज नवती; ती सुधारणा त्या रूलीनंतर आलेले अनुभवाप्रमाणें झाली आहे. या गुणांपैकीं उदाहरणार्थ दोन येथें दाखल करितों. नदीचे कांठच्या जमिनी ज्यांत पूर येऊन मळी बसते, किंवा ज्यांस त्या नदीचे पाण्यापासून बागाईत करण्यास सवड असते, असे जमिनींचा, त्यांचे अंतस्थ गुणानें नंबर लागेल त्यापेक्षां, ह्या विशेष प्रकारचे फायद्यासाठीं जास्त वर लावण्यांत येतो. कांहीं जमिनींत बागाईत करण्यास उपयोगी पडण्यासारखें पाणी लागतें, व कांहींस लागत नाहीं; व दोन्ही प्रकारचे जमिनींवर सारा सारखा घेतला तर योग्य होणारें नाहीं ह्मणून पाणी लागण्याचा संभव आहे ह्या कारणानेंही जमिनीची वर्गवारी वाढविण्यांत येते. ह्या गुणांचीं नांवें "भूम्यंतरगत पाण्याची सोय" व "साधारण फायदेशीर स्थिति" अशीं आहेत. भातशेताचे प्रतवारीचे नियम वेगळे आहेत. प्रतबंदी झाल्यावर हवापाणी, बाजारचें सान्निध्य, व शेतकीची स्थिति, या गोष्टींचे अनुरोधानें गांवचे समुदाय बनविण्यांत येतात. हे समुदाय तालुक्यापेक्षां मोठे असत नाहींत, लहान असतात.

साऱ्याचा आकार ठरविण्यासाठीं ज्या तालुक्याचा ठराव करण्याचा असेल

त्याची पूर्वीची तीस वर्षांची जमाबंदीची माहिती काढतात, व साऱ्याचें प्रमाण कसें होतें व तो सोईनें वसूल हो । असे किंवा कसें, हवापाण्याचें मान कसें असतें, धान्यास किंमत कशी येते, शेतकी वाढली आहे किंवा कमी झाली आहे, दळणवळणाचे मार्गांची स्थिति कशी आहे, पाटबंधारे झाले आहेत किंवा कसें, जमिनीस किंमत किती येते, मालविक्रीस बाजाराची सोय कशी आहे वगैरे गोष्टींचा विचार करून त्या तालुक्यावर किंवा गांवांचे समुदायावर बसविण्याचे साऱ्याचा आकार ठरविण्यांत येतो. त्या साऱ्याची नंतर गांववार व नंबरवार वांटणी जमिनींचा आकार व प्रतवारी यांचे मानानें होते. साधारण साऱ्याचा आकार जमिनीचे उत्पन्नाचा पंधरावा अंश असावा असें धरतात. हे ठराव तीस वर्षांचे मुदतीचे होतात.

सारा नियमित रीतीनें देण्यांत येत आहे तोंपर्यंत ती जमीन धारण करणाराकडून काढण्यांत येत नाहीं. ती त्यास दुसऱ्यास देतां येते, व खातेदार मयत झाला तर ती त्याचे वारसाकडे जाते. साऱ्याची फेरतपासणी झाल्यावर जो सारा ठरेल तो देण्याची जबाबदारी कुळांवर आहे, सारा देण्याचा नसेल तर त्यांस जमीन सोडण्याची परवानगी असते. ही सर्व्हेपद्धतीप्रमाणें जमीन धारण करण्याची रीत आहे. याशिवाय प्राचीनपैकींही कांहीं जमीन धारण करण्याच्या पद्धति चालू आहेत. गुजराथेंत तालुकदारी, नर्वदारी, भागदारी, व मेहवासी अशा पद्धति आहेत. तालुकदारी ही बंगाल्यांतील जमीनदारी पद्धतीचे नमुन्यावर आहे. तालुकदार हे पूर्वीचे रजपूत ठाकुरांचे वंशज आहेत, व त्यांची जमिनीवरील मालकी सरकारांनीं कबूल केलेली आहे ; तरी त्यांस जमीन सरकारचे परवानगीशिवाय फरोक्त करून देण्याचा अधिकार नाहीं ; गहाण टांकता येते. त्यांच्याकडून कमाल आकारापैकीं ५०।७० टक्के आकार सरकारांत सारा ह्मणून घेण्यांत येतो. तापीचे उत्तरेस कांहीं गांवांत वंत (जींत वांटणी झालेली आहे अशी) पद्धति चालू आहे ती मूळची तालुकदारी पद्धतीच आहे, परंतु मुसलमानांचा अंमल बसल्यावर त्यांनीं त्या तालुकदारांच्या जमिनींपैकीं तीन हिस्से जमीन सरकारांत खालसा करून घेतली व चवथा हिस्सा त्यांस ठेवला असा तींत फरक झाला आहे. असे जमिनीवर सारा माफ असतो, किंवा फक्त कांहीं जुडी मात्र घेण्यांत येते. नर्वदारी व भागदारी ह्या उत्तरहिंदुस्थानांतलेप्रमाणें गांवकीच्या पद्धति आहेत. त्यांत जमीन धारण करणारे आपापले साऱ्याबद्दल जबाबदार असून शिवाय ते सर्वांचे साऱ्याबद्दलही समुच्चयानें जबाबदार असतात. या पद्धतीस साम्य पावणारी पद्धति ह्मणजे उत्तरहिंदुस्थानांतील पट्टीदारी ही आहे.

मेहवासी लोक पूर्वी फक्त कांहीं खंडणीदाखल रक्कम देत व त्याच वहिवाटीचा अवशेष हल्लींची मेहवासी पद्धति आहे. कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांत खोतीची पद्धति आहे. बंगाल्यांतील जमीनदारांप्रमाणेंच हे पहिल्यानें साऱ्याचे मक्तेदार होते व पुढें ते मालक असे ठरलेले आहेत. गांवचे सर्व साऱ्याबद्दल जबाबदार खोत असतो. अलीकडे कांहीं नवीन ठराव करून खोती गांवांतील कुळांस कांहीं हक्क दिले आहेत. साऱ्याची फेरतपासणी झाल्यावर तो देण्यास ते खोत जबाबदार असतात. इनामांत चार प्रकार आहेत. (१) मुसलमानांनीं दिलेल्या जहागिरी व मराठ्यांनीं कामगिरीबद्दल बक्षिस दिलेलीं इनामें किंवा सरंजाम किंवा नेमणुका. (२) नौकरांचीं इनामें. (३) देवस्थानांचीं इनामें. (४) जातइनामें. या वर्गाचीं इनामें साधारणतः बिनशर्तीनें वंशपरंपरेनें दिलेलीं आहेत. या इनामांबद्दल एक कमिटी नेमून चौकशी झाली आहे, व कांहीं इनामदारांबरोबर समरी सेटलमेंट (चौकशीशिवाय आपसांत ठराव) करण्यांत आले आहेत. पहिले तीन वर्गाचे इनामाबद्दलही चौकशी होऊन किंवा चौकशीशिवाय जुडि बसवून गार्डनसाहेबांचे रुलींप्रमाणें ठराव झाले आहेत.

सिंध प्रांतांत मुंबई इलाख्याप्रमाणेंच साऱ्याची पद्धति लागू आहे. जमिनीचे गुणाप्रमाणें प्रतवारी लावण्यांत येते, व हा प्रदेश निःपर्जन्य असलेमुळें ही प्रतवारी लावतांना पाण्याच्या पुरवठ्याच्या सोईचा विशेष विचार करण्यांत येतो. साधारण सर्व शेतकी सिंधु नदीचे पाण्यावरच चालते. तें पाणी प्रत्यक्ष पुरापासून किंवा पाटांतून शेंदून काढून जमिनीस देण्यांत येतें व त्यावर शेतकी चालते. या प्रांतांत जमीन कांहीं मुदत पड टाकावी लागते, व यासाठीं सन १८६३-६४ सालचे साऱ्याचे ठरावाचे वेळीं सर्व्हे नंबर मोठा धरून त्यावर हलका सारा बसविण्यांत आला होता. त्याचा हेतु असा कीं कुळास कांहीं जमीन पड टाकण्यास सवड राहावी. परंतु त्या व्यवस्थेस अनुसरून कुळें वागलीं नाहींत ; तीं सर्व जमीन लागवड करीत व ती निकस झाली म्हणजे सोडून देऊन दुसरी धरीत. फेरतपासणीचे वेळीं पूर्वीची व्यवस्था पालटली आहे. आतां नंबर लहान करून पूर्ण सारा घेण्यांत येतो, व पड जमिनीवर कुळांचा हक्क मात्र कायम ठेवण्यांत येतो ; तिजबद्दल त्यांस सारा पडत नाहीं. या प्रांतांत साऱ्याचे ठराव दहा वर्षांचे मुदतीचे होतात.

मुंबई इलाख्यांत जमीन धारण करणारांचें रजिष्टर ठेवण्यांत येतें. त्यांत कुळांचीं नांवें, त्यांचेकडे असलेली जमीन, व तिचा सारा हीं दाखल केलेलीं असतात. दिगंरवादी झाल्यास रजिष्टरांत दुरस्ती करण्यांत येते.

सर्व्हे सुरू झाली ती सरकारचे हुकुमानेंच झाली. त्याबद्दल कायदा करण्यांत आला नव्हता. पुढें सन १८६५ सालीं त्या सर्व्हेचें काम कायदेशीर करून घेण्यांत आलें. त्यानंतर जमीनमहसुलाबद्दल सन १८७९ सालीं कायदा करण्यांत आला, त्यांत जमिनीची सुधारणा, त्या धारण करणारांनीं केली तर, तिचे संबंधानें साऱ्यांत फेरफार करण्यास आधार करून ठेविला होता. हें कलम सर्व्हे पद्धतीचे मूळ तत्वाचे विरुद्ध होतें व त्यामुळें जमिनीची सुधारणा होण्यास हरकत येईल असें दिसून आल्यावरून, सरकारांनीं असें जाहीर केलें कीं, खासगी भांडवलानें जमिनींत सुधारणा करण्यांत आल्यास त्या कारणानें फेरतपासणीचे वेळीं सारा जास्त बसविण्यांत येणार नाहीं. त्याच वेळीं असेंही ठरविण्यांत आलें कीं तालुक्यावर किंवा गांवांचे समुदायावर सारा पूर्वींचेपेक्षां ३३ टक्यांपेक्षां जास्त वाढवूं नये; गांवांवर साऱ्याची वाढ ६६ टक्यांवर जाऊं नये; व प्रत्येक जमिनीवर सारा दुपटीपेक्षां जास्त वाढविण्यांत येऊं नये. पुढें सुधारणांचे संबंधानें सारा वाढविण्याचा नाहीं हें तत्व कायद्यांतच सन १८८६ चे ४ थे कायद्यानें दाखल करण्यांत आलें. त्या कायद्यांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, जमिनीची किंमत व शेतकीचा फायदा ह्यांसंबंधानें साऱ्याची तपासणी करण्यांत येईल; त्या किमतींत किंवा फायद्यांत, जमीन धारण करणारानें आपले खर्चानें सुधारणा केल्यामुळें, वाढ झाली तर त्या कारणामुळें, जास्त सारा वाढविण्याचा नाहीं.

वायव्य प्रांत व पंजाब या प्रांतांत बहुतेक एकच तऱ्हेची जमीन धारण करण्याची पद्धति चालू आहे. या प्रांतांत ग्रामव्यवस्था प्राचीन पद्धतीवर चांगली राहिली आहे व गांवांतील जूटही पूर्वींप्रमाणेंच कायम आहे, तेव्हां दरठरोती करणें ती पूर्वींप्रमाणें सरकार गांवाबरोबर एकवटीनें करतें; त्यांतलि प्रत्येक कुळाबरोबर करीत नाहींत. या गांवांतून जमीन समुच्चयानें लागवड करितात किंवा ती कुळवार वांटलेली असते, तरी साऱ्याबद्दल जबाबदारी मात्र सर्व गांवावर असते.

या गांवकीचा मुख्य पुढारी लोकनियुक्त किंवा वंशपरंपरेचा असतो. तसेंच कांहीं ठिकाणीं पुष्कळ गांवही एकाच इसमाचे मालकीचे आहेत, व असे प्रसंगीं गांवचे मालकाबरोबर ठराव होतो. असे प्रकारें गांववार दरठरोती होते त्या पद्धतीस जमीनदारी किंवा मौजेवारी पद्धत असें ह्मणतात. गांवकींत दोन प्रकार आहेत. एक प्रकारचे गांवांत सर्व जमीन समाइकींत वहिवाटण्यांत येऊन उत्पन्नही समाइकींत घेऊन ग्रामरूढीप्रमाणें तें वांटण्यांत येतें.

दुसरे प्रकारचे गांव आहेत त्यांत गांवांतील जमीन वांटून घेतलेली असते व जमिनीचे मालक आपापल्या जमिनींबद्दल साऱ्याचा अंश गांवकीस देतात ; व याप्रमाणें गांवकीची समाईक व्यवस्था सोडून जमिनी वांटून घेण्याकडे लोकांचा कल जास्त होत चालला आहे. पंजाब प्रांतांत जमिनीचे मालकच बहुतकरून जमीन करतात, परंतु वायव्य प्रांतांत बऱ्याच जमिनींचे मालक त्यांची लागवड कुळांकडून करवितात. या कुळांत हक्कदार व उपरी असे दोन वर्ग आहेत. पहिले वर्गाची ह्मणजे हक्कदार कुळाची जमीन तो सारा बरोबर रीतीनें देत आहे तोंपर्यंत त्याचेकडून निघण्याची नसते व त्याचा हक्क त्याचे वारसाकडे जातो. या कुळांनीं देण्याचा धारा रूढीप्रमाणें ठरलेला असतो व तो कांहींचा कायम ठरलेला असतो व कांहींचा विवक्षित कारणासाठीं मात्र वाढवितां येतो. या कुळांस काढून टाकण्यास दिवाणी हुकुमनामा मिळवावा लागतो व तो मिळविण्यास सारा बरोबर रीतीनें दिला जात नाहीं असें शाबीत करावें लागतें. या प्रांतांतील शंभरांपैकीं सत्तर हिस्से जमीन मूळ मालक किंवा हक्कदार कुळें यांचेकडे लागवडीस आहे. दुसरे प्रकारचे कुळांस सालअखेरीस काढून टाकतां येतें, व त्यांनीं देण्याचा धारा त्यांचे व मालकाचें विचारानें ठरण्याचा असतो. कुळांनीं जमिनींत सुधारणा केली असल्यास त्यांस काढून टाकतांना त्याबद्दल त्यांस नुकसान भरून द्यावें लागतें.

सारा बसविण्याचे कामांत पहिल्यानें जमिनीची मोजणी होते व त्यानंतर सारा बसविण्याचा असेल त्या जिल्ह्याचे देशस्थितीचे मानानें भाग पाडण्यांत येतात. त्यापुढील व सर्वांत महत्वाचें काम ह्मटलें ह्मणजे जमिनीपासून भाडें किती येतें, किंवा नक्की नफा किती रहातो, तें पहाण्याचें असतें. मद्रासेस ज्याप्रमाणें सारा जमिनीचे उत्पन्नावर किंवा मुंबईत पूर्वीचे साऱ्याचे मानावर ठरविण्यांत येतो त्याप्रमाणें उत्तरहिंदुस्थानांत तो जमिनीचे भाड्याचे किंवा नफ्याचे मानावर ठरविण्यांत येतो. याप्रमाणें भागवार भाड्याचा आकार ठरविण्यांत येतो, व नंतर तो गांववार वांटण्यांत येतो. साऱ्याची वांटणी करणें ती जमिनीचे मगदुराचे मानानें किंवा त्या जमिनीस कृत्रिम सोईची अनुकूलता असेल त्या मानानें तो वांटण्यांत येतो. भाडें किंवा नफा जो हिशेबानें निघेल त्यापैकीं निम्मे सरकारांत घेण्याचा असें ठरलेलें आहे.

हे ठराव ३० वर्षांचे मुदतीचे असतात. वायव्य प्रांतांत जमीन धारण करणारे जमीनदार मुख्यत्वें चार प्रकारचे आहेत. (१) जमीनदारी रीतीचे, ह्मणजे ज्यांत गांवच्या सर्व जमिनी एकत्रांत वहिवाटून व त्यांचें सर्व उत्पन्न ऐके

ठिकाणीं करून तें मालक मंडळींत वांटून घेण्यांत येतें असे. (२) पट्टीदारी रीतीचे, ह्मणजे ज्यांत गांवची जमीन मालक वेगळाले लावतात व आपला साऱ्याचा हिस्सा देतात ते. या वर्गांत एखादे इसमाचा सारा थकला तर त्या-बद्दल जबाबदारी मात्र सर्वांवर असतें. (३) तिसरे प्रकारांत जमीनदारीचें व पट्टीदारीचें संमेलन झालेलें असतें, ह्मणजे कांहीं जमीन समाईक ठेवलेली असते व कांहीं वांटलेली असते. याप्रमाणें समाईक ठेवलेले जमिनीचे उत्पन्नांतून सारा पहिल्यानें देण्यांत येतो व नंतर शिलक राहील तें वांटून घेण्यांत येतें. यांत गांवावरचे मालकींतील हिश्शाप्रमाणें प्रत्येक प्रकारचे जमिनींत हिस्सा असतो (४) चवथा प्रकार भायाचारी. हा प्रकार साधारण तिसरे प्रकाराप्रमाणेंच असतो; फरक एवढाच कीं प्रत्येक प्रकारची जमीन हिश्शाचे हक्काचे मानानें इसमवार घेतलेली नसते. हिस्सा वहिवाटीप्रमाणें ठरतो, वंशपरंपरेचे हक्काप्रमाणें ठरत नाहीं. असे प्रकारचे गांवाबद्दल साऱ्याचे ठराव सरकार जमीनदारांचे प्रतिनिधि—लंबरदार—ह्मणून असतात त्यांचेबरोबर करतात.

या प्रांतांतील मोजणीची पद्धति दक्षिणेकडील प्रांतांतील पद्धतीपेक्षां जास्त व्यापक आहे. तिकडचेप्रमाणें जमिनीची मोजणी व प्रतबंदी होतेच, परंतु याशिवाय प्रत्येक गांवांतील वहिवाटी, व पोटकुळांच्या जमीन धारण करण्याच्या पद्धति, यांची चौकशी करून नोंद ठेवण्यांत येते. यापासून सरकारदेणें निश्चित होतें इतकेंच नाहीं, तर जमीन करणारे सर्व वर्गांचे परस्पर हक्कसंबंधही निश्चित होतात.

पंजाबप्रांतांतील जमीन स्वतः कसणारे कुळांचे ताब्यांत विशेष प्रकारानें असलेमुळें तेथील सारा जमिनींचे पिकाचे मानानें ठरविण्यांत येतो. वेगळाले प्रकारचे जमिनींत, एक प्रकारचें पीक घेऊन तें किती होतें तें पहातात; ही माहिती पुष्कळ वर्षांची घेण्यांत येते व त्यांत बरे व वाईट सालांची सरासरी आल्यानें उत्पन्नाचें मध्यम प्रमाण चांगलें निघतें. असे प्रकारानें उत्पन्न जें ठरेल त्यापैकीं सहावा हिस्सा सरकारांत घेण्यांत येतो. ही आकारणी पहिल्यानें कांहीं गांवांचे समुदायाची एके ठिकाणीं काढून नंतर तो आकार गांववार वांटण्यांत येतो. गांवांत जमीनवार फाळणी करण्याचें काम गांवकीवर सोंपविलेलें असतें.

वायव्य प्रांतांतील जमीन धारण करणारांचे वर्ग सांगितले आहेत त्यांपैकीं पहिल्या वर्गाचे लोक पंजाबांत फारसे नाहींत. पट्टीदारी व भायाचारी वर्ग सांगितले आहेत त्याच वर्गाचे बहुतेक लोक आहेत. सरकारदेण्याबद्दल सर्व गांवकीचे लोक जबाबदार असतात व एखादे इसमानें जमीन सोडली तर, त्या

जमीन सोडणारांचे बरोबर गांवची जमीन करणारे जे लोक असतात त्यांस ती जमीन मिळण्याचा प्रथम हक्क असतो.

अयोध्या प्रांत सन १८५६ सालीं खालसा झाला. या प्रांतांतील तालुकदार हे बंगाल्यांतलि जमीनदारांप्रमाणें नुस्ते साऱ्याचे मक्तेदार असे नव्हते. ते मुळचे त्या प्रांतांतील वडे लोकांपैकीं होते व त्यांचा जमिनीवरील अधिकार वंशपरंपरेनें किंवा लष्करी हुद्याचे कारणानें आलेला असा होता. या तालुकदारांचे ताब्यांतलि जमिनींचे साऱ्याचा ठराव त्यांचेबरोबरच करण्यांत आला व इतर जमीनीसंबंधानें जमिनींचे मालकांबरोबर वर सांगितलेले पद्धतीप्रमाणें ठरविण्यांत आला.

तालुकदारांशीं ठराव होतांना तीन वेळां तीन प्रकार झाले व त्याचा परिणाम जमीन करणारे कुळांस अनिष्ट असा झाला. हा प्रांत खालसा झाल्यावर तालुकदार जरी हक्कदार होते व त्यांचा हक्क कबूल करणें जरी रास्त होतें, तरी ते हक्क पहिले सर्व्हेचे वेळीं पाळण्यांत आले नाहींत. त्यामुळें तालुकदार बिथरून जाऊन सन १८५७ सालीं बंडांत सामील झाले. त्यानंतर लार्ड क्यानिंग साहेबांनीं सर्व जमीनदार लोकांचे हक्क रद्द आहेत असा जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो प्रसिद्ध करण्याचा हेतु असा होता कीं पूर्वीचे सर्व्हेनें उत्पन्न केलेले अयोग्य हक्क नाहींसे व्हावे व तालुकदारांस पूर्वीचे हक्कांप्रमाणें जमीन देण्यास सांपडावी. हा हेतु सिद्धीस गेला, परंतु एकंदरीचे लाटांबरोबर रयतेचा हक्क मात्र नाहींसा झाला. बंडानंतर कायमची दरठरोती करावी या मताचें प्राबल्य होतें, व त्या अवधींत तालुकदारांबरोबर बंडाचे पूर्वी, त्यांचे ताब्यांत ज्या जमिनी असतील, त्यांबद्दल उक्ता सारा घ्यावा असा ठराव करण्यांत आला. शिवाय त्या तालुकदारांत वडील मुलासच वारसा चालावा असें ठरविण्यांत आलें, व त्यांस मृत्युपत्र करण्याचा अधिकार, पूर्वी नसलेला, देण्यांत आला. परंतु त्या वेळीं कुळांचे हक्कांचा कांहीं विचार झाला नाहीं, तर तालुकदारांचे विरुद्ध त्यांचे हक्क चालूं देण्याचे नाहींत असेंच ठरविलें होतें. याप्रमाणें या प्रांतांतील दोनतृतीयांश जमीन तालुकदारांकडे आहे, व एकतृतीयांश जमीन लहान कुळें किंवा प्राचीन ग्रामव्यवस्थेप्रमाणें रहाणारे लोक यांचेकडे राहिली आहे.

अलीकडे कुळांची स्थिति सुधारण्यासाठीं सन १८८६ सालीं कायदा झाला आहे, व त्याप्रमाणें भाडें वाढविणेचे व जमिनी काढून घेणेचे बाबतींत महत्वाचे नियम ठरविले आहेत. हल्लीं असलेले कुळांवर बसलेला सारा वाढविणें तो ६½ टक्यांपेक्षां जास्त वाढविण्याचा नाहीं, व सारा बरोबर देण्यांत येत

आहे तोंपर्यंत जमीन काढून घेण्याची नाहीं, व कुळांस जमीन काढून घेण्याचे वेळीं त्यांनीं सुधारणा केली असेल त्याबद्दल नुकसानी द्यावी असें ठरलेलें आहे.

मध्यप्रांतांत धारा ठरविण्याचे पद्धतीचा पाया जरी वायव्य प्रांतांतील पद्धतीवर आहे तरी त्यांत स्थानिक कारणांनीं फरक पुष्कळ झाले आहेत. मोजणी व पहाणी वायव्य प्रांतांतील नमुन्यावरच होते, व त्याच प्रांतांतलेप्रमाणें भाड्याचा किंवा नफ्याचा निमे भाग सरकारांत घेण्यांत येतो. या प्रांतांत जमीन धारण करण्याची पद्धत बंगाल, मुंबई, उत्तरहिंदुस्थान यांत चालू असलेपैकीं पूर्णपणें अशी एकही नाहीं; तींत जमीनदारी, मौजेवारी, रयतवारी या तीनही पद्धतींचे प्रकार आहेत. त्या पद्धतीस चांगलें अर्थबोधक नांव ह्मणजे मालगुजारी पद्धत हेंच आहे. मालगुजार ह्मणजे पूर्वीं ज्यांचे गुजारतीनें वसूल होत असे ते लोक व त्यांचेचबरोबर इंग्रज सरकारांनीं धाऱ्याचा ठराव केला आहे. पुष्कळ जमिनींचे मालक व ज्यांत वडील घरांतच पुरुष संततीस वारसा जातो, असे कांहीं खरे जमीनदार या प्रांतांत आहेत. या जमीनदारांपैकीं कांहीं पूर्वीं सरकारदेण्याचे ठेकेदार व कांहीं गांवचे मुख्य होते, व त्यांचेबरोबरच ठराव झाले त्या वेळीं त्यांस जमिनीवर मालकी हक्क प्राप्त झाले. पंजाब व वायव्य प्रांतांप्रमाणें ग्रामपद्धति जेथें चालू आहे, तेथें गांवचा मुख्य, व त्या गांवचे इतर जमिनींचे मालक यांचे संबंध, त्या प्रांतांतील जमीनदारी किंवा पट्टीदारी पद्धतीप्रमाणें असतो. बरेच मालगुजार हे स्वतंत्र जमिनीचे मालक असून त्यांचा व जमीन करणारांचा संबंध कायद्यावरून ठरलेला आहे. या प्रांतांतील सर्व्हे पद्धतीचा कल पोटहिस्सेदारांचे हक्क कायम करण्याकडे फार आहे. असे प्रकारानें ज्या पोटहिस्सेदारांचे हक्क ठरविण्यांत आले आहेत ते व ज्यांचेबरोबर मालकी देण्याबद्दल ठराव करण्यांत आले नाहींत असे लोक व ज्या इनाम जमीनी खालसा झाल्या त्या करणारे लोक यांस कमी दर्जाचे जमिनीचे मालक या सदरांत गणण्यांत येतें; व ते सारा मालगुजारांचे मार्फतीनें भरतात. संबलपूर जिल्ह्यांत मात्र रयतवारी पद्धतीशीं अगदीं साम्य असणारी पद्धत लागू झाली आहे. याप्रमाणें या प्रांतांत जमीनदारी, मौजेवारी व रयतवारी या तीनही पद्धति अंशतः चालू आहेत.

आसाम प्रांतांत सर्वत्र धाऱ्याची सारखी पद्धति चालू नाहीं. त्या प्रांताचे वेगळाले भागांत सुधारणा कमी जास्ती प्रमाणानें झालेली आहे; त्याच अनुरोधानें साऱ्याच्या पद्धतीही भिन्न भिन्न आहेत. ब्रह्मपुत्रानदीच्या खोऱ्याचे भागांत

मौजास (प्रांताचे भागास) एक एक मौजेदार नेमिला आहे. तो लागवडीस असलेले जमिनीची साधारण सांखळीनें मोजणी करून व प्रतवारी लावून वार्षिक सारा ठरवितो. त्या ठरावांची डेपुटी कमिशनर तपासणी करून ते कायम करितात. साऱ्याचा वसूल मौजेदार करितो व आपलें कमिशन काढून घेऊन बाकी सरकारांत भरतो. कुळांकडून सारा वसूल झाला किंवा न झाला तरी सरकारांत सारा देण्याची जबाबदारी मौजेदारांवर असते. जास्त सुधारलेले भागांत १० वर्षांचे मुदतीची दरठरोती होते.

सिलहिट व गोलपरा जिल्ह्यांत धाऱ्याची कायमची ठरोती बंगालचेप्रमाणेंच झालेली आहे. सिलहिट जिल्ह्यांत ज्या जमिनीचा सारा कायमचा ठरला नाहीं, त्या जमिनी सरकारच्या मालकीच्या असें मानतात व त्यांचे संबंधानें ठराव २० वर्षांचे मुदतीनें करण्यांत येतात. सारा, आसपासचे जमिनीस जें भाडें येतें त्याचे मानानें ठरविण्यांत येतो. कचर जिल्ह्यांत एक वेगळ्या प्रकारची पद्धति चालू आहे तिचें नांव मिरासदारी असें आहे. या जिल्ह्यांतील जमिनी कांहीं कुळें मिळून समाइकीनें करतात, व साराही सर्वजण मिळून देतात. साऱ्याचे ठराव १५ वर्षांचे मुदतीचे होतात, व त्या कुळांस जमिनी कायमच्या दिलेल्या आहेत व त्या त्यांस फरोक्त करून देतां येतात. सिलहिट व कचर जिल्ह्यांत दरठरोतीचे पूर्वी सर्व्हे करण्यांत येते.

या प्रांतांत चहाची लागवड करणारांस कांहीं विशेष सवलतींनीं पड जमिनी देण्यांत येतात. तसेंच या प्रांतांत पड जमिनी मालकी हक्कासुद्धां विकण्यांत येतात.

कांहीं डोंगरी भागांत जमीनबाबीऐवजीं घरपट्टीच देण्यांत येते.

खालचे ब्रह्मदेशांत इकडचेप्रमाणें ग्रामव्यवस्था नाहीं. त्या देशांत क्विन् ह्मणजे साधारण कांहीं जमिनीचा समुदाय असतो, त्याजवर पहिल्यानें सारा ठरवून नंतर तो जमीनवार वांटण्यांत येतो. सारा ठरविण्यासाठीं मद्रासेंतलेप्रमाणें जमिनीचें उत्पन्न काढून त्यांत खर्च वजा करतात इतकेंच नाहीं, तर जमीन करणाऱ्या कुळांचा प्रपंचाचा खर्चही वजा करतात. भातशेताचा सारा दहापासून १५ वर्षांचे मुदतीचा ठरविण्यांत येतो.

वरचे ब्रह्मदेशांत क्यापिटेशन् टॅक्स ह्मणजे डोईवर कर घेण्यांत येतो. यास थाथमेडा ह्मणतात. सरकारी जमिनीवर मात्र सारा घेण्यांत येतो परंतु त्या फारच थोड्या आहेत.

कायमची दरठरोती झाली नसेल असे प्रांतांत साधारणतः ठराव तीस वर्षांचे मुदतीचा असतो. त्या मुदतींत कोणतेही कारणानें सारा वाढविण्यांत

येत नाहीं. त्यानंतर साऱ्याची फेरतपासणी करण्यांत येते. फेरतपासणी करतांना मागील सर्व्हे झाल्यापासून कोणते प्रकारचा पालट झाला असेल, त्याचा विचार करण्यांत येतो. जमीन धारण करणारानें आपले खर्चानें सुधारणा केल्या असतील तर त्यांबद्दल सारा वाढविण्यांत येत नाहीं; आणि ज्या तीन कारणांसाठीं सारा वाढविण्यांत येतो तीं वर दिलींच आहेत. त्या नियमांचा अंमल करतांना कोणती सर्व्हे आधारास घेण्याची हा प्रश्न येतोच. त्यासंबंधानें असें ठरलें आहे कीं, ज्या ठिकाणीं पूर्वींची सर्व्हे बरोबर व उभय पक्षांस सोईची झालेली असेल तेथें फिरून मोजणी करण्याची जरूर नाहीं, परंतु तशी स्थिति नसली ह्मणजे मोजणीपासून फिरून सर्व काम व्हावें. एकदां मोजणी व प्रतबंदी बरोबर झाली असली ह्मणजे पुढें तिचे अनुरोधानें गांवचे कागदपत्र बरोबर चालू ठेवणें हेंच महत्वाचें काम रहातें.

हे हक्काचे दाखले वेगळाले प्रांतांत कसे ठेवण्यांत येतात, व ते बरोबर ठेवले जाण्यासंबंधानें अलीकडे काय नवीन व्यवस्था करण्यांत आली आहे तें सांगून हें पद्धतीचे वर्णनाचें प्रकरण पुरें करण्याचें आहे.

या संबंधाचा मुख्य दाखला ह्मणजे जमिनींचा नकाशा व त्यांचें रजिस्टर. नकाशांत शेताचें क्षेत्र व त्याचें ठिकाण व त्याचा नंबर दाखविला असतो. रजिस्टरांतही क्षेत्र व ती जमीन बागाइती किंवा जिराइती आहे, हें दाखल असून शिवाय दुसऱ्याही गोष्टी असतात. या गोष्टींचा पर्याय प्रांताप्रांतांत वेगळाला आहे. मुंबई व मद्रासेंत जमीन धारण करणारे इसमाचें नांव दाखल करण्यांत येऊन इतर हक्कदारांचे हक्काचा निर्णय करण्याचें काम दिवाणी कोर्टांवर सोंपविलेलें असतें. वायव्य प्रांतांत तें काम तें रजिस्टर तयार करणारा अंमलदारच करतो. त्याचे ठरावास नाराजी झालेले इसमास दिवाणी मार्ग खुला असतो.उत्तरहिंदुस्थानचे इतर भागांत ह्या ठरावांवर दिवाणी दावा चालत नाहीं. गांववार किंवा ईस्टेटीवार ठराव झाले असतील असे प्रसंगीं या रजिस्टराशिवाय कुळें, व त्यांचेकडे असलेल्या जामिनी, व तसेंच त्या जामिनींचे मालक, व त्यांचे हिस्से व त्यांची समुच्चयानें किंवा वेगळाली असलेली सारा देण्याची जबाबदारी, यांबद्दल दाखला ठेवण्यांत येतो.

पडजमीन लागवडीस देण्यासंबंधानें थोडें सांगण्यासारखें आहे तें असें कीं, मद्रास व मुंबई या इलाख्यांतील सर्व्हेचे पद्धतीप्रमाणें सर्व जमीन, ती लागण झालेली असो किंवा पड असो, ती मोजली जाऊन तिजवरील सारा ठरलेला असतो; ती जमीन लागणीस घेतली कीं लागलीच तिजबद्दलचा सारा सुरू होतो. उत्तरहिंदुस्थानांत साऱ्याचा ठराव गांवांबरोबर असतो, तेव्हां पड

जमीन लागण झाली तर तिचेपासून सरकारास फायदा फेरसर्व्हे झाल्यावर होतो. तसेंच मुंबई व मद्रास इलाख्यांत साऱ्याचा ठराव शेतावर असल्यामुळें तीं शेतें कुळांस पाहिजेल तेव्हां सोडून देतां येतात. तसें उत्तरहिंदुस्थानांतील पद्धतीप्रमाणें करतां येत नाहीं; कारण तेथें सारा गांववार ठरलेला असतो व लागवडीसंबंधानें कसाही फरक झाला तरी ठरीव सारा त्या गांवांत पुरा करून द्यावा लागतोच.

साऱ्याचा वसूल हतयांनीं करण्यांत येतो. त्यांच्या मुदती वेगळाले प्रांतांत वेगळाल्या आहेत. पावसाची कमतरता झाल्यानें पीक झालें नाहीं किंवा दुसरे कारणामुळें पिकाचें नुकसान झालें तर सारा घेण्याचें तहकूब करण्यांत येतें. तो माफ करण्याचा किंवा कसें तें पुढील पीक कसें येतें तें पाहून प्रत्येक प्रसंगीं ठरविण्याचें आहे, असा उत्तरहिंदुस्थानांत नियम अलीकडे करण्यांत आला आहे. तशी तहकुबी व माफी देण्याची वहिवाट दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांत साऱ्याचे पद्धतीचेच अंगभूत आहे.

हिंदुस्थान हा प्राधान्येंकरून शेतकरी देश आहे हें आरंभींच सांगण्यांत आलें. लार्ड मेयो यांनीं असें ह्मटलें आहे कीं " या देशाचे सुधारणेंत व संपत्तिवर्धनाचे कामीं पाऊल पुढें पडणें आणखी कांहीं शतकें तरी शेतकीचे सुधारणेवर व विस्तारावर अवलंबून राहील; पुष्कळ काळपर्यंत शेतकीचें उत्पन्न हेंच निर्यात मालाचा मुख्य भाग राहील; व्यापार सुधारण्यास हल्लींचे धान्यांचे व उत्पन्नाचे मानांत व गुणांत सुधारणा झाली पाहिजे किंवा व्यापारोपयोगी अथवा कालोपयोगी होण्यासारखे पदार्थ या देशांत नवीन उत्पन्न करूं लागलें पाहिजे. शेतकीशीं इतका निकट संबंध दुसरे कोणतेंही सरकारचा नाहीं; हिंदुस्थानसरकार हे नुसते राज्यशास्ते आहेत इतकेंच नाहीं, तर ते मोठे जमीनदारही आहेत. जमीन सुधारण्याचे प्रत्येक बाबीनें सरकारचे मिळकतीची किंमत वाढत जाते वगैरे." यासाठीं या देशांत शेतकीचे प्रश्नाचें विशेष आस्थेनें परिशीलन व्हावें ह्मणून सन १८७० सालीं हिंदुस्थानसरकारांनीं शेतकीचें खातें वेगळें स्थापन केलें व त्याप्रमाणें पुढें प्रांतांतूनही तें खातें काढण्यांत आलें आहे. हल्लीं फेरमोजणीच्या बाबतींत ज्या सुधारणा झाल्या आहेत त्यांचें श्रेय या खात्याकडेच आहे. या खात्याकडून आतां गांवचे कागद व नकाशे बरोबर ठेवण्यांत येतात, व भाड्याचेबद्दल योग्य दाखले वेळचेवेळेस ठेवण्यांत येतात. याप्रमाणें माहिती बरोबर असली ह्मणजे तपासणीचे वेळीं मोजणी करण्याचें कारण राहत नाहीं.

जमीनबाबीचे उत्पन्नाची वाढ. या बाबीचें उत्पन्न सन १८४० सालापासून आतांपर्यंत दुप्पट वाढलें आहे हें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल.

सन १८४०—४१ रु.	१२	कोटी	सन १८८०—८१ रु.	२१	कोटी
,, १८५०—५१	१५	,,	,, १८९१—९२	२४	,,
,, १८६०—६१	१८	,,	,, १८९२—९३	२४ $\frac{९}{१०}$	,,
,, १८७०—७१	२१	,,			

हे सर्व आंकडे तुलनेसाठीं चांगले उपयोगी नाहींत, कारण कीं सन १८५८ सालपर्यंत नवीन प्रांत इंग्रजी राज्यांत सामील होतच होते. सन १८६० साला-चे सुमारास हल्लींचेप्रमाणेंच इंग्रजी राज्याच्या हद्दी ठरल्या आहेत, तेव्हां त्या-नंतरचे आंकडे घेऊन पहातां जमीनबाबीची वाढ सुमारें तेहतीस टक्के झाली आहे.

आतां जमीनबाबीचें प्रांतवार उत्पन्न कसें होतें तें सांगितलें पाहिजे. तें सालवार प्रांताप्रांतांत कसें होतें हें सांगितलें तर फार विस्तार होईल सबब तो तपशील सन १८९२–९३ सालाचा देण्यांत येत आहे. तुलनेसाठीं सन १८८१–८२ व १८९१–९२ सालाबद्दल आंकडे दिले आहेत.

प्रांत.	१८८१–८२	१८९१–९२	१८९२–९३
	रु०	रु०	रु०
हिंदुस्थान.	९४९९८०	१३८६७३०	१३९०६५०
वंगाल.	३७९४३८९०	३८६७९५७०	३८४९६०९०
आसाम.	३८९३८००	४६६९०००	४७२९५००
वायव्य प्रांत व अयोध्या.	५७५११०४०	५९३०८८६०	५९२७४१४०
पंजाब.	२०५१९६३०	२३२१४६१०	२३४२७०९०
मध्य प्रांत.	६१३७५९०	७०१५०७०	६९५०३८०
ब्रह्मदेश.	१०५२२६२०	२१४२०३६०	२२६७६५७०
मद्रास.	४३५४४२१०	३९५०७५८०	४६५१०७३०
मुंबई.	३८४५७४६०	४४४५५९६०	४५५९८१३०
	२१९४८०२२०	२३९६५७७४०	२४९०५३२८०

या आंकड्यांत इरिगेशन खात्यास जो जमीनबाबेचा ऐवज जातो तो धरलेला नाहीं. वरचे ब्रह्मदेशाचें उत्पन्न सन १८८६–८७ सालापासून येऊं लागलें आहे. सन १८९१–९२ सालचें मद्रास प्रांतांतील उत्पन्न दुष्काळामुळें कमी झालें होतें.

जमीनबाबीचें उत्पन्न तपशीलवार कसें होतें त्याचा थोडा तपशील सन १८९२–९३ सालाबद्दल देतों. जमिनीचा सारा रु. २३०४५४७४०, मालकी

हक्कांचे विक्रीबद्दल रु. १२३२०, इनाम जुडी रु. १००२६९८०, पड जमिनींचा लिलांव व सारा सरकारांनीं घेण्याचा हक्क नाहींसा करण्यासाठीं दिलेला आकार रु. १०७३७०, डोईवर व घरांवर कर–विशेषतः ब्रह्मदेशांत–रु. ३८०७६२०, सरकारी इस्टेटी सुधारण्याबद्दल रु. ४७३६००, किरकोळ रु. ५८२२०२०, वरचे ब्रह्मदेशांत जमीनबाबीशिवाय जमा रु. ५५७३३१०, मिळून रु. २५६२७६३४० वसूल आले होते. यांपैकीं रु. ७२२३०६० ची रकम पब्लिकवर्क्स खात्यांत जमा होण्याची आहे, म्हणजे या खात्याची जमा रु. २४९०५३२८० रहाते.

आतां जमीनबाबीचा बोजा लोकसंख्येचे मानानें कसा पडतो, व एकरास कसा पडतो, तें पुढील कोष्टकावरून दिसून येईल. तें सन १८९१–९२ सालाबद्दल आहे.

	माणशीं कराचें प्रमाण.	लागवडीस असलेले जमिनीचें दरएकरास प्रमाण.
	रु. आ. पै.	रु. आ. पै.
मद्रास.	१·६·६	१·७·८
मुंबई.	१·१४·९	१·०·४
सिंध.	२·८·४	२·५·८
वायव्य प्रांत.	१·५·६	१·१२·१०
अयोध्या.	१·२·०	१·९·१०
पंजाब.	१·३·७	१·०·०
मध्य प्रांत.	०·१०·७	०·६·५
आसाम.	०·१२·५	...
वरचा ब्रह्मदेश.	१·१२·१	२·१·११
खालचा ब्रह्मदेश.	२·०·०	१·१३·८
कुर्ग.	१·११·८	२·९·८
अजमीर.	०·११·०	...
मध्यप्रमाण.	१·६·०	१·९·३
बंगाल.	१·६·०	...

लागवडीस असलेले जमिनीवरील कराचे बोजाचें प्रमाण ज्या प्रांतांत मध्यस्थांचे मार्फत वसूल होतो त्या प्रांतांत कसें पडतें तें समजण्यास साधनें नाहींत. त्या प्रांतांतील पत्रकांत जमीनदारीच्या जमिनी व इतर जमिनींबद्दल माहिती

एकच पत्रकांत असते. एकंदर हिंदुस्थानास दरएकरास सरासरी सारा रु. ०.१२.३ बसतो.

आतां जमीन लागवडीस किती होती व लागवडीलायख जमीन किती हें ही समजणें जरूर आहे तें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

प्रांत.	१८८१-८२		१८९१-९२	
	लागवडीस आलेली.	लागवडीलायक शिलक.	लागवडीस आलेली.	लागवडीलायक शिलक.
	आंकडे	हजार	एकरांचे	आहेत.
मद्रास.	२५०००	१८१२४	२८८२४	७९६५
मुंबई.	२१८६९	३६००	२९९९८	२०६७
सिंध.	३०५०	५६५२	६४४१	५७६०
वायव्य प्रांत.	२५१७२	९२४०	२७३८४	७९८०
अयोध्या.	८२७४	४०३५	९४१३	३२८३
पंजाब.	२३५२३	२४७५२	२५७७९	२४४७२
मध्यप्रांत.	१४१४१	११८११	१७७८६	९४२७
आसाम.	२१६७	१३३२४	२५५९	९०१२
खालचा ब्रह्मदेश.	३६३९	२३७२०	५६६५	१८५२७
वरचा—			२२६६	१८८३६
बंगाल.			५२८२८	तपशील नाहीं
वऱ्हाड.			७४८२	८१४
अजमीर.			४१३	११०
कुर्ग.			१५७	५४
तेरीज १८८१-८२	×		१२६८३५	११४२५८
* १८९१-९२			२१८९१३	९९३१३
१८९२-९३			२२१७९८	८९९२८

* यांत कांहीं दुसरे प्रांतांचे आंकडे सामील आहेत.

× ही बेरीज वर दिलेले प्रांतांपुर्तीच आहे.

या कोष्टकावरून गेले दहा सालांत जास्त जमीन लागवडीस आलेली आहे असें दिसून येईल.

लोकमत—या भागांत जमीन धारण करण्याच्या व सरकारसारा बसविण्याच्या पद्धति सांगितल्या आहेत. आतां दोन मुद्यांसंबंधानें लोकांचें मत भिन्न आहे त्यावद्दल येथें सांगण्याचें आहे.

जमीनबाब कर नाहीं, भाडें आहे असें फासेट व मिल यांचें मत असल्याचें वर सांगितलें आहे. हेंच मत फ्यामिनकमिशनरांस संमत आहे. हें मत ज्यांस संमत नाहीं असे लोक आहेत, त्यांचें ह्मणणें असें आहे कीं जमीनबाब ही जमिनीवर करच आहे. फ्यामिनकमिशनानें असें लिहिलें आहे कीं सरकार हे जमिनींचे मालक आहेत व जमीन धारण करणारांकडून उत्पन्नांतून खर्च वजा जातां शिल्लक राहील त्यांतून वाटेल तितकी रक्कम घेण्यास प्राचीन वहिवाटीस अनुसरून सरकारास अधिकार आहे. वाटेल तितकी रक्कम असें न ह्मणतां नियमित रक्कम असें ह्मटलें ह्मणजे मतभेद राहत नाहीं. पूर्वींचे राजे वाटेल तितका सारा वसूल करीत हें खरें आहे; परंतु त्यांनीं तसें घेणें न्याय्य होतें असें ह्मणतां येत नाहीं. सरकारानें सारा एक षष्ठांशापासून एक द्वादशांपर्यंत घ्यावा असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. या ग्रंथावरून सरकाराची जमीनीवर मालकी आहे व रयत सर्व सरकारचीं कुळें आहेत असे होत नाहीं. सरकारचे वर्तनावरूनही सर्व जमीन मालकीची आहे असें दिसून येत नाहीं; कारण तसें असतें तर सार्वजनिक कामासाठीं जमीन घेण्यावद्दल सरकारांनीं जे कायदे केले आहेत त्यांचीं जरूर नव्हती. सरकार जामिनींचे मालक व जमीन करणारे लोक कुळें असें असतें तर जमीन सरकारांत घेतांना जमीन सोडण्याविषयीं कुळांस मालकीचे नात्यानें सरकारांनीं सुचविलें ह्मणजे पुरे झालें असतें; व कुळांस जमीनी खरेदी, गाहाण वगैरे देण्याचा जो हक्क आहे तो नसता. मनूची जी पद्धति सांगितली आहे ती मुसलमानांनीं मान्य केलेली नव्हती; ते जिंकून घेणार या नात्यानें आपणास सर्व जमिनींचे मालक असें ह्मणवून घेत. इंग्रज सरकारचेंही ह्मणणें आपण पूर्ण मालक आहों असेंच आहे. सरकारांनीं सारा घेण्याची अखेरची मर्यादा ठरविली नाहीं तर रयतेचें नुकसान होण्याचा संभव आहे; कारण सरकारचा खर्च वाढत चालला आहे, तेव्हां उत्पन्न वाढविण्यासाठीं जमिनींचे उत्पन्नाचा वाजवीपेक्षां फाजील हिस्सा घेण्याकडे सरकारची प्रवृत्ति स्वाभाविक तऱ्हेनेंच होईल ; अप्रतिहत व्यापाराचीं तत्वें लागू करण्याचे हेतूनें कस्टमजकाती कमी करण्याविषयीं खटपटी होतील व तो माफ होईल, प्राप्तीवरील कर माफ करण्यासंबंधानेंही तो कर देणारे लोकांस तकरार करण्याची इच्छा होणें

स्वाभाविक आहे तेही प्रयत्न करतील, व अखेरीस इतर कर कमी झाले ह्मणजे जमिनीवरील बोजे वाढतील व त्याचा जमीन करणारे रयतेचे स्थितीवर परिणाम चमत्कारिक होईल; यासाठीं सरकारांनीं आपण जमिनीचे मालक आहों ही विचारसरणी सोडून द्यावी. सरकारांस वाटेल तितका सारा वाढविण्याचा अधिकार आहे ऐशीं याच तत्वाचा परिणाम फेरतपासणीचे वेळेस सारा जो सत्तर किंवा टक्केपर्यंत वाढविण्यांत येतो हा असावा. सरकारांनीं आपण उत्पन्नाचा कितवा हिस्सा घेण्याचा तें कायमचें ठरवून टाकावें किंवा एकंदरींत जास्तींत जास्ती ह्मणजे किती सारा बसविण्याचा तें ठरवावें. सरकारच जमिनीचे मालक असलें ह्मणजे लोकवस्ती एके ठिकाणींच वाढत जाते व त्यावर सरकारी देणेंही जास्त पडतें. जमिनीवर खासगी इसमाची मालकी असली ह्मणजे तो आपली सोय पाहतो व त्यामुळें लोकांस जमीन मिळत नाहींशी झाली ह्मणजे उदरनिर्वाहासाठीं त्यांस दुसरीकडे जावें लागतें व त्यामुळें लोकवस्ती एकेच ठिकाणीं वाढत राहत नाहीं. शिवाय दुसरी गोष्ट ह्मणजे ही कीं खासगी इसमास जो ऐवज येतो त्यापैकीं कांहीं भाग तरी जमीन सुधारण्याकडे लागतो; तसें सरकार मालक असलें ह्मणजे होत नाहीं, व लोकांस सर्व बाबतींत सरकारावर अवलंबून रहाण्याची संवय लागते, त्यांच्यांत स्वावलंबन रहात नाहीं. हल्लींचे स्थितींत जमिनीपासून व्हावें तसें पीक होत नाहीं. सारा वारंवार वाढणें, शेतकरी लोकांची निकृष्ट स्थिति असणें, शेतकींत सुधारणा न होणें व जमिनीची मशागत न होणें, व लोकसंख्या वाढत जाऊन उत्पन्न सर्व खाण्यांत जाऊन धान्यसंग्रह न होणें हीं हल्लींचे निकृष्ट स्थितीचीं कारणें आहेत. ही स्थिति सुधारण्यास उपाय सुचविण्यांत आले आहेत ते सरकारांनीं आपण घेण्याचा भाग नियमित करून टाकून वाटेल तितका सारा वाढविण्याचा हक्क आहे हें तत्व सोडून द्यावें; सावकारापासून रयतेस जो त्रास होतो त्यापासून त्यांची सोडवणूक करण्यासाठीं शेतकऱ्यांच्या पेढ्या काढाव्या; बागाईत वाढून जमिनींत जास्त उत्पन्न होईल असें करावें; सरकारचे साऱ्याबलद्द ऐवज एकदम देऊन टाकून तो जमिनीवरील बोजा कायमचा दूर करण्यास सवड ठेवावी, असें केल्यानें इनामदारांसारखा एक नवा वर्ग उत्पन्न होईल व मालकी कायमची झाली असतां शेतीची सुधारणा करण्यास त्यांस उत्तेजन येईल. याप्रमाणें सरकारी पद्धतीसंबंधानें लोकांचे विचार आहेत.

कायमचा सारा करण्यासंबंधानें हिंदुस्थान व विलायतसरकार यांचे दरम्यान झालेले वादविवादाचा सारांश दिलाच आहे; आतां कायम सारा व्हावा या मताचे जे लोक आहेत त्यांचे विचाराचा थोडक्यांत सारांश दाखल करण्याचा आहे.

या मतवाद्यांचे विचार व विरुद्ध मताचे लोकांचे विचार यांत अंतर पडण्याचें कारण असें आहे कीं, ते वेगळाले तत्वांस जास्त महत्व देतात. कायमचा सारा असावा असें मानणाऱ्या पक्षाचे लोक असें ह्मणतात कीं, साऱ्यांत वारंवार पालट झाला तर लोकांस जमिनींत भांडवल घालून ती चांगले स्थितींत आणण्यास धैर्य व इच्छा होत नाहीं व यामुळें शेतकीची स्थिति वाईट राहते. विरुद्ध बाजूचें असें ह्मणणें आहे कीं, कालेंकरून शेतकीची व इतर सुधारणा झाल्यानें सारा जास्त वाढवून उत्पन्न वाढविण्यास सांपडतें ती संधी नाहींशी होईल. एक वर्ग देशाचे अबादीकडे लक्ष ठेवतो व दुसरा वर्ग सरकारी उत्पन्न कसें वाढेल यावर नजर देतो. कायमचा सारा करण्याचे बाबतींत पूर्वी हुकूम झाले त्या वेळींही खजिन्याचें कांहीं नुकसान होईल कीं काय या गोष्टीचा विचार झालाच होता व ते हुकूम देणारांनीं साऱ्यापासून नुकसान होईल त्याच्या मोबदला देशाची जी अबादी होईल ती धरली होती. याप्रमाणें या दोन मतवादी लोकांचे विचारांची सरणी आहे.

सरकारांनीं सारा कायमचा करण्याचा नाहीं असें ठरविल्याचें वर सांगितलेंच आहे व त्यापूर्वीचे वादविवादाचा सारांशही दिला आहे. आतां कायमचा सारा हवा असें ह्मणणारांचे विचार देण्याचे आहेत. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, कायमचे साऱ्याची, मुदतीचे साऱ्याची व दरसाल साऱ्याचा ठराव होण्याची, अशा तिन्ही पद्धति अनुक्रमें बंगाल प्रांतांत, वायव्य प्रांतांत व मुंबई इलाख्यांत व मद्रास इलाख्यांत चालू आहेत. प्रांतांतील स्थिति पाहिली ह्मणजे बंगाल्याची स्थिति उत्तम, दुसरे वर्गाचे प्रांतांची स्थिति मध्यम व दरसाल सारा ठरत असलेले प्रांतांची स्थिति कनिष्ठ अशी आहे. बंगाल्यांत पहिल्यानें दोनतृतीयांश जमीन जंगल होती व त्यांत वनपशूंचेंच वास्तव्य असे, व ती जमीन लागवडीस आणण्यास थोडे मुदतीचे ठरावानें लोकांस इच्छा होणार नाहीं, या गोष्टीचा विचार करूनच लार्ड कार्नवालिस यांनीं साऱ्याचा कायमचा ठराव केला. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं बंगाल्यांतील शेतकी उत्कृष्ट स्थितींत आली आहे, व सरकारचा सारा अतिनियमितपणानें व कमी खर्चानें वसूल होत आहे. असेच प्रकारानें स्थित्यंतर झाल्याबद्दल व सद्यःस्थिति फार चांगली असल्याबद्दल त्या प्रांतांचे लेफ्टनेंट गव्हरनरांनीं अभिप्राय दाखल केले आहेत; व त्या प्रांतांतील लोकांस दुष्काळासारखे प्रसंग इतर प्रांतांतील लोकांपेक्षां कमी त्रासानें सोसतां येतात असेंही पण सदरचे अंमलदारांनीं कबूल केलें आहे.

कायमचा धारा ठरविण्याविरुद्ध जीं कारणें देण्यांत येतात त्यांत देशसुधारणेमुळें जमिनीपासून जो जास्त फायदा येतो तो जमीनदार लोकांस मुफत

मिळतो हें एक मुख्य आहे. खरोखरी अशी स्थिति नाहीं. तसें विधान करतांना जमिनींचे मालक पूर्वींचेच आहेत, त्यांस जमिनी मुफत मिळाल्या आहेत, असें गृहीत घेण्यांत येतें, परंतु पूर्वी ज्यांचेबरोबर ठराव झाले त्याच जमीनदारांकडे जमिनी आहेत असें फार क्वचित आहे; बहुतेक जमीनदाऱ्या पूर्वींचे मालकांकडून दुसरे मालकांकडे गेल्या आहेत व त्यांस पुरी किंमत द्यावी लागली आहे. जमिनीस किंमत पडते ती तिचेवरील स्वत्वाचे व तिचेपासून होणारे किफायतीचे मानानें पडते; व जे जमिनींचे मालक झाले आहेत त्यांनीं ज्याअर्थी पुरी किंमत देऊन जमिनी घेतल्या आहेत, त्याअर्थी त्यांस येणारा फायदा बिनमोबदल्याचा व मुफत आहे असें ह्मणतां येणार नाहीं. जमीनदारांस मूळ जमिनी मुफत मिळाल्या असेंही झालेलें नाहीं; कारण कायमचे साऱ्याचे ठराव झाले त्या वेळीं फार जमीन पड होती, व तींत जंगल वाढलेलें होतें; त्या सर्व जमिनी त्या लोकांस कायमचें स्वत्व मिळाल्यानें त्यांनीं खर्च करून जंगल तोडून लागवडीस आणल्या आहेत. मूळ जमिनी लागवडीस आणण्यास मूळचे जमीनदारांस पुष्कळ खर्च करावा लागला व हल्लींचे जमीनदारांस उत्पन्नाचे मानानें किंमत द्यावी लागली आहे; तेव्हां जमिनीपासून येणारा फायदा मुफत मिळतो असें ह्मणतां येत नाहीं.

मुंबई इलाखा इंग्रजांचे ताब्यांत आल्यावर पहिल्यानें सारा अतिशय बसविण्यांत आल्यानें रयतेची दैना झाली. पुढें त्याबद्दल सरकारांत दाद लागून सारा बेताचा बसला. त्यानंतर अमेरिकेंतील लढाईमुळें, शेतकीचे मालास किंमत आली होती, व शेतकीस तेजी आली होती, त्याच सुमारास साऱ्याची फेरतपासणी झाल्यानें त्या वाढलेल्या किमतीचे मानानें सारे बसले; काय कारणानें किमती वाढलेल्या आहेत याबद्दल विचार झाला नाहीं. जोंपर्यंत ती तूर्तातूर्त आलेली सुस्थिति चालू होती तोंपर्यंत ठीक चाललें, परंतु पुढें लढाई बंद झाल्यावर त्या कारणानें ज्या किमती वाढल्या होत्या त्या कमी झाल्या व शेतकरी लोकांचे हालास सुरवात झाली. कांहीं दिवस सारा शिलकेंतून दिला व ती सरल्यावर सावकाराची मदत लागूं लागली. अखेरीस सावकाराचा त्रास असह्य झाल्यावर दंग्यावर आलें. याप्रमाणें रयतेजवळ सारा भागून भांडवल शिलक रहात नसलेमुळें दुष्काळराजाची स्वारी येतांच त्यांची स्थिति अत्यंत वाईट झाली; कारण त्यापासून संरक्षण करण्याचीं साधनेंच त्यांचेजवळ नव्हतीं.

वायव्यप्रांतांतही पूर्वी दरसाल सारा ठरेतोंपर्यंत स्थिति वाईट होती. पुढें तीस वर्षांचे मुदतीनें सारा ठरविण्यांत आल्यानें ती पूर्वींपेक्षां सुधारली असें अनुभवास आलें आहे.

मद्रासइलाख्यांतही सारा दरसाल पालटण्यांत येत असलेमुळें रयतेची स्थिति वाईट आहे व त्यांचीही दुष्काळाचे वेळीं तशीच स्थिति झाली होती.

यावरून रयतवारी पद्धति चालू आहे असे भागांत रयतेची स्थिति, कायमचा सारा असतो असे भागांतले रयतेपेक्षां वाईट असते, असें या बाजूचें ह्मणणें आहे. ह्या गोष्टीचें ते सरकारी दाखल्यावरून समर्थन करून दाखवितात.

प्रजापक्षाचे लोकांस व कांहीं सरकारी कामगार यांस कायमची दरठरोती पसंत वाटते व तिजपासून ते पुढील फायदे दाखवितात. (१) वेळोवेळीं साऱ्याची तपासणी करण्यासाठीं लागणारा खर्च वांचेल. (२) त्या तपासणीचे वेळीं लोकांस जो त्रास होतो तो होणार नाहीं. (३) साऱ्याचे ठरावाची मुदत सरण्याचे सुमारास मिळकतीची किंमत कमी होते ती होणार नाहीं. (४) जमिनींत सुधारणा होईल व तिजवर भांडवल खर्च होईल व त्यापासून देशाची सुवत्ता होईल. (५) लोकांत समाधान व संतोषवृत्ति असल्यानें जमिनींची किंमत वाढेल.

येथपर्यंत सर्व हिंदुस्थानचा सामान्य विचार झाला. प्रत्येक प्रांतांत सर्व्हेचे व दरठरोतीचे पद्धतींत दोष असतीलच व नियम अमलांत आणण्याचे संबंधानेंही पुष्कळ तकरारी करण्यासारख्या गोष्टी घडत असतील, परंतु त्यांच्या संबंधानें माहिती लागणेंही कठीण व मिळाली तरी ती असे सामान्य वर्णनात्मक पुस्तकांत देणेंही शक्य नाहीं. मुंबईइलाख्यांतील सर्व्हेचे संबंधानें कांहीं तकरारी आहेत त्यांचें टिपण,त्या विषयाचा पूर्ण विचार केला आहे असे एका सद्गृहस्थानें, हा ग्रंथ लिहिणाराचे विनंतीवरून दिलें आहे; त्यांतील कांहीं महत्वाचे मुद्दे पुढें दिले आहेत; ते सर्व अतिशय महत्वाचे आहेत, तेव्हां त्यांचेबद्दल कोणाचें मत भिन्न होण्याचा संभव असला तरी, सर्वांनीं त्यांचेबद्दल विचार करून अनुभव घेऊन पाहण्यासारखे ते मुद्दे आहेतः—

(१) वाढलेले साऱ्याचे दर कायम करण्यापूर्वी जमीन धारण करणारे लोकांचें ह्मणणें ऐकून घ्यावें असा सरकारचा नियम आहे, परंतु त्याची अंमलबजावणी होतांना त्या लोकांस आपलें ह्मणणें कळविण्यास योग्य अशा सवलती देण्यांत येत नाहींत.

(२) सारा वाढवितांना तालुक्याचा व खेड्यांचे समुदायांचा सारा पूर्वीपेक्षां शेंकडा ३३ टक्यांपेक्षां जास्त वाढवूं नये, संबंध एका गांवचा सारा ६६ टक्यांपेक्षां जास्त व कुळवार सारा दुप्पटीवर जाऊं देऊं नये; ह्या ज्या मर्यादा सरकारानें ठरविल्या आहेत त्या फार प्रसंगीं मोडल्या जातात.

(३) सारा जास्त वाढल्यानें तो कुळांच्यानें देववत नाहीं व त्या कारणानें ज-

मिनीच्या दिगरबाधा होतात व जमिनी सावकाराकडे जातात. सारा वाढवितांना तो मितप्रमाणानें वाढविला पाहिजे.

(४) सर्व्हेचें काम चालू असतांना त्यांत मुलकी कामगारांचा संबंध येत नाहीं; तसा संबंध असणें जरूर आहे. मोजणी, प्रतवंदी, दरआकारणी, व त्याची कुळवार फाळणी, हीं सर्व कामें होतपर्यंत कलेक्टर व असिस्टंट कलेक्टर यांस तें काम तपासण्याची संधी नसते. सर्व काम तयार झाल्यावर तें त्यांचे अभिप्रायासाठीं जातें, परंतु तयार झालेलें काम तपासून त्यांतील चुका काढण्यास अवश्य जी फुरसत व शास्त्रीय ज्ञान लागतात तीं त्यांस असत नाहींत, यामुळें नांवाची मात्र तपासणी होते. कलेक्टर व असिस्टंट कलेक्टर यांस सर्व्हेचे कामाची माहिती करून देणें व प्रतवंदीचें व साऱ्याचे दरठरोतीचें काम मुलकी कामगाराचे सल्लामसलतीनें होणें हे ही स्थिति सुधारण्यास उपाय आहेत.

(५) पहिल्यानें दर ठरवितांना सक्तीची नजर ठेवणें व तो वसूल करणेचे कामांतही सक्ती करणें ह्या गोष्टी, पाऊस नियमित रीतीनें पडत नाहीं असे भागांत फार घातुक होतात, व त्या बाबतींत थोडी जास्त सवलतीची पद्धति चालू केली पाहिजे असा शेतकीचे कायद्यासंबंधानें जें अलीकडे कमिशन बसलें होतें त्यांनीं अभिप्राय दिला आहे. शेतकरी वर्गाची निकृष्ट स्थिति झाली आहे व ती राज्यास भीतिदायक आहे, असें लार्ड लान्सडाऊन यांनीं त्या रिपोर्टावर मत दाखल केलें आहे असें ह्मणतात.

(६) साऱ्याची पद्धति मूळ ज्यानीं ठरविली त्यांचा हेतु कुळांस सर्व खर्चवेंच जाऊन कांहीं रक्कम तरी शिलक रहावी असा होता; अलीकडे सारा वाढवितांना या तत्वाकडे दुर्लक्ष होतें. सारा बसवितांना मनाचा कल कसा ठेवला पाहिजे यासंबंधानें सर जार्ज विंगेटसाहेब यांचा अभिप्राय मनन करण्यासारखा आहे. ते ह्मणतात कीं:—चुकून सारा जरी अतिशय कमी बसला तरी देशाचें नुकसान होत नाहीं, फक्त त्या मानानें सरकारास पैसा कमी वसूल होईल; परंतु दुसरे दिशेस जर चूक झाली व सारा जरब बसला तर मात्र देशाची धुळधाण होते; तेव्हां यांपैकीं कोणती चूक होऊं नये याबद्दल सावधागिरी ठेवण्याची हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

(७) रयतेनें केलेले सुधारणांचे कारणानें सारा वाढविण्याचा नाहीं असा सरकारांनीं नियम केला आहे. साऱ्याचे फेरतपासणीचे वेळीं या नियमाकडे दुर्लक्ष होतें. या प्रकारचें दुर्लक्ष गुजराथ व कोंकणांतील सर्व्हेचे वेळीं विशेष झालें आहे. सारा वाढवितांना गुजराथेंत जमिनीखालीं पाणी जवळ आहे व

कोंकणांत स्थानिक स्थितींत एकंदर सुधारणा झाली आहे अशा सबबी लावण्यांत आल्या आहेत, परंतु त्यांचा परिणाम सदरचा नियम मोडणें हा झाला आहे. असें झाल्यानें कुळांस जमिनी सुधारण्यास उमेद रहात नाहीं.

(८) सर्व्हेखात्यांतून अन्याय झाला असतां तो दुरुस्त करून घेण्यास दिवाणी कोर्टाचा मार्ग कायद्यानें बंद करण्यांत आला आहे.

(९) सारा वाढतो तो पहिल्यानें जमिनीची प्रतवारी जास्त लावल्यानें, गांवचे समुदाय पूर्वीपेक्षां लहान लहान केल्यानें, व सारा घेण्याचें परमावधीचें प्रमाण वाढविल्यानें असे तीन कारणांनीं होतो.

सन १८९४ चे प्रांतिकसभेंत सर्व्हेखात्याकडून होत असलेले कामाबद्दल पुढें लिहिलेला ठराव करण्यांत आला आहे.

" (अ) सर फिलिफ वुडहौस यांच्या कारकीर्दींत सन १८७४ सालीं सरकारी ठराव जमिनीवरचे सारे जबर नसावे, व त्या साऱ्यांस मर्यादा अमुक प्रकारें असावी अशा अर्थाचा झाला होता; त्यानंतर लार्ड रेसाहेबांच्या कारकीर्दींत सन १८८६ सालीं जमिनींत स्वखर्चानें कोणीं सुधारणा केल्यास त्यावर सारा माफ असावा अशाविषयीं कायद्यानें हमीही दिली आहे; असें असतां सर्व्हेखात्याचा स्पष्ट कल याच्याविरुद्ध वागण्याचा आहे ही गोष्ट अयोग्य होय, असा या सभेचा खास अभिप्राय आहे. (ब) गेल्या पांच सालांत सदरलि ठराव व कायदा यांच्याविरुद्ध सक्तीचा अंमल हें खातें करीत असून त्याचा स्थानिक सरकारांनीं कांहींच बंदोबस्त केला नाहीं, उलट सर्व्हेखात्याच्या अभिप्रायाविरुद्ध सरकारी अम्मलदारांनींच खुद्द अधिक सौम्य अशा सूचना केल्या असतां त्या सरकारांनीं नामंजूर केल्या आहेत, हें पाहून सभेस खेद वाटतो. (क) सर्व्हेखात्याचीं साधनें व कामाच्या पद्धति पूर्णदशेस पोंचून महागाईच्या प्रसंगीं जे मुळचे दर ठरविण्यांत आले होते, त्यांहून अधिक असे जमिनीचे दर ज्याअर्थीं अलीकडे ठरविण्यांत आले आहेत, त्याअर्थीं पूर्वीच्या सुधारणेंत सारे वाढवितांना जमीनकमावणीचे श्रम व स्वस्ताई हीं जीं दोन कारणें सरकारानें मानिलीं होतीं तीं अर्थातच निरुपयोगीं झालीं आहेत, याकरितां विशेषतः कोंकण प्रांतांत विशेष जमिनीवर अगर गांवांच्या एकंदर जमिनीवर सारे वाढविण्याविषयीं ज्या सूचना होत आहेत त्या सक्तीनें बंद कराव्या अगर कसें, तसच वरकस जमिनींस व भातशेतांस पूर्णपणें सारे माफी देण्याच्या बाबतींत सरकारची हमी असणें अगत्याचें आहे किंवा कसें, याबद्दल सरकारांनीं पूर्ण विचार करणें हें योग्य आहे. (२) देवगडतालुक्यांतील जमिनीबद्दल खुद्द खोत लोकांस जितके सारे मिळं शकतात, त्याहूनही अधिक सारे बसविण्याचा

अन्यायाचा यत्न रेव्हिन्यू सर्व्हेकडून झाला आहे, व त्याचा परिणाम खोत लोकांचे हक्क पर्यायानें काढून टाकणें असा होत आहे. ही गोष्टही सभा फिरून दुसऱ्यानें सरकारच्या नजरेस आणून देत आहे; व ह्या शोचनीय स्थितीचा बंदोबस्त करण्याची तजवीज सरकाराकडून अद्याप कांहीं झाली नाहीं याबद्दल सभेस खेद वाटत आहे."

पोटभाग दुसरा.

अफू.

जमिनीचे पिकांत अफूचें पीक हें अत्यंत मौल्यवान व महत्वाचें आहे. या पदार्थाचा प्राचीन इतिहास फारसा उपलब्ध नाहीं, तरी साधारण असा समज आहे कीं पंधरावे शतकांत मुसलमानांनीं इराणांतून हें झाड या देशांत आणलें व प्रथमतः या झाडाची लागवड पश्चिम किनाऱ्यावर होऊन नंतर माळवा प्रांतांत होऊं लागली. अकबर बादशहानें सरकारपरवानगीवांचून हें पीक करूं नये असें ठरविलें होतें. इंग्रज सरकारांनीं अफूचा मक्ता सन १७७३ सालीं आपलेकडे ठेवण्याचें ठरविलें, त्याचे पूर्वी पुष्कळ दिवसांपासून हिंदुस्थानांतून भोंवतालचे देशांत अफू जात असे. ईस्ट इंडिया कंपनी ही पहिल्यानें अफू पिकविण्याचे हक्कांचा मक्ता लिलाव करून देत असे; परंतु, त्यापासून जमीन करणारांवर फार जुलूम होतो व अफूंतही भेसळ करण्यांत येते असें दिसून आल्यावरून तिनें सन १७९७ सालीं अफू तयार करण्याचें काम आपलेकडेच ठेवण्याचें सुरू केलें.

अफूपासून तिजोरीस उत्पन्न येतें, त्याचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार ह्मणजे हिंदुस्थानांत खपासाठीं जी अफू विकली जाते तिचेवर कर घेण्यांत येतो. हें जमेचें सदर फारसें मोठें नाहीं व उत्पन्नाचा जमाखर्च एक्साईज (मादक पदार्थावरील कर) या सदरांत येतो. दुसरा प्रकार ज्यापासून विशेष उत्पन्न होतें तो, ह्मणजे परदेशांत जी अफू जाते तिचेपासून उत्पन्न होतें तो आहे. अफूची लागवड माळव्यांतील संस्थानांत व वायव्य व अयोध्या प्रांतांत व बिहार प्रांतांत होते. पंजाब प्रांतांतही कांहीं अफू स्थानिक खपासाठीं उत्पन्न करण्यांत येते. माळव्यांतील अफूची लागवड संस्थानिकांचे देखरेखीखालीं होते, व ता अफू परराष्ट्रांत पाठविणेसाठीं इंग्रजी राज्यांत आणण्यास जो परवाना

द्यावा लागतो, त्याजवर इंग्रज सरकारची दस्तुरी घेण्यांत येते. वायव्य वगैरे प्रांतांत जी अफू उत्पन्न होते ती परराष्ट्रांस पाठविण्यालायक तयार करण्याचे सरकारी कारखाने गाझीपूर व पाटना येथें आहेत. अफू तयार करण्याचा मक्ता सरकारी आहे हें वर सांगितलेंच आहे. त्याबद्दल व्यवस्था अशी आहे कीं, सरकारांतून जमीन करणाऱ्यांस अफू लागवड करण्याचे परवाने देण्यांत येतात, व तयार केलेली अफू सरकाराशिवाय दुसरे कोणास देऊं नये असा त्यांत निर्बंध असतो. याप्रमाणें सरकारांत आलेली अफू सरकारी कारखान्यांत तयार होते व पुढें ती कलकत्ता येथें व्यापाऱ्यांस परदेशीं पाठविण्यासाठीं लिलावानें विकण्यांत येते. परवान्याशिवाय वाटेल त्या इसमास अफूचे पिकाची लागवड करण्याची सक्त मनाई आहे व ती उत्पन्न करण्याचे बाबतींत, किंवा जवळ बाळगणें, किंवा विकणें, परदेशीं पाठविणें, किंवा या देशांत आणणें या बाबतींत सरकारचे नियम आहेत; व ते मोडले तर कायद्यांत एक वर्षाची कैद व हजार रुपये दंड अशी शिक्षा सांगितलेली आहे.

अफूचे पिकास हवेंतील फरकामुळें फार वेळीं नुकसान होतें व उत्पन्नही वेळोवेळीं कमी जास्त होतें, त्यामुळें सरकारचे उत्पन्नास पूर्वीं अनिश्चितपणा येते असे; परंतु गेल २५ वर्षांपासून चांगले उत्पन्नाचे सालीं सर्व माल न विकतां, कांहीं माल कारखान्यांत शिलक ठेवण्याची वहिवाट सरकारांनीं सुरू केली तेव्हां-पासून हा अनिश्चितपणा पुष्कळ कमी झाला.

हिंदुस्थानांतून निर्गत होणारी अफू बहुतेक चीन देशास जाते व कांहीं थोडी स्ट्रेटस् सेटलमेंटस् येथें जाते. हिंदुस्थानसरकारानीं अफूचे मक्त्यांत पडणें नीतीस विरुद्ध व मादक पदार्थांचें प्रसारास उत्तेजक आहे, व औषधी कामासाठीं अफू लागेल ती शिवायकरून सुखासुखी अफू खाण्यानें मनुष्य नितिभ्रष्ट होऊन नुकसानीस येतो, वगैरे या व्यापाराचे संबंधानें आक्षेप घेण्यांत येतात. तसेंच इंग्रज सरकारांनीं चिनी लोकांस बळेंच अफूचें व्यसन लावलें आहे व सामर्थ्याचे जोरावर हिंदुस्थानची अफू त्या देशावर लादण्यांत येत आहे, असाही इंग्रज सरकारावर आरोप करण्यांत येतो. सन १८९३ सालीं विलायतेस अफूचे व्यापाराचे विरुद्ध मताची इतकी सरशी झाली कीं, पार्लमेंटास त्या विषयाचे संबंधानें विचार करण्यासाठीं एक कमिशन नेमावें लागलें. अफूची लागवड बंद करावी किंवा कसें, व बंद करणें झालें तर संस्थानांचे संबंधानें काय व्यवस्था करावी, सरकाराचे तिजोरीचें व लोकांचें किती व कसें नुकसान होईल व त्याबद्दल काय व्यवस्था करावी, अफूचे सेवनापासून परिणाम कसे होतात, व या सर्व बाबतींत हिंदुस्थानांत लोकमत कसें आहे, या सर्व प्रश्नांचा

विचार करण्याचें काम त्या कामिशनाकडे सोंपविलें आहे. या कमिशनाचा रिपोर्ट अजून बाहेर पडला नाहीं.

बंगाल्याकडे शेतकऱ्यांस दरएकरीं साधारण ४० रुपये किमतीची अफू उत्पन्न होते व दरएकरास १३० शेर खसखसही सांपडते. याशिवाय फुलाच्या पाकळ्या व पानें यांपासूनही कांहीं उत्पन्न होतें. तिकडील शेतकरी लोक हें पीक सर्व जमिनींत न करतां जमिनीच्या थोड्याशा भागांत करितात, यामुळें तें पीक गेलें तरी शेतकऱ्यांचें सर्वस्वी नुकसान होत नाहीं. परदेशांत पाठविण्याचा माल पेट्यांत घालून पाठविण्यांत येतो ; या प्रत्येक पेटींत १३३ पाउंड अफू असते. या पेट्यांची किंमत गेले वीस वर्षांत उतरत चालली आहे. सन १८६१।६२ सालीं १४८० पासून १५८० पर्यंत रुपये पेटीस किंमत येत असे, ती सन १८९१।९२ सालीं ११९० पासून १२१० पर्यंत आली. यास कारण असें आहे कीं, चीन देशांत अफू उत्पन्न होऊं लागली आहे व इराण देशांतूनही जाऊं लागली आहे, यामुळें इकडील मालाचा खप कमी होत चालला आहे. हिंदुस्थानांतील अफूची त्या देशांत उत्पन्न होणाऱ्या अफूपेक्षां तिचे चांगले गुणामुळें फार चहा आहे.

अफूचें उत्पन्न होतें तें तीन रीतींनीं होतें: (१) बंगाल्यांतील सरकारी कारखान्यांतून परदेशांस पाठविण्यासाठीं अफूची विक्री करितात त्यापासून; (२) माळव्यांतील अफू इंग्रजी मुलखांत आणतांना त्यावर परवान्याची फी घतात तीपासून; व (३) देशांतील खपासाठीं अफू देतात तिची किंमत येते तिजपासून. या तीन रीतींनीं उत्पन्न सन १८९१–९२ सालीं झालें तें येणेंप्रमाणें:--

	जमा रुपये.	वजा खर्च रुपये.
बंगाल्यांतील विक्री...............	५९५४२९२०	१८६१८१३०
माळव्याचे अफूवरील ड्यूटी	१८४४२८१०	
देशांतील खर्चास दिलेले अफूची किंमत	२१३८६७०	
	८०१२४४००	

निव्वळ जमा	१८९१-९२	६१५०६२७०
,,	१८९२-९३	६३९०६८४०
,,	१८८१-८२	७८०३२२००
,,	१८९४-९५ अंदाज.........	४१३८३०००

परदेशांत पाठविण्यासाठीं बंगाल्यांत किती अफू विकली व मुंबईस माळव्याची

अफू आणण्याचे परवाने किती पेट्यांबद्दल दिले व परदेशास किती पेट्या रवाना झाल्या त्याबद्दल माहिती देतों.

	१८८१-८२	१८९१-९२	१८९२-९३
बंगाल्यांत विक्री पेट्या.........	५६४००	५६२५०	४८८५२
दरपेटीस आलेली किंमत रु० (आ० पै. गाळून) ...	१३२३	१०५७	१२४७
मुंबईस माळव्यांतून आणलेल्या पेट्या	३११९६	३०६५४	२७८४५
फी दरपेटीस	७००	६००	६००
परदेशास किती पेट्या रवाना झाल्या.	८९३३८	८७५५८	७५३८४

सन १८९४ सालचे अखेरीस माळव्याचे अफूवरील फीचा दर रुपये ५० नीं जास्त वाढविला.

हिंदुस्थान देशांत अफूचा खप किती झाला हें चांगलें समजत नाहीं, कारण कीं पुष्कळ संस्थानांत अफू त्या त्या ठिकाणचे खर्चासाठीं पिकविण्यांत येते, व माळव्याहून परवाने घेऊन कांहीं व्यापारी व संस्थानिक परस्पर अफू घेऊन जातात, यामुळें माळव्यांतून एकंदर अफू या कामांसाठीं किती गेली याचा हिशेब लागत नाहीं. मुंबईत देशांतील खर्चासाठीं सन १८९१-९२ सालीं २४१४२ पाउंड अफू देण्यांत आली होती व पाउंडास दहा रुपये अशी किंमत आली होती. अलीकडे किंमत चार आण्यांनीं कमी करण्यांत आली आहे. या इलाख्यांतील बहुतेक भागांत कमिशनर हे प्रत्येक व्हेंडरानें अगदीं कमींत कमी किती अफू विकली पाहिजे तें ठरवितात; ही मर्यादा आतां व्यापाऱ्यांचे चढाओढीनें ठरली जात नाहीं, ही नवीन सुधारणा आहे. बंगाल्यांतील अफू सन १८८१ सालीं ५२५ हजार पाउंड व सन १८९१-९२ सालीं ६१७ हजार पाउंड या देशांतील खर्चासाठीं देण्यांत आली होती. देशांत खपलेले अफूपासून सरकारास सन १८८१-८२ सालीं रुपये ७९९४५२० व सन १८९१-९२ सालीं रुपये ९७६५१३० उत्पन्न झालें होतें. उत्पन्नाचे वाढीस कारण मुख्यत्वेंकरून अलीकडील बंदोबस्त हाच होय; त्यामुळें पूर्वीं चोरून आणलेली अफू खपत असे, तेथें आतां परवान्याची अफू खपते.

सन १८९१ सालीं हिंदुस्थानसरकारचा एक खलिता पार्लमेन्ट सभेस सादर करण्यांत आला त्यांतील मुद्याच्या गोष्टी अशा आहेत कीं, पूर्वींपेक्षां दुकानांची संख्या कमी झाली आहे; सन १८८९-९० सालीं बावीस हजार लोकांस अफूचें एक दुकान असें पडलें व अफूपासून होणारे पदार्थांचीं दुकानें एक लक्ष सत्याण्णव हजार लोकसंख्येस एक असें पडलें. दुकानांतच अफूपासून तयार केलेले

पदार्थ सेवन करूं देण्यास दुकानांस परवाने होते ते कमी करण्याच्या किंवा रद्द
करण्याच्या तजविजी चालू होत्या; मद्रासइलाख्यांत अफूचे सेवनास प्रतिबंध
सन १८८० पर्यंत नव्हता; त्या सालीं इतर प्रांतांतलेप्रमाणें या इलाख्यांतही
बंदोबस्त करण्यांत आला; तसेंच अफूवरील करही कांहीं प्रांतांत अफूचे व्यस-
नाचा प्रसार कमी करण्यासाठीं वाढविण्यांत आला होता; अफू विकण्याचें बंद
करणें शक्य नाहीं, कारण संस्थानांत तिची उत्पत्ति करण्याचें बंद करतां येत
नाहीं व उत्तरहिंदुस्थानांतील लढाऊ लोकांस हें व्यसन फारच आहे. एकंदर
हिंदुस्थानांत सुमारें ४००००० लोक अफू खातात.

पोटभाग तिसरा.

एक्साइझ—मादक पदार्थांवरील कर.

मादक पदार्थांचे सेवनाचा प्रघात कांहीं लोकांत फार प्राचीनकालापासून आहे;
एकंदरींत पहातां लोक निर्व्यसनी आहेत. मादक पदार्थांवर पूर्वींचे कारकीर्दींत-
ही कांहीं कर उत्पन्न करण्यांत येत असे असें दिसतें. हा कर देण्याची पद्धत
तकरार न येईल असे रीतीनें निश्चित करण्यास फार अडचण पडते. त्या कामीं
प्रश्नही फार भानगडीचे उत्पन्न होतात. देशवैचित्र्य, मादक पदार्थ करण्याचे
मूळ पदार्थांची विपुलता, व्यसनवश लोकांच्या तऱ्हा व भिन्न शासनवर्ति प्रांतांचें
सांनिध्य यांमुळें निरनिराळ्या पद्धति योजाव्या लागतात व बिनपरवा-
न्यानें हे पदार्थ तयार करण्यास किंवा दस्तुरी चुकवून नेण्यास सवलतीही फार
असल्यामुळें बंदोबस्तही फार सावधगिरीनें करावा लागतो.

ह्या कराचे बाबतींत सरकारचें वर्तन कांहीं तत्वांस अनुसरून असतें, तीं
अशीं आहेत:– मादक पदार्थ व पेयें यांवर कर जरब असावा; त्या पदार्थांचा
व्यापार सरकारी बंदोबस्ताखालीं असावा; हे पदार्थ विकण्याचे दुकानांची संख्या
गरजेचे मानानें असावी, व लोकमत कसें आहे याचा तपास करून त्यास अनुरू-
न व्यवस्था करण्याचा साध्य असेल तितका प्रयत्न करावा. हा कर जरब घे-
ण्याचा हेतु या पदार्थांचे सेवनास प्रतिबंध व्हावा हा आहे; तरी फार सक्ती
झाली तर व्यसनपरिहार न होतां अन्यमार्गानें हे पदार्थ प्राप्त करून घेण्याची
प्रवृत्ति होते, तेव्हां अशी प्रवृत्ति होईल इतका जरब करही घेण्यांत येऊ नये.

एकंदर अगदीं थोडे खर्चापासून जितकी जास्त जमा वसूल करतां येईल तितकी करावी असा सरकारचा हेतु आहे.

मादक पदार्थांचा प्रसार अप्रतिहत चालूं देणें हें देशास हितकर होत नाहीं, ह्मणून त्या पदार्थांचे व्यापाराचें नियमन करण्याचा अधिकार सरकारांनीं आपले हातीं ठेवला आहे. सर्व मादक पदार्थ विकण्याचा अधिकार सरकारचाच असें ठरविलें आहे व ते तयार करण्याचा व विकण्याचा परवाना कांहीं फी घेऊन देण्यांत येतो. अफूबद्दल कशी व्यवस्था करण्यांत आली आहे तें पूर्वी सांगितलेंच आहे. दारूशिवाय इतर मादक पदार्थ विकण्याचे भागा भागाबद्दल परवाने दरसाल लिलाव करून देण्याची साधारणतः वहिवाट आहे. परदेशी दारू विकण्याचे परवाने प्रत्येक दुकानावर सालिना कांहीं रक्कम घेऊन देतात. देशी दारूवर कर घेण्याचे संबंधानें मात्र वेगळाले प्रांतांत वेगळाल्या वहिवाटी चालू आहेत, त्यांचेबद्दल विस्तारानें वर्णन पुढें देण्यांत येईल. साधारण विचार पहतां त्या वहिवाटींचे दोन वर्ग करतां येण्यासारखे आहेत. (अ) पाहिले वर्गांतील पद्धतींत विशेष हा आहे कीं, एखादे मध्य ठिकाणीं दारू तयार करून ती तेथून बाहेर विक्रीस नेतांना तिजवर नियमाप्रमाणें दस्तुरी घेण्यांत येते. (ब) दुसरे वर्गाचे पद्धतींत कर वसूल करणें तो तयार झालेले दारूवर घेण्यांत येत नाहीं; तर मूळ दारू तयार करण्याचा व विकण्याचा हक्कच लिलाव करून घेण्यांत येतो. लिलावांत आलेले पैसेच अर्थात तो लिलावदार पुढें तयार करील त्या दारूवरील कर होतो. पहिले वर्गाचे पद्धतीस सेंट्रल डिस्टिलरी सिस्टिम (ह्मणजे मध्य ठिकाणीं भट्टी ठेवण्याची पद्धति) असें ह्मणतात. दुसरे वर्गाचे पद्धतीस आंउटास्टिल (बाहेरील भट्यांची) व मक्त्याची पद्धति असें ह्मणतात. या पद्धति प्रांतिक ठिकाणांचे मानानें निरनिराळ्या प्रकारानें अमलांत आणण्यांत येतात. पहिले वर्गाची पद्धति हिंदुस्थानसरकारास विशेष पसंत आहे व ती बहुतेक प्रांतांत भरवस्तीचे व साधारण वस्तीचे भागांत चालू आहे. विरल लोकवस्तीचे, व मार्गणाचे संबंधानें अडचणीचे व मध्य ठिकाणापासून दूर असलेले भागांत मध्यस्थ भट्टींतून दारू पुरविणें अतिशय खर्चाचें काम होतें, तेव्हां असे भागांत ठिकठिकाणीं दारू तयार करून विक्री करण्याचे परवाने देण्यांत येतात; ह्मणजे असे भागांत दुसरे वर्गाची पद्धति चालू असते.

आतां वेगळाले प्रांतांत ह्या पद्धति कशा चालू आहेत ते सांगतों.

(१) सेंट्रल डिस्टिलरी सिस्टिम अशी आहे कीं मध्य ठिकाणीं एक दारू तयार करण्याचे ठिकाणाची सरकार स्थापना करतें व त्या ठिकाणीं सरकारांनीं पसंत केलेले चांगले योग्यतेचे इसमास सरकारचे अंमलदारांचे देखरेखीखालीं,

दारू तयार करण्यास परवानगी देण्यांत येते. त्यानें दारू तयार केल्यानंतर भट्टींतून जी दारू बाहेर विकण्यास नेण्यांत येईल तीवर नियमाप्रमाणें दस्तुरी घेण्यांत येते. असे भट्टयांत दारू तयार करण्याचा हक्क मक्त्यानें देत नाहींत. तसेंच साधारणतः दारू तयार करण्याचा व विकण्याचा हक्क हे वेगळाले ठेवतात. या प्रकारची पद्धति खालचा बंगाल, वायव्य व अयोध्या प्रांत, व पंजाब प्रांत यांत चालू आहे. ब्रह्मदेशांत युरोपीय पद्धतीवर जी दारू तयार करण्यांत येते तिचेवर या पद्धतीप्रमाणें कर घेण्यांत येतो. मध्यप्रांतांत हीच पद्धति चालू आहे, तरी तींत थोडा फरक आहे. या प्रांतांत दस्तुरी घेण्याची ती, तयार झालेले दारूवर न घेतां, दारू तयार करण्यास जो मालमसाला लावण्यांत येतो त्याचेवर घेण्यांत येते.

या पद्धतीप्रमाणें तयार झालेली दारू विकण्यासंबंधानें व्यवस्थाही सरकारांनीं आपले बंदोबस्तांत ठेवली आहे, ती अशी कीं दुकानें किती घालावीं व कोठें घालावीं याबद्दल ठराव जिल्ह्याचे अधिकारी करतात व ते या दुकानांत दारू विकण्याचे परवाने देतात व त्यासंबंधानें फी घेतात. ही फी कांहीं ठिकाणीं महिन्याचे, कांहीं ठिकाणीं वर्षांचे मुदतीनें ठराविण्यांत येते. तिची रक्कम कांहीं ठिकाणीं लिलाव करून, व कांहीं ठिकाणीं टेंडरें (मागणीचे अर्ज) मागून ठरवितात.

(२) मद्रास प्रांतांत दारू तयार करण्याचा व विकण्याचा हक्क एक इसमास एकवट करून देत नाहींत. दारूविक्रीचे संबंधानें या प्रांतांत वर सांगितलेप्रमाणेंच वहिवाट चालू आहे. ती तयार करण्यासाठीं या प्रांतांत सरकार भट्टी स्थापन करीत नाहींत; तर चांगले योग्यतेचे माणसास भट्टी घालण्यास फी घेऊन परवानगी देतात व त्या भट्टयांत सरकारी अंमलदारांचे देखरेखीखालीं दारू तयार होते. ही पद्धति या प्रांतांचे बहुतेक भागांत चालू आहे. या पद्धतीस फ्रीसप्लायपद्धति ह्मणतात. या प्रांतांत पूर्वीं अशी वहिवाट होती कीं, दारू विकण्यास विवक्षित भट्टींतूनच दारू घ्यावी लागत असे, व हल्लीं चालू असलेले पद्धतीप्रमाणें पाहिजे त्या भट्टींतून ती आणतां येते; ही गोष्ट विशेष रीतीनें निदर्शनास यावी ह्मणून या रीतीस फ्री सप्लाय (निष्प्रतिबंध) असें नांव ठेवलेलें आहे.

(३) या प्रांताचे कांहीं जिल्ह्यांत दारू तयार करण्याचा हक्क मक्तयानें देण्यांत येतो. तो देण्याची रीति अशी आहे कीं मक्तेदारानें दारू विकणाऱ्यांस ती कोणते दरानें द्यावी हें ठरवितात व ती शर्त पतकरून सरकारास ती तयार करण्याचे परवान्याबद्दल दारूचे किमतीचे पैशापैकीं जो जास्त अंश देण्यास तयार होईल त्यास तो हक्क देण्यांत येतो. त्यानंतर तो मक्तेदार आपले खासगी भट्टींत

वर सांगितलेप्रमाणें दारू तयार करतो. या पद्धतीस "दारू तयार करून देण्याची मक्तयाची पद्धति" (धी सिस्टिम आफ मॉनॉपली सप्लाय) असें ह्मणतात.

(४) सेंट्रल डिस्टिलरी पद्धतीचा आणखी एक प्रकार मुंबई इलाख्यांत चालू आहे, त्याचा अनुभव पाहून ती सर्वत्र चालू करण्याचा विचार आहे. दारू तयार करण्याची व विक्रीची परवानगी एकाच इसमास जिल्ह्याचे हद्दीपुर्ती किंवा कांहीं विवक्षित हद्दीपुर्ती देण्यांत येते; मक्तेदारानें दारू तयार करणें ती सरकारांनीं स्थापन केलेले भट्टीखान्यांत सरकारी अंमलदारांचे देखरेखीखालीं करावी लागते, व त्यास त्या अंमलदारांचा पगारही द्यावा लागतो; भट्टीखान्यांतून दारू बाहेर नेतांना तिजवर नियमाप्रमाणें कर द्यावा लागतो; दारू विकण्यास दुकानें किती असावीं व कोठें कोठें ठेवावीं व दारू विकण्याचे दर किती मर्यादेंत असावे हें सरकार ठरवून देतात. दारू तयार करणें व विकणें याचा मक्ता देतात हें वर सांगितलेंच आहे; तो मक्ता घेण्यासाठीं लोकांकडून अर्ज मागवितात व त्यांत निदान किती ग्यालन दारूबद्दल (भट्टींतील) फी भरण्यास अर्जदार तयार आहे याबद्दल अर्जदाराकडून लिहून घेतात, व जो जास्त दारूवर फी देण्यास तयार असेल त्यास ती तयार करण्याची व विकण्याची परवानगी देण्यांत येते. निदान कबूल केलेली जी ग्यालनांची संख्या तिजवर फी भरावी लागते व त्यापेक्षां जास्त दारू तयार झाल्यास तिजबद्दल शिवाय फी नियमाप्रमाणें द्यावी लागते.

ही पद्धति मुंबई इलाख्याचे बहुतेक भागांत व अजमीर प्रांतांत व वायव्य प्रांताचे कांहीं भागांत चालू आहे. हीस ग्यारंटीड मिनिमम सिस्टिम ह्मणतात.

(५) सेंट्रल डिस्टिलरी पद्धतीचा आणखी एक नमुना आहे तो असा कीं, वर चवथे प्रकारांत सांगितल्याप्रमाणें निदान अमुक दारूवर फी भरण्यास तयार आहे असें ठरवून घेऊन, जास्त दारूवर फी देण्यास तयार असेल त्यास मक्ता देत नाहींत, तर दारूवर नियमाप्रमाणें फी देऊन शिवाय सर्वांत जास्त रक्कम देण्यास जो तयार असेल त्यास ती तयार करण्याचा व विकण्याचा परवाना देतात. हीस माडिफाइड डिस्टिलरी सिस्टिम ह्मणतात.

ही पद्धति मद्रास इलाख्याचे कांहीं भागांत चालू आहे. या पद्धतीचा अनुभव ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत घेऊन पाहण्यांत आला होता, परंतु तिचेपासून बिगरपरवान्याची दारू तयार करण्याची मात्र प्रवृत्ति होते असें दिसून आल्यावरून ती पद्धति सोडून देऊन चवथे प्रकारची पद्धति चालू करण्यांत आली आहे.

याप्रमाणें सेंट्रल डिस्टिलरी पद्धतीचे पांच प्रकार आहेत.

मद्रास व मुंबई इलाख्यांत ताडांचे किंवा माडांचे झाडांचे रसापासून दारू

करण्यांत येते. ज्या झाडांपासून माडी किंवा ताडी काढण्यांत येते त्यांवर कर घेण्यांत येतो व शिवाय तयार झालेले दारूवरही कर घेण्यांत येतोच.

मध्यप्रांतांत दारू तयार करण्याचा हक्क देण्याची एक वेगळीच पद्धति आहे. हिचें सेंट्रल डिस्टिलरी पद्धतीशीं थोडें साम्य आहे. या प्रांतांत सरकार मध्य ठिकाणीं भट्टीखाना स्थापन करतात व त्यांत प्रतिष्ठित इसमास आपली भट्टी घालण्यास परवानगी देतात व तींत तो सरकारी अंमलदारांचे साधारण देखरेखीखालीं दारू तयार करतो. फी घेणें ती, त्या भट्टींत किती दारू तयार करण्याचें सामर्थ्य असेल त्या मानानें, जितके दिवस ती भट्टी चालू राहील तितके दिवसांची, घेण्यांत येते. या प्रांतांत दारू विकण्याचे परवाने ती तयार करणाऱ्यास देत नाहींत; तो हक्क, वर सांगितल्याप्रमाणें, लिलावानें देण्यांत येतो.

या पद्धतीप्रमाणें पंजाब प्रांतांतील एका तालुक्यांत माल वहिवाट अलीकडे चालू करण्यांत आली आहे. या जिल्ह्यांत अलवार व भरतपूर संस्थानांचीं गांवें व इंग्रजी गांवें मिसळून गेलेलीं आहेत. या संस्थानांत दारूचा मक्ता देण्यांत येतो, त्यामुळें संस्थानी गांवाशेजारचे लोकांस दारू स्वस्त मिळते व सरकारचे जास्त कर भरणारे दारूस कोणी विचारीत नाहींत; यासाठीं सेंट्रल डिस्टिलरी पद्धति या भागांत बंद करून मध्यप्रांतांतलि पद्धति चालू केली आहे. मक्तेदारानें दारू किती तयार करावी तिची अखेरची मर्यादा सरकारांनीं ठरवून दिली आहे. जास्त दारू केल्यास तिजवर जास्त कर द्यावा लागतो.

मक्त्याची पद्धति.—पूर्वीं दारू तयार करण्याची व विकण्याची परवानगी मक्त्यानें देण्यांत येत असे. मक्तेदारास वाटेल तितकी दारू तयार करून, ती वाटेल तितके ठिकाणीं दुकानें घालून वाटेल त्या दरानें विकण्याची परवानगी असे अलीकडे बरेच वर्षांपासून ही पद्धति चालू नाहीं.

वायव्य व अयोध्या व मद्रास प्रांतांचे कांहीं भागांत मक्त्याची पद्धति चालू आहे; तरी त्यांत दुकानांची संख्या, दुकानें व भट्ट्या घालण्याचीं ठिकाणें, कांहीं ठिकाणीं दारू विकण्याचे दर वगैरेंबद्दल सरकार नियम करतात व कांहीं नियमित मर्यादेपुरताच परवाना लिलाव करून किंवा अर्ज मागवून देण्यांत येतो. ही पद्धति मुंबई इलाख्याचे कांहीं भागांतही चालू आहे. या इलाख्यांत या पद्धतीस आउटस्टिलपद्धति म्हणतात.

वायव्यप्रांत व अयोध्या प्रांत, आसाम व ब्रह्मदेश यांत आउटस्टिलपद्धति चालू आहे. ही पद्धति अशी आहे कीं, दारू तयार करण्यासाठीं भट्टी घालण्यास व तींत तयार केलेली दारू नियमित दुकानांत विकण्याची परवानगी लिलाव करून जास्त बोलणारास देण्यांत येते. साधारणतः एका भट्टीस जोडून एकच

दुकान ठेवण्याची परवानगी देण्यांत येते. नियमित स्थळींच भट्टी आहे किंवा कसें, नियमाप्रमाणें मक्तेदार वागत आहे किंवा कसें व यासंबंधानें सरकार देखरेख ठेवतात. ही आउटस्टिलपद्धति सरकारास पसंत नाहीं; साधेल तशी ती कमी कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू आहे. बंगाल प्रांतांतील कांहीं भागांत व पंजावांतील एक दोन तालुक्यांत ही पद्धति चालू आहे, परंतु तेथें ही दारू किती व कोणते गुणाची तयार करावी व भट्टी कशी असावी व किंमत निदान किती घ्यावी यावद्दल नियम करून दारूचा प्रसार कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे.

व्यसनाचे नियमनासाठीं मादक पदार्थांबद्दल बंदोवस्तही करणें जरूर आहे, तसाच जमा उत्पन्न करण्यासाठीं आहे. हा कर फार जरब ठेवला असलेमुळें वाटेल तेव्हां तो वाढवून त्यापासून जास्त जमा उत्पन्न करण्यासारखी ही बाब नाहीं. उत्पन्नांत वाढ कशी झाली आहे ती पुढील पत्रकावरून दिसून येईल. ही वाढ होण्यास कारणें अलीकडील सक्त बंदोवस्त व लोकसंख्येची वाढ हीं आहेत; मादक पदार्थांचे जास्त खपामुळें ती झालेली नाहीं.

मादक पदार्थांपासून उत्पन्न—हजाराचे आंकडे आहेत.

सन १८६१-६२ रु. १७८६१	१८९१–९२—रु. ५११७२
सन १८७१-७२ रु. २३६९१	१८९२–९३—रु. ५२४२४
सन १८८१-८२ रु. ३२२७२	१८९४–९५ अंदाज ५३१७७

मादक पदार्थांवर कर वसूल करण्याचे बाबतींत सरकारचें वर्तन कांहीं तत्वांस अनुसरून असतें हें वर सांगितलेंच आहे. तो कर बसविण्याचा तो कसे रीतीनें बसवावा यावद्दल मतभेद आहे. तसेंच या पदार्थांचे खपास सरकारांनीं किती प्रतिबंध करावा यावद्दलही तसाच मतभेद आहे. प्रतिबंधाचे प्रश्नाशीं धर्मसंबंधीं व सामाजिक पुष्कळ गोष्टींचा संबंध असल्यानें तो प्रश्न फार भानगडीचा आहे. सर्वस्वी प्रतिबंध करणें या देशाचे स्थितीचे मानानें शक्य नाहीं, कारण दारू तयार करण्यास पदार्थ विपुल आहेत व ती तयार करण्यास साधनेंही फारच अल्प खर्चांत प्राप्त करून घेतां येतात; तसेंच कांहीं जातींत दारू पिण्याची इच्छा व संवई फार प्रबल आहेत. दारू कोणी पिऊं नये असा पूर्ण प्रतिबंधक कायदा केला तरी, त्याची अंमलबजावणी होणें अशक्य, ह्मणून तो नामशेष मात्र राहील व त्यापासून लोकांचा कायद्यासंबंधानें अनादर मात्र उत्पन्न होईल. एकंदर विचार पाहतां, दारू किंवा इतर मादक पदार्थांचे मित सेवनापासून अपाय होतो असें ह्मणतां येत नाहीं व दारू मिळेनाशी करून दारू पिण्याचें बंद करण्यापेक्षां, लोकमत योग्य प्रकारचें होऊन व व्यसनी लोकांची व्यसनाचे

घातुकपणाविषयीं खात्री होऊन दारूचा खप वेतावाताचा जरी झाला तरी तें चांगलें असें हिंदुस्थानसरकारचें मत आहे.

मादक पदार्थांचे संबधानें बंदोबस्त कसे प्रकारानें करण्यांत येत आहे व सरकारास या पदार्थांपासून उत्पन्न किती येतें हें येथपर्यंत सांगितलें. आतां सन १८९१–९२ सालाबद्दल बाबवार जमेचा व खर्चाचा तपशील देण्याचा आहे, तो देऊन शेवटीं मादक पदार्थांचे प्रसाराचे प्रतिबंधार्थ सरकारचें वर्तन कशा दिशेनें असणार आहे तें सांगून हा विषय समाप्त करण्यांत येईल.

मादक पदार्थांवरील कराबद्दल जमाखर्चाचें कोष्टक सन १८९१–९२ सालाबद्दल.

सदरें	१८८१–८२ रु.	१८९१–९२ रु.
लायसेन्स फी वगैरे	१५३२८७७०	२०६३३५८०
भट्यांची फी	८०५०५०	१७४४६६०
स्टिलहेडडयूटी	८१६३५८०	१५३६७४६०
भांग, गांजा व अफू विकण्याबद्दल परवान्याची फी	३१६०३६०	५८३३५८०
हिंदुस्थानांत खपणारे अफूवरील डयूटी	६६१९०२०	७३६९४२०
अफू लावलेले जमिनीचें भाडें	३६७४०	४२४५०
दंड व किरकोळ	१५९२२०	१८१४८०
	३४२७२७४०	५११७२६४०
खर्च	९६८८६०	१९००९७०
निव्वळ जमा	३३३०३८८०	४९२७१६७०
सन १८९४–९५ सालांतील अंदाजी जमा	५३१७३०००	५११२४०००
खर्च	२०५२०००	
सन १८९२–९३ जमा	५२४२४४३०	५०४९४३००
खर्च	१९३०१३०	

सरकारचा वर्तनक्रम पुढें कसे दिशेनें राहाणार आहे तें मात्र सांगण्याचें राहिलें आहे; मूळतत्वें पूर्वींच सांगितलेलीं आहेत. आतां सरकार साधेल त्याप्रमाणें भट्ट्याची किंवा आउटस्टिलपद्धति बंद करीत जातील; तिचेबद्दल सेंट्रल

डिस्टिलरी पद्धति सुरू करतील; परदेशांतून येणारे दारूवर जितकी जकात घेण्यांत येते त्या मर्यादेपर्यंत शक्य असेल तितका जरब कर देशी दारूवर घेतील; दुकानांची संख्या कमी करीत जातील; व आउटस्टिलपद्धति चालू ठेवणें जरूर असेल असे ठिकाणीं ही भट्टी किती मोठी असावी, किंवा दारूची निदान किंमत किती असावी, याबद्दल सरकार बंदोबस्त करतील; याप्रमाणें बंदोबस्त होण्याचा आहे.

लोकमत–आतां या विषयाचे संबंधानें लोकमत कसें आहे हें सांगण्याचें आहे. मक्तयाचे पद्धतीपासून व्यसनाचा प्रसार वाढत जात आहे, सरकार उत्पन्न वाढविण्यासाठीं मादक पदार्थांचा प्रसार वाढवीत आहे, अशा पूर्वी तकरारी करण्यांत येत असत. आतां मूळ तत्वांचे संबंधानें सरकारचें व लोकांचें एक मत झाल्यासारखें आहे; व सरकारांनीं अनुसरण्याचीं ह्मणून जीं तत्वें ठरविलेलीं आहेत, तीं राष्ट्रीय सभेस मान्य आहेत. एका बाबतींत मात्र सुधारणा झाली पाहिजे असें राष्ट्रीय सभेचें ह्मणणें आहे. हल्लीं दारूचीं दुकानें किती असावीं व तीं कोठें घालण्यांत यावीं याबद्दल निश्चय सरकार करतात; व त्या कामीं लोकांच्या इच्छा अमुक तऱ्हेच्या आहेत असें सरकारास कळल्यास त्यांचाही विचार करण्यांत येतो. राष्ट्रीय सभेची सूचना अशी आहे कीं, एखादे ठिकाणीं दुकान नसावें असें त्या भागांतील रहिवाशांपैकीं निमेपेक्षां जास्त लोकांनीं जाहीर केल्यास तें दुकान बंद करण्याविषयीं नियम असावा. या प्रश्नासंबंधानें सरकारांनीं विचार करून तसा नियम करणें शक्य नाहीं असें ठरविलें आहे. सरकारचें ह्मणणें असें आहे कीं, या देशांत अनेक जातींचे लोक आहेत व त्यांचे दारूचे-संबंधानें विचार व सांप्रदाय भिन्न भिन्न आहेत. कांहीं लोकांत तर मद्यसेवन हें धर्मापैकींच एक बाब आहे असा समज आहे. मुसलमान लोकांस व हिंदुलोकांतील वरचे दर्जाचे लोकांस मद्य त्याज्य वाटतें व त्याचें सेवन धर्मबाह्य असें वाटतें, तसा इतर वर्गांचे लोकांचा समज नाहीं; यासुळें हिंदु व मुसलमान लोकांची वस्ती विशेष आहे असे ठिकाणीं दारूविरुद्ध बहुमत सहज होईल; व त्या लोकांचे मताप्रमाणें अंमल केल्यास इतर लोकांस तें पसंत होणार नाहीं इतकेंच नाहीं, तर आपले धर्माचे बाबतींत व्यत्यय आला असेंही त्यांस वाटण्याचा संभव आहे. वर सांगितलेली सचना अमलांत येण्यास देशांतील लोकसमाज एक तऱ्हेचा व ज्यांचे विचारांत साम्य आहे असा असला पाहिजे. दुकानें घालण्याचा किंवा काढून टाकण्याचा अधिकार म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांस द्यावा असें लोकपक्षाचें ह्मणणें आहे. त्यासंबंधानें सरकारचें ह्मणणें असें आहे कीं, या सभांत सभासद येतात ते वरिष्ठ दर्जाचे लोकांतीलच अस-

तात, ते बहुजनसमाजाचे प्रतिनिधि असत नाहींत; तसेंच प्रतिनिधींवर त्यांस नेमून देणारे लोकांचा जसा दाब विलायतेंत असतो, तसा इकडे असत नाहीं; यामुळें या सभांचे सभासदांचें मत, हें सकल जनसमाजाचें प्रतिनिधिद्वारें कळविलेलें मत, असें ह्मणतां येत नाहीं. तेव्हां वर सांगितलेल्या अडचणी या उपायानें दूर होत नाहींत. असा सरकारचे विचारसरणीचा सारांश आहे.

पोटभाग चवथा.

प्रांतिक कर.

प्रांतिक कर हे बहुतेक जमिनीवरच स्थानिक रस्ते, शाळा, गांवसफाई, गांवपोष्टाचा खर्च व कांहीं प्रांतांत गांवपोलीस यांसाठीं घेण्यांत येतात. कांहीं मुदतीचे सारे ठरलेले आहेत, असे भागांत हे कर जमीनबाबीवर शेंकडा कांहीं टक्के घेण्यांत येतात; कायमचे सारे ठरले आहेत असे भागांत जमिनीचे भाड्याचे रकमेवर ते आकारण्यांत येतात व त्यांचा कांहीं भाग मालकांकडून व कांहीं भाग कुळांकडून असे वसूल करतात. बंगाल्यांत प्रांतिक करांपैकीं निमे, वायव्यप्रांतांत एक चतुर्थांश सरकारांत घेतात; बाकीचे प्रांतांत ह्या करांची जमा बहुतेक स्थानिक कामांवर लोकलबोर्डांचे मार्फत खर्च होते. हे कर जमीनबाबीबरोबर ती वसूल करणारे अंमलदारच वसूल करतात.

हे कर कोणते प्रांतांत कसे आहेत त्याची सन १८९२–९३ सालाबद्दल माहिती खालीं देतों.

(१) दिस्ट्रिक्ट लोकल फंड रस्ते, शाळा, दवाखाने वगैरेसाठीं रुपये २०५८२७३. तपशील:—हिंदुस्थानसरकाराचे अमलांतील प्रांत रु० २०७६०, बंगाल रु० ४०१५३१०, आसाम रु० ५४९५००, वायव्य व अयोध्या रु० ४५५४९००, पंजाब रु० २२१३८२०, मध्यप्रांत रु० ३१४७२०, खालचा ब्रह्मदेश रु० १०२०८२०, मद्रास रु० ५१५७६२०, मुंबई रु० २६५५२८०.

(२) जमिनीवर प्रांतिक कर रस्ते, शाळा वगैरेसाठीं रुपये ४५२८४९०. तपशील:—बंगाल रुपये ४१९५२६०, वायव्यप्रांत रुपये ३२९७२०, मध्यप्रांत रु० ३५१०.

(३) जमिनीवर प्रांतिक कर फामिन इन्शुअरन्स व पाट बंधारे व आगगा-

ज्यांसाठीं रुपये २४०१६२०. तपशील:—वायव्यप्रांत रु० १७००५९०, पंजाब रु० ५५२८९०, मध्यप्रांत रु० १४८१४०.

(४) प्रांतिक पोष्टासाठीं कर रुपये ५११८९०. तपशील:–बंगालरु० ४३७४१०, वायव्यप्रांत रु० ३६६३०, मध्यप्रांत रु० ३७८५०.

(५) गांवकामगारांसाठीं जमिनीवर कर रुपये ८४०९७२०. तपशील:–हिंदुस्थानसरकार रु० ३२५६०, वायव्य व अयोध्याप्रांत रु० २३६०९२०, पंजाब रु० १२८७६८०, मध्यप्रांत रुपये ४५७१८०, मद्रास रु० ३९०७४२०, मुंबई रु० ३६३९६०.

(६) कोर्ट आफ वार्ड यांचे ताब्यांतील इष्टेटीवर नौकरपगारासाठीं कर रुपये १३९४२०. तपशील:-बंगाल रु० ७६६८०, पंजाब रु० २९१७०, मध्यप्रांत रु० ३३५७०.

(७) किरकोळ रुपये ४९११०

सन		जमा रुपये	खर्च रुपये.
१८८१–८२		२८९५४९००	५३२२६०
१८९१–९२		३५०२८३७०	६४१६६०
१८९२–९३		३७०६४९८०	६३५०८०
१८९४–९५	अंदाज	३५२५३०००	५३००००

पोटभाग पांचवा.

कष्टमच्या जकाती.

बंडाचे सालापर्यंत आयात मालावर शेंकडा पांच टक्केप्रमाणें जकात घेण्यांत येत असे. बंडानंतर तो दर दहा टक्के करण्यांत आला होता. सन १८६४ सालीं तो साडेसात टक्यांवर येऊन सन १८७५ सालीं फिरून पांच टक्यांवर आला. त्या सालचे कायद्याप्रमाणें कॉटन् टिवस्ट (सूत) याजवर साडेतीन टक्के व लोखंड व रेलवेचें सामान यांजवर शेंकडा एक टक्का अशी दस्तुरी घेण्याचें ठरलें. कच्चे मालावर घेतलेले दस्तुरीचा बोजा त्या मालाचे खरेदीस लागणारे भांडवलावरच पडतो, व परोक्ष रीतीनें भांडवलावरच कर घेतल्याप्रमाणें होतें, ह्मणून या मालावर कमी दस्तुरी घेण्यांत येत असे.

हिंदुस्थानांत विलायतेहून येणारे कापडांत त्यांक्याशायर येथील माल बराच

असतो ; त्यावर जकात बसल्यानें आपले व्यापारास धक्का बसतो व हिंदुस्थानांत वाढत चाललेले गिरण्यांस मदत होते अशा अर्थाची तक्रार तेथील व्यापाऱ्यांनीं केली. त्यावरून या बाबतींत वादविवाद चालू झाला. सन १८७६ सालीं लार्ड सालिसबरी हे हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी असतांना, त्यांनीं आयात मालावर कर घेणें हें अर्थशास्त्राचे तत्वांस विरुद्ध असून त्यापासून व्यापारास हरकती उत्पन्न होतात, ह्मणून त्या जकाती घेण्याचें होईल तितक्या लवकर रहित करावें असें फर्माविलें. तसेंच सन १८७७ सालीं हाउस ऑफ कॉमन्सनें कापसाचे मालावरील जकात, हिंदुस्थानचे पैशाचे संबंधानें स्थितीचा विचार करून, होईल तितकी लवकर रद्द करावी असा ठराव केला, व त्याप्रमाणें लॉर्ड लिटन् यांचे कारकीर्दींत सन १८७८ सालीं कांहीं बाबतींत व लॉर्ड रिपन यांचे कारकीर्दींत सन १८८२ सालीं बहुतेक बाबतींत आयात मालावरील जकात सोडण्यांत आली.

आयात मालावर व निर्गत मालावर जकात घेण्याचे संबंधानें कांहीं मूलतत्वें ठरलेलीं आहेत तीं अशीं–(१) एखादे देशांत जो माल उत्पन्न होतो त्या प्रकारचा माल परदेशांहून येईल तर त्यावर दस्तुरी घेण्यांत येऊं नये ; कारण अशी दस्तुरी देशांत होणारे मालास संरक्षण (प्रोटेक्टिव्ह) होते. तसा कर आयात मालावर घेणें झाल्यास देशी मालावरही कर बसविण्यांत यावा. (२) होतां होईतोंपर्यंत व्यापारोपयोगी कच्चे मालावर जकात घेण्यांत येऊं नये. (३) कर बसविणें झाल्यास ज्या पदार्थांवर कर बसविला असतां खर्चवेंच वजा जातां उत्पन्न बरेंचसें होईल, असे पदार्थांवर मात्र बसवावा. (४) निर्गत मालावर जकात बसविण्याचे संबंधानें नियम असा आहे कीं, कर बसविणें तो, जो माल त्या देशांतच विशेषेंकरून उत्पन्न होत असेल व त्याच देशांतून तो मुख्यत्वेंकरून बाहेर जात असेल, त्यावरच बसवावा. सर जॉन स्ट्रॅची यांनीं हा कर माफ करण्याचे वेळेस या कराचे बाबतींत वर लिहिलेलीं तत्वें सांगून शिवाय असें सांगितलें कीं, " हिंदुस्थानांत सांपत्तिक द्रव्यें विपुल आहेत, परंतु लोक गरीब आहेत, त्यामुळें भांडवलाची कमताई आहे; यासाठीं देशांतील मालाचा परदेशांत जितका खप होईल तितका चांगला; हिंदुस्थानांतून इंग्लंड देशास दरसाल वीस कोटींवर रुपये पाठवावे लागतात व त्याबद्दल व्यापारी रीतीचा मोबदला कांहीं येत नाहीं; ही रकम विलायतेपासून भांडवल, अक्कल, सामर्थ्य वगैरेंचे संबंधानें जी या देशास मदत होते तिचा मोबदला आहे; या देशाच्या व्यापाराची स्थिति एक विशेष प्रकारची आहे, व त्याची वृद्धीही अजून पुष्कळशी होणें आहे. विलायतेस दरमाणशीं आयात व निर्गत मालाची किंमत सरासरीनें वीस पौंड पडते, व हिंदुस्थानांत ती फक्त दहा शिलिंग पडते; तिकडे ज्या

थोड्या आयात मालावर जकात घेण्यांत येते तिची दरमाणशीं सरासरी बारा शिलिंग पडते व हिंदुस्थानांत जकात देणारे मालाची यादी जरी मोठी थोरली आहे तरी दस्तुरी दरमाणशीं सरासरी तीन पेन्स पडते; यावरून विलायत व हिंदुस्थान यांतील व्यापाराची कशी स्थिति आहे, हें दिसून येतें. हिंदुस्थानची गरीबी, कलाकौशल्याचे संबंधानें मागसलेली स्थिति व विशेष प्रकारची राज्यकीय स्थिति यांमुळें या देशाचा माल परदेशांचे मालाशीं अदलाबदल होण्यास अतिशय सवड द्यावी लागते."

या उताऱ्यावरून आयात व निर्गत मालावरील जकात घेण्याचे संबंधानें जीं मूलतत्वें आहेत तीं समजून येतील. या जकातीस वर जे आक्षेप सांगितले आहेत ते दारू, मीठ व अफू या पदार्थांवर घेण्यांत येत असलेले जकातीस वरील नियमाप्रमाणें लागू पडत नाहींत, कारण त्या पदार्थांवर या देशांतही दस्तुरी घेण्यांत येते. या कारणांसाठीं इतर मालावरील जकात जरी कमी करण्यांत आली, तरी हत्यारें, दारू, मीठ व अफू यांवरील आयात जकात व तांदुळावरील निर्गत जकातही माफ करण्यांत आली नाहीं. सन १८८१–८२ सालीं आयात व निर्गत मालावरील जकातीचें निव्वळ उत्पन्न २ कोटींवर थोडेंसें होतें, तें दस्तुरी माफ झाल्यावर साधारण एक कोटीवर आलें. सन १८९१–९२ सालीं हें उत्पन्न सुमारें दीड कोटीचें जवळ जवळ होतें.

या देशांत आयात व निर्गत मालाची किंमत सन १८४० सालीं २१ कोटि रुपये, १८५० सालीं ३२ कोटि, १८६० सालीं १३८ कोटि व सन १८९१–९२ सालीं १९५ कोटि, रुपये होती. ही सर्व वाढ आयात मालावरील जकात माफ झाल्यानेंच झाली असें नाहीं; तर माल निर्गत जास्त होण्यास आगगाड्या वगैरे साधनें झालीं आहेत व निर्गत होणारा मालही जास्त उत्पन्न झाल्यानें व विलायतेंतील शिलकी मालाची किंमत उतरल्यानें ही वाढ झाली आहे. कर माफ होणें हें कांहीं अंशीं वाढीस कारण आहे.

येथपर्यंत या कराबद्दलची सन १८८२ पर्यंतची हकीकत झाली. त्या सालीं आयात जकात माफ झाल्यानें अप्रतिहत व्यापाराचीं तत्वें हिंदुस्थानास पूर्णपणें लागू झालीं, व ही स्थिति सन १८८८ पर्यंत पूर्ण जारींत होती. सन १८८८ सालीं पेट्रोलियमवर दरग्यालनास अर्धा आणाप्रमाणें जकात बसविण्यांत आली तेव्हांपासून मार्च १८९४ पर्यंत या बाबतींत कांहीं कमी जास्ती झालें नव्हतें. सन १८९४ चे मार्च महिन्यांत १८७५ सालीं ज्या जिनसांवर जकात घेण्यांत येत असे त्या जिन्नसवारींत कांहीं फरक करून ती जकात बसविण्यांत आली

आहे. या प्रकारें पिछेहाट होण्यास जमेचे मानानें खर्चास येणारी तूट हें कारण होय.

वर या जकातीविरुद्ध जीं कारणें दाखविण्यांत येतात तीं दिलीं आहेत. आतां हा कर पूर्वी घेण्याचें सुरू असतांना त्याचे समर्थनास जीं कारणें देण्यांत येत असत, व ज्यांची हल्लीं कर बसवितांना पुनरुक्ति करण्यांत आली आहे, तीं देऊन हा विषय पुरा करण्याचा आहे. तीं कारणें अशीं कीं पांच टक्या-सारखे हलके जकातीपासून देशी व्यापारास उत्तेजन मिळतें असें होत नाहीं; व अप्रतिहत व्यापाराचीं तत्वें लागू करतांना त्या देशाचे जमाखर्चाचे संबंधानें स्थिति कशी आहे याकडे नजर ठेविली पाहिजे; जमाखर्चाची स्थिति चांगली असल्याशिवाय अप्रतिहत व्यापाराचीं तत्वें लागू करणें हें बरोबर नाहीं; व या जकातीबद्दल विचार करतांना ती सोडली तर एकंदर देशाचे जमेंत राज्य-कारभार चालण्यासारखा आहे किंवा नाहीं हें मुख्यत्वेंकरून पाहिलें पाहिजे वगैरे.

नवीन बसविलेले आयात मालावरील जकातीपासून खर्चवेंच वजा जातां बाकी निव्वळ उत्पन्न एक कोटि वीस लक्ष होईल असा अंदाज कायदा करतांना धरला होता. १८९४–९५ चे बजेटांत आयात व निर्गत मालावरील जकाती-पासून दोन कोटि चवऱ्याशीं लक्ष रुपये उत्पन्न हाईल व एकंदर कष्टम खात्याचें निव्वळ उत्पन्न दोन कोटि सहासष्ट लक्ष होईल असा अंदाज धरला आहे.

आयात मालावरील जकात फिरून बसविली त्या वेळीं कापसाचे केलेले मालावर जकात बसविली नव्हती व हें लोकांस पसंत पडलें नव्हतें. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, खर्चाचे नडीमुळें जकात जर बसविणें जरूर झालें तर ती एखादे प्रकारचे व्यापारास मेहेरबानी न दाखवितां सर्व मालावर सारखी बसविली पाहिजे. ब्राडफर्डचे लोंकरी कापडास, स्टाफर्डचे लोखंडास जर जकात आहे तर ती मांचेस्टर येथील कापडास नसावी हें बरोबर नाहीं. त्या मालास अशी माफी दिल्यानें विलायतचे व्यापाऱ्यांचे फायद्यासाठीं हिंदुस्थानचे हिता-हिताचा विचार होत नाहीं असा समज होईल. पांच टक्यांपर्यंत आयात माला-वर जकात बसविल्यानें देशांत उत्पन्न होणारे मालास उत्तेजन दिल्यासारखें होत नाहीं व ज्या तऱ्हेचा माल विलायतेहून येतो तसा माल या देशांत बहु-तेक उत्पन्नही होत नाहीं, असा कर बसविल्यानें नुकसान या देशांतील लोकांचें आहे व ते सोसण्यास कबूल आहेत. जमा व खर्चाचे बाबतींत सरकारांनीं हिंदु-स्थानचे हिताचा विचार करूनच वर्तन ठेविलें पाहिजे.

यासंबंधानें सरकारतर्फे ह्या मालावर जकात न बसविण्याचीं कारणें सांग-

ण्यांत आलीं होतीं तीं अशीं कीं, विलायतसरकारास फक्त हिंदुस्थानचेच हिताहिताचा विचार करून चालत नाहीं; इंग्रजी राज्यांतील सर्व देशांचे संबंधानें विचार केला पाहिजे, तेव्हां इंग्लंडचेही हिताहिताचा विचार केला पाहिजे. ही जकात बसल्यानें त्यांक्याशायरचे व्यापाऱ्यांचें नुकसान झालें असतें व त्यांनीं ती जकात बसवूं न देण्याचे संबंधानें खटपट केली असती व त्यामुळें दोन देशांत जीं सलोख्याचीं नातीं आहेत त्यांस धक्का बसला असता; जी जकात पूर्वीं पार्लमेंटचे शिफारशीनें माफ झाली होती, ती पार्लमेंटचे मंजुरातीशिवाय फिरून बसवितां येत नव्हती; ती मंजुरात मागण्यापूर्वीं नाण्याचे संबंधानें कायदा करण्यांत आला होता त्याचा परिणाम देशावर कसा होतो तें अनुभवानें पाहिलें पाहिजे होतें.

याप्रमाणें अनुभव पाहिल्यावर जमाखर्चाची तोंडामिळवणी पूर्वीं बसविलेले जकातीनें होत नाहीं असें दिसून आलें; तेव्हां १८९४ चे दिजंबरांत परदेशांतून येणारे कापडावर पांच टक्के जकात बसविण्यांत आली. त्याच वेळीं या देशांतील गिरण्यांत २० नंबराचेपेक्षां बारीक जो माल होतो त्यावरही पांच टक्के कर बसविला आहे. तो बसविण्यास कारण असें देण्यांत आलें कीं, पार्लमेंटांनीं केलेले ठरावांत हिंदुस्थानांतील जकाती देशांत तयार होणारे मालास संरक्षक अशा होऊं नयेत असें आहे; तेव्हां परदेशी येणारे कापसाचे तयार मालावरील जकात देशांत होणारे मालास संरक्षक अशी न होण्यास देशी मालावर तसा कर बसविणें अगत्य आहे. असें करण्याविषयीं स्टेटसेक्रेटरी यांचा हुकूम आलेला होता व तो हिंदुस्थानसरकारांनीं अमलांत आणला आहे. याप्रमाणें देशी मालावर कर बसला हें लोकांस पसंत नाहीं. लोकपक्षाचें ह्मणणें असें आहे कीं, या करानें गिरण्यांचा जो व्यापार नवीन उदयास येत आहे त्यास धक्का बसेल, पांच टक्के जकातही देशी मालास संरक्षक होत नाहीं, तसेंच ज्या प्रकारचा माल विलायतेहून या देशास येतो तसा या देशांतील गिरण्यांत शंभरांपैकीं सहा टक्केही होत नाहीं; परदेशी मालावरील जकात देशी मालास संरक्षक होण्यास तो पुष्कळसा होत असला पाहिजे, त्याप्रमाणें २४ नंबरचे सुतापेक्षां बारीक माल फारच थोडा होत आहे; जकात बसविणें झाल्यास तिचेपासून जसा चांगली झाली पाहिजे तशी या जकातीपासून होत नाहीं; जपान देशांत गिरण्या झाल्या आहेत व तेथील कपडा चीन वगैरे देशांत हिंदुस्थानांतील मालाशीं टक्कर मारीत आहे, तेव्हां अशा वेळीं गिरण्यांचे वाढीस प्रतिबद्धक असें कांहीं सरकारांनीं करूं नये. सरकारतर्फे हवाला सेक्रेटरी आफ स्टेट यांचे हुकुमावरच देण्यांत आला व असें सांगण्यांत आलें कीं मूळ हुकूम पार्लमेंटाचा आहे, तो

अमलांत आणण्यास काय तजविजी कराव्या किंवा न कराव्या याबद्दल स्टेट-सेक्रेटरीसच समजण्यास साधनें आहेत व त्यांनीं व्यापाराचे स्थितीचा व इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांचे हिताहिताचा विचार करून हुकूम दिला आहे, असेंही सांगण्यांत आलें.

कष्टम जकातीचे उत्पन्नाबद्दल माहिती खालीं दिली आहे.

जमा		१८८१–८२	१८९१–९२
		रु.	रु.
आयात मालावरील जकात		१५६२३५००	७९६४८१०
निर्गत ,, ,,		७६७९६९०	८८१९५७०
इतर उत्पन्न		३१०६९०	२२८५००
		२३६१३८८०	१७०१२८८०
खर्च		१९५११३०	१३६३६३०+
निव्वळ उत्पन्न		२१६६२७५०	१५६४९२५०
सन १८९२–९३ जमा	१६१७६३३०		१४७६९९९०
खर्च *	१४०६३४०		
सन १८९४–९५ अंदाजी जमा	२८७२९०००		२६६३४०.००
खर्च	२०९५०००		

\+ शिवाय परत दिलेली रक्कम रु० ४६९७७०. ही रक्कम १२९ पानांतील कोष्टकांत खर्चांत सामील आहे.

* शिवाय परत दिलेली रक्कम रु० ५८३३६०.

पोटभाग सहावा.

ष्टांप.

ष्टांपांचें उत्पन्न येण्याचें प्रथमतः सन १७९७–९८ सालीं सुरू झालें, त्या सालीं उत्पन्न वीस हजार रुपये झालें, तें सन १८५९–६० सालीं ६८ लक्षांपर्यंत गेलें. पुढें सन १८६०–६१ सालीं ष्टांपाचा कायदा नवीन झाल्यावर तें उत्पन्न फार झपाट्यानें वाढलें. हा कायदा विलायतेंतील कायद्याचे नमुन्यावर केला

होता व त्यांत इकडील स्थितीस अनुलक्षून पक्षकारांस व व्यापाऱ्यांस सोईचा होईल अशी व्यवस्था करण्यांत आली होती.

ष्टांप दोन प्रकारचे आहेत. एक न्यायाचे कामास लागणारे व दुसरे व्यापारव्यवहाराचे कामास लागणारे ष्टांप. न्यायखात्यांतील उपयोगाचे तिकिटांचे दर सन १८७० सालचे सातवे कायद्यावरून ठरलेले अजून चालू आहेत. व्यापारी ष्टांपाबद्दल कायदा सन १८७९ चा पहिला आहे. सावकार लोक वाईट सालांत घेतलेले रोख्यावरून चांगले सुगीचे सालीं दावे करतात, तेव्हां ष्टांपांचें उत्पन्न वाढेल तें साल शेतकरी लोकांस चांगलें असें समजावें असा कांहींचा समज आहे; परंतु त्याचे खरेपणाचा प्रत्यय उत्पन्नाचे कोष्टकावरून येत नाहीं व तो येण्यासारखाही नाहीं; कारण सर्व हिंदुस्थानांत ह्मणजे एकदम पुष्कळ पाऊस पडतो किंवा वाईट पीक येतें असें होत नाहीं. चांगलें पीक आलें ह्मणजे कुळें सावकाराची फेड करीतच नाहींत असेंही मानण्यास आधार नाहीं; तसेंच वाईट सालीं सावकार आपले पुढील फायद्यावर नजर ठेऊन कुळांस आपले कबजांत आणून ठेवीत नसतील असेंही ह्मणतां येत नाहीं. तेव्हां या बाबतींत निश्चित असें कांहीं अनुमान करतां येत नाहीं.

या उत्पन्नाचें प्रांतवार लोकसंख्येशीं प्रमाण पहातां मुंबई व बंगाल प्रांतांत दरमाणशीं इतर प्रांतांपेक्षां जास्त प्रमाण बसतें व उत्पन्नाचे वाढीचे मानानें पहातां मुंबई व मध्यप्रांत यांचा नंबर वर येतो.

सन १८८१–८२ व १८९१–९२ सालांबद्दल ष्टांपाचे जमेची व खर्चाची माहिती पुढें लिहिल्याप्रमाणें:—

जमा.	१८८१–८२ रुपये.	१८९१–९२ रुपये.
कोर्टफीष्टांपाची विक्री	२३०१५११०	२८८७७७४०
जनरल ष्टांपाची विक्री	१०१९८९१०	१२९७२८१०
इतर प्रकारें उत्पन्न	५९९७००	७७१०१०
×पैकीं वजा परत दिलेल्या रकमा	–३७७०७०	–४७१९८०
एकूण जमा	३३४३६६५०	४२१४९५८०

× १२९ पानावरील कोष्टकांत परत दिलेल्या रकमा खर्चांत दाखल केल्या आहेत व येथें जमेंत वजा घातल्या आहेत.

देखरेख करणारे अंमलदार, त्यांच्या कचेऱ्या व सादिलवार.	१८७८१०	१५७५८०
ष्टांपविक्रीबद्दल खर्च.	५८९८००	७३७७३०
	७७७६१०	८९५३१०
विलायतेंतील खर्च व हुंडणावळ.	३२८६२०	४८९१६०
	११०६२३०	१३८४४७०

सन १८९४-९५ चे बजेटांत धरलेली जमा रु० ... ... ४५६१८०००
" " खर्च रु० ... ... १७९००००
सन १८९२-९३ तील जमा रुपये ४४४८५४०
" " खर्च रुपये १९५००८०

पोटभाग सातवा.

मीठ.

आतां मिठाचे उत्पन्नाबद्दल विचार करण्याचा आहे.

हिंदुस्थानांत चार तऱ्हेनें मीठ पैदा होतें. तें असें:—

(१) समुद्रापासून; (२) डोंगरांतून; (३) दलदलीपासून; व (४) खारे मातीपासून. समुद्रापासून मीठ मुंबई, मद्रास व ओरिसा या प्रांतांचे किनाऱ्यावर होतें. ब्रह्मदेशांतही समुद्रापासून कांहीं मीठ करण्यांत येतें. डोंगरी मीठ पंजाबांत, कोहाक प्रांतांत, मंदी संस्थानांत व कांग्रादरीमध्यें सांपडतें. तिसऱ्या प्रकारचें मीठ राजपुतान्यांतील सांबर सरोवर, पंजाबांतील व खारागोडा येथील खाऱ्या विहिरींपासून होतें. चवथे प्रकारचें मीठ पतियाला, ग्वालेर व दतिया या संस्थानांत होतें. बंगाल प्रांतांत इंग्लंडांतून चेशायर येथून मीठ येतें व अरबस्थान व जर्मनी देशांतूनही येतें.

पूर्वी वेगळाले प्रांतांत मिठाचे दस्तुरीचे दर वेगळाले होते, परंतु सन १८८२ सालीं सर्व प्रांतांत बहुतेक सारखा दर करण्यांत आला. पूर्वी ब्रिटिश मुलखाचे बाहेरील प्रांतांत व संस्थानांत मीठ फार होत असे, यामुळें मिठावर कर घेण्यास अतिशय त्रास पडे. सरकारचा कर न देतां मीठ हद्दींत येऊं नये व ज्या

प्रांतांत दस्तुरी कमी असेल असे प्रांतांतून दस्तुरी जास्त घेण्यांत येत असे असे प्रांतांत मीठ जाऊं नये, यासाठीं फारच मोठा बंदोबस्त करावा लागे. नेटिव्ह संस्थानांत असलेले मिठाचे कारखाने सरकारचे हातांत आल्याशिवाय व वेगळाले प्रांतांत एकसारखा कराचा दर झाल्याशिवाय या बाबतींत सुधारणा होणें शक्य नव्हतें. हल्लीं सर्व नेटिव्ह संस्थानांबरोबर करार ठरवून मिठाचे कारखाने सरकारांनीं आपले हातांत घेतले आहेत व फ्रेंच व पोर्तुगीज लोकांबरोबरही या बाबतींत तहनामे ठरले आहेत. या नवीन पद्धतीस प्रारंभ लॉर्ड मेयोचे कारकीर्दीत झाला. त्याप्रमाणें जयपूर, व जोधपूरचे संस्थानिकांबरोबर सांबर सरोवरावर मीठ करण्याचा हक्क प्रथमतः संपादन करण्यांत आला. अखेरीस सन १८८२ सालीं लॉर्ड रिपन यांचे कारकीर्दीत सर्व संस्थानिकांबरोबर करार करून, सर्व मिठागरें इंग्रज सरकारचे ताब्यांत घेऊन, व सर्व हिंदुस्थानांत कराचा दर एकसारखा करून ती पद्धत पूर्णतेस आली.

मुंबईइलाख्यांतील मीठ कच्छचे रणांतील सरकारी कारखान्यांत व कोंकणांत खाजगी मिठागरांत सरकारचे देखरेखींखालीं तयार होतें. पूर्वेचे किनाऱ्यावर ओरिसा प्रांतांत व मद्रासइलाख्यांत समुद्रापासूनच मीठ तयार होतें व तें सरकारांत घेण्यांत येतें. सरकार तें मीठ विकत घेतें व नंतर तें ठरीव किमतीप्रमाणें विकण्यांत येतें. मुंबईस खाजगी कारखान्यांतील मीठ विकण्याचे वेळेस त्याजवर कर वसूल करण्यांत येतो. पंजाबांत डोंगरी मिठाचे कारखाने सरकारचेच आहेत व तेथील मीठ विकतांना करासुद्धां किंमत घेण्यांत येते. राजपुतान्यांतील कारखानेही सरकारचे देखरेखीखालीं आहेत. सर्व प्रांतांत कराचा दर एक झाल्यानें व आगगाड्या, आगबोटी वगैरे वाढल्यानें सर्व देशांत मीठ पूर्वीपेक्षां स्वस्त झालें आहे व सरकारचें उत्पन्नही वाढलें आहे.

मिठाचे करापासून उत्पन्न सन १८८१–८२ व सन १८९१–९२ सालीं किती झालें तें देतों:—

	१८८१–८२	१८९१–९२	१८९२–९३
जमा	७३७५६२००	८६३६१८२०	८६५६१०४०
खर्च	४८६२०९० (१)	४९७१४६० (२)	४५८७०७०

सन १८९४–९५ ची अंदाजी जमा ८६२९२००० खर्च ५१८६०००

(१) यांत परत दिलेल्या रकमा रु० ३८११२० सामील आहेत.

(२) याशिवाय परत दिलेल्या रकमा वजा होण्याच्या आहेत रु. २९९८६०.

पूर्वीं मिठाचा दर वेगळाले प्रांतांत वेगळाला होता हें सांगितलेंच आहे.

सन १८८२ सालांत ब्रह्मदेश व कोहाक शिवायकरून बाकीचे सर्व हिंदुस्थानांत ८२ पौंडांचे मणास २ रुपये असा करण्यांत आला होता, तो सन १८८८ सालीं रु. २ $\frac{1}{2}$ करण्यांत आला. ब्रह्मदेशांत सन १८८८ सालापर्यंत १ रुपयास थोडा कमी असा कर होता, तो त्या सालीं एक रुपया करण्यांत आला. कोहाक प्रांतांत १०२ पौंडांस आठ आणे दस्तुरी आहे. दरमाणशीं मीठ किती खपतें हें काढण्याचें बहुधा कठीण आहे. उत्तरहिंदुस्थानांतील लोकांस सामान्यपक्षीं मीठ कमी लागतें ; त्याचे मानानें मुंबई व मद्रास या इलाख्यांत मीठ जास्त खाण्यांत येतें. सामान्यपक्षीं माणशीं मीठ किती लागतें तें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

		सन १८८१–८२	सन १८९१–९२
मुंबई	पौंड	१० $\frac{1}{2}$	१२
मद्रास	पौंड	१५	१६
(उत्तरचे तीन जिल्हे व मलबार शिवाय)			
बंगाल	पौंड.		१२

मिठाचा खप व कराचें उत्पन्न यांचें गेले १० वर्षांचें प्रमाण पाहतां, उत्तर-हिंदुस्थानांत सन १८८१--८२ चे मानानें सन १८९१--९२ सालीं खप एक पंचमांशानें व उत्पन्नही त्याच प्रमाणानें वाढलें आहे. मुंबईइलाख्यांत खप व उत्पन्न यांचें प्रमाण दिढीनें वाढलें आहे. मद्रासइलाख्यांत सवाईनें वाढ आहे. बंगाल्यांत दोन्ही बाबतींत विशेषसा फरक झाला नाहीं. सर्व हिंदुस्थानांतील प्रमाण पाहिलें तर खपाचे वाढीचें प्रमाण शेंकडा २५ आहे व उत्पन्नाचे वाढीचें प्रमाण शेंकडा १७ आहे. बंगाल्यांत, चेशायरमधून मीठ येतें ह्मणून वर सांगितलेंच आहे. अलीकडे हिंदुस्थानांतील मीठ बंगाल्यांत पूर्वींपेक्षां जास्त खपतें व जर्मनी व अरबस्थानांतूनही मीठ येतें, यामुळें चेशायरचे मिठाचें मान पूर्वीपेक्षां कमी झालें आहे.

पोटभाग आठवा.

आकारलेले प्रत्यक्ष कर.

या भागांत जमा वाढविण्यासाठीं लोकांची प्राप्ती आणि जीवनाचीं साधनें यांचे मानानें त्यांजवर बसविलेले प्रत्यक्ष करांबद्दल सांगण्याचें आहे. असे प्रकारचे प्रत्यक्ष कर इंग्रज सरकारांनींच पहिल्यानें बसाविले आहेत असें नाहीं. पूर्वी-

चे कारकीर्दीतही धंदेवाले लोकांवर मोहतर्फा व कांहींवर सायरबाब असे कर असत. मद्रासइलाख्यांत मोहतर्फा सन १८६० सालापर्यंत घेण्यांत येत होता; मुंबईकडे सन १८४४ सालीं मिठावरील कर वाढविण्यांत आल्यावर मोहतर्फा सोडण्यांत आला; मध्यप्रांतांत पांढरी ह्मणून कर घेण्यांत येत असे, तो अजूनही चालू आहे. बंगालप्रांतांत सायरबाब कायमची दरठरोती झाल्यावर सुटली.

बंडामुळें कर्ज फार झालें व खर्च वाढला तेव्हां प्राप्तीवरील कर बसविण्यांत आला. बंडाचा मोड करून स्वस्थता करण्यांत बेचाळीस कोटींवर खर्च आला होता, व राज्यव्यवस्थेचे प्रत्येक खात्यांत सुधारणा करण्यांत आल्या होत्या व त्यांमुळेंही खर्च वाढला होता; व तिजोरींत तर टंचाई झाली होती तेव्हां मिस्तर वुइलसन्, त्या वेळचे हिंदुस्थानचे फडणीस, यांनीं हा कर विलायतेचे नमुन्यावर सुरू केला. तो कर शेतकी, धंदे, व्यापार, नौकरी वगैरे सर्व प्रकारचे प्राप्तीवर बसविला होता. त्या वेळीं ५०० रुपयांवरील प्राप्तीवर शेंकडा ४ रुपये व दोनशेंपासून ५०० पर्यंतचे प्राप्तीवर शेंकडा दोन रुपये कर बसविण्यांत आला होता. यानंतर दरांत वारंवार फेरफार झाले व हा कर सन १८७३ सालीं अजीबात सोडून देण्यांत आला. पुढें दुष्काळ पडल्यानें तिजोरींत खड्डा पडला तेव्हां सन १८७८ सालीं दुष्काळापासून देशाचें संरक्षण व्हावें ह्मणून धंदे व व्यापार यांपासून होणारे प्राप्तीवर कर बसविण्यांत आला, व पुढें शेतकीशिवाय सर्व प्रकारचे प्राप्तीवर तो सन १८८६ त बसविला. असे प्रकारानें या वेळीं कर वाढविण्यास कारण देशाचे संरक्षणाचा खर्च वाढविण्यांत आला होता तें झालें व आतां हा कर जमेची नेहमींची बाब असें ठरलें आहे. हा कायदा सन १८८६ चा दुसरा आहे व तो अजून अमलांत आहे. त्यांतील मुख्य मुद्दे असे आहेत कीं, रुपये ५०० खालील प्राप्तीवर कर नसतो, दोन हजारांपर्यंत प्राप्तीवर दररुपयास ४ पै व पुढें ५ पैप्रमाणें घेण्यांत येतो. लष्करी खात्यांत माफीची मर्यादा सहा हजारांपर्यंत आहे. सरकारास दिलेले कर्जावर व्याज मिळतें त्यावरही कर घेण्यांत येतो; परंतु सर्व मार्गांनीं एका इसमाची प्राप्ती जर दोन हजारांखालीं असेल तर या व्याजावर कर घेण्यांत येत नाहीं. नौकरीचे पगारावर दर वर सांगितल्याप्रमाणें आहेत व दुसरे प्रकारचे प्राप्तीवर कर दोन हजारांपर्यंत कांहीं ठरीव दराप्रमाणें घेण्यांत येतो व त्यावराल प्राप्तीवर पांच पैप्रमाणें घेण्यांत येतो. शेतकीचे प्राप्तीवर हा कर नाहीं.

हिंदुस्थानांत प्रत्यक्ष कर बसवितांना कोणते तरी प्रकारची अडचण असतेच. प्राप्तीवरील कराचे संबंधानें असें होतें कीं नौकर लोक व कंपन्या

व इलाख्यांचे शहरांतील लोक यांचेशिवाय बाकीचे लोकांवर आकारणी बरोबर करण्यास साधनें फार अपुरीं असतात. बाहेरचे लोकांजवळ फार करून हिशेब ठेवलेले नसतात व असले तरी त्यापासून व्यापाराची स्थिति दुसऱ्यास सगळी समजूं नये असे प्रकारानें ठेवलेल असतात, यामुळें कराची आकारणी करणाऱ्यांसही अडचण पडते व कर ज्यांचेवर बसला आहे त्यांचीही कुरकुर राहते. कंपन्यांचें उत्पन्न बरोबर समजतें ह्मणून त्यांचेवर कराचा बोजा बाहेरगांवचे व्यापाऱ्यांचे मानानें जास्त बसण्याचा संभव असतो. दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, हा कर देणारे लोकांची यादी व उत्पन्नाचे आंकडे तयार झाले असले ह्मणजे हवे त्या वेळीं या कराचें उत्पन्न वाढवितां येण्यास सवड असते, ह्मणून कर वाढविला तर उत्पन्न होण्यासारखी रक्कम असल ती प्रसंग पडला असतां उपयोगीं पडण्यासाठीं लोकांजवळ हातावेगळी ठेवलेली रक्कम असें विलायतेस समजतात; व एखादे सालीं खर्चास तूट आली ह्मणजे हा कर वाढवून ती उत्पन्न करून घेतात. तीच स्थिति इकडेही वेळोवेळीं होण्याची भीति आहे; हा कर इकडे सुरू झाल्यापासून तसा प्रकार कांहीं वेळीं झालेला आहे.

योग्य आकारणी झाली नाहीं तर तकरार करून ती दुरुस्त करून घेण्यास मार्ग ठेवला आहे व लोकही त्याचा उपयोग करून घेतात. एकंदर तपासणींत शेंकडा ५ टक्के कर कमी होतो असें दिसतें.

ह्या कराचें उत्पन्न लोकसंख्येचे मानानें फार कमी आहे, याचें कारण असें आहे कीं, या देशांत शेतकीवर निर्वाह करणारे लोकांची संख्या फार मोठी आहे व गांवचे उपयोगी पडणारे कामकरी लोकांस मेहनतान्याबद्दल शेतेंच मिळालेलीं आहेत; या लोकांचे प्राप्तीवर हा कर नाहीं. शहरांत राहणारे लोकांची संख्या शेंकडा सुमारें ९$\frac{१}{३}$ आहे. प्राचीन ग्रामपद्धतींत कलाकौशल्यावर निर्वाह करणारे लोकांची मान्यताही कमीच होती. अलीकडेच या लोकांचे स्थितीस बहडती कळा आहे व तीही इंग्रज सरकाराकडून सर्वांचें सारखें संरक्षण होऊं लागल्यानंतरची आहे. तेव्हां कर वसूल होण्याचा तो साधारण प्रतीचे मोठे गांवांतूनच होतो.

या कराचें सन १८९१-९२ सालीं निवळ उत्पन्न एक कोटी एकसष्ट लक्ष झालें. सन १८८६-८७ पासून सुमारें तेहतीस लक्षांची वाढ झाली आहे. खर्च पूर्वीपेक्षां सुमारें दोन लक्ष रुपये कमी लागतो.

सन १८९१-९२ सालीं या करापासून उत्पन्न किती झालें ती माहिती खालीं

दिली आहे. तुलनेसाठीं सन १८८६-८७ ह्मणजे या कराचे प्रारंभींचे सालचे आंकडे दिले आहेत.

सन १८९१–९२ सालीं आकारलेले करांचें उत्पन्न किती झालें त्याचा तपशील.

प्रांत.	१८८६–८७	१८९१–९२
	रु.	रु.
मद्रास....	१५४३४५०	१९०९४४०
मुंबई.	३१६४५९०	३६९६४७०
बंगाल.	३६४४५७०	४३७५१९०
वायव्य प्रांत....	२२२०६८०	२२७७२१०
पंजाब....	११२३७७०	१३३१९२०
मध्यप्रांत.	४०३४६०	४५५०००
आसाम.	२०५०५०	२३०२२०
ब्रह्मदेश.	१६०	७३३६९०
हिंदुस्थानसरकार.	१२४१६२०	१५१९०९०
जमा बेरीज....	१३५४७३५०	१६५२८२३०
वजा { परत दिलेल्या रकमा. ...	२७०६७०	१४७२६०
वजा { खर्च....	५०१५८०	२९५७७०
निवळ जमा....	१२७७५१००	१६०८५२००
सन १८९२–९३		१६३१७०१०
सन १८९४–९५ चा अंदाज.		१७०८२०००

दहा हजार लोकसंख्येंत १८ माणसांवर कर बसतो, व प्रत्येक मनुष्यावर सुमारें १२ आणे पडतो. कर बसविलेले इसमांवर सरासरीनें रुपये ३५ कर बसतो. आतां हा कर कोणाकडून किती येतो हें पाहतां, नौकर लोकांचा पगार व पेनशन यांवर २३ टक्के, कंपन्यांकडून ७, सरकारी प्रामिसरी नोटीचे व्याजावर ३ व इतर प्रकारचे उत्पन्नावर ६७ असा येतो. नौकरांत शेंकडा ७२ सरकारी नौकर आहेत, व इतर प्रकारचे उत्पन्नापैकीं सुमारें एकतृतीयांश सावकारी करणाऱ्यांकडून येतो. मद्रास व बंगाल्यांत हें प्रमाण एक चतुर्थांश पडतें. हा कर शहरांपासूनच जास्त येतो असें वर

सांगितलें आहेच. फक्त कलकत्ता व मुंबई ह्या दोन शहरांतच सर्व कराचे जमे-पैकीं २७ टक्के जमा येते; कर देणारे लोकांवर सरासरीनें प्रत्येकीं रुपये ८० बसतात, व दर दहा हजारीं कर देणारे २९८ लोक पडतात.

सन १८८६–८७ सालीं कर देणारे लोक ३ लक्ष ९७ हजार होते व सन १८९१–९२ सालीं ४ लक्ष ३ हजार होते. २२ कोटि प्रजेपैकीं शेतकीशिवाय ५०० रुपयांहून जास्त प्राप्ती असणारे इसम चार लक्षच होते. एकंदर कर दे-णारे लोकांपैकीं दोन हजारांपेक्षां कमी उत्पन्नाचे शेंकडा ८७ होते व वरचे उ-त्पन्नाचे १३ होते. यांपैकीं पहिल्या वर्गाचे लोक एकंदर करापैकीं ३९ टक्के व दुसरे वर्गाचे ६१ टक्के देतात.

या करासंबंधानें जी माहिती मिळविण्यांत आलेली आहे तिजवरून पाहतां कर देणारे लोकांची एकंदर प्राप्ती ६९$\frac{3}{4}$ कोटी असावी असें दिसतें. इंग्लंड व वेल्स देशांतील ४१५ कोटी उत्पन्नाचे मानानें ही फारच कमी दिसते, परंतु यासंबंधा-नें या देशांत व्यापारवृद्धि होऊं लागून फारच थोडे दिवस झाले आहेत व वि-लायतेस पिढ्यानुपिढ्या व्यापार वृद्धिंगतच होत गेला आहे हें लक्षांत वागविलें पाहिजे.

भाग अकरावा.

शेतकी व हवामान.

सन १८९१ चे मनुष्यगणतींत शेतकीवर निर्वाह करणारे लोकांची संख्या १७ कोटि ५३ लक्ष भरली आहे. याशिवाय मनुष्यगणतींत मजूरदार ह्मणून जे दाखल आहेत त्यांपैकीं बहुतेक शेतकीचीच मजुरी करतात; त्यांची संख्या २ कोटी ५४ लक्ष वरील संख्येंत मिळविली ह्मणजे एकंदर लोकसंख्येपैकीं शेतकीवर निर्वाह करणारे लोकांची संख्या शेंकडा ६९.९२ पडते. सन १८७२ सालीं हें प्रमाण शेंकडा ६८.५ होतें, व सन १८८१ सालीं शेंकडा ७२ असें होतें. फामिनकमिशनचे चौकशींत असें निष्पन्न झालें कीं, खेडेगांवीं रहा-णारे लोकांपैकीं शेंकडा ९० ह्मणजे एकंदर जनसंख्येपैकीं शेंकडा ८० प्रत्यक्ष किंवा परोक्ष रीतीनें शेतकीवर निर्वाह करतात. तेव्हां एवढ्या मोठ्या लोक-

संख्येचें उदरनिर्वाहाचें साधन जी शेतकी ती फार महत्वाचा विषय आहे हें उघड आहे.

शेतकीखातें–शेतकीसंबंधानें माहिती मिळविण्याचें काम सरकारांतून अगदीं अलीकडे चालू झालें आहे. सरकारचें या विषयाकडे लक्ष सन १८६६ चे ओरिसा प्रांतांतील दुष्कळामुळें गेलें ; आतां सर्व प्रांतांत शेतकीसंबंधानें स्वतंत्र खातीं स्थापन झालीं आहेत. या खात्यांकडे (१) शेतकीचे व सांपत्तिक स्थितीचे संबंधानें व्यवस्थित रीतीनें माहिती मिळविणें व ती प्रसिद्ध करणें ; (२) शेतकी व धान्याचा संग्रह यांचे सुधारणेसंबंधानें प्रयत्न करणें ; (३) दुष्काळाचे वेळीं व्यवस्था करणें व त्यासाठीं जरूर ती माहिती पूर्वी गोळा करून तयार राखणें हीं कामें सोंपविलेलीं आहेत. शेतकीची माहिती मिळविण्याचें काम गांवकामगारांचे मार्फतीनें, व ते कामगार जेथें नाहींत अशा प्रांतांत इतर रीतीनें चालू आहे. सांपत्तिक द्रव्यांचे संबंधानें सरकारांनीं माहिती मिळवून डाक्तर वाट यांचेकडून एक मोठा कोश तयार करविला आहे.

शेतकीची सुधारणा–शेतकी खात्याची स्थापना लार्ड मेयो साहेबांचे कारकीर्दीत झाली; शेतकीचे सुधारणेसंबंधानें त्यांनीं अभिप्राय दाखल केलेला आहे तो फार मनन करण्यासारखा आहे. तो असाः—आणखी पुष्कळ पिढ्या या देशाच्या संपत्तीची व सुधारणेची प्रगती शेतकीचे सुधारणेवर अवलंबून राहणार आहे, व परदेशांशीं ज्या पदार्थांचा व्यापार होण्याचा त्यांत शेतकीचें उत्पन्न हेंच मुख्य असणार आहे; तेव्हां व्यापारवृद्धि होण्यास शेतकीची सुधारणा करून उत्पन्न वाढविण्याची तजवीज केली पाहिजे व त्याचे गुण वाढविण्यासाठींही प्रयत्न झाले पाहिजेत; तसेंच नवीन प्रकारचीं धान्यें व कलाकौशल्यास व कारखान्यांस उपयोगी पदार्थ उत्पन्न करविण्याचा उद्योग केला पाहिजे. या गोष्टी घडवून आणणें सरकारास अगत्याचें आहे, कारण या देशांत सरकार हे नुस्ते राज्यव्यवस्था पाहणारेच नसून जमिनीचे मालकही आहेत वगैरे.

शेतकीची सुधारणा हें या खात्याचे हातांतील कामांपैकीं दुसरें काम आहे; परंतु त्यासंबंधानें अशा सामान्य वर्णनात्मक पुस्तकांत विशेष सांगतां येण्यासारखें नाहीं; फक्त अलीकडे या बाबतींत कोणत्या दिशेनें प्रयत्न चालू आहेत तें मात्र सांगतां येईल. या देशांत वेगळाले प्रांतांत वेगळाले प्रकारच्या जमिनी, दक्षिण प्रांतांतील काळ्या जमिनी, कर्नाटकांतील उंचवट्यावरील कोरड्या जमिनी, पंजाबांतील व सिंध प्रांतांतील वालुकामय जमिनी या सर्व वेगळाल्या वर्गांच्या आहेत व त्यांत पिकेंही वेगळाले रीतीनें करावीं लागतात. तें ज्ञान अनुभवानें शेतकऱ्यांस चांगलें आलेलें आहे; तरी तें ज्ञान आणखी पुष्कळ वाढविलें

पाहिजे आहे. असे प्रकारें ह्या ज्ञानाचा प्रसार होणें फार अगत्याचें होत चाललें आहे. आतां लागवडीलायख असलेली जमीन बहुतेक लागवडीस आलेली आहे, ती संपल्यावर हवीतशी वाढवूं असें ह्मणतां येण्यासारखें नाहीं; लोकसंख्या मात्र वाढत जाणारी आहे, तेव्हां त्यांचे निर्वाहासाठीं अन्नाचा सांठा हल्लीं लागवडीस आलेले जमिनीपासून जास्त पीक होईल असें करून वाढविला पाहिजे. शेतकीत सुधारणा कोणते दिशेनें करण्याची या बाबतींत शेतकरी अगदींच अनभिज्ञ आहेत असें नाहीं. विहिरीचें बागाईत पूर्वीपासून आहेच, परंतु सरकारांनीं पाटाचें पाणी आणून देतांच त्याचा उपयोग शेतकऱ्यांनीं लागलीच केला, त्याची वृद्धि हवीतशी होत नाहीं याचें कारण त्यांची गरीबी हें होय. पूर्वी नसलेलीं पुष्कळ पिकें आतां या देशांत होतात ही गोष्टही शेतकरी सुधारणा करण्यास तयार असतात याची साक्ष देते. खतांचें महत्व त्यांस माहीत आहे व चांगले उंची पिकांस त्याचा उपयोगही ते करतात. आजपर्यंत शेतकी सुधारण्याचे बाबतींत प्रयत्न सरकारतर्फे झाले ते सर्व एकदेशी ह्मणजे परदेशांतील पिकांच्या जाती इकडे आणणें व परदेशी औतें इकडे सुरू करणें असे प्रकारें नुसतें अनुकरण करण्याचे मार्गानें झाले; या देशांतील स्थितीचे मानानें योग्य असा त्या क्रमांत फेरफार करण्यांत आला नव्हता, त्यामुळें त्या प्रयत्नांपासून व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. त्यापेक्षां इकडील पिकांच्या जाती सुधारण्याचा प्रयत्न झाला असता तर जास्त फायदा झाला असता. परदेशी बियाणें इकडे आणण्यापेक्षां इकडील जातीच सुधारल्यानें जास्त फायदा होतो असें चहाचे लागवडींत पूर्णपणें निदर्शनास आलें आहे. आतां निराळे पद्धतीवर व्यवस्था चालली आहे. पूर्वींचीं नमुन्याचीं शेतें आतां काढून टाकून त्यांचे बदली शेतकीचे सुधारणेसाठीं जे उपाय उपयुक्त वाटतात त्यांचा अनुभव पाहण्यासाठीं शेतें ठेवण्यांत आलीं आहेत. विलायतेहून शेतकीचे संबंधानें शास्त्रीय ज्ञान ज्यांस आहे असे विद्वान लोकांस इकडे आणवून त्यांचेकडून इकडील शेतकीच्या तऱ्हा व इकडे कोणत्या सुधारणा करणें योग्य आहे याबद्दल चौकशी करण्यांत येत आहे. सन १८८९ सालीं हिंदुस्थानचे स्टेट-सेक्रेटरी साहेबांनीं डा० व्होएल्कर, विलायतेंतील कृषिकर्मोत्तेजक सभेचे रसायनशास्त्रासंबंधनें मसलतगार, यांस या देशांतील शेतकीची सुधारणा कशी करतां येईल व रसायनशास्त्रोक्त प्रयोग कितपत उपयोगांत आणतां येतील याबद्दल शोध करण्यासाठीं इकडे पाठविलें होतें. त्यांनीं या देशांत सुमारें सवा वर्ष राहून व वेगळाले प्रांतांत प्रवास करून शेतकीचा अनुभव घेतला व एक रिपोर्ट केला. या रिपोर्टांतील सूचना कोणते रीतीनें अमलांत आणतां येतील या

बद्दल सरकारांत विचार चालू आहे. जंगलासंबंधानें त्यांनीं केलेले सुचना संबंधानें मात्र हिंदुस्थान सरकारांनीं ठराव प्रसिद्ध केला आहे; त्याचा मतलब जंगलाचे भागाचे अखेरीस देण्यांत येईल. या शास्त्रवेत्त्यांचा रिपोर्ट फार मोठा व महत्वाचा व सर्वांनीं अवश्य वाचण्यासारखा आहे. त्यांनीं केलेल्या सूचनांपैकीं दोन तीन बाबतींतील मुख्य सूचना मात्र येथें दाखल करतों. त्यांची एक सूचना अशी-आहे कीं, शेतकरी वर्गांपैकीं कांहीं वर्गाचे लोक आस्थेचे व सामर्थ्याचे मानानें इतरापेक्षां जास्त चांगले आहेत व ते नवीन सुधारणा ग्रहण करण्यास जास्त समर्थ असतात; तेव्हां असे लोकांस शास्त्रीय कृषिकर्मविद्येची तत्वें शिकविल्यास फायदा होण्यासारखा आहे व ते ह्मणतात कीं हें ज्ञान नसलेमुळें हल्लीं शेतकी सुधारण्याचे कामास पुष्कळ हरकत होते. जमीनीचा सुपिकपणा हल्लीं प्रमाणें कायम राखण्यास कोणते उपाय केले पाहिजेत याबद्दल त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, जनावरांचे उत्सर्ग, जे भूमींत गेले तर तीस पुष्टिदायक होतील असे, जळण कमी असल्यानें, पुष्कळसे खताचे कामीं येणारे पदार्थ निरर्थक टाकले जातात, ते सर्व पदार्थ भूमीस मिळतील असें झालें पाहिजे; या देशांत फेर पाळीनें पिकें करण्याची पद्धति चालू आहे ती योग्य तत्वांस अनुसरूनच आहे व त्यांत सुधारणा कशी होईल तें अनुभव घेऊन त्याचें अनुरोधानें ठरविलें पाहिजे; चांगलें बीं मिळवून देण्याचे संबंधानें सरकारांतून तजवीज करावी व सरकारी शेतांत चांगले बियांचा उपयोग लोकांचे प्रत्ययास आणून द्यावा; तसेंच बागाइती पिकें करण्याचें वाढलें पाहिजे असें त्यांचें ह्मणणें आहे. त्यांचे दृष्टीस असें पडलें कीं कृत्रिम पाटाचे पाण्यापेक्षां विहिरीचें पाणी जास्त चांगलें असें शेतकरी समजतात व शिवाय साधारण समज असा आहे कीं, विहिरीचें पाणी उष्ण असतें व पाटाचें पाणी थंड असतें. विहिरीचे पाण्यानें शेतकी करतांना ती चांगले काळजीनें होते व पाटाचे पाणी असलें ह्मणजे तशी होत नाहीं; कदाचित पाटाचें पाणी सुबलक मिळाल्यानें जमिनींत वाजवीपेक्षां फाजिल सोडलें जात असेल व फाजिल पाणी मुरल्यापासून होणारे परिणामांमुळें शेतकऱ्यांचा वर सांगितल्याप्रमाणें समज झाला असेल असें त्यांचें ह्मणणें आहे.

हिंदुस्थानसरकारचे शेतकीखात्याचे चिटणिसांनीं बागाइती पिकें किती जास्त होण्यासारखीं आहेत याबद्दल अलीकडे शोध केला आहे, त्यांत त्यांस असें दिसून आलें कीं, ज्या प्रांतांबद्दल माहिती उपलब्ध आहे त्यांत सात कोटी साठ लक्ष एकर जमिनींत बागाइती पिकें होण्यासारखीं आहेत; त्यांपैकीं सुमारें एक पंचमांश जमिनींत विहिरीचे पाण्यानें बागाईत होईल व बाकीचे जमिनीस पाटाचें पाणी मिळालें पाहिजे. बागाईत वाढविण्याचे संबंधानें सर जेम्स् केअर्ड

यांनीं असा अभिप्राय दाखल केला आहे कीं, लागवडीलायक असलेले जमिनी-पैकीं एकतृतीयांश जमिनींत जर बागाइती पिकें होऊं लागलीं तर जें धान्य जास्त होईल त्यापासून दुष्काळाची भीति नाहींशी होईल; व दरसाल पीक जरी १ $\frac{1}{2}$ टक्का वाढत जाईल तरी त्यावर वाढत जाणारे लोक संख्येचा गुजारा होईल. शेतकी सुधारण्यासाठीं सरकारांतून तगाई मिळते. सरकारांतून पाट-बंधारे बांधण्यासंबंधानें किती प्रयत्न झाला आहे त्याबद्दल वर्णन पब्लिक वर्क्सचे भागांत येईल.

शेतकीचीं जनावरें—शेतकीस अत्यंत अवश्य जीं जनावरें त्यांचेसंबंधानें या देशाची स्थिति कशी आहे तें पाहण्याचें आहे. या देशांत जरूरीपेक्षां पुष्कळ जास्त जनावरें आहेत असा डा. व्होएलकर यांनीं अभिप्राय दिला आहे; परंतु दुसरे एका मोठे ग्रंथकाराचे ग्रंथांत या देशांत शेतकीस पुरेसा जनावरांचा संग्रह नाहीं व तीं चाऱ्याचे कमताईमुळें चांगलीं पुष्ट नसतात असा अभिप्राय दाखल आहे. जनावरांस हवा तितका चारा मिळत नाहीं व तीं उत्पन्न करण्यासंबंधानें योग्य काळजी घेण्यांत येत नाहीं व त्यामुळें तीं अशक्त असतात; शेतांत चाऱ्यासाठीं पिकें लावणें व जंगल राखणें हा ही स्थिति सुधारण्यास उपाय आहे असें डा. व्होएलकर यांनीं फार आग्रहानें सुचविलें आहे. बहुतेक प्रांतांत शेतकीचें काम बैलावरच होतें. म्हैसूर संस्थान, मद्रास इलाख्यांतील कर्नुल व नेलुरजिल्हे, मध्यप्रांत, मुंबई इलाख्यांतील गुज-राथ प्रांत, पंजाबांत हरियाणा या ठिकाणीं बैलाच्या जाति चांगल्या आहेत. घोड्यांचेसंबंधानें पाहतां, लष्करांत पूर्वींप्रमाणें घोड्यांचा खप नसलेमुळें बंगाल व मद्रास प्रांतांतील घोड्यांच्या प्राचीनच्या जाती नष्ट झाल्यासारख्या आहेत. मुंबई इलाख्यांत दक्षिणेंत व काठेवाड प्रांतांत घोडे चांगले होतात व या प्रांतांत सरकारांनीं वळू घोडे ठेवले आहेत. पंजाबांत व बलूचिस्थानांत मात्र उत्कृष्ट घोडे उत्पन्न होतात व हेच लष्करासाठीं घेण्यांत येतात. ब्रह्मदेशांत व मणिपु-रांत उत्कृष्ट तट्टें होतात, तीं पोलो नामक खेळास उपयोगी पडतात. तो खेळ मूळचा मणिपुरांतीलच आहे.

जनावरांच्या व पिकांच्या रोगांचें निदान शोधण्याचे व उपाय करण्याचे संबं-धानें अलीकडे प्रयत्न चालू आहेत. पशुवैद्य तयार करण्यासाठीं शाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत व एक पशुवैद्यकी खातेंही स्थापन केलें आहे. जनाव-रांची स्थिति सुधारावी व चांगले प्रकारचीं गुरें तयार करण्यास प्रोत्साहन द्यावें म्हणून ठिकठिकाणीं गुरांचीं प्रदर्शनें करून बक्षिसें देण्यांत येतात; व ठिकठिकाणीं वळूही ठेवण्यांत आले आहेत.

जनावरांचे संख्येसंबंधानें माहिती अपुरी आहे तरी पुढील कोष्टकावरून जनावरांचे संख्येसंबंधानें कांहीं कल्पना होईल. ही माहिती सन १८९२-९३ सालाबद्दल आहे व आंकडे हजाराचे आहेत. सरकारी माहितीचे पुस्तकांत बंगाल्याबद्दल माहिती नाहीं.

१. शेतकीचीं जनावरें, नांगर, गाड्या वगैरे.

आंकडे हजाराचे आहेत.

	बैल.	टोणगे.	नांगर.	गाड्या.
मद्रास.	४१८४	८१९	२५१७	४५४
मुंबई.	३१३२	२६२	११११	५००
वायव्यप्रांत.	७१९३	६०४	३०२७	४४२
अयोध्या.	३१८६	१९२	१४४८	९२
पंजाब.	४२३२	५०६	२१९१	२०८
मध्यप्रांत (तेरा जिल्ह्यांपुर्ती माहिती).	१९४१	३०२	८५८	२२३
वरचा ब्रह्मदेश.	५३८	६९	३१९	२०३
खालचा ब्रह्मदेश.	५४३	२८२	३५१	१८६
आसाम (६ जिल्ह्यांपुर्ती माहिती).	१२६२	१४८	२९५	५
वऱ्हाड.	८२०	३२	१३८	१३१
कुर्ग.	३८	११	३०	.७
अजमीर.	१०१	७	४७	१०
*बेरीज हिंदुस्थानची	२७१७८	३२३९	१२३७९	२४५८

(२) इतर जनावरें—आंकडे हजाराचे आहेत.

	दुभतीं जनावरें *गाई–ह्मशी.	शेळ्या–मेंढ्या.	घोडे.	गाढवें व खेंचरें.
मद्रास.	४७९०	१२७००	३९	११८
मुंबई.	२७९४	३४६१	१४४	६२
वायव्यप्रांत.	७२२२	४१७६	३२५	२६३
अयोध्या.	३१६६	१८४९	१४८	६३
पंजाब.	५२८०	६६७२	२६९	५३८
मध्यप्रांत (१३ जिल्ह्यांपुर्ती माहिती).	२१००	६५५	८०	२२

वरचा ब्रह्मदेश.	४८६	३८	१४	.७१
खालचा ब्रह्मदेश.	४९४	३४	१०	०
आसाम (६ जिल्ह्यां- पुर्ती माहिती).	** ०	१९१	५	.३८
वऱ्हाड.	९७३	४९८	३५	२०
कुर्ग.	३६	३	.६५	.३०
अजमीर.	१६४	३७१	३	५
* बेरीज सर्व हिंदुस्थानची.	२७५२४	३०६६२	१०७८	१०९५

* यांत इतर कांहीं प्रांतांबद्दल आंकडे आहेत.

** याशिवाय वासरें व रेडकें १५३१० आहेत.

** या प्रांताचे बैल व टोणगे यांचे आंकड्यांत गाई-ह्मशी यांबद्दल आंकडे सामील आहेत.

दुष्काळासंबंधानें व्यवस्था—या देशांत आजपर्यंत पुष्कळ दुष्काळ पडले आहेत व मागील अनुभवावरून पहातां पुढें ही त्या बाबतींत भिती नाहीं असें नाहीं. सन १८७६ चा दुष्काळ पडल्यावर त्यांचे संबंधानें पद्धतवार व्यवस्था लावण्याची अवश्यकता दिसून आली, तेव्हां दुष्काळाचे बाबतींत व्यवस्था कशी असावी याबद्दल माहिती मिळविण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें होतें. या कमिशनानें मिळविलेली माहिती अत्यंत महत्वाची आहे व या कमिशनाचेच सूचनेवरून शेतकीखातें जें मध्यंतरीं लयास गेलें होतें त्याचा उद्धार झाला आहे. या कमिशनानें या खात्याचे मार्फत दुष्काळ निवारणार्थ पूर्वोपायाची तजवीज कशी करावी हें सांगितलें आहे. त्या सूचना अशा आहेत:— प्रत्येक जिल्ह्यांत एका अमलदाराकडून शेतकीचे पिकाबद्दल व धान्याचे दराबद्दल माहिती मिळवीत जावी, व त्यावरून त्या सालचें पीक नेहमींप्रमाणें आहे किंवा नाहीं हें पहावें; असे प्रकारानें सालोसाल माहिती मिळवीत गेल्यानें शेतकरी लोकांचे स्थिति संबंधानें अनुमान करण्यास चांगलें साधन होईल, व दुष्काळ पडलाच तर कोणते वर्गाचे लोकांस जास्त मदतीची जरूर लागेल हें ही समजेल. तसेंच या अमलदारानें धान्याचा संग्रह, व्यापाराची स्थिति, कर्ज काय व्याजानें मिळतें व मजुरीचा दर काय असतो, मजूर पुरेसे मिळतात किंवा नाहीं, याबद्दल व याविषयाचे संबंधाचे दुसरे बाबतींची माहिती मिळवावी; हा अमलदार कलेक्टराचे हताखालीं असावा; प्रत्येक प्रांतासाठीं शेतकीचा एक डायरेक्टर असावा व त्यानें नेहमीं शेतकीचे सुधारणेचे कामीं लक्ष पुरवावें व वर सांगितलेले माहिती मिळविणारे अमलदारावर देखरेख करावी

व सरकारास शेतकीचे स्थितीची माहिती सर्व प्रांतांची एकवट करून देत जावी; तसेंच त्यानें दुष्काळाचीं चिन्हें दिसतांच सरकारास बातमी द्यावी व त्याचे निवारणासाठीं काय उपाय योजावे याबद्दल अंदाज तयार करून द्यावा ; शेतकीचे खात्यावर हिंदुस्थानसरकारचे हाताखालीं एक अंमलदार असावा, वगैरे. या सूचनांप्रमाणें हल्लीं सर्व प्रांतांत तजवीज झाली आहे.

या पूर्व उपाया संबंधानें सूचना झाल्या. दुष्काळ पडल्यावर कशी तजवीज करावी याबद्दलही या कमिशनानें सूचना केल्या होत्या व त्यांस अनुसरून एक "फ्यामीन कोड" (दुष्काळाचेसंबंधानें नियमसंग्रह) करण्यांत आला आहे. शेतकी खात्याचे अंमलदारांनीं दुष्काळाचीं चिन्हें दिसल्याचें सरकारास कळवितांच या नियमाप्रमाणें अंमल सुरू होतो व दुष्काळाचे व्यवस्थेचें काम जिल्ह्याचे मुख्य अंमलदाराचे हातीं जातें. दुष्काळपीडितांस मदत देण्याची ती दोन तऱ्हेनें देण्यांत येते; एक रस्ते, तलाव वगैरे कामें सुरू करून त्यांवर लोकांस मजुरीनें लावून व मुफत अन्न देऊन; दुष्काळपीडित प्रांताचे विभाग करून त्या विभागवार अन्नछत्रें, दवाखाने वगैरे स्थापन करण्यांत येतात. आतां धान्य आणविण्यासंबंधानें सरकारास तजवीज करण्याचें आगगाड्या वगैरे झाल्यानें कारण राहिलें नाहीं; व्यापाराचे क्रमानेंच एखादे भागांत महागाई होतांच चांगले संपन्न भागांतून माल येऊं लागतो व चढलेल्या किमती उतरतात. गुरांसाठीं राखून ठेवलेले जंगलांत चारण्याची मुफत सोय करण्यांत येते व सारा घेण्याचें तहकूब करण्यांत येतें किंवा प्रसंगीं तो माफ करण्यांत येतो. अलीकडे मदत देण्याची एक नवीन रीत सुरू करण्यांत आली आहे ती अशी कीं, जमिनीचे मालकांस ती सुधारण्यासाठीं तिचे तारणावर रकम कर्जाऊ देण्यांत येते ; ते लोक मजुरदार लाऊन तें काम सुरू करतात, तेंव्हां अर्थांतच दुष्काळपीडितांस मदत होऊन शेतकीचीही सुधारणा होते. हें कर्ज दुष्काळांतच मिळतें असें नाहीं. सर्व काळीं मिळतें. जमिनी सुधारण्यासाठीं मदत सन १८८१--८२ सालीं रु. ४८०४८०० व सन १८९१–९२ सालीं रु. २०६३८०० देण्यांत आली होती. दुष्काळपीडितांस मदत देण्यासाठीं पैशाची तजवीज कशी करण्यांत येते व त्या पैशापैकीं सालोसाल कसा खर्च करण्यांत येतो याबद्दल जमाखर्चाचे भागांत सांगितलेंच आहे.

गेले शंभर वर्षांत दुष्काळ पडले त्यांबद्दल साधारण माहिती मिळते ती थोडक्यांत देतों:—

१७६९-७०—बंगाल्यांत–सुमार एकतृतीयांश लोक मयत झाले.

१७८०-८३–कर्नाटक–मद्राससरकारांनी लोकांत वर्गणी करून मदत केली होती.

१७८३-८४–उत्तराहिंदुस्थानांत--ब्रिटिश मुलखाचे बाहेर पडला होता. चांगले सालीं धान्यसंग्रह करून ठेवण्याचें वारेन हेस्टिंग्स् यांनीं ठरविलें.

१७९०--९२ १८०२–४ १८०७,१८१२,१८२४ १८३३,१८५४,१८६६	मद्रास व दक्षिणहिंदुस्थानांत–यांपैकीं पहिले दुष्काळापासून दुष्काळपीडित लोकांस सरकारांतून कामें देण्याचें सुरू झालें.

१८३८, १८६०--६१--वायव्यप्रांत--यांतील दुसरे दुष्काळापासून सदरप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली.

१८६५--६६–ओरिसा– १८७३--७४--वायव्यप्रांत– १८७६–७७–७८–दक्षिणहिंदुस्थान–	यांत सरकारतर्फे कामें सुरू होतीं व धर्मार्थ खर्च करण्यांत आला होता.

शेतकीची स्थिति–ही समजण्यास जमीन लागवडींत किती आहे व लागवडीलायक किती शिलक आहे तें समजलें पाहिजे. त्याबद्दल माहिती खालील कोष्टकांत दिली आहे. कायमची धाऱ्याची ठरोती झाली आहे असे प्रांतांत (बंगाल व मद्रासचा कांहीं भाग) ही माहिती उपलब्ध होत नाहीं; या भागांबद्दल माहिती अजमासाची आहे. या कोष्टकांत पंजाब व वायव्यप्रांत यांत जमीन लागणीस येण्यासारखी बरीच आहे, परंतु ती पूर्वी लागणीस आलेले जमिनीप्रमाणें चांगले मगदुराची नाहीं. ब्रह्मदेशांतील जमिनीची मात्र तशी स्थिति नाहीं. ह्या कमी मगदुराच्या पड जमिनीचा मगदूर खात घालून किंवा बागाईत करून वाढविला पाहिजे. बागाइताचा प्रसार, शेतकी करण्याचे रीतींत सुधारणा, रस्त्यांची वृद्धि व पड जमिनी लागवडीस येणें वगैरे गोष्टी कालेंकरून घडून आल्या ह्मणजे शेतकीचें उत्पन्न हल्लींचेपेक्षां दीडपट वाढणें शक्य आहे. बागाइताचा प्रसार उत्तरहिंदुस्थान व गोदावरी व कृष्णा यांचे मुखांचे मधील मद्रास प्रांत व सिंध प्रांत यांतच विशेष आहे. मुंबई इलाख्याचे इतर भागांत मोठे तलाव करून बागाइताची सोय करण्याची खटपट सुरू आहे. मद्रास व अयोध्या प्रांतांत तलावाचे पाण्यानेंही शेतकी बरीच होते. सर्व हिंदुस्थानांतील जमीन घेतली तर सरासरी एकदशांश जमिनींत दोन पिकें होतात. अयोध्या प्रांतांत माल शेंकडा २४ टक्के जमिनींत व बंगाल व वायव्य प्रांतांत शेंकडा १३ व १६ टक्के जमिनींत दोन पिकें होतात. मद्रास, सिंध

आसाम व मध्यप्रांत या प्रांतांत हें प्रमाण शेंकडा ८।९ आहे. बाकीचे प्रांतांत फारच थोड्या जमिनींत दोन पिकें होतात.

जमीन लागवडीस किती आहे व लागवडीलायख किती जमीन शिलक आहे याबद्दल कोष्टक सन १८९१–९२.

आंकडे लक्षाचे आहेत. बंगाल प्रांताचे आंकडे मात्र १८९२।९३ सालाबद्दल आहेत.

प्रांत.	सर्व्हेप्रमाणें क्षेत्र.	प्रांताचें क्षेत्र–लक्ष एकर वजा संस्थानांचे व माहिती मिळत नाहीं असे भागांतील क्षेत्र.	उरलेलें क्षेत्र.
मद्रास.	९११	३१०	६०१
मुंबई व सिंध.	११७९	४८९	६८९
बंगाल.	१०१६	२३	९९२
वायव्य प्रांत.	५७०	९८	४७१
अयोध्या.	१५३	...	१५३
पंजाब.	९६१	२०९	६५१
मध्यप्रांत.	७४१	३०८	४३३
वरचा ब्रह्मदेश.	५२५	३६	४८८
खालचा ब्रह्मदेश.	५६१	...	५६१
आसाम.	२९०	१४४	१४४
वऱ्हाड.	११३	...	११३
कुर्ग.	१०	...	१०
अजमीर.	१७	८	९
	६९९५	१७३३	५२६१

वरचे कोष्टकाचे शेवटचे भागांतील क्षेत्राची वांटणी.

प्रांत.	जंगल.	शेतकी न होण्यासारखी जमीन.	लागवडी जमीन.	लागवडीलायख जमीन शिलक.	लागवडी जमिनी-पैकीं बागाईत होत असलेल्या जमिनी
मद्रास.	११०	११८	२८६	७९	५३
मुंबई व सिंध.	७४	१७२	३६४	७८	३१
बंगाल.	५५	*	५२२	४१२	–
वायव्य प्रांत.	५२	६६	२७३	७९	७३
अयोध्या.	५	२२	९४	३२	२६
पंजाब.	३०	११६	२५७	२४४	७३
मध्यप्रांत.	१२२	३९	१७७	९४	६
वरचा ब्रह्मदेश.	दाखला नाहीं.	२५७	४२	१८८	५
खालचा ब्रह्मदेश.	३५	२८३	५५	१८५	...
आसाम.	२८	९०	२५	+	...
वऱ्हाड.	१२	१७	७४	८	...
कुर्ग.	५	२	१	...	...
अजमीर.	...	३	३	१	...
एकूण ...	५२६	१५४८	२१८९	९९३	२७२

* लागवडीलायख जमिनींत सामील.   × शेतकी न होण्यासारखे जमिनींत सामील.

वरचे कोष्टकांत सन १८९१–९२ सालीं लागवडी व लागवडलायख किती जमीन होती तें सांगितलें आहे. आतां त्या सालीं कोणतीं पिकें किती जमिनींत लावलीं होतीं त्यांबद्दल तपशील कांहीं महत्वाचे पिकांबद्दल देत आहें. सदरचे सालीं एकंदर २१०९८६०३७ एकर जमिनींत लागवड झाली होती. त्यापैकीं २३१८४०८६ एकर जमिनींत दोन पिकें करण्यांत आलीं होतीं, ह्मणजे खरी लागवड झालेली जमीन १८७८०१९५१ एकर राहते.

पिकांत दोन वर्ग आहेत: (१) खाण्याचीं धान्यें–तांदूळ, गहूं, बाजरी, नाचणी, वरी वगैरे हा एक वर्ग; व (२) खाण्याचे उपयोगी पडत नाहींत अशीं धान्यें व पदार्थ–हा वर्ग दुसरा. सन १८९१–९२ सालीं पहिल्या वर्गाचें पीक १८०७८४५६३ एकर जमिनींत झालें होतें व दुसरे वर्गाचें पीक २८३९१२०३ एकर जमिनींत झालें होतें.

	तांदूळ (१)	गहूं (१)	ज्वारी (१)	बाजरी (१)
मद्रास.	५७७१	१७	४६६७	२४९६
मुंबई व सिंध.	२२९९	२१५७	८७५७	५५३४
बंगाल.	३६३२४	१६०७	...	...
वायव्य प्रांत.	४६५०	३३९२	४६०	४३१
अयोध्या.	२४८८	१३६५	९५	१७४
पंजाब.	७२२	६७६७	२०२१	१५०९
मध्यप्रांत.	४२९२	३९५७	१३१०	३८
वरचा ब्रह्मदेश.	१०१२	१७	५७४	९०
खालचा ब्रह्मदेश.	४६६२	...	...	...
आसाम.	१२०७	...	...	...
वऱ्हाड.	२२	८८७	२१७९	७०
कुर्ग.	७४	...	...	...
अजमीर.	...	९	६३	१७
बेरीज. *	६३५२९	२०१८१	२०१३२	१०३६१

	जवस. (२)	तिळी. (२)	ऊंस.	कापूस. (३)
मद्रास	३१	५२१	५८	१३१८
मुंबई व सिंध.	२४७	३४१	७८	२६२१
बंगाल.	...	...	११५५	...
वायव्यप्रांत	४८४	१२७	१०६७	११९५
अयोध्या	१३७	१४	२९५	५४
पंजाब	३३	१४२	३६३	५००
मध्यप्रांत.	१३८६	४५६	४४	७६०
वरचा ब्रह्मदेश.	...	३२८	...	११०
खालचा ब्रह्मदेश.	...	५२	१०	१६
आसाम.	...	...	१८	...
वऱ्हाड.	३६४	१३९	२	२२४१
कुर्ग.	...	...	...	...
अजमीर.	...	८	...	३८
बेरीज *	२६८७	२१३२	३०९६	८८५९

	नीळ (४)	तंबाखू (५)	चहा (५)	काफी (५)
मद्रास.	२१२	७२	५	६५
मुंबई व सिंध	८	८५	...	...
बंगाल.	६१४	६१८	१४७	...
वायव्यप्रांत.	२४२	२९	९	...
अयोध्या.	१६	११	...	...
पंजाब.	५८	४३	९	...
मध्यप्रांत	...	२१	...	...
वरचा ब्रह्मदेश	१	२४	...	...
खालचा ब्रह्मदेश	...	१६	...	...
आसाम.	...	...	२४१	...
वऱ्हाड.	...	२०	...	...
कुर्ग.	...	...	...	६२
अजमीर.	...	...	...	...
बेरीज.*	*११५५	९४५	४१३	१२७

* बेरजांचे आंकड्यांत आणखी किरकोळ प्रांतांचे आंकडे सामील आहेत.

(१) खाण्याचीं एकंदर सर्व धान्यें १८०७८४५६३ एकर जमिनींत लावलीं होतीं.

(२) जवस, तिळी, व इतर गळिताचीं धान्यें मिळून १२८५७४२३ एकर जमिनींत लावलीं होतीं.

(३) कापूस, जूट वगैरे सूत काढण्यास उपयोगी पडणारे धागा असलेले पदार्थ ११२५९६०२ एकर जमिनींत लावले होते.

(४) नीळ वगैरे रंगाचे पदार्थ ११९०२३३ एकर जमिनींत लावले होते.

(५) चहा, काफी, तंबाखू, अफू वगैरे ओषधी व अमलाचे पदार्थ २१५०७५४ एकर जमिनींत होते.

बंगाल्यासंबंधानें आंकडे अजमासाचे आहेत, कारण त्या प्रांतांत माहिती मिळविण्याचेसंबंधानें नीटशी व्यवस्था लागलेली नाहीं.

या देशांत होत असलेले कांहीं महत्वाचे पिकांसंबंधानें साधारण थोडी माहिती देतों.

तांदूळ—हें पीक कमी जास्ती सर्व प्रांतांत होतें. ज्या प्रांतांत हें पीक जास्त होतें तेथील कनिष्ठ व मध्यम वर्गाचे लोकही तेंच धान्य खातात; परंतु तें धान्य कमी होतें असे भागांत वरिष्ठ दर्जाचे लोक मात्र तें खातात. एकंदरींत एकतृतीयांश लोक तांदूळ खातात असें दिसून आलें आहे. १८७८ चे आंकड्यांशीं ताडून पाहतां, सर्व प्रांतांत ह्या पिकाची लागवड वाढली आहे. ह्या धान्याचा खप ह्या देशांतच होतो असें नाहीं; तें परदेशांतही पुष्कळ जातें; ह्याबद्दल माहिती व्यापाराचे भागांत येईल.

गहूं— या पिकाची लागवड गेले वीस वर्षांत पुष्कळ वाढली आहे. हें धान्य परदेशांस फार जातें हें त्या वाढीचें कारण आहे. हें धान्य खाण्याचा उत्तर-हिंदुस्थानांत विशेष परिपाठ आहे, व त्याची लागवडही त्याच भागांत जास्त होते. गव्हांत प्रकार पुष्कळ आहेत, तरी त्यांचे एकंदर चार वर्ग करतां येतील— पांढरे, तांबडे, टणक व मऊ. टणक, पांढरे व तांबडे गव्हांचा हिंदुस्थानांत खप चांगला होतो; त्यांचे मानानें मऊ तांबडे गव्हांस किंमत कांहीं कमी येते. गव्हाची लागवड जास्त झाल्यानें दुसरे नित्य खाण्याचे धान्याची लागवड कमी झाली असें नाहीं.

ज्वारी व बाजरी—गव्हांचेइतकीच जमीन ज्वारीचे पिकाखालीं आहे; बाजरीखालीं त्याचे निम्यानें आहे. मुंबई व मद्रासप्रांतांत ज्वारी व बाजरी हीं दोन्ही धान्यें विशेष पिकतात. वऱ्हाडांत ज्वारी विशेष पिकते व पंजाबांत बाजरी जास्त होते.

डाळीचीं धान्यें—या धान्यांत प्रकार फार आहेत. हिंदुस्थानसरकाराकडून जें पिकांबद्दल पुस्तक छापून निघतें त्यांत हरभऱ्याबद्दलच तपशील दाखविलेला असतो. हरभरे उत्तर व मध्य हिंदुस्थानांत व पश्चिमहिंदुस्थानांत होतात. दक्षिणेकडे कुळथी विशेष पिकते. एकंदरींत डाळदाण्याचें पीक पंजाब, वायव्य, व अयोध्या प्रांतांत जास्त होतें. या पिकाची लागवड स्वतंत्र किंवा दुसरे धान्यांबरोबर करतात.

गळिताचीं धान्यें—जवस मध्यप्रांत, वऱ्हाड, वायव्य व अयोध्या या प्रांतांत विशेष होतो. तिळी मध्यप्रांतापासून खालचे भागांत जास्त होते. मद्रासेकडे एरंड्या लावण्याची जास्त वहिवाट आहे. मुंबईइलाख्यांत खुरासणी व करडी

जास्त होते. उत्तरहिंदुस्थानांत मोहोरी, घोडेराई वगैरे व दक्षिणहिंदुस्थानांत भुइमूग होतात.

कापूस व जूट—कापूस फार प्राचीन काळापासून सर्व हिंदुस्थाभर होतो. सन १८६१-६५ पर्यंत अमेरिकेंतील लढाईचे कारणानें तिकडील कापूस विलायतेस जाईनासा झाला होता, त्या वेळीं या देशांतील कापसास तेजी आली होती. त्याच वेळेपासून त्याचे लागवडीसही उत्तेजन आलें. परदेशांतील चांगल्या जातीचे कापसाची लागवड इकडे करण्याचे प्रयत्न तेव्हांपासून पुष्कळ वेळां झाले आहेत, व त्यांपासून पिकांत कांहीं सुधारणाही झाली आहे; तरी तिकडील पिकाचे चांगले गुण इकडे कांहीं दिवसांनीं कमी होत जातात. इकडे ज्या लांब धाग्याच्या कापसाच्या जाती आहेत त्याच सुधारण्याचा प्रयत्न झाला असता तर कापसाचे जातींत चांगली सुधारणा झाली असती असा डा. वाटसाहेबांचा अभिप्राय आहे. वऱ्हाड व सिंध शिवायकरून मुंबईइलाख्याचे उत्तर व दक्षिण भागांत उत्तम कापूस होतो. मुंबईइलाख्याचा मध्यभाग, मद्रास, वायव्यप्रांत, वरचा ब्रह्मदेश यांत पुष्कळ कापूस होतो, परंतु त्याची तार लहान असते.

इंग्रजी मुलखाचे बाहेर संस्थानांत ९० लक्ष एकर जमिनींत कापसाची लागवड होते असा अंदाज आहे. कापूस परदेशांस फार जातो, त्याबद्दल माहिती व्यापाराचे सदरांत सांगण्यांत येईल. या देशांतील गिरण्यांतही कापसाचा पुष्कळ खप होतो.

जूट (ताग) बंगाल्याचे उत्तर व पूर्व भागांत व आसामचे दक्षिण भागांत होतो.

तंबाखू—हिची लागवडही सर्व देशांत होते ; ती बहुतेक देशांतील खपासाठींच होते. कांहीं ठिकाणीं परदेशांत पाठविण्यासाठीं लागवड होते, त्यांत डिंडिगूळ येथील तंबाखू प्रसिद्ध आहे. परदेशांतील तंबाखूच्या चांगल्या जाती इकडे लागवडीस आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

काफी–बुंद–हा पदार्थ मूळ या देशांतील नाहीं. तो अरबांनीं या देशांत आणला व त्याची लागवड पहिल्यानें मलबारचे किनाऱ्यावर झाली. हल्लीं काफीची लागवड नीलगिरी पर्वत, वैनाद व सालेम (मद्रास इलाख्यांत), आसाम प्रांत, कोचीन, त्रावणकोरसंस्थान व म्हैसूर संस्थानच्या पश्चिमभागांत होते. एकंदर सर्व प्रांतांत मिळून सन १८९१--९२ सालीं चार लक्ष वीस हजार एकर जमिनींत हें पीक करण्यांत आलें.

चहा--चहाची लागवड या देशांत सन १८३५ सालापासून सुरू झाली. प्रथमतः चिनांतून चहाचें बियाणें आणून इकडे चहाची लागवड करण्याचा प्रयत्न

झाला, परंतु तो चांगला सफल झाला नाहीं. पुढें चहाचे झाडाची एक जात आसामांत सांपडली तिची लागवड करून सुधारणा केल्यापासून चहाचे गुणांत चांगली सुधारणा झाली आहे. सन १८९१--९२ सालीं १२३७ लक्ष पौंड चहा उत्पन्न झाला होता.

सिंकोनाची लागवड या देशांत सन १८६१ पासून सुरू झाली. पाहिल्यानें अनुभव पाहण्यासाठीं तीं झाडें नीलगिरीवर लावण्यांत आलीं. आतां सिक्किम, नीलगिरी, दार्जालिंग, सालेम, कुर्ग व म्हैसूर प्रांतांत लागवड होते. सन १८९१--९२ सालीं सरकारी व खासगी मिळून १४८ लक्ष झाडें होतीं व त्यांपासून १९ लक्ष पौंड साल निघाली होती.

ऊंस--उंसाची लागवड सन १८८४-८५ पासून दुप्पट वाढली आहे. बंगाल व वायव्यप्रांताचा याचे लागवडीसंबंधानें पहिला नंबर आहे; त्याचे खालोखाल पंजाब व अयोध्याप्रांतांचा नंबर येईल. दक्षिण व मध्याहिंदुस्थानांत उंसाची लागवड फारशी नाहीं तरी ती वाढत आहे. या देशांतील ऊंस मारिशस येथील उंसाइतका चांगला नसतो.

नीळ--हें पीक विशेषतः बंगाल, वायव्यप्रांत व मद्रास या प्रांतांत होतें. बंगाल्यांत निळीची लागवड युरोपिअन लोकांनीं चालू केली व ती विशेषतः त्यांचेच हातीं आहे. उत्तराबिहार व मद्रासेकडे एतद्देशीय लोक तिची लागवड करतात. सन १८८० चे मानानें पाहतां निळीची किंमत पुष्कळशी उतरली आहे.

येथपर्यंत लागवडीस असलेली व लागवडलायक पड जमीन किती आहे व कोणतीं पिकें किती जमिनींत होतात वगैरे गोष्टींबद्दल माहिती सांगितली. आतां धान्यांचे किमतीसंबंधानें सांगण्याचें आहे. सन १८६० सालापर्यंत धान्याच्या किमती उतरत जात होत्या व त्यांच्यांत फेरबदलही फार होत असत. त्या सालानंतर त्या स्थिर रहात गेल्या आहेत; व त्यांचा कल साधारण वाढण्याकडेच आहे. याचें कारण असें आहे कीं, रस्ते सुधारल्यानें एका ठिकाणचें पीक दुसरे ठिकाणीं जाऊं लागलें व परदेशास जाणारे मालांतही पुष्कळ वृद्धि झाली आहे, त्यामुळें राहिलेले मालास चांगला दर येतो. पूर्वीं मौल्यवान धातूचें नाणेंही हल्लींइतकें नव्हतें व व्यापारही हल्लींसारखा नव्हता. नाणें कमी असलें ह्मणजे किमती उतरतात व तें पुष्कळ झालें ह्मणजे त्या चढतात, असा अर्थशास्त्राचा नियम आहे व या नियमाप्रमाणेंच नाण्याचे विपुलतेचे मानानें धान्यांचे दरांत फेरबदल झाला आहे. सन १८६४--६५ सालापासून आगगाड्या वगैरे कामांसाठीं परदेशांतून या देशांत पैसा फार आला व त्या वेळेपासून धान्यांचे दरांतही चढ झाला. रस्ते व आगगाड्या झाल्यानें धान्यांच्या किमती सर्वत्र सारख्या

होतात; एखादे भागांत माल जास्त झाला व दुसरे भागांत त्याची तूट पडल्यानें जर किंमत चढली, तर माल पुष्कळ झाला असेल असे ठिकाणांहून तिकडे माल जाऊं लागतो व असा क्रम चालू राहून किमती सगळीकडे सारख्या राहतात.

धान्याच्या किमती किती वाढल्या आहेत त्याबद्दल माहिती खालीं दिली आहे. सन १८६१ सालाचे पुढील माहिती विशेष चौकशी होऊन वेळचे वेळीं मिळविलेली असल्यामुळें ती चांगली विश्वसनीय आहे. त्या सालापूर्वीची माहिती तितकी विश्वसनीय नाहीं, तरी आहे तशीच माहिती साधारण ठोकळ अनुमानें काढण्यास उपयोगी होईल ह्मणून खालीं वेगळे कोष्टकांत दिली आहे. पुढील माहिती सर्व देशांतील किमतीचे सरासरीची आहे. सरासरी काढतांना ज्या प्रांतांत जो माल पिकतो किंवा जेथें त्याचा विशेष खप आहे असे ठिकाणांचें मान घेतलें आहे.

	गहूं.	तांदूळ.	ज्वारी	बाजरी.
	शेर	शेर	शेर	शेर
१८६१–६५	२१·३६	२१·६६	२५·७८	२४·२७
१८६६–७०	१५·४५	१७·४२	२१·२५	१९·९०
१८७१–७५	१९·४६	१९·१४	२५·३०	२२·३८
१८७६–८०	१६·३५	१५·३०	२०·४२	१८·९१
१८८१–८५	१९·९८	१८·२१	२७·६४	२४·२२
१८८६–९०	१६·०५	१५·४१	२१·१७	१९·४९
१८९१	१४·०५	१३·९१	१८·४४	१६·५७
किती जिल्ह्यांची सरासरी घेतली आहे त्यांची संख्या	९९	९०	९५	८६

सन १८६० पूर्वी धान्यांची किंमत कशी होती याबद्दल माहिती. दहा सालांचे सरासरीची माहिती आहे.

	गहूं.	तांदूळ.	ज्वारी.	बाजरी.
	शेर	शेर	शेर	शेर
१८१०	...	...	...	२७½
१८२०	...	५५¾	...	२३
१८३०	२८½	५२½	...	२६
१८४०	२६½	५२	४७	२९
१८५०	३२	६२½	५१½	३१¾
१८६०	४१	५०	४८½	३१½

शेतकीचे स्थितीसंबंधानें आणखी एक बाबतींत माहिती दाखल करून हा भाग पुरा करण्याचा आहे. शेतकीचे मालाची किंमत जशी वाढत जात आहे तसाच मजुरीचा दरही वाढत जात आहे. हा किती वाढला आहे तें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

	शेतकीची मजुरी. रु. आ. पै.	घोडेवाल्यास मजुरी. रु. आ. पै.	सुतार-लोहार वगैरेस मजुरी. रु. आ. पै.
१८७३–७६	६·११·१	६·७·३	१४·९·२
१८७७–८१	६·७·११	६·७·३	१४·११·११
१८८२–८६	६·८·८	६·११·११	१५·११·१०
१८७७–९१	७·१·८	६·१५·८	१६·१४·५

यावरून असें दिसतें कीं शेतकीवर मजुरी करणारांचा मजुरीचा दर शेंकडा सुमारें दहा टक्के चढला आहे ; घोडेवाल्याचा ८ टक्के व गवंडी वगैरेंचा सुमारें १६ टक्के वाढला आहे.

शेतकीचे मालाची किंमत किती वाढली आहे तें शेंकडावळीचे प्रमाणानें पहातां, सन १८७३ सालापासून तांदुळाची किंमत ४९ टक्के, गव्हाची ३५ टक्के, ज्वारीची ३८ टक्के व बाजरीची ३७ टक्के अशी वाढली आहे.

मीटिओरालजी–विद्युल्कावायुचक्रशास्त्र.

हिंदुस्थानासारखे उष्ण कटिबंधांतील देशांत पर्जन्यावरच जीवनाचीं साधनें अवलंबून असतात; तेव्हां मथळ्यावर लिहिलेले आकाशस्थ चमत्कारांचें उद्घाटन होणें अत्यंत महत्वाचें असतें. पर्जन्य कधीं सुरू होईल. तो किती पडेल, वारा कोणीकडून किती जोरानें वहात आहे व त्याची धोकादायक गति कोठें झाली आहे किंवा काय वगैरे माहिती योग्य वेळीं मिळाल्यास सरकार व रयत या उभयतांसही उपयोगी होते. पर्जन्य किती पडला व हवेचें मान कसें होतें ह्याबद्दलचें निरीक्षण सुरू झाल्यास फार दिवस झाले आहेत तरी अलीकडेसच या खात्याचे कामांचा फार विस्तार करण्यांत आला आहे व निरीक्षणस्थलेंही जास्त स्थापन करण्यांत आलीं आहेत. आतां वेगळाले ठिकाणांहून हवामानाबद्दल माहिती मिळवून ती एके ठिकाणीं करून सिमला, कलकत्ता व मुंबई या ठिकाणीं दररोज दुपारचे आंत प्रसिद्ध करण्यांत येते. हें खातें सुव्यस्थित हो-

ऊन फार दिवस झाले नाहींत, यामुळें सिद्धान्त ठरविण्यास पुरेशी माहिती अजून गोळा झालेली नाहीं. सर्व उद्योगाचें इष्ट पर्यवसान सरकारास पुढें पडणारे पावसाचा अंदाज आगाऊ कळून विशेष आपत्ती होण्याचा संभव असल्यास योग्य त्या तजविजी करण्यास सवड मिळावी हें आहे व तें साध्य करण्यासाठीं प्रयत्न चालू आहेत.

हल्लीं जमिनीवर पाऊस, हवामान व वायूची गति यांबद्दल जशी नोंद ठेवण्यांत येते तशीच समुद्रांतून येणारे गलबतावरही ठेवण्यांत येते व दोन्ही ठिकाणीं मिळविलेले माहितीचा मेळ घालण्यांत येऊन वादळें, झंजावात, तुफान वगैरेंचा उगम शोधण्यांत येतो. समुद्रावर तुफान होण्याचीं चिन्हें दिसून आल्यास त्याबद्दल दर्यावर्दी लोकांस सूचना देण्यांत येते. खंबायतेचे आखातास मिळणारे नद्यांस पूर एकदम येतात ह्मणून त्या नद्यांचे उद्गमस्थानीं जास्त पर्जन्यवृष्टी झाली ह्मणजे त्यांचे कांठचे शहरांस त्याबद्दल सूचना देण्यांत येते. याशिवाय हिमालय व दुसरे त्याचे जोडीचे पर्वत यांवर बर्फ पडतें त्यांत कांहीं मेळ असतो किंवा कसें, व पर्जन्य व जंगल यांचा परस्पर कार्यकारणसंबंध कसा आहे वगैरे गोष्टींबद्दल शोध चालू आहेत. या खात्यांतून जी माहिती मिळविण्यांत येते तिचे अनुरोधानें पत्रकें व नकाशे वारंवार प्रसिद्ध करण्यांत येतात. या देशांत मिळविण्यांत आलेले माहितीचा शास्त्रीय दृष्टीनें विचार याच देशांत होतो असें नाहीं, तर ती माहिती युरोप व उत्तरअमेरिका देशांतील शास्त्रज्ञ लोकांकडे विचारासाठीं पाठविण्यांत येत असते.

या कामासाठीं या देशांत ४ पहिले वर्गाचीं व ६४ दुसरे वर्गाचीं व ९७ तिसरे वर्गाचीं निरीक्षणस्थलें आहेत. याशिवाय निकोबार व झांझिवार येथेंही माहिती मिळविण्यासाठीं स्थळें स्थापन केलीं आहेत.

या खात्याचा खर्च सन १८८१-८२ सालीं रु. १४८७४० व सन १८९१-९२ सालीं रु. २७१९९० असा झाला होता.

भाग बारावा.

जंगलखातें.

हिंदुस्थानांत नैसर्गिक उत्पन्नाचे बाबतींत लागवडी जमिनीचे उत्पन्नाचे खालोखाल जंगलचे उत्पन्नाचा नंबर येतो. पश्चिमेकडील वालुकामय मैदानाशि-

वाय ज्यांत कोणतेही प्रकारची वृक्षवृद्धि होत नाहीं असा भूमिभाग या देशांत फार थोडा आहे; एक रीतीनें पाहिलें तर सर्व वसाहत जंगल तुटूनच झालेली आहे. हा निर्वृक्ष करण्याचा क्रम कांहीं ठिकाणीं इतके थरास गेला आहे कीं, लोकांस जळणाचा निर्वाह जमिनीचे सुपीकपणास अत्यंत उपयोगी असे गुरांचे उत्सर्ग त्यांजवरच करावा लागतो, व ही स्थिति जमिनीचे पोषक शक्तीस घातुक होते. मोठालीं इमारती लांकडांचीं रानें राखणें व तयार करणें एवढ्याच कामांत जंगलखात्याचा उपयोग होईल असें नाहीं, तर गृहाग्नीची तजवीज ठिकठिकाणीं वृक्षवृद्धि करून त्याजवर लाऊन, जमिनीस लागणारे पोषक पदार्थ जे हल्लीं ज्वलनक्रियेस जातात ते भूमिगत होतील असें केलें ह्मणजे या खात्यापासून सर्व देशांस अत्यंत फायदा होणार आहे व कृषिकर्मावर तर त्याचा फारच चांगला परिणाम होईल. जंगलाचा व पर्जन्यवृष्टीचा कार्यकारणसंबंध अजून जरी अनुभवसिद्ध झालेला नाहीं, तरी नद्यांचे व ओढ्यांचे उगमप्रांत वृक्षमय असल्यानें पूर वगैरेंचे स्वरूपानें समुद्रास्तृप्यंतु न होतां, ती वृष्टी या वृक्षवाटिकेंत संचित होते व तो संचय खालील प्रांतास दीर्घकाल उपयोगी होतो हें सिद्ध झालें आहे. निर्वृक्ष करण्यचा क्रम कृषीवलांकडून व वननिवासी लोकांकडून फार काल चालू आहे व वनसंरक्षणक्रिया अगदीं अलीकडे चालू झाली आहे, तेव्हां सर्व व्यवस्था ठीक लागण्यास बराच काळ जावा लागेल. जंगल कमी झाल्यानें गुरांचे चरण्याचीही फार अडचण झाली आहे; शेतकीचे कामास व दुधाचे पुरवठ्यास जितके जनावरांची जरूर लागते तितके जनावरांची मात्र योग्य जोपासना होते; बाकीचे जनावरांस मिळेल तेथें असेल तितका चारा खाऊन काळ कंठून अखेरीस कष्टमय जीवयात्रा पुरी करावी लागते. जनावरांस चाऱ्याचा सुकाळ होण्याची तजवीज पड जमिनीची राखण करून करणें हें जंगलखात्याचें काम झालें आहे. असे प्रकारानें इमारतीचीं व इंधनाचीं लांकडें पुरवून गृहकार्यास, व जनावरांस चारा व शेतास खात हीं मिळेशीं करून शेतकीस व वृक्षवृद्धि व संरक्षण यांचे द्वारें पर्जन्यराजाची कृपा संपादन करून लोकांची सर्वत्र अबादी करण्यास जंगलखातें फार उपयोगी आहे.

इमारती लांकडांत सागाचा पहिला नंबर आहे, तो उत्तरब्रह्मदेश, कानडा, मलाबार व घाटांचे भाग, सातपुडा, विंध्याद्रि प्रांत येथें (परंतु सर्वांत उत्तम ब्रह्मदेशांत) होतो. वायव्य, बंगाल, आसाम वगैरे प्रांतांत हिमालयाचे पायथ्याशीं साल झाडें होतात व हिमालयांत गंधसरू वगैरे झाडें होतात. आसाम व ब्रह्मदेशांतील हिमालयाचे खालचे ओळींत देवदारू वगैरे झाडें आहेत. ब्रह्म-

देशांत उत्तरेस व आसामाचे आग्नेयेस रबराचीं झाडें आहेत. घाटांत व विशेषेकरून म्हैसूर व कुर्ग प्रांतीं चंदन पुष्कळ आहे. बांबू तर सर्वत्र होतो व वायव्येकडे राटन (वेत) होतो.

जंगलाची व्यवस्था सन १८७८ चे हिंदुस्थानसरकारचे कायद्याप्रमाणें चालते. त्याप्रमाणें जंगलाचे " राखून ठेवलेलीं ", " संरक्षण केलेलीं ", व " गांवकीचीं " असे वर्ग केले आहेत. जंगलें राखून ठेवण्याचा विधि असा आहे कीं, पहिल्यानें अमुक जमिनी राखलेलें जंगल करण्याच्या आहेत अशी जाहिरात देण्यांत येते, व नंतर त्या जमिनीवरील खासगी किंवा गांवकीचे हक्क असतील त्यांचा तपास होऊन त्यांची व्यवस्था लावल्यावर जंगलाच्या हद्दी ठरवून ठिकठिकाणीं हद्दींच्या खुणा घालण्यांत येतात. हें काम साधारण मुलकी खात्यांतील अधिकाऱ्यांकडून होतें. इतर वर्गांचे जंगलांपेक्षां या राखलेले जंगलांत सरकारचे इच्छेप्रमाणें सर्व व्यवस्था पूर्णपणें अमलांत येते. जंगलाचे कायद्यांत जंगल राखणें, त्याची व्यवस्था करणें, व जंगलाचें उत्पन्न करणें, व त्यासंबंधानें कर घेणें याबद्दल नियम आहेत. जंगलें कोणते ठिकाणीं किती व कसे प्रकारानें ठेवण्याचीं व त्यांचे उत्पन्नाबद्दल काय व्यवस्था करण्याची या बाबतींत प्रत्येक प्रांताबद्दल लोकस्थितीचा व त्यांचे जरूरीचा विचार करून तच्छास्त्राभिज्ञ अधिकारी वर्गाकडून तें ठरविलेलें असतें. यास कामाचे बेत (वर्किंग प्लान्स्) असें म्हणतात. जंगलखात्याकडे जमीन आल्यावर पुढें तिची व्यवस्था त्या खात्याचे लोकांकडून शास्त्रीय तत्वांप्रमाणें होते. तरीही जेथें जळण व गुरें चरणीचे कामासाठींच मुख्यत्वेंकरून जंगल राखलेलें असेल, किंवा त्याचे व्यवस्थेशीं रयतेचे नफानुकसानीचा संबंध येत असेल असे ठिकाणीं मुलकी व जंगल खातीं हीं एकमेकांचे सल्लामसलतीनें कामें चालवितात.

जंगलखात्यांतील व्यवस्था पाहणारे कामगारांपैकीं कांहीं त्या विषयाचा विशेष अभ्यास केलेले विलायतेंतून नेमून येतात व कांहीं हिंदुस्थानांत नेमण्यांत येतात. त्या सर्वांवर देखरेख इन्स्पेक्टर जनरल हिंदुस्थाभर करतो. जंगलचे अंमलदारांत वरिष्ठ दर्जाचे म्हणजे कानसरवेटरचे कामावर त्या विषयाचा विशेष रीतीनें अभ्यास केलेले लोकच नेमण्यांत येतात. सन १८८५ सालापर्यंत हिंदुस्थानांतून निवडक उमेदवार, जर्मनी किंवा फ्रान्स देशांत या विषयाच्या शाळा आहेत त्यांत, शिकण्यास पाठविण्यांत येत असत ; परंतु त्या सालीं कूपर्सहिल येथें असलेले कालेजास जंगलखात्यांत उपयोगी असे विषय शिकविण्यास वर्ग जोडण्यांत आले. तेथें तयार झालेले लोकांस प्रथमतः एक फारेष्टचे मुख्य हपिसांत कांहीं दिवस ठेवण्यांत येतें ; तेथें त्यांनीं देशभाषेचा अभ्यास केल्या-

वर व प्रांतांतील जंगलाचे स्थितीचा अनुभव आल्यावर त्यांस कामावर पाठविण्यांत येतें. खालचे दर्जाचे नौकर लोक तयार करण्यासाठीं सन १८७८ सालीं देहरादुन येथें एक शाळा स्थापन करण्यांत आली. तींत वनस्पतिशास्त्र, खनिजपदार्थांचें ज्ञान, मोजणी करणें, गणित व पदार्थविज्ञानशास्त्र हे शास्त्रीय विषय शिकवून शिवाय वहिवाटीच्या गोष्टीही शिकविण्यांत येतात. या शाळेचे व हल्लीं जंगलाचे संबंधानें व्यवस्था करण्यांत आली आहे तिचे उत्पादक सर डी. ब्रांडिस हिंदुस्थानचे माजी इन्स्पेक्टर जनरल हे होत.

पुढील कोष्टकावरून सन १८९१ सालीं राखून ठेवलेलें जंगल वेगळाले प्रांतांत किती होतें तें दिसून येईल.

तुलनेसाठीं सन १८८१-८२ चे आंकडे दिले आहेत.

आंकडे चौरस मैलाचे आहेत.

	१८८१-८२	१८९१-९२
मद्रास.	११-२	७१७५
मुंबई.	९७८९	१०३१८
बंगाल.	४२३६	५२११
वायव्यप्रांत.	३३२६	३७६८
पंजाब.	११६०	१७१५
मध्यप्रांत.	१९४३०	१९६८०
आसाम.	२०६६	३६१२
वऱ्हाड.	१३९४	१२५६
कुर्ग.	२३४	११३
अजमीर.	१२२	१३९
वरचा ब्रह्मदेश.	—	१०५९
खालचा ब्रह्मदेश.	३२७४	५६१५
	४६२१३	५९७४३*

* यांत बलुचिस्थानांतील ८२ मैल येतात.

जंगल राखून ठेवतांच त्याच्या हद्दी ठरविण्यांत येतात व हक्कांबद्दलही चौकशी होते. दरसाल दोन तीन हजार चौरस मैलांची हिंदुस्थानचे सर्व्हेचे खात्याकडून मोजणी होते. ह्या मोजणीनें कामाचे बेत करण्यास फार मदत होते.

गुरचरणीचे संबंधानें व्यवस्था वेगळाले प्रांतांत वेगळाले रीतीची आहे. बंगाल्यांत ७६९ चौरसमैल जमीन या कामासाठीं सोडलेली आहे. मध्यप्रांत, पंजाब व वायव्यप्रांत यांत जंगलापैकीं शेंकडा ७० टक्के जमीन या कामास देण्यांत

आली आहे. मद्रास इलाख्यांत सर्वच जंगल " राखून ठेवलेलें " आहे व रानाचे शेजारचे गांवांस गुरें चारण्यासाठीं कांहीं जमीन पालटून पालटून देण्यांत येते. अजमीर येथें सन १८९१-९२ सालीं चाऱ्याचे टंचाईमुळें सर्वच राखून ठेवलेलें जंगल मोकळें सोडलें होतें. मुंबई इलाख्यांत डोंगराळ प्रदेश व सातपुडा शिवायकरून बाकीचा जंगली भाग ठिकठिकाणीं पसरलेला आहे व तो जंगली जळाऊ झाडें व गवत होण्यासारखाच आहे; त्या कारणामुळें त्यांत गुरचरणीची तजवीज करणें व त्याजवर देखरेख करणें हें फार कठीण असतें. सन १८९१-९२ सालीं या बावतींत नवीन नियम करण्यांत आले आहेत. त्यांचा अनुभव पाहण्यास पुरेशी सवड सांपडलेली नाहीं, तरी आलेले अनुभवावरून ते चांगले उपयोगी होतील असें दिसतें.

जंगली जमिनींत गुरें चारण्याचे विषयाबरोबरच जंगलांत गैरहक्कानें जाणें व तेथील जिन्नस उपटणें या गुन्ह्यांचाही विचार केला पाहिजे. खालचे कोष्टकांत हे गुन्हे सन १८९१-९२ सालीं किती झाले तें दाखविलें आहे, व तुलनेसाठीं सन १८८१-८२ चे आंकडे दिले आहेत. पूर्वीचेपेक्षां हल्लीं गुन्ह्यांत वाढ झालेली आहे. वेगळाले तऱ्हेचे गुन्हे वेळोवेळीं वाढतात व कमी होतात, तेव्हां या आंकड्यांचेसंबंधानें टीका करण्याचें कारण नाहीं. कांहीं ठिकाणीं खालचे अंमलदारांचे कसुरीनें कारण नसतां खटले करणें किंवा खटले धरून आपसांत तडजोड करून सोडून देणें असें होतें.

जंगलसंबंधीं गुन्ह्यांचें कोष्टक.

प्रांत.	सन १८८१–८२	सन १८९१–९२
मद्रास.	१३६	११६३६
मुंबई.	२८९८	१७७८७
बंगाल.	२२२९	१९४४
वायव्य प्रांत.	७१४	८६९
पंजाब.	१२६६	१९६३
मध्यप्रांत.	१०१९१	८०४७
वऱ्हाड.	३८१	३७३
आसाम.	१३१	४३१
कुर्ग.	८	३०
अजमीर.	६७	१३९
ब्रिटिशबलुचिस्थान.	२२	१६०

वरचा ब्रह्मदेश.	...	३६२
खालचा ब्रह्मदेश.	२५०	१३२०
	१९२९३	४५०६१

पूर्वींचे काळांत जंगलाबद्दल काळजी घेण्यांत आली नसल्यामुळें हल्लीं त्यापासून विस्ताराचे मानानें जसें उत्पन्न व्हावें तसें होत नाहीं. आतां झाडी पातळ करणें, तसेंच वेली व लहान झुडपें, जीं चांगले प्रकारचे झाडांचे वृद्धीस हानिकारक होतात, तीं नाहींशीं करणें या कामांकडे लक्ष देण्यांत येत आहे. अग्नि हाही जंगलास उपद्रव देतो, व त्या बाबतींत बंदोबस्त करण्याचे कामींही या खात्यास पुष्कळ त्रास होतो.

जंगलांतील उत्पन्न परराष्ट्रांस किती गेलें हें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

आंकडे हजार रुपयांचे आहेत.

जिनसांचीं नांवें.	निर्गत झालेले सालाची किंमत. ,८१–८२	,९१–९२	व्यापार कोणते देशांशीं विशेष होतो त्याबद्दल माहिती.
कचुकू (रब्बर)	१०८८	११७२	बंगाल व ब्रह्मदेशांतून विलायतेस व अमेरिकेस.
लाख.	५५५२	६०६७	बंगाल्यांतून विलायतेस व अमेरिकेस.
रंगाची लाख.	९१	२	
कात	२५३०	३१७२	बंगाल व ब्रह्मदेशांतून विलायतेस व अमेरिकेस.
वेलदोडे	६३६	३१८	मुंबईहून विलायत, इराण, अरबस्थान, बगदाद व एडन येथें जातात.
हिरडे	१४४४	३९३६	मुंबईहून विलायत, जर्मनी व आस्त्रिया देशांस.
चंदन व एबनी	४६९	८४१	मुंबई व मद्रासेहून फ्रान्स व चिनास.
सागवान	५०६७	४७४८	ब्रह्मदेशांतून व बंगाल्यांतून विलायतेस, केप व जिब्राल्टर येथें.
	१६८८२	२०२६२	

या खात्याचें जमाखर्चाचें पत्रक सन १८९१–९२ सालाबद्दल पुढें देण्यांत येत आहे. एकंदर हिंदुस्थानचा विचार पाहतां ब्रह्मदेश व मुंबई या प्रांतांत

एकंदर उत्पन्नापैकीं सुमारें ५७ टक्के उत्पन्न होतात. गेले वीस वर्षांत या दोन प्रांतांतील निव्वळ बचत दुप्पट वाढली आहे व इतर प्रांतांतही तींत चांगली वाढ आहे. व्यवस्थेंत सुधारणा झाली, गायरानाबद्दल जास्त तजवीज झाली व आगगाडीचे रस्त्याचे वाढीमुळें स्लीपरची मागणी वाढली, हीं उत्पन्न वाढण्यास विशेष कारणें आहेत.

सन १८९१–९२ सालाचें जंगलखात्याचे जमाखर्चाचें कोष्टक.

या रकमांत वऱ्हाडचे आंकडे आलेले नाहींत.

सदरें.	रकम.
	रु.
अ–जमा.	
(१) इमारती लांकूड वगैरे.	७७६२३८०
(२) जळाऊ लांकडें व कोळसा.	२१४९०७०
(३) बांबू.	६००५६०
(४) गवत व चराई.	१९०९७१०
(५) किरकोळ उत्पन्न.	१५८६६५०
(६) जप्त केलेले पाला वगैरे.	२१९[illegible]४०
(७) परकीय इमारती लांकडावर कर.	२५३५००
(८) हिशानें किंवा कौलानें केलेले जंगलाचें उत्पन्न	३०[illegible]९०
(९) दंड व धरलेला माल.	३५६८०
(१०) परत आलेल्या रकमा.	११[illegible]८०
(११) किरकोळ.	३४७०६०
अ. जमा बेरीज.	१४९०५८२०
ब. खर्च.	
(१) व्यवस्था.	५३६७०
(२) रक्षण व कामें.	४८००३६०
(३) नौकरपगार वगैरे.	३५७४५९०
(४) विलायतेस खर्च व त्यावरील हुंडणावळीसुद्धां.	१०६४०
	८४३९२६०

जमा (सन १८८१–८२) रु. ८७४८१६० खर्च (१८८१–८२) रु. ५५८७३६०

—— सन १८९४–९५ रु. १६४६०००० ——१८९४–९५ रु. ९८४४०००
(अंदाज.)

* वऱ्हाडचें उत्पन्न व खर्च यांत आलीं नाहींत.

जंगलाची व्यवस्था कोणते तत्वांवर चालावी यासंबंधानें हिंदुस्थानसरकारांनीं फार महत्वाचा ठराव नुसताच प्रसिद्ध केला आहे तो खालीं देतों. पुण्याच्या सार्वजनिक सभेनें त्या ठरावाचें भाषांतर करवून प्रसिद्ध केलें आहे तेंच येथें दिलें आहे.

हिंदुस्थानसरकारचा जंगलखात्यासंबंधाचा साग्र ठराव.

हिंदुस्थानांतील शेतकीची सुधारणा, याविषयीं डाक्टर व्होलकेर यांनीं जो रिपोर्ट केला आहे, त्याचे आठवे भागांत जंगलखात्याच्या व्यवस्थेपासून शेतकीचे कामास हल्लीं जितकी प्रत्यक्ष मदत मिळत आहे त्यापेक्षां जेणेंकरून जास्त मदत होत जाईल अशाच रीतीनें जंगलखात्याचे व्यवस्थेस वळण देणें ही किती महत्वाची गोष्ट आहे, याविषयीं त्यांनीं सविस्तर वर्णन केलें आहे. जंगलखात्याचे इन्स्पेक्टर जनरल यांनीं, सन १८९२।९३ सालच्या जंगलखात्याचे व्यवस्थेसंबंधानें केलेल्या गुणदोषविवेचनांत ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील सरकारी जंगलांची व्यवस्था कोणत्या धर्तीवर चालवावी, याविषयीं बराच तपशीलवार ऊहापोह केला आहे. जंगलखात्याचे इन्स्पेक्टर-जनरल यांनीं ज्या तत्वांचा उल्लेख केला आहे, तीं हिंदुस्थानसरकारास बहुतेक मान्य आहेत. तरी या बाबतींत ज्या प्रकारची सामान्यतः व्यवस्था राहिली पाहिजे ह्मणून हिंदुस्थानसरकारची इच्छा आहे, ती येथें सांगितली असतां विशेष उपयोग होईल असें वाटल्यावरून तिचा उल्लेख या ठिकाणीं केला आहे. असा उल्लेख करण्याचें आणखीं विशेष कारण असें आहे कीं, जंगलखात्याच्या व्यवस्थेसंबंधानें सरकारचे जे उद्देश आहेत त्या उद्देशांबद्दल गैरसमज झाल्याचीं अलीकडे बरींच उदाहरणें सरकारास आढळून आलेलीं आहेत.

२. सरकारी जंगलाची व्यवस्था राखण्याचा मुख्य हेतु लोकांचें हित व्हावें हा होय. कांहीं प्रसंगीं जेणेंकरून एकंदर सर्व कर देणारे लोकांचें हित होईल अशी व्यवस्था राहिली पाहिजे व अन्य प्रसंगीं ज्या प्रदेशांत जंगलें असतील त्या प्रदेशांत राहणारे लोकांचेंच जेणेंकरून हित होईल अशी व्यवस्था राहिली पाहिजे ; परंतु बहुतेक प्रसंगीं सार्वजनिक हित साधण्याचे हेतूनें जंगलाच्या

बंदोबस्त ठेविला असतां अर्थातच त्या जंगलांच्या अगदीं आसपास राहणारे लोकांचे पूर्वापार चालत आलेले हक्क व त्यांच्या वहिवाटी यांचें थोडेंबहुत तरी नियमन करण्याची अवश्यकता उत्पन्न होते. तथापि अशा प्रकारचें नियमन केल्यानें अगर मर्यादा ठरविल्यानें जर लोकांचा मोठा फायदा होण्याचा संभव असेल तरच असें करणें निर्दोष होईल. अशा कामीं नेहमीं हें मुख्य तत्व लक्षांत वागविलें पाहिजे कीं, जेथें व्यक्तिविषयक हिताकडे लक्ष न देतां उलट त्याचे हक्काचें व अधिकाराचें जेथें नियमन करण्याचा प्रसंग येईल तेथें सार्वजनिक हित साधण्यासाठीं जितकी अवश्यकता जरूर असेल तितक्याच मानानें व्यक्तीचे हक्क व अधिकार यांचें नियमन केलें पाहिजे.

३. हिंदुस्थानचीं जंगलें हीं सरकारी मालकीचीं आहेत ह्मणून त्यांचे स्थूल मानानें खालीं लिहिल्याप्रमाणें वर्ग केले आहेत:—

अ. ज्यांचें रक्षण, हवा चांगली राहावी ह्मणून अगर स्थलविशेषाचे कारणामुळें अवश्य आहे अशीं रानें.

ब. ज्यांत उपयोगीं पडणारीं मौल्यवान इमारती लांकडें उत्पन्न होतात तीं जंगलें.

क. लहानसहान जंगलें.

ड. गुरेंचराईचीं कुरणें.

वर निर्दिष्ट केलेल्या वर्गांपैकीं कोणत्या तरी प्रकारच्या वर्गांत हल्लींच्या सरकारी जंगलाचा समावेश करून त्यांचे वर्ग करण्याची योजना करावी असा या ठरावाचा हेतु नाहीं. कांहीं जंगलें वर सांगितलेल्या वर्गांचें मिश्रण झालेलीं असतील आणि एकाच जंगलाचे भाग निरनिराळ्या सदरांत येऊं शकतील. जंगलाच्या प्रत्येक वर्गाची व्यवस्था अनुक्रमें कोणत्या तऱ्हेनें लावावी, याविषयीं सर्व साधारण व्यवस्थेचें दिग्दर्शन करण्यासाठीं मात्र सदहू वर्गीकरणापासून उपयोग आहे ; आणि ही साधारण व्यवस्था कोठें व कशी लागू करावयाची हें ठिकठिकाणची हवाल पाहून ठरविलें पाहिजे.

४. पहिल्या प्रकारचीं जंगलें बहुतकरून डोंगरांच्या उतरंडीवर असतात. या उतरंडीवरून येणाऱ्या पाण्याच्या लोटांनीं त्यांच्या पायथ्याशीं असलेली लागवड जमीन दिवसेंदिवस अगदीं वाहून जाण्याची मोठी भीति असते. अशा प्रकारें जमिनीचा नाश होऊं नये ह्मणून डोंगरांच्या उतरंडीवर असलेल्या झाडझाडोऱ्यांचें संरक्षण केलें पाहिजे ; एवढेंच नाहीं, तर तसा झाडझाडोरा जिकडून जास्त वाढेल असा बंदोबस्त ठेवणें अत्यवश्यक आहे. यावरून ही

गोष्ट अगदीं उघड होते कीं, अशा प्रकारें जंगलांचें संरक्षण करणें ह्मणजे खासगी हक्कांचें थोडेंफार नियमन करणें होय; परंतु संरक्षणापासून होणारे फायदे व नियमनापासून होणारें नुकसान यांत महदंतर आहे. यासाठीं जोंपर्यंत नियमन केल्यापासून खरोखर प्रत्यक्ष फायदा होण्याजोगा आहे तोंपर्यंत अल्प नुकसानीचे बाधीकडे बिलकुल लक्ष देतां कामा नये.

५. दुसऱ्या प्रतीचीं जंगलें ह्मटलीं ह्मणजे ज्या विस्तीर्ण प्रदेशापासून आपणास साग, साळ, देवदार व अशाच प्रकारच्या मौल्यवान लांकडाचा पुरवठा होतो, तीं जंगलें होत. हे प्रदेश सर्वथैव नव्हे तरी बहुतकरून वस्तुतः जंगली प्रदेशच असतात. यामुळें अशा जंगलावर खासगी वहिवाटीचे हक्क फारच संकुचित असतात. अशी जेव्हां स्थिति असते तेव्हां हीं जंगलें सरकारची मोठी मौल्यवान मिळकत आहे व सरकारमहसुलाचीं साधनें आहेत असें समजून त्यांची व्यवस्था मुख्यत्वेंकरून व्यापारदृष्टीनें केली पाहिजे. शिवाय अशा बाबतींत देखील जंगलाचा उपभोग घेण्याची वहिवाट जंगलाच्या समिंवर जे प्रदेश असतात त्यांत रहाणारे लोकांचीच मात्र बहुतकरून झाली असते. ज्या लोकांची अशी वहिवाट असेल त्या लोकांची ऊर्जितदशा होण्यास तशी वहिवाट त्यांस नेहमीं करूं देणें अगदीं अवश्य आहे, आणि ज्याअर्थीं हे वहिवाटीचे हक्क एकंदर जंगलाच्या खोऱ्याच्या मानानें फारच अल्प असे असतात त्याअर्थीं ते जशाचे तसे चालू ठेवल्यानें फारशी गैरसोय होण्यासारखी नाहीं. जंगलाच्या हद्दीवर रहाणारे लोकांस मुख्यत्वेंकरून ज्या पदार्थांची फारच गरज लागते ते पदार्थ ह्मटले ह्मणजे इमारतीकरितां लहानसहान लांकडें, जळणाकरितां सर्पण, खताकरितां व वैरणीकरितां रानें, कुंपणाकरितां कांटी, गुरांढोरांकरितां गवत व चराऊ रानें व स्वतःचे उपयोगाकरितां जंगलांत उत्पन्न होणारे खाद्य पदार्थ हे होत. मग हे पदार्थ (ज्या ठिकाणीं जंगलांतील लांकडांची तोड करण्याची वहिवाट सुरू केली आहे) जरी अगदीं मोफत देण्याची सवड झाली नाहीं तरी होतां होईल तितक्या माफक दरानें ते दिले पाहिजेत. अशा प्रसंगीं चढाओढीचे दर बिलकुल लावतां कामा नये. एकंदरींत ही गोष्ट लक्षांत वागविली पाहिजे कीं, अशा ठिकाणीं उत्पन्नाच्या बाबीस मुख्य स्थळ न देतां तें स्थळ लोकांचे सोईस दिलें पाहिजे.

मौल्यवान इमारती लांकडांची लागवड होण्यालायक ह्मणून बरेंच जमिनीचें क्षेत्र हल्लीं राखून ठेविलें आहे, परंतु हें सर्व क्षेत्र सदर लांकडांच्या लागवडीजोगें आहे असें नाहीं. यासंबंधानें केलेला अंदाज चुकीचा आहे असें मान-

ण्यास बरींच कारणें आहेत. यांपैकीं जंगलें अल्पमोलाचीं लांकडें होण्यालायक आहेत. यासाठीं अशा प्रकारच्या जंगलांचा उपयोग लोकवस्तीस लागणारीं लहानसहान इमारती लांकडें यांचा पुरवठा करण्याकडे केला असता तर रयतेस व सरकारास जास्त फायदा झाला असता. सदर जंगलांचा उपयोग मौल्यवान लांकडें तयार करण्याकडे केल्यानें व्यापारी लोकांपासून इतका फायदा कधींही व्हावयाचा नाहीं. शिवाय जीं जंगलें मौल्यावान इमारती लांकडाची लागवड करण्यास योग्य अशीं आहेत त्या जंगलांचा उपयोग तशा प्रकारचे लांकडांची लागवड न करितां एकंदर लोकसंख्येस व विशेषत: शेतकरी लोकांस लागणारीं लहानसहान इमारती लांकडें यांच्या लागवडीकडे केला असतां महसुलाचे दृष्टीनें व लोकाहिताचे दृष्टीनें अशा व्यवस्थेपासून चांगला उपयोग होण्याचा संभव आहे किंवा नाहीं याबद्दल प्रत्येक प्रसंगीं विचार करणें अगदीं अवश्य आहे.

६. ही गोष्ट देखील लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जंगलें राखून धरण्याकडे जमिनीचा उपयोग करणें व कलम ७ यांत ज्या कांहीं शर्ती सांगितल्या आहेत त्या शर्ती संभाळून लागवडीकडे जमिनीचा उपयोग करणें या परस्परांची तुलना केली असतां लागवडीचा हक्क विशेष बलवत्तर आहे यांत संशय नाहीं. हिंदुस्थान देशांतील लोकसंख्येच्या निर्वाहाचीं झाडें बहुतकरून जमिनीवरच असले कारणामुळें हिंदुस्थान देशाच्या संबंधानें हें एक मोठें कोडें होऊन राहिलें आहे; यासाठीं क्षेत्राच्या मानानें ज्या जमिनीच्या लागवडीनें पुष्कळ लोकांचा निर्वाह होईल अशी जमीन लागवडीस आगणें इष्ट आहे; ह्मणून जेथें जेथें लोकांस जमीन लागण करण्याची खरोखर जरूर असेल आणि लागवड करण्यासारखी जंगली प्रदेशांखेरीज दुसरीकडे असूं शकणार नाहीं, तेथें ती जमीन जंगलांतून बिनदिक्कत सोडून दिली पाहिजे; इमारती लांकडांसाठीं राखून ठेवलेल्या मौल्यवान जंगलांपैकीं देखील जमीन लागवडीस देण्याची जर मोकळीक ठेविली आहे, तर त्याहून कमी दरजाची तर अर्थात् लागवडीस जरूर दिली पाहिजे हें वेगळें सांगण्याची अवश्यकता उरत नाहीं. जेव्हां जंगलांतील क्षेत्रांत लागवड केली जाईल तेव्हां तें नवीन लागवड केलेलें क्षेत्र जंगलाचे सदरांतून ऐनजिन्नस कमी करून टाकीत जावें, व ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत वागविली पाहिजे कीं, जंगलकायद्याचे आधारें अशा जमिनीचा समावेश जरी राखीव जंगलाचे सदरांत केला असला, तरी जंगलाचे सदरांतून कमी करून लागवड जमिनीचे सदरांत त्याचा समावेश करण्याचा स्थानिक सरकारास पूर्ण अखत्यार आहे. हिंदुस्थान-

सरकारची मंजुरी घेण्याची बिलकुल अवश्यकता नाहीं. चालू असलेले जंगलाचे कायद्यांत अगर त्या कायद्याचे आधारें जे नियम अगर ठराव प्रसिद्ध आहेत, त्यांवरून अशा बाबतींत स्थानिक सरकारचा अखत्यार बिलकुल संकुचित होत नाहीं. मात्र यावरून स्थानिक सरकारांनीं केलेल्या व्यवहारांत योग्य प्रसंगीं हात घालण्याचा जो हिंदुस्थानसरकारचा साधारण अधिकार आहे तो कोणत्याही बाजूनें कमी होतो असें मात्र समजूं नये.

७ आतां कलम ६ याचे प्रारंभीं जंगलाचे सदरांतून कमी करून लागवड जमिनीचे सदरांत जमिनीचा समावेश करितांना कांहीं शर्ती संभाळल्या पाहिजेत असें सांगून ठेविलें आहेच. तरी अशा शर्ती घालून ठेवण्याचा मुख्य हेतु असा आहे कीं, जंगलाचे सदरांतून कमी करून लागवडीचे सदरांत जमिनीचा समावेश केल्यानें नुकसानीपेक्षां जर फार मोठें सार्वजनिक हित होण्याचा संभव असेल तरच अशी व्यवस्था करावयाची आहे.

(१) मौल्यवान जंगलांत मधून जमिनीचे लहानसान तुकडे शेतें करण्याकरितां कधींही तोडून देऊं नयेत. सरासरीचे मानानें लागवड करण्यास योग्य असें एखादें मोठें क्षेत्र पाहून तेंच लागवडीकरितां दिलें पाहिजे, उत्तम जमीन ह्मणून मधून जंगलांतील तुकडे तोडून दिल्यानें थोडी जास्त मगदुराची जमीन वापरण्यास सांपडेल ही गोष्ट जरी खरी असेल तथापि त्या योगानें बाकी राहिलेल्या जंगलाच्या क्षेत्राचें योग्य संरक्षण करणें अगदीं अशक्य होणार आहे, यासाठीं अशा प्रसंगीं हितापेक्षां अनहित जास्त आहे.

(२) आतां लागवड होणें तीही पण कायमची झाली पाहिजे. कांहीं ठिकाणीं जंगलाची नैसर्गिक स्थिति अशी असते कीं, जंगलें नाहींशीं केल्यानें त्या जमिनी थोड्या अगर जास्त मुदतींत धुपून जाऊन खराब अगर नापीक होतात. अशा प्रकारचीं जंगलें आहेत तीं कलम ८ यांत सांगितल्याप्रमाणें पहिल्या प्रतीच्या जंगलांत बसतात असें समजून त्यांचेसंबंधानें जे निर्बंध ठरविले आहेत ते निर्बंध याही जंगलास लागू केले पाहिजेत. त्याचप्रमाणें जागेचा पालट करून लागवड करण्याची जी पद्धत आहे ती चालू ठेवल्यानें थोड्याशा जमिनींत पीक करण्यास सांपडतें येवढ्याच फायद्यासाठीं जंगलाचे भाग कोठें कोठें उद्वस्त होऊं द्यावे लागतात, व अशी परवानगी दिल्यापासून नफ्यापेक्षां लोकांचें नुकसान जास्त होतें, यासाठीं अशा प्रकारची लागवड करूं देणें ती ज्या जंगली जातीचा निर्वाह केवळ अशाच प्रकारच्या शेतकीवर आहे त्यांसच मात्र कांहीं योग्य निर्बंध ठरवून करूं दिली पाहिजे.

(३) लागवड केवळ नांवाची असतां कामानये, व तिच्या योगानें अंशतः अगर सर्वांशीं गुरें व मेंढरें राखणाऱ्या लोकांस तेथें जाऊन वसाहत करण्यास सबब होऊं नये, कारण असें केल्यानें त्यांचें जें हित होईल, त्यापेक्षां जंगलाचें फार नुकसान होईल.

(४) जंगलाच्या आसपासची जमीन लागवडीस देणें ती त्या प्रदेशांतील लोकांस सदर जंगलापासून ज्या जिनसांचा पुरवठा होणें अवश्य आहे अगर त्या जंगलाच्या आसपासच रहाणारे लोकांस ज्या ज्या जिनसा मिळण्याची सोय हल्लींची अगर भावी कायम ठेविली पाहिजे तशा जिनसा पैदा होण्यास जंगलापैकीं जरूर तेवढें क्षेत्र राखून ठेऊन बाकीचें जंगल लागवडीस देण्यास हरकत नाहीं. पुष्कळ प्रदेशांत जंगलाच्या साह्याशिवाय शेतकी करणें अगदीं अशक्य असतें, करितां जेथें अशा जंगलावर अशा शेतकीचें अस्तित्व अवलंबून असेल तीं जंगलें बिलकुल नाहींशीं होऊं देतां कामा नये.

८. ज्या जंगलांविषयीं विचार चालला आहे त्या जंगलांत लोकांची वहिवाट करण्याची चाल बहुतकरून नसते असें वर सांगितलें आहे. कधीं कधीं जेव्हां ह्या जंगलांत स्थायिक खेड्यांची व लागवडीची इतकी मिसळ झालेली असते कीं, लोकांच्या वहिवाटीचे हक्क व अधिकार यांचे योगानें महसूल उत्पन्न होणाऱ्या जंगलाच्या मालमत्तेची व्यवस्था लावण्यास हरकत येत असेल, तेव्हां या ठरावाच्या ५ वे कलमाच्या अखेरीस जीं तत्वें घालून दिलीं आहेत त्यांप्रमाणें अंमल करावा, आणि अशा प्रसंगीं लोकांच्या स्थानिक गरजा पूर्णपणें पुऱ्या झाल्यावर महसुलाचा विचार करणें तो मागाहून करावा. जंगलांचें संरक्षण करण्याकरितां अथवा त्यापासून होणाऱ्या फायद्यांचा चांगला उपभोग घेण्याकरितां जे निर्बंध अवश्य वाटतील ते ठेवावे, परंतु केवळ सरकारचा महसूल वाढविण्याकरितां योग्य स्थानिक मागण्यांचा निर्बंध करूं नये.

९. जे प्रदेश खरे खर ह्मटलें ह्मणजे जंगलेंच असतात, परंतु ज्यांत हलक्या प्रतीचीं इमारती लांकडें किंवा उंच प्रतीचीं परंतु कमी वाढीचीं इमारती लांकडें मात्र उत्पन्न होतात, ते प्रदेश तिसऱ्या प्रतीचीं जंगलें होत. अशा प्रकारच्या कित्येक जंगलांतून शिल्पक्रियेच्या कारखान्यांस, आगगाडीस व अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारखान्याला उपयोगीं पडणारा जो सर्पणाचा पुरवठा होतो तो इतका महत्वाचा आहे कीं, सदर जंगलाचा समावेश दुसऱ्या प्रकारच्या जंगलांत वस्तुतः करावा लागतो आणि त्याची व्यवस्था मुख्यत्वेंकरून व्यापारदृष्टीनेंच केली पाहिजे; परंतु जीं स्थानिक खपास लागणारें सर्पण, वैरण व चराई यांचा

पुरवठा करण्याचे कामीं मुख्यत्वेंकरून उपयोगीं पडतात त्या जंगलांविषयीं आतां आपणास विचार करावयाचा आहे; आणि अशा जंगलांची व्यवस्था करणें ती त्यांच्या आसपास जे लोक राहतात व ज्यांस त्या जंगलांपासून जंगलांतील जिनसांचा पुरवठा होतो, त्यांचें हित होईल अशा प्रकारें केली पाहिजे. वहिवाट करणारांस जंगलांतील मालाचा समूळ नाश करितां येऊं नये, आणि लोक स्वतः अविचारानें वागल्यामुळें जें त्यांचें नुकसान होणार त्यापासून त्यांचें रक्षण केलें पाहिजे, याकरितां ह्या जंगलांतील झाडें आणि गवत हीं राखून ठेविलीं पाहिजेत, ही पहिली गोष्ट ; आणि लोकांचा पुष्कळ फायदा व सोय होईल अशा रीतीनें जंगलांतील उत्पन्न होणाऱ्या जिनसांचा त्यांस पुरवठा केला पाहिजे, ही दुसरी गोष्ट; ह्या दोन गोष्टी पुऱ्या झाल्यानंतर मग सरकारमहसुलाबद्दल विचार करणें तो करावा.

१०. पूर्वी सांगितलेल्या गोष्टींवरून ज्या मोठमोठ्या क्षेत्रांपासून मुख्यत्वेंकरून किंमतदार वैरण आणि सर्पण पैदा होतें त्यांजपासून होणारें उत्पन्न सोडून देण्याचा हिंदुस्थानसरकारचा हेतु आहे असें कोणी समजूं नये. अशा प्रकारच्या जंगलाचे अनेक प्रकार आहेत. सदहू जंगलांतील अगर त्यांचे सभोंवतीं असणाऱ्या ज्या खेड्यांतील लोकांस गुरें चारणीकरितां आणि सर्पण मिळण्याकरितां त्या जंगलाशिवाय दुसरे मार्ग नाहींत, त्या खेड्यांतील राहणारे लोकांच्या गरजा अतिमहत्वाच्या आहेत असें मानलें पाहिजे ; आणि त्या गरजा फारच माफक दरानें आणि होईल तितकें करून सरकारी अंमलदारांकडून हरकत न होतां पुरविल्या पाहिजेत; परंतु ज्या प्रदेशांत खेड्यांतील लोकांस त्यांच्या लागवडीच्या जमिनीस लागून अशा पुष्कळच गुरें चारणीच्या जागा आहेत व ज्यांजवर त्यांची मालकी असून ज्यांची व्यवस्था ते स्वतः पहात आहेत, आणि जेथें त्या गुरें चारणीशिवाय सरकारी जमीन पुरवणीदाखल असून ज्या भटकणाऱ्या धनगर लोकांस मेंढ्या चारण्यास अथवा जसजसे ऋतु बदलतात तसतशा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणाऱ्या गुरांस चरण्यास उपयोगी पडतात, अशा प्रदेशांत सरकारानें आपल्या मिळकतीपासून वाजवी उत्पन्न करून घेतल्यास गैरशिस्त होणार नाहीं. अशा ठिकाणीं देखील गुरें चारणाऱ्या लोकांची सोय व फायदा यांविषयीं विशेष विचार केला पाहिजे आणि त्या ठिकाणीं राहणाऱ्या लोकांपासून अगर तेथें हमेशा गुरें चारणीबद्दल पैसे द्यावयाचे ते उघड बाजारांत जे दर असतील त्यापेक्षां बरेच कमी द्यावे व त्यांनाच तीं रानें गुरें चारणीस द्यावीं. खेड्यांत राहणारे लोकांनीं अगर कळप घेऊन फिरणाऱ्या लोकांनीं

गुरें चारणीबद्दलची मागणी केली असतां ती एक अगर जास्त वर्षांच्या मुदतीनें ठरवून देणें हें नेहमीं फायदेशीर होईल. इतर पद्धतीप्रमाणें ह्या पद्धतींतही कांहीं विशेष अडचणी आहेत, परंतु या पद्धतीच्या योगानें हलक्या प्रकारच्या नोकर लोकांस फारच थोडा हात घालतां येईल, आणि लोकांवर जुलूम करण्याचे व त्यांजपासून जबरीनें पैसे घेण्याचे जे त्यांस प्रसंग येतात ते फारच थोडे येतील. ज्या ठिकाणीं गुरें चारणीबद्दलची फी प्रत्येक व्यक्तीपासून घेण्यांत येते त्या ठिकाणीं कांहीं गुरें मोफत चरूं देण्याची वहिवाट असते. अशा बाबतींत जीं गुरें मोफत चरूं द्यावयाचीं तीं, नांगरणीचे कामास प्रत्यक्ष उपयोगास लावलेले बैलच असले पाहिजेत असें नाहीं, तर दुभतीं गुरें व वांसरें बेताचीं असल्यास त्यांसही मोफत चरूं द्यावें. शेतकऱ्यांस नांगराचे बैलाची जितकी अवश्यकता (अवश्यकता हा शब्द वाजवी व्यापक अर्थानें येथें योजिला आहे) असते, तितकीच गाईंची अथवा ह्मशींची असते आणि पुष्कळ ठिकाणीं खेडेगांवांतून बैल पाळून वाढविण्याची चाल असते.

११. या ठरावाच्या मथळ्यांत डाक्टर व्होलकेर यांच्या ज्या रिपोर्टाचा उल्लेख केला आहे त्यांत कांहीं ठिकाणीं सर्पणाकरितां व वैरणीकरितां जागा राखून ठेवण्याविषयीं त्यांनीं आग्रहपूर्वक शिफारस केली आहे आणि हिंदुस्थानसरकार अशा प्रकारची व्यवस्था करण्याविषयीं स्थानिक सरकारांस वारंवार कळवीत आलेंच आहे. कोणत्याही एखाद्या क्षेत्रांतून गवत राखून तें वैरणीकरितां कापून ठेविलें तर त्या क्षेत्रांत हल्लींपेक्षां जास्त गुरांचें पोषण होईल, अथवा त्या क्षेत्रांत गुरें चरण्याची परवानगी दिल्यानें हल्लींपेक्षां जास्त गुरांचें पोषण होईल, या प्रश्नाचा निकाल करणें तो ज्या ठिकाणीं जशी स्थिति असेल त्या स्थितीच्या मानानें त्या ठिकाणीं केला पाहिजे. परंतु सदरीं लिहिलेल्या प्रश्नाचा एकदां निकाल केला, ह्मणजे यासंबंधीं सर्व बाबतींचा निकाल झालाच, असें मात्र कोणी समजूं नये. "लोकांचा पुष्कळ फायदा व हित होईल अशा रीतीनें" सर्पण व वैरण यांचा पुरवठा व्हावा, असा किरकोळ जंगलाची व्यवस्था करण्याचा एक मुख्य हेतु आहे ह्मणून वर नवव्या कलमांत सांगितलें आहे. असें करतांना लोकांच्या रीतिभाति व इच्छा यांजकडे योग्य लक्ष पुरविलें पाहिजे. जंगलें सक्त रीतीनें राखल्यानें आणि तीं कांहीं मुदतपर्यंत बंद ठेवल्यानें अथवा त्यांत गुरें चरण्याची अगदीं मनाई केल्यानें सर्पणाचा व वाळलेल्या गवताचा पुष्कळ पुरवठा होण्याचा संभव आहे. परंतु अशा प्रकारें जास्त केलेल्या पुरवठ्याचा लोक जर उपयोग करून घेणार नाहींत, तर तसें करण्यापासून फारच

थोडा फायदा होईल. हिंदुस्थानांतील लोकांच्या रीतिभाति हळू हळू बदलत असतात, आणि लोकांचा जेणेंकरून फायदा होईल अशा पुष्कळ गोष्टी करितां येतील अथवा त्या करणें वाजवी होईल, तरी, जें करणें असेल तें एकदम न करितां धिम्मेंधिम्में व क्रमाक्रमानें केलें पाहिजे; कारण त्याच्या भौतिक फायद्याकडे लक्ष देण्यापेक्षां जेणेंकरून त्याचें समाधान होईल अशी गोष्ट करणें कमी महत्वाचें नाहीं. राखलेल्या जंगलांत गुरें चारणीकरितां वेगळें क्षेत्र काढून ठेविल्यानें, वर सांगितलेल्या राखलेल्या जंगलांत आसपास राहणाऱ्या लोकांचा फायदा व्हावा हा हेतु आहे, ही गोष्ट देखील ध्यानांत ठेविली पाहिजे, आणि गुरें चारणीपासून हल्लीं होणाऱ्या उत्पन्नापेक्षां जास्त उत्पन्न व्हावें ह्मणून रानांत उत्पन्न होणारे जिन्नस राखलेल्या जंगलापासून दूरदूरच्या अंतरांवरील मोठमोठ्या शहरांच्या खर्चाकरितां, जो कोणी अधिक किंमत देईल, त्यास व फक्त विकून जास्त उत्पन्न करणें, ही गोष्ट हिंदुस्थानसरकारानें जी व्यवस्था ठेवावी ह्मणून वर सांगितलें आहे, त्या व्यवस्थेस नेहमीं अनुसरून असतें असें नाहीं. पुनः या ठिकाणीं देखील जशी वस्तुस्थिति असेल तसा निकाल केला पाहिजे. राखलेल्या क्षेत्रांशिवाय इतर क्षेत्रांतून ठिकठिकाणचा सर्पणाचा व वैरणीचा पुरवठा सामान्य वर्षांत (ज्या वर्षांत दुष्काळ वगैरे नसतो अशा वर्षांत) आसपास राहणाऱ्या लोकांच्या गरजा भागविण्यापुरता कोठें कोठें मात्र असतो. अशी गोष्ट असेल तेव्हां अशा सालांत जंगलांतील माल जास्त फायदा होईल अशा रीतीनें विकतां येईल; आणि बाहेरच्या मालाचा पुरवठा कमी पडत असेल तेव्हांच मात्र जंगलांतील माल त्या ठिकाणच्या खपाकरितां राखून ठेवावा. शेवटीं असें सांगणें आहे कीं, या ठरावाच्या १२ वे कलमांत एजन्सी (जंगलाची व्यवस्था पहाण्याकरितां सरकारानें नेमलेले कामगार) विषयीं जें सांगितलें आहे तें, आणि त्याचे पुढील १३ वे कलमांत ज्या सामान्य विचाराविषयीं ऊहापोह केला आहे ते विचार, हे सर्पणाचा व वैरणीचा वगैरे पुरवठा करण्याकरितां सदरीं लिहिल्याप्रमाणें राखून ठेविलेल्या क्षेत्रांस पूर्णपणें लागू आहेत.

१२. गुरें चारणीच्या आणि नुसत्या कुरणाच्या जागा हीं चवथ्या वर्गाचीं जंगलें होत. हीं बहुधा नांवाचींच रानें असतात असें ह्मटलें तरी चालेल. अशा प्रकारच्या जमिनीवर, एका बाजूस सरकार व दुसऱ्या बाजूस खासगी लोक अथवा गांवांतील लोक, यांचे दरम्यान हक्क असतात त्यांजबद्दल कायदेशीर निर्णय करून घेण्यासाठीं ह्या जमिनी जंगलें आहेत असें ठरविणे नेहमीं सोईचें असतें; परंतु एवढ्यावरून ह्या जमिनीस जंगलखात्याचीं जंगलें राखण्याची जी

सख्त पद्धत आहे ती लागू करावी, अथवा त्याची व्यवस्था जंगलखात्याकडून झाली पाहिजे, असें मात्र कोणी समजूं नये. एजन्सीचा प्रश्न ह्मटला ह्मणजे त्यांत खर्चाची काटकसर व उपयुक्तता यांचा विचार करावा लागतो आणि प्रत्येक प्रसंगीं, ज्या ठिकाणीं ह्या जमिनीची व्यवस्था जंगलखात्याकडून होते, त्या ठिकाणीं नेमणुकीचा खर्च वास्तविक होणाऱ्या उत्पन्नापेक्षां अगर त्यापासून जितकें उत्पन्न होण्याजोगें आहे त्यापेक्षां जास्त असतो, अशी हिंदुस्थान-सरकारची समजूत आहे.

पुढें दिलेल्या सूचना जंगलाच्या कायद्याखालीं येणाऱ्या जंगलाच्या जमिनीस (मग त्या जमिनीची व्यवस्था जंगलखात्याकडे असो किंवा नसो) लागू पडतात असें नाहीं; परंतु त्या सूचना सर्व सरकारी पडीत जमिनीसही लागू आहेत. मग त्या पडीत जमिनी जंगलें आहेत असें ठरविलें नसलें तरी हरकत नाहीं. ह्या प्रसंगीं स्थानिक लोकांचें हित फारच साधावयाचें असतें व साधारण लोकांचें त्यांत फारसें हित होण्याजोगें नसतें, यावरून असें सिद्ध होतें कीं, जीं केवळ गुरें चारणीचीं क्षेत्रें आहेत त्यांच्या व्यवस्थेस लहानसहान जंगलाच्या व्यवस्थेच्या संबंधानें जीं पूर्वीं तत्वें सांगितलीं तीं सारखींच, किंबहुना विशेष प्रकारें लागू पडतात.

१३. ह्या क्षेत्राच्या संबंधानें ज्या अडचणी येतात तशाच प्रकारच्या किंबहुना त्यांहून अधिक कठिण अडचणी रयतवारी सत्ताप्रकारच्या जमिनीसंबंधानें येणाऱ्या आहेत. जमीनदारी पद्धतीच्या प्रदेशांत ज्या सरकारी जमिनी आहेत त्या या ठरावाचें कलम १० यांत जे दोन प्रकार सांगितले आहेत त्यांपैकीं बहुतकरून दुसऱ्या प्रकारांत मोडतात; परंतु ज्या ठिकाणीं रयतवारीची व्यवस्था चालू असते त्या ठिकाणीं जो कोणताही सर्व्हेनंबर अथवा कोणतेंही शेत रिकामें पडलेलें अगर कोणास लावून दिलेलें नसतें, तें सरकारच्या ताब्यांत व व्यवस्थेखालीं असतें व त्या जमिनींत परवानगीवांचून जाण्यास प्रथमदर्शनींच मनाई असते. लागवड केलेल्या कांहीं प्रदेशांत वर सांगितल्या प्रकारच्या रिकाम्या पडलेल्या व पडीत जमिनी असतात तेवढ्याच काय त्या बहुतकरून तेथें राहणाऱ्या लोकांच्या गुरें चरण्याचे कामीं उपयोगीं पडतात. ज्या जमिनीचा केवळ गुरें चरण्याकडे उपयोग होतो व ज्या जमिनींत परवानगीवांचून जाणें-येणें मना केलें असतें, अशा सरकारी जमिनी व वहिवाट करणाऱ्या लोकांच्या शेतीभातीच्या जमिनी ह्यांची मिसळ झाली असली तर त्यापासून बराच दुरुपयोग होतो. विशेषेंकरून त्या जमिनीची व्यवस्था जंगलखात्याकडे असली तर

त्यापासून दुरुपयोग होतो, असें हिंदुस्थानसरकारचें स्पष्ट मत आहे. जंगलखात्यांतील हलक्या प्रतीचे नोकर हे आपणास जो त्यांना पगार देतां येतो त्या मानानें विश्वासू असावे तितके कदाचित् असतील, परंतु त्यांची नीति ते ज्या अशिक्षित वर्गांतून आले असतात त्यांच्यापेक्षां अधिक श्रेष्ठ नसते, आणि ज्या प्रदेशांत कामें करतात ते प्रदेश विस्तीर्ण असल्यामुळें व त्यांच्यावर देखरेख करणाऱ्या अंमलदारांची संख्या फारच थोडी असल्यामुळें त्यांजवर चांगली देखरेख ठेवण्याचें काम फारच कठीण पडतें. लागवड जमिनीच्या आसपास फैलावलेल्या पडित जमिनीवरील चारा अथवा चारणीचें उत्पन्न राखण्याच्या उद्देशानें, गुरें आपल्या मालकांच्या शेताची हद्द ओलांडून जवळच्या दुसऱ्या शेतांत गेलीं तर त्यांना कोंडवाड्यांत घालण्याची दहशत दाखविण्याचा अधिकार हलक्या प्रतीच्या नोकराच्या हातांत देणें अगदीं गैरशिस्त आहे. जंगलाच्या कायद्याचें कलम ६७ यांत गुन्हे मोडून टाकण्याकरितां दिलेला अधिकार हलक्या प्रतीच्या नोकरानें केलेल्या रिपोर्टावरून चालवूं देणें अथवा या अधिकारापासून उत्पन्न होणाऱ्या लालचीस त्यांस पात्र करणें ही गोष्ट वरील गोष्टींपेक्षां तर फारच गैरशिस्त आहे. ज्या ठिकाणीं फायद्याची बाब बरीच महत्वाची असते त्या ठिकाणीं हलके नोकर लोक लोकांपासून जुलमानें पैसे घेतील अशी जरी भीति असली तरी ती पत्करणें कदाचित् जरूर होईल. पण असे जुलमानें पैसे काढण्याचे प्रसंग अगदीं कमी करतां येतील अशी तजवीज करावी. ज्या बाबतीबद्दल विचार चालू आहे त्यांत होणारें हित फारच थोडें असून जुलूम करण्याचे प्रसंग अतोनात येणारे आहेत.

१४. गुरें चरणीची बाब ही मुख्यत्वेंकरून उत्पन्नाची बाब आहे, अशी हिंदुस्थानसरकारची इच्छा नाहीं हें पक्केपणीं लक्षांत ठेविलें पाहिजे; परंतु यावरून ठिकठिकाणीं पसरलेल्या ज्या सरकारी जमिनी आहेत, त्यांचें उत्पन्न सोडण्यास सरकार तयार आहे असें मात्र कोणी समजूं नये. असें करणें खरोखर इष्ट नाहीं; कारण असें केलें असतां जमिनी लागवडी वगैरे करतां लावून देण्याचे कामांत हरकती आणण्यास व जमिनीची नवीन वहिवाट करणारांस पीडा करण्यास रयतेस सवड होईल; परंतु त्या जमिनीची व्यवस्था तेथें रहाणाऱ्या लागवड करणारांकडे अगर त्यांपैकीं मुखत्यारांकडे दिली असतां, साक्षात् सरकारतर्फे वहिवाट करण्यास ज्या हरकती येतात ह्मणून नुकतेंच सांगितलें आहे त्या पुष्कळच कमी होतील. गांवच्या लोकांच्या मार्फत गांवच्या रिकाम्या पडलेल्या जमिनी खंडानें बहुधा देतां येतील, अथवा दुसऱ्या तऱ्हेनें त्यांची

व्यवस्था लावतां येईल. जमिनी खंडानें द्यावयाच्या त्यांबद्दल जो जबर खंड लोक नुकत्याच सांगितलेल्या अडचणीपासून बचाव होण्याकरितां देण्यास तयार असतात तो घेऊन देऊं नयेत, परंतु ज्या जमिनीबद्दल सरकारांत सारा द्यावा लागतो त्या जमिनीची चांगली लागवड होण्याकरितां चरणारे गुरांचे व मेंढरांचे कळप अवश्य लागतात व त्यांच्या चारणीची तजवीज केल्यावांचून ते जगणार नाहींत, ही गोष्ट मनांत आणून व माफक अंदाज करून त्या मानानें जो खंड घ्यावयाचा त्याचा आकार ठरवावा. जीं शेतें लोकांनीं सोडून दिलीं असतील तीं कमी पट्टी घेऊन गुरें चारणीच्या कामाकरितां बाहेरच्या लोकांस कधीं देऊं नयेत ; कारण असें केल्यानें सदर्हू शेत, उलाढाली करणारे लोक अतिक्रमण करणाऱ्या गुरांपासून जितका फायदा करून घेतां येईल तितका मिळविण्याच्या मुख्य हेतूनें कमी पट्टी देऊन सहज घेतील.

१५. मूळ तत्वाच्या आणखी एका मुद्याचा विचार करण्याचें राहिलें आहे. जंगलें रक्षण केलेलीं आहेत असें जाहिरनामा लावून प्रसिद्ध करण्याविषयीं जी रीत हिंदुस्थानच्या जंगलाचे कायद्याचे ४ थे बाबींत सांगितली आहे ती रीत हिंदुस्थानसरकारानें कांहीं बाबतींत चालचलाऊ व मध्यंतरींची अशी मानली आहे ; आणि रक्षण केलेल्या जंगलांतील किती क्षेत्र जंगलाच्या कायद्याच्या २ ऱ्या बाबीअन्वयें राखलेलें जंगल ह्मणून ठेवावें आणि बाकी राहिलेलें अजिबात सोडून द्यावें, याचा विचार व निकाल करण्यास फुरसत सांपडावी हाच असें करण्याचा मुख्य हेतु आहे. जंगलाच्या कायद्यामध्यें दोन पद्धति निरनिराळ्या सांगितल्या आहेत. बाब २ हींत जी जास्त सक्त पद्धत सांगितली आहे तिच्या योगानें हल्लींचे हक्क निश्चित करतां येतील, दुसऱ्यास देतां येतील किंवा बदल करितां येतील आणि ही पद्धत या ठरावाच्या ३ ऱ्या कलमांत पहिल्या व दुसऱ्या वर्गाचीं जीं जंगलें सांगितलीं आहेत त्यांस सामान्यत: लागू पडेल. चवथे बाबतींत जी पद्धत सांगितली आहे तिच्या योगानें हक्क दप्तरीं दाखल करितां येतात व नियमित करतां येतात आणि ज्या प्रसंगीं क्षेत्रास लागू असणारे हक्क मोठे असतात व ज्या प्रसंगीं जंगलांची व्यवस्था तेथील लोकांच्या फायद्यासाठीं मुख्यत्वेंकरून करावयाची असते त्या प्रसंगीं ही पद्धत नेहमीं बरोबर लागू करतां येईल. साधारणत: ही पद्धत ३ ऱ्या व ४ थ्या वर्गाच्या जंगलांना लागू पडेल. ही दुसरी पद्धत वास्तविक चालचलाऊ असून ती बाब २ यांत जंगल राखण्याबद्दल सांगितलेल्या कोणत्याही गोष्टीवरून तीस बाध नाहीं. सरकारासंबंधानें पाहिलें तर वर सांगितलेल्या

दोन्ही पद्धतींत मुख्य फरक आहे तो हा कीं, नवे हक्क रक्षण केलेल्या जंगलांत उत्पन्न करतां येईल, परंतु राखलेले जंगलांत नवीन हक्क उत्पन्न करतां येणार नाहींत. २ ऱ्या बाबींत सांगितल्याप्रमाणें तयार करून ठेविलेल्या हक्कांचा दाखला निश्चयात्मक नसतो आणि ४ थे बाबींत सांगितल्यप्रमाणें जो हक्काचा दाखला ठेवलेला असतो त्याजवरून त्याचे खरेपणाबद्दल मात्र अनुमान करतां येतें.

ज्या ठिकाणीं हक्क नियमित करण्याचा हेतु, ते अधिक फायदेशीर रीतीनें चालवितां यावे हा असून, लोकांचें हित साधण्यासाठीं त्यांचा दुरुपयोग व्हावा असा नसतो, त्या ठिकाणीं या अनुमानापासून पुष्कळच बचाव होतो अशी समजूत आहे. लोकांच्या संबंधानें पाहिलें तर या दोन पद्धतींत मुख्य भेद आहे तो हा कीं, स्थूल मानानें विचार केला असतां राखून ठेविलेल्या जंगलांत जी जी क्रिया परवानगी घेतल्याशिवाय केली जाते ती ती क्रिया गुन्हे असें समजलें जातें; आणि संरक्षण केलेल्या जंगलांत जीबद्दल मनाई नाहीं अशी कोणतीही क्रिया केली असतां ती गुन्हा होत नाहीं. या दोन्ही बाबतींत जीवरून एकसारखाच परिणाम घडून येईल, असे प्रकारें त्या परवानगीची आणि मनाईची व्यवस्था लावितां येण्याचा संभव आहे असा तर्क करितां येईल; परंतु व्यवहारदृष्टीनें तसें करणें अगदीं असंभवनीय आहे. असें जर नसतें तर कायदे करणाऱ्या मंडळीनें या दोहों पद्धतींमध्यें जो फरक काढिला आहे तो व्यर्थ व निरर्थक झाला असता. सर्वसाधारण लोकांच्या ज्या हिताकरितां जास्त सक्त रीत लागू करणें व जंगलाचे गुन्ह्याची अधिक व्यापक व्याख्या करणें वाजवी होईल अशा प्रकारें तें हित मोठ्या महत्वाचें असेल त्या वेळेस मात्र दुसऱ्या पद्धतीची योजना करावी.

ह्मणून गव्हरनर–जनरल–इन–कौन्सिल यांची अशी इच्छा आहे कीं, सर्पण व वैरण यांकरितां रक्षण करून ठेविलेल्या जमिनी व निवळ व निखालस गुरें चारणीच्या जमिनी आणि मुख्यत्वेंकरून त्या जमिनींपैकीं ज्या लागवड केलेल्या प्रदेशांमध्यें असतात त्या जमिनी, अशा जमिनींविषयीं विचार करितांना प्रत्येक जमीन जंगलाच्या कोणत्या वर्गांत दाखल करणें अवश्य आहे अथवा त्या जमिनी कोणत्या वर्गांत दाखल कराव्या हें जर पूर्वींच ठरविलें असेल, तर त्या राखून ठेवलेल्या जंगली क्षेत्राप्रमाणें ठेवाव्या किंवा नाहीं, याचा विचार केला पाहिजे आणि ह्या प्रश्नाचा निकाल, जर असें करणें वाजवी आहे असा झाला तर, ह्या जमिनी राखून ठेवलेलीं जंगलें आहेत असें ह्मणण्यापेक्षां तीं रक्षण केलेलीं जंगलें आहेत असें मानणें विशेष चांगलें होईल किंवा नाहीं हेंही पाहिलें पाहिजे.

१६. हीं वर सांगितलेलीं सामान्य तत्वें ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व सरकारी

जंगलांच्या व्यवस्था करितांना लक्षांत वागविलीं पाहिजेत अशी हिंदुस्थानसरकाराची इच्छा आहे. ह्या तत्वांची तपशीलवार अंमलबजावणी नानातऱ्हांच्या अनेक गोष्टींवर अवलंबून राहील व त्या गोष्टींची योग्यायोग्यता स्थानिक अधिकाऱ्यांनीं प्रत्येक प्रसंगीं पाहिली पाहिजे व त्यांचा निकाल करणें तो त्यांचे मुखत्यारीवरच सोंपविला पाहिजे, ही गोष्ट हिंदुस्थानसरकारास पूर्णपणें अगवत आहे. व्यापाराच्या कामांकरितां ज्या सवलती दिल्या जातील त्यांचा दगलबाजीनें दुरुपयोग करण्याची जी भीति आहे तीविषयीं सावधागिरी बाळगणें हें आतिशय कठिण काम आहे; आणि ही भीति कशी उत्तम रीतीनें टाळितां येईल हें ठिकठिकाणच्या स्थितीवरून मात्र कळणार आहे. जंगलांत उत्पन्न होणाऱ्या जिनसांची व्यवस्था करण्याची जी अधिक सुलभ रीत आहे ती शेतकरी लोकांस लागू करावी ह्मणून गव्हरनर–इन्–कौन्सिल यांची इच्छा आहे. परंतु ती रीत चालू करण्याचे कामांत जंगलासंबंधानें दिलेल्या सवलतींचा उपयोग लोकांनीं, योग्य रीतीनें लावून दिलेल्या निर्बंधाप्रमाणें, करावा ह्मणून विशेषेंकरून खरोखर राखून ठेवलेल्या क्षेत्रावर फार काळजी घेऊन देखरेख ठेवणें जरूर आहे. परंतु दुसऱ्या पक्षीं पहातां हिंदुस्थानसरकारास वाटत आहे कीं, कांहीं प्रांतांत ह्या व्यवस्थेनें हल्लीं असलेले नोकर वगैरे लोक बरेच कमी करितां येतील आणि या सरकारची अशी इच्छा आहे कीं, वर बारावे कलमांत जें सांगितलें आहे त्यासंबंधानें ह्या गोष्टीचा काळजीपूर्वक विचार करावा. सर्व प्रांतांतून जंगलाच्या संबंधानें जशी व्यवस्था असावी अशी या सरकारची इच्छा आहे तशी व्यवस्था कांहीं प्रांतांतून मागेंच झालेली आहे. सार्वभौम हितास विरोध येणार नाहीं अशा धोरणानें लोकांच्या स्थानिक गरजा जाणून त्या भागविण्याचे कामीं सर्व स्थानिक सरकारांस व प्रांताचा राज्यकारभार चालविणाऱ्या अधिकाऱ्यांस हिंदुस्थानसरकार मनापासून मदत देईल असें आश्वासन आतां आपल्यास मिळालें आहे, हें पाहून त्यांस आनंद होईल असा गव्हरनर–इन्–कौन्सिल यांचा समज आहे. जंगलांची व्यवस्था कशी लावावयाची याजबद्दलच्या उपायांची योजना करण्यांत येईल त्या वेळेस या कामाकरितां अवश्य लागणाऱ्या सर्व तजविजी त्यांत दाखल करून ठेविल्या पाहिजेत. जंगलाबद्दलचे ठराव करतेवेळीं जे हक्क नोंदून ठेविले असतील ते हक्क कसे चालवावे याविषयीं या व्यवस्थेमध्यें तजवीज करून ठेविली पाहिजे. ज्या ठिकाणीं मेहेरबानीखातर आणि अधिकार द्यावयाचे या हेतूनें जास्त सवलती दिल्या असतील त्या ठिकाणीं त्या सवलती, जी स्थिति मनांत आणून दिल्या असतील, ती स्थिति जसजशी बदलत जाईल त्याप्रमाणें वेळोवेळीं जरूर

पडल्यास, तपासणीकरितां यावी ह्मणून, त्या कांहीं मुदतीनें, उदाहरणार्थ १० वर्षांच्या मुदतीनें, दिल्या असतां बरें पडेल.

भाग तेरावा.

खाणी व कारखाने.

हिंदुस्थान देशांत खनिज पदार्थ कोठें कसे आहेत याचा शोध जिआलाजिकल सर्व्हेचे (भूमीचे रचनेची पहाणी करणारे) अंमलदार आहेत ते करतात व त्या माहितीप्रमाणें पुढें तीं द्रव्यें काढण्याचेसंबंधानें उद्योग होतात. सध्या दगडी कोळसा, सोनें व पेट्रोलियम तेल या तीन द्रव्यांचेसंबंधानें खाणी चांगल्या चालू आहेत.

दगडी कोळसा–हा काढण्याचें काम चांगले प्रकारानें चाललें आहे. बंगाल्यांत राणीगंज येथें कोळसा असल्याचें सन १७७४ पासून माहीत होतें व तो काढण्यास सुरवातही सन १७७७ पासून झाली होती. या ठिकाणचा कोळसा लवकर निघतो तरी तो गुणांत कमी असतो. कहरबरी येथील कोळसा चांगला असतो. सन १८९१-९२ सालीं बंगाल्यांतील खाणींतून एकंदरीपैकीं $\frac{3}{4}$ कोळसा निघाला होता. त्या सालीं हिंदुस्थानांत एकंदर ८७ खाणी होत्या. त्यांपैकीं ७७ बंगाल्यांत, मध्यप्रांतांत वरोरा येथें एक व मोहपाणी येथें एक अशा दोन, निजामाचे हद्दींत सिंगारणी येथें एक, पंजाबांत दंडोत येथें एक, बलुचिस्थानांत खोस्त येथें एक, आसामांत ३, रेवा संस्थानांत उमरिया येथें एक, अशा खाणी होत्या. बंगाल्यांत सर्वांत मोठ्या दोन खाणी आहेत त्या ईस्ट इंडिया कंपनी ह्मणजे सरकार चालवितें, बाकीच्या खाजगी कंपन्या चालवितात. पंजाबांतील, वरोरा येथील, रेव्यांतील व बलुचिस्थानांतील खाणीही सरकार चालवितात. बाकीच्या कंपन्यांकडे आहेत. एकंदर सर्व खाणींतून सन १८७५-७६ सालीं १० लक्ष टन कोळसा निघाला होता; सन १८९१-९२ सालीं २३ लक्ष टन निघाला होता; ह्मणजे दुपटीवर वाढ झाली आहे. ब्रह्मदेशांत अलीकडे खाणी काढल्या आहेत व त्यांतून सन १८९३ सालीं १९३८ टन कोळसा निघाला होता. सन १८९३ सालीं २५२९८५५ टन कोळसा, रु. ८६०७८६० चा निघाला होता. त्यापैकीं इंग्रजी मुलखांत २२५७९९२ टन निघाला होता व २७१८६३ टन संस्थानिकांचे हद्दींत निघाला होता.

विलायती कोळशापेक्षां इकडील कोळशांत राख जास्त असते, त्यामुळें त्याचे-

पासून विलायती कोळशाचे प्रमाणानें एकद्वितीयांशापासून दोन तृतीयांश काम होतें. विलायती कोळशांत गुण जास्त आहेत तरी तिकडून इकडे आणण्याचे खर्चानें याची किंमत फार वाढते, यामुळें बंगाल व ब्रह्मदेशांत या देशांतील कोळसा स्वस्ता पडतो. या देशांतील कोळशापैकीं निम्मे आगगाड्यांकडे खर्च होतो. या देशांतील कोळसा सिलोन, जाव्हा, स्ट्रेट्स् सेटलमेंट येथें जातो. मुंबई व मद्रास इलाख्यांत कोळशाच्या खाणी मुळींच नाहींत. परदेशांतून कोळसा पुष्कळ येतो, परंतु अलीकडे कारखान्यांत पुष्कळ वाढ झाली आहे तरी त्या मानानें कोळसा येण्यांत वाढ झाली नाहीं. गंगा व गोदावरी या दोन नद्यांचे दरम्यानचे प्रदेशांतच विशेषेंकरून कोळसा आहे. गोदावरीचे दक्षिणेस कोळसा सांपडत नाहीं; गंगेचे उत्तरेसही फार थोडे ठिकाणीं सांपडतो.

लोखंड–लोखंड हिंदुस्थानचे सर्व भागांत सांपडतें; विशेषेंकरून मद्रास इलाख्यांत सालेम, बल्लारी व कुर्नुल येथें, मध्यप्रांतांत वरोरा व जबलपूर येथें व बंगालचे पश्चिम भागांत सांपडतें. युरोपीय पद्धतीवर लोखंड गाळण्याचें बंगाल्यांतच चालू आहे. या प्रांतांत वरकर येथें लोखंडाचा मोठा कारखाना स्थापन झाला आहे व त्यांत तयार झालेलें लोखंड सर्व खपतें. मुंबई इलाख्यांत घाटाचे भागांत व मद्रास इलाख्यांत सालेम व भोंवतालचे भागांत कांहीं लोखंड गाळण्यांत येतें; आतां हा धंदा बसल्यासारखा झाला आहे. लोखंड गाळण्यास मुख्य अडचण सर्पणाची पडते. सन १८९३ सालीं ३७१०२ टन लोखंड रु. २३१३७१ किमतीचें निघालें होतें.

पेट्रोलियम तेल–हें वरचे ब्रह्मदेशांतच मुख्यत्वेंकरून सांपडतें. खालचा ब्रह्मदेश, आसाम, पंजाब या प्रांतांतही कांहीं सांपडतें. वरचे ब्रह्मदेशांतील यिनानचांगजवळ याच्या १०० पेक्षां जास्त विहिरी आहेत व त्यांतून सन १८९३ सालीं एक कोटि ग्यालन तेल निघालें होतें. शिबी हरणई आगगाडीचे रस्त्यावर खट्टन येथील विहिरींतून गेले १० सालांत सुमारें ४ लाख टन तेल निघालें, परंतु तेथील तेलाचा सांठा संपण्याचीं चिन्हें दिसत आहेत. आसामांतील मकम येथील विहिरींतून तेल चांगलें निघतें. परंतु अजून पुष्कळ निघूं लागलें नाहीं. या देशांत या तेलाचा प्रसार किती झाला आहे तें परदेशांतून आलेले तेलाचे आंकडे खालीं दिले आहेत त्यांवरून दिसेल.

	ग्यालन	किंमत रु.
सन १८७५	६२३८६४	४४९३७०
१८८१–८२	९८८३०४९	५०४०३३०
१८९१–९२	५८१०९२८३	२३६८१४००
१८९३–९४	८३६६६८६३	३०९४७३४५०

सन १८९३–९४ सालीं ४९२ लक्ष ग्यालन अमेरिकेंतून आलें होतें व ३४० लक्ष ग्यालन तेल रशियांतून आलें.

सन १८९३ सालीं या देशांत १०३ लक्ष ग्यालन तेल किंमत रु. ७९७२६७ चें निघालें होतें.

सोनें- सोनें बहुतेक सर्व देशांत सांपडतें. तें सांपडतें तीं ठिकाणें देतों.

(१) मद्रास इलाखा—त्रावणकोर, मदुरा, सालेम, मलबार, वायनाद, कोइंबतूर, अर्काट, निलगिरी, व दक्षिण कानडा.

(२) ह्मैसूर व हैद्राबाद संस्थानें.

(३) बंगाल प्रांत—ओरिसा, मिदनापूर, बंकुरा, चंपरण जिल्हे, छोटा नागपूर, मनभुम सिदभुम, उदैपूर, दार्जलिंग.

(४) मध्य हिंदुस्थान—अजमीर मरवाड प्रांत.

(५) मध्य प्रांत—छत्तिसगड, नागपूर, जबलपूर, गोदावरी जिल्हा.

(६) मुंबई इलाखा—धारवाड, बेळगांव, कलादगी जिल्हे व काठेवाड प्रांत.

(७) पंजाब—बन्नु, पेशावर, हजारा, रावळपिंडी, जेलम, कांगरा, अंबाला, गुरगांव, होसियारपूर.

(८) वायव्य प्रांत—बिजनोर, नैनिताल, गरव्हाल.

(९) खालचा ब्रह्मदेश व वरचा ब्रह्मदेश.

ह्मैसूर व वायनाद या ठिकाणांशिवाय इतर ठिकाणीं सोनें काढण्याचें काम जारीनें चालू नाहीं. त्या दोन भागांत मात्र युरोपियन लोकांचे देखरेखीखालीं व चांगले पद्धतीप्रमाणें सोनें काढण्यांत येत आहे. ह्मैसुरांत सन १८९२ सालीं १६३१८८ औंस सोनें जवळजवळ ९९ लक्ष रुपयांचें निघालें. बाकीचे प्रांतांत तें झारेकऱ्यासारखें धुवून काढण्यांत येतें, तें विशेष निघतही नाहीं.

मीठ.—पंजाबांत खाणींतून मीठ निघतें. सन १८९३ सालीं या खाणींतून मीठ १०४५२२ टन किंमत रु० ४६४४८९ चें निघालें होतें.

मौल्यवान धोंडे—हिरे छोटा नागपूर, मध्यप्रांत, कृष्णेचें खोरें, मद्रास इलाख्यांत अनंतपूर, कडप्पा, कर्नूल व गोदावरी जिल्हा, बुंदेलखंड व हैद्राबाद या प्रांतांत सांपडतात. हिरे काढण्यासाठीं कंपन्यांकडून प्रयत्न चालू आहेत परंतु कोठेंच विशेषसे चांगले व पुष्कळ असे हिरे सांपडले नाहींत. हैद्राबाद संस्थानांत सन १८९१ सालीं रु. १५५३० चे व बुंदेलखंडांत सन १८९२ सालीं रु. ९३३१ चे हिरे सांपडले होते.

माणकें–ब्रह्मदेशांत सांपडतात व तीं काढण्याचें काम कंपन्यांकडून चालू आहे. तीं सुमारें ६६ चौरस मैलांचे क्षेत्रांत सांपडतात.

जेड दगड–हा ब्रह्मदेशांत सांपडतो, व तो चिनांत फार जातो. सन १८९३-९४ सालीं ४३४६५० रुपयांचा परदेशांत गेला होता.

इतर खनिज पदार्थ—पुष्कळ आहेत परंतु ते काढण्याचे कारखाने सांगण्यासारखे नाहींत. मिका (अभ्रक) पश्चिम बंगाल्यांत सांपडतो. सन १८९३-९४ सालीं ७६६६९९ रुपयांचा परदेशांस गेला होता. मद्रास इलाख्यांत नेलोर व कोइंबतूर जिल्ह्यांत, सिंधेंत, राजपुतान्यांतील कृष्णगड संस्थानांत, ह्मैसूर व हैद्राबाद संस्थानांतही सांपडतो. कथील खालचे ब्रह्मदेशांत सांपडतें. तें काढण्याचें अलीकडे चांगले रीतीनें सुरू झालें आहे. ब्रह्मदेशांतून रु. ८२८२९ चें कथील सन १८९३ सालीं या देशांत आलें. शिसें मद्रास इलाख्यांत कर्नूल जिल्ह्यांत, मुंबई इलाख्यांत पंचमहाल व रेवाकाठ्यांत बंगालइलाख्यांत ३।४ जिल्ह्यांत, मध्यप्रांतांत संबलपूर व रायपूर जिल्ह्यांत, सिमला जिल्ह्यांत, वरचे ब्रह्मदेशांत शान संस्थानांत वगैरे ठिकाणीं सांपडतें. तें काढण्याचें काम अगदीं चालत नाहीं असें आहे. म्यांगानीझ पूर्व किनाऱ्यावर व बेळगांव, धारवाड व रत्नागिरी जिल्ह्यांत व जबलपूर जिल्ह्यांत सांपडतें. विजयानगरचे माहाराजांनीं तें काढून तपासून पाहण्यासाठीं विलायतेसही पाठविलें आहे. तांबें बंगाल, मध्यप्रांत, राजपुताना वगैरे भागांत सांपडतें. बंगाल्यांत सन १८९३ सालीं रु० १३२५०० चें तांबें निघालें. बाकी कोठें किती निघालें याबद्दल माहिती मिळत नाहीं. इतर खनिज पदार्थ या देशांत पुष्कळ सांपडतात परंतु ते काढण्याचें काम चालू नाहीं तेव्हां त्यांचेबद्दल येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

कारखाने.

कापसाच्या गिरण्या—पहिली गिरणी सन १८५१ सालीं मुंबई येथें चालू झाली. सन १८७८ सालीं ५८ गिरण्या होत्या व सन १८९१–९२ सालीं १२७ होत्या. गिरण्यांची वाढ कशी झाली तें पुढील आंकड्यांवरून दिसेल.

गिरण्यांची संख्या.

सन १८७६–७७	४७
१८८१–८२	६२
१८९१–९२	१२७
१८९३–९४	१३६

सन १८९३–९४ सालीं या गिरण्यांत चात्या ३५३८ हजार व माग २९ हजार होते.

या गिरण्यांपैकीं सन १८९३–९४ सालीं मुंबई इलाख्यांत ९४; मद्रास इलाख्यांत ११; कलकत्त्यांत किंवा अगदीं जवळ मिळून ८; वायव्य प्रांतांत ५; पंजाव व दिल्ली येथें एक एक व मध्यप्रांतांत ५ व बाकीच्या इतर ठिकाणीं आहेत. या गिरण्यांतून माल किती होतो हें समजण्यास साधनीभूत माहितीचें पत्रक प्रसिद्ध होत नाहीं. सन १८८० सालचे मानानें पाहतां सूत परदेशांतून पूर्वीपेक्षां शेंकडा १० टक्के जास्त येतें व हिंदुस्थानांतून पूर्वीपेक्षां परदेशांत पांचपट जास्त जातें. कापड पूर्वीचे मानानें परदेशांतून सुमारें सहा टक्के जास्त येतें व या देशांतील कापड पूर्वीपेक्षां सुमारें अडीचपट बाहेर जातें.

जूट (ताग)–जूटचे कारखाने बहुतेक कलकत्ता येथें व बंगाल्यांत कांहीं ठिकाणीं मात्र आहेत. शिवाय कानपूर व विझागापटण येथें अशा दोनच गिरण्या दुसरीकडे आहेत. पहिली गिरणी सन १८५७ सालीं स्थापन झाली, तरी बहुतक गिरण्या सन १८७४ चे पुढील आहेत. या गिरण्यांचे वाढीबद्दल माहिती देतों.

साल	संख्या.
सन १८७६–७७	१८
१८८१–८२	२१
१८८६–८७	२४
१८९१–९२	२७
१८९३–९४	२८

आतां जूट व जूटचें केलेलें कापड परदेशांस जाण्याचें मान पाहतां पूर्वीचे मानानें जूट सुमारें दिढीनें जास्त जातो व जूटचें कापड पूर्वीपेक्षां दुप्पट जातें.

कागदाच्या गिरण्या बंगाल इलाख्यांत व पुणें, लखनौ व ग्वालेर येथें मिळून ८ आहेत व त्यांत भांडवल सुमारें पन्नास लक्ष रुपये आहे. कागदही चांगले निघत चालले आहेत.

लोंकरीच्या गिरण्या कानपूर, धरीवल, बंगलूर व मुंबई येथें आहेत व त्यांतून पोलिसास व एतद्देशिय लष्करास कपडा बराच घेण्यांत येतो.

रेशमाच्या गिरण्या मुंबई व कलकत्ता व पुणें येथें आहेत, व कांहीं लहान लहान कारखाने बंगाल्यांत आहेत. या कारखान्यांतून सन १८७५–७६ सालीं २४६८०५२ यार्ड कापड रु० २३८०००० किंमतीचें परदेशांस गेलें व सन १८८०–८१ सालीं रु० २२०४२२० चा माल गेला व तेथून पुढें दहा वर्षांत सरासरीनें रु० ३३१९२०० चा माल गेला.

इतर कारखाने–सन १८९१-९२ सालीं कापूस दाबण्याचे कारखाने ४००, सोडा-

वाटर वगैरे पेयें करण्याचे कारखाने ७६, नवसागराचे २७४, तांदूळ साफ करण्याचे ५४ व नीळ तयार करण्याचे ५५ असे कारखाने होते.

सन १८८१ व १८९१ सालीं ह्या कारखान्यांतील मजुरांचे सुखाचे व सोईचे संबंधानें कायदे झाले आहेत; त्यांप्रमाणें वायकांस अकरा तासांपेक्षां जास्त वेळ कामावर लावतां येत नाहीं व नऊ वर्षांचे खालील मुलें कामावर लावण्याचें बंद झालें आहे; मुलगा असें चवदा वर्षांचे वयापर्यंत समजण्याचें आहे. मुलास ७ तास कामावर लावण्याचें आहे. याशिवाय मध्यंतरीं विसावा देणें, हवापाणी, स्वच्छता, सुट्टी यांसंबंधानें त्या कायद्यांत नियम आहेत.

या भागांतील विषयाशीं व पुढील भागांतील व्यापाराचे विषयाशीं संबंध असणारा विषय ह्मणजे समाईक भांडवली कंपन्या हा आहे. त्याबद्दल कांहीं माहिती देतों. सन १८९१ सालीं ह्या कंपन्या किती व कोणकोणत्या कामासाठीं झालेल्या होत्या याबद्दल कोष्टक देतों. तुलनेसाठीं सन १८८१–८२ चे आंकडे दिले आहेत.

हिंदुस्थानांत रजिष्टर झालेल्या कंपन्या.	कंपन्यांची संख्या.		कंपन्यांचें भांडवल लक्ष रुपये.	
	१८८१–८२	१८९१–९२	१८८१–८२	१८९१–९२
अ--सुरू असलेल्या.				
(१) व्यांका व विमा उतरणाऱ्या कंपन्या.	१४६	२७३	२१८	३९३
(२) गिरण्या व गठ्ठे दावण्याचे कारखाने.	१००	२४५	६७५	१२०५
(३) खाणीच्या कंपन्या.	१९	५७	७३	१६१
(४) शेतकी व बागाइतीबद्दल कंपन्या.	१२२	१५८	२७९	३७५
(५) व्यापारी कंपन्या.	९५	१६८	१९४	३७९
(६) इतर.	२३	४९	१२५	१४२
बेरीज.	५०५	९५०	१५६८	२६५८

ब---चालू नसलेल्या कंपन्या	२२२	६०२
क--चालू न झालेल्या कंपन्या	४२२	८०८
बेरीज	११४९	२३६०

यावरून सर्व प्रकारचे व्यवहारांत वाढ आहे असें दिसून येईल.

भाग चवदावा.

व्यापार.

या भागांत या देशाचा परराष्ट्रांशीं व्यापार किती होत आहे हें सांगावयाचें आहे. व्यापाराची हकीकत देणें ह्मणजे देशसुधारणेची हकीकत—लोकांच्या गरजा व त्या भागविण्यास वेगळाले कालीं योजलेले उपाय यांची माहिती, देणें होय. कांहीं देशांतील लोकांस शरीरसंरक्षणाव्यतिरिक्त दुसरे प्रकारच्या गरजाच नसतात, व त्यांचा व्यवसाय उपजीविकेचीं साधनें गोळा करणें हाच काय तो असतो. अशा लोकांत सुधारणा होत नाहीं व ती होण्याची त्यांस जरुरीही वाटत नाहीं. इतर कांहीं राष्ट्रें अशीं आहेत कीं, त्यांस उदरपूर्ती-शिवाय इतर पुष्कळ गरजा असतात व त्यांस सुखवैचित्र्य व चैनबाजी यांची अपेक्षा वाटते. देशांच्या गरजा व त्या पुरविण्याचें सामर्थ्य यांवरून त्या देशाचें सुधारणेंत पाऊल किती पडलें आहे हें समजतें. ह्या सर्व प्रकारच्या गरजा भागविण्यास जे पदार्थ लागतात ते सर्वच ज्या त्या देशांत प्राप्य असतात असें नाहीं. उदाहरणार्थ, इंग्लंड देश घ्या—तेथील लोकांस पुरेसें धान्य त्या देशांत उत्पन्न होत नाहीं; परंतु त्या देशाची खनिज संपत्ति फार मोठी आहे व लोक कल्पक, मेहनती व धाडशी आहेत; तेव्हां ते कच्चया मालाच्या जिनसा तयार करून त्या परदेशांत पाठवितात व आपल्यास हवें तें धान्य वगैरे जिनसा परदेशांतून आणवितात. अशीच बहुतेक सर्व देशांची स्थिति असते. अशी जिनसांची अदलाबदल होण्याची ती देशांचे नैसर्गिक स्थितीवर, ह्मणजे त्यांचे जमिनींचा प्रकार व सुपीकपणा, हवापाणी, व्यापारोपयोगी पदार्थांची विपुलता, लोकांची स्थिति, वगैरे कारणांवर अवलंबून असते. ह्या गोष्टींपैकीं कांहीं एका देशास अनुकूल असतात तर कांहीं दुसरे देशास अनुकूल असतात. हे दोन्ही

देश सुधारलेले असल्यास ते त्या जिनसांची अदलाबदल करतात व याप्रमाणें व्यापारास सुरवात होते.

व्यापाराचे जिन्नस तीन प्रकारचे असतात. खनिज, प्राणिवर्गापैकीं व शेतकीनें प्राप्त होणारे. या तीनही प्रकारचे संपत्तीसंबंधानें या देशास कशी अनुकूलता आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. अज्ञान, आलस्य, वगैरे अनेक कारणांनीं या देशांत असलेली खनिज संपत्ती असून नसल्यासारखीच आहे; व तशाच कारणांनीं उद्भिज वस्तु ज्या प्राप्त आहेत त्या तयार करून उपयोगालायख करण्याचेंही फारच कमी प्रमाणावर चालू आहे. तेव्हां हल्लीं या देशाची स्थिति ह्मणजे शेतकी करावी व उत्पन्न होईल त्याची अदलाबदल करून जरूर त्या वस्तु प्राप्त करून घ्याव्या अशीच आहे. या देशांतील शेंकडा ६९ लोक शेतकीवरच उपजीवन करणारे आहेत. हा देशही चांगला सुपीक असून विस्तृत आहे यामुळें भुसारमाल व कापूस वगैरे शेतकीचा माल या देशाहून फार बाहेर जातो. या विषयाचा सर्व दिशांनीं व शास्त्रीय रीतीनें विचार करणें या पुस्तकाचे हेतूबाहेर आहे. व्यापाराची हल्लींची स्थिति कशी आहे ह्मणजे तो किती होतो, कोणते देशांशीं होतो, कोणते जिनसांचा होतो हेंच विशेषेंकरून येथें सांगण्याचें आहे. बराच व्यापार परदेशांशीं जलमार्गानें होतो व त्याबद्दल विशेष माहिती सांगण्यांत येईल. त्यानंतर खुष्कीनें होणारे व्यापाराबद्दलही थोडी हकीकत सांगण्यांत येईल. जलमार्गानें होणारे व्यापाराबद्दल जशी फार दिवसांची व व्यवस्थित अशी माहिती मिळते तशी खुष्कीवरून होणारे व्यापारासंबंधानें मिळत नाहीं. त्या मार्गानें व्यापारही फारसा होत नाहीं.

व्यापाराची वाढ—जलमार्गानें होणारा व्यापार किती होतो व त्याची वाढ कशी होत गेली आहे तें पुढील कोष्टकावरून समजेल. सन १८९१-९२ सालापर्यंत पांच पांच वर्षांची सरासरी दिली आहे व शेवटीं सन १८९१-९२ व १८९३-९४ सालांबद्दलचे आंकडे दिले आहेत.

सालें.	आयात व्यापार. कोटि लक्ष रु०	निर्गत व्यापार. कोटि लक्ष रु०
४०–४१ ते ४४–४५	११–७९	१५–५२
४५–४६—४९–५०	१२– ४	१७–११
५०–५१—५४–५५	१६– ६	२०–४
५५–५६—५९–६०	३२–२	२७–५८
६०–६१—६४–६५	४२–८४	५१–२८
६५–६६—६९–७०	४८—७१	५४—४७

	आयात व्यापार.	निर्गत व्यापार.
७०-७१—७४-७५	४०—७९	५८—७३
७५-७६—७९-८०	४९—९१	६५—३८
८०-८१—८४-८५	६५—१६	८३—४
८५-८६—८९-९०	७८—५४	९४—२८
१८९१-९२	९४—१५	१११—४६
१८९३-९४	९५—४८	११०—६१

यांत खासगी व्यापार, व सरकारासाठीं आणलेला माल सोनें, रुपें, हे सर्व येतात.

व्यापारावर परिणाम घडवून आणणाऱ्या गोष्टी.

या व्यापाराचे वाढीचा विचार करतांना त्यांचेवर परिणाम घडवून आणणाऱ्या कांहीं गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या झाल्या आहेत त्यांबद्दल थोडी माहिती दाखल करतों.

१८६२—६९ अमेरिकेचे लढाईमुळें कापसाचा व्यापार फार वाढला.

१८६९—सुएझचा कालवा सुरू झाला.

१८७०—७१ मुंबई, कलकत्ता व लाहोर यांचे दरम्यानच्या आगगाडीचा रस्ता पुरा झाला.

१८७२—७३ कापूस परदेशास रवाना होत असे तो फार कमी होण्यास सुरवात झाली.

१८७३—७४ परदेशास जाणारे गव्हावरील जकात माफ झाली.

१८७४—७५ निजामाचे रेल्वेचा पहिला भाग सुरू झाला.

१८७५—७६ या देशांत येणारे कापसाचे कापडावरील जकात माफ झाली.

१८७६—७७ }
१८७७—७८ } दक्षिण भागांत दुष्काळ पडला.

१८७७—७८ ब्रह्मी रेल्वेचा पहिला भाग सुरू झाला.

१८७८—७९ सिंधूचे खोऱ्यांतील आगगाडी सुरू झाली.

१८७९—८० देशांतील व्यापारासंबंधी कस्टम जकाती माफ झाल्या.

१८८०—८१ राजपुतान्यांतील आगगाडी सुरू झाली.

१८८१—८२ आयात मालावरील जकात माफ झाली. मार्च १८८२.

१८८६—८७ ब्रह्मदेशांतील रेल्वे जास्त वाढली.

१८८८—८९ निजामाची रेल्वे पुरी झाली.

१८८९—९० इंडियन मिडलंड रेल्वे पुरी झाली.
१८९०—९१ बंगाल-नागपूर रेल्वे पुरी झाली.
१८९३—९४ टांकसाळी बंद झाल्या.
१८९४—९५ आयात मालावर जकाती बसल्या व देशांत तयार झालेले कापसाचे मालावर कर बसला.

आयात मालावरील जकातीसंबंधानें पूर्वी हकीकत दिलीच आहे.

नाण्याचे बाबतींतील अलीकडील फक—टांकसाळी बंद झाल्या त्याचे संबंधानें थोडी माहिती देणें अवश्य आहे ती देतों. या देशाचा व्यापार ज्या देशांशीं होतो त्यांपैकीं कांहीं देशांत सोन्याचें नाणें चालू आहे व कांहीं देशांत रुप्याचें नाणें चालू आहे. कांहीं देशांत या दोन्हीही धातूंचीं नाणीं (त्यांचे किमतींतील प्रमाण ठरवून ठेवून त्याप्रमाणें) चालण्याचा ठराव आहे; परंतु आतां त्या देशांत रुप्याचें नाणें पाडण्याचें बंद झाल्यानें ते देशही वस्तुतः सोन्याचें नाणें चालविणारेच झाले आहेत. कांहीं वर्षांपूर्वी सोन्याची व रुप्याची जी किंमत होती त्या मानानें रुपया ह्मणजे दोन शिलिंग, किंवा पौंडाचा दहावा भाग असे किमतीचा होता. हल्लीं सोन्याचे मानानें रुप्याचा भाव कमी झाल्यामुळें रुपयाची किंमत सुमारें एक शिलिंग व एक पेनी जवळ जवळ आली आहे, ह्मणजे बहुतेक निम्यावर आली आहे. याप्रमाणें या दोन धातूंचे किमतींत अंतर पडून रुप्याची अर्थात रुपयाची किंमत कमी होत जाण्यास सुरुवात सन १८७२ पासून झाली. विलायतेस सोन्याचें नाणें पहिल्यापासून होतेंच ; परंतु युरोपांतील इतर देशांत अलीकडेपर्यंत रुप्याचें नाणें चालू असल्यामुळें त्या धातूची किंमत चांगली टिकत होती. त्या सालानंतर यूरोपांतील बहुतेक मोठाले देशांत सोन्याचें नाणें सुरू झालें आहे. जर्मनी, स्वीडन, नार्वे या देशांनीं सन १८७३ सालीं रुप्याचें नाणें बंद करून सोन्याचें नाणें चालू केलें. फ्रान्स वगैरे देशांत, दोन्ही धातूंच्या ठरीव प्रमाणानें किमती धरून, दोन्ही धातूंचीं नाणीं चालू होतीं व आहेत, परंतु त्याही देशांनीं रुप्याचीं नाणीं पाडण्याचें बंद केलें. पूर्वी युनायटेड स्टेट्स्‌मध्यें कागदी नाणें असे व त्याचे बदली सरकारांतून रोख पैसे मिळत नसत ; परंतु त्याही देशानें दोन्ही नाणीं चालू ठेवण्याचें बंद केलें. इतर देशांनींही याच क्रमाचें अवलंबन केलें, त्यामुळें बरेच देशांत रुप्याचा खप कमी झाला व त्याची किंमत सोन्याचे मानानें फार उतरली.

या हिंदुस्थान देशांतील नाणें रुप्याचें, व ज्या देशांशीं व्यवहार करावयाचा त्यांपैकीं बरेच देशांत नाणें सोन्याचें, असें झाल्यानें व रुप्याची किंमत उतरल्यानें या देशाहून इतर देशांस ऐवज़ पाठविण्यास पूर्वीपेक्षां आतां जास्त खर्च

लागतो. हिंदुस्थानासंबंधानें विलायतेस राज्यव्यवस्थेचा व इतर खर्च आहे त्यासाठीं हिंदुस्थानसरकारास पुष्कळ ऐवज तिकडे पाठविण्याचा असतो, तेव्हां त्यांसही या नाण्याचे भावांतील चलविचलीमुळें खर्च जास्त लागत आहे. आज एक, उद्यां एक, असा रुप्याचा भाव चलविचलीचा व नेहमीं उतरत जाणारा असा झाल्यामुळें व्यापाराची स्थिति फार अनिश्चित झाली व त्यांत नुकसानही होऊं लागलें. या देशांत लष्कराशिवाय इतर खात्यांत नौकरीसंबंधानें इंग्रज लोक आहेत त्यांस पगार रुप्याचे नाण्यांत मिळतो; या लोकांस खर्चासाठीं बराच पैसा नेहमीं विलायतेस पाठवावा लागतो व शिल्लक राहील तीही विलायतेसच पाठविण्याची असते, तेव्हां हे पैसे पाठवितांना त्यांचें नुकसान होऊं लागलें. असे प्रकारें रुप्याचे नाण्याचे भावांतील फेरबदलामुळें फार लोकांची अडचणीची स्थिति होऊन गेली.

ही स्थिति सुधारण्यासाठीं हिंदुस्थानसरकारांनीं विलायतसरकारास असे उपाय सुचविले कीं, लोकांस टांकसाळींतून रुप्याचें नाणें पाडून देण्याचें बंद करावें व जें नाणें पाडावयाचें तें सरकारांनीं रुपें विकत घेऊन पाडावें; टांकसाळींत सोन्याचें नाणें पाडावयाचें सुरू करावें व लोकांनीं सोनें आणलें तर त्याचें नाणें त्यांस पाडून द्यावें; सोन्याचें नाणें देवघेवीसाठीं कायदेशीर आहे असें ठरवावें; हीं सोन्याचीं नाणीं एक दहा रुपयांचें व एक वीस रुपयांचें अशीं पाडावीं; सोन्याचे व रुप्याचे नाण्यांच्या किंमतीचें परस्पर प्रमाण सरकारांनीं ठरवावें; तूर्त विलायतेंत चालू असलेल्या सोन्याचे नाण्यांची किंमत अमुक रुपये अशी सरकारांतून ठरवून तीं या देशांत व्यवहारांत घेणें कायदेशीर करावें, वगैरे. इकडे सोन्याचें नाणें पाडण्याचें सुरू करणें तें टांकसाळी बंद केल्यापासून कसा परिणाम होतो तें पाहून नंतर सुरू करावें, असेंही हिंदुस्थानसरकारांनीं सुचविलें होतें. ही सर्व व्यवस्था सोन्याचें नाणें सुरू करण्यासाठींच झालेली आहे. हें नाणें एकदम सुरू करणें तें सरकाराजवळ सोन्याचीं नाणीं किंवा तीं पाडण्यास पुरेसें सोनें नसल्यानें शक्य नव्हतें. तेव्हां तो हेतु साधण्यास अवश्य जी पहिली गोष्ट, ह्मणजे सोन्याचे मानानें रुप्याचे नाण्याची किंमत ठरवून तें चालू करणें हें हिंदुस्थानसरकारांनीं पतकरलें, व त्याप्रमाणें करण्यास विलायतसरकारची परवानगी मागितली.

याप्रमाणें हिंदुस्थानसरकारांनीं सूचना केल्या, तेव्हां त्यांचे विचारासाठीं हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरींनीं एक अर्थशास्त्रज्ञांची कमिटी नेमली. त्या कमिटीचे लार्ड हर्शेल, विलायतेंतील मुख्य न्यायाधीश हे चेअरमन होते. या कमिटीनें या विषयाचा सर्व प्रकारें विचार करून हिंदुस्थानसरकारांनीं सुचविलेली व्यव-

स्था करण्यास हरकत नाहीं असा अभिप्राय दिला; व त्या सूचनांत दुरुस्ती करण्यास सुचविली ती अशी कीं, टांकसाळींतून लोकांस चांदी घेऊन रुपये पाडून देण्याचें बंद केलें तरी, सोनें आणलें तर रुपयाची एक शिलिंग चार पेन्स अशी किंमत धरून त्याचेबदली रुपये द्यावे; व त्याच प्रमाणानें सरकारी देण्याऐवजीं सोनें सरकारी खजिन्यांत घेण्यास परवानगी असावी. ही दुरुस्ती करण्याचें हिंदुस्थानसरकारांनीं कबूल केल्यावर त्यांच्या सूचना अमलांत आणण्यास स्टेटक्रेटरींनीं परवानगी दिली व त्याप्रमाणें २६ जून १८९३ रोजीं कायदा झाला.

हा कायदा होईपर्यंत रुपयाची किंमत त्यांत असलेले रुप्याचे मानानें असे, ती स्थिति या नवीन सुरू केलेले व्यवस्थेनें पालटली व रुपयास एक विशेष प्रकारची कृत्रिम किंमत आली. पूर्वीप्रमाणें वाटेल त्यास टांकसाळींत रुपये पाडून मिळत नसलेमुळें, हल्लीं जे रुपये पडलेले आहेत तेच काय ते चालू राहाणार; मागणी असेल त्या मानानें मालाचा पुरवठा नसला ह्मणजे त्या मालाची किंमत चढते असा नियम आहे, त्याप्रमाणें रुपये पाडण्याचें बंद झालें व हल्लींप्रमाणें त्यांची जरूर कायम राहिली किंवा जास्त वाढली ह्मणजे, अर्थातच गरजेपेक्षां रुपयांची संख्या कमी पडून ते मिळत नाहींतसे होतील, व तसें झालें ह्मणजे रुपयाची किंमत वाढेल व ती त्यांत असलेले रुप्याचे मानानें जी किंमत असण्याची त्यापेक्षां जास्त होईल. रुपयाची किंमत जास्त झाली ह्मणजे सोन्याचे व रुप्याचे दरम्यान किंमतींत जें अंतर आहे तें कमी होईल व सोन्याचें नाणें चालू असलेले देशांस ऐवज पाठविणें झाल्यास पूर्वीचे मानानें कमी रुपये पाठवावे लागतील. अशी स्थिति व्हावी या विचारानेंच हिंदुस्थानसरकारांनीं वर सांगितल्याप्रमाणें नाण्याची किंमत बदलण्याचा प्रयत्न केला.

ही व्यवस्था करण्याचे हेतु (१) रुप्याचे नाण्याची किंमत बदलण्याचें बंद करावें; (२) रुप्याचा भाव उतरण्याचें बंद करावें; (३) सोनें देशांत जास्त येईल असें करावें, असे होते. ज्या भावी स्थितीवर नजर ठेऊन हा खटाटोप केला ती स्थिति अजून तरी, पहिल्यानें जितके प्रमाणानें होईल असा अजमास केला होता तितके प्रमाणानें, झालेली नाहीं. पुढें ती स्थिति येईल किंवा नाहीं याबद्दल अजूनही कांहीं लोकांस शंकाच आहे. रुपयाची किंमत जशी उतरली असती तशी ही व्यवस्था अमलांत आल्यानें, ती उतरण्याचें बंद झालें असें सरकारतर्फे व सदरचे व्यवस्थेस अनुकूल असलेले लोकांचें ह्मणणें आहे. हा विषय शास्त्रीय असून फार गहन आहे व उभयपक्षांचें मतांतर पूर्वीपेक्षां कांहीं कमी झालें असें नाहीं, तेव्हां या पुस्तकाचे सरणीस अनुसरून दिलेलें वर्णन

पुरें आहे असें वाटतें. ही व्यवस्था सुरू करते वेळींच तिचेपासून परिणाम कसा होईल याबद्दल हवाला भविष्यकाळीं येणारे अनुभवावर दिलेला होता व पुरा अनुभव येण्यास पुरेसा काल अजून गेला नाहीं हें खरें आहे.

या कायद्याप्रमाणें टांकसाळींत लोकांस नाणें पाडून देण्याचें बंद केल्यावर हर्शेलकमिटीचे सूचनेप्रमाणें टांकसाळींत सोनें आणून दिलें तर, दररुपयाची किंमत १६ पेन्स धरून त्याचे किंमतीचे रुपये मिळतील व पंधरा रुपयांबद्दल एक पौंड व साडेसात रुपयांबद्दल अर्धा पौंड सरकारी देण्यांत घेत जावा असे जाहिरनामे काढण्यांत आले. हा कायदा झाल्यावर लागलीच रुपयाची किंमत १६ पेन्सपर्यंत चढली, परंतु ही किमतींत वाढ व्यवहाराचे खरे स्थितीस अनुसरून झाली नसल्यामुळें फिरून रुपयास उतरती कळा लागली.

सरकारचे अजमासाप्रमाणें रुपयाची किंमत पूर्वींपेक्षां वाढली नाहीं. रुपयाची किंमत न वाढण्यास हा कायदा झाल्यावर कांहीं विशेष कारणें झालीं. कायदा झाल्यानंतर रुपयाची किंमत कांहीं दिवस जी चढली होती तिचा फायदा घेण्यासाठीं व्यापाऱ्यांनीं परदेशी माल भराभर आणण्यास सुरवात केली व सन १८९१--९२ सालीं माल कमी आला होता त्यामुळें त्या मालाचा खपही बराच झाला. रुपयाची किंमत उतरूं लागल्यावरही पुढें ती फारच उतरेल या भीतीनेंही तो माल आणण्याचा क्रम (१८९३--९४ अखेरपर्यंत) तसाच कायम राहिला. सन १८९३--९४ सालीं पूर्वीचे सालापेक्षां शेंकडा १८ टक्के माल जास्त आला होता. त्या सालीं सोनेंही पूर्वीचे सालापेक्षां पुष्कळ जास्त आलें. तसेंच रुपेंही जास्त आलें. हर्शेलकमिटीनें टांकसाळींत रुपये पाडण्याचें बंद करण्याचें पसंत केलें आहे ही बातमी इकडे कायदा करण्याचेपूर्वीं पुष्कळ दिवस युरोपांत पसरली होती, व त्यामुळें कायदा होऊन अमलांत येण्याचेपूर्वीं रुपये पाडून घेण्यास सांपडावें ह्मणून व्यापाऱ्यांनीं पुष्कळ चांदी हिंदुस्थानांत पाठविली. कायदा झाल्यानंतर रुपयाचे मानानें चांदी स्वस्ती मिळूं लागली तेव्हां, लोकांनीं त्या स्वस्ताईचें खरें स्वरूप न जाणतां नुसते स्वस्ताईसच भुलून ती फार खरेदीही केली व ही स्थिति सन १८९३-९४ चे अखेरपर्यंत चालू होती. या गोष्टीचा परिणाम असा झाला कीं, व्यापाऱ्यांस चांदीचे खपामुळें मालखरेदीसाठीं जे रुपये पाहिजे होते ते लोकांकडून मिळूं लागले व त्यामुळें स्टेटसेक्रेटरीचे बिलांस खप नाहींसा झाला. तीं बिलें घेण्याचे ऐवजीं व्यापारी लोक चांदीच पाठवूं लागले. हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरीचीं बिलें व्यापारास कसे प्रकारानें अवश्यक आहेत तें, याच भागांत पुढें " व्यापाराची बाकी " यासंबंधानें माहि-

ती देतेवेळीं सांगण्यांत येईल. याप्रमाणें नेहमींपेक्षां जास्त माल येण्यानें व रुपें अतिशय येण्यानें हिंदुस्थानसरकारांनीं अजमास केल्याप्रमाणें रुपयाची किंमत चढली नाहीं. आयात मालपेक्षां निर्गत माल जास्त होऊन त्याबद्दल पैसा पाठविण्याचा जेव्हां प्रसंग येईल तेव्हांच रुपयाची किंमत चढण्याची संधी येणार; ती संधी आयात माल जास्त आल्यानें आली नाहीं. याशिवाय आणखी एक कारण झालें तें असें कीं, हा कायदा अमलांत आला तो व्यापाराचा मोसम नसतांना ह्मणजे पावसाळ्यांत आला व परदेशी माल जाण्याचें त्या दिवसांत बंद असल्यानें व्यापाऱ्यांस इकडे ऐवज पाठविण्याची जरूर लागली नाहीं. पुढें स्टेटसेक्रेटरींनीं आपलीं बिलें अमुकच भावानें मिळतील असें ठरविल्यानें, व्यापाऱ्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें इकडे जास्त माल व चांदी पाठवून आपली गरज भागवून घेतली. अमुकच दरानें बिलें विकण्याचें सन १८९४ चे जानेवारींत बंद झालें व तेव्हांपासून व्यापाराचे क्रमानें व त्याचे गरजेचे मानानें रुपयाची किंमत स्थिर होत चालली आहे व ती कितीही कमी असली तरी त्यांतील चांदीचे किमतीपेक्षां कांहीं जास्त असते.

रुपयाची किंमत त्यांतील चांदीचे किंमतीपेक्षां जास्त झाल्यानें चांदीचें नाणें ज्या देशांत चालू होतें अशा चीन वगैरे देशांबरोबर जो या देशाचा व्यापार होतो त्यास, हा कायदा झाल्यावर कांहीं मुदतपावेतों फारच हिसका बसला. नवीन व्यवस्था झाल्यानें रुप्याचें नाणें चालू असणारे देशांबरोबर जो व्यापार होतो त्यांत गडबड होईल असा पूर्वींच कयास झाला होता. तशी स्थिति कांहीं दिवस टिकली, परंतु पुढें नवीन स्थितीचे मानानें मालाच्या किंमती ठरून गेल्यावर पूर्वींप्रमाणें व्यापार चालूं लागला आहे, असा मि० ओकानरसाहेबांनीं अभिप्राय दिला आहे.

चांदीचा भाव उतरल्यामुळें हिंदुस्थानचा व्यापार वाढला असें प्रतिपादन केलेलें वारंवार दृष्टीस पडतें. या मंडळींचें ह्मणणें असें आहे कीं, या देशांतील मालाची सोन्याचे मानानें जी किंमत आहे तिचेबद्दल पूर्वीं जितके रुपये येत असत त्यांचेपेक्षां आतां जास्त रुपये येतात, त्यामुळें इकडील व्यापाऱ्यांस माल स्वस्त विकण्यास सांपडतो व शेतकऱ्यांसही जास्त किंमत मिळते, व याचा परिणाम असा होतो कीं त्यापासून व्यापार वाढतो इतकेंच नाहीं तर मालही जास्त तयार होतो. ह्या प्रतिपादनाची अयथार्थता मि. ओकानर यांनीं सन १८८६ सालीं सिद्ध करून दिली आहे. पूर्वीं मालास ज्या किमती येत असत तशा आतां परदेशांत येत नाहींत. तेव्हां चांदीचा भाव उतरल्यामुळें जो कांहीं

फायदा होतो, त्याचे मोबदल्यांत मालास कमी किंमत येते ही तोट्याची बाब जाते, व व्यापारांत या कारणामुळें कांहीं फायदा रहात नाहीं.

व्यापाराचे वृद्धीचें मान.—आयात व निर्गत व्यापाराची वृद्धि झाली आहे, त्यांत आयात व्यापार ज्या प्रमाणानें वाढला आहे त्या प्रमाणानें निर्गत व्यापार वाढला नाहीं. सन १८४१–४२ सालीं आयात व्यापार ९ कोटी ६३ लक्ष रुपयांचा झाला, व सन १८९१–९२ सालीं ८४ कोटी १५ लक्षांचा झाला, ह्मणजे वाढ पावणेनऊपट झाली आहे. निर्गत व्यापार सन १८४१–४२ सालीं १४ कोटी ३४ लक्ष रुपयांचा झाला व सन १८९१–९२ सालीं १११ कोटी ४६ लक्ष रुपयांचा झाला, ह्मणजे वाढ पावणेआठपट झाली आहे. या रकमेंत सोनें व रुपें यांचा समावेश आहे. अलीकडे सोनें व रुपें यांचा व्यापार सव्यासारखा झाला आहे, तेव्हां व्यापाराची खरी वाढ पाहण्यास ते जिन्नस सोडून खरे व्यापारी मालांत वाढ कशी झाली आहे तें पाहिलें तर, आयात मालाची वाढ जवळ जवळ नऊपट पडते व निर्गत मालाची वाढ ७ $\frac{८}{१०}$ पडते असें दिसतें.

ही वाढ होण्यास जीं कारणें झालीं आहेत त्यांपैकीं कांहीं मुख्य मुख्य येथें देतों. (१) यंत्रांत सुधारणा व वाफेच्या शक्तीचा यंत्रें चालविण्याकडे उपयोग. ह्यापासून श्रम व वेळ कमी लागतो व माल कमी खर्चांत तयार होतो. (२) सुएझचा कालवा सुरू होणें. हा कालवा सुरू झाल्यानें यूरोप व एशिया यांचे दरम्यान जाण्यायेण्यास अंतर कमी झालें आहे व त्यामुळें प्रवासास श्रम व वेळ हीं कमी लागतात. (३) गलबतें जाऊन त्यांचे बदली आगबोटी सरू होणें. यामुळें प्रवास लवकर होऊन नियमानें होतो. (४) या दोन कारणांमुळेंच माल नेण्याआणण्याचें भाडेंही कमी झालें आहे. ही व्यापारास सोयच झाली आहे. (५) अप्रतिहत व्यापाराचीं तत्वें या देशांत अमलांत येणें. (६) आगगाड्यांची वृद्धि. याबद्दल माहिती पब्लिक वर्क्सचे भागांत येईल. (७) परकीय भांडवल या देशांत येऊन नवीन धंदे सुरू होणें–उदाहरणार्थ चहा, काफी वगैरेंची लागवड. याप्रमाणें व्यापारवृद्धीस कारणीभूत झालेल्या मुख्य गोष्टी आहेत. या व्यापारवृद्धीपासून देशावर परिणाम कसे झाले आहेत त्यांबद्दल देशस्थितीचे भागांत सांगण्यांत येईल.

व्यापाराचीं मुख्य बंदरें—कलकत्ता.–जलमार्गानें होणारा व्यापार मुख्यत्वेंकरून कलकत्ता, मद्रास, मुंबई, कराची व रंगून या बंदरांतून चालतो. हिंदुस्थानाचा समुद्रकिनारा नऊ हजार मैलांपेक्षां जास्त आहे व त्याचे कांठीं बंदरेंही तीन साडेतीनशें आहेत; तरी व्यापार सदरचे पांच बंदरांशींच मुख्यत्वेंकरून होतो.

हीं बंदरेंही ज्या प्रांतांत आहेत त्या प्रांतांचा परदेशाशीं व्यापार चालण्यास तीं मोठीं योग्य अशीं ठिकाणें आहेत. कलकत्ता शहर हें बंगालचा व्यापारी माल ज्या जलमार्गानें जातो येतो त्या जलमार्गाचे तोंडाशीं असल्यानें, त्या प्रांतांतील माल परदेशीं जाण्यास किंवा परकीय माल देशांत पाठविण्यास मोठें सोईचें आहे ; तसेंच त्याच शहरांत त्या प्रांतांतील आगगाड्यांचे रस्ते येऊन मिळतात. गंगा नदींत नौकानयनास फार अडचणी होत्या, ही एक या बंदराची उणीव होती, परंतु नदीचे मार्गाची पाहणी झाल्यानें व मार्ग दाखविण्यासंबंधानें बंदोबस्त चांगला झाल्यानें ती उणीव आतां दूर झाल्यासारखी आहे. बंदरांतील व्यवस्थाही पोर्टट्रस्टाकडून चांगली ठेवली जात असून माल चढावणें व उतरणें फार सोईचें झालें आहे.

मुंबई–या बंदराचे बरोबरीचें दुसरें बंदर ह्मणजे मुंबईचें आहे व या दोन बंदरांतूनच बहुतेक व्यापार होतो. कलकत्त्याचे बंदरांतून पूर्वी माल देशाचे जास्त भागास पुरविण्यांत येत होता, तितका विस्तृत भाग मुंबईचे बंदरास नव्हता; परंतु आतां मध्यहिंदुस्थानांतील व बंगाल–नागपूर रेलवे झाल्यानें मुंबई बंदरास जास्त प्रांत मिळाला आहे. या बंदरांत दक्षिण व वायव्य प्रांतांतून आगगाडीचे रस्ते येऊन मिळतात. मुंबईचे बंदरांतून कापूस, गहूं व गळितांचीं धान्यें वगैरे माल विशेष जातो; कलकत्त्याचे बंदरास हा माल असूनही शिवाय तीळ, चहा, जूट (ताग), तांदूळ, कातडीं, रेशीम व साखर वगैरे माल आहे. अफूही दोन्ही बंदरांतून जाते. मुंबई बंदरांत पुष्कळ माल येऊन तो फिरून परदेशास रवाना होणारा असा असतो, यामुळें या बंदराचा आयात व्यापाराचा आंकडा थोडा जास्त फुगलेला दिसतो. हें बंदर दुसरे प्रकारानेंही फार महत्वाचें आहे व तें महत्व वाढत जाणारें आहे. हें बंदर परदेशीं व विशेषतः युरोपास जाणारे येणारे लोकांचें चढण्याउतरण्याचें मुख्य ठिकाण झालें आहे, व विलायतेचे टपालाच्या व माणसें नेणाऱ्या आगबोटी याच बंदरांतून जातात येतात; तेव्हां मुंबई बंदर हें हिंदुस्थानचें महाद्वारच झालें आहे व त्या दृष्टीनें तें फार उत्कृष्ट व सोईचें ठिकाण आहे.

मद्रास—मद्रास हें व्यापाराचे संबंधानें मोठें महत्वाचें बंदर नाहीं व तें मोठें सोईचेंही नाहीं. मुंबई व बंगाल या प्रांतांतील व्यापार जसा इलाख्याचे मुख्य शहराचे बंदराबरोबरच होतो तशी मद्रासची स्थिति नाहीं. टुटिकोरिन, कोकंडा, मंगलोर, कालिकत वगैरे बंदरांतही पुष्कळसा व्यापार होतो.

रंगून—रंगून बंदर गेले वीस वर्षांपासून फार महत्वास येत चाललें आहे; तें इरावतीचे कांठीं आहे व त्या नदीचे मार्गानें वरचे ब्रह्मदेशांतून व पेगू प्रांतां-

तून माल या बंदरांत येतो. आगगाडीनेंही माल येण्यास सोय जास्त झाली आहे. विलायती माल या प्रांतांत ह्या बंदरांतूनच जातो. ब्रह्मी लोक चैनी व सुखाभिलाषी असल्यानें विलायती माल वापरण्याकडे, इतर प्रांतांतले लोकांपेक्षां, त्या लोकांची प्रवृत्ती जास्त आहे. **कराची** बंदरही उत्तरोत्तर महत्वास येत आहे.

वेगळाले प्रांतांतून किती माल परदेशीं जातो व किती या देशांत येतो हें दाखविण्यासाठीं कोष्टक पुढें दिलें आहे. या प्रांतांत प्रत्येकीं बहुतेक एक–एकच महत्वाचें बंदर आहे, तेव्हां या कोष्टकावरून वर सांगितलेले बंदरांचे महत्वाचीही कल्पना होण्यासारखी आहे. आंकडे लाख रुपयांचे आहेत.

प्रांत.	१८७१–७२	१८८१–८२	१८९१–९२	१८९३–९४
बंगाल.				
—आयात.	१९५०	२२३६	२८७०	३१०३
—निर्गत.	२७८४	३४२८	४०२१	४२२६
मुंबई.				
—आयात.	१७२७	२७१५	३६७७	४५०१
—निर्गत.	२५८४	३२२५	४३३०	४२२६
मद्रास.				
—आयात.	३५७	४२१	६२२	६२३
—निर्गत.	७२९	७८४	१०१८	११७७
ब्रह्मदेश.				
—आयात.	१४३	३३४	५२२	५२७
—निर्गत.	२८०	६५७	१००८	७३१
कराची.				
—आयात.	४०	१२३	४०८	४८१
—निर्गत.	८०	२०४	७३७	६८५

हे जे आंकडे दिले आहेत त्यांत व्यापारी माल सोनें व रुपें हीं येतात, सरकारांतून जो स्टोराचा माल येतो तो त्यांत येत नाहीं. या पांच बंदरांबरोबर एकंदर व्यापारापेकीं ९४ टक्के व्यापार होतो.

व्यापार कोणते देशांबरोबर होतो—या देशांचा पुष्कळ देशांशीं व्यापार होतो व त्या संबंधानें आतां कांहीं माहिती द्यावयाची आहे. प्रथमतः कोणते देशांशीं किती व्यापार होतो याची साधारण कल्पना येण्यासाठीं कांहीं मोठे देशांचे संबंधानें आयात व निर्गत मालाचे किंमतीचे सन १८९३-९४ सा-

लाचे आंकडे देतों. तसेंच गेले २०।२२ वर्षांत त्या त्या देशांबरोबरील व्यापारांत किती वाढ किंवा कमीपणा झाला आहे तें दाखविण्यासाठीं सन १८७१-७२ सालाबद्दलचे आंकडे दाखल करतों.

देशाचें नांव.	आयात माल.		निर्गत माल.	
	हे आंकडे	लक्ष रुपयांचे	आहेत.	
	१८७१-७२	१८९३-९४	१८७१-७२	१८९३-९४
युनायटेड किंग्डम.	३२४५	५२००	३३०२	३४६४
आस्ट्रिया.	१२	१३७	१०५	२९४
बेल्जियम.	—	२०५	२०	५७२
फ्रान्स.	५५	११३	४९७	१०६९
जर्मनी.	३	१७१	३५	७६४
इटली.	११	४४	११३	३५७
रशिया.	—	१२६	३७	६६
ईजिप्त.	४	१७	—	३७२
मारिशस.	५६	१७८	६४	१३३
युनायटेड् स्टेट्स्.	७	२०१	२३१	३३५
सिलोन.	१०८	६९	२०८	३२२
चीन.	४०१	३५४	१३९४	१०९८
जपान.	१	२५	—	१४१
इराण.	८५	७३	१३६	१८३
स्ट्रेट्स् सेटलमेंट.	८८	२५२	२१५	४८४
तुर्कस्थान. (एशियांतील.)	--	४४	३	७०

व्यापाराचे मार्ग–सुएझचा कालवा–सन १८६९ सालीं सुएझचा कालवा सुरू झाला; तापर्यंत पश्चिमेकडील देशांशीं व्यापार केप आफ् गुडहोप मार्गानें होत असे व बहुतेक माल प्रथमतः विलायतेस जाऊन तेथून इतर देशांस रवाना होई. हा कालवा झाल्यापासून युरोपाशीं होणारे व्यापाराची दिशा पालटली. प्राचीन काळीं या देशांतून युरोपखंडांत माल जाई तो तीन मार्गांनीं जात असे. एक मार्ग–पश्चिम किनाऱ्यानें इराणचे अखातांतून येऊन बसऱ्यास येई व तेथून तैग्रिस नदींतून बगदाद येथें जाऊन, तेथून जमिनीवरून भूमध्य समुद्राचे किनाऱ्यावर जाऊन पुढें व्हेनिस व इटली देशांस जाई. दुसरा मार्ग–बगदादचे वर तैग्रिस नदीनें जाऊन नंतर फुटे व तेथून काळ्या समुद्रास जाऊन त्यांतून पुढें ग्रीस

देशास प्रदक्षिणा घालून पुढें वर सांगितलेले रस्त्यास मिळून इटलीस जाई. या दोन्ही मार्गांत मध्यावर बगदाद हें मोठें व महत्वाचें शहर होतें. तिसरा मार्ग– समुद्रांतून एडन येथें येई, तेथून खुष्कीनें वालुकामय मैदानांतून नील नदीस जाऊन मिळे व तेथून पुढें केरो व अलेग्झांड्रिया येथें जाऊन, तेथून समुद्रानें इटलीस जाई. युरोपांत तुर्कांचें आगमन झाल्यावर ह्या मार्गांनीं व्यापार चालण्यास हरकती होऊं लागल्या होत्या; पुढें पोर्तुगीझ लोकांस हिंदुस्थानांत येण्यास केप आफ गुडहोपचा मार्ग मिळाल्यावर सदरचे मार्ग बंद पडले. पूर्वीं हे मार्ग चालू असतांना भूमध्य समुद्रांतील बंदरांशीं या देशाचा व्यापार होत असे, व तसा सुएझचा कालवा चालू झाल्यानंतर फिरून चालू झाला व युरोपीय देशांचें या देशांशीं प्रत्यक्ष दळणवळण चालू झालें. हा प्रत्यक्ष व्यापार चालू झाल्यापासून विलायतेचे मार्फत जो पूर्वीं व्यापार होत असे तो कमी होत गेला आहे. हा कालवा झाल्यापासून माल जाण्याचे मार्गांतच काय तो फरक झाला आहे, व्यापाराचे प्रकारांत फारसा फरक झाला नाहीं.

एकंदर मालापैकीं सुएझचे कालव्यांतून किती माल जातो तें दाखविण्यासाठीं शेंकड्याचे प्रमाणाचे आंकडे पुढें देतों.

१८७५-७६	५४·२३
१८८१-८२	६१·३९
१८९१-९२	८६·९१
१८९३-९४	७०.५७

यावरून एकंदर व्यापारापैकीं पाऊणपटीपेक्षां जास्त व्यापार या मार्गानें होतो असें दिसतें.

युनायटेड् किंग्डम—वरील कोष्टकांत महत्वाचे संबंधानें प्रधान स्थान विलायतेचें आहे. सन १८९३-९४ सालीं या देशांत एकंदर जो माल आला त्यापैकीं शंभरांत सत्तर भाग विलायतेंतून आला व गेलेले मालापैकीं ३२ टक्के माल याच देशास गेला. एकंदर व्यापारांत ज्या प्रमाणानें वाढ झाली त्या प्रमाणानें या देशाशीं होणारे व्यापारांत वाढ झाली नाहीं. असें होण्यास अनेक कारणें झालीं आहेत. या देशाचा विलायतेशीं जो निकट संबंध आहे त्यामुळें, व पूर्वी नौकानयनासंबंधीं जे कायदे होते त्यांमुळें, व ईस्ट इंडिआ कंपनी दुसऱ्या देशांस या देशाशीं व्यापार करण्यास हरकती आणीत असे त्यामुळें, सुएझचा कालवा होईपर्यंत या देशाचा माल युरोपांतील इतर देशांस विलायतेचे मार्फतच मिळत असे. त्या वेळीं व्यापार केप आफ गुडहोप मार्गानें चालत असे, तेव्हां युरोपाशीं व्यापार विलायतेचे मार्फत होणें एक प्रकारानें रीतीचेंच होतें. तो

कालवा झाल्यापासून या व्यापाराची दिशा पालटली, व व्यापार पूर्वींचे मार्गानें फिरून होऊं लागला.

विलायतेशीं होणारे व्यापाराची वाढ गेले वीस वर्षांत कशी झाली तें खालील आंकड्यांवरून दिसेल. आंकडे कोटि रुपयांचे आहेत.

	१८७१–७२	१८८१–८२	१८९१–९२	१८९३–९४
आयात माल—	३२	३८	४८	५२
निर्गत माल—	३३	३४	३६	३४

हिंदुस्थान देशास कापड, धातू, यंत्रें, कोळसा, वगैरे जो माल लागतो तो पुरविण्याचें सामर्थ्य इंग्लंड देशासच आहे, तो माल पुरवितां येण्यासारखें सामर्थ्य इतर देशांस नाहीं; अशी स्थिति आहे तोंपर्यंत येणारे मालासंबंधानें विलायतेचा नंबर वर राहणें स्वाभाविक आहे. आतां इतर युरोपीय देशही हा माल पुरविण्याचा कांहीं प्रयत्न करूं लागले आहेत, तरी अशा कामांत विलायतेशीं प्रतिस्पर्धा करण्यासारखा देश केवळ हिंदुस्थान हा आहे. या देशांत व्यापारास उपयोगी खनिज व उद्भिज्ज जिनसांची समृद्धि आहे, व त्याचा उपयोग करून घेण्याकडेही लक्ष जास्त लागत चाललें आहे. दगडी कोळसा व लोखंड काढण्याचे कारखाने वाढत आहेत, कापसाचें व लोंकरीचें सूत काढण्याचे व कापड विणण्याचे कारखाने पुष्कळ होत आहेत; अशा प्रकारानें चढते काळाची कला दिसूं लागली आहे.

विलायतेहून या देशास माल येतो व इकडून तिकडे जातो त्यापैकीं कांहीं महत्वाचे जिनसांचीं नांवें येथें देतों. त्यांचे पुढें कंसांत सन १८९३–९४ सालीं माल किती आला त्याची किंमत दिली आहे; ते आंकडे हजार रुपयांचे आहेत.

आयात माल–कोरें कापड (१५९३२९), धुवट कापड (५४०४१), रंगित कापड (६६२४३), सूत (३०१४५), लोंकरीचे कपडे (१०१०१), दारू (८९८१), हार्डवेअर–चाकू, कात्र्या वगैरे धातूचें सामान--(९९०७), यंत्रें वगैरे (२४७५०), रेशमी कापड (५८७५), तांब्याचे पत्रे (१५४६८), दगडी कोळसा (९४१६).

यांशिवाय मीठ, पोषाखाचें सामान वगैरे माल येतो.

निर्गत माल—कापूस (१३०२७), गहूं (२५६३२), गळिताचीं धान्यें (३६२०१), तांदूळ (१८४९९), चहा (६११४४), जूट--ताग (५५६५०), नीळ (१५७६०), कातडीं (५३८४), देशी लोंकर (१०४३६), परकी लोंकर (६१०६), काफी (९९५८), सोरा (१३०८). अलीकडे कलकत्त्या-

कडून जूटचा इकडे तयार झालेला मालही तिकडे जाऊं लागला आहे. हा सन ८९३–९४ सालीं ५९८२ हजार रुपयांचा गेला.

गेले १० वर्षांचें मान पाहतां, आयात मालपैकीं कोरें कापड व सूत यांचें मान थोडें उतरलें आहे, व बाकीचे मालांत सांगण्यासारखा फरक झाला नाहीं. निर्गत मालांत कापूस जाण्याचें फारच कमी झालें आहे. तांदूळ व नीळ हे जिन्नस थोडे कमी जातात. बाकीचे जिनसांत वाढच आहे. कापूस कमी जाण्याचें कारण असें आहे कीं आतां जाडें कापड या देशांत निघूं लागलें आहे, व तें कापड विलायतेस निघेनासें झालें आहे; या देशांतून कापूस जाई तोहीं जाडे कापडास उपयोगी पडण्यासारखाच जात असे, तेव्हां जाडें कापड निघण्याचें बंद झाल्यानें कापूसही जाण्याचें बंद झालें. तो कापूस आतां तिकडे न जातां इकडील गिरण्यांतच खपतो. युरोपांतील इतर देशांस कापूस विलायतेचे मार्फत जात असे तो आतां परस्पर जाऊं लागला आहे, हेंही तो विलायतेस कमी जाण्याचें एक कारण आहे.

इटली.—या देशाशीं ज्या जिनसांचा व्यापार होतो त्यांपैकीं मुख्य येथें देतों. सन १८९३-९४ सालीं किती व्यापार झाला तें दाखविण्यासाठीं मालाचे किंमतीचे आंकडे मालाचे नांवापुढें दिले आहेत. हे आंकडे हजाराचे आहेत.

येणारे जिन्नस :—पोंवळीं (१५९३) , पांढरे धुवट कपडे, रंगित कपडे, कांचेचे मणी, रेशमी कापड, पोषाखाचे जिन्नस, संगमरवरी दगड, घड्याळें वगैरे.

जाणारे जिन्नस :—कापूस (५८१८६), गहूं (२०३१), गळिताचीं धान्यें (५७७४), रेशीम (८७८), ताग (२६४४), नीळ (९५३), कातडीं (३३५६) वगैरे.

गेले १० वर्षांत पोंवळीं व रेशमी कापड येण्याचें मान कमी झालें आहे; पांढरें धुवट कापड, पोषाखाचें सामान, सगंमरवरी दगड पूर्वींप्रमाणेंच येत आहेत; रंगित कापड, कांचेचे मणी व घड्याळें हीं पूर्वींपेक्षां जास्त येतात.

जाणारे मालांत कापूस, नीळ, कातडीं हीं पूर्वींप्रमाणेंच जातात; गळिताचीं धान्यें, गहूं व जूट (ताग) हीं जास्त जातात ; रेशीम कमी जातें.

या देशांतून जो माल येतो त्यांत युरोपिअन लोकांचे उपयोगाचाच विशेष येतो. तो सर्वच त्या देशांत झालेला येत नाहीं, त्यांत कांहीं जर्मनीचे दक्षिण भागांतीलही येतो. या देशाचा हिंदुस्थानाशीं व्यापार विशेषसा वाढला नाहीं, कारण तिकडून येणारा माल नेहमींचे गरजांचा नसल्यामुळें त्याचा खप इकडे सुबत्ता किंवा दुर्भिक्ष असेल त्या मानानें होतो व येणारे व जाणारे मालावर त्या देशांत दस्तुरी घेण्यांत येते.

फ्रान्स---येणारा मालः—पोषाखाचें सामान (२३९७), रेशमी कापड (१३२३), भेसळीचें रेशमी कापड (१७८२), ब्रांडी व इतर दारू (१५०७), घड्याळें, केशर, कांचेचे मणी, रंगित कापड व दुसरा किरकोळ माल.

जाणारा माल :—कापूस (१३४७१), गहूं (८५६५), नीळ (३९२५), गळिताचीं धान्यें (५८५४१), काफी (७३१८), रेशीम (२३४७), कातडीं (१०७५), मिरीं वगैरे.

(हे मालाचे किमतीचे आंकडे हजार रुपयांचे १८९३-९४ सालाचे आहेत).

गेले १० सालांत आयात मालापैकीं पोषाखाचे सामानांत व रेशमाचे भेसळीचे कापडांत पुष्कळ वाढ झाली आहे; बाकीचे मालांत विशेष कमी जास्ती झालें नाहीं. निर्गत मालांत गळिताचीं धान्यें, रेशीम व नीळ या पदार्थांसंबंधानें वाढ आहे व बाकीचे मालांत कमी जास्ती कांहीं झालेलें नाहीं.

या देशांतून माल येतो तो बहुतेक युरोपिअन लोकांचे उपयोगाचाच येतो. निर्गत मालापेक्षां येणारा माल कमी दिसतो, परंतु खरें म्हटलें तर तसें नाहीं; या देशांतून परस्पर माल येतो त्याचेशिवाय पुष्कळ माल इंग्लंडांत जाऊन तेथून या देशास रवाना होतो. या देशांतून घड्याळें येतात तीं स्वित्झरलंडांतील असतात.

जर्मनी—येणारा मालः—लोंकरी कपडा व लोंकरीचा इतर माल (२४४७), मीठ (९५९), साखर (२७६१), चांकू, कात्र्या वगैरे धातूचा माल व हार्डवेअर (१३९२), आगपेट्या (५०५), कांचेचें सामान (८०३), दारू (२९९), पोषाखाचें सामान (८०७), आनिलाइन रंग (४०५ , पोलाद (५५९), लोखंड (७१६), कापसाचें कापड (६५७) व इतर माल.

जाणारा माल :—कापूस (२८६६०), जूट (ताग) (११६४२), गळिताचीं धान्यें (१५५७३), कातडीं (६८०४), नीळ (४७१२), तांदूळ (१७८०), गहूं (१५२), वगैरे.

(आंकडे मालाचे किमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४चे आहेत.)

लोंकरी कपडा, व आगकाड्या यांचें येण्याचें मान पूर्वीप्रमाणेंच आहे; बाकीचे जिनसांत वाढ आहे. दारू मात्र कांहीं कमी येते.

तांदूळ व कापूस हे गेले १० वर्षांचे पूर्वी जात होते त्यापेक्षां कमी जातात. बाकीचे मालांत वाढ आहे. गहूं व गळिताचीं धान्यें जास्त जातात, परंतु तो व्यापार नेहमींसारखा चालत नाहीं, कमी जास्त होत असतो.

या देशांतून माल येतो त्यांत हलका व विलायतेचे मालासारखा नकली

माल फार येतो. व्यापार ट्रिस्टी, व्हेनिस्, अंटवर्प बंदरांतून व विलायतेचे द्वारें होतो.

हालंड—या देशांतून माल येतो तो सर्व याच देशांतील नसतो. जर्मनी वगैरे देशांतील माल हालंड देशाचे बंदरांतून या देशास येतो.

येणारा माल:—रंगित सुती कापड, रंगित लोंकरी कापड, मेणबत्त्या, तंबाखू, दारू, खेळणीं, रंग वगैरे.

जाणारा मालः—गहूं, जवस व मोहऱ्या.

आस्त्रिया-येणारा माल-कापसाचें सूत (५६९), पोषाखाचें सामान, लोंकरीचें कापड (९८२), हार्डवेअर (५५६), कागद (१२९४), स्टेशनरी सामान, कांचेचे मणी, कांचेचें सामान, भेसळीचें रेशमी कापड, आनिलाइन रंग, वगैरे.

जाणारा माल:-कापूस (१७३९९), नीळ (४२२३), जूट (ताग) (३१६४), कातडीं (१४८८) वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४चे आहेत).

या देशांतून माल येण्याचें फार झपाट्यानें वाढत आहे; गेले पांच सालांतच त्याची दुप्पट वाढ झाली आहे. सूत येण्याचें मात्र कमी झालें आहे. दहा वर्षांचे पूर्वी या देशांतून येणारे मालांत कागद व सूत हेच जिन्नस महत्वाचे होते. इतर जिन्नस येण्याचें अलीकडेसच चालू झालें आहे.

जर्मनीप्रमाणच या देशांतूनही नकली स्वस्त माल येतो व त्याची वाढ आहे. आयात मालांत वाढ झाली आहे तशी निर्गत मालांत झाली नाहीं.

आस्ट्रो-हंगेरियन कंपनीच्या आगबोटी त्या देशांतून या देशास परभाऱ्या येऊं लागल्यानें व्यापार वाढत चालला आहे.

बेल्जियम-येणारा माल:-लोखंड व लोखंडी सामान (६३३४), पोलाद (२७७७), मेणबत्त्या (४३७), हार्डवेअर-चाकू, कात्र्या वगैरे धातूचा माल (८१४), कांच व कांचेचें सामान (१३७५), आनिलाइन रंग (३२६०), तांबें (८४६), आगकाड्या (४११), मातीचे जिन्नस (५२०), सूत वगैरे.

जाणारा मालः—कापूस (२२७९२), गहूं (५८९३), गळिताचीं धान्यें (२५५११).

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४चे आहेत).

पूर्वी स्टेशनरी सामान, सूत व कांच हाच माल विशेष येत असे सन १८८३।४ सालापासून इतर माल येऊं लागला व त्याची वाढही चांगली झाली आहे.

सूत व स्टेशनरी येण्याचें बहुतेक बंद झालें आहे. जाणारे मालांत कापूस व गहूं हा माल नेहमीं सारखा जात नाहीं. गळिताचे धान्यांत मात्र वाढ आहे. एकंदरींत आयात मालांत वाढ आहे तशी निर्गत मालांत नाहीं.

या देशांत अप्रतिहत व्यापाराचीं तत्वें चालू आहेत, व लोक कुशल व उद्योगी आहेत, तेव्हां हिंदुस्थानाशीं या देशाचा व्यापार वाढण्यास सोईचें आहे. आंटवर्प बंदर हें त्या देशास व युरोपाचे उत्तरभागांस माल परविण्यास मोठें सोईचें ठिकाण आहे.

रशिया—येणारे मालांत महत्वाचा माल ह्मणजे एशियांतील रशियांतून केरोसीन तेल येतें तें आहे. हें तेल १८८५।८६ सालीं पहिल्यानें येऊं लागलें. त्या सालीं हें तेल ६७० हजार रुपयांचें १५७७ हजार ग्यालन आलें. त्यांत वाढ होत जाऊन सन १८९१।९२ सालीं ११२९१ हजार व १८९३।९४ सालीं १२६२५ हजार रुपयांचें आलें.

काळ्या समुद्रांतून युरोपीय रशियांत कापूस (४९८३) नीळ (५९१), व गळिताचीं धान्यें, तांदूळ वगैरे जिन्नस जातात. आयात व निर्गत व्यापारांत गेले पांच सालांत वाढ झाली आहे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४चे आहेत).

युनायटेड स्टेट्स-येणारा माल :—कोरें कापड (५४५), केरोसीन तेल (१८३१८), तंबाखू (३९८), घड्याळें (१८४) वगैरे.

जाणारा माल :—जूट (ताग) (५६७६), जवस (८३३), नीळ (४३७७), कच्चीं कातडीं (५०८४), कमावलेलीं कातडीं (४५३८), चपडी लाख (२०५७), पोतीं (३११४), पोत्यांचें कापड (४०३६), कात (८५६), चहा (७०), सोरा (६५४), वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४चे आहेत).

गेले दहा सालांत केरोसीन तेल येण्याचे संबंधानें फार वाढ झाली आहे. कोरे कापडाचा व्यापार सारखा चालत नाहीं. जाणारे मालांत ताग, लाख, सोरा, कच्चीं कातडीं व कमावलेलीं कातडीं, यांचा व्यापार पूर्वीप्रमाणेंच आहे. दुसरीं कातडीं, पोतीं व पोत्यांचें कापड व चहा यांत वाढ आहे. जवस जाण्याचें फारच कमी झालें आहे; व तसें होण्यास कारण त्या देशांत सरकारांनीं सवलती देऊन तो पिकविण्यास उत्तेजन दिलें आहे हें आहे.

केरोसीन तेल सन १८७५-७६ सालीं ५३६ हजार ग्यालन आलें; सन १८९३-९४ सालीं ४६२२६ हजार ग्यालन आलें; यावरून हा व्यापार किती वाढला आहे त्याची कल्पना होईल. हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत हें तेल सांपडतें

परंतु तें काढण्याचा उद्योग विशेषसा झालेला नाहीं ; परंतु आतां तिकडे लक्ष लागत आहे.

या देशाचा युनायटेड स्टेटशीं परस्पर व्यापार चालतो. माल न्यूयार्क येथें पाठविण्यासाठीं गलबतांतून लिव्हरपूल व ग्लासगो येथें जातो व तेथून दुसरे गलबतांत भरून पुढें अमेरिकेंत जातो. त्या देशाशीं असा परभारा व्यापार सुरू झाल्यापासून निर्गत व्यापारास वाढ आहे.

अरबस्थान–येणारा माल :—खजूर, मोतीं, मीठ, मासे, वगैरे.

जाणारा माल :—परकीय देशांतील कापड (१४५९), देशिकापड (५४०), परकीय सूत (८१), देशीसूत (१८१), परकीय साखर (४५९), परकीय काफी, देशीकाफी (३५३), तांदूळ (३६०१), गहूं (३४७), कणीक, ज्वारी, देशी साखर वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून, हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत).

या देशास हिंदुस्थानांतून काफी जाणें म्हणजे सकृद्दर्शनीं चमत्कारिक दिसतें; कारण ती या देशांत फार पिकते व ती तेथूनच इतर देशांत फार जाते. इकडील काफी जाते ती तेथील उंची मालांत भेसळ करण्यासाठीं व त्या देशांतील चांगला माल गेल्यानें देशांतील खपास कमी पुरवठा होतो तो भरून काढण्यासाठीं जाते.

एडन—हें बंदर त्याचे भोंवतालचे भागांशीं होणारे व्यापाराची उतार पेठ आहे.

सन १८८५--८६ सालापासून एक इटालियन कंपनी एडन येथें मीठ तयार करून हिंदुस्थानांत पाठवीत असते.

येणारा माल:---मीठ (७९०) हस्तिदंत, काफी वगैरे.

जाणारा माल:---युरोपीय कापड (९२३), देशी कापड (१७५७), देशी सूत (६८४), तांदूळ (१२१७), ज्वारी, गव्हांची कणीक, तंबाखू, सुंठ, गहूं, परदेशी साखर वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत.)

गेले दहा सालांचे मानानें पाहतां, येणारे मालांत हस्तिदंत कमी येतो, काफी, मीठ जास्त येतात. जाणारे मालांत कापड, तांदूळ, तंबाखू, सुंठ हे पदार्थ पूर्वीप्रमाणेंच जातात, गहूं व देशी सूत हीं कमी जातात. ज्वारीचा व्यापार कमी जास्ती होतो. कणीक जास्त जाऊं लागली आहे.

एशियांतील तुर्कस्थान–या देशाचा व्यापार बसोरा बंदराशीं मुख्यत्वेंकरून होतो. आयात मालांत मुख्य म्हणजे खजूर व घोडे. त्यांचे खालीं गहूं,

तूप, धान्य, वगैरे येतात. सन १८९३-९४ सालीं घोडे १०८४ हजार रुपयांचे आले. या देशांस माल जातो त्यांतील मुख्य जिनसांची नांवनिशी व १८९३-९४ सालांत किती किंमतीचा माल गेला त्याची किंमतही देतों. किंमतीचे आंकडे त्या त्या जिनसाचे पुढें असून हजार रुपयांचे आहेत.

निर्गत होणारा माल:-परकीय कापड (१०१७), परकीय साखर (४३७), काफी (५६८), नीळ (११०१), पोतीं (१०१९), देशी सूत (२७९). याशिवाय देशी कापड, मिरीं, चहा वगैरे. पोत्याचा व्यापार वाढत आहे. चहा व सूत हीं पूर्वींपेक्षां जास्त जाऊं लागलीं आहेत. साखर, काफी, नीळ वगैरेंचें मान कमी आहे, देशी व परदेशी कापड व मिरीं हीं पूर्वींप्रमाणेंच जातात.

इराण—आयात माल:-कापूस, मोतीं, खजूर, फळें, लोंकर, सुगंधी सामान, हिंग, रेशीम हा व्यापार वाढत नाहीं. १८९३-९४ सालीं घोडे ३४९ हजार रुपयांचे आले.

जाणारा माल:-परकीय कापसाचें कापड (५६८४), देशी कापड (२५२), परकीय सूत (३५१), देशी सूत (२११), नीळ (१४१०), देशी चहा (१५९१), परकीय चहा (३२१६), परकीय साखर (१३०१), देशी काफी (३६१), तांदूळ (१०३२), याशिवाय परकीय तांबें, मिरीं वगैरे माल जातो. हा व्यापार साधारण वाढला आहे. (हे आंकडे मालाचे किमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ सालाबद्दल आहेत.)

या देशांतून येणारे मालांत महत्वाचा माल मोतीं व खजूर हा आहे. या देशांतून कापूस येतो, तो इकडील कापूस महाग झाला ह्मणजे मुंबईतील गिरण्यांसाठीं आणण्यांत येतो. हिंदुस्थानांतून जाणारे मालांत महत्वाचा माल ह्मणजे तांदूळ व नीळ. इकडील सूत व कापड तिकडे फारसें खपत नाहीं.

या देशांतून चिनांत अफू जाते ती मुंबई बंदरांत येऊन पी. आणि ओ. कंपनीचे आगबोटींतून पुढें जाते.

चीन-चीन देशाशीं व्यापार मुख्यत्वें अफूचाच आहे. त्या देशांतून या देशास इकडून जाणारे मालाचे किंमतीचा माल येत नाहीं. ही जी या देशाची चीन देशाकडे बाकी फिरते तिचे मोबदला चीन देश विलायतेस माल पाठवितो व त्यानें या देशाचे बाकीची फेड होते. सन १८७५-७६ सालानंतर मुंबईहून कापसाचें सूत व कापूस व कलकत्याहून पोतीं तिकडे जाऊं लागलीं; तेव्हांपासून म्यांचेस्टर येथील माल तिकडे कमी खपूं लागला. हा व्यापार कसा वाढत गेला तें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

हे आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.

	साल ७१--७२	८१--८२	९१--९२
आयात माल.	१३५	१५४	२८७
रेशीम.	(५१)	(५१)	(९८)
रेशमी कापड.	(२१)	(२२)	(५३)
चहा.	(१६)	(१४)	(३५)
निर्यात माल.	१३७४	१३४८	१३७१
कापूस.	(११५)	(९८)	(२६)
कापड व सूत.	(५)	(११४)	(५१६)
अफू	(१२२७)	(११०१)	(७८०)

याशिवाय आणखी इतर माल आहे. हे आंकडे कांहीं महत्वाचे जिनसांपुर्तेच आहेत.

यावरून हिंदुस्थानचा एकंदर व्यापार ज्या मानानें वाढत आहे त्या मानानें या देशाशीं व्यापार वाढत नाहीं असें दिसतें. सन १८९३-९४ सालीं टांकसाळी बंद झाल्यामुळें या देशाचा चीन देशाशीं जो व्यापार होतो त्यांत चलबिचल झाली. नवीन स्थितीस अनुसरून व्यवहार चालू झाल्यावर पुनः व्यापार पूर्वस्थितीवर येईल असा सरकारचा समज आहे.

चीन देशास या देशांतून सूत व कापड फार जाऊं लागलें आहे याचें कारण रुप्याचा भाव उतरणें हें आहे असें ह्मणतात, परंतु त्याचें खरें कारण इकडील सूत चिनी व जपानी लोकांस पाहिजे तसें असतें हें आहे. या देशांतील गिरण्यांत कापूस येण्यास फार भाडें पडत नाहीं, व त्या देशास येथील कापड जाण्यासही भाडें फार पडत नाहीं, यामुळें इकडील माल त्या देशांत जास्त खपूं लागला आहे.

पूर्वी सर्व व्यापार हांगकांग बंदराशींच होत असे. सन १८७७–७८ सालापासून ट्रीटी पोर्ट्स् (तहनाम्याचीं बंदरें) यांबरोबरही व्यापार होऊं लागला आहे.

आयात मालः—रेशीम, रेशमी कापड, साखर (५१३३), तांबें (३२००), चहा (८७२५), सोनें (९६९३), रुपें (२३८०), कापूर, फटाके, कांचेचें सामान वगैरे.

निर्गत मालः—अफू, देशी सूत, कापूस, पोतीं.

(हे आंकडे मालाचे किमतीचे असून हजार रुपयाचे १८९३-९४ चे आहेत.)

स्ट्रेट्स सेटलमेंट—येणारा मालः–कथील (३१५३), रेशीम (२४६४), रेशमी कापड (३७२), साखर (१२३७), मिरीं (२०२०), सुपारी (२५८७),

कापूर, नारळ, खारे मासे, सुपारी, चहा, जायफळ, पोषाखाचें सामान, वेत, रंगित कापड, छत्र्या, काफी वगैरे.

जाणारा मालः—तांदूळ (१४०३९), अफू (१६१४४), पोतीं (४०३६), परदेशीय कापड (२१५८), देशी कापड (१९१६), देशी सूत (१३४६), जेड दगड वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत.)

या देशांतून रेशीम येतें तें बहुतेक चिनी असतें व अफू जाते ती बहुतेक चीन व इतर पूर्वेकडील देशांसाठीं जाते. सिंगापूर बंदर हें त्या बाजूचा माल हिंदुस्थानांत पाठविण्यासाठीं दराचे मानानें सोय होईपर्यंत सांठवून ठेवण्यासाठीं उतार पेठ आहे. आतां सिलोनांतील कोलंबो हें यासंबंधानें जास्त महत्वाचें होत आहे.

रेशमी कापड, नारळ, चहा, हे पदार्थ आतां पाहिल्यापेक्षां कमी येतात व अफू, जेड दगड व देशी कपडा कमी जातो. बाकी जिनसांचा व्यापार चांगला चालत आहे.

सिलोन:--हिंदुस्थानचे इतर बंदरांशीं व्यापार जसा चालतो तसाच सिलोन बेटाशीं चालतो. मद्रास इलाख्याचे दक्षिणेकडील बंदरांचा या देशाशीं व्यापार सारखा चालू असतो. त्या इलाख्यांतून सिलोनांत काफी वगैरेचे लागवडीचे कामावर लोक मजुरीनें जातात व या लोकांचे गुजाऱ्यासाठीं तिकडे तांदूळ पुष्कळ जातो. त्या बेटांतील लोकांस चहा, काफी, मसाल्याचें सामान हीं पिकें करणें फायद्याचें होतें, सबब ते तीं पिकें करतात व धान्य वगैरे परदेशांतून नेतात. बागाईत पुष्कळ असल्यामुळें खतासाठीं पेंड पुष्कळ जाते. कोलंबो बंदर हें पूर्वी सांगितल्याप्रमाणें पूर्वेकडील व पश्चिमेकडील देशांतील माल हिंदुस्थानांत दर येईपर्यंत सांठवून ठेवण्याचें ठिकाण झालें आहे.

येणारा मालः--सुपारी (१७२२), काफी, चहा, शिंपले, नारळ, पोतीं, वेलदोडे, लांकूड, खोबरेल, काथ्याचा माल, खारे मासे वगैरे.

जाणारा मालः—परकीय कापसाचा माल (५९८), देशी कापसाचा माल (१८२६), तांदूळ (१९४७१), भात, पेंड, गव्हांची कणीक, साखर, जनावरें वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत.)

आयात मालांत काफी व लांकडें कमी येतात व निर्गत मालांत जनावरें कमी जातात. बाकी आयात व निर्गत व्यापार चांगला चालला आहे.

जपान.-येणारा मालः—मजेचें सामान, रेशीम, रेशमी कापड, पोषाखाचें

सामान, कोळसा वगैरे.

सूत (२२१९), कापूस (१०९३८) व पोतीं हे जिन्नस जाणारे मालांत महत्वाचे आहेत.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत.)

या देशांतून येणारा माल पूर्वी चीन देशाचे बंदरांतून येत असे, आतां त्या देशाशीं आगबोटीनें परस्पर दळणवळण टाटा कंपनीचे परिश्रमानें सुरू झालें आहे; या कंपनीस प्रतिस्पर्धी पेनिनशुलर कंपनी आहे; तिचे बरोबर चढाओढींत टाटा कंपनी जर टिकली तर हिंदुस्थानाचा जपानाशीं व्यापार पुष्कळ वाढेल.

जपान देशांत गिरण्या सुरू झाल्यानें इकडून तिकडे सूत व कापड फार थोडें जातें. पुढें तिकडील कापड चीन वगैरे देशांत खपूं लागल्यानें या देशाचा माल तिकडे खपण्यास अडथळा होईल अशी भीति आहे. आतां तयार मालाऐवजीं हिंदुस्थानांतून जपानांत कापूस पुष्कळ जाऊं लागला आहे.

आस्ट्रेलिया–येणारा मालः— घोडे (१४२३), तांबें (५०६), कोळसा वगैरे.

जाणारा मालः–पोतीं (६३१६), एरंडेल (५७२), चहा, तांदूळ वगैरे.

हे आंकडे मालाचे किमतीचे असून हजार रुपयांचे सन १८९३–९४चे आहेत.

या देशाचा हिंदुस्थानाशीं व्यापार पुष्कळ वाढेल असें कांहीं दिवसांपूर्वी वाटत होतें, परंतु तसें कांहीं घडून आलें नाहीं. हा देश विशेष प्रकारानें कारागिरीचा माल तयार करूं लागल्याशिवाय व येणारे जाणारे मालावर जकाती त्या देशांत घेतात त्या बंद झाल्याशिवाय व्यापार वाढण्याची आशा कमी आहे.

मारिशस–या बेटांतून साखर व गूळ हा माल मुख्यत्वेंकरून येतो. सन १८९३–९४ सालीं साखर १७३२१ हजार रुपयांची आली.

जणारा मालः— तांदूळ (६८३०), हरभरे व डाळ, इतर डाळी, तेल व पेंड, सोरा, पोतीं, कणीक वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचें असून हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत.)

जाणारे मालांत मुख्य तांदूळच आहेत. या बेटाबरोबरील व्यापार सारखा चालत नाहीं; तो मुख्यत्वेंकरून एकच जिनसाचा असलेमुळें त्यास वारंवार झोंके बसतात. या बेटांतून इकडे साखर फार येऊं लागली, ती इकडे तिचा खप वाढला ह्मणून येऊं लागली असें नाहीं; युरोपांत साखर होऊं लागल्यानें या बेटांतील साखरेचा तिकडे खप कमी झाला, तेव्हां तिचा कोठें तरी खप करणें जरूर झालें ह्मणून या देशास येऊं लागली.

मोझांबिकहून मुख्यत्वेंकरून हस्तिदंतच येतो व परदेशांतून आलेलें कापड तिकडे जातें.

झांझिबार.-येणारा मालः-लवंगा (१५०८), हस्तिदंत, खोबरें, वगैरे.

जाणारा माल.-परदेशीय कापड (२३१२), देशी कापड (२०७०), तांदूळ (११०२), परदेशीय साखर, कणीक, तूप वगैरे.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत.)

परदेशीय कापड व साखर हे पदार्थ पहिल्यापेक्षां आतां कमी जातात; बाकीचा व्यापार चांगला चालला आहे.

केप आफ गुड होप-हिंदुस्थानचा या देशाबरोबर व्यापार फार थोडा होतो. येणारे पदार्थांत लोखंड व तांबें हेच पदार्थ महत्वाचे आहेत. जाणारे मालांत तांदूळ (५४९), पोतीं (१४०९) व सागवान हे पदार्थ मुख्य आहेत.

(हे आंकडे मालाचे किंमतीचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ चे आहेत.)

ईजिप्त—आयात मालः—पोषाखाचें सामान, तंबाखूचा तयार माल, कापूस वगैरे.

जाणारा मालः—तांदूळ (१८९२४), गहूं (७२५०), गळिताचीं धान्यें नीळ (३३६३); साखर वगैरे. (हे आंकडे मालाचे किंमतचे असून हजार रुपयांचे १८९३-९४ बद्दल आहेत.)

या देशास पुष्कळ माल जातो तो नांवाचा मात्र त्या देशांस जातो ; खरोखर तो युरोपांतील देशांसाठींच जातो. असें होण्याचें कारण तांदूळ, गहूं हे तिकडे जातात ते पूर्वी मागणें येऊन त्याप्रमाणें पाठविलेले नसतात ; ते इजिप्तांत गेल्यावर मागणें येईल त्या मानानें कोठें पाठविण्याचे तें ठरतें. या देशाचे उपयोगासाठीं ह्मणजे पोतीं व नीळ हे पदार्थ जातात.

आयात व निर्गत व्यापार.—आतां ज्या मालासंबंधानें व्यापार होतो त्याचा विचार करण्याचा आहे. या मालाचे सरकारांनीं सात वर्ग केले आहेत. (१) जिवंत प्राणी (जनावरें), (२) खाण्याचे पदार्थ, (३) धातू व धातूंचे जिन्नस, (४) रसायनद्रव्यें, औषधें, अमली पदार्थ व रंगाचे जिन्नस, (५) तेलें, (६) कच्चा माल, (७) पूर्णपणें व अंशतः तयार केलेले जिन्नस. व्यापाराचे सर्व जिनसांची नांवनिशी येथें देणें शक्य नाहीं. कांहीं महत्वाचे जिनसांची नांवनिशी व त्यांची किंमत हीं मात्र येथें देतों. व्यापारांत जिन्नसवार वाढ कशी झाली आहे हें दाखविण्यासाठीं, सन१८७५-७६, १८८१-८२, १८९१-९२ व १८९३-९४ सालांचे आंकडे दिले आहेत. या

यादींत सरकारासाठीं सरकारतर्फे जो माल आणण्यांत येतो तो दाखल केला नाहीं. सोनें-रुपें किती आलें व गेलें त्याची किंमत अखेरीस दिली आहे.

येणारे व जाणारे व्यापारी मालांत जिन्नसवार वाढ कशी झाली तें दाखविणारें कोष्टक पुढें देतों. हें कांहीं महत्वाचे जिनसांचे संबंधानेंच आहे. आंकडे मालाचे किमतीचे असून हजार रुपयांचे आहेत.

येणारा माल.

	१८७५–७६	१८८१–८२	१८९१–९२	१८९३–९४
१ वर्ग पहिला जिवंत प्राणी–				
घोडे.	७४३	२०३९	२७८१	२९८३
पहिले वर्गाची बेरीज.	७६१	२०८५	२९३२	३०५०
२ वर्ग दुसरा, खाण्याचे पदार्थ.				
फळें व भाज्या.	७०८	१५८२	१३४२	९५७
दारू.	१३९२१	१३०८६	१४४२०	१४५८२
मीठ.	६००९	५६९०	६२७९	७९१४
मसाला.	३९५९	५०७१	७९७१	८७३६
साखर.	८९५९	१२४३७	२५६१९	२८२४१
चहा.	२४७५	१९९६	४४३१	५७१९
काफी.	१६२	१०३८	१४४०	७४३
प्रोव्हिजन्स-खाण्याचे पदार्थ.	७१३५	१०५३०	१७७१७	१७८२८
धान्यें.	२६५	१०३८	२१५५	१३१६
बेरीज	...	...	८१७६७	८६५८०
३ वर्ग तिसरा, धातू व धातूंचे पदार्थ.				
हार्डवेअर व कटलरी. (चाकू, कात्र्या वगैरे धातूंचें सामान)	४७५३	६२६६	१२३८९	१३०१६
लोखंड.	१४२४५	१४१४३	२३२१२	२४२८८
पोलाद.	८८९	१३२०	४५९५	६२२७

	'७५-७६	'८१-८२	'९१-९२	'९३-९४
पितळ.	४८५	५३९	६२४	६६२
तांबें.	१२०७५	१४६७४	२०८९०	२३८२५
कथील.	१६९२	१६९७	२६४३	३२७५
शिसें.	६३०	९६४	१७०९	१६६३
पारा.	१०७५	१५५	४३६	४४३
जस्त.	८२६	१३५२	१९०६	१९२८
आगगाडीचें सामान.	५९९७	१०७९५	१४८४१	१२४२९
यंत्रें वगैरे.	१३९१६	१२२१०	२११०५	२५१८०
बेरीज.	...	...	१०४८९८	११३४१२

४. वर्ग चवथा–रसायनद्रव्यें व औषधें व अमली पदार्थ.

रसायनद्रव्यें.	...	१३४६	२८६४	३५६८
औषधें.	२८७६	३८१८	४८३४	५२३८
रंग चे व कमावण्याचे जिन्नस.	१४३४	१७१४	५९८३	७०८८
तंबाखू.	७६४	६३१	१६७०	२४७६
बेरीज	...	...	१५३५२	१८३७०

५. वर्ग पांचवा–तेलें.

खनिज तेलें.	४४६	५०४०	२३६८१	३२७५५
वनस्पतिज तेलें.	...	३०३	२६७७	२९४५
	...	...	२६३५९	३५७०१

६. वर्ग सहावा–कच्चा माल.

कोळसा.	६६५५	१०२००	१२५०४	९७७५
हस्तिदंत.	२३१०	२२५९	२७४३	२८८७
रेशमि.	६९४८	७४९२	१२६४०	१३५९६

	'७५-७६	'८१-८२	'९१-९२	'९३-९४
ल कर	४५५	७५४	११८२	१४१३
[illegible].कूड.	...	...	११९६	१५४९
कापूस.	...	१०४२	१७७२	२२३३
वेरीज.	...	...	३८२८०	३८९५२

७. वर्ग स तवा—तयार माल.

कापसाचें सूत.	२७९४	३२२२०	३५१४६	३१०८२
कापसाच कोरें कापड.	१०६३९७	१२८९०८	१३९३५७	१५९९५९
—बुटट कापड.	२३८७७	३५६३३	४९५३५	५५३६०
—रंगित कापड.	२८३७२	३९६४०	५७०१४	७०१५५
शि ण्याचा दोरा.	९९९	८४६	१६६१	१७७४
रेशमी कापड.	६७७९	११०६०	१४५३४	१४८४३
—भ सळीचें कापड.	२९२	१०३२	२७३४	२७४३
लोंक िचें कापड.	८२६५	९१२२	१३३६६	१४२२९
—शाली.	...	७६५	१९७७	२२७१
पोषा ाचें सामान.	६१५९	६४१४	१२५९४	१४३५३
बूट व जोडे.	...	...	१३८६	१४२७
शेतकीचीं हत्यारें.	२६१	३९९	७३३	७८७
बंदुक दारू वगैरे.	७६३	७५२	२०६५	२६५७
पुस्तकें.	१०३५	१३३६	२२१५	२४८६
कागद.	२७०१	४७३१	४६४०	४८८३
मेणबत्त्या.	७९१	७५८	१२६७	१५१९
घड्याळें.	४३७	८३१	१४०२	१५ ५
पोवळीं.	८१४	१८५३	१६८१	१६७३
मातीचीं भांडीं.	९९१	१६०५	२७३५	२५१६
फटाके वगैरे.	४७४	४४८	६८२	६७३
कांच.	३४९९	४५४८	७२८२	७८ ४
शास्त्रीय व वाजविण्याचीं हत्यारें.	६१२	१३४५	२५२५	२७८८
कमावलेलीं कातडीं.	५३६	६९४	१९१४	२००७

	'७५-७६	'८१-८२	'९१-९२	'९३-९४
आगपेट्या.	७९१	१४४३	३३१६	३७५१
रंग (फांसण्याचे).	२०२९	२१०५	२२५७	२४८४
साबण.	२४३	५५९	११०४	१२१७
खेळ.	...	...	१६१३	१८०३
छत्र्या.	१९६४	२०९५	४१४९	४८०९
बेरीज.	...	...	३९६२८३	४४३५४७
एकंदर आयात मालाची बेरीज.	३७११२६	४६९९२०	६६५८७४	७३९६१६
सोनें-रुपें.	५३००७	११३२२७	१४७२२६	१८४२५२
	४२४१३३	५८३१४८	८१३१०१	९२३८६८

निर्गत माल.

१ वर्ग पहिला-जिवंत प्राणी.				
जनावरें.	८५६	७७८	१०१८	१२२९
२ वर्ग दुसरा-खाण्याचे-पिण्याचे पदार्थ.				
काफी.	१६२७०	१४४७४	१९९८६	२००२१
फळें व भाज्या	३६७	३७६	८४५	९८८
धान्यें-तांदूळ.	५३११०	८३०८१	१३३८६७	१०३८८६
गहूं.	९०१०	८६०४०	१४३८०४	५११३०
हरभरे.	९९७	९९९	११५०	१२१५
ज्वारी.	...	...	४९१३	२२९१
डाळी.	....	८८४	२४९१	२८१४
खाण्याचे पदार्थ.	१८६७	२६९८	७७६५	८७३९
मसाल्याचें सामान.	३४२५	२४५८	४०८९	४५६१
साखर व गूळ.	२५३९	५०८२	७६१३	६९८२
चहा.	२१६६४	३६०११	५९६८१	६५८५८
बेरीज.	...	...	३८४५६९	२७२३९७

	'७५-७६	'८१-८२	'९१-९२	'९३-९४
३ वर्ग तिसरा-धातू व धातूचे पदार्थ.	३५७	३४३	७७०	७६६
४ वर्ग चवथा-औषधें वगैरे.				
औषधें.	—	८६६	१८५०	१४३७
अमलाचे पदार्थ.				
—अफू.	१११४८४	१२४३२१	९५६२२	८०१९४
—तंबाखू.	१६९५	११५०	१३६६	१३९४
रंगाचे व कमावण्याचे जिन्नस.				
—नीळ.	२८७५०	४५०९०	३२१४०	४१८२१
—कात.	—	—	३१७२	३३७८
—हिरडा.	—	१४४४	३९३६	४१५१
बेरीज.	—	—	१३८७२४	१३३३३१
५ वर्ग पांचवा-तेलें.				
एरंडेल.	४०४२	२९७७	३४२१	२३६९
खोबरेल.		१०७८	१५४९	१०९३
बेरीज.	—	—	६०४०	५३५८
६ वर्ग सहावा-कच्चा माल.				
रब्बर.	९७८	१०८८	११७२	१२५९
कापूस.	१३२७८९	१४९३५९	१०७५४३	१३३०२२
जूट (ताग).	२८०५३	५०३०३	६८४८४	८५२५६
कातडीं.	२९४३९	३९४८७	२३६७०	२५६७४
शिंगें.	८०६	१२३५	३३३७	१८८१
हस्तिदंत.	६८	५०	४५	३२
खताचे जिन्नस.	—	२४९	२३६७	२८०७
सोरा.	३४८९	३५९४	३६५६	३३८१
बीं-एरंड्या.	—	११७७	४४९०	६०२७

	'७५-७६	'८१-८२	'९१-९२	'९३-९४
—भुइमूग.	—	१७३५	८७५८	९५९७
—जवस.	३३१७१	३०००१	६७९३४	७५०८८
—घोडराई.	१०८४	१०३१९	१७०८९	४७३४९
—तीळ.	७८७४	१२१७७	१७६५३	१९३०४
रेशीम.	४१५९	३८८२	५१८६	६९८०
लोंकर.	१०९४२	८१४५	१०१३८	१०७९७
बेरीज.	—	—	३६१५९०	४५३७३४

७ वर्ग सातवा-तयार माल.

कापसाचें सूत.	२६६९	१३६८८	५७७१०	४९७४१
कापड.	३९१९	५९९८	११३४२	११७४५
जूटचीं (तागाचीं) पोतीं.	४४२८	१०८४०	२१९५२	२८७०६
—पोत्याचें कापड.	४४७	११९	३१३८	५६३०
रेशमी कापड.	२४०७	२०५९	१५९५	२००७
—मेसरीचें कापड.	—	१५५	२४०	४१६
लोंकरीचें कापड.	३९६	७२४	८११	११८४
—शाली.	१६१२	१२४१	१३६	२९९
पोषाखाचें सामान.	४८९	५४७	११९२	१३०१
कमावलेलीं कातडीं.	११९०	१९१८	२८१८९	३२३३८
लाख.	७२९१	७१९५	७४४५	९५२१
पेंड.	—	५६३	१०४५	१४०३
गंधी सामान.			६३	७५
बेरीज.	...	...	१४२७९४	१५३४२४
एकूण एकंदर निर्गत मालाची किंमत.	५६२१२२	७९२५५२	१०३५५०८	१०२०२४१
परदेशीय माल निर्गत झाला त्याची किंमत.	१८३३१	२६४६७	४४८५१	४४३४८
सोनें-रुपें.	२११५१	१०९७३	३१४३१	४०२४७
	६०१६१५	८२९९९३	११११७९१	११०४८३८

आयात व्यापार —वर्ग पहिला–जिवंत प्राणी–या वर्गांत महत्वाचा माल म्हणजे घोडेच आहेत. ते मुख्यत्वेंकरून आस्ट्रेलिया व तुर्कस्थानांतून येतात. इतर देशांतून थोडे येतात.

वर्ग दुसरा—खाण्याचे पदार्थ–दारू–दारूचा व्यापार चांगलासा वाढला नाहीं. ती विलायतेंतून सर्वांत जास्त येते; त्याचे खालोखाल फ्रान्स व जर्मनी देशांतून येते. या देशांतही विलायती नमुन्याची दारू करण्याचे कारखाने झाले आहेत. सन १८९२ सालीं २१ कारखाने चालू होते त्यांत एल, बियर, पोर्ट, या प्रकारची दारू ४८ लक्ष ग्यालन तयार झाली; त्यापैकीं २७ लक्ष ग्यालन लष्करासाठीं सरकारांनीं खरेदी केली व बाकीची देशांत खपली. सन १८९२-९३ सालीं परकी दारू ४८ लक्ष ६२ हजार ग्यालन आली, त्यापैकीं ११ हजार ग्यालन काय ती फिरून परदेशास गेली; बाकीची सर्व या देशांतच खपली.

मीठ—मीठ येतें तें कलकत्ता व ब्रह्मदेशांतच येतें. या व्यापारांत विशेषशी वाढ नाहीं. मीठ इतर देशांपेक्षां विलायतेहूनच सर्वांत जास्त येतें, तरी पूर्वीपेक्षां जर्मनी, आस्ट्रिया, व एडन येथून आतां जास्त येऊं लागलें आहे. एडन येथें एक इटालियन कंपनीनें मीठ तयार करण्याचा कारखाना सरकारच्या परवानगीनें काढला आहे. जर्मनी व आस्ट्रिया या देशांतून मीठ जास्त येण्यास कारण हाम्बर्ग व कलकत्त्याचे दरम्यान आगबोटी आतां नियमानें येऊं लागल्या आहेत व त्यांत वजनासाठीं मीठ घालून आणतात.

मसाला—या सदरांत सुपारी, लवंगा, जायफळें, मिरीं वगैरे जिन्नस येतात. सुपारी स्ट्रेट्स् सेटलमेंट व सिलोन या देशांतून मद्रास व बंगाल प्रांतांत येते. लवंगा बहुतेक झांजिबाराहून येतात व एडन, स्ट्रेट्स् सेटलमेंट वगैरे देशांतूनही कांहीं येतात. यापैकीं पुष्कळ माल विलायतेस जातो. जायफळें व मिरीं हीं स्ट्रेट्स् सेटलमेंटाहूनच बहुतेक येतात. परदेशांहून मिरीं येतात त्याशिवाय या देशांत व त्रावणकोर संस्थानांत मिरीं पुष्कळ पिकतात.

साखर—साखर येते तींतील निम्मेपेक्षां जास्त मारिशस बेटाहून येते. त्याचे खालोखाल चीन, जर्मनी, स्ट्रेट्स् सेटलमेंट व विलायत या देशांतून येते. यापैकीं सुमारें तीन हिस्से साखर पश्चिमहिंदुस्थानांत येते; कारण या भागांत साखर फारशी तयार होत नाहीं व उत्तरहिंदुस्थानांतील साखर या भागांत आणून विकण्यास पुरवत नाहीं. चीन व मारिशस येथील साखर फार चांगल्या व सुधारलेले कृतीनें स्वच्छ केलेली असते व ती तेथें स्वस्ती पडते. या देशांतून साखर येते ती उंसाची असते; युरोपांत बीटपासून साखर काढूं लागले आहेत तीही इकडे येते, तरी या साखरेचा व्यापार फारसा वाढला नाहीं. युरोपांत

बीटपासून साखर काढूं लागल्यापासून मारिशस वगैरे कडील साखर तेथें खपत नाहींशी झाली, तेव्हां ती हिंदुस्थानांत पाठविण्याशिवाय गत्यंतरच नाहींसें झालें आहे, यामुळें या देशांत साखर फार येते.

या देशांतून परदेशांत साखर जाते ती शुद्ध केलेली नसते; तिकडून इकडे येते ती चांगली शुद्ध केलेली असत.

चहा--चहा ये ो तो बहुतेक चिनांतूनच येतो. सिलोन बेटाहून अलीकडे चहा येऊं लागला आहे. या चहापकीं बराच इराण व अफगाणिस्थान या देशांस जातो. चिनांतील इकडे येणारा चहा हलका असतो व कमी किंमतीस विकतो. सिलोन बेटांतील चहा चांगला असतो व तो मुंबईस जास्त येतो; कारण या प्रांतांत त्या चहास उत्तरहिंदुस्थानांतील चहाबरोबर किमतीसंबंधानें चढाओढ करण्यास सांपडते.

प्रोव्हिजन्स--खाण्याचे पदार्थ--या सदरांत लोणी, मासे, मांस, मिठाया, चीझ, लोणचीं, मुरांबे, वाळावेलेलीं व मसाला घातलेलीं फळें, खजूर, पीठ, तूप, वगैरे पदार्थ येतात. मध्यंतरीं मिठावरील जकात वाढविण्यांत आल्यावर कांहीं दिवस खारे मासे फार येऊं लागले होते; त्यांजवर जकात बसविण्यांत आल्यावर ते आतां कमी येऊं लागले आहेत. या वर्गांतील बराच माल विलायतेहून युरोपिअन लोकांसाठीं येतो. इराणचे अखातानें व मकाण किनाऱ्यावरून मुंबई व सिंध प्रांतांत तूप येतें.

वर्ग तिसरा--धातू व धातूचे पदार्थ--हार्डवेअर व कटलरी (चाकू, कात्र्या वगैरे धातूचें सामान). हा माल बहुतेक विलायतेहूनच येतो तरी अलीकडे जर्मनी, आस्त्रिया व बेल्जम ह्या देशांतून हा माल बराच येऊं लागला आहे. सन १८९३--९४ सालीं या देशांतून हा माल एकंदरीपैकीं सुमारें एकपंचमांश आला.

या सालीं शिवण्याचीं यंत्रें किंमत रु. ४०४५०० चीं आलीं.

लोखंड व पोलाद--हें विलायतेहून मुख्यत्वें येतें तरी आतां बेल्जम व जर्मनीहूनही बरेंच येऊं लागलें आहे. पूर्वीपेक्षां लोखंडाचे बदली पोलादाचा उपयोग जास्त होऊं लागला आहे. विलायतेहून येणारा माल चांगला परंतु महाग असतो व जर्मनी व बेल्जम येथून येणारा माल हलका परंतु स्वस्ता असतो, यामुळें हा माल जास्त खपूं लागला आहे.

तांबें—लोखंडाचे खालोखाल महत्वाची धातू तांबें आहे. तें चीन, विलायत, आस्त्रेलिया वगैरे देशांतून येतें.

लोखंड व तांबें मिळून धातूंपैकीं ९४ भाग माल होतो, बाकी सहा भागांत पितळ, शिसें वगैरे इतर धातू येतात.

आगगाड्यांचें सामान व यांत्रिक सामान हें बहुतेक विलायतेहूनच येतें; बेलजम वगैरे देशांतून फारच थोडें येतें.

वरील कोष्टकांत जे आंकडे दिले आहेत त्यांशिवाय सरकारी आगगाड्या होतात त्यांचा माल येतो, तो सन १८९१-९२ सालीं १२८ लक्ष व सन १८९३-९४ सालीं १०३ लक्ष रुपयांचा आला होता.

वर्ग चवथा---रसायनद्रव्यें–यांचे संबंधानें विशेष कांहीं सांगण्यासारखें नाहीं. हीं द्रव्यें येण्याचें जास्त वाढत आहे व कागद करण्याचे कारखाने वाढतील तशीं हीं द्रव्यें येण्याचेंही वाढेल. औषधें येण्याचेंही वाढतच आहे.

रंगाचे व कमावण्याचे जिन्नस—यांत तीन हिस्से आनिलाइन व अलीझराइन रंग हे येतात. त्यांपैकीं ९० टक्के मुंबई इलाख्यांत खपतात, कारण बंगाल्यांत रंगीत कपडे घालण्याचा फारसा परिपाठ नाहीं. हे रंग येण्याचें अलीकडेच फार वाढलें आहे, व ते युरोपांतूनच बहुतेक येतात, व सर्वांत जास्त बेलजम देशांतून येतात.

तंबाख—हा पदार्थ सन १८९१।९२ पर्यंत परदेशांतून इकडे येण्यापेक्षां इकडून परदेशास जास्त जात असे. अलीकडे हें मान उलटलें आहे.

वर्ग पांचवा--तेलें–या वर्गांत खनिज व वनस्पतिज तेलें येतात. खनिज तेलांत केरोसीन तेल मुख्यत्वें युनायटेड स्टेट्स् व रशिया या देशांतून येतें. याबद्दल पूर्वीं थोडीशी माहिती दिलीच आहे. या देशांतही हें तेल सांपडतें; त्याजबद्दल “ खाणी व कारखानें ” या भागांत सांगितलें आहे, तेव्हां येथें फिरून उल्लेख करण्याचें कारण नाहीं.

वनस्पतिज तेलांत खोबरेल तेल व जवसाचें तेल हीं मुख्य आहेत. खोबरेल तेल सिलोन, मारिशस व स्टेट्स् सेटलमेंट व हांगकांग येथून बंगाल्यांत येतें. हें तेल व जवसाचें तेल काढण्यास कच्चा माल या देशांत असून हीं तेलें परदेशांतून येतात हें विचार करण्यासारखें आहे.

वर्ग सहावा--कच्चा माल--या वर्गांतील महत्वाचा माल कोणता किती येतो, तें वरील कोष्टकांत दिलेंच आहे. कोळसा येण्याचें दिवसानुदिवस कमी होत आहे. परदेशी कोळसा बहुतेक पश्चिमहिंदुस्थानांतच खपतो. त्या कोळशाचे पांचपट कोळसा सन १८९३–९४ सालीं या देशांतील खाणींतून निघाला. जपान व हिंदुस्थानाचे दरम्यान आगबोटी जाण्याचें एका नामांकित पारशी

कंपनीनें सुरू केल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. सन १८९३-९४ सालीं जपानाहून थोडा कोळसा प्रथमतः आला हें या व्यवस्थेचें फळ आहे.

कापूस—मुंबईच्या गिरण्यांत उपयोगासाठीं भाव सोईचा पडेल त्या वेळीं, इराणांतून कापूस येतो. अलीकडे ईजित देशांतून लांब धाग्याचा कापूस आणून इकडे तलम कापड काढण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत व २४ नंबरापेक्षां बारीक सूत काढण्यापासून तोटा होत नाहीं असें अनुभवास आलें आहे. असे कामासाठीं कापूस सन १८८९।९० सालीं ६३८ हंड्रेडवेट आला होता व सन १८९३।९४ सालीं ३६८६८ हंड्रेडवेट आला. चिनांत इकडील कापड खपण्याचें जसें कमी होत जाईल तसा गिरण्यांस याच देशांतील खपास लागणारा माल काढावा लागेल. खप होऊं लागला ह्मणजे लांब धाग्याचा कापूसही इकडे जास्त पिकविण्याचें सुरू होईल.

रेशीम—बहुतेक रेशीम मुंबईस गिरण्यांत विणण्यासाठीं येतें; तें चिनांतून येतें. तयार मालाचा खप मुंबई प्रांतांत व ब्रह्मदेशांत होतो.

लांकूड—इमारती लांकूड सियाम व स्ट्रेट्स् सेटलमेंट येथून येतें, व तें गुणानें ब्रह्मदेशांतील लाकडांबरोबर असतें.

लोंकर—पंजाब व कानपूरच्या गिरण्यांत उंची लोंकरीचें कापड तयार होऊं लागलें आहे, त्यासाठीं पूर्वीपेक्षां जास्त लोंकर येते. इराणांतून व मक्राण किनाऱ्यावरून लोंकर येते ती मुंबई व कराची बंदरांत येऊन बहुतेक परदेशास जाते.

वर्ग सातवा—तयार माल—या वर्गांतील फार महत्वाचा माल ह्मणजे कापसाचें सूत व कापड हा आहे.

सूत—या मालाचे व्यापारांत ह्मणण्यासारखी वाढ नाहीं. मध्यंतरीं हुंडणावळीचा भाव वाढला होता तेव्हां कांहीं माल जास्त आला (१८९०-९१-९२); परंतु ती स्थिति पुढें टिकली नाहीं. गेले १० सालांत या मालाचे व्यापारांत वाढ नाहीं इतकेंच नाहीं, तर तो येण्याचें कमी होत आहे. याचें कारण परदेशांतून येणाऱ्या मालासारखा माल या देशांत तयार होऊं लागला, व आगगाड्या वगैरे वाढल्यानें त्या मालाचा देशांत प्रसार होऊं लागला हें दिसतें.

कापड—गेल दोन सालांत या मालाचा व्यापार सट्टयासारखा झाला. टांकसाळी बंद झाल्या व रुपयाची किंमत कांहीं वेळ वाढली होती, त्या वेळीं व्यापारी लोकांनीं त्या स्थितीचा फायदा घेण्यासाठीं जास्त माल आणवून घेतला. पूर्वी कांहीं वर्षें माल कमी आला असल्यानें तो माल कांहीं दिवस खपला; परंतु आतां त्या मालाचा खप चांगला होण्याचीं चिन्हें कमी दिसूं लागलीं आहेत.

एकंदर आयात मालांत कापसाचा माल सन १८७३।७४ सालीं ५७ टक्के होता, तो १८८२।८३ सालीं ४७ टक्के, व सन १८९३।९४ सालीं ४३ ३/४ टक्के झाला; यावरून इतर मालाचा व्यापार ज्याप्रमाणें वाढत आहे व लोकसंख्या-ही ज्या प्रमाणानें वाढत आहे, त्या प्रमाणानें या व्यापारांत वाढ होत नाहीं असें दिसतें. कापड वगैरे माल ज्या भागांत गिरण्या कमी आहेत त्या भागांत जास्त येतो. हा माल मुंबईस येतो त्यापेक्षां बंगाल्यांत पुष्कळ जास्त जातो. कापड वगैरे माल बहुतेक सर्व विलायतेहूनच येतो. पायमोजे वगैरेसारखें विणकरी काम मात्र सर्वच विलायतेहून येत नाहीं; त्यापैकीं सुमारें निम्म माल युरोपांतील इतर देशांतून येतो.

रेशमी कापड—या कापडाचा व्यापार विशेषसा वाढला नाहीं. तें विलायतेहून व चिनांतून येतें व फ्रान्समधून येण्याचें कमी झालें आह. रेशमी भेसळीचें कापड बहुतेक फ्रान्सांतूनच येतें.

लोंकरी कापडाचे व्यापाराची वाढही साधारण आहे. शालीशिवाय इतर मालास मागणें फारसें नाहीं. लोंकरी कापड बहुतेक विलायतेहूनच येतें. जर्मनी व आस्त्रिया देशांतून गेले १० सालांपासून कांहीं कापड येऊं लागलें आहे.

इतर माल येतो त्याचे संबंधानें सांगण्यासारखें विशेष कांहीं नाहीं. पोषाखाचें सामान ह्मणजे शिवलेले कपडे, युरोपियन लोकांत वापरले जाणारे, हे विलायत, फ्रान्स वगैरे देशांतून येतात. पोवळीं इटलीहून येतात. कागद विलायतेहून व आस्त्रियाहून एकंदरीपैकीं सुमारें तीन-चतुर्थांश येतात.

आयात मालांत मुख्य कापसाचा माल आहे. हा पूर्वीपेक्षां आतां स्वस्ता विकतो. साधारण उपयोगाचे कोणतेही जिनसाचा व्यापार कमी झाला नाहीं. या जिनसांचे व्यापारांत जी वृद्धि झाली आहे त्यावरून लोकांस माल खरेदी करण्याचें जास्त सामर्थ्य आलें आहे, किंवा लोकांस छानछोकीनें रहाण्याची संवय लागली आहे, किंवा त्यांचे रहाण्याचे तऱ्हेंत एकंदर सुधारणा झाली आहे असें दिसतें. उदाहरणार्थ, रेशमी व उंचेचीं वस्त्रें, किंवा साखर वगैरे जिनस घ्या; हे पूर्वीपेक्षां आतां जास्त खपतात. धातूचा माल जास्त येतो व त्याचा खप मध्यम व कनिष्ठ वर्गाचे लोकांत होतो. मातीचीं भांडीं जाऊन त्यांचेबदली धातूचे भांड्यांचा जास्त उपयोग होतो, यावरून या वर्गाची स्थिति सुधारली आहे असें दिसतें. खनिज तेलाचे खपांत

फारच वाढ झाली आहे व त्याची किंमतही गेले पांच वर्षांत चवथाई उतरली आहे.

परदेशांतून येणाऱ्या मालाच्या किंमती पूर्वीपेक्षां उतरल्या आहेत. सन १८७३ चे मानानें कापसाच्या कापडाची किंमत शेंकडा २६ टक्के, सुताची ३६ पासून ४३ टक्के, लोखंडाची ३६ टक्के व तांब्याची ३६ टक्के अशा किंमती उतरल्या आहेत. हे जिन्नस महत्वाचे व सर्वत्र खपाचे आहेत ह्मणून मासल्यासाठीं घेतले आहेत.

आयात व्यापाराची वांटणी सन १८९३।९० सालीं देशावर कशी झाली होती तें खालील माहितीवरून दिसेल. एकंदरींपकीं जवळ जवळ ९४ टक्के व्यापार दहा देशांशीं झाला होता व बाकीचा इतर देशांशीं झाला होता.

विलायत.	७०·३	युनायटेडस्टेट्स्.	२·७	राशिया.	१·७
चीन.	४·८	मारिशस.	२·४	फ्रान्स.	१·५
स्ट्रेट्स् सेटलमेंट.	३·४	जर्मनी.	२·३	इतर देश.	६·२
बेलजेम.	२·८	आस्ट्रिया.	१·९		१००

येथपर्यंत आयात व्यापारासंबंधानें झालें. आतां निर्गत व्यापारासंबंधानें सांगावयाचें आहे.

निर्गत व्यापार—या देशाचे निर्गत व्यापारांत दोन पर्याय आहेत. परदेशाहून आलेला माल फिरून परदेशास जातो हा एक, व या देशाचा माल परदेशास जातो हा दुसरा. पहिल्यानें परदेशी माल येथें येऊन फिरून परदेशीं किती जातो तें सांगतों.

या व्यापाराची वाढ कशी झाली आहे तें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल.

१८७५–७६	१८३३१६०८	रुपये.
१८८१–८२	२६४६७१६५	,,
१८९१–९२	४४८५१७९०	,,
१८९३–९४	४४३१९७५०	,,

हा व्यापार मुंबई व कराची बंदरांतून चालतो व त्या व्यापारास सोईचीं तींच बंदरें आहेत.

कोणते जिन्नस किती किंमतीचे जातात हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

जिनसांचीं नांवें	१८८१।८२	१८९१।९२	१८९३।९४
खाण्याचे जिन्नस.			
प्रोव्हिजन्स. ...	१००९	११७१	१२४५

	'८१-८२	'९१-९२	'९३-९४
मसाल्याचे जिन्नस ...	४००	३०१	२०८
साखर (शुद्ध केलेली)	१२५४	१२९६	३३८१
चहा ...	४५९	३१५७	३४३१
धातू व धातूचे जिन्नस.—			
हार्डवेअर व कटलरी...	२७३	६९२	७६८
तांबें ...	२२५	१०५७	५२२
लोखंड ...	३८७	८२८	६३९
रसायनद्रव्यें व औषधें...	३१९	६७८	७०४
कच्चा माल—			
डीक व राळ ...	६७७	६८७	७०३
हस्तिदंत ...	९२०	१५०४	११९२
रेशीम ...	५५१	३७४	३२९
लोंकर ...	२२७६	६३०८	६०९३
तयार माल.			
कापसाचें सूत. ...	५१९	११३६	७९९
,, कापड. ...	१२६५१	१८१७१	१६४५९
रेशमी कापड. ...	२८९	६६९	७०६
लोंकरांचें कापड. ...	३१०	७८३	७२०
पोषाखाचें सामान. ...	५२०	१०००	१२६६
कांचेचें सामान. ...	२४६	४१५	४३६

हा व्यापार कोणते देशांशीं किती होतो तें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल.

देशांचीं नांवें.	किंमत हजार रुपये. १८८१-८२	१८९१-९२	१८९३-९४.
इराण.	८९४३	१४१८५	१२३३४
विलायत.	५७५३	१०९४०	११००५
आफ्रिकेचे पूर्व किनाऱ्यावरील देश, झांझिबार व मोझांबिक.	२३०१	३५१८	३६२५
अरबस्थान.	२३७४	३०३४	३०२०
स्ट्रेट्स् सेटलमेंट.	१८८४	२४६२	३१२८
टर्किश अरबस्थान	—	३१४२	२४५५

एडन.	६८७	१४६४	१८४२
चीन.	८८	१११६	१४००
मारिशस.	२४८	१०२६	१४०९
सिलोन–(लंका).	४७३	१५५८	१५११

आतां हिंदुस्थानांत उत्पन्न होणारा माल परदेशांस जातो त्याबद्दल विचार करावयाचा आहे. ह्या मालाचही आयात मालाप्रमाणेंच वर्ग आहेत.

वर्ग पहिला–सजीव प्राणी–या वर्गासंबंधानें सांगण्यासारखें विशेष कांहीं नाहीं. हा व्यापार बहुतेक सिलोनशीं व स्टेट्स् सेटलमेंटशीं होतो.

वर्ग दुसरा–खाण्यापिण्याचे पदार्थ–काफी–काफीची लागवड कोणते भागांत होते तें शेतकीचे भागांत सांगितलेंच आहे. ही विलायत, आस्त्रिया, फ्रान्स, जर्मनी, इजिप्त, अरबस्थान, इराण, एशियांतील तुर्कस्थान, वगैरे देशांस जाते. ही बहुतेक मद्रासबंदरांतूनच रवाना होते व कांहीं मुंबई बंदरांतून जाते.

तांदूळ–युरोपांत विलायत, माल्टा, फ्रान्स, इजिप्त, जर्मनी वगैरे देशांस; एशियांत सिलोन, स्ट्रेट्स् सेटलमेंट, अरबस्थान व इराण, वगैरे देशांस; आफ्रिकेंत मारिशस, रुंआ, केप कालनी, नेटल व आफ्रिकेचे पूर्व किनाऱ्यावरील देश वगैरेंस; अमेरिकेंत वेस्ट इंडीज, दक्षिणअमेरिका, कानडा, युनायटेड स्टेट्स् वगैरे देशांत तांदूळ जातो. त्याचा उपयोग खाण्याकडे व खळ करण्याकडे करतात; व जर्मनी, फ्रान्स, हालंड व इटाली या देशांत त्याची दारू करतात. मुख्यत्वेंकरून ब्रह्मदेश व बंगाल प्रांतांतून तांदूळ रवाना होतो. मद्रास, मुंबई व सिंध प्रांतांतूनही तांदूळ बाहेरदेशीं जातो, परंतु तितका जात नाहीं.

सन १८६८ सालाचे मानानें हा व्यापार हल्लीं तिप्पट वाढला आहे.

गहूं–गव्हांचा व्यापार सारखा चालत नाहीं. ज्या देशांतून तो जातो व ज्या देशांत त्याचा खप होतो, त्या देशांतील पिकावर, कमी किंवा अधिक गहूं जाणें अवलंबून असतें. त्याचा खप बहुतेक युरोपांतील देशांतच होतो. एशियांतील देशांत फार थोडा होतो. गहूं मुंबई, सिंध, बंगाल या प्रांतांतील बंदरांतून रवाना होतो.

कणीकही परदेशीं जाते. कांहीं थोडी विलायतेस व बेलजियम देशास जाते; तरी बहुतक कणीक मारिशस, एडन, अरबस्थान, सिलोन, आफ्रिकेचा पूर्वकिनारा या देशांस जाते.

गव्हांचे व्यापारांत सन १८६८ सालचे मानानें अलीकडे फारच वाढ झाली आहे. सुएझचा कालवा होण्याचे पूर्वी हा व्यापार युरोप खंडाशीं होणें शक्यच नव्हतें. सन १८७३ सालापर्यंत गव्हांवर निर्गत जकात टनास पांच रुपये

होती, ती माफ झाल्यानंतर व्यापाराची वाढ होऊं लागली; तरी उत्तर व पश्चिमहिंदुस्थानांतील आगगाड्या सर्व तयार झाल्यानें १८८१–८२ नंतर ह्या व्यापाराचें खरें स्वरूप दिसूं लागलें. सन १८९१–९२ सालीं युरोपांतील देशांत पीक बुडाल्यानें गव्हांचा व्यापार विशेष वाढला. साधारणपणें दरसाल ७ पासून ८ लक्ष टन गहूं या देशांतून युरोपास जातो.

ज्वारी व बाजरी–या धान्यांचा खप सन १८९०-९१-९२ सालांत युरोपांत फार झाला. तिकडे मका, राय, ओट व बटाटे यांपासून दारू काढतात, त्यांची किंमत फार वाढल्यानें त्या कामास लावण्यासाठां ज्वारी व बाजरी इकडून नेण्यांत आली; परंतु पुढें त्यांचा चांगला उपयोग होत नाहीं असें ठरलें. कावडीं, बदकें वगैरे चारण्यासाठीं तिकडे हीं धान्यें नेतात; परंतु या कामीं त्यांचा खप विशेष होण्यासारखा नाहीं.

साखर–विलायत व सिलोन देशांस बहुतेक जाते. या देशांतील साखरेचे व्यापाराचा पूर्ववृत्तांत मोठा चमत्कारिक असून बोध करून घेण्यासारखा आहे. पहिल्यानें या देशांतून चांगली शुद्ध साखर परदेशास रवाना होत असे. ती बंगाल्यांतूनच रवाना होई; कारण, मुंबई व मद्रास या ठिकाणांहून ती पाठावेण्यास ईस्टइंडिया कंपनीनें हरकती घालून ठेविल्या होत्या. या देशांतून व पश्चिमेकडील बेटांतूनही साखर विलायतेस जात असे; त्या वेळीं हिंदुस्थानांतील साखरेवर जास्त आयात जकात होती तीमुळें या व्यापारास हिसका बसला; तसें नसतें तर या देशाचा साखरेचा व्यापार वाढला असता. पुढें इंग्लंडांत व स्काटलंडांत साखर शुद्ध करण्याचे कारखाने झाल्यानें इकडून तिकडे गूळ जाऊं लागला व शुद्ध केलेली साखर फार कमी जाऊं लागली. अलीकडे परदेशांतून या देशांत साखर येऊं लागली आहे त्यामुळें या देशांतील गूळ व साखर यांचे उत्पन्नास फार हिसका बसेल असें कांहीं लोकांचें मत आहे. तरी पूर्वींचे मानानें या तां उंसाची लागवड कमी झाली आहे असें दिसत नाहीं. पुढें युरोपांत बीटपासून साखर काढूं लागले, त्यामुळें या देशांतून जी तिकडे शुद्ध केलेली साखर जात असे ती जाण्याची बंद झाली व उलट इतर देशांतून जी उंसाची साखर युरापात असे ती हिंदुस्थानांत येऊं लागली. आतां तर बीटपासून काढलेली साखरही या देशांत पुष्कळ येऊं लागली आहे व एकंदरींत ह्या दोन्ही प्रकारच्या साखरा फार स्वस्त्या झाल्या आहेत. ही परदेशी साखर इकडे यऊं लागल्यानें साखर तयार करण्याचे इकडील कारखाने बसत चालले आहेत. आतां इकडून जितका गूळ परदेशास जातो त्याचे सातपट साखर परदेशांतून इकडे येत. ही साखर इकडे येऊं लागल्यानें गुळा-

चा खप कमी झाला नाहीं; त्याचा खप साखर करण्यासाठीं होईनासा झाल्या-पासून ता फार स्वस्ती झाला आहे व त्याचा ह्या देशांतच खप फार वाढला आहे.

चहा— चहाची लागवड कोणकोणते प्रांतांत होते तें शेतकीचे भागांत सांगितलेंच आहे. हिंदुस्थानांतून विलायतेंत फार चहा जातो. थोडा आस्त्रिया व इराणांत जातो. युनायटेड स्टेट्समध्यें जास्त चहा जाऊं लागला आहे. हिंदुस्थानांतील चहाचा चिनाचे चहापेक्षां विलायतेस जास्त खप होऊं लागला आहे. या व्यापारासंबधें हिंदुस्थान व सिलोन यांमध्यें चढाओढ होईल असें अनुमान आहे. सन १८९१-९२ सालीं हिंदुस्थानांतून जितका चहा गेला त्य चे निम्मे सिलोनहून परदेशांस गेला. इंग्रजी राज्यांतील बंदरांतून चहा परदेशास रवाना झाला, त्याशिवाय त्राव्हणकार व कोचीन या प्रांतांतील बंदरांतून लक्ष पौंड चहा सन १८९३ सालीं परदेशास रवाना झाला. चहाच व्यापारांत सारखी वाढच आहे.

वर्ग तिसरा—धातू व धातूचे पदार्थ—यासंबंधानें विशेष असें कांहीं नाहीं. या देशांत कोणत खनिज पदार्थांची उत्पत्ती होते तें खाणी व कारखाने या भागांत सांगितलें आहेच.

वर्ग चवथा—औषधें व असली पदार्थ—अफू—अफूचे संबंधानें विशेष माहिती दहावे भागांत दिली आहे. अफू चीन, स्ट्रेट्स् सेटलमेंट, कोचीन चायना, वगैरे देशांत जाते.

नीळ—नीळीबद्दल शेतकीचे भागांत माहिती दिली आहे. नीळ विलायत, आस्त्रिया, फ्रान्स, जर्मनी, इटली, रशिया, इजिप्त, युनायटेड स्टेट्स्, इराण, एशियांतील तुर्कस्थान, वगैरे देशांस जाते. विलायतेस जास्त ह्मणजे एकंदरीपैकीं सुमारें एकतृतीयांश जाते.

वर्ग पांचवा —तेलें,- खोबरेल व एरंडेल हीं परदेशास जातात. एरंडेल तेल बंगाल्यांतून विलायत, आस्त्रेलिया, स्ट्रेट्स् सेटलमेंट, चीन, मारिशस व केप या देशांस जातें. खोबरेल बहुतेक मद्रासेहून विलायतेस व युरोपखंडांत जातें; त्याचा उपयोग मुख्यत्वेंकरून साबण, वासाचीं तेलें करण्याकडे होतो.

वर्ग साहवा—कच्चा माल—कोळसा या देशांतील कोळसा परदेशांस जाऊं लागला आहे व तो हल्लीं कोलंबो, सिंगापूर, मारिशस व एडन येथें जातो. सन १८९१-९२ सालीं ४३६४ टन व सन १८९२-९३ सालीं १५६२० टन कोळसा परदेशीं गेला.

कापूस—हा विलायत, इटाली, आस्त्रिया, बेलजम, फ्रान्स, जर्मनी, रशिया,

स्पेन वगैरे युरोपांतील देश व चीन व जपान हे एशियांतील देश यांस जातो. कापूस विलायतेस फार थोडा जाण्याचें व जपानांत जास्त जाऊं लागण्याचें कारण पूर्वी सांगितलेंच आहे. फ्रान्स, इटली, व आस्ट्रिया देशांत कापूस जाण्याचें प्रमाण कमी झालें नाहीं. जर्मनी व बेलजम देशांस कापूस फार जाऊं लागला आहे. कापसाचा व्यापार बहुतेक मुंबई बंदरांतून होतो.

जूट-(ताग)-या जिनसाचा व्यापार फार अनिश्चित असतो. बंगाल्यांतील एका भागांत मात्र जूटची (तागाची) लागवड करतात, त्यामुळें त्या भागांत पर्जन्याची आप्ती किंवा सुबत्ता असल त्या मानानें तो उत्पन्न होतो. तांदूळ वगैरे जिन्नस देशाचे बरेच भागांत होत अ .ल्या कारणानें त्या मालाचे पुरवठ्यास विशेष खूट येत नाहीं; तसें जूट (तागाचें) नसल्यामुळें व्यापारांत उत्पन्नाचे मानानें नेहमीं चलविचल असते.

विलायत, युनायटेड स्टेट्स्, जर्मनी, फ्रान्स, इटली, आस्ट्रिया, स्पेन वगैरे देशांत इकडून जूट (ताग) जातो. युनायटेड स्टेट्समध्यें पूर्वीपेक्षां तो हल्लीं कमी जातो ; पण जर्मनींत जास्त जाऊं लागला आहे. क्रिमियाचे लढाईचे वेळीं जूट (ताग) रशियांतून विलायतेस जाणें बंद झालें व त्या वेळीं तो या देशांतून तिकडे जाण्यास सुरवात झाली. हा व्यापार कलकत्ताबंदरांतूनच होतो.

कातडीं—हा व्यापार बहुतेक युरोपांतील आस्ट्रिया, फ्रान्स, जर्मनी, इटली या देशांशीं होतो. इकडे चांगली सुबत्ता असली ह्मणजे कातडीं कमी जातात व दुष्काळ पडला ह्मणजे तीं जास्त जातात. मेंढरें व बकऱ्यांचीं कातडीं अमेरिकेंत विशेष जातात व मोठे जनावरांचीं कातडीं इतर देशांस जास्त जातात. कातड्यांचा व्यापार बहुतेक बंगाल्यांतून होतो.

खताचे जिन्नस—हाडें विलायतेस व जर्मनी या देशांस विशेष जातात; थोडीं थोडीं इतर देशांसही जातात. सन १८९३–९४ सालीं हाडें २७४० हजार रुपये किंमतीचीं गेलीं व इतर खताचें सामान ६७ हजार रुपयांचे किंमतीचें गेलें.

बियें— एरंडी ही मुख्यत्वेंकरून फ्रान्स देशास जाते, व त्याचेपेक्षां कमी विलायत, बेलजम, इटली, रशिया वगैरे देशांस जाते.

भुइमूग—मुख्यत्वेंकरून फ्रान्स, बेलजम देशांस जातो.

जवस—निम्मेचे जवळ जवळ जवस विलायतेस जातो त्याचे खालोखाल फ्रान्स देशास जातो. कांहीं थोडा युरोपांतील बाकीचे सर्व देशांस जातो. पूर्वी युनायटेड स्टेट्स् देशास जवस फार जात असे; आतां तिकडे फारच कमी जातो. ह्याचें कारण पूर्वी सांगितलेंच आहे.

मोहरी व घोडेराई—ही फ्रान्स, बेलजम, व जर्मनी देशांस विशेष जाते.

तीळ–फ्रान्स देशास फार जातो. तेथें त्याचा सावण करण्याचे कामीं उपयोग करतात. कांहीं थोडा बेलजम, जर्मनी, इटली वगैरे देशांस जातो. गाळेताचे धान्याचा व्यापार निम्मेपेक्षां जास्त मुंबई बंदराशीं होतो.

रेशीम–मुख्यत्वें विलायतेस व फ्रान्स देशास जातें. तें बहुतेक बंगाल्यांतूनच जातें.

लोंकर–लोंकर जाते ती फार हलके प्रकारची असते व जाडाभरडा माल तयार करण्यासाठींच तिचा उपयोग होतो. इकडून जाणारे लोंकरींत केंस व मातीची भेसळ करतात, त्यामुळें या व्यापाराचे वृद्धीस हरकत येते असें दिसतें. या देशांत लोंकरीचें कापड काढणाऱ्या पांच गिरण्या आहेत, त्यांत जाडें कापडच फार निघतें. लोंकर मुंबई व कराची बंदरांतून विशेष जाते; ती बहुतेक विलायतेसच जाते.

वर्ग सातवा—तयार केलेला माल–या प्रकारचे मालांत अलीकडे पहिला नंबर सूत, कापड वगैरे कापसाचे मालाचा आहे. त्याचे खालोखाल जूटचें (तागाचें) कापड व पोतीं व कमावलेलीं कातडीं यांचा येतो. या दोन प्रकारचे मालांत कधीं जूटचा (तागाचा) माल जास्त जातो व कधीं कमावलेलीं कातडीं जास्त जातात. त्यांचे खालीं लाख, रेशमी कापड, काथ्याचा माल, लोंकरीचा माल व पोषाखाचें सामान वगैरे जिन्नस येतात. ही नंबरवारी गेले चार सालांचे आंकड्यांवरूनच लावलेली आहे.

कापसाचें सूत–हें विशेषेंकरून चिनांत जातें; जपान, स्ट्रेट्स् सेटलमेंट व एडन व एशियांतील दुसरे देश यांतही कांहीं जातें.

कापड–हें विशेषेंकरून चीन, एडन, आफ्रिकेचा पूर्वकिनारा, स्ट्रेट्स् सेटलमेंट, एशियांतील तुर्कस्थान, अरबस्थान, इराण, सिलोन, वगैरे देशांस जातें. हिंदुस्थानांतील गिरण्यांची वाढ कशी झाली तें खाणी व कारखाने या भागांत सांगितलें आहे.

जुटाचा (तागाचा) माल–तागाचे तयार मालाचा व्यापार वाढत आहे. हा माल दोन प्रकारचा असतो. पोतीं व पोत्याचें कापड. पोतीं विलायत, युनाय-

टेड स्टेट्स्, आस्ट्रेलिया, चीन, स्ट्रेट्स् सेटलमेंट, दक्षिण अमेरिका, इजिप्त वगैरे देशांस जातात. कच्या मालाचा पुरवठा नेहमीं सारखा होण्याची खात्री नसल्यामुळें विशेष भांडवलाचे कारखान्यांस मात्र मालाचा सांठा करून ठेऊन ह्या व्यापारांत फायदा करून घेतां येतो. जूटचे (तागाचे) गिरण्यांचे संबंधानें माहिती खाणी व कारखाने या भागांत दिली आहे. पोत्याचें कापड विलायत, युनायटेड स्टेट्स्, चीन, वगैरे देशांस जातें.

रेशमाचा माल—रेशमी कापड विलायतेस व फ्रान्स देशास जातें.

लोंकरीचा माल—ह्या मालाचा व्यापार महत्वाचा नाहीं. या देशांतील गिरण्यांत जाडाभरडा माल निघतो; विलायती मालाबरोबर टिकाव धरण्यासारखा चांगला निघत नाहीं. शाली विलायतेस व इराण देशास जातात.

कमावलेलीं कातडीं—कातडीं मद्रास इलाख्यांत कमावलीं जाऊन तीं विलायत, बेलजम, फ्रान्स, युनायटेड स्टेट्स् व स्ट्रेट्स् सेटलमेंट वगैरे देशांस जातात.

लाख—ही छोटानागपूर व मध्यप्रांताचे पूर्व भागांत सांपडते. तेथून ती कलकत्त्यास येते व तेथें ती गाळली जाऊन तिची चपड्याची लाख व बटनाची लाख अशी दोन प्रकारची लाख तयार करितात. ही लाख विलायत, युनायटेड स्टेट्स् व यूरोपांतील इतर देश यांकडे रवाना होते.

पेंड—हिचा व्यापार वाढत आहे. पेंड मद्रास, कलकत्ता व मुंबईहून मुख्यत्वेंकरून सिलोनास जाते. विलायतेस व युरोपांतील देशांस व स्ट्रेट्स् सेटलमेंटासही कांहीं जाते.

निर्गत मालांत आतां पाहिला नंबर तांदूळ व गहूं यांचा आहे; त्यांत कधीं तांदूळ जास्त जातात व कधीं गहूं जास्त जातात. त्यांचेपेक्षां खालचा नंबर गळिताचीं धान्यें व कापूस यांचा आहे. नंतर अफू, कापड, ताग, चहा, तागाचा माल हीं येतात. ही नंबरवारी अलीकडील चार पांच वर्षांचे व्यापाराचे स्थितीप्रमाणें लावली आहे. निर्गत मालांत अफू व कापूस शिवायकरून इतर सर्व मालासंबंधानें वाढ आहे.

जाणारे मालाच्या ठोक विक्रीच्या किमती सन १८७३ सालचे मानानें पाहतां कांहीं मालासंबंधानें उतरल्या आहेत व कांहीं मालाच्या चढल्या आहेत. कापूस, सूत, कातडीं, नीळ, अफू व चहा या मालांच्या किमती उतरल्या आहेत. तांदूळ व ताग यांची किंमत वाढली आहे. बाकीचे महत्वाच्या मालाच्या किमती उतरल्या नाहींत व चढल्याही नाहींत.

निर्गत व्यापाराची वांटणी देशवार हल्लीं (१८९३-९४ कशी होते तें खालील माहितीवरून दिसेल. सर्व देशांशीं होणारा व्यापार १०० धरून प्रत्येक देशाचे वांटणीस किती भाग येतात तें पुढील आंकड्यांवरून कळून येईल.

विलायत.	३२·८	ईजिप्त.	३·६
चीन.	१०·७	इटली.	३·५
फ्रान्स.	१०·४	युनायटेड्स्टेट्स्.	३·३
जर्मनी.	७·५	सिलोन.	३·०
बेल्जम.	५·६	आस्त्रिया.	२·९
स्ट्रेट्स् सेटलमेंट.	४·४	इतर देश.	१२·२
			१००

सरकारचें स्टोर:—येथपर्यंत आयात व निर्गत व्यापारापैकीं खासगी व्यापारासंबंधानें विचार झाला. आतां सरकारतर्फे कांहीं माल आणण्यांत येतो त्या संबंधानें सांगावयाचें आहे. यासंबंधानें विशेष तपशील देण्याचें कारण नाहीं; कारण हा माल थोडा असतो व तो सरकारचे खर्चासाठींच आणलेला असतो.

प्रथमतः हा माल सालोसाल किती किमतीचा आला व गेला तें दाखविण्यासाठीं कांहीं माहिती देतों.

	माल आला —रुपये—	माल गेला.
सन १८७५--७६	१७७८९८८०	१३११८२०
— १८८१--८२	२१२१२९००	६८८५१०
-- १८९१--९२	२८४४९२६२	२८१०८१५
— १८९३--९४	३१००४७४८	१३१२३४३

हा माल कोणते प्रकारचा किती आला याबद्दल माहितीः—

आंकडे हजार रुपयांचे आहेत.

	१८७५--७६	१८९१--९२	१८९३--९४
हत्यारें.	१२८८	५०२०	१७६३
कोळसा.	१५९	५८०	६२६
औषधें.	५८३	३०२	२१९
कातड्याचें सामान.	६९७	२२२	१४६
दारू.	३१००	७३	१
यंत्रें.	४८२	६८४	८८९
धातू व धातूचा माल.	१२९६	४८७३	५७२०
कागद व स्टेशनरी.	८७७	६८७	७२७
आगगाडीचें सामान.	४७९३	१०२१२	१०९१५
तारायंत्राचें सामान.	२८५	९५१	७४३
लोंकरीचें सामान.	२४९५	११२८	१३६३
इतर.	१७३१	३८११	७५२५

व्यापाराची बाकीः—व्यापारासंबंधानें या देशाविषयीं एक गोष्ट विशेष आहे ती ही कीं, परदेशांत तयार झालेला माल हिंदुस्थानांत खपतो, त्या मालाच्या किमतीपेक्षां पुष्कळ जास्त किमतीचा माल या देशांत उत्पन्न होऊन परदेशांत खपतो. या देशांत माल तयार करण्याचे कारखाने फार थोडे आहेत व ते युरोपियन लोकांनीं तरी काढलेले आहेत किंवा त्यांचें उदाहरण घेऊन येथील लोकांनीं काढिले आहेत; याकरितां पुरेसा पक्का माल येथें तयार होत नसून, अशा प्रकारचा बराच माल देशांत पुरवठा होण्याकरितां परदेशांपासून विकत घ्यावा लागतो. या देशाची स्थिति अशी आहे कीं येथें पाहिजे तितका कच्चा माल उत्पन्न होऊं शकतो व उष्ण व समशीतोष्ण कटिबंधांतील सर्व प्रकारचे जिन्नस या देशांत होतात. शेतकीचा मालही विपुल होतो व त्याचा खपही युरोपांतील देशांत व इतर देशांत फार होतो, यामुळें तो परदेशांस फार रवाना होतो. हिंदुस्थान देशांतील लोकांची गृहस्थिति व त्यांचा राहण्याचा रिवाज हीं फार साधीं आहेत; त्यांस प्रपंचास फारशा जिनसा लागत नाहींत, यामुळें परदेशांहून येणारा माल परदेशांस जाणारे मालापेक्षां फार कमी असतो. जितका माल परदेशांस जातो तितके किमतीचा माल परत न आल्यानें हिंदुस्थानची

बाकी इतर देशांकडे नेहमीं फिरते. या बाकीबद्दल व्यापारी तऱ्हेचा मोबदला येत नाहीं. ह्या बाकीची फेड होते ती अशीः—(१) बाकी पैकीं कांहीं अंशाबद्दल सोनें व रुपें हीं येतात. या देशांतील लोकांस अनेक ऐतिहासिक कारणांनीं दागिन्याचे किंवा नाण्याचे स्वरूपानें द्रव्यसंचय करून जवळ बाळगून ठेवण्याची संवय झाली आहे; तेव्हां बाकीबद्दल येणाऱ्या सोन्यारुप्यापैकीं कांहीं नाणें पाडण्याकडे जातें व कांहीं दागिन्याकडे खपतें. (२) कांहीं बाकीपासून हिंदुस्थानचे राज्यव्यवस्थेबद्दल विलायतेस जो खर्च होतो व त्याचेसाठीं इकडून तिकडे जी रक्कम पाठवावी लागते त्याची या बाकीच्या योगानें परस्पर व्यवस्था होते. विलायतेस गेलेले मालाचे किमतीबद्दल तेथील व्यापाऱ्यांस इकडे रक्कम पाठवावयाची असते व हिंदुस्थानसरकारास विलायतेस हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरीकडे वर सांगितलेप्रमाणें रक्कम पाठवावयाची असते, यामुळें मोठी सोय होते ती अशी कीं, स्टेटसेक्रेटरी हे व्यापारी लोकांपासून विलायतेस पैसे घेऊन त्यांस हिंदुस्थानसरकारचे तिजोरीवर हुंड्या देतात; व्यापारी लोक त्या हुंड्या हिंदुस्थानांत पटवून त्या पैशानें मालाचे किमतीची फेड करितात. हिंदुस्थानसरकारास विलायतेस कोणते कारणासाठीं पैसे पाठवावे लागतात त्याबद्दल माहिती फिनान्सचे भागांत (जमाबंदीचे भागांत) दिली आहे, तेव्हां त्याबद्दल येथें फिरून सांगण्याचें कारण नाहीं. राज्यव्यवस्थेचा खर्च, लष्करखर्च, हिंदुस्थान देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठीं सरकारानें स्वतः किंवा कंपन्यांस हमी देऊन विलायतेंत कर्ज काढून आगगाड्या, कालवे, वगैरे कामें करविलीं आहेत त्यांचा व्याजाचा वगैरे खर्च, असे अनेक खर्च असतात. (३) याशिवाय खासगी लोकांनींही या देशांत कारखाने काढण्यासाठीं विलायतेस पुष्कळ कर्ज काढलें आहे व त्याचे व्याजाची रक्कम तिकडे पाठवण्याची असते, त्याचे फेडीसही ही व्यापाराची बाकी उपयोगी पडते. असे प्रकारानें या व्यापाराचे बाकीपासून हिंदुस्थानास राज्यव्यवस्थेचे संबंधानें, किंवा सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठीं झालेले खर्चासंबंधानें, विलायतेस जी रक्कम पाठविण्याची असते तिची फेड होते. आतां ही व्यापाराची बाकी किती राहते व तिचेबद्दल सोनें–रुपें किती येतें, सरकारी व खासगी देण्यांत किती रक्कम जाते याबद्दल माहिती देतों. खालील पत्रकांत माहिती सन १८७०–७१ पासून १८९२–९३ पर्यंतची आहे. आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.

हिंदुस्थानचे व्यापाराचे बाकीबद्दल कोष्टक सन १८७०-७१—१८९२-९३ अखेर.
आंकडे लक्ष रुपयांचे आहेत.

	१८७०-७१ ते १८७४-७५	१८७५-७६ ते १८७९-८०	१८८०-८१ ते १८८४-८५	१८८५-८६ ते १८८९-९०	१८९०-९१	१८९१-९२	१८९२-९३
व्यापारी माल— परदेशांस गेला—सोनें-रुपें शिवायकरून …………	२८५१५	३१२४७	४११४६	४६३४०	१००२२	१०८१७	१०६५७
आलेला माल, सरकारी स्टोर वजा करून …………	१६०९०	१८८११	२५३१५	३०५९८	६९०३	६६५८	६२६१
परदेशीं किती जास्त माल गेला तो ……………	१२४२४	१२४३६	१५८३०	१५७४१	३११९	४१५८	४३९५
पैकीं वजा होमचार्जिस वगैरे साठीं रकम …………	६०५०	८४०५	१०३६९	१०१७३	२५१२	२५६१	२६६१
—— सोनें व रुपें निवळ शिलकेंत राहिलें ते.							
सोनें. …	११६४	३०७	२३५६	१५३६	५६३	२४१	—२८१
रुपें. …	५५३२	३५२७	३०४०	४८१७	१४१७	९०२	१२८६

मागील पानावरून पुढें चालू.

	१८७०-७१ ते १८७४-७५	१८७५-७६ ते १८७९-८०	१८८०-८१ ते १८८४-८५	१८८५-८६ ते १८८९-९०	१८९०-९१	१८९१-९२	१८९२-९३
हिंदुस्थानास येणें राहिलेली रकम................	३६७६	१९५	६४	...	...	४५३	६२८
,, देणें ,,	...	...	...	७८५	१३७४	...	...
सालाची सरासरी–व्यापाराची बाकी..................	२४८४	२४८७	३१६६	३१४८	३११९	४१५८	४३९५
,, होमचार्जेस वगैरे साठीं पाठविलेली रकम.	१२१०	१६८१	२०७३	२०३४	२५१२	२५६१	२६६१
,, सोनें-रुपें शिलक राहिलें तें	५३९	७६६	१०७९	१२७०	१९८१	११४३	११०५
,, हिंदुस्थानास येणें ...	७३५	३९	१२	...	...	४५३	६२८
,, हिंदुस्थानानें देणें ...	...	...	...	१५७	१३७४	...	...

वरील कोष्टकांतील तपशील सन १८७०–७१ पासून सन १८९२–९३ पर्यंतचा आहे. सर रि. टेंपलसाहेब हिंदुस्थानसरकारचे फडणवीस असतां त्यांनीं सन १८३५ पासून १८७१ पर्यंत ही व्यापाराची बाकी कोणाकडे किती फिरते याचा हिशेब करून तिजबद्दल तपशील दाखविला होता तो असा:– त्या ३६ वर्षांत व्यापारी माल १०१२ कोटि रुपयांचा परदेशीं गेला व ५८३ कोटींचा माल परदेशांहून या देशीं आला; या मुदतींत सोनें-रुपें ३१२ कोटी रुपयांचें आलें व ३७ कोटींचें परदेशांत गेलें; ह्मणजे निवळ सोनें-रुपें २७५ कोटींचें इकडे राहिलें; वजावाट होतां १५४ कोटी रुपयांबद्दल व्यापारी तऱ्हेचा मोबदला आलेला नव्हता, अशी बाकी राहिली. तींतून हिंदुस्थानचे स्टेट-सेक्रेटरी यांचे मार्फत विलायतेंत होणारा खर्च ११३ कोटी रुपये झाला होता, तो वजा केला ह्मणजे खरी बाकी काय ती ४१ कोटी राहिली. त्या रकमेनें खासगी व्यापारासाठीं काढलेले कर्जाचें व्याज, इकडे नौकर लोकांनीं शिलक टाकलेली रकम विलायतेस पाठविण्याची असते ती, मालाचें भाडें व इतर कर्जें यांची फेड झाली होती.

सन १८७०–७१ पासून १८९२–९३ पर्यंत सोनें-रुपें आलें व परदेशांस गेलें त्याची वजावाट करतां या देशांत सोनें ५८ कोटि ८० लक्षांचें राहिलें, व रुपें १६५ कोटी २३ लक्षांचें राहिलें; ह्मणजे एकंदर सोनें–रुपें मिळून २२४ कोटी ३ लक्षांचें राहिलें. या तेवीस सालांची सरासरी काढली तर दरसाल सोनें-रुपें ९कोटी ७४ लक्षांचें आलें आहे. त्याचे पूर्वीचे कालाचा विचार पाहिला तर, १८३९-४० पासून १८५४--५५ पर्यंत दरसाल अडीच कोटींचें व त्याचे पुढील पंधरा वर्षांत ह्मणजे सन १८५५।५६ ते १८६९।७० पर्यंत दरसाल पंधरा कोटींचें सोनें-रुपें येत गेलें. या दुसऱ्या मुदतींत घडामोडी फार मोठ्या झाल्या होत्या. बंडामुळें खर्च फार झाला होता व त्यानंतर राज्यकारभार सुव्यवस्थित करण्यासाठीं खर्च वाढला, व आगगाड्या वगैरे पब्लिक वर्क्सचीं कामें करण्यासाठीं कर्ज काढण्यांत आलें; अमेरिकेंतील लढाईमळें इकडील कापूस विलायतेस फार गेला होता; त्याचे किंमतीचा ऐवजही येणें होता; या सर्व गोष्टींमुळें या मुदतींत या देशांत पैसा पुष्कळ आला व त्यामुळें सोनें व रुपें यांची सरासरी पुष्कळ वाढली. याचे पुढील मुदतींत सरासरी ९ कोटी ७४ लक्षांची पडते हें वर सांगितलेंच आहे. सोनें व रुपें किती येत असे तें वरील कोष्टकांत दिलेंच आहे. सन १८९२--९३ सालापर्यंत दरसाल सोनें व रुपें ह्या दोन्ही धातू येत असत; त्या सालीं मात्र सोनें आलें त्यापेक्षां २ कोटी ८१ लक्षांचें सोनें जास्त गेलें. सोन्याचे मानानें रुप्याची किंमत अलीकडे फार उतरत गेल्यामुळें

हिंदुस्थानांत रुपें सन १८८५--८६ पासून जास्त येऊं लागलें व आलेल्या रुप्याचे बहुतेक रुपये पाडण्यांत आले.

व्यापाराचीं यानें--समुद्रावरून व्यापार झाला त्यासाठीं गलबतें व आगबोटी मिळून किती लागलीं होतीं त्याची माहिती येणेंप्रमाणें.

आलेलीं गलबतें.

	१८७५-७६	१८८१-८२	१८९१-९२
ब्रिटिश	१६५२	२३६७	२३२५
ब्रिटिश इंडियन	२१०६	१४७८	९५३
परदेशांचीं	८१७	८१२	७२१
देशी	१६८४	१८०३	१६८७
बेरीज	६२५९	६४६०	५६८६
यांचें बारदान किती टनांचें होतें तें–	२६२९९२३	३६३२२४८	४३०८३७५

गेलेलीं गलबतें.

	१८७५-७६	१८८१-८२	१८९१-९२
ब्रिटिश	१७९६	२४९४	२३३५
ब्रिटिश इंडियन	१८६४	१३९०	९७७
परदेशी	८८७	७८७	६४५
देशी	१६५४	१६११	१५१५
बेरीज	६२०१	६२८२	५४७२
त्यांचें बारदान किती टनांचें होतें तें–	२७९९०६३	३७३६६३८	४२८२२७६

सन १८९१-९२ सालीं यांत वाफेनें चालणारीं गलबतें ८० टक्के होतीं. सन १८८१-८२ सालीं हें प्रमाण ६२ टक्के होतें. गलबतांची संख्या कमी झाली आहे, ह्मणजे पूर्वींपेक्षां आतां गलबतें मोठालीं असतात. देशी गलबतें कमी होत आहेत.

हिंदुस्थानांतील बंदरांचा परस्परांशीं व्यापार–या देशाचा परदेशांशीं व्यापार होतो त्याशिवाय देशांतले देशांतच वेगळाले बंदरांचा परस्परांशीं पुष्कळ व्यापार होतो. हा व्यापार तीन तऱ्हेनें होतो. देशांत उत्पन्न होणारे जिन्नस जरूरीप्रमाणें प्रांता-प्रांतांत अदलाबदल करणें, ते जिन्नस परदे-

शांस रवाना करण्यासाठीं मुख्य बंदरीं आणणें व परदेशांहून आलेला माल वेगळाले प्रांतांत वांटून देणें, असे तीन प्रकारचा हा व्यापार आहे. हा व्यापार करणारीं सर्वच बंदरें इंग्रजांचे हद्दींत नाहींत. कांहीं एतद्देशीय संस्थानांचे हद्दींत आहेत. गोंवा, पांडिचरी वगैरे परराष्ट्रांचीं कांहीं बंदरें आहेत.

हा व्यापार किती होतो तें खालील आंकड्यांवरून दिसून येईल. आंकडे लाख रुपयांचे आहेत.

आयात व्यापार.	१८८१-८२	१८९१-९२	१८९३-९४
व्यापारी माल.	२४४२	३२००	३५११
सोनें-रुपें.	२८८	२८६	१२२
	२७३१	३४८६	३६३३
निर्गत व्यापार.			
व्यापारी माल.	२२७७	३०२९	३०५०
सोनें-रुपें.	२९६	२७२	१६०
	२५७४	३३०१	३२१०
आयात व निर्गत व्यापाराची बेरीज.	५३०५	६७८७	६८४३

यांत सरकारी माल जातो व येतो त्याचा समावेश केलेला नाहीं.

धान्यें, कापूस, कापसाचा माल, ज्यूटचा (तागाचा) माल, मसाला, गळितांचीं धान्यें, खाण्याचे जिन्नस, सोंठ, सागवानी व इतर इमारती लांकडें, नारळ व खोबरें, तंबाखू, ज्यूट (ताग), साखर, तेलें, काफी, कातडीं, दारू, कोळसा, चहा हे ह्या व्यापारचे जिन्नस आहेत.

ह्या व्यापारांत प्रांतवार कांहीं विशेष गोष्टी आहेत त्या विस्तारभयास्तव गाळल्या आहेत. प्रांतांतील पांच मुख्य बंदरांचा किती व्यापार झाला तें मात्र सांगतों.

आंकडे लाख रुपयांचे आहेत.

आयात व्यापार.	१८८१-८२	१८९१-९२	१८९२-९३
बंगाल.	२५०	५४८	५६५
मुंबई.	९७२	१२३१	१५५१
सिंध.	१९८	२५५	२७४
मद्रास.	८२	६६४	६५३

ब्रह्मदेश.	१९२	४९९	४६७
निर्गत व्यापार.			
बंगाल.	४५८	८४८	६०७
मुंबई.	६३१	१२५९	१३८९
सिंध.	९७	१३६	१३३
मद्रास.	५५	५२६	५०४
ब्रह्मदेश.	७८	२५८	४१५

ही माहिती खासगी व्यापारी मालासंबंधानेंच आहे.

यावरून मुंबई व सिंध प्रांतांचे वांटणीस जवळ जवळ निम्मे व्यापार पडतो. यांचे कारण असें आहे कीं, या प्रांतांत गलबतें चालण्यासारख्या मोठाल्या नद्या नाहींत व किनाऱ्यावरील भाग सुपीक व संपन्न आहेत, त्यामुळें समुद्रकिनाऱ्यावरून व्यापार चांगला चालतो. सिंध प्रांतांतील माल मुंबई प्रांतांत खपतो व सिंधेस इतर प्रांतांचा माल मुंबईचे मार्फत मिळतो. बंगाल्याची स्थिति याहून भिन्न आहे. या प्रांतांत गलबतें चालण्यासारख्या नद्या पुष्कळ असल्यानें त्या मार्गानें व्यापार फार होतो. या प्रांतांचे किनाऱ्यावर बंदरें चांगलीं नाहींत व किनाऱ्यावरील भागही दरिद्री आहेत, यामुळें किनाऱ्यानें व्यापार फार होत नाहीं. मद्रासचे किनाऱ्याची स्थिति बहुतेक अशीच आहे, तेव्हां या प्रांतांत व्यापार खुष्कीनें फार होतो. ब्रह्मदेशाचा व्यापार बहुतेक बंगाल प्रांताशींच होतो.

ह्या व्यापारापैकीं तीन हिस्से व्यापार आगबोटींतून व एक हिस्सा गलबतांतून होतो. पूर्वीचे मानानें आगबोटी जास्त होत चालल्या आहेत.

परदेशांशीं खुष्कीनें होणारा व्यापार-- हिंदुस्थानचे उत्तरबाजूस जे देश आहेत त्यांचेबरोबरही कांहीं व्यापार होतो. ह्या व्यापाराचा हिशेब ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे, परंतु तो समुद्रावरील व्यापारासंबंधानें जसा विश्वसनीय असतो तितका असत नाहीं. हा व्यापार किती होतो ह्याबद्दल माहिती पुढें येईल. आतां व्यापार कोणते देशांशीं होतो व मुख्यत्वें कोणते जिनसांचा होतो त्याचें पहिल्यानें विवरण करावयाचें आहे. वायव्य सरहद्दीवरून बलुचिस्थान व अफगाणिस्थान व मध्यएशियांतील देशांशीं व्यापार तीन मार्गानें चालतो. खिलात, कंदाहार वगैरे भागांचा व्यापार बोलन घाटानें चालतो. गिझनी वगैरेकडून व्यापारी लोक देराइस्मालखान येथें गुमाल घाटानें येतात. काबुलाकडील व्यापारी खैबरघाटानें पेशावरास येतात. अफगाणिस्थानांतून

रेशीम, वाळविलेलीं फळें, मंजिष्ट व दुसरे रंग, औषधें, लोंकर वगैरे पदार्थ येतात. इकडून तिकडे कापड, चहा, नीळ, व मीठ हे पदार्थ जातात.

मध्यएशियांतील प्रदेशांबरोबर व्यापार चालतो. त्यापैकीं कांहीं काश्मीरचे द्वारें लडाख, यार्कंद, काशगर वगैरेंशीं होतो. त्याची घडामोड अमृतसर व जलंदर येथें होते. काश्मिरांतुन शालीची लोंकर, चरस रेशीम, सोनें-रुपें वगैरे माल येतो. कापड, धान्यें, धातू, मीठ, चहा व नीळ हे पदार्थ तिकडे जातात.

नेपाळचा व्यापार सरहद्दीवरील खेड्यांचे बाजारांत होतो. सर्व मालावर नेपाळांत जकाती घेण्यांत येतात. व्यापाराचा मुख्य मार्ग पाटण्याहून निघून काटमांडू येथें जातो; तेथून पुढें फुटून त्याचे दोन मार्ग होतात व ते तिबेटांत जातात. नेपाळांतून खाण्याचीं धान्यें, गळिताचीं धान्यें, जनावरें, इमारती डांकूड, व शिंगें हे पदार्थ येतात. कापसाचे, लोंकरीचे, व रेशमी कपडे, मीठ, धातू, कापूस, साखर व मसाल्याचें सामान हे पदार्थ तिकडे जातात.

आग्नेय कोंपऱ्यास सुतानापासून मणिपुरापर्यंतचे भागांत जे डोंगरी लोक राहतात त्यांचेबरोबर कांहीं व्यापार होतो. हे लोक तांदूळ, कापड, मीठ, धातू, वगैरे जिन्नस घेतात व कापूस, रबर, लाख, मेण वगैरे जंगली माल देतात.

ब्रह्मदेशाचा सियामावरोबर व चिनावरोबर खुष्कीनें होणारे व्यापाराचा हिशेब ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे.

खुष्कीनें परदेशांशीं व्यापार किती होतो त्याबद्दल माहिती खालीं दिली आहे.

	आयात व्यापार.		निर्गत व्यापार.	
	१८८१--८२	१८९१--९२	१८८१--८२	१८९१--९२
खिलात व कंदाहार.	२२५१	६९२२	८७३	६००३
काबूल.	८३८९	६५३६	२७८२	२१८१
काश्मीर.	३५९१	६६१६	४९५९	६५०५
तिबेट.	२१९	४९५	६४२	१३०६
नेपाळ.	८६६७	१३५८५	१३८९५	१६४५०
भुतान.	१२८	२२७	१८५	३३०
सियाम.	१५०४	७०९	३९९	४८८
शान संस्थानें.	२७६	१७४३	६०६	२६०१
पश्चिमचीन.	...	१४०५	...	४६३
एकंदर खुष्कीनें होणारा व्यापार *	२८४८४	४०५३६	३४२२०	४२४०८

* या बेरजेंत वरील ठिकाणें व सरहद्दीवरील इतर ठिकाणें या सर्वांशीं होत असलेले व्यापाराचा समावेश होतो.

देशांतले देशांत जो व्यापार चालतो त्याबद्दल माहिती सांगतां येण्यासारखी नाहीं. खेडेगांवांतून माल गोळा करून ठिकठिकाणीं जमवून अखेरीस मुख्य बंदरीं पाठविणें, परदेशांतून आलेला माल देशांत ठिकठिकाणीं पाठविणें, एका प्रांतांत होत असलेला माल दुसरे प्रांतांत नेणें वगैरे असंख्य प्रकारच्या घडामोडी होतात. हा व्यापार किती होतो त्याबद्दल तपशील मिळणें शक्य नाहीं. सन १८९१ चे मनुष्यगणतीवरून ४७ कोटी लोक (पुरुष, बायका, मुलें मिळून) व्यापारावर निर्वाह करितात असें दिसून येतें.

भाग पंधरावा.

पब्लिक वर्क्स.

पब्लिकवर्क्सखात्यांत (१) आगगाड्या, (२) पाट–बंधारे, व (३) इमारती व रस्ते अशा तीन शाखा आहेत. आगगाडीखात्याची व्यवस्था हिंदुस्थानसरकारचे हातीं आहे; दुसऱ्या दोन्ही शाखा प्रांतिक सरकारांचे हातीं आहेत. तीन्ही शाखांचा मिळून खर्च किती होतो तो खालीं दिला आहे. आंकडे हजार रुपयांचे आहेत.

	१८९१--९२		१८९४-९५ (अंदाज)	
	जमा	खर्च	जमा	खर्च
आगगाड्या	१९९३८०	२०२५३९	२०४०८४	२२५३८३
पाट--बंधारे	२२७२०	२९४५०	२४६३८	२९०९४
रस्ते व इमारती	६२७१	६२०८७	६२९२	५४८९१
लष्करी	(४९७)	(१२१४५)	(४६८)	(१००६८)
सिव्हिल	(५५७३)	(४९९४२)	(५८२४)	(४४८२३)
बेरीज	२२८३७२	२९४०७६	२३५०१४	३०९३६८

आगगाड्या.

या देशांत आगगाड्या करण्यास सुरवात लार्ड डलहौसी यांचे कारकीर्दीत झाली. आगगाडींतून पहिल्यानें उतारून नेऊं लागण्यास सुरवात मुंबई व ठाण्याचें दरम्यान सन १८५३ सालीं झाली. त्याचे पुढचे सालीं ईस्ट इंडिया रेलवेने कलकत्त्यापासून ३८ मैल रस्ता सुरू केला. मद्रासरेल्वेनें सन १८५६ सालीं पहिल्यानें ६५ मैल रस्ता खुला केला. साउथ इंडिअन रेलवेची सन १८६१ सालीं सुरवात झाली. सन १८५३ सालीं आगगाडी २० मैल होती. सन १८६१ सालीं १५८८ मैल, सन १८७१ अखेर ५०७७½ मैल, सन १८८१ अखेर ९८९२ मैल, व सन १८९१ अखेर १७२८३ मैल, सन १८९३ अखेर १८४५९ मैल खुली होती. यावरून आगगाड्यांचा विस्तार कसा झाला तें दिसून येईल.

आगगाड्या तीन रीतीनें करण्यांत येतात.

(१) कंपन्यांकडून त्यांस व्याजाबद्दल हमी देऊन.

(२) कंपन्यांस कांहीं थोडी मदत देऊन.

(३) सरकारमार्फत.

आगगाड्या बांधण्यास पहिल्यानें सुरवात झाली ती ज्या कंपन्यांचे भागीदारांस सरकारांनीं व्याज देण्याची हमी दिली होती असे कंपन्यांकडून झाली. त्याचे पूर्वी हमीशिवाय खासगी कंपन्यांनीं आगगाड्या बांधाव्या असेबद्दल सन १८४३ पासून खटपट सुरू होती ; परंतु त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं ; तेव्हां, कंपन्यांस व्याजाची हमी देण्याची पद्धति सन १८४९ सालीं सुरू झाली. त्याप्रमाणें मुंबई, मद्रास व कलकत्ता ह्या तीन राजधान्या जोडणाऱ्या आगगाड्यांचे रस्त्यांची सुरवात अशा कंपन्यांचे हातून झाली व त्या पुऱ्या होऊन आगगाडीद्वारें त्या शहरांचा परस्पर प्रत्यक्ष संबंध सन १८७१ सालीं जुळला.

आतां या हमीचे कराराचे शर्तीसंबंधानें चार शब्द सांगणें जरूर आहे. सरकारांनीं पहिल्यानें व्याजाबद्दल हमी दिली ती ९९ वर्षांचे मुदतीची दिली ; तीप्रमाणें भागावर काढलेले कर्जावर शेंकडा पांच टक्के व्याज देण्याचें व डिबेंचरवर काढलेले कर्जावर कांहीं कमी दरानें व्याज देण्याचें कबूल केलें होतें ; शिवाय जमीन फुकट दिली होती. अशा कंपन्या सरकारचे देखरेखीखालीं कामें करतात व निवळ उत्पन्नांतून व्याज भागलें नाहीं तर तूट सरकार भरून देतात व बचत राहिली तर ती सरकार व कंपनी निमेनिम वांटून घेतात. या कंपन्यांनीं आगगाड्यांतून टपाल फुकट नेण्याचें व सैन्य व सरकारी स्टोराचें सामान कमी दरानें नेण्याचें असतें. रेल्वेसंबंधानें सर्व व्यवहार रुपयास १

शिलिंग १० पेन्स ह्या दरानें होण्याचा असतो ; परंतु बचतीची रकम विलायतेस पाठविण्याची ती त्या त्या वेळीं असलेले हुंडणावळीचे दराप्रमाणें पाठविण्याची आहे. याप्रमाणें केलेल्या आगगाड्या कांहीं नियमित मुदतीस, उदाहरणार्थ २५, ५०, १०० वे वर्षी सरकारास विकत घेतां येतात. तसेंच आगगाड्या घेऊन सरकारांनीं आपले भांडवलाचा पैसा द्यावा असें कंपन्यांस ह्मणण्याची परवानगी असते. त्या विकत घेतांना भांडवल, (भागाची किंमत पूर्वीचे तीन वर्षाचे सरासरीनें निघेल त्या दरानें) सरकारांनीं द्यावें लागतें ; किंवा ९९ वर्षांपैकीं उरलेले मुदतीपर्यंत भागीदारांस आन्यूइटी (वर्षासन) दिली तरी चालतें. ९९ सालांचे अखेरीस हमी दिलेले कंपनीचा रस्ता, जमीन व कारखाने, गाड्या वगैरे सर्व सरकारास मिळण्याची असते. सन १८६९–७० सालीं हमी देण्याबद्दलचे नियमांत बचतीचे विभागासंबंधानें पालट झाला व २५ वे वर्षी आगगाडी विकत घेण्याचा हक्क सरकारांनीं सोडून दिला. ही नवीन व्यवस्था हमीवाले कंपन्यांपैकीं तीन कंपन्यांनीं कबूल केली. यानंतर पुढें वेगळाले कंपन्यांशीं वेगळाले तऱ्हेनें ठराव झाले आहेत. ईस्टर्न बंगाल रेल्वेस ३ $\frac{1}{2}$ टक्यांचेच व्याजाची हमी देण्यांत आली आहे ; व तीस बचतीपैकीं चवथा हिस्सा मिळण्याचा आहे. ही रेल्वे भागाची रकम बरोबर देऊन सरकारास मिळण्याचा हक्क सन १९०५ सालीं उत्पन्न होईल ; व त्यानंतर दर दहा वर्षांस ही रेल्वे विकत घेण्याचा सरकारास अधिकार राहील. सदर्न मराठा रेल्वेसही तशीच हमी आहे व ती सरकारांनीं विकत घेण्याची मुदत २५,३५, किंवा ४५ वर्षे अशी ठरली आहे. बंगाल–नागपूर, व इंडियन मिडलंड यांस ४ टक्के व्याजाची हमी दिलेली आहे. आगगाड्या करण्यासाठीं किंवा कंपन्यांस कर्ज देण्यासाठीं एक कोटि पौंडांपर्यंत कर्ज काढण्याची स्टेटसेक्रेटरीस ५१ व्हिक्टोरियाचा ५ वे कायद्यावरून अधिकार आहे. पाउंड ७१३०३८० कर्ज काढण्यांत आलें आहे (सपटंबर १८९२ पर्यंत). ही रकम बहुतेक बंगाल–नागपूर व सदर्न मराठा ह्या कंपन्यांसच देण्यांत आली आहे ; त्या रकमेवर कंपन्यांकडून व्याज येतें.

स्टेटरेल्वे ह्या सरकार आपण कर्ज काढून आपल्या नौकर लोकांचे मार्फत करतें. लार्ड डलहौसी यांनीं लांब लांब पल्याच्या मुख्य आगगाड्या चालू केल्या, त्या सर्व रुंद रुळीच्या मार्गाच्या (ब्राड गेज) आहेत. त्यानंतर पुढें लार्ड मेयो यांणीं फीडर आगगाड्यांचे रस्ते ह्मणजे मोठ्या रस्त्यांस पुरवठा करणाऱ्या गाड्यांचे रस्ते चालू केले; ते लहान अरुंद प्रमाणाचे (गेजचे) केले. हे रस्ते बहुतेक सरकारी आहेत. ते सरकारांनीं कर्ज काढून आपले नौकर लोकांचे मार्फत बांधलेले आहेत. अलीकडे " असिस्टेड " (मदत दिलेल्या) कंपन्यांकडून आगगाड्या

बांधण्याचाही क्रम चालू आहे. या कंपन्यांस सरकार हळकें व्याज कांहीं मुदत देण्याची हमी देतें, जमीन फुकट देतें व दुसऱ्या किरकोळ सवलती देतें, व हमी दिलेले व्याजापेक्षां जास्त उत्पन्न झालें तर तें पूर्वीं जें व्याज आंगावर द्यावें लागलें असेल त्याचे बदलीं घेतें. याशिवाय चालू जमेपैकीं कांहीं रक्कम स्थानिक आगगाड्या करण्याकडे खर्च होते; याबद्दल रेव्हेन्यू हिशेब ठेवण्यांत येत नाहीं. फामिन इशुअरन्स फंडापैकीं कांहीं रक्कम दुष्काळी प्रांतांत आगगाड्या करण्याकडेही खर्च होत आहे; त्याबद्दल आजपर्यंत खर्च किती झाला तो १५७ पानावर सांगितला आहे. याशिवाय कांहीं संस्थानिक आपले खर्चानें आगगाड्या तयार करतात. ह्या बांधण्याचें कामही हिंदुस्थानसरकारचे नौकरांमार्फतच किंवा दुसरे कंपन्यांचे मार्फत ह्मणजे ज्यांचे आगगाड्यांशीं ह्या संस्थानाच्या आगगाड्या येऊन मिळतात त्यांचे मार्फत करण्यांत येतें.

ग्यारंटी (हमी) दिलेल्या आगगाड्या बहुतेक सरकारांनीं विकत घेतल्या आहेत. आतां ग्रेट इंडियन, बांबे बडोदा व मद्रास रेल्वे ह्या आगगाड्या मात्र पूर्वींचे कंपन्यांकडे आहेत.

येथपर्यंत आगगाड्या बांधण्याची तजवीज कसे प्रकारानें झाली व होत आहे याबद्दल झालें. आतां सर्व आगगाड्यांपासून उत्पन्न किती होतें व खर्च किती होतो, माल व मनुष्यें किती जातात हें दाखविण्यासाठीं एक कोष्टक देतों. या बाबतींत सालोसाल वृद्धी कशी होत गेली आहे हें दाखविण्यासाठीं दहा दहा वर्षांचे अंतरानें कांहीं सालचे आंकडे दिले आहेत. शेवटचे ६ कोष्टकांतील आंकडे लक्षाचे आहेत.

सालें दिजंबर अखेर.	सुरू असलेले आगगाडीचे रस्त्यांची लांबी.	खर्च झालेलें भांडवल.	उतारूंची संख्या.	माल नेण्यांतआला त्याचें वजन.	जमा.	खर्च.	निव्वळ प्राप्ती.
	मैल.	लक्ष रु.	लक्ष.	लक्ष टन.	लक्ष रु.	लक्ष रु.	लक्ष रु.
१८७१	५०७७½	९२३४	१८८	३३	६१४	३४५	२६८
१८८१	९८९२	१३४२०	५२२	१३२	१३७२	६७७	६९५
१८९१	१७२८३	२२७६६	१२१९	२५९	२३९०	११२१	१२६८
१८९३	१८४५९	...	१३४७	२८७	२३९५	११२७	१२६७

ह्या कोष्टकांतील रकमांचा कांहीं तपशील देणें इष्ट दिसतें. आगगाड्यांचे प्रकार वर सांगितले आहेत, त्या प्रत्येक प्रकारचे आगगाड्यांचा रस्ता, त्यांची जमा व खर्च किती होतों याबद्दल माहिती देतों. ही माहिती सन १८९१ सालाबद्दल आहे. हें साल घेण्याचें कारण तें दशवार्षिक रिपोर्टाचें साल आहे.

आगगाड्यांचा रस्ता किती चालू होता त्याचा तपशील येणेंप्रमाणें :—ग्यारंटीड (हमी दिलेल्या) कंपन्यांच्या आगगाड्यांवा रस्ता मैल २५८७; असिस्टेड (मदत दिलेले) कंपन्यांचा रस्ता मैल ८४१; सरकारी (स्टेट) आगगाड्यांचा रस्ता मैल ११५२० ; संस्थानिकांच्या आगगाड्या मैल १४३३ ; एकूण मैल १७२८३. (हे आंकडे स्टाटिस्टिकल आब्स्त्राक्टावरून घेतले आहेत व त्यांत हमी दिलेले कंपन्यांचे बेरजेंत व तपाशिलांत अंतर आहे.)

सन १८९१.	उत्पन्न हजार रु.	चालू खर्च.
ग्यारंटीड कंपन्या.	७६२०३	३७७२३
असिस्टेड कंपन्या.	२६२३	१४६८
स्टेटआगगाड्या.	१५३८२७	६९२६३
संस्थानिकांच्या आगगाड्या.	६४१९	३७३२
बेरीज हजार रुपये	२३९०७२	११२१८६

सन १८९१ अखेर भांडवल कोणते प्रकारचे आगगाड्यांवर किती खर्च झालें होतें त्याचा तपशील येणेंप्रमाणें :—

	रुपये.
१ सरकारांनीं आगगाड्या बांधल्या किंवा विकत घेतल्या त्यांचेवर....	...१३३५४६०७४०
२ सरकारी आगगाड्या कंपन्यांकडून करविलेल्या	... २८११३७६३०
३ ग्यारंटीड (हमीच्या) कंपन्यांनीं खर्च केलेला	... ४९२०५८६८०
४ मदत दिलेल्या कंपन्यांनीं खर्च केले ते	... ५६०७०३६०
५ संस्थानिकांनीं खर्च केलेले	... ८६००२५१०
६ परराष्ट्रांच्या आगगाड्या... ...	... १६८९०६८०
७ रेल्वेची सर्व्हे वगैरे करण्यांत खर्च ...	... ९०७७०५०
	२२७६६९७६५०

आगगाड्यांसंबंधानें हिशेब दिजंबरअखेर साल धरून ठेवलेले असतात; त्यांचेप्रमाणें वरील माहिती सन १८९१ दिजंबरअखेर दिली आहे. सरकारी

जमाखर्च मार्चअखेर सालाचे असतात, त्याप्रमाणें पान १२१ वरील जमाखर्चाचे कोष्टकांत आंकडे दिले आहेत. त्याचा वेगळाले प्रकारचे आगगाड्यांचे संबंधानें तपशील देतों तो असा:-

	जमा हजार रुपये	चालू खर्च	इतर
स्टट(सरकारी) आगगाड्या.	१६४११९	८२१४५	८०८७९
ग्यारंटीड आगगाड्या.	३४९३१		३८२६३
मदत दिलेल्या आगगाड्या.	३३०		३३१
किरकोळ खर्च.	——		९२१
	१९९३८०		२०२५३९

सन १८९१-९२चे पूर्वीचे दहा वर्षांचे मानानें आगगाड्यांची वृद्धी कशी झाली आहे हें पाहतां, असें दिसतें कीं, रस्ता १८८०-८१ सालीं शंभर मैल होता असें धरलें तर सन १८९१-९२ सालीं १८६ झाला; त्याच प्रमाणानें उतारू २४२, माल १९८, निवळ उत्पन्न १७७ असें झालें होतें.

सन १८९१–९२ सालीं आगगाड्यांकडे २६०६०० नौकर लोक होते त्यांत २५००३६ नेटिव, ४६२६ युरोपियन व ५९३६ युरेशियन असे होते.

या सालीं अपघात झाले त्यांत ६४५ इसम मयत झाले, १०८४ दुखावले गेले. एकंदर अपघात ४२९८ झाले त्यांपैकीं रेल्वेआक्टाप्रमाणें सरकारास कळविण्यास लायख असे १६६ होते.

सन १८९१–९२ सालीं आगगाड्यांतील व्हालंटीअर पलटणींत युरोपियन व युरेशियन ९५२५ होते; पैकीं ८९०३ चांगले तयार होते.

पाट-बंधारे व कालवे.

या देशास पाटबंधाऱ्यांचें महत्व किती आहे याचें वर्णन शेतकीचे भागांत केलें आहे. शेतकीवरच जनसमाजाचा चरितार्थ चालण्याचा असलेमुळें व पर्जन्यवृष्टीचें मान अनिश्चित असलेमुळें कृत्रिम उपायांनीं उदकसंचय करण्याची किंवा उदकप्रवाह आणण्याची रीत पूर्वीचे राजांचे कारकीर्दीपासून आहे. सिंध देश निर्जल असूनही प्राचीन काळीं कृत्रिम उदकप्रवाहांनीं तो फार सुपीक झाला होता; तसेंच कावेरी नदीचे पाट १६०० वर्षांपूर्वींच बांधण्यांत आले होते; तेच आतांही सुधारणा होऊन चालू आहेत. यमुनेचे पूर्व व पश्चिमेकडील कालवे हे फेरोजशहा तघलख व शहाजहान यांचे कारकीर्दींत झाले आहेत. इंग्रज सरकारांनीं पाट-बंधाऱ्यांचीं मोठालीं कामें केलीं आहेत. त्यांनीं पहिला मोठा

कालवा गंगा नदीला काढला; तें काम बांधण्यास सन १८४८ सालीं सुरवात होऊन त्यांत पाणी सोडण्याचें लार्ड डलहौसी यांणीं सन १८५४ सालीं सुरू केलें. त्याच सुमारास दक्षिणेंतही गोदावरी, कृष्णा व कावेरी या नद्यांचे पाट-बंधारे बांधण्यांत आले. या सरकारी प्रयत्नांस चांगलें यश आलेलें पाहून मद्रासेकडे व कलकत्याकडे दोन तीन कंपन्यांनीं पाट-बंधारे बांधण्याचें काम करण्याचा उद्योग केला, परंतु त्यांचे हातून तें काम सिद्धीस गेलें नाहीं; व त्यांस तीं कामें सरकारचे स्वाधीन करावीं लागलीं. वायव्य प्रांतांतील महत्वाचे पाट-बंधारे यमुना व भागीरथी नद्यांचे आहेत. शरदृतूंत व वसंतऋतूंत बर्फ वितळून या नद्यांस पूर येण्याचें पूर्वीं, शेतकीस पाण्याची फार जरूर असते; असे वेळीं या कृत्रिम पाटांचे पाण्याचा फार उपयोग होतो. पाणी आणण्यासाठीं हरिद्वार येथें गंगेचा बहुतेक प्रवाह पाटांत घेण्यांत आला व तो पुढें नेण्यासाठीं अचाट श्रम व पैसा खर्च केला आहे. या पाटाचें हरिद्वारापासून पहिले वीस मैलांतील काम पाहण्यासही फार फार मनोहर आहे. कांहीं ठिकाणीं हा कालवा नद्यांचे पोटांतून नेला आहे, व त्याचेवरून सर्व नदीचा प्रवाह जातो. कोठें मैल दोन मैलपर्यंत पूल बांधून त्यावरून तें पाणी नेलें आहे. त्या पाटाचे उगमापासून २०० मैलांवर भागीरथी नदीस फिरून एक पाट काढण्यांत आला आहे. दोन्ही पाटांचें मिळून दरसेकंडास १०००० घनफूट पाणी लोकांस देण्याचें सामर्थ्य आहे. भागीरथीचे कालव्याचे प्रमाणानें लहान परंतु एकंदरींत चांगले मोठे असे तीन कालवे यमुना नदीचे काढले आहेत. इतर प्रांतांतही मोठीं कामें आहेत, परंतु या कालव्याचेबद्दल तपशील येथें देण्याचें कारण सरकारांनीं या कामीं कसे दीर्घ प्रयत्न केले आहेत हें दाखवावें हें आहे. कालव्यासंबंधानें प्रांतवार वर्णन पुढें क्रमानें येईल.

पाट-बंधाऱ्यांचे दोन मुख्य वर्ग आहेत. (१) प्रोडक्टिव्ह (ह्मणजे उत्पन्न येणारे) व (२) प्रोडक्टिव्ह शिवायकरून दुसरे. तिसरा एक वर्ग आहे त्याचें नांव प्रोटेक्टिव्ह (संरक्षणासाठीं केलेले); या वर्गाचे पाट-बंधारे दुष्काळ-निवारणार्थ फंडांतून केलेले असतात. प्रोडक्टिव्ह वर्गाचे पाटबंधारे कर्ज काढून केले तरी चालतात व त्यांचेसाठीं कर्ज काढून ते केलेले असोत किंवा चालू खर्चांतून ते केलेले असोत, या कामांवर खर्च झालेले पैसे भांडवल असें समजून त्यांवर हिशेबीं व्याज आकारण्यांत येतें. दुसरे वर्गाचीं कामें चालू जमेंतूनच केलीं पाहिजेत. त्यांचेवर खर्च झालेले भांडवलावर व्याज आकारण्यांत येत नाहीं. पहिले वर्गाचे व दुसरे वर्गांपैकीं कांहीं कामांचें क्यापिटल (ह्मणजे भांडवलाचे) व रेव्हिन्यू ह्मणजे जमेचे असे हिशेब ठेवण्यांत येतात.

पाट बंधारे व तळीं यांची आणखी एक प्रकारची वर्गवारी आहे; तिचेप्रमाणें असे कामाचे दोन वर्ग आहेत. मेजर ह्मणजे मोठीं व मायनर ह्मणजे लहान. हा फरक साधारण तीं कामें करण्यास लागलेले शास्त्रीय ज्ञानाचे संबंधानें केलेला असतो, त्यांचे विस्तारासंबंधानें केलेला नसतो. या पहिले (मेजर) वर्गांत प्रोडक्टिव्ह व प्रोटेक्टिव्ह या वर्गांचीं कामें येतात. मायनर (लहान) या वर्गांत चालू जमेंतून केलेलीं कामें येतात. या चालू जमेपैकीं केलेले कामांपैकीं कांहीं कामांबद्दल क्यापिटल व रेव्हेन्यु हिशेब वर सांगितल्याप्रमाणें ठेवतात, तरी त्यांत व्याज आकारण्यांत येत नाहीं. मेजर वर्गांचे सर्वच कामांबद्दल तसे हिशेब ठेवतात; व या वर्गांत कांहीं कामांवर चालू जमेंतून खर्च झाला असला तरी त्याचेवर व्याज आकारण्यांत येतेंच. ह्या वर्गवाऱ्या सर्व हिशेबी कामांचे उपयोगाच्या आहेत. पाटबंधाऱ्यापासून कांहीं वसूल प्रत्यक्ष इरिगेशन खात्याकडेस येतो, व कांहीं वसूल जमीनबाबेचे स्वरूपानें येतो, व असा वसूल झालेला असला ह्मणजे त्यापैकीं कांहीं अंश पाटबंधाऱ्याचे हिशेबीं दाखल करण्यांत येतो.

आतां पाटबंधाऱ्याचे कामावर आजपर्यंत किती खर्च झाला आहे व उत्पन्न किती होत आहे व चालू खर्च किती लागत आहे याबद्दल माहिती देतों.

भांडवल खर्च.			रुपये.
(मेजर) मोठीं कामें सन	१८७३-७४	अखेर	८१२९९४१०
——	१८८२-८३	—	२०७६६८५६०
——	१८९१-९२	—	२८३२०७०३०
——	१८९२-९३	—	२८९२३०९७०

फामिन इन्शुरअन्स् फंडापैकीं पाटबंधाऱ्याचे कामांवर सन १८९२-९३ अखेर रु० १६७६०६३० खर्च झाला. त्या खर्चास सुरुवात सन १८८१-८२ पासून झाली आहे.

भांडवल खर्च.			रुपये.
(मायनर) लहान कामें सन	१८८२-८३	अखेर	३०४०३३२०
——	१८९१-९२	—	४६३६६५१०
——	१८९२-९३	—	४७३६१०३०

उत्पन्न व खर्च.

मोठीं कामें.	उत्पन्न–हजार रुपये खर्च.			
	प्रत्यक्ष आलेलें–	जमीनबाबेपैकीं	चालू खर्च.–	व्याजाबद्दल खर्च.
१८७३-७४	३६६३	*	२६६६	२८०७
१८८२-८३	+९३०९	+४६९०	५०२०	८०९०
१८९१-९२	१४०४७	६७३१	७६१४	११०९६
१८९२-९३	१५१०७	७२२३	७९३९	११३८३

+ एकूण जमा रुपये १४०००६३०; त्यांतून मद्रासकनालकंपनीसंबंधानें रु० ५६२४० वजा करण्याचे आहेत ते करून खरी जमा रु० १३९४४३९०.

* प्रत्यक्ष येत असलेले रकमेंत सामील.

लहान कामें.	उत्पन्न–हजार रुपये–	खर्च.
१८८२-८३	१३९०	९०११
१८९१-९२	१९४१	१०७३८
१८९२-९३	१८५८	१००८१

प्रोटेक्टिव्ह खर्च दुष्काळनिवारणार्थ फंडापैकीं. या खर्चास सुरवात सन १८८१-८२ पासून झाली आहे.

	रुपये.
१८८१-८२	१३५४४९०
१८८२-८३	२६३४४३०
१८९१-९२	७७९३१०
१८९२-९३	६०७९३०

सन १८७३-७४ सालीं इरिगेशनचे उत्पन्नांतून चालू खर्च भागून भांडवलावर व्याज पडत नव्हतें; उलटें शेंकडा २½ टक्के व्याज आंगावर पडे. सन १८७९-८० सालीं पहिल्यानें व्याज सुटण्यास सुरवात झाली. तें सन १८८२-८३ सालीं शेंकडा ⅖ टक्का सुटलें व सन १८९१-९२ सालीं ४.८३ टक्के व १८९२-९३ सालीं ६.८९ टक्के असें सुटलें.

येथपर्यंत उत्पन्न व खर्चाबद्दल हकीकत झाली. आतां एकंदर पाटांची लांबी किती आहे व त्यापासून किती जमिनीस पाणी मिळत आहे तें सांगण्याचें आहे. ती माहिती पुढील कोष्टकावरून मिळेल. सन १८९१-९२ बद्दल तपशिलवार माहिती दिली आहे व तुलनेसाठीं सन १८८२-८३ व १८९२-९३ सालांबद्दल आंकडे ठोक रकमेचे दिले आहेत.

प्रांत	कालवे व फाटे मैल. कालवे	फाटे	किती एकर जमिनीस पाणी मिळालें तें. हजाराचे आंकडे आहेत.
अ–प्रोडक्टिव्ह.			
१ बंगाल.	७४८	२३८१	७३६
२ वायव्य व अयोध्या प्रांत.	१४००	६१८०	१९१२
३ पंजाब.	१२७३	५३६४	१९६३
४ मद्रास.	१९७१	५५२०	२४१३
५ मुंबई व सिंध.	६२५	५१९	५३४
बेरीज.	६०१७	१९९६४	७५६०
ब. प्रोडक्टिव्ह नाहींत असे (क्यापिटल हिशेब असलेलें.)			
१ राजपुताना.	तळ्यापासून	बागाईत आहे.	११
२ बंगाल.	१६८	...	२३
३ वायव्य व अयोध्याप्रांत.	२०	५२२	१३२
४ पंजाब.	२६३०	६०३	११०४
५ मद्रास.	१२८८	११९६	३७८
६ मुंबई व सिंध.	२६५९	२९३२	१७२७
बेरजि	६७६५	५२२३	३३७८
सन १८९१–९२	१२७८२	२५२१७	१०९३८
सन १८८२–८३	८३७६	१६३४३	६९२०
सन १८९२–९३	१३६०५	२६२१०	९६४१

सिंधेंत $\frac{४}{५}$ जमीन बागाइती आहे. पंजाब व वायव्य प्रांतांतील कांहीं भाग यांत कृत्रिम उपायांनीं आणलेले पाण्याचा चांगला उपयोग होतो; या प्रांतांत एकचतुर्थांशापासून एकतृतीयांशापर्यंत जमीन बागाइती आहे. मद्रासेस $\frac{१}{४}$ शावर व म्हैसुरास $\frac{१}{६}$ जमीन बागाइती आहे. मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतांत बागाइती फार थोडी आहे; ह्मणजे सुमारें शेंकडा अर्धा एकर जमीन आहे. या प्रांतांत बागाइती वाढली पाहिजे आहे. तशीच बंगाल्यांतही बागाइती जमीन शेंकडा $१\frac{१}{२}$ टक्का आहे.

आतां वेगळाले प्रांतांतील कालव्याचे स्थितीचे संबंधानें सन १८९१-९२
सालाबद्दल कांहीं हकीकत सांगतों. पंजाबांतील कालव्यांपैकीं, सन १८९१-९२
सालीं, ३८६ मैल कालवे नौकानयनास योग्य असे व २७९३ मैल पुराचें पाणी
आल्यानें चालू रहाणारे व सर्व काळ चालू राहणारे ११०७ मैल असे होते. पुरा-
वर अवलंबून राहणारे कालव्यांपेक्षां नेहमीं चालू राहणारे कालव्यांस फाटे जास्त
असतात. या वर्गाचें कालव्यांत पश्चिम यमुना, बारीदुआब, सिरहिंद हीं कामें
मोठालीं आहेत व आणखी नवीन कालव्याचीं कामें चालू आहेत. पुरानें पाणी
येणारे कालवे लांबीला जास्त असतात ; मुजफरगड कालव्याचें पाणी एकंदर
७२६ मैल व सिंधु नदीचे पाटाचें पाणी १५०० मैल असे भागांत पसरतें. सिंधचे
लगतचे भागांत पुराचे कालवे फार आहेत व नद्यांचे अंतरवार्ति भागांत नेहमीं पाणी
असणारे कालवे आहेत. या प्रांतांतील पाटबंधाऱ्याचे कामांवर सन
१८९२–९३ अखेर भांडवली तऱ्हेचे (कर्ज काढलेले) रुपये ७१८२२९८०
खर्च झाले आहेत.

सिंधेंत हैदराबाद, कराची, पश्चिम व पूर्व नारा, शिकारपूर वगैरे हे मुख्य
कालवे आहेत. या प्रांतांतील पाट-बंधाऱ्यासंबंधानें मुख्य काम ह्मणजे गाळ
काढून साफ ठेवणें, बांध धुपून किंवा फुटून न जातील अशी तजवीज ठेवणें, व
जेथून पाणी प्रारंभीं कालव्यांत सोडण्यांत येतें तीं कामें चांगलीं ठेवणें हीं आ-
हेत. कारण, सिंधु नदीस नेहमींपेक्षां लवकर किंवा उशीरा पूर आले व ह्या
तजाविजी बरोबर झालेल्या नसल्या तर नुकसान होतें. या व पंजाब प्रांतांतील
बहुतेक शेतकी पाट-बंधाऱ्याचे व विहिरीचे पाण्यावरून चालते. ह्या प्रांतांतही
पुराचे पाण्याचे कालवे व नेहमीं पाणी जाणारे कालवे असे दोन वर्गाचे कालवे
आहेत. पहिले वर्गाचे कालवे बहुतेक पूर्वीचे राजांचे कारकीर्दींत झालेले किंवा
खासगी लोकांनीं केलेले असे आहेत. दुसरे वर्गाचे कालवे इंग्रज सरकारांनीं
केलेले आहेत. या प्रांतांत पाटबंधाऱ्याचे कामाची व्यवस्था जमीनमहसुलाचे
व्यवस्थेचे अंगभूत आहे. या प्रांतांतील पाट-बंधाऱ्याचे कामांवर क्यापि-
टल खर्च (भांडवली खर्च) सन १८९२-९३अखेर रुपये. १२३७१०८० झाला आहे.

बाकीचे मुंबई इलाख्याचे भागांतील पाट-बंधाऱ्याचीं कामें विशेषशीं मोठीं
नाहींत व त्यांतील महत्वाचीं आहेत तीं महाराष्ट्रांत आहेत. निरा व मुठा काल-
व्याचे कामांवर सन १८९१-९२ सालापर्यंत ५१ लक्ष व ६३ लक्ष रुपये खर्च
झाले आहेत. बाकीचीं कामें साधारण आहेत. याशिवाय प्राचीन जे
तलाव आहेत त्यांची दुरुस्ती ठेवण्याचेंही सरकारांनीं अलीकडेस आप-
लेकडे घेतलें आहे. विहिरींचें व पाटाचें बागाईत बरेंच होतें, परंतु तें सर्व

खासगी खर्चानें होतें. किनाऱ्याचे भागांत (कोंकणांत) पावसावर भाताचें उत्पन्न होतें; कृत्रिम उपायांनीं पाणी पुरवावें लागत नाहीं. गुजराथेंत विहिरी व महाराष्ट्रांत तळीं पुष्कळ आहेत; परंतु त्यांचें पाणी पर्जन्याचे आप्तीचे सालीं पुरत नाहीं व याच कारणासाठीं सरकारांनीं मोठे तलाव बांधून पाणी पुरविण्याचा उद्योग चालू केला आहे. या उद्योगाचा मुख्य हेतु नफा मिळविण्याचा नसून दुष्काळापासून देशाचें संरक्षण व्हावें हा विशेष आहे. या प्रांतांतील पाटबंधाऱ्याचे कामांवर सन १८९२–९३ अखेर भांडवली खर्च रुपये २५३१६-७३० झाला आहे.

वायव्य प्रांतांतील उत्तर व पश्चिम भागांत जमीन एक तऱ्हेची आहे; तींत कृत्रिम उपायांनीं पाणी घेतलें ह्मणजे जमिनीवर एक प्रकारचा खारा लोण्याचा पापुद्रा येतो किंवा तींत पाणी सांचून पीक होत नाहींसें होतें; तरी पूर्वीं पर्जन्याचे आप्तीचे सालीं या प्रांतांत नेहमीं दुष्काळ पडत तसे गंगेचे व यमुनेचे कालवे झाल्यापासून या भागांत पडण्याचें बंद झालें आहे. पाटाचें पाणी मिळाल्यानें जास्त मौल्यवान पिकें तयार करतां येतात, हा एक विशेष उपयोग आहे. या प्रांतांत गंगेचे व यमुनेचे चार कालवे फार मोठे आहेत व या प्रांतांतील पाटबंधाऱ्याचे कामावर सन १८९२–९३ अखेर रुपये ८२३०० ८३० खर्च झाला होता. यमुनेचे खालचे कालवे झाल्यापासून नेहमींचे जे पाणी वाहून-जाण्याचे नैसर्गिक मार्ग ते बंद झाले व त्यामुळें जमिनींत पाणी सांचलें जाऊन पीक येत नाहींसें झालें आहे. अलीकडे तें पाणी जाण्याचे मार्ग खुले करून देण्याचे कामास सुरवात झाली आहे, व तें काम लवकरच पुरें होईल. या प्रांतांतील कालव्यांपैकीं मोठाले कालव्यांचा उपयोग नौकानयनासाठींही होतो. सन १८९१–९२ सालीं ५७५ मैल कालव्याचा भाग जमिनीस पाणी देण्यास पुरून शिवाय या कामीं उपयोगांत आला होता. रोहिलखंड, बुंदेलखंड या प्रांतांतलि कालवे व बिजनरचे कालवे हे दुष्काळनिवारणासाठींच बांधण्यांत आले.

वरील प्रांतांप्रमाणें बंगाल्यांत पाटबंधारे उपयोगी असले तरी अत्यवश्य असनाहींत. या प्रांतांत ४ मोठीं व ६ लहान अशीं पाटबंधाऱ्याचीं कामें आहेत. एकंदर ९१६ मैल कालवे सन १८९१–९२ सालीं चालू होते. त्यांपैकीं ७३८ मैल जमिनीस पाणी देण्यास व नौकानयनास उपयोगांत आले होते व १७८ मैल कालवे नौकानयनाचे कामासच उपयोगी पडले. दक्षिण बिहार वगैरे रुक्ष भागांत मात्र कालव्याचा चांगला उपयोग होतो. त्यांचा व ओरिसा प्रांतांत महानदीस बांधून पाटबंधारे काढलेले आहेत त्यांचा हेतु मुख्यत्वें दुष्काळनिवारण हा आहे. या प्रांतांत साधारणतः पाऊस असतो तेव्हां पाटाचें पाणी बहुतेक लागत नाहीं;

ह्मणून ते पाट नौकानयनासाठीं उपयोगांत आणतात. पाटबंधाऱ्याचे कामांवर सन १८९२–९३ अखेर भांडवली खर्च रुपये ७४१७२६१० झाला आहे.

अयोध्या प्रांतांत असे प्रकारचीं कामें झालेलीं नाहींत. या प्रांतांत पाण्याचा नैसर्गिक पुरवठा साधारण पुरेसा असल्यामुळें कृत्रिम उपयांनीं पाणी आणण्याची जरूर नाहीं. त्या प्रांतांत लागण जमिनीपैकीं एकतृतीयांश जमीन बागाइती आहे.

मद्रासइलाख्यांत पाटबंधारे गोदावरी,कृष्णा व कावेरी यांचे दुबेळक्यांचे भागांत आहेत. एकंदर १० मोठीं व २० लहान कामें झालेलीं आहेत. तुंगभद्रा नदीचेही कालवे करनूल व कडापा जिल्ह्यांतून जात आहेत व हा मुलूख दुष्काळी असलेमुळें त्यापासून संरक्षण होण्यास त्यांचा उपयोग होतो. मदुरा व गंजम या जिल्ह्यांत मोठालीं कामें बांधण्याचें काम चालू आहे. या इलाख्यांतील कालव्यांपासून भात पिकविण्यास फार उत्तेजन आलें आहे. पूर्वींचीं तळींही पुष्कळ आहेत व त्यांची दुरुस्ती करण्याचेंही काम चालू आहे. पश्चिम किनाऱ्याचा भाग शिवायकरून बाकी इलाख्याचे भागांत पर्जन्याचें मान तुटपुंजीचें असतें, यासाठीं या भागांत बागाइतास तळ्यांचें किंवा नद्यांचें पाणी आणावें लागतें, किंवा विहिरी खणाव्या लागतात. या इलाख्यांत कृत्रिम उपायांनीं पाणी आणण्याबद्दल प्रयत्न प्राचीन काळापासून झालेले आहेत. आतां पूर्वींचीं तळीं व बंधारे सर्व सरकारचे झाले आहेत व ते त्यांजवर खर्चही चांगला करीत आहेत. कृष्णा, गोदावरी व कावेरी यांचे दुबेळक्यांतून पाटांचें जणुकाय जाळेंच करण्यांत आलें आहे; तेव्हां त्या भागांस आतां दुष्काळाची भीति राहिली नाहीं. या प्रांतांत सन १८९२–९३ अखेर पाटबांधण्याचे कामावर भांडवली खर्च रुपये ७८१५९६७० झाला आहे.

ह्मैसुराकडेही तळीं, बंधारे वगैरे आहेत व सन १८७६–७७ चे दुष्काळापासून असे प्रकारचीं कामें सरकारांतून जास्त अगत्यानें होत आहेत. या प्रांतांत सुमारें $\frac{1}{6}$ जमीन बागाइती आहे.

मध्यप्रांतांत सरकारी तळें नेमाडांत एकच आहे, बाकी बागाईत सर्व खाजगी खर्चानें पाणी आणून किंवा विहिरींचे पाण्यापासून होत आहे.

रस्ते, इमारती वगैरे.

पब्लिक वर्क्स खात्याकडून होणारे कामांपैकीं दोन प्रकारचे कामांसंबंधानें येथपर्यंत वर्णन झालें. आतां रस्ते व इमारतीचे कामांसंबंधानें सांगण्याचें राहिलें आहे; परंतु यासंबंधानें विशेष सांगण्यासारखें फार थोडें आहे. आगगाड्या

झाल्यानें पूर्वी मोठे सडकांचें जितकें महत्व होतें तितकें आतां राहिलें नाहीं. मुंबई–आग्रा रस्ता, कलकत्त्याहून वांयव्यसरहद्दीवर जाणारा रस्ता, बोरघांटाचा रस्ता वगैरे पूर्वीचे थेटचे प्रवासाचे रस्ते, लांबचे प्रवास आतां आगगाड्यांनीं होऊं लागल्यामुळें, तसेच पडले आहेत. आतां आगगाडीस मिळण्यास किंवा प्रांतांचे प्रांतांतील दळणवणास उपयोगी पडणारे रस्त्यांची जरूरी व महत्व हीं वाढलीं आहेत. देशाची सुधारणा होण्यास मार्गक्रमणाची जितकी सोय जास्त होईल तितकी चांगली. स्थानिक उपयोगाचे रस्ते (शास्त्रीय ज्ञानाची ज्यास अवश्यकता नसेल असे) स्थानिकस्वराज्य व्यवस्थेचे संबंधाचे अंमलदारांकडून होते ; इतर रस्ते व पूल वगैरे कामें पब्लिकवर्क्सखात्याकडून होतात. रस्ते, इमारती यांशिवाय या खात्याकडून पिण्याचे पाण्याची तजवीज, आरोग्यरक्षणा-संबंधानें तजविजी, धक्के बांधणें, पूल बांधणें, दीपगृहें बांधणें, वगैरे कामें होतात.

सन १८९१–९२ व सन १८९२–९३ सालीं या खात्याचा खर्च किती झाला त्याबद्दल कोष्टक खालीं दिलें आहे व तुलनेसाठीं सन १८८१–८२चे आंकडे दिले आहेत.

प्रांत.	सन १८९१–९२.
हिंदुस्थानसरकार.	२२१२३८०
मद्रास.	७६८७५५०
मुंबई.	६८११९४०
बंगाल.	९००९०१०
वायव्यप्रांत.	७१७७१८०
पंजाब.	४७५०१००
मध्यप्रांत.	२३७०१८०
आसाम.	१९१७९१०
ब्रह्मदेश.	६५८४६९९
इंग्लंड. हुंडणावळीसह.	१४२१४००
बेरीज.	४९९४२३४०
सन १८९२-९३	४६४९६८१०
सन १८८१-८२	३९७७३२७०
सन १८७३-७४	३८७०३१००

सन १८९४-९५चे जमाखर्चाचे अंदाजांत खर्चासाठीं रक्कम रु० ४४८२३००० दाखल करण्यांत आली आहे.

रस्ते व इमारतीसंबंधाचे कामांत लष्करी व सिव्हिल असे भाग आहेत. अलीकडे लष्करी कामाचें खातें वेगळें करण्यांत आलें आहे; व त्या खात्याकडील कामांवर सन १८९१-९२ सालीं रुपये १२१४५१८०, सन १८९२–९३ सालीं रुपये ११९६७९९० खर्च झाला होता, व सन १८९४-९५ चे बजेटांत रुपये १००६८००० दाखल करण्यांत आले आहेत.

भाग सोळावा.

टपाल व तारायंत्र.

राज्यव्यवस्थेचे खात्यांपैकीं टपालखात्याप्रमाणें एकसारखीं सतत वाढत गेलेलीं व त्याच मानानें लोकप्रिय असलेलीं दुसरीं फार थोडीं आहेत. या खात्यांत लोकांचे सोईसाठीं वारंवार मोठ्या उपयुक्त सुधारणाही पुष्कळशा झालेल्या आहेत. गेले दहा वर्षांतच या खात्याकडून वाटले जाणारे पत्रांची संख्या दुप्पट वाढली आहे, हीच गोष्ट या खात्याचे लोकप्रियतेची साक्ष देण्यास पुरे आहे.

सन १८९१–९२ सालीं पत्रें, कार्डें, वर्तमानपत्रें वगैरे मिळून ३३५०७१०८८ पोष्टांतून वाटलीं गेलीं; सन १८८१–८२ सालीं १६४३८५४४९ वांटलीं होती; सन १८८१–८२ सालीं दरशंभर लोकसंख्येस ७६ पत्रें पडत होतीं, तीं सन १८९१–९२ सालीं १३८ पडलीं. पत्रव्यवहारासंबंधानें पहिला नंबर मुंबई व सिंध या दोन प्रांतांचा आहे; त्यांत दरशंभर इसमांस २७४ व २६६ अशीं पत्रें पडतात. इतर प्रांतांतील प्रमाण यापेक्षां कमी आहे. दरशंभर इसमांस प्रांतवार सन १८९१–९२ सालीं पत्रें बसलीं तीं येणेंप्रमाणें:—मुंबई २७४, सिंध २६६, मद्रास १५८, ब्रह्मदेश १७३, पंजाब १५५, बंगाल १०३, वायव्यप्रांत ११४, मध्यप्रांत १११, आसाम १११, अयोध्या ७२. मुंबईइलाख्यांतील संस्थानांतील पत्रें वजा केलीं तर बाकीचे भागासंबंधानें ही संख्या दरशंभर

हापिसें ११४६ व नौकर २७२१ होते व त्यांचेकडून एक कोटि तीस लक्ष पत्रें वाटलीं गेलीं होतीं.

सेव्हिंग ब्यांका (पेढ्या) संबंधानें फिनान्सचे भागांत सांगण्यांत आलें आहे, सबब येथें विस्तारानें सांगण्याची जरूर नाहीं. हें काम या खात्याकडे सन १८८२ पासून आलें; त्यापूर्वी तें काम जिल्ह्याचे खजिन्याकडे असे. सन १८८१-८२ सालीं पैसे ठेवणारे १८९७७ व ठेवीची रकम रु० ७२७८९२० होती. सन १८९१-९२ सालीं पैसे ठेवणारे ४६३४५३ व पैशाची रकम रुपये ७०५९३१६९ झालीं. थोडे प्राप्तीचे लोकांस संचय करण्यास सोय व्हावी हा या व्यवस्थेचा हेतु आहे व तो चांगला सिद्धीस जात आहे.

या खात्याचे जमाखर्चाचें पत्रक खालीं दिलें आहे तें फिनान्शियल खात्याचे हिशेबाप्रमाणें दिलें आहे. या देशांत होत असलेले व्यवहारासंबंधानेंच पाहतां खर्च वजा जातां शिलक राहते, परंतु विलायतेंत येणारे खर्चासुद्धां पाहतां तूट येते.

जमा.		रकम हजार रुपये.
खासगी पत्रव्यवहाराचें पोष्टेज.		१५४८
ष्टांपांची विक्री.		८३३०
सराव्हिस स्टांपाची विक्री	...	२१३२
* मेलकार्टसराव्हिस वगैरे	...	१७१
मनीआर्डरकमिशन	...	२११२
विलायतेच्या मनिआर्डरींचें कमिशन	...	१
फी व किरकोळ जमा	...	८८
* संरक्षित संस्थानांकडून हिस्सेरसी	...	११
* बैलगाडीसराव्हिसची जमा	...	७१
वजावाटी	...	—७९
दिस्ट्रिक्ट पोष्टाची जमा	...	७८
बेरीज.	...	१४४६३

खर्च.		हजार रुपये.
सार्वजिक व्यवस्था खर्च	...	१४७
हिशेबी खातें खर्च	...	४१२
प्रांतिक नौकर खर्च	...	७८६८
टपाल (मेल) नेण्याबद्दल	...	२६०४
* नेमणुका	...	६१९
* स्टांप विक्रीवर बट्टा	...	१२९
सादिलवार	...	५५२
किरकोळ		५३
दिस्ट्रिक्ट पोष्ट	...	११६७
सामान खरेदी विलायतेस. पाउंड	...	३६०
विलायतेस खर्च होतो तो.	...	६०३
हुंडणावळ	...	४१८
बेरीज	...	१४९३३

* वरचे कोष्टकांत फुली दिलेल्या रकमांचा टपालचे खरोखरीचे व्यवस्थेशीं संबंध नाहीं; तसेंच टपाल नेण्याबद्दल खर्च दाखल आहे त्यांत बैलगाड्यांतून व तांग्यांतून लोकांस जाण्याची कांहीं ठिकाणीं सोय ठेविली आहे त्याबद्दल खर्च रु० ३०६६९० आहे तेही पोष्टाचे खरे कामांसंबंधाचा नव्हे.

सन १८९४–९५ चे अंदाजांत जमेची रक्कम रु० १५९५०००० व खर्चाची रु० १६०८१००० धरली आहे. खर्चापैकीं पौंड १०२९०० चा खर्च विलायतेस होण्याचा आहे व त्याची हुंडणावळ रु० ७३५००० आहे.

तारायंत्रखातें.

तारायंत्रखात्याची व्यवस्था हिंदुस्थानचे डायरेक्टर जनरलांचे हातून होते. तारांत देशांतील व परदेशाच्या असे दोन वर्ग आहेत व या देशाचे तारायंत्राचे व्यवस्थेसाठीं १७ विभाग केलेले आहेत. सरकारच्या स्वतःचे तारायंत्राची व आगगाडीचे रस्त्याचे बाजूनें असणारे तारायंत्राची व्यवस्था सरकाराचेच हातीं आहे. तारायंत्राची एकंदर ३८६२५ मैल लांबी आहे. सरकारी तारांची लांबी १२०१५९ मैल आहे व त्याची व्यवस्था डायरेक्टर जनरलांकडे आहे. आगगाडीचे कंपन्यांचे खासगी मालकीचे तारांची लांबी ६८८० मैल आहे. सरकारी तारेपैकीं तारखात्याचे उपयोगांत ७४९६२ मैल तार आहे व बाकीची तार आगगाड्यांचे कंपन्यांचे वहिवाटीस सरकारांनीं भाड्यानें दिली आहे.

पुढील कोष्टकावरून या खात्यामार्फत होणारे व्यवहाराचे वाढीची कल्पना होईल.

सालें.	तार किती मैल होती ती.	तारहापिसें.	तारांची संख्या हजार.	भांडवल खर्च. हजार रुपये.
१८५१–५२	८३	६	०	६२
१८६१–६२	११४०१	१४४	०	७६३२
१८७१–७२	१४८५७	१९९	६२८	२५५२९
१८८१–८२	२१०४९	२९२	१६१६	२७३६५
१८९१–९२	३८६२५	१००१	३८११	५२२३६
१८९२–९३	४१०३०	११००	३९८१	५२३४६

जमाखर्चाचें मान पाहतां बरेच वर्षांपासून शिलक राहत आहे. तारा पाठविण्याबद्दल फी घेण्यांत येते ती जितकी जरूरीनें बातमी पाठविण्याची ती पाठविणाराची इच्छा असेल त्या मानानें घेण्यांत येते. अतिजरूरीचे तारेस शब्दास चार आणे व साधारण तारेस त्याचे निंमे व सावकाश गेली तरी चालणारे तारेचे शब्दास एक आणा अशी घेण्यांत येते.

पाश्चिमात्य देशांस तारा पाठविण्याचे संबंधानें सोय झाली आहे व त्याबद्दलची व्यवस्थाही हिंदुस्थानसरकारचे तारखात्याचे मार्फतच होते. सन १८५९ सालीं एका खासगी कंपनीनें सुएजपासून मुंबई पर्यंत समुद्रांतून तार घातली, परंतु घालण्याचें काम पुरें होतांच उपयोगी पडेनाशी झाली व ती दुरुस्त करण्याचा प्रयत्न पुढें झालेला नाहीं. सन १८६३ सालीं तुर्कीसरकारानें कान्स्टांटिनोपलपासून एशिया मैनरांतून बगदादपर्यंत तारायंत्र सुरूं केलें, तेव्हां हिंदुस्थानसरकारांनीं कराचीहून बगदादपर्यंत इराणचे अखातांतून तार नेऊन दोहोंचा तेथें संयोग केला. या तारेंतून बातम्या जाण्यास मधून मधून अडथळा होऊं लागला; तेव्हां दुसरी एक तार इराणांतून बुशायर व तेहरान मार्गानें बगदादपर्यंत घालण्यांत आली. त्यानंतर रूससरकारानें टिफ्लिसपासून इराणचे हद्दीपर्यंत तार घातली व इराणचे शहानें ती तेहरानपर्यंत नेली. या दोन्हीही तारमार्गानें काम बरोबर होत नसे. पुढें सन १८७० सालीं इस्टर्न टेलिग्राफ कंपनीनें सुएझपासून मुंबईपर्यंत समुद्रांतून तार घातली व इंडो--युरोपिअन कंपनीनें विलायतेहून जर्मनी, रशिया व काकेसस् पर्वतांतून तेहरानपर्यंत एक तार आणली. ईस्टर्न टेलिग्राफ कंपनीनें चिनांतही तार नेली आहे. तेथून उत्तरएशियांतूनही विलायतेस तार पाठविण्यांत येते. याप्रमाणें विलायतेस तारा पाठविण्याचे मुख्य तीन मार्ग झाले आहेत. त्यापैकीं सुएझचे मार्गानें निंमेपेक्षां जास्त बातम्या पाठविण्यांत येतात.

तेहरानद्वारें इंडो-युरोपिअन कंपनीचे मार्फत ३७ टक्के व ३ टक्के तुर्कसरकारचे तारेंतून बातम्या जातात. चिनास तारा पाठविण्यास परस्पर व सियामांतून व अमूरवरून असे तीन मार्ग आहेत. तेहरान मार्गें विलायतेस बातमी जाण्यास सन १८९१--९२ सालीं ५९ मिनिटें लागलीं व तुर्की तारेचे मार्फत १५ तास व १२ मिनिटें लागलीं आपसांत चढाओढ लागूंनये व मेळानें काम व्हावें ह्मणून पाश्चिमात्य तारांचा व्यवहार हिंदुस्थानसरकार व वर लिहिलेल्या दोन कंपन्या ह्या मिळून करतात; व उत्पन्न केलेले कामाचे मानानें वांटून घेतात.

तारखात्याचें सन १८९१-९२ चें जमाखर्चाचें कोष्टक.

	हजार रुपये.
जमा.	
अ. हिंदुस्थानांतील तारांचें उत्पन्न, तारायंत्राचें भाडें वगैरे मिळून जमा ...	७३७५
ब. इंडो--युरोपिअन तारांचें उत्पन्न वगैरे ...	१८१८
जमा बेरीज ...	९१९३
खर्च.	
हिंदुस्थानांतील ...	४६९१
इंडो--युरोपिअन तारांसंबंधानें ...	१४८५
माजी रेडसी कंपनीचे भागीदारांस वर्षासनें ...	२५८
बेरीज ...	६४३४
भांडवल खर्च सन १८९१-९२ ...	१९५१
	८३८५
सन १८९४-९५ ची अंदाजी जमा.	९९३८
अंदाजी खर्च.	
चालू खर्च.	७५२६
भांडवली खर्च.	१६७०
	९१९६
सन १८८१-८२ जमा	४६६९
——— खर्च	५४५१

भाग सतरावा.

जननमरण व आरोग्यरक्षण.

जननमरणाचा दाखला ठेवण्याची वहिवाट अजून बाल्यावस्थेंतच आहे. शहरांतून ही व्यवस्था बरी चालली आहे. परंतु खेड्यांतून अद्याप तशी स्थिती झाली नाहीं. हिंदुस्थानांत मृत्यूचें प्रमाण कसें आहे याबद्दल विचार करणें झाल्यास ज्या कांहीं ठिकाणीं चांगले व्यवस्थितपणें दाखले ठेवण्यांत येतात, तेथील किंवा ज्या वर्गाचे लोकांत दाखले ठेवण्याचे संबंधानें विशेष व्यवस्था असते, अशा ठिकाणचे दाखले घ्यावे लागतात. शहरांतील दाखले सर्व सामान्य स्थितीचे द्योतक असे मानण्यासही अडचण आहे; ती अशी कीं, पुष्कळ लोक बायकामुलें बाहेर प्रांतीं ठेऊन शहरांत उदरनिर्वाह करण्यास जातात; या मुळें मृत्यूचें प्रमाण वाढविण्यास मात्र हे लोक कारण होतात, तसें जननाची संख्या वाढण्यास होत नाहींत. एकंदरींत या विषयाचा विचार करण्यास चांगलीं विश्वसनीय अशीं साधनें नाहींत.

सन १८८१ पासून १८९१ पर्यंतची दहा वर्षें साधारण हिंदुस्थानास चांगलीं गेलीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं; या मुदतींत मोठा दुष्काळही पडलेला नाहीं किंवा मोठ्याशा भागांत पर्जन्याची आधी होऊन पीकेंही बुडालेलीं नाहींत; तेव्हां हा काल प्रगतीचा ह्मणून धरला तरी चालण्यासारखें आहे. सन १८९१ चे मनुष्य गणतीचे पत्रकाची तपासणी विलायतेंतील आक्चुअरीकडून (विमा उतरण्यासाठीं वयाची किंमत करणारे शास्त्रज्ञाकडून) करविली आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं, युरोपांतील लोकांची साधारण जीवन मर्यादा मध्यम प्रमाणानें पुरुषांस ४१ वर्षें व बायकांस ४४ $\frac{1}{2}$ वर्षें पडते; व या देशांत पुरुषांस २४ $\frac{1}{2}$ व बायकांस २५ $\frac{1}{2}$ अशी पडते; एकंदर जनन झाल्यापासून एक वर्षांतच मरण पावणारे मुलांची संख्या शेंकडा २७ व मुलींची संख्या २४ पडते. विलायतेस हें प्रमाण शेंकडा ३४ पासून १७ आहे. विलायतेस जन्माचें प्रमाण हजारीं ३१ पडतें; तें इकडे ४० पासून ५० पर्यंत प्रांता प्रांताचे मानानें पडतें. तिकडे मृत्यूची संख्या हजारीं वीस पडते. हिंदुस्थानांत ३८ पासून ४५ पर्यंत पडते. हिंदुस्थानांत विवाहाचें माहात्म्य फार मोठें आहे व अगदीं पूर्व वयांतच पुरुष व स्त्रियांचा समागम घडतो, या गोष्टी लक्षांत आणल्या ह्मणजे मृत्यूचें प्रमाण मोठें आहे, हें ठीकच आहे व त्यामुळेंच लोकसंख्येची फार वाढ होत

नाहीं. या देशांत कांहीं कंपन्या, युरोपियन व एतद्देशीयांचे आयुष्याचे विमे एक दरानें उतरतात परंतु विमे उतरण्यास मध्यम व वरिष्ठ वर्गाचेच लोक जातात व त्यांतही सुदृढ प्रकृतीचे इसमांचाच विमा उतरतात, तेव्हां ह्या प्रमाणावरून सर्व सामान्य लोकांचे संबंधानें अनुमान काढतां येण्यासारखें नाहीं.

मरणाचें रजिष्टर बरोबर ठेवलेलें नसतें हें वर सांगितलेंच आहे, दाखल झालेले संख्येपेक्षां मृत्यूची खरी संख्या पुष्कळ जास्त असते. असे अपुरे दाखल्यावरून सालोसाल जन्ममृत्युचें प्रमाण कसें पालटत गेलें हें समजण्यास या पत्रकांचा उपयोग नाहीं. तरी प्रत्येक सालांत जे मयत झाले त्यांत कोणते कारणानें किती मयत झाले हें त्यांवरून समजतें. साधारण प्रांताप्रांतांत अंतर पडतें, सर्व हिंदुस्थानचें मान कसें बसतें तें येथें देत आहे.

रोगाचें नांव.	१८८१-८२	१८९१-९२
महामारी.	३·५३	९·८१
देवी.	१·६२	१·६७
ताप.	६९·७०	६४·२०
अतिसार, आमांश.	५·७२	४·११
दुखापत.	१·६०	१·४९
साप व हिंस्रपशूंचें डसणें.	०·४६	०·४०
इतर.	१७·३७	१८·३२

साधारण महामारी व देवी या कारणानीं होणारे मृत्यूचे संख्येंत मात्र विशेषसा फरक पडतो. इतर कारणांनीं होणारे मृत्यूचे संख्येंत सालोसाल विशेषसें अंतर पडत नाहीं. हिंस्र पशूंपासून होणारा त्रास दूर व्हावा म्हणून त्यांस मारण्यास बक्षिसें देऊन उत्तेजन देण्यांत येतें. एखादे प्रसंगीं असे जनावरांपासून विशेष त्रास होतो असें दिसून आल्यास त्या ठिकाणापुरतें मोठें बक्षिस लावण्यांत येतें, किंवा फी न घेतां शिकार करण्यास परवानगी देण्यांत येते. सन १८९२ सालीं अशा प्रकारचे एकंदर ६९ हजार परवाने दिले होते व त्या सालीं बक्षिसांत १०६ हजार रुपये खर्च झाले होते. बक्षिसांचे दर वेगळाले प्रांतांत त्यांचे स्थितीचे मानानें वेगळाले आहेत. सर्प दंशापासून मृत्यूंची संख्या मोठी आहे, व त्याचा प्रतिकार करण्याचें ज्यास्त कठीण आहे. जंगली झुडुपें, निवडुंग व केतक्यांचीं बनें, यांत साधारणतः साप फार राहतात, म्हणून वस्ती जवळील ठिकाणांतून निवडुंग वगैरे काढून टाकण्याविषयीं तजवीज करण्यांत येत असते. बक्षिसें देऊन साप मारण्याचेंही चालू आहे. पूर्वींचे बक्षिसें देण्याचे पद्धतींत अलीकडे फरक करण्यांत आला आहे तो असा–साप मारण्याबद्दल

सर्व सालभर बक्षिसें न देतां सापांचीं अंडीं घालण्याचा जो काळ आहे त्याचे पूर्वींचे दोन महिनेच बक्षिसें देण्याची मुदत ठेविली आहे. ही पद्धत सुरू झाल्या-वर पूर्वींचे मानानें मारलेले सर्पांची संख्या सुमारें $\frac{1}{6}$ अंशावर आलेली आहे. पूर्वींचे पद्धतीप्रमाणें लहान मोठे असे सर्व सर्प या सत्रांत येत; आतां नवीन व्यवस्थे-प्रमाणें सर्प मारणाऱ्यांस मोठ्या सर्पांचेच पाठीस लागावें लागतें. ही पद्धत अम-लांत आल्यानंतरचे दोन वर्षांचे अनुभवावरून पाहतां साप चावण्यापासून मृत्यूंचीं संख्या वाढली नाहीं; तरी या पद्धतीचेसंबंधानें अनुभव येण्यास आणखी कांहीं मुदत गेली पाहिजे.

महामारीचे उपद्रवाचे संबंधानेंही वैद्यकी खात्यांतून उपाय करण्यांत येतात, परंतु त्यापासून त्या रोगाचे सांथीचा उपशम होण्यापलीकडे मजल गेली आहे असें नाहीं. हा रोग उद्भवल्यानंतर रोगी एकीकडे काढणें, घाण नाहींशी करणें, औषधोपचार करणें व रोग्याचे संबंधाचे पदार्थांचा नाश करणें इत्यादि उपायां-नीं रोगाचा प्रसार साधारण कमी होतो असें ह्मटलें तरी चालण्यासारखें आहे; परंतु सांथीचा उद्भव बंद करणें किंवा एकदा एखादा इसम त्या दुखण्याचे सपा-ट्यांत सांपडल्यावर त्याचेवरील त्या दुखण्याचा अंमल खात्रीनें नाहींसा करणें या गोष्टी अजून साध्य झाल्या नाहींत.

देवी काढविण्यापासून मात्र देवीच्या सांथी कमी येतात असें दिसून येतें, व त्या संबंधाची भावी स्थिति समाधान मानण्यासारखी आहे. देवीच्या सांथी पूर्वींपेक्षां आतां कमी येतात, एवढेंच नाहीं तर त्यांचा परिणामही पूर्वींसारखा भयंकर होत नाहीं. मनुष्य गणतीचे वेळीं निघालेले माहितीवरून ही देवी काढविण्यापासून चांगला परिणाम होत आहे व पूर्वींपेक्षां देवीचे यो-गानें पूर्ण अंध, अर्ध अंध, किंवा वण पडलेले लोक कमी होत चालले आहेत असें दिसून येतें. देवी काढविण्याचा प्रसार चांगला होत आहे. सन १८८१-८२ सालीं इंग्रज सरकारचे राज्यांत ४६११४७५ लोकांस देवी काढविण्यांत आल्या होत्या, व सन १८९१-९२ सालीं ६२४९००७ लोकांस देवी काढविण्यांत आल्या.

आतां रोग विमोचनाचे संबंधानें काय तजविजी चालल्या आहेत त्यांकडे वळूं. मोठाले शहरांत मोठाले दवाखाने त्या जिल्ह्याचे वैद्यकी खात्याचे मुख्यांचे हातीं असतात. इलाख्याचे शहरीं मेडिकल कॉलेजांतील शिक्षक व इतर डाक्टर लोक यांचे हाताखालीं दवाखाने असतात. अलीकडे तालुक्यानिहाय सोईप्रमाणें दवाखाने स्थापण्याच्या तजविजी चालू आहेत व त्यांजवर वैद्यकीचे शाळांतून शिक्षण मिळालेले लोक नेमण्यांत येतात. दवाखान्यांत राहून औषध

देणेची तजवीज कांहीं रोग्यांस पुरेशी केलेली असते परंतु तिचा उपयोग अपघात किंवा दुखापती झालेले लोक पोलिसांकडून पाठविण्यांत येतात त्याशिवाय इतर लोक फारसा करीत नाहींत. लोकांस खरा उपयोग ह्मणजे फुकट औषध देण्यांत येतें त्याचा होतो. सन १८८१–८२ सालीं १२४७ व सन १८९१ सालीं १८०९ दवाखाने होते, त्यांत आंतराहून उपचार सन १८८१ सालीं ९८६७ व सन १८९१ सालीं १२९१३ लोकांस करण्यांत आला. फक्त औषध दिलेल्या लोकांची दर रोजची संख्या सन १८८१ सालीं ६२८९५ व सन १८९१ सालीं ९३६८३ अशी होती.

गेले १० सालांत लॉर्ड डफरीन यांचे कारकीर्दींत त्यांचे पत्नीनें स्त्रियांस स्त्री वैद्यांकडून औषधोपचार करण्याचे उद्योगाचा उपक्रम केला तो सुप्रसिद्धच आहे. तेव्हांपासून अलीकडे स्त्री रोग्यांची जास्त शुश्रूषा होत आहे.

सार्वजनिक दवाखान्यांची व्यवस्था मुनसिपालिट्या लोकल बोर्ड किंवा त्या दोघांच्या संयुक्त कमिट्या यांचेकडे असते व खर्च कांहीं स्थानिक उत्पन्नांतून व कांहीं सरकारांतून देण्यांत येतो. सन १८९१–९२ सालीं दवाखान्यांचे व इस्पितळासंबंधानें जमा रु० ५४८५५६० झाली होती ती पुढें लिहिलेले मार्गानें आलेली होती. सरकारांतून रु० २०९८८२०, लोकलबोर्डांकडून रु० १३४२३७०, मुनसिपालिट्यांकडून रु० १०८१३७०, व्याजी लावलेले रकमांचे व्याज रु० १५२६१०, व्याजी लावलेले मुद्दल परत घेऊन रु० ९२७८० वर्गण्या युरोपियन लोकांच्या रु० ८६८३०, एतद्देशीय लोकांच्या रुपये २६८८८०, एकूण रु० ५४८५६०. या शिवाय आणखी धर्मार्थ दवाखाने सर्व खर्च खासगी लोकांकडूनच होत असलेले पुष्कळ आहेत व अशा रुग्णशाला घालणें हें हिंदु मुसलमान जैन व पारशी लोकांत धर्माचें कृत्य असें समजतात; बुद्ध लोकांत तर तें कर्तव्यच समजतात.

आतां आरोग्य रक्षणासंबंधानें सांगण्याचें आहे. स्थानिक स्वराज्याचे वर्णनांत या कामी त्या संस्थांकडून कसे प्रकारानें खर्च होतो व स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्याचें संबंधानें सरकार किती लक्ष घालतें हें सांगितलेंच आहे. गटारें बांधण्या संबंधानें मोठाले शहरांतून मात्र विशेषशा तजविजी झाल्या आहेत. बाह्य प्रांतींही अलीकडे स्वच्छता ठेवण्यासंबंधानें खटपट चालू आहे. या विषयाकडे लष्करांचे भागांतील स्वच्छते संबंधानें कमिशन मार्फत चौकशी झाली तेव्हांपासून विशेष लक्ष लागलें व तेव्हांपासून स्वच्छतेचे संबंधानें शास्त्रीय तत्वांप्रमाणें शहरांत व खेडेगांवांत व्यवस्था करण्याची खटपट चालू आहे. सन १८८८ सालीं या बाबतींत हिंदुस्थानसरकारानीं व्यवस्था करण्यासाठीं दर

प्रांतास एक सानिटरी बोर्ड स्थापन करावें व स्वच्छता राखण्याची व्यवस्था करण्यासाठीं कायदे करावे व खेडेगांवांत व्यवस्था करण्यासाठीं साधे नियम करावे असें फर्माविलें आहे. या सानिटरी बोर्डांनी शहरांत व बाहेर गांवीं स्वच्छते संबंधानें व्यवस्था कशी ठेवण्याची याबद्दल शहरांतील कमिट्यांस व गांवगन्नाचे लोकांस सल्ला द्यावयाची आहे व तीं कामें कशी चालली आहेत या बद्दल देखरेखही करण्याची आहे. याप्रमाणें सर्व प्रांतांत सानिटरी बोर्डें स्थापन झालीं आहेत. मुंबई व मध्यप्रांत यांत स्वच्छतेचे बाबतींत विशेष कायदे आहेत व कांहीं ठिकाणचे लोकल बोर्डांचे कायद्यांतच पुरेसे अधिकार दिलेले आहेत. या संबंधानें विशेष तपशीलवार माहिती देण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. सानिटरी बोर्डें स्थापन होऊन फारच थोडी मुदत झाली आहे व व्यवस्थाही अजून चांगली चालू झाली नाहीं तेव्हां या व्यवस्थेपासून परिणाम कसा झाला तें सांगतां येत नाहीं.

भाग १८ वा.

सर्व्हे—पाहाण्या.

कोणतेही देशांत सुधारणेचीं कामें बरोबर चालण्यास त्या देशाचे नैसर्गिक स्थितीची खात्रीलायक माहिती असावी लागते, त्याप्रमाणें या देशाचे संबंधानें वेगळाले प्रकारची माहिती मिळविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारचा सारखा उद्योग चालू आहे. त्या संबंधाची अगदीं त्रोटक अशी माहिती मात्र येथें दाखल करतों; पूर्ण माहिती पाहिजे असल्यास मार्कहम व ब्लाक साहेबांनीं त्या संबंधानें दोन ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत ते पाहिले पाहिजेत.

१ किनाऱ्याची पाहणी—देशाचे किनाऱ्याची माहिती मिळवून नौकानियनास उपयोगी पडणारे नकाशे तयार करविण्याचें काम पूर्वीं हिंदुस्थानचे आरमार खात्याचे मार्फत सन १८६२ पर्यंत होत होतें. तें खातें मोडल्यानंतर या कामासाठीं एक अंमलदार नेमण्यांत आला होता, व पुढें सन १८८२ सालीं किनाऱ्याची पाहणी करण्यासाठीं नवीन व्यवस्था करण्यांत आली. हिंदुस्थानचा किनारा सुमारें ५१०० मैल लांब आहे, त्यापैकीं सन १८८८ अखेरपर्यंत

१७१५ मैलाची पाहणी झाली आहे. सर्व किनाऱ्याची पाहणी पुरी होण्यास बराच काळ लागेल.

२ भरती ओहोटी व समुद्राची सपाटी यांची पाहणी चालू आहे. याप्रमाणें किनाऱ्याचे बरेच भागाची पाहणी झाली आहे. भरतीचे संबंधानें ही पाहणी करून त्यासंबंधानें माहिती त्या कामावर नेमलेले एका अंमल दाराकडून तपासली जाऊन ती प्रसिद्ध करण्यांत येते.

३ भूगर्भाची पहाणी करण्यासाठीं कांहीं अमलदार नेमलेले आहेत, त्यांनीं केलेले शोधांसंबंधी माहिती ही प्रसिद्ध होत असते. ही माहिती मिळविण्यासंबंधानें चांगली व्यवस्था सन १८५६ सालीं होऊन त्या खात्यावर एक मुख्य अंमलदार नेमण्यांत आला; त्याचे पूर्वी वेगळाले भागांत वेगळाले अंमलदार पाहणी करीत. त्याखात्याचे मार्फत या देशाचे बहुतेक भागांची पाहणी झाली आहे व त्यांत विशेषेंकरून दगडी कोळसा, सोनें व पेट्रोलियम तेल हे जिन्नस सांपडणारे भागांची विशेष पाहणी झाली आहे. तेनासेरिम प्रांतांत जेथें कथील सांपडतें तो भाग व जेथें मीठ सांपडतें असे उत्तरेकडील भाग यांची ही तशीच पाहणी झाली आहे. भूगर्भाचे पाहणींत शास्त्रीय भागाकडे जसें लक्ष देण्यांत येतें तसेंच देशाचे संपत्तिवर्धक गोष्टींकडे ही लक्ष देण्यांत आलें आहे. दक्षिणेकडील भागाचे पाहणीपैकीं बरींच कामें अजून व्हावयाचीं आहेत. सर्व काम पुरें होण्यास पुष्कळ दिवस लागतील.

४ सर्व्हे आफ इंडिया–देशाची मोजणी व पाहणी करण्याचें काम एका स्वतंत्र खात्याकडे सोंपविलेलें आहे. तें काम या खात्याचे मार्फत फारच चांगलें झालें असून त्या कामाचा लौकिकही फार दूरवर गेला आहे. प्रथमतः देशाचे त्रिकोणाकृति भाग करण्यांत आले व त्याप्रमाणें सर्व देशाची मोजणी होऊन सर्व कामाचा बरोबर मेळ बसविण्यांत आला. याप्रमाणें त्रिकोण करण्याचें काम त्रिग्नामेट्रिकल सर्व्हेचे मार्फत झालें. ही सर्व्हे या खात्याचे कामांपैकीं पहिला भाग आहे.

त्रिग्नामेट्रिकल सर्व्हेनें कलेलें मोठें महत्वाचें काम याम्योत्तर वृत्ताचे वर्तुलाचे भागाची मोजणी हें होय. यापासून पृथ्वीचा आकार कोणते प्रकारचा आहे हें ठरविण्यास व दुसरे ही पुष्कळ शास्त्रीय शोध करण्यास साधनें मिळतात. ह्या त्रिग्नामेट्रिकल सर्व्हेकडून त्रिकोणाच्या तिन बाजू कायम करून ठेवण्यांत येतात, व या त्रिकोणांत येत असलेले भागाची तपाशिलवार पाहणी करणें व त्याचे नकाशे तयार करणें हीं कामें टोपोग्राफिकल सर्व्हेकडून होतात. या खात्याकडून

तयार होत असलेले नकाशांत गांवें, रस्ते, नद्या, डोंगर, देशाचा उंचसखल पणा, वगैरेबद्दल माहिती फार भरपूर असते. एका मैलास एक इंच याप्रमाणानें हे नकाशे असतात. अजून बरेच भागाची याप्रमाणें पाहणी व्हावयाची आहे.

जंगलाची पाहणी करण्याचें कामही चालू आहे. त्यांत कोणते भागांत किती व कसे प्रकारचें जंगल आहे, झाडी किती आहे, त्यांत कोणतीं झाडें मुख्यत्वेंकरून असतात याबद्दल माहिती मिळविण्यांत येते.

५ काडास्त्रल सर्व्हे--जमीन महसुलाचे कामासाठीं जमीनीची मोजणी करावी लागते हें जमीन बाबींचे भागांत सांगितलेंच आहे. ही सर्व हल्लीं उत्तर व मध्य हिंदुस्थानांत चालू आहे. बंगाल्यांत कांहीं भागांत मात्र ही सर्व्हे झाली आहे. मध्य भाग, वायव्य प्रांत, व पंजाब यांपैकीं पंजाब प्रांतांत गांव कामगारांकडून करण्यांत आलेली मोजणी चांगली बरोबर झाली होती, तिचा त्रिग्रामेट्रिकल सर्व्हेशीं मेळ घालून उपयोग करून घेण्यांत आला. वायव्य प्रांतांत ही अशीच व्यवस्था करण्यांत आली. मध्यप्रांतांत या सर्व्हेकडून गांवांचे बाह्य मर्यादेच्या हद्दी ठरविण्यांत येतात व बाकीची माहिती सेटलमेंट हपीसर हे गांव कामगारांचे माहितीनें भरतात. मुंबई इलाख्यांत रेव्हिन्यु सर्व्हेकडून डोंगराचा भाग बरोबर मोजण्यांत आला नव्हता. तो मोजण्याचें काम हल्लीं चालू आहे. ब्रह्मदेशाची सर्व्हे ही चालू आहे.

६ आर्किआलाजिकल सर्व्हे–प्राचीन काळचीं देवळें, लेणीं, स्तंभ, शिलालेख वगैरे या देशांत पुष्कळ आहेत त्यांची ही पाहणी होत असते व हें काम करण्यासाठीं जे अंमलदार नेमलेले आहेत त्यांजकडे प्राचीन कालच्या प्रेक्षणीय इमारती व लेणीं असलेंल्या स्थितींत कायम ठेवणें, ज्या इमारती लेणीं वगैरे पूर्व कालीं बुजून गेलेलीं असतील ती फिरून उकरून मोकळी करणें, धातूचे पत्र्यावरील लेखांच्या प्रती करणें व त्यांचा अर्थ करणें, त्यांचा कालनिर्णय करून त्यावरून प्राचीन इतिहासाचीं साधनें मिळविणें, हीं कामें असतात. ह्या कामास सुरवात सुरवुइल्यम जोन्स यांचे वेळीं झाली व तें काम अजून पर्यंत चालू आहे. या खात्याचे मार्फत झालेल्या शोधांवरून प्राचीन काळच्या पुष्कळ गोष्टी समजल्या आहेत व त्या काळचा खरा इतिहास लिहिण्यास साधनें झालीं आहेत.

७ जिऑग्राफिकल सर्व्हे–येथपर्यंत देशांतील भागांचे व वस्तूंचे पाहणी संबंधानें हकीकत झाली. भूगोलांचे यथार्थ ज्ञान वाढावें या साठीं ही हिंदुस्थान सरकार उद्योग करीत आहेत व त्या कामावर अंमलदार नेमलेले आहेत. हे अंमलदार या देशाचे उत्तरेकडील देशांत प्रवास करून माहिती मिळवितात. तसेंच

पुष्कळ प्रवाशी स्वेच्छेनें परदेशांत प्रवास करून माहिती मिळवितात तिचाही उपयोग करण्यांत येतो. याप्रमाणें काफ्रिस्थान, उत्तर हिंदुस्थानांतील मोठाले नद्यांचे हिमालयांतील व त्याचे पलीकडील उगम प्रांत व तिबेट वगैरे देशांबद्दल शोध झाले आहेत. अफगाणिस्थानांतील लढाईचे वेळीं, आफगाणिस्थान व रशिया यांच्या दरम्यानच्या हद्दी ठरविण्याचे वेळीं, त्या भागांतलि माहिती मिळविण्यांत आली. या वरून या खात्याचे मार्फतीनें किती महत्वाचें काम होत आहे याची कल्पना होईल.

भाग १९ वा.

शिक्षण.

हिंदुस्थानदेशाचा प्राचीन काळचा जो इतिहास उपलब्ध आहे त्यावरून अशी माहिती मिळते कीं, ह्या देशांतील लोक अशिक्षित असे कधींच नव्हते. त्याकाळीं हिंदु लोकांच्या पाठशाळा व मुसलमान लोकांचे मदरसे असत. शाळांतून मुख्यत्वें धर्मशिक्षण देण्यांत येत असे; व तेथील विद्यार्थी संस्कृत, अरबी वगैरे प्राचीन भाषांचें अध्ययन करीत ह्याशिवाय लहान लहान खेड्यांत लेखन वाचन व हिशेबठिशेब शिकविण्याच्या शाळा असत. या शाळांतून सर्व जातीच्या मुलांस शिक्षण देण्यांत येत असे. धार्मिक शिक्षणाच्या शाळांना जमिनी तोडून दिल्या असत; व फुकट विद्यादान देणें हें मोठें सत्कृत्य आहे असा समज असे. खेडेगांवांतील शिक्षकांना धान्य वगैरे रूपानें वेतन मिळे.

सन १८५४ चे पूर्वीची स्थिती—अर्वाचीन शिक्षणपद्धतीचा मूळ पाया ह्मटला ह्मणजे सन १८५४ सालचा विलायत सरकारचा खलिता होय. गेल्या शतकाच्या अखेरीस सरकारानें लोकशिक्षणाचें काम हातीं घेण्यापुर्वी यूरोपखंडांतून या देशांत येऊन राहिलेल्या मिशनरींनीं तें हातीं घेतलें होतें. सरकारतर्फे शिक्षणास मदत देण्याची सुरवात हिंदुस्थान सरकारचे पहिले गव्हरनर जनरल वारन् हेस्टिंग्ज यांनीं सन १७८१ सालीं केली. त्यानां फारशी भाषा चांगली अवगत असोन त्याभाषेला उत्तेजन देण्यासाठीं कलकत्ता शहरीं त्यांनीं एक मद्रसा स्थापन केला. फारशी भाषा त्यावेळीं दरबारी भाषा होती व न्याय मनसुब्याचें कामही त्याभाषेंत चालत असे. तेव्हां

मुख्यतः त्या भाषेस उत्तेजन द्यावें व मुसलमान लोकांस हिंदूलोकांच्या बरोबरीनें विद्या मिळून नौकरींत व विशेषतः न्यायखात्यांत शिरण्यास त्यांस सवड मिळावी असा ही संस्था स्थापन करण्याचा उद्देश होता. यानंतर दहा १० वर्षांनीं सरकारानें बनारस येथें एक संस्कृत कॉलेज स्थापन केलें. धर्मशास्त्र व संस्कृतभाषा यांचा अभ्यास करून त्यांत पारंगत झालेल्या विद्यार्थीनीं युरोपियन न्यायाधिशांचे मदतनीस व्हावें ह्या उद्देशानें ही संस्था स्थापन करण्यांत आली होती.

सन १८१३ सालीं पार्लमेंट सभेच्या आक्ता अन्वयें कंपनी सरकारास नवीन सनद देण्यांत आली. या आक्तांत असा एक ठराव मुद्दाम केला होता कीं, हिंदुस्थानांतील ग्रंथांचें पुनरुज्जीवन व सुधारणा व्हावी, हिंदुस्थानांतील विद्वान लोकांना उत्तेजन मिळावें व हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यांत राहणाऱ्या प्रजाजनांमध्यें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व्हावा, एतदर्थ किमानपक्षीं एक लाख रुपये कंपनी सरकारानें खर्च करावे. याच सुमारास दरबारांत फारशी भाषेच्या ऐवजी इंग्रजी भाषेची सुरवात होऊं लागली. तेव्हां अर्थांतच इलाख्याच्या मुख्य ठिकाणीं देशी भाषांच्या व प्राचीन भाषांच्या ऐवजी इंग्रजी भाषेची जिज्ञासा लोकांस वाटूं लागली. प्राच्य भाषा व इंग्रजी भाषा यांच्या अभिमान्यांमध्यें पुष्कळ वर्षें पर्यंत कडाक्याचा वादविवाद सुरू होता. शेवटीं सन १८३३ सालीं प्रसिद्ध लॉर्डमेकॉले साहेबांनीं इंग्लिश भाषेचा पक्ष धरून तिच्या मंडणार्थ आपलें वजन खर्चीं घातलें. त्या नंतर सन १८३९ सालीं हिंदुस्थानच्या गव्हनर जनरल साहेबांनीं आपला अभिप्राय ह्या प्रश्नासंबंधानें नमूद केला. त्यांतील आशय असा आहे कीं यद्यपि यूरोपियन ग्रंथ, तत्वशास्त्र, व शास्त्रीय ग्रंथ यांचें अध्ययन इंग्रजी भाषेंतच करणें इष्ट आहे तथापि प्राच्य संस्था पूर्वस्थितींत ठेवून त्यांना सरकारचा आश्रय पूर्वीप्रमाणेंच मिळावा. इंग्रजी व देशी शिक्षणांचा मिलाफ करून विद्यार्थ्यांचे अभिरुचीप्रमाणें त्यांना पसंत असेल तें शिक्षण देण्यांत यावें.

त्यानंतर पुढें दहा पंधरा वर्षांपर्यंत वरिष्ठ व मध्यम प्रतीचें शिक्षण देण्याकडे सरकारचें लक्ष वेधलें होतें. नॉर्थवेस्ट प्रांत शिवायकरून बाकीचे प्रांतांत प्राथमिक शिक्षण देण्याचेसंबंधानें तजवीज बहुतेक झालीच नव्हती. बंगाल्यांत सन १८१७ सालीं कांहीं श्रीमान गृहस्थांनीं वरिष्ठ जातीचे मुलांस शिक्षण देण्यासाठीं एक हिंदु कॉलेज स्थापन करण्याचे उद्देशानें एक मंडळी स्थापिली. त्या वेळीं स्थापन झालेलें हिंदू कॉलेज हल्लीं प्रेसिडेन्सि कॉलेज या नावानें प्रसिद्ध आहे. पुढें कांहीं एतद्देशीय व यूरोपियन गृहस्थांनीं मिळून इंग्लिश व एतद्देशीय

विद्यांचे प्रसारासाठीं सन १८१९ सालीं स्कूल सोसायटी नांवांची सभा स्थापन केली. नंतर सरकार तर्फेची कमेटी स्थापन झाली व तिनें पुष्कळ वजनदार लोकांचे इच्छेविरुद्ध सन १८२३ सालीं एक संस्कृत कॉलेज स्थापिलें. त्यानंतर सन १८३० सालीं डाक्तर डफ नांवाच्या मिशनरी साहेबांनीं एक कॉलेज स्थापन केलें. सन १८४२।४३ सालीं सरकार तर्फेच्या कमेट्यांत सुधारणा होऊन कौन्सिल ऑफ एज्युकेशन स्थापन झालें. सन १८५५ सालापर्यंत वरिष्ठ प्रकारचे शिक्षणावरच सर्व खर्च होत असे. त्या सालीं बंगाल इलाख्यांत १५१ शाळा १३१३६३ विद्यार्थी व ५९४२३० रुपये खर्च असा होता. तरी प्राथमिक शिक्षण फक्त ३२७९ विद्यार्थ्यांसच कायतें मिळत होतें. मद्रास इलाख्यांत सन १८२६ सालीं सर टामस मनरो यांनीं इलाख्याचे शहरीं एक मुख्य शाळा, जिल्ह्याचे शहरींही एक एक वरिष्ठ प्रकारची शाळा व तालूक्याचे ठिकाणीं एक एक लहान शाळा स्थापन करण्यासाठीं एक बोर्ड स्थापन केलें. या बोर्डानें नाहीं ह्मणावयास एक हायस्कूल मात्र स्थापन केलें. त्या हायस्कूलाचें रूपांतर होऊन हल्लीं त्यास प्रेसिडेन्सि कॉलेज असें ह्मणतात. सन १८३६ सालीं या बोर्डाची सुधारणा होऊन त्याचे जागीं यूनिव्हर्सिटी बोर्ड स्थापन झालें. सन १८५४ सालीं विद्याखातें स्थापन झालें. त्या वेळीं मद्रासेंत स्थापन केलेल्या हायस्कुलाशिवाय बाहेरील प्रांतांत नुकतीच स्थापन झालेलीं पांच हायस्कूलें व थोड्याशा प्राथमिक शिक्षणाच्या शाळा असून सरकारी खर्च ४५३६० रुपये होत होता. शिक्षणाचे कामीं सरकारचें दुर्लक्ष्य होतें तरी मिशनरी लोकांच्या शाळा मद्रास व तंजावर, मच्छलीपट्टण, तिनिवेली वगैरे बाह्य प्रांतांत स्थापन झाल्या होत्या व त्यांत सन १८५४ सालीं ३०००० विद्यार्थी शिकत होते. त्या वेळीं एतद्देशीय लोकांच्या उद्योगानें स्थापन झालेली संस्था ह्मटली ह्मणजे पचैयप्पाची शाळा होय. ह्या शाळेचा खर्च धर्म फंडांतून भागविण्यांत येत असे. मद्रासे प्रमाणें मुंबई इलाख्यांतही विद्यादानाचे कामीं मिशनरी लोकांचीच अघाडी होती. त्यांनीं मुंबई शहरांत सन १८१४ सालीं पहिली शाळा स्थापन केली. पुढील सालीं खाजगी वर्गणीनें मुंबई शहरांत व बाहेरील प्रांतांत शाळास्थापन करण्यासाठीं एज्युकेशन सोसायटी नांवांची मंडळी स्थापन झाली. त्यानंतर सन १८२२ सालीं ह्या मंडळीनें यूरोपियन व युरेशियन लोकांसच शिक्षण देण्याचें ठरविलें. त्याचवेळीं विद्येचे प्रसारार्थ व शिक्षणाचीं पुस्तकें तयार करण्यासाठीं सुप्रसिद्ध एलफिन्स्टन साहेब यांचे अध्यक्षतेखालीं दुसरी एक सभा स्थापन झाली. पुढें सन १८२७ सालीं एलफिन्स्टन साहेब गव्हरनरचे कामाचा राजीनामा देऊन जाण्याचे वेळीं लोकांनीं त्यांचे स्मारकासाठीं चारलक्ष पन्नास हजार रूपये वर्गणीनें

जमा केले. त्या रकमेचा विनियोग एक कॉलेज स्थापन करण्याकडे करण्यांत आला. हेंच हल्लींचें एलफिन्स्टन कॉलेज होय. पुढें त्या मंडळीचे जागीं एक बोर्ड स्थापन झालें. पहिल्यानें ह्या बोर्डाकडून खाजगी शाळांस मदत देऊन इंग्लिश शिक्षणाचा प्रसार कराविण्याकडे खर्च होत असे. परंतु पुढें एतद्देशीय शिक्षणासही त्याच रीतीनें मदत मिळूं लागली. सन १८५४ सालीं सरकारांतून शिक्षणाचे कामीं २५०००० रुपये खर्च होत होते.

वायव्य प्रांतांत सन १८२३ व १८२५ सालीं आग्रा व दिल्ली येथें कॉलेजें स्थापन झालीं. त्या शिवाय काशीस एक कॉलेज पूर्वींच स्थापन झालेलें होतें. त्याच सुमारास मोठमोठ्या शहरीं हायस्कुलें स्थापन करण्यांत आलीं. थोमासन साहेब यांचे कारकीर्दींत सन १८५० सालीं जन समाजाचे शिक्षणाचा प्रारंभ झाला. त्यांनीं तालुक्यांचे गांवीं एतद्देशीय शिक्षणाच्या व रिष्ठ शाळा व भोंवतालचे प्रांतांत मध्यवर्तीच्या अशा सोईवार खेडेगांवांत लहान शाळा स्थापन केल्या. वरिष्ठ शाळांचा खर्च सरकारांतून होत असे व खेड्यांतील शाळाचा खर्च भागविणे साठीं जमिनबाबीवर शेंकडा एक टक्का कर जमिनदारांचे खुषीनें बसविण्यांत आला. सन १८५४ सालीं ३९२० शाळा, ५३००० विद्यार्थी, असे असून वरिष्ठ दर्जाचे शाळांवर सरकारी खर्च १८०००० व कनिष्ठ शिक्षणाचे शाळा संबंधानें ४५००० रुपये असा होत होता.

सन १८५४ सालचा खलिता--येथपर्यंत सन १८५४ सालचे पूर्वींची शिक्षणाची हकीकत थोडक्यांत दिली आहे. त्या सालीं शिक्षणाची पद्धत कशी असावी ह्याबद्दल विलायत सरकारनें नवीन नियम केले. ह्या खलित्याला हिंदुस्थानांतील शिक्षणाची सनद असें नामाभिधान मिळालेलें आहे. त्यानंतर सन १८५९ सालीं हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरी साहेबांनीं एक खलिता काढून सन १८५४ सालच्या खलित्याचें समर्थन केलें. ह्या दोनी महत्वाच्या खलित्यांचा सारांश थोडक्यांत देतो. सन १८५४ सालच्या खलित्यांत विद्येचा प्रसार व सुधारणा (इंग्रजींत व देश भाषांत) करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास निक्षून शिफारस केली आहे. ज्या साधनांनीं हा उद्देश सिद्धीस नेतां येईल त्यांचाही निर्देश केला आहे तो असा—

(१) शिक्षणाची व्यवस्था लावण्याकरितां एक स्वतंत्र खातें स्थापन करावें.

(२) प्रत्येक इलाख्यांतील मुख्य शहरीं विश्व विद्यालयें (युनिव्हर्सिट्या) स्थापन करावीं.

(३) सर्व प्रकारच्या शाळांतील शिक्षकांस शिक्षण पद्धतीचें स्वरूप चांगलें समजण्यासाठीं पाठशाला स्थापाव्या.

(४) विद्यमान सरकारी कॉलेजें व हायस्कुलें कायम ठेवून जरूरी प्रमाणें आणखी नवीं स्थापावीं.

(५) शिक्षणाच्या मध्यम वर्गाच्या शाळा स्थापन कराव्या.

(६) प्राथमिक शिक्षणाच्या देशी अथवा इतर शाळांकडे जास्त लक्ष पोंचवावें.

(७) सरकारी मदतीनें शाळा चालविण्याची पद्धत सुरू करावी.

उपयुक्त व्यवहारोयोपगी ज्ञान बहुजन समाजास प्राप्त होईल अशी व्यवस्था करण्याबद्दल हिंदुस्थान सरकारास विशेष रीतीनें सुचविलें आहे. वरिष्ठ प्रतीच्या शाळांत इंग्रजी भाषेचें शिक्षण देणेचें असोन खालच्या प्रतीच्या शाळांत देशी भाषांतून शिक्षण द्यावें असें फर्माविलें आहे. इंग्रजी भाषा शिकण्याची जेथें लोकांना इच्छा होईल तेथेंच तें द्यावें; जेथें त्याची गरज नसेल तेथें तें देण्याचें कारण नाहीं असें खलित्यांत ह्मटलें आहे. ज्या शाळांत धर्मशिक्षण बिलकूल देण्यांत येत नसेल त्याच शाळांना सरकारनें मदत द्यावी. ज्या शाळांतून व्यवहारोपयोगी शिक्षण देण्यांत येत असेल, व्यवस्था चांगली असेल, सरकारच्या देखरेखी खालीं ज्या राहतील व विद्यार्थ्यांपासून थोडी-कां होईना परंतु कांहींतरी फी जेथें घेण्यांत येत असेल त्या शाळांना त्या ठि-काणीं विद्येची अवश्यकता कितपत आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारनें शक्त्य-नुसार मदत करावी. ही जी सरकारी मदत द्यावयाची ती विशेष कारणें पाहून व सरकारी परीक्षकांचे अभिप्राय लक्षांत घेऊन द्यावी. ज्या ठिकाणीं सरकार-च्या मदतीनें स्थानिक गरजा भागविण्यासारखीं कॉलेजें व हायस्कुलें पुरेशीं अ-सतील तेथें सरकारांनीं ती स्थापन करू नयेत; परंतु जेथें स्थानिक गरजा भाग-विण्यासारख्या अशा संस्था नसतील तेथें नवीन संस्था स्थापन करून कांहीं काळपर्यंत सरकारनें त्या चालवाव्या. अशा रीतीनें सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या शाळा जसजशा वाढत जातील त्या मानानें सरकारानें शिक्षणा-च्या कामापासून आपलें अंग हळू हळू काढून घ्यावें; परंतु कोणत्याही शाळेचा सरकारचा आश्रय न मिळाले मुळें ऱ्हास होऊं देणें बराबर नाहीं. विद्यार्थ्यांना स्कालरशिपा देण्याची पद्धत सुरू करून कनिष्ट प्रतीच्या मध्यम प्रतीच्या, व वरिष्ट प्रतीच्या शाळांचा संबंध जोडण्यांत यावा, स्त्री शिक्षणास सरकारनें मोक-ळ्या मनानें पूर्ण मदत करावी. प्रत्येक प्रांतांतील मुख्य अधिकाऱ्यानें विद्ये-च्या प्रसाराचे कामीं साह्य केलें पाहिजे; व शाळा खात्यांतील जागा भरतां-ना अशिक्षित मनुष्यापेक्षां सुशिक्षित मनुष्यांचीच योजना व्हावी. खालच्या प्रतीच्या जागा भरतांना सुद्धां निरक्षर मनुष्यापेक्षां लिहितां वाचतां येणा-ऱ्या लोकांनाच पसंत करावें.

सन १८५९ सालचा खलिता विद्येसंबंधानें दुसरा महत्वाचा खलिता सन १८५९ सालीं निघाला. ह्या खलित्यांत पूर्वीच्या खलित्यान्वयें झालेल्या सुधारणेचें परीक्षण करून त्याचें समर्थन केलें आहे. प्राथमिक शिक्षणासंबंधानें मात्र ह्या व पूर्वीच्या खलित्यांत मतभेद आहे. या खलित्यांत सरकारी मदतीच्या पद्धतीनें इंग्रजी व इंग्रजी मराठी मिश्रित शिक्षणाच्या खाजगी शाळांची भरभराट होत असल्याबद्दल समाधान दाखविलें आहे. प्राथमिक देशी शिक्षणाचे कामीं एतद्देशिय लोकांनीं सरकारी मदतींचा बिलकूल फायदा करून घेतला नसून त्या शिक्षणाचे कामीं लोकांकडून मदत होण्याची आशा निरर्थक होईल असा आशय प्रगट केला आहे. हें काम सरकारनेंच हातीं घ्यावें व या शिक्षणाच्या प्रसारासाठीं जमिनीवर पट्टी बसवून फंड जमवावा अशी शिफारस केली आहे.

एजुकेशन कमिशन—या खलित्याप्रमाणें सन १८५५ सालापासून शिक्षणाची व्यवस्था चालू झाली. पुढें सन १८८२ पर्यंत शिक्षणाच्या पद्धतीच्या संबंधानें विशेष महत्वाचा असा फरक कांहीं झाला नाहीं. सन १८८२ झालीं हिंदुस्थान सरकारांनीं सदरील दोन्ही खलित्याप्रमाणें व्यवस्था कशी चालली आहे, देशांत शिक्षणाची स्थिति कशी आहे व विद्याप्रसार किती झाला आहे ह्याची इत्थंभूत चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमिलें होतें. या कमिशनचे अध्यक्ष सुप्रसिद्ध व विद्वान गृहस्थ सर. वुइल्यम् हंटर साहेब असून शिवाय एक यूरोपियन चिटणीस व सर्व प्रांतांतून निरनिराळ्या जातींतून निवडलेले सुमारे वीस सभासद त्यांच्या मदतीस होते; व त्यांत कांहीं सरकारी नौकर व कांहीं खासगी लोक ह्या कमीशननें देशांत चोहोंकडे फिरून माहिती मिळविली, व ती रिपोर्टाच्या द्वारें सन १८८३ सालीं हिंदुस्थान सरकाराकडे सादर केली. त्यांत हिंदुस्थानच्या त्या वेळच्या शिक्षण स्थितीची साद्यंत माहिती असून भावी सुधारणा कोणत्या व कशा कराव्या हेंही कमीशननें नमुद केलें आहे. कमिशनच्यानजरेस असें आलें कीं, सन १८५४ व १८५९ सालीं शिक्षणाची जी पद्धत सुरु करण्यांत आली तींत महत्वाच्या अशा बाबतींत अनुभवावरून कोणताही दोष दिसून आला नाहीं. या कमिशनानें महत्वाच्या सूचना केल्या आहेत त्यांचा पुढें प्रसंगानुसार उल्लेख करण्यांत येईल.

सन १८५४-१८८२ पर्यंतची हकीकत—पहिल्यानें विशेष महत्वाची पाहण्याची गोष्ट ह्मटली ह्मणजे नवीन शिक्षणपद्धत सन १८५४।५५ सालीं सुरू झाल्यापासून शिक्षणाच्या संस्था व छात्रवर्ग यांत किती वाढ झाली आहे तें पाहण्याचें आहे. सन १८५४ सालच्या पूर्वीची माहिती वर दिलीच आहे. ही वाढ क्रमा क्रमानें कशी झालीं तें पुढें दाखल केलेल्या पत्रकावरून दिसून येईल.

या पत्रकांत प्रथमतः खलिल्याप्रमाणें शिक्षणाची नवीन व्यवस्था सुरू झाल्यावर पहिले सालाचे प्रांतवार आंकडे दिले आहेत व पुढें सर्व हिंदुस्थानचे संबधानें आंकडे पुढील सालचे दिले आहेत.

प्रांत.	वर्ष.	शाळा.	विद्यार्थी.
मद्रास.	१८५६-५७	१३७६६	२०४८५६
मुंबई.	१८५५-५६	२८७५	१०६०४०
बंगाल. आसाम.	१८५४-५५	२५३७८	५२७७३१
वायव्येकडील प्रांत.	”	३९२०	५२९५२
पंजाब.	१८५५-५६	५६२१	४४२९१
मध्यप्रांत.	१८६२-६३	११६९	२१३५३
वऱ्हाड.	१८६६-६७	२४७	८६४४
बेरीज सर्व हिंदुस्थानची (१)	१८५५-५६	५०९९८	९२३७८०
” (१)	१८७०-७१	८३०५२	१८९४८२३
” (२)	१८८१-८२	९४९८९	२४५१९८९
” (२)	१८९१-९२	१४१७९३	३८५६८२१
”	१८९३-९४	१४७२९७	४०६६-३५

(१) अजमीर बंगलोर व ब्रह्मदेशचे आंकडे शिवायकरून.
(२) यांत अजमीरचे आंकडे गाळले आहेत व बंगलोर व ब्रह्मदेशचे आंकडे सामिल आहेत.

या पत्रकांत सरकारी व सरकारी शिक्षणपद्धतीस अनुसरणारे खासगी शाळांचा समावेश केलेला आहे.

शाळांचें वर्ग—आतां जें वेगळाले प्रकारचें शिक्षण देण्यांत येतें त्याबद्दल संक्षिप्त माहिती द्यावयाची आहे. एकंदर शाळांचे पांच वर्ग केलेले आहेत ते असेः– (१) कॉलेजें. (२) मध्यम शिक्षणाच्या शाळा. (३) प्राथमिक शिक्षणाच्या शाळा. (४) शिक्षक वर्ग तयार करण्याच्या शाळा. (५) धंदेशिक्षणाच्या शाळा. ह्या शाळांसंबंधानें संक्षिप्त रीतीनें क्रमवार माहिती द्यावयाची आहे.

(१) **युनिव्हर्सिट्या व कॉलेजें**—कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील

युनिव्हर्सिट्या (विश्वविद्यालयें) सन १८५७ सालीं स्थापन झाल्या. वायव्यप्रांतांतील युनिव्हर्सिटी अलाहाबाद येथें सन १८८७ सालीं स्थापन झाली. या सर्व लंदन युनिव्हर्सिटीचे नमुन्यावर स्थापन झाल्या असोन त्यांत चानसेलर, व्हाइसचानसेलर, फेलोज व सेनेट (व्यवस्थापक मंडळी) अशा प्रत्येकांत असतात. हीं विश्वविद्यालयें फक्त परीक्षा घेण्याचेंच काम कारितात. शिक्षणाचें काम करीत नाहींत; परंतु परीक्षांसाठीं विषयक्रम ठरविण्याचें काम ह्यांचे हातीं असल्यानें ह्यांस शिक्षणाचा क्रमही आपले हातांत ठेवण्यास सांपडतें. सन १८८२ सालीं पंजाबांत लाहोर येथें एक विश्वविद्यालय स्थापन झालें त्यांत इतरांप्रमाणें परिक्षणाचें काम करून शिक्षणाचेंही काम करण्यांत येतें. विश्वविद्यालयांत प्रवेश होण्यास एक प्रवेश परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेस विषय इंग्रजी, देशी किंवा प्राचीन भाषा, इतिहास, भूगोल, गणित व मद्रास व मुंबई इलाख्यांत ह्याशियाव सृष्टपदार्थ विज्ञानज्ञान असे आहेत. इंग्लंदांतील सोळा वर्षांचे साधारण बुद्धीचे मुलास जितकें ज्ञान असतें तितकें या परिक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यास असावें अशा मानानें विषयक्रम ठेविलेला आहे. प्रवेशपरीक्षा झाल्यावर पुढील परीक्षांचें शिक्षण कॉलेजांतून देण्यांत येतें. कॉलेजांत दोन पर्याय आहेत. (१) आर्टस कॉलेजें (२) धंदे शिक्षणाचीं कालेजें. धंदे शिक्षणाच्या कॉलेजांत कायदे, वैद्यक, इंजिनियरींग व शेतकी हे विषय शिकविण्यांत येतात. कॉलेजांतील शिक्षण देशाचे राज्यव्यवस्थेचे किंवा धंद्याचे कामांत विशेष कर्तबगारीनें काम करण्यास योग्यता येण्यासारखें देण्यांत येतें. विश्वविद्यालयांत आर्टस्, शास्त्रीय विषय, वैद्यक, इंजिनियरींग व कायदे असा आहे. ह्या विषयांत परीक्षा घेऊन बॅचलर आफ् आर्टस (बी. ए.) व मास्टर आफ् आर्टस (एम्. ए.) व लायसेन्शिएस्ट अशा पदव्या देण्यांत येतात. लाहोर विश्वविद्यालयांत प्राच्य ज्ञानाचे शिक्षण ही देण्यांत येतें व परीक्षा घेऊन पदव्या देण्यांत येतात. सन १८८१–८२ व १८९१–९२ व १८९३–९४ वेगळाले प्रकारचीं कालेजें किती होतीं याबद्दल माहिती देतों:

वेगळाले वर्गांचीं कालेजें.

संस्थांचे प्रकार.	१८८१-८२	१८९१-९२	१८९३-९४
१ आर्टस कालेजें.			
—संस्था.	६७	१०४	११४
—विद्यार्थी.	६०३७	१२९८५	१४३६०

२ धंदे शिक्षणाचीं कालेजें.			
(१) कायद्याचीं कालेजें.			
—संस्था.	१२	२७	२८
—विद्यार्थी.	७३९	१९२५	२२६६
(२) वैद्यकीचीं कालेजें.			
—संस्था.	३	४	४
—विद्यार्थी.	४७६	७७८	८५०
(३) एंजिनियरिंग कालेजें.			
—संस्था.	३	४	४
—विद्यार्थी.	३३०	४८४	६०१
(४) पाठशाळा.			
—संस्था.	१	१	३
—विद्यार्थी.	४४	६०	६६
(५) शेतकीचें कालेज.			
—संस्था.	...	१	१
—विद्यार्थी.	...	४५	४१
एकूण कालेजें.	८६	१४१	१५४
—विद्यार्थी.	७६२६	१६२०१	१८१८४

ह्या कोष्टकांतील माहिती पब्लिक–सार्वजनिक शाळांसंबंधानेंच आहे. पब्लिक शाळा ह्मणजे ज्यांत शिक्षणक्रम युनिव्हर्सिटी किंवा सरकारी विद्याखातें यांनीं ठरविलेले किंवा पसंत केलेले नियमाप्रमाणें चालतो, ज्यांची देखरेख किंवा परीक्षा सरकारांतून होते, किंवा ज्यांतून विद्यार्थी युनिव्हर्सिटीचे किंवा सरकारी विद्याखात्याचे मार्फत होणाऱ्या परीक्षांस पाठविण्यांत येतात अशा शाळा येतात. ह्या वर्गांत सरकारी किंवा मुनिसिपालिटी किंवा लोकलबोर्ड यांचे खर्चानें किंवा मदतीनें चालणाऱ्या शाळा व निवळ खासगी खर्चानें चालणाऱ्या शाळा येतात. इतर शाळांस खासगी शाळा ह्मणतात.

वर ज्या आर्टस् कॉलेजांच्या संख्या दिल्या आहेत त्यांत प्राच्य विद्या शिकविणारीं कॉलेजें सन १८९१।९२ सालीं ४ होतीं व सन १८९३-९४ सालीं ५ होतीं. त्यापैकीं दोन सरकारचे व्यवस्थेखालीं आहेत व तीन सरकारच्या मदतीनें चालू आहेत. काशी येथील कॉलेज सन १८८८ पर्यंत इंग्रजी कॉलेजांतच त्याचा एक भाग ह्मणून मोडत होतें, तें त्या सालीं स्वतंत्र करण्यांत आलें. या कॉलेजांत प्राचीन ब्राह्म विद्येचें उत्कृष्ट शिक्षण देण्यांत येतें असा लौकिक

आहे. शास्त्रीय विषय अर्वाचीन शोधांचे आधारें शिकविण्यांत येतात. भाषा विषयाचे शिक्षणांत मात्र कांहीं सुधारणा न होतां पूर्वींचेच पद्धतीनें शिक्षण देण्यांत येतें. या कॉलेजांतून शास्त्रीय विषयांवर आजपर्यंत फार उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. कलकत्ता येथील संस्कृत कॉलेजांत इंग्लिश शिकविण्यास सुरवात झाली आहे. लाहोर येथील प्राच्यविश्वविद्यालयांत प्राच्य भाषा शिकविण्यासंबंधानें सुधारणा करण्याचें काम चालू आहे लखनौ येथील कॅनिंग कॉलेजची स्थिति कोणतेही प्रकारानें सुधारलेली नाहीं.

इंग्रजी कालेजें सन १८९१-९२ सालीं १०० व सन १८९३-९४ सालीं १०९ होतीं. या १०९ कालेजांपैकीं सरकार खर्चानें चाललेलीं २३ म्युनासिपल व लोकलबोर्डांनीं चालविलेलीं ५, एतद्देशीय संस्थानांकडून चाललेलीं २, सरकारी किंवा लोकल किंवा म्युनिसिपल बोर्डांचे मदतीनें चाललेलीं ४९ व मदतीशिवाय चाललेलीं ३० अशीं होतीं. सन १८९१।९२ सालीं बी.ए.चे परीक्षेपर्यंत शिकविणारीं कॉलेजें ५८ होतीं. कॉलेजांत प्रवेश होण्यासाठीं जी परीक्षा घेण्यांत येते तीच नौकरी मिळण्यासाठीं लायकी ठरविणारी परीक्षा असल्यामुळें कॉलेजांत शिरण्याची इच्छा नसून फक्त नौकरी मिळविण्यासाठींच ह्या परीक्षेस पुष्कळ विद्यार्थी बसत असत. अलीकडे नौकरीची परीक्षा वेगळी करण्यांत आली आहे यामुळ प्रवेश परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नियमित झाली आहे.

मध्यम वर्गाचे शिक्षणाच्या शाळा-एथपर्यंत कॉलेजासंबंधानें संक्षिप्त माहिती दिली आहे. त्यांच्या खालच्या वर्गाच्या शाळा ह्मणजे मध्यम प्रतीचें शिक्षण देणाऱ्या शाळा होत. या शाळांची संख्या व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या सन १८८१।८२, १८९१।९२ व १८९३।९४ सालीं पुढें दिल्याप्रमाणें होती. या शाळांत दोन वर्ग आहेत (१) हायस्कुलें व (२) त्यांचे खालचे प्रतीच्या शाळा; या खालचे प्रतीच्या शाळांत कांहींत इंग्रजी व देशी भाषांत शिक्षण देण्यांत येतें व कांहींत फक्त देशी भाषांतच शिक्षण देण्यांत येतें सन १८८१-८२ सालीं हायस्कुले व त्यांच्या खालच्या प्रतीच्या इंग्रजी शाळा ह्या हिशेबांचे पत्रकांत एकच वर्गांत देत असत. हल्लीं हायस्कुलें व खालचे प्रतीच्या इंग्रजी व देशी भाषांच्या शाळा वेगळाल्या दाखविण्यांत येतात, तेव्हां सन १८८१-८२ तील व पुढील शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या पत्रकांत एकासमोर एक अशी तुलने साठीं दाखवितां येत नाहीं. पहिल्यानें सन १८८१-८२ बद्दल माहिती देऊन नंतर सन १८९१-९२ व १८९३-९४ साला बदल माहिती देण्यांत येईल.

मध्यम वर्गाच्या शिक्षणाच्या (सेकंडरी) शाळा, सन १८८१–८२

मध्यम वर्गाच्या इंग्रजी शाळा.	संस्था.	विद्यार्थी.
मुलांसाठीं—	२१३४	१४९२६५
मुलीं साठीं—	१४६	५६३६
मध्यम वर्गाच्या देशी भाषांच्या शाळा.		
मुलांसाठीं—	१७९८	६६४६६
मुलीसाठीं—	४४	७३०

यांत हायस्कुलें व त्यांचे खालचे दर्जाच्या इंग्रजी शाळा ह्या येतात.

	सन १८९१–९२		१८९३–८४	
	संस्था	विद्यार्थी	संस्था	विद्यार्थी
मध्यम वर्गाच्या शाळा. हायस्कुलें.				
मुलासाठीं	७५५	१६४६९३	७७२	१७३६९६
मुलीसाठीं	७६	७७७०	८५	९४२४
मध्यम वर्गाच्या इंग्रजी शाळा.				
मुलांसाठीं.	१७८९	१३७३२६	१७९४	१४३८७२
मुलीसाठीं.	१५७	११०४६	१४१	९३३१
मध्यम वर्गाच्या देशी भाषांच्या शाळा.				
मुलांसाठीं	१८९४	१३६९६९	२०७६	१५४६६४
मुलीसाठीं.	२०१	१५४९०	१९८	१६६७१
	४८७२	४७३२९४	५०६६	५०७६५८

यांत मुलांचे शाळांत ३६८८ मुली शिकत होत्या त्या सामील आहेत. मुलींचे शाळांतील विद्यार्थ्यांचे संख्येंत २७५२ मुलें सामील आहेत.

ही माहिती पब्लिक (सार्वजनिक) वर्गाचे संस्थांची आहे. सन १८९३–९४ सालीं या मध्यम वर्गाचे संस्थांपैकीं सरकारी ३२०, मुनासिपालिट्या व लोकल बोर्डें यांनीं चालविलेल्या ११४३, संस्थानांतील ९७, खासगी (परंतु सरकारी किंवा लोकल फंड किंवा मुनसिपल फंडांतून मदत पावणाऱ्या) २७६३ व मदत न पावणाऱ्या खासगी ७४३ अशा होत्या.

वरचे कोष्टकांत जे शाळांचे वर्ग दिले आहेत त्या वरून खरोखर हायस्कुलांत ह्मणजे प्रवेश परिक्षेचे पूर्वीचे चार वर्गांत विद्यार्थी किती शिकत आहेत त्याचा बोध होत नाहीं, कारण कांहीं प्रांतांत हायस्कूल या सदरांत अगदीं प्रारंभापासून इंग्रजी शिकण्याचे वर्ग येतात व कांहींत फक्त खरे वरचे वर्गच हायस्कूल

ह्मणून दाखल करतात. यासाठीं वरील विद्यार्थ्यांची शिक्षणाचे पायरी प्रमाणें फोड करून सन १८९१--९२ सालाबद्दल माहिती देतों.

हायस्कुलांतील.	५७४६०	प्राथमिक (इंग्रजी).
मध्यमवर्गाचे	९८६७३	वरचे प्रतीचे. ५९८८८
		खालचे प्रतीचे. ९५९४२

यावरून खरोखर वरचे प्रतीचे इंग्रजी शिकणारांची संख्या किती लहान आहे हें लक्षांत येण्यासारखें आहे.

एज्युकेशन कमिशनची चौकशी होईपर्यंत मध्यम वर्गाचें इंग्रजी शिक्षण विश्वविद्यालयांत प्रवेश होण्यास उपयोगी पडेल असे प्रकारचें एकदेशीय होत असे. त्या कमिशनानें व्यापार किंवा इतर धंद्यांत पडण्यास विद्यार्थ्यांचे आंगीं पात्रता यावी अशा प्रकारचें व्यावहारिक शिक्षण देण्यांत यावें अशी सूचना केली होती. ही सूचना हिंदुस्थान सरकारास ही पसंत पडून त्यांनीं असें फर्माविलें कीं, विद्यार्थ्यांचें लक्ष्य व्यापार व औद्योगिक धंद्यांकडे लागेल अशा तऱ्हेचे शिक्षणास मदत देण्यांत यावी; व यासाठीं शिक्षण देणें तें हायस्कुलांतच देण्याची सुरवात करावी. मध्यमवर्गाचें शिक्षण कोणत्या भाषेंत द्यावें ह्या संबंधानें हिंदुस्थान सरकारांनीं असा अभिप्राय दिला आहे कीं, ज्या विद्यार्थि वर्गाचें शिक्षण मध्यमवर्गांतच पुरें होतें अशा विद्यार्थ्यांस तें देशी भाषेच्याच द्वारें दिलें असतां जास्त उपयोगी होईल. बंगाल्यांतील अनुभवारून असें दिसून आलें आहे कीं हायस्कुलांतून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस देशी भाषेतूनच शिक्षण प्रथमतः चांगले मिळाल्यानें पुढील अभ्यासासही चांगले सोईचे होऊन परिणाम फार चांगला दृष्टोत्पत्तीस येतो. परकीय भाषेंतून शिक्षण दिल्यानें त्या भाषेचें मात्र थोडें तुटपुंजें ज्ञान होतें, परंतु विद्यार्थ्यांस शिकविण्यांत आलेले विषय ग्रहण करतां येतील असे प्रकारानें शिकविले न गेल्यामुळें त्या शिक्षणापासून त्यांचे मनावर कोणतेही प्रकारचा संस्कार होत नाहीं. या प्रश्नासंबंधानें वेगळालें प्रांतांतील अधिकारी वर्गांत अजून एकमत झालेलें नाहीं. वेगळाले प्रांतांत कोणते भाषेंत शिक्षण देण्याचें या संबंधानें भिन्नभिन्न पद्धति चालू आहेत, परंतु त्यांपैकीं चांगली कोणती याबद्दल निर्णय होण्यासारखा अजून कोणतेच पद्धतीचा अनुभव आलेला नाहीं. देशी भाषेच्या द्वारें इतिहास, गणित व भूगोल या विषयांचें चांगलें ज्ञान कमी श्रमांत प्राप्त करून घेतां येतें व यांत जो वेळेचा फायदा होईल तो इंग्रजी भाषेचें ज्ञान प्राप्त करून घेण्यांत घालवावी असें एक पक्षाचें ह्मणणें आहे; या विषयांचे देशी भाषांचे द्वारें चांगलें ज्ञान होतच नाहीं असें कांहींचें ह्मणणें आहे. युनिव्हार्सिटीचे प्रवेश परिक्षेस बसणारांस हे विषय पहिल्यानें देशी भाषेंत

शिकून फिरून ते इंग्रजींत शिकावे लागल्यानें दुप्पट वेळ लागतो असें बहुतेक उभयपक्षांस ही कबूल आहे. या प्रश्नाचा निकाल अनुभव येईल त्या मानानें कालें करूनच लागण्याचा आहे.

नौकरीची लायकी ठरविणारी परीक्षा वेगळी करण्यांत आल्याचें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें, मुंबई, मद्रास, व वायव्य प्रांत यांत व्यवस्था सुरु झाली आहे. पंजाब इलाख्यांतील विश्वविद्यालयांत कारकुनीचे संबंधानें व व्यापाराचे संबंधानें एक स्वतंत्र परीक्षा घेण्याचें ठरविलें आहे.

प्राथमिक शिक्षण.—प्राथमिक शिक्षण ह्मणजे जनसमाजाचे स्थितीचे मानानें व्यवहारास जरूर असणारे विषयांचे ज्ञान देशी भाषांच्या द्वारें करून देणें हें होय. विश्वविद्यालयांच्या प्रवेश परीक्षांस साधनीभूत असें हें शिक्षण असलेंच पाहिजें असें नाहीं.

सर्व प्रकारच्या शिक्षणास सरकाराकडून मदत व्हावी असें जरी आहे तरी, प्राथमिक शिक्षणाचे संबंधानें देशस्थितीचा विचार पाहतां सरकारानें ह्या शिक्षणाला जास्त मदत दिली पाहिजे व लोकलफंडापैकीं शिक्षणासाठीं काढून ठेविलेली रक्कम व सरकारांतून शिक्षणासाठीं देण्यांत येत असलेली रक्कम यांचा साधेल तितका विनियोग याच शिक्षणाकडे करावा असें हिंदुस्थान सरकारांनीं ठरविलें आहे. वरिष्ठ व मध्यम प्रतीचे शिक्षणांतून सरकार अजीबात आंग काढून घेणार किंवा त्यास प्रतिबंध करणार असें नाहीं. तर पूर्वीं वरिष्ठ प्रतीचे शिक्षणास जास्त मदत देण्यांत येत असे तशी न देतां प्राथमिक शिक्षणास पूर्वीपेक्षां विशेष मदत देण्यांत यावी आणि वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणाचा खर्च उत्पन्नांतून भागेल असें करून प्राथमिक व वरिष्ठ शिक्षणाचा क्रम सारखा चालावा अशा बेतानें सरकारचा या पुढें वर्तनक्रम रहावयाचा आहे. हा ठराव एजुकेशन कमिशनचे सूचनांस अनुसरून आहे.

प्राथमिक शिक्षण देतांना तें जास्त व्यवहारोपयोगी होईल असें द्यावें गणित, हिशेब, महत्वमापन व शेतकी, आरोग्य व कलाकौशल्य यांस उपयोगी पडण्यासारखा सृष्टपदार्थविज्ञान शास्त्राच्या ज्ञानाचा त्यांत समावेश करावा असें हिंदुस्थान सरकारचें मत आहे. मुंबई इलाख्यांत खालच्या शाळांतील शिक्षण हें विश्व विद्यालयाचे प्रवेश परीक्षेस उपयोगी पडणाऱ्या शिक्षणाचाच भाग आहे असें मानण्यांत येतें. बंगाल्यांत खालचे वर्गाचे शाळांत लेखन, वाचन, व हिशेबठिशेब हेच कायते विषय शिकविण्यांत येतात. सर्व हायस्कुलांत या शिक्षणाच्या वरच्या पायरीचें शिक्षण देण्यांत येतें व त्यांतही विश्वविद्यालयाच्या उपयोगी पडेल असें शिक्षण वरच्या वर्गांतून मात्र देण्यांत येतें. मद्रास येथील

क्रम मध्यस्थ आहे. यांत प्राथमिक व वरिष्ठ शिक्षणाचा एकच क्रम आहे, तथापि पुष्कळसे विषय शिकण्याचें विद्यार्थ्यांचे इच्छेवर ठेविलेलें आहे. एकंदरींत सर्व प्रांतांतील प्राथमिक शिक्षण क्रमाची कडेची मर्यादा सारखीच आहे. प्राथमिक शिक्षणाच्या शाळांपैकीं मोठी संख्या लोकल बोर्डांचे व मुनसिपालिट्यांचे शाळांची आहे; सन १८९३-९४ सालीं या शाळांची संख्या १६८०८ होती. सरकारी शाळा ४६५ होत्या. संस्थानांत २२८१ होत्या. सरकार, लोकलबोर्ड किंवा म्युनसिपालिट्या यांच्या मदतीनें चाललेल्या शाळा ५६७४३ होत्या. मदतीशिवाय चाललेल्या शाळा २१०२८ होत्या. या संख्येंत मुलांचे व मुलींचे शाळांचा समावेश झालेला आहे. त्यांत मुलांच्या शाळा ९१७३० व मुलींच्या शाळा ५५९५ होत्या. या सर्व शाळांत मिळून ह्या सालीं २७७८७६६ मुलें व १६८७६४ मुली अशीं होतीं. मिळून एकंदर विद्यार्थ्यांची संख्या २९४७५३० होती. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार गेले दहा वर्षांत कसा झाला आहे तें पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

प्राथमिक शिक्षणाच्या शाळा.

साल	मुलांच्या शाळा	मुलांच्या विद्यार्थी	मुलींच्या शाळा	मुलींच्या विद्यार्थी
सन १८८१।८२	८३५९१	२०७०९६३	२६७८	८५२७९
सन १८९१।९२	९१८८१	२६८०४२४+	५२२८	१५०९५४*
१८९३-९४	९१७३०	२७७८७६६	५५९५	१६८७६४

* यांत मुलांचे शाळांत येणाऱ्या ११९८४८ मुली सामिल आहेत.

\+ यांत मुलींचे शाळांत येणारीं ६२२९ मुलें सामिल आहेत.

आतां पब्लिक (सार्वजनिक) शाळा यांची व्याख्या वर दिली आहे त्यांत न येणाऱ्या खासगी शाळा आहेत त्यांचे बद्दल कांहीं माहिती देतों. एजुकेशन कमिशनचे पूर्वी या शाळांचा दाखला मुळींच ठेवण्यांत येत नसे, तेव्हां ही माहिती सन १८९१-९२ सालाबद्दलच दिली आहे. ह्या शाळा बहुतेक प्राथमिक शिक्षणाच्याच जास्त आहेत.

वरिष्ठ प्रतीचे शाळांत अरबी, पार्शी, संस्कृत, किंवा दुसऱ्या प्राच्य भाषांचें शिक्षण देण्यांत येतें व प्राथमिक शिक्षणाचे शाळांत लिहिणें वाचणें, कुराणपठन किंवा असे तऱ्हेचे विषय शिकविण्यांत येतात.

वरिष्ठ प्रतीच्या शाळा ५५५९ होत्या व त्यांत ६८६९६ मुलें व २५५ मुली

शिकत होत्या. प्राथमिक शिक्षणाच्या शाळा ३३५५८ होत्या व त्यांत ४०७५७२ मुलें व ३१२८८ मुली अशा शिकत होत्या.

शिक्षक वर्ग तयार करण्याच्या व धंदेशिक्षणाच्या शाळा—वर सांगितलेल्या तीन प्रकारच्या शाळांशिवाय बाकी राहिलेल्या दोन प्रकारच्या शाळांची आतां माहिती द्यावयाची राहिली आहे. त्या शिक्षकवर्ग तयार करण्याच्या व धंदे शिक्षणाच्या शाळा होत. पहिल्या वर्गाच्या शाळांचे तीन प्रकार आहेत. वरच्या प्रकारच्या शाळांत इंग्रजी भाषेच्या द्वारें शिक्षण देण्यांत येतें. मद्रास इलाख्यांत शिक्षणाचे संबंधानें एक कालेज आहे व मद्रास युनिव्हर्सिटी शिक्षणाचे कामांतील नैपुण्याबद्दल पदवी देते. दुसऱ्या ह्मणजे मध्यम प्रतीच्या शाळांतून देशी भाषेंत शिक्षण देण्यांत येतें. मद्रास इलाख्यांत मात्र अशा प्रकारच्या कांहीं शाळांतून इंग्रजी भाषेंतच शिक्षण देण्यांत येतें. तिसऱ्या ह्मणजे प्राथमिक शिक्षणाच्या शिक्षकवर्ग तयार करण्याच्या शाळांत निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे शिक्षणक्रम सुरू आहेत. ह्यांहीपेक्षां खालच्या दरजाच्या शाळा थोड्या वर्षांपूर्वी बंगाल व मद्रास इलाख्यांत स्थापन झाल्या आहेत. निरनिराळ्या प्रांतांत कमीजास्त प्रमाणानें बालशिक्षकांचीही योजना शिक्षणाचे कामीं करण्यांत येते. सन १८९१।९२ साला पर्यंत या प्रकारचे शाळांतील मध्यम व प्राथमिक शिक्षणाच्या क्रमांतील भिन्नता सुस्पष्ट नव्हती; तथापि ह्या सालीं प्राथमिक शिक्षणाच्या ४९ शाळा असून मध्यम प्रतीच्या शिक्षणाच्या २५ होत्या. सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या खाजगी शाळांत एतद्देशीय ख्रिश्चन विद्यार्थांची संख्या बरीच मोठी होती. हल्लीं शाळांत आहे त्या पेक्षां विद्यार्थी वर्गाचा वर्तनक्रम जास्त नीतिशुद्ध असला पाहिजे असा हिंदुस्थानसरकारचा अभिप्राय आहे; तेव्हां हल्लीं शिक्षकवर्ग तयार करण्याचे कामास विशेष महत्व आलें आहे हें उघड आहे. सन १८९१-९२ सालीं शिक्षक तयार करण्याच्या शाळा ११५ होत्या व त्यांत विद्यार्थी ४३५३ होते. सन १८८१-८२ सालीं ह्या शाळा ९६ होत्या व विद्यार्थी ३५१९ होते. सन १८९३-९४ सालीं शाळा १५१ व विद्यार्थी ४३७० होते. स्त्रीशिक्षक तयार करण्याच्या सन १८९१-९२ सालीं २७ शाळा असून त्यापैकीं बऱ्याच शाळांत प्राथमिक व मध्यम प्रतीच्या शिक्षणापलीकडे शिक्षण देण्यांत येत नव्हतें. एकंदर ७९३ विद्यार्थिणी पैकीं ४४८ एतद्देशीय ख्रिश्चन धर्माच्या होत्या. ह्याचें कारण असें दिसतें कीं, ह्या वर्गातील मुलीं शिवाय इतर जातीच्या प्रतिष्ठित व सुशिक्षित घराण्यांतील फारच थोड्या मुली शिक्षणाचा धंदा चालविण्यास उत्सुक असतात. या शाळांची संख्या खालीं दिली आहे.

	शाळा.	विद्यार्थी.
१८८१-८२	१६	५१९
१८९१-९२	३७	७९३
१८९३-९४	३८	९०९

धंदे शिक्षण—या वर्गाचे शिक्षणाचे दोन वर्ग केले तरी चालतील. एका वर्गांत कायदे, वैद्यक व एंजिनीअरिंग या विषयांचें शिक्षण येईल व दुसरे वर्गांत कलाकौशल्याच्या धंद्यांचें शिक्षण येईल. कायदे वैद्यक व एंजिनीअरिंग हे विषय शिकविण्याची कालेजें आहेत; त्यांची व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या वर कालेजांबद्दल सांगतानां दिली आहे. आतां या वर्गाचे शिक्षणाच्या कालेजाचे खालच्या वर्गाच्या शाळा आहेत त्यांचे संबंधानें सांगण्याचें आहे. या वर्गाच्या शाळा किती आहेत व त्यांत विद्यार्थी किती आहेत त्याबद्दल माहिती देतों.

	१८८१-८२	१८९१-९२	१८९३-९४
१ कायद्याच्या शाळा.	—	२	५
—त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या.	—	३९	२२९
२ वैद्यकीच्या शाळा.	११	१९	२०
—त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या.	८३०	१९८८	२५१०
३ एंजिनीअरिंग शाळा.	९	२४	२४
—त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या.	३१०	१०४२	१२०३

वैद्यकीचे शाळांतून स्त्रियाही शिकण्यास येतात, त्यांची संख्या सन १८९१-९२ सालीं ८७ व सन १८९३-९४ सालीं ६० होती.

या शाळांतून विशेष उंच प्रतीचें शिक्षण देण्यांत येत नाहीं व या शाळांतून बाहेर पडणारे विद्यार्थ्यांस साधारण नेहमींचे व्यवहारास पुरण्यासारखें ज्ञान मिळालेलें असतें.

कौशल्याचे शिक्षण—सन १८८४ पासून आलीकडे हिंदुस्थानांत कलाकौशल्याचा व औद्योगिक शिक्षणाचा प्रसार कसे प्रकारानें करावा याबद्दल विचार चालू झाला आहे. मूळ सन १८५४चे शिक्षणाचे संबंधाचे खलित्यांतच हिंदुस्थनांतील बहुजन समाजाला प्रत्येक स्थितींत उपयोगी पडण्यासारखें व्यावहारिक शिक्षण देण्यांत यावें असें फर्माविलें होतें, परंतु सरकारी शाळांतून भाषा विषयक ज्ञानाचे शिक्षण देण्याकडेच लक्ष पोंचविलें गेल्यामुळें, खलित्यांतलि त्या सूचना तशाच्यातशाच राहिल्या होत्या. पुढें एजुकेन कमिशनचे सूचनेवरून हीं स्थिति सुधारण्याचें हिंदुस्थान सरकारांनीं ठरविलें व सन १८८६

सालीं त्यांनीं या विषयासंबंधानें कशी व्यवस्था करावी याबद्दल स्थानिक सरकारांस कांहीं सूचना केल्या व त्या कालापर्यंत या विषया संबंधानें कांहीं व्यवस्था झाली नव्हती ही गोष्ट त्यांचे नजरेस आणून दिली. हिंदुस्थान सरकारांनीं असें सुचविलें होतें कीं, चित्रलेखन व शास्त्रांचीं मूलतत्वें हे विषय अगदीं खालचे दर्जाच्या शाळा सोडून बाकीच्या सर्व शाळांत शिकविण्यांत यावे व सृष्टपदार्थ विज्ञान शास्त्राचे अभ्यासासंबंधानें दुर्लक्ष्य होऊं नये. चित्रलेखन शिकविण्यासंबंधानें बहुतेक प्रांतांत कमी जास्ती परंतु कांहीं तरी तजवीज झाली आहे व तो विषय मध्यमवर्गाच्या शाळांतूनच आतां शिकविण्यांत येतो. शिवाय चित्रलेखन व कलांचें शिक्षण देण्यासाठीं स्वतंत्र शाळाही स्थापन केलेल्या आहेत. ह्या शाळा किती आहेत व त्यांत विद्यार्थी किती आहेत तें येणें प्रमाणें—

	शाळांची संख्या.	विद्यार्थांची संख्या.
सन १८८१-८२	५	४३९
— १८९१-९२	६	१०४८
— १८९३-९४	५	१३४८

शाळांतून सृष्टपदार्थ विज्ञान शास्त्राचे कांहीं भाग शिकविण्यासंबंधानें मुंबई, मद्रास, बंगाल, आसाम व मध्यप्रांतांत व्यवस्था आहे; वायव्यप्रांत व पंजाबांत या बद्दल व्यवस्था करण्याचा विचार ठरला आहे. बाकीचे प्रांतांत शास्त्रीय विषय शिकविण्याबद्दल व्यवस्था झालेली नाहीं.

धंदे शिक्षण देण्याचे संबंधानेंही हिंदुस्थानसरकारांनीं स्थानिक सरकारांस त्याच वेळीं सूचना केल्या होत्या व पुढें त्या सरकारांचा अभिप्राय घेऊन त्या बद्दल कोणते तत्वांवर व्यवस्था करण्याची या बद्दल ठराव केला आहे. त्या ठरावांतील मुद्दे असे आहेत कीं, शाळांतून शिक्षण देण्याचें तें फक्त भाषाज्ञाना संबंधींच न देतां व्यवहारांत उपयोगी पडण्यासारखे विषयांचेंही द्यावें ; शेतकी सारखे धंद्यांपासून वाढत जाणारे जनसमाजाचा गुजारा लागण्यासारखा नाहीं, तेव्हां त्यांस उदरनिर्वाहास साधन करून देण्यासाठीं व देशांतील सांपत्तिक द्रव्यांचा योग्य उपयोग करून घेण्याकडे जास्त प्रवृत्ति होत जावी व जगांतील चढाओढींत यादेशांतील लोकांचा निभाव लागावा ह्मणून धंदे शिक्षण देणे अवश्य आहे. खरें धंदे शिक्षण ह्मणजे व्यापारोपयोगी जिन्नस चांगले तऱ्हेचें तयार करण्यास मनुष्य वाकबगार होणें हें आहे. ही वाकबगारी येण्यास बुद्धि, कल्पनाशक्ती, हस्त कौशल्य, आवडनिवड करण्याचें सामर्थ्य, हीं सर्व चांगलीं सुधारलीं पाहिजेत- ह्या प्रकारचे धंदेशिक्षण देण्याचें तें त्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्यास धंदे रोजगारांत घालण्यास भांडवल तयार असेल तरच देण्याचें आहे ;

कारण हें ज्ञान ह्मणजे धंदे रोजगारांतील भांडवलाची साथ देणारी वस्तु आहे; तेव्हां तें शिक्षण आगगाड्यांचा व कारखान्यांचा प्रसार होत जाईल, खनिज द्रव्यें काढण्यास सुरवात होईल व व्यापाराची वृद्धी होत जाईल त्या मानानें महत्वाचें होत जाणार आहे. हें शिक्षण जरूरीप्रमाणें आस्ते आस्ते देत गेलें पाहिजे असें आहे, तरीही हल्लींचे देशस्थितीचे मानानें सरकारांनीं हें शिक्षण देण्यास सुरवात करण्यास योग्य वेळ प्राप्त झाली आहे व या कामीं उदार गृहस्थांनींही लक्ष घातलें पाहिजे. सुरवात करण्याची ती हल्लींचे स्थितीचे मानानें करून, पुढें प्रसंगाप्रमाणें शिक्षणक्रमांत सुधारणा करीत जावी. हीं हकीकत धंदे शिक्षणापैकीं वरिष्ठ प्रतीचे शिक्षणा संबंधानें आहे. धंदे शिक्षणाचे प्राथमिक ज्ञानासंबंधानें स्थिती भिन्न आहे व तें शिक्षण देण्याचें सुरू करण्यास विशेषशा अडचणीही नाहींत. एकंदरींत हे सर्व विचार मनांत आणून हिंदुस्थान सरकारांनीं असें ठरविलें कीं, विशेष प्रकारचे धंद्याचें शिक्षण ग्रहण करण्याची योग्यता येण्यास अवश्य असणारे जे सामान्य प्रकारचें शास्त्रीय शिक्षण, तें हल्लींचे शाळांतील शिक्षण क्रमांत वर सांगितल्याप्रमाणें चित्रलेखन व शास्त्रीय विषयांची मूल तत्वें ह्या विषयांचा समावेश करून, सुरू करावें व विशेष प्रकारचें धंदे शिक्षण देण्याचें तें देशांतील ज्या भागांत जे धंदे रोजगार चालू असतील त्यांचे अनुरोधानें व त्या धंद्यांत उपयोगी पडण्यासारखे लोक तयार होतील असे प्रकारचें देण्याची तजवीज करावी. ही व्यवस्था करण्यास सोईचें व्हावें ह्मणून प्रत्येक प्रांतांत कोण कोणते धंदे विशेष प्रकारानें चालू आहेत व त्यांची स्थिती कशी आहे याबद्दल चौकशी करावी, व विलायतेस धंदे शिक्षणासंबंधानें कमिशननें जो रिपोर्ट केला आहे त्याचे अनुरोधानें इकडे धंदे शिक्षण देण्यासंबंधानें कशा व्यवस्था कराव्या हें सुचविण्यासाठीं त्या बाबतींत विशेष ज्ञान आहे असे लोकांची एक कमिटी नेमावी इ. इ.

हा ठराव झाल्या नंतर वेगळाले प्रांतांत धंदे शिक्षणाचे बाबतींत कांहीं नवीन व्यवस्था करण्यांत आल्या व पूर्वी त्या बाबतींत ज्या व्यवस्था होत्या त्या सुधारण्यांत आल्या; तेव्हां आतां नवीन व जुन्या व्यवस्था असा भेद न करतां वेगळाल्या प्रांतांत धंदे शिक्षणाचे संबंधानें कशी स्थिती आहे त्याचे वर्णन देतों. अर्थात ग्रंथाचे मानानें ही माहिती अत्यंत संक्षिप्त रीतीनें येईल. मद्रास इलाख्यांत धंदे शिक्षण देण्याचें मद्रास स्कूल आफ आर्टस् या शाळेंत चालू आहे. तेथें चित्रें काढणें व चित्रें खोदण्याचें शिकविण्यांत येतें व त्याच शाळेचे दुसरे एका भागांत सुतारकी, कोरीव काम, गालिचे व सतरंजा विणणें, सोनारी काम, मातीचे भांड्यांवर चित्रें काढणें वगैरे कामें शिकविण्यांत येतात.

या शाळेंतील शिक्षणापासून प्राचीनचे बुडते धंदे तरते झाले इतकेंच नाहीं, तर त्यांत सुधारणाही होत आहे. महाराणी सरकारचे जुबिली प्रीत्यर्थ फंड जमा होऊन व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट स्थापन झालें आहे, परंतु त्या संस्थेची इमारत तयार झाली नसलेमुळें शिक्षणाचें काम अजून नीट चालूं झालें नाहीं या इलाख्यांत मद्रास येथें एंजिनिअरिंग कालेज आहे त्या संबंधानें विशेष सांगण्याची जरूर नाहीं. शेतकीचे ही एक कालेज आहे, त्यांत शेतकीचे शिक्षण देण्यांत येतें. मद्रास सरकारांनीं धंदे शिक्षणा संबंधानें एक विशेष व्यवस्था चालू केली आहे, ती अशी कीं, वेगळाले शास्त्रीय, कलाकौशल्याचे व धंद्याचे उपयोगी विषयांत परीक्षा घेऊन त्यांत सरटिफिकीटें देण्यांत येतात. ही व्यवस्था करण्याचा हेतु असा आहे कीं, प्रथमतः लोकांत परीक्षणाचे द्वारें त्या विषयांचे अभ्यासाची जिज्ञासा उत्पन्न करून देऊन, नंतर तानमान पाहून धंदे शिक्षणाच्या शाळा घालून शिक्षण देण्याचें सुरू करावें.

मुंबई इलाख्यांत धंदे शिक्षणाच्या संबंधानें कांहीं व्यवस्था झाली आहे. या बाबतींतील इलाखे सरकारचे ठरावांत धंदे शिक्षणाचें सामान्य शिक्षण व विशेष शिक्षण असे दोन वर्ग केले आहेत; पहिले वर्गाचे शिक्षणांत सर्व धंद्यांस उपयोगी पडण्यासारखें हातास वळण लावणारें शिक्षण येतें व दुसरे वर्गांत विशेष धंद्यांचे शिक्षण येतें. या ठरावांत (१) शेतकी, (२) कलाकौशल्याचे धंदे व (३) यांत्रिक ज्ञान यांचे शिक्षणाबद्दल विचार केला आहे. कलाकौशल्याचे शिक्षणाबद्दल मुंबईचे स्कूल आफ आर्ट यांत कांहीं विशेष व्यवस्था करून सोय केली आहे. या शाळेंत चित्रें काढण्याचें व करण्याचें व तीं कोरण्याचें शिकवितात. सन १८९० सालीं या शाळेस धंदे शिक्षण देण्यासाठीं रे वर्कशाप (कारखाना) जोडण्यांत आला व त्यांत लाकडांवरील कोरीव काम, धातूचे काम, सोनारकी, गालीचे करणें वगैरे कामें शिकविण्यांत येतात. लार्ड रिपन यांचे स्मारकासाठीं व महाराणी सरकारचे जूबिलीचे वेळीं मुंबईचे मुनसिपालिटीनें दिलेले व इतर रीतीनें जमा झालेले पैशांतून व्हिक्टोरिया टेक्निकल इंस्टिटयूट स्थापन झालें आहे व ही संस्था सरकार, मुंबई मुनसिपालिटी, रेल्वे कंपन्या व गिरणीवाल्यांची असोसिएशन यांचे वर्गणीनें चालत आहे. या शाळेंत सृष्टपदार्थविज्ञान, यंत्र शास्त्र, वगैरे विषय शिकविण्यांत येतात, व याच संस्थेस जोडून असलेले रिपन टेक्स्टाइल इन्स्टिटयूट आहे त्यांत विणकरी संबंधानें शास्त्रीय व व्यावहारिक शिक्षण देण्यांत येतें. पुणें येथील सायन्स कालेजांत एंजिनिअरिंग, शास्त्रें, शेतकी व फारेस्ट्री (जंगल संबंधी ज्ञान) हे विषय शिकविण्यांत येतात. या कालेजांत एक वर्कशाप (कारखाना) आहे त्यांत

लोहाराचें व ओताऱ्याचें काम शिकविण्यांत येतें. हायस्कुलांत शेतकीचा विषय शिकविण्याची तजवीज आहे. मुंबईस पशुवैद्यकीचे कालेज आहे. याप्रमाणें मुंबई इलाख्यांत वर सांगितलेले तीन ही विषयासंबंधानें शिक्षण देण्यांत येतें. या शिवाय धंद्याच्या लहान शाळा आहेत त्यांची संख्या एकंदरींत येईल.

बंगाल्यांत धंदेरोजगारांचे स्थितीसंबंधानें विशेष अमलदार नेमून चौकशी करण्यांत आली आहे. त्यानें केलेले सूचनांचा अजून विचार चालू आहे. मात्र एंजिनिअरिंग कालेजांत यांत्रिक ज्ञानाचें शिक्षण देण्यासंबंधानें तजवीज करण्यांत आली आहे. कलकत्त्याचे स्कूल आफ आर्टमध्यें चित्तें काढणें, चित्रें करणें, कोरीव काम वगैरे शिकवितात. या इलाख्यांत धंदेशिक्षणाच्या दुसऱ्या लहान शाळा आहेत, परंतु त्यांची स्थिति वाईट आहे.

वायव्य प्रांताचे सरकारचे मताप्रमाणें त्या प्रांतांत परकीय भांडवलानें जे धंदे चालू झाले आहेत ते चालविण्यास जें यांत्रिक ज्ञान लागतें तें देण्याची तजवीज करावा ह्मणजे पुरें आहे. या विषयाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली होती, तिचे सूचनांचा विचार चालू आहे. अलीकडे लखनौ येथें एक धंदे शिक्षणाची शाळा व कानपूर येथें एक शेतकीची शाळा अशा घालण्यांत आल्या आहेत.

पंजाबांत धंदेशिक्षण देणाऱ्या शाळांस मदत देण्याचा ठराव झाला आहे. लाहोर येथील मेयो स्कूल आफ इंडस्ट्रियल आर्ट या शाळेंत इमारतींस शोभा आणण्या संबंधाचीं कारागिरीचीं कामें विशेष शिकविण्यांत येतात. लाहोर येथें एक पशुवैद्यकाची शाळा आहे.

मध्यप्रांतांत शेतकीची एक व एंजिनिअरिंगची एक अशा शाळा आहेत. धंदे शिक्षणासंबंधानें कांहीं स्कालरशिपा ठेवल्या आहेत; त्या मिळणारे विद्यार्थ्यांस बंगाल नागपूर रेल्वेचे कारखान्यांत शिक्षण मिळतें.

ब्रह्मदेशांत ही असेच प्रकारची व्यवस्था करण्यांत आली आहे.

आतां धंदे शिक्षणासंबंधाच्या शाळांची व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या देतों.

	१८८१-८२	१८९१-९२	१८९३-९४
कलाकौशल्याच्या शाळांची संख्या.	५	६	५
त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या.	४३९	१०४८	१३८८
औद्योदिक शांळांची संख्या.	४४	६९	६९
त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या.	१५०९	३८६०	३८८४

विशेष प्रकारच्या शिक्षणाच्या शाळांचें येथपर्यंत वर्णन दिलें व त्यांची

संख्याही दिली. या वर्गाचें शिक्षणाच्या वर दिलेले शाळांशिवाय इतर कांहीं शाळा आहेत त्यांची संख्या व त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या खालीं लिहिल्याप्रमाणें:—

	१८८१–८२	१८९१–९२	१८९३–९४
विशेष शिक्षणाच्या इतर शाळांची संख्या.	५६	२८२	३४५
त्यांतलि विद्यार्थ्यांची संख्या.	१९८०	८६०८	९१८९

स्त्रीशिक्षण—या भागांत ठिकठिकाणीं शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या दाखल करतांना स्त्रियांचे संबंधानें ज्या संस्था आहेत त्यांचा उल्लेख केला आहे, तरी हें शिक्षण किती थोडें होत आहे व तें ही किती कोतें आहे, हें स्पष्ट रीतीनें दिसण्यासाठीं त्या सर्व हकीकतींचे एका वेगळ्या सदरांत एके ठिकाणीं पुनरुच्चारण करणें इष्ट दिसतें. स्त्रियांस शिक्षण उदरनिर्वाह करण्यास अवश्यकतेचें नसल्यामुळें व बालविवाहाचे चालीमुळें व अशाच दुसऱ्या सामाजिक कारणामुळें स्त्रीशिक्षणाचा प्रसार बरोबर रीतीनें होत नाहीं. शिक्षण फारच थोड्या मुलींस मिळतें व तेंही प्राथमिक शिक्षणाचे पलीकडे फारसें जात नाहीं. कांहीं प्रांतांत मात्र वरिष्ठ प्रतीचें शिक्षण देण्याकडे सुधारणेच्छु लोकांचा कल होत चालला आहे. ही जी स्थिति सांगितली ती हिंदु व मुसलमान वगैरे एतद्देशीय लोकांचे संबंधानें आहे. युरोपीअन, युरेशिअनस्, पारशी, यहुदी वगैरे वर्गाचे लोकांची स्त्रीशिशणासंबंधानें स्थिति सर्व प्रकारानें भिन्न आहे.

स्त्रीयांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण देण्यासाठीं स्वतंत्र कालेजें नाहींत. पुरुषांसाठीं जीं कालेजें आहेत त्यांतच स्त्रियांस शिकावें लागतें. सन १८९१–९२ सालीं कालेजांत ७६ स्त्रिया शिकत होत्या; त्यांत आर्टस् कालेजांत ४५, वैद्यकीचे कालेजांत २९ व शिक्षणाचे कालेजांत २ अशा होत्या. त्या सालीं मध्यमवर्गाचे शिक्षणाच्या इंग्रजी वरिष्ठ प्रतीच्या शाळा (हायस्कुलें) ७६ होत्या व त्यांत ७०६६ विद्यार्थिणी होत्या. मध्यमवर्गाच्या इंग्रजी शाळा १५७ होत्या व त्यांत विद्यार्थिणी ९३९६ होत्या व याच वर्गाच्या देशीभाषेच्या शाळा २०१ होत्या व त्यांत विद्यार्थिणी १५०९२ होत्या. सन १८८१ सालीं वरिष्ठ प्रतीच्या इंग्रजी शाळा १४६ होत्या व त्यांत ५६३६ विद्यार्थिणी होत्या; देशीभाषेच्या शाळा ४४ होत्या व त्यांत ७३० विद्यार्थिणी होत्या. पूर्वी शाळांची संख्या दिली आहे त्यांत मुलींचे शाळेंत कांहीं मुलें येतात त्यांची संख्या सामिल आहे सन १८९१–९२ सालीं मुलींचे मध्यम वर्गाचे शाळांत जाणारे मुलांची संख्या

२७५२ होती. याचप्रमाणें मुलांचे शाळांत ही मुली जात होत्या त्यांची संख्या ३६८८ होती.

प्राथमिक शिक्षणाच्या मुलींच्या शाळा व त्यांत विद्यार्थिणी किती होत्या त्याबद्दल माहितीचें कोष्टक देतों.

प्राथमिक शिक्षणाच्या		शाळांची संख्या.	विद्यार्थिणींची संख्या.
मुलींच्या शाळा	१८९१–९२	५२२८	१५०९५४
	१८८१–८२	२६७८	८५२८९

मुलांचे शाळांत सन १८९१–९२ सालीं ११९८४८ मुली शिकत होत्या. एकंदरींत सन १८९१–९२ सालीं मुलांचे व मुलींचे शाळांत मिळून मध्यमवर्गाचे शिक्षणांत ३५२४२ व प्राथमिक शिक्षणांत २७०८०२ विद्यार्थिणी होत्या.

विशेष वर्गाचे शाळांपकीं वैद्यकीचे शाळांत ८७, स्कूल आफ आर्ट मध्यें ५१ व इतर प्रकारचे शाळांत ३२३ मिळून ४६१ विद्यार्थिणी होत्या.

हायस्कुलांचे संख्येंत प्रारंभीपासून इंग्रजी शिकण्याचे वर्गापासून सर्व वर्गाचा समावेश होतो हें वर सांगितलेंच आहे, तेव्हां वरील संख्येवरून खरोखर मध्यमवर्गाचें इंग्रजी शिक्षण किती विद्यार्थिणीस मिळत होतें तें स्पष्टपणें समजत नाहीं. खरोखर मध्यमवर्गाचें इंग्रजी शिक्षण कायतें ८५८ विद्यार्थिणींस मिळत होतें, ह्मणजे मध्यम वर्गाचें शिक्षण मिळणाऱ्यामुलींपैकीं शेंकडा २½ मुलींस खरोखर हायस्कुलाचे पायरीचें शिक्षण मिळत होतें.

आतां वेगळाले जातींत शाळेंत जाण्यास योग्य मुलींत शेंकडा किती मुली शाळेंत जातात तें सांगतों.

हिंदु.	·७१	मुसलमान.	·६७
शीख.	·४१	ख्रिश्चन.	३२·९१
जैन.	३·२३	यहुदी.	२९·५५
बुद्ध.	२·८२		
पार्शी.	६७·१५	विनधर्माचे.	·१७

शिक्षणांत असलेले व शिकण्यास योग्य असलेले मुलांचें प्रमाण—येथपर्यंत शिक्षणाचा प्रसार किती झाला आहे या बद्दल संक्षिप्त रीतीनें वर्णन केलें आहे. हें वर्णन करतांनां शिक्षणाची स्थिती पाहण्यासाठीं वारंवार ज्या परीक्षा होतात त्या बद्दल माहिती देण्यास पाहिजे होती, परंतु ती विस्तार भयास्तव गाळली आहे. देशांत शिक्षणाचा प्रसार किती झाला आहे हें समजण्यास शाळांची व त्यांत जाणारे विद्यार्थ्यांची संख्या समजली ह्मणजे साधारण बरे प्रकारची कल्पना होण्यासारखी आहे, ह्मणून तेवढ्याच मुद्यांवर या भागांत

माहिती दिली आहे. आतां शिक्षणांत असलेले विद्यार्थ्यांचें प्रमाण शिक्षणास योग्य असे प्रजेचे संख्येशीं कसें बसतें तें सांगतों. लोक संख्येपैकीं शेंकडा १५ शाळेंत जाण्यासारखीं मुलें आहेत असें धरावें असें हिंदुस्थान सरकारांनीं ठरविलें आहे हें प्रमाण साधारण अजमासासाठींच घेतलेलें आहे; साधारण सर्व वर्गांचे लोक घेतले ह्मणजे हे प्रमाण चांगलें उपयोगी पडतें, परंतु युरोपिअन, पारशी किंवा ब्रह्मो असे लहान संख्येचे लोकसमुदाय, ज्यांत शिक्षणाचा प्रसार फार झाला आहे असे वर्गांचे लोकच घेतले ह्मणजे तें प्रमाण चुकतें सन १८९१-९२ सालीं शाळेंत जाण्यासारखे मुलांपैकीं नऊ मुलांत एक मुलगा शाळेंत जात होता व ५० मुलींपैकीं एक मुलगी शाळेंत जात होती असें दिसतें.

वेगळाले जातींत शिक्षणाचा प्रसार किती झाला आहे–कोणते जातींत शिक्षणाचा किती प्रसार झाला आहे हें पाहण्याचें आहे. वेगळाले वर्गांचे लोकांतील शाळेंत जाण्यास योग्य मुलांपैकीं शिक्षणांत शेंकडा किती होतीं हें पुढील माहितीवरून दिसून येईल.

जात किंवा धर्म.	शाळेंत जाण्यास योग्य असे मुलां-मुलींपैकीं शिक्षणांत शेंकडा किती होतीं त्यांचे प्रमाण–सन १८९१-९२ सालाबद्दल.
हिंदु.	१०·५
महंमदीय.	११·७
पारशी (मुंबई व मध्यप्रांतांत).	१४३·१.
शीख.	९·४
बुद्ध धर्माचे (ब्रह्मदेशांत).	१६·८
नेटीव ख्रिश्चन.	४९·३
युरोपिअन व युरेशिअन.	७९·१
यहुदी (मुंबई)	८६·५
ब्रह्मो (बंगाल)	२१२·६

यांत पारशी व ब्रह्मो यांचे प्रमाण जास्त वाढण्याचें कारण वर सांगितलेंच आहे.

आणखी एक प्रकारानें विद्यार्थिवर्गाची फोड करणें जरूर आहे, ती अशी कीं, वेगळाले प्रकारचे शिक्षणांत वेगळाले जातीचे लोक कसे प्रमाणानें आहेत,

हें दाखविण्यासाठीं प्रत्येक वर्गाचे शिक्षण क्रमांत दर शंभर विद्यार्थ्यांत वेगळाले जातीचे किती आहेत तें खालीं देतों.

(१) कालेजांतील विद्यार्थ्यांत.

हिंदु ८६·२, मुसलमान ६·४, नेटिव्ह ख्रिश्चन ३, युरोपिअन १·२, इतर ३·२.

(२) धंद्यांच्या कालेजांतील विद्यार्थ्यांत.

हिंदु ७४·३, मुसलमान ७·२, नेटिव्ह ख्रिश्चिन ३·६, युरोपिअन व युरेशिअन ११·३, इतर ३·६.

(३) मध्यम वर्गाच्या इंग्रजी मुलांचे शाळांतील विद्यार्थ्यांत.

हिंदु ७५·३, मुसलमान १३, नेटिव्ह ख्रिश्चन ४·३, युरोपिअन व युरेशिअन ३·६, इतर ३·८.

(४) मध्यम वर्गाचे देशी भाषांचे मुलांचे शाळांतील विद्यार्थ्यांत.

हिंदु ७८·१, मुसलमान १९·३, नेटिव्ह ख्रिश्चन ०·८, इतर १·८.

(५) प्राथमिक शिक्षणाचे मुलांचे शाळांतील विद्यार्थ्यांत.

हिंदु ७१·२, मुसलमान २०·३, युरोपिअन ०·१, नेटिव्ह ख्रिश्चन २·०, इतर ६·४.

(६) स्पेशल (विशेष वर्गाचे) शाळांतील विद्यार्थ्यांत.

हिंदु ५८·२, मुसलमान २४·७, युरोपिअन २·९, नेटिव्ह ख्रिश्चन ८·९, इतर ५·३.

(७) मध्यम वर्गाच्या मुलींच्या इंग्रजी शाळा.

हिंदु ८·२, मुसलमान ०·१, युरोपिअन व युरेशीअन ५८·३, नेटिव्ह ख्रिश्चन २६·८, इतर ६·६.

(८) मध्यम वर्गाच्या मुलींच्या देशी भाषांच्या शाळा.

हिंदु ६६·८, मुसलमान ६·२, नेटिव्ह ख्रिश्चन २५·६, इतर १·४.

(९) मुलींच्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळा.

हिंदु ७१·५, मुसलमान १६·२, नेटिव्ह ख्रिश्चन ६·१, युरोपिअन व युरेशिअन १, इतर ५·२.

शिक्षणावर खर्च-किती होत आहे त्याबद्दल आतां माहिती देतों.

शाळांचे वर्ग किंवा	१८८१-८२		१८९१-९२	
खर्चाचीं सदरें.	प्रांतिक.	एकंदर.	प्रांतिक.	एकंदर
विश्वविद्यालयें.	५४८९०	१७७७४०	३२६६०	४७३१४०
क़ालेजें.	९९२४९०	१६१७०८०	१५३७६८०	२८७२८३०
मध्यम वर्गाच्या शाळा.	१६९७६८०	४८०६२८०	१६६१५१०	९८९५६९०
प्राथमिक शाळा.	१५८२७८०	७६२५०००	१३४३३४०	९६१४२८०
ट्रेनिंग व धंद्याच्या शाळा.	६४१६३०	९५२५४०	१००२५८०	१७१०३४०
स्कालरशिपा.	३१६०८०	५०८६७०	४०८६१	७२७०७०
तपासणी खर्च. डिरे-क्‌शन्‌ व इन्स्पेक्‌शन्‌).	१४८१९२०	१६८२९००	१५४२५२०	२२४९७८०
इ़मारती वगैरे.	३६०२१०	८७२०८०	१०८२७००	२१८२३४०
किरकोळ.	१६३५७०	३६५१२०	२०१९५०	७९४१६
	७२९१२५०	१८६०७४१०	८८१३५५०	३०५१९६३०
* या शिवाय इंपीरियल ग्रयांट होती ती.			*	१३२४००

ह्या खर्चापैकीं सन १८८१--८२ सालीं सरकारी खर्च शेंकडा ५९-१ टक्के होता, व खासगी. ४०.९ टक्के होता. सन १८९१--९२ सालीं हें प्रमाण सरकारी ५१-२ व खासगी ४८-८ असें होतें. विश्वविद्यालयें व शिक्षक तयार करण्याच्या शाळांचा व देखरेख या संबंधाचा सर्व खर्च सरकारावरच आहे. हल्लीं कालेजें व प्राथमिक शिक्षणावर होत असलेले खर्चाचा साधारण निम्मे भाग सरकारावर पडतो. मध्यम वर्गाचे शिक्षणावर होत असलेले खर्चापैकीं साधारण एक तृतीयांश सरकारी खर्च आहे. प्राथमिक शिक्षणावरील खर्चापैकीं बराच भाग लोकल फंडांतून किंवा प्रांतिक करांचे उत्पन्नांतून होतो. मध्यम वर्गाचे शिक्षणाचे कामांत खासगी खर्च पुष्कळ होत आहे.

आतां शिक्षणाचे संबंधानें प्रत्येक विद्यार्थ्यावर खर्च किती होतो तें देऊन हें खर्चाचें प्रकर्ण संपविण्याचें आहे. हा खर्च किती होतो तें येणें प्रमाणें:-

कालेजें.	रु.
—आर्टस.	१६२.
—धंद्यांची.	२५५.

	रु.
मध्यम वर्गाच्या शाळा.	२१·६
प्राथमिक शिक्षणाच्या शाळा.	३·६
ट्रेनिंग (शिक्षक तयार करण्याच्या शाळा.)	१३०·९
धंदे शिक्षणाच्या शाळा.	६५·१

एजुकेशन कमिशनच्या सूचना—येथवर हिंदुस्थानांतील शिक्षणासंबंधानें महत्वाची अशी माहिती संक्षिप्त रीतीनें दिली आहे. आतां एज्युकेशन कमिशननें आपल्या रिपोर्टांत ज्या कित्येक महत्वाच्या सूचना केल्या आहेत त्यांचा निर्देश करून हिंदुस्थान सरकारचा त्या संबंधानें अभिप्राय काय पडला तें सांगतों:—

युरोपियन व युरेजियन लोकांच्या मुलांचे शिक्षणाबद्दल सरकारानें एजुकेशन कमिशन नेमण्याचे पूर्वीच व्यवस्था केली होती. सरकारानें ह्या विद्यार्थ्यांच्या शाळांना मदत देण्यासाठीं ग्रांट--इन--एडचे नियम केले आहेत व लोकांनीं त्या कामीं फंड जमविला असेल त्यास पुरवणी दाखलही मदत करावी व धर्मसंबंधी मतभेदांकडे लक्ष देऊं नये असें ठरविलें आहे. ह्या बद्दल एक कोड करण्यांत आलें होतें. हें कोड हल्लीं नॉर्थवेस्ट प्राव्हिन्सेस (वायव्येकडील प्रांत) आयोध्या, पंजाब व मध्यप्रांत ह्यांना लागू केलें आहे; व त्यापैकीं कांहीं नियम मद्रासच्या कोडमध्यें सामील केले आहेत. मुंबई इलाख्यांत अशा शाळांना नियमित कालपर्यंत मदत ठरवून देण्याची पद्धत सुरू आहे. बंगाल्यांत परीक्षांचे निकालावर मदत देण्यांत येते. हिंदुस्थान सरकारनें अशी शिफारस केली आहे कीं मुंबईतील पद्धतच चोहोंकडे सुरू करावी, व त्याप्रमाणें ती पद्धत बंगाल्यांत कांहीं शाळांस लागू केली आहे.

मुसलमान लोकांचे शिक्षण—एज्युकेशन कमिशननें मुसलमान लोकांच्या मुलांसंबंधानें विशेष शिफारशी केल्या होत्या, त्यांचा निकाल हिंदुस्थान सरकारनें केला आहे. ह्या वर्गातील विद्यार्थ्यांचे शिक्षणासाठीं विशेष प्रकारची व्यवस्था करावी अशी कमिशनची सूचना होती; परंतु हिंदुस्थान सरकारास ती मान्य झाली नाहीं. त्यांच्या मतें वेगळालें प्रतीच्या ज्या सरकारी शाळा आहेत त्यांतच इतर विद्यार्थ्यांप्रमाणेंच मुसलमान विद्यार्थ्यांनीं शिक्षण मिळवावें व असे प्रकारें इतर जातींचे लोकां बरोबरीनें शिक्षण मिळविल्याशिवाय त्या लोकांचा जगांतील चढाओढींत निभाव लागणार नाहीं. वरिष्ठ प्रकारच्या शिक्षणांत मुसलमान लोकांचें पाऊल इतर लोकांच्या मानानें बरेंच मागें आहे, ह्मणून त्या लोकांनीं ह्या गोष्टीकडे जास्त लक्ष्य द्यावें व सरकारानीं स्कालरशिपा देऊन शिक्षणास उत्तेजन द्यावें असें हिंदुस्थान सरकारनें सुचविलें. याप्रमाणें सर्व प्रांतांत व्यवस्था करण्यांत आली आहे.

शिक्षणाचे कामीं सरकारनें मार्ग दाखवावयाचा आहे. परंतु लोकांनीं तें काम एकदां आंगावर घेतलें ह्मणजे त्या कामांतून हळूहळू आपलें आंग काढून घ्यावें असें ठरविलें आहे. दिवसानुदिवस इतर खाजगी शाळांना अनुकरण करण्या योग्य अशा नमुन्याच्या शाळा मात्र सरकारनें ठेवाव्या असा विचार ठरला आहे. अशा प्रकारची बदल करितांना सरकारी शाळांतील ह्मणजे विशेषेंकरून हायस्कुलें व कॉलेजें ह्यांतील विद्यार्थ्यांची संख्या नियमित करावी. ज्या अर्थी ह्या शाळा इतर शाळांना नमुना वळविण्याकरितांच ठेवावयाच्या आहेत त्या अर्थी प्रत्येक विद्यार्थ्याकडे पूर्ण लक्ष राहून त्याला पद्धतवार शिक्षण मिळेल अशा बेतानें विद्यार्थ्यांची संख्या तेथें असावी. अर्थात् ह्या शाळांचा पूर्ण रीतीनें उपयोग व्हावा ही सरकारची इच्छा आहेच, तथापि विशेष अपवादक कारणांशिवाय ह्या शाळांवरील सरकारी खर्च वाढवूं नये असें हिंदुस्थान सरकारनें सुचविलें आहे.

एज्युकेशन कमिशनपुढें हिंदुस्थानसरकारानें कालेजांत शिक्षणाचें काम करून पुढें परीक्षक वर्गांत त्याच लोकांना समाविष्ट करण्याची जी पद्धत पडली होती तिच्या गुणावगुण निर्णयाचा प्रश्न विचारासाठीं ठेविला होता. पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें शिक्षक व परीक्षक यांच्या कामामध्यें भेद केलेला नव्हता. तत्वज्ञान व उच्च प्रतीचे गणितशास्त्र असले विषय शिकविणारा शिक्षक सुद्धां प्रसंगानुसार खेड्यांतील प्राथमिक शिक्षणाचा परीक्षक होत असे. तेव्हां ह्या बाबतींत विद्याखात्यामध्यें सुधारणा झाली पाहिजे असें हिंदुस्थानसरकारचें मत होतें. या प्रश्नासंबंधानें कमिशननें आपल्या रिपोर्टांत असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, थोड्या पगारावर तरुण गृहस्थांना नेमून त्यांना वाटेल तें काम करण्यास सांगण्याची पद्धत सुधारली तरी पाहिजे किंवा अजीबात बंद केली पाहिजे. कमिशनचें ह्मणणें असें आहे कीं, मोठाल्या इलाख्यांमध्यें किंवा प्रांतांमध्यें कालेजांतून युरोपियन प्रिन्सिपल (मुख्य अध्यापक) ठेवून त्यांच्या हातांखालीं लायक प्रोफेसर ठेवावे. परक्षिक वर्गा मधून यूरोपियन लोक दिवसानुदिवस कमी करून त्यांचे जागी एतद्देशीय परीक्षक नेमावें. शिक्षक व परिक्षक हे दोन्ही वर्ग अगदीं पृथक ठेवावे असें हिंदुस्थानसरकारचें मत आहे हें वर सांगितलचें आहे. माध्यमिक व प्राथमिक शाळांचें परीक्षण करण्यास एतद्देशीय लोक चांगले लायक आहेत असा हिंदुस्थानसरकारचा अभिप्राय आहे व ह्या कामीं एतद्देशियांचीच दिवसानुदिवस योजना करण्याबद्दल सरकार विचार करीत आहे. युरोपियन प्रिन्सिपल व प्रोफेसर ह्यांच्या ऐवजीं एतद्देशिय लोक नेमण्याविषयींचा दुसरा प्रश्न आहे. हिंदुस्थान सरकारच्या मतें ह्या प्रश्नाची

भवति न भवति करण्याचा काल अद्यापि प्राप्त झालेला नाहीं. इंग्लंडांतून येणारे अध्यापक हल्लींप्रमाणें पुष्कळ वर्षेपर्यंत न नेमतां थोडी वर्षेंच त्यांची नेमणूक करण्याबद्दल विचार चालू आहे.

चांगले शिक्षक नेमण्याबद्दलही कमिशननें विचार केला होता. ह्या कामीं हिंदुस्थानसरकारच्या मतें जास्त सुधारणा झाली पाहिजे व स्थानिकसरकारांनीं या गोष्टीकडे विशेष लक्ष पोंचवावें असें त्यांनीं फर्माविलें आहे. हिंदुस्थानसरकारच्या मतें हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांचें वर्तन नीतिशुद्ध बनण्यास नीतिमान व विद्याव्यासंगी असा शिक्षक वर्ग असणें अत्यंत जरूर आहे.

लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या ह्यांकडे प्राथमिक व माध्यमिक शाळांची जबाबदारी सोंपवावी असा कमिशनचा अभिप्राय होता व हिंदुस्थानसरकारास तो पसंत पडला. मद्रास इलाख्यांत ह्या शाळांतून सरकारनें आपलें अंग अजिबात काढून घेतलें आहे. मुंबई इलाख्यांत बहुतेक प्राथमिक शाळांतून व $\frac{2}{3}$ माध्यमिक शाळांतून सरकारनें आपलें अंग काढून घेतलें आहे. पंजाबांतही तीच स्थिति आहे. बंगाल्यांत खेड्यांतील शाळांतून सरकारनें आपलें अंग काढून घेतलें आहे, परंतु म्युनिसिपालिटीच्या हद्दींतील शाळांची स्थिति तशी नाहीं. बाकीच्या प्रांतांत सदर्हूप्रमाणेंच बहुतेक व्यवस्था आहे. लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्यांतील मेंबर विद्येच्या देखरेखीच्या कामीं विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांना जास्त साह्य करितील अशी हिंदुस्थानसरकारनें आशा दाखविली आहे.

धंदे शिक्षण व उद्योग शिक्षण ह्या संबंधानें वर संक्षिप्त माहिती देण्यांत आलीच आहे. हिंदुस्थान सरकारचें थोडक्यांत असें मत आहे कीं, हिंदुस्थानांतील हल्लींच्या व्यापाराच्या स्थितीकडे लक्ष ठेवून अवश्यक तेवढें शास्त्रीय पद्धतीचें शिक्षण देण्यांत यावें. मुख्य मुख्य व्यापाराच्या ठिकाणीं उपयुक्त अशा शिक्षणाच्या शाळा काढाव्या व देशांतील भांडवल जसजसें वाढत जाईल त्या मानानें ही शिक्षण पद्धत परिपक्व दशेस आणावी.

आतां शाळांतून व कालेजांतून विद्यार्थ्यांस नीतिशिक्षण व योग्य वळण कसें मिळेल ह्या प्रश्नाचा निर्देश करावयाचा आहे. हिंदुस्थान सरकारानें पुढें लिहिलेल्या सूचना स्थानिक सरकारांकडे पाठविल्या आहेत व त्याप्रमाणें वेगळाले प्रांतांत बरेच गोष्टींसंबंधानें व्यवस्था सुरू झाली आहे.

(१) शिक्षक वर्ग तयार करण्यासाठीं ट्रेनिंग स्कुलें व कॉलेजें काढावीं, व तेथें समाधानकारक रीतीनें जे आपला विद्याक्रम पुरा करतील त्यांसच शिक्षक नेमण्यांत यावें.

(२) विद्यार्थी वर्गावर सुपरिणाम घडून येईल अशा प्रकारचे शिक्षणपद्धती-चा प्रसार व्हावा.

(३) विद्यार्थ्यांच्या नियमबाह्य वर्तनावर दाब ठेवणें.

(४) त्यांच्या वर्तणुकीबद्दल नोंद ठेवणें.

(५) बोर्डिंग हौसिस (भोजनालयें) शाळांना लागून घालणें.

(६) शाळेंत किंवा शाळेचे बाहेर विद्यार्थ्यांच्या वर्तनावर लक्ष ठेवतील असे मॉनिटर (मालचाटे) नेमणें.

(७) विद्यार्थ्यांस अमुक वयाच्या पुढें शाळेंत घेऊं नये असा निर्बंध ठरविणें.

(८) एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत विद्यार्थी घेण्याबद्दल निमम ठरविणें.

(९) खेळावयाच्या जागा व तालिमखाने शाळांना जोडणें. प्रिन्सिपल व प्रोफेसर यांनीं आपल्या खाजगी वर्तनानें विद्यार्थ्यांना योग्य वळण घालून द्यावें, अशीही हिंदुस्थानसरकारानें सूचना केली होती.

ज्या कॉलेजांतून व शाळांतून धार्मिक शिक्षण देण्यांत येत नाहीं तेथें केवळ नीतिशिक्षण अलगरीतीनें देतां येईल कीं नाहीं या संबंधानें शंका काढण्यांत आली होती. ही अडचण टाळण्याकरितां एज्युकेशन कमिशननें अशी सूचना केली आहे कीं, ज्या कॉलेजांतून धार्मिक शिक्षण पूर्णरीतीनें देतां येईल अशीं कॉलेजें सरकारच्या मदतीनें काढण्यांत यावीं. हें मत हिंदुस्थानसरकारास पूर्ण रीतीनें पसंत पडलें आहे; तथापि विद्याखात्यानें नीतिशिक्षणाबद्दल घ्यावा तसा अद्याप अनुभव घेतलेला नाहीं व जोंपर्यंत नीतिशिक्षण देण्याचा प्रयत्न विद्या-खात्यानें केला नाहीं तोंपर्यंत त्या कामीं यशप्राप्ति होणार नाहीं असें हिंदुस्थान सरकारास वाटत नाहीं. ह्या मतास अनुसरून एज्युकेशन कमिशनच्या शिफार-शी प्रमाणें हिंदुस्थानसरकारनें स्थानिक सरकारास अशी शिफारस केली आहे कीं, सर्वसाधारण धार्मिक मतें एकवट करून एक नीतिशिक्षणाचें पुस्तक तयार करावें व तें सरकारी व इतर शाळांतून सुरू करावें. या प्रश्नाचा विचार अद्याप व्हावयाचा आहे.

एज्युकेशन कमिशननें शिक्षण पद्धतीची सुधारणा करण्यासाठीं विद्वान मंड-ळ्या स्थापन करण्याविषयीं जी सूचना केली ती हिंदुस्थानसरकारनें पसंत केली आहे.

सरकारी अधिकारी व ज्यांना विद्येची विशेष अभिरुचि आहे अशा इतर लोकांनीं शिक्षणाचे संबंधानें परस्परास असलेली माहिती व परस्परांचे विचार प्रदर्शित केले तर त्यापासून फार फायदा होईल ही गोष्ट हिंदुस्थानसरकारास पूर्ण संमत आहे, व त्यांची अशी विशेष इच्छा आहे कीं, सरकारच्या मदतीनें

चालणाऱ्या व मदतीशिवाय चालणाऱ्या शाळांच्या अधिकाऱ्यांचे व सरकारी विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांचे वरचेवर एकत्र वादविवाद होण्याचे प्रसंग यावेत. या योगानें सरकारी मदतीनें शाळा चालविण्याच्या पद्धतीस जास्त बळकटी येणार आहे.

ह्याशिवाय एज्युकेशन कमिशननें प्रत्येक वर्गाच्या शिक्षणासंबंधानें अनेक महत्वाच्या सूचना केल्या आहेत परंतु त्या विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत.

भाग विसावा.

लोकस्थिति.

हिंदुस्थान देशाचें लोकस्थितीचें वर्णन करणें ह्मणजे मोठाच बिकट विषय हातीं घेणें होय. विस्ताराचेच संबंधानें पाहिलें तर, या देशास एक देश ह्मणण्यापेक्षां एक खंड ह्मणणें जास्त शोभेल. खंडांत वेगळाले देशांतील जमिनीचे प्रकार, लोकांच्या जाति, त्यांचे भाषाभेद, त्यांच्या रहाण्याच्या तऱ्हा, यांचे संबंधानें जितके फरक दृष्टिगोचर होतात तितकेच या देशांतलि वेगळाले भागांत दिसतात. उदाहरणार्थ समुद्र किनाऱ्या जवळील समशीत व उष्ण अशी हवा व तीस अनुरूप असा त्या लोकांचा आयुष्यक्रम, व थंडी व उष्णता यांचा कडेलोट होतो असे पंजाबासारखे भागांतील स्थिती व तेथील लोकांची रहाण्याची तऱ्हा, हीं घेतलीं तर वेगळाले प्रांतांत किती फरक पडतो तें दिसतें. या देशाची पश्चिमेकडील देशांशीं तुलना करण्याचा तर मुळींच मार्ग नाहीं. इकडील व तिकडील रीतिरिवाज भिन्न आहेत व लोकमान्यता ही इकडे जशी वंश परंपरेनें व वहिवाटीस अनुसरून चालते तशी तिकडे असत नाहीं; तिकडे लोकांत मान्यता होण्यास मोठे कुलांत जन्म होणें हें पुरत नाहीं. ती आंगचे कर्तबगारीवरच मिळवावी लागते. असे स्थितिवैचित्र्य असल्यामुळें लोकस्थिती संबंधानें प्रांतवार वेगळालें वर्णन दिलें आहे.

धंदेवार लोकांची वांटणी–प्रांतवार विचार करण्यापूर्वी सर्व देशास सामान्यतः लागू पडणाऱ्या अशा कांहीं गोष्टी आहेत, त्यांचे संबंधानें पहिल्यानें विचार केला पाहिजे. प्रथमतः कोणते धंद्यांत किती लोक आहेत हें पाहूं. या

बद्दल माहितीचें कोष्टक खालीं दिलें आहे, त्यांत प्रत्येक धंद्याचे लोकांचाच समावेश न करितां त्या त्या धंद्याचे कामकरी लोकांवर ज्या ज्या लोकांचा चरितार्थ चालतो असे लोकांचा ही त्या त्या वर्गांतच समावेश केलेला आहे. असे प्रकारानें समाजांतील सर्व लोकांचा या खालील आंकड्यांत समावेश झाला आहे.

धंदे	समाजापैकीं शेंकडा किती लोक सदरचे धंद्यात आहेत ते.
१ राज्यव्यवस्था.	१·९५
२ राज्याचें संरक्षण.	०·२३
३ परकीय राजांची सेवा.	०·१८
४ गुराखीपणा.	१·२७
५ शेतकी.	५९·७९
६ घरगुती नौकरी.	३·९१
७ खाद्य व पेय पदार्थ करणारे.	५·०७
८ सर्पण काटी गोळा करणारे.	१·२३
९ बांध काम करणारे.	०·५०
१० गाड्या व नांवा करणारे.	०·०५
११ इतर किरकोळ गरजांचे पदार्थ करणारे.	०·४०
१२ कपडे व पोषाखाचे जिन्नस करणारे.	४·३९
१३ धातूचें व जडावाचें काम करणारे.	१·३३
१४ कांचेचें व कुंभाराचें काम करणारे.	०·८२
१५ लांकूड व वेत यांचें काम करणारे.	१·५०
१६ औषधांचें काम करणारे.	०·१४
१७ कातड्यांचें काम करणारे.	१·१४
१८ व्यापारी.	१·६३
१९ माल नेणें व वखारींत साठवून ठेवणें हीं कामें करणारे.	१·३८
२० विद्वत्तेचे धंदे व शास्त्रीय धंदे करणारे.	१·९७
२१ खेळ करणारे.	०·०५
२२ मातीकाम व मजूरी करणारे.	८·८७
२३ अनिश्चित व्यवसायाचे लोक.	०·५४
२४ निष्कामी.	१·६५

प्रत्यक्ष शेतकीवरच निर्वाह खरणारे शेतकरी लोक, ह्मणजे जमीनीचे मालक व त्यांचीं कुळें, हे शेंकडा ५९·७९ आहेत. या शिवाय गांवचे उपयोगाचे लोक

ज्यांस त्यांचे कामाबद्दल जमीनी मिळाल्या आहेत, किंवा ज्यांस कामाबद्दल पिकापैकीं अंश किंवा बलुतें मिळतें असे लोक ह्मणजे मजूरदार, सुतार, लोहार, तांबट, न्हावी, गवंडी, कोळी, तेली, कुंभार, चांभार, गांव कामगार, भिक्षुक वगैरे, हे प्रत्यक्ष शेतकरी लोकांत मिळविले ह्मणजे शहरें धरून शेंकडा ८४ व शहरें सोडून शेंकडा ८८ लोक शेतकीवर अवलंबून आहेत असें दिसतें. या शिवाय दुकानदारी, शिंपीगिरी, सावकारी वगैरे शेतकीशीं संबंध नसणारे १० प्रकारचे धंदेवाले लोक शेंकडा सुमारे ५$\frac{1}{2}$ आहेत. या शिवाय इतर व्यवसायाचे लोक शेंकडा ९·६९ शिलक रहातात.

लागवडी जमीन—शेतकीवर निर्वाह करणारे लोकांची संख्या सर्वांत फार मोठी आहे. त्यांचे उपजीविकेचें मुख्य साधन जी जमीन तिचे संबंधानें पाहिलें तर तिचे क्षेत्र मर्यादित आहे, ती पाहिजे तितकी वाढवितां येण्यासारखी नाहीं. जमिनीचें उत्पन्नापासून जितके संख्येस अन्नाचा पुरवठा होण्यासारखा आहे तितकी लोकसंख्या हल्लीं सर्वत्र होऊन गेली आहे असें नाहीं, तरी कांहीं प्रांतांची तशी स्थिति होत चालली आहे. या विषयाचा विचार करतांना किती जमीन लागवडीस आली आहे व किती येण्याची राहिलेली आहे हें पहिल्यानें पाहिलें पाहिजे. या संबंधानें सर्व प्रांतांत चांगली माहिती मिळत नाहीं, जी थोडी माहिती मिळते तिजवरून साधारणपणें असें दिसतें कीं, पाऊस नियमित पडतो असे ठिकाणीं पूर्वींच वाहीत असलेले जमीनी जवळील जमीनी झपाट्यानें लागवडीस येत चालल्या आहेत. विरल लोकवस्तीचे भागांत हा क्रम जास्त जारीनें सुरू आहे. ब्रह्मदेशांत गेले १० वर्षांतच लागवडी जमिनीची दिढीनें वाढ झाली आहे. आसामांत जमीन रिकामी आहे तरी, लोकांची स्थिति भिन्न असल्यामुळें वाढ ८ टक्केच झाली आहे. कुर्ग प्रांतांत वाढ १२ टक्के झाली आहे. मद्रासेंत गेले ४० वर्षांत जिराईत जमीन ३३ टक्के व बागाईत जमीन ५० टक्के जास्त वाढली आहे. पंजाब व सिंध प्रांतांत गेले १० सालांत शेंकडा २८ व २२ टक्के वाढ झाली आहे. मुंबईस नवीन सर्व्हे केलेल्या जमिनी पत्रकांत वारंवार दाखविण्यांत येत असल्यानें, किती वाढ झाली तें चांगलें समजत नाहीं तरी, इतर प्रांतांचे प्रमाणानें वाढ झाल्याची दिसत नाहीं. बंगाल्याचे संबंधानें दाखले मुळींच नाहींत. वायव्य व अयोध्या प्रांतांत विशेष वाढ झालेली नाहीं. वऱ्हाडांत मूळ लागवडीस असलेली जमीन इतकी आहे कीं, या प्रांतांतून पुष्कळ धान्य इतर ठिकाणीं जाण्यास शिलक राहतें.

वाढती लोकसंख्या व तिची सोय—लोकवस्तीही कांहीं भागांत जमिनीचे मानानें फार झाली आहे. असे भाग बिहारचा उत्तर भाग व रत्ना-

गिरी जिल्हा हे आहेत. दर मैलीं बिहारांत वस्ती ६६७ आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत वस्ती २८२ आहे तरी लागवडीस योग्य जमीन फार थोडी असल्यानें जमिनीचें मानानें वस्ती जास्त होते. पंजाबांतील डोंगरा जवळील प्रदेश, अयोध्या प्रांत व मध्य प्रांतांतील नर्मदेचे काठचा प्रदेश यांत वस्ती बहुतेक पूर्णपणें वाढली आहे. हिंदु लोक एखादे परकी ठिकाणीं तुटल्यासारखे जाऊन वस्ती करून रहात नाहींत. वस्तीपासून लांब नाहीं असें ठिकाणीं, किंवा जेथें गेल्यानें मागील संबंध तुटल्यासारखा होत नाहीं इतके अंतरावर, जमीन असेल तर लोकवस्ती सहज वाढते. ब्रह्मदेशांत व सिंधेंत लागवड करण्याजोगी जमीन पुष्कळ शिलक असल्यानें वस्ती वाढण्यास अडचण पडत नाहीं. वायव्य प्रांत व अयोध्या प्रांत यांत डोंगराचे भागांतील जमीन दुसरे लागवडी जमिनीचे जवळ असल्यानें तेथें ही वस्ती वाढत आहे. आसामांत चहाचे लागवडीचे कामावर गेलेले लोक पुढें तेथेंच कायमचे रहिवाशी होऊन राहतात. इतर प्रांतांत अशी सोईची व श्रम न करतां लागवडीस येण्यासारखी जमीन फार थोडे ठिकाणीं आहे, त्या मानानें इतर दाट वस्तीचे भागांतून लोकांस तेथें जाऊन राहण्यास सवड थोडीच आहे. मुंबई इलाख्यांत चांगली सुपिक व लागवडीस येण्यासारखी जमीन पंच महालांत व खानदेशाचे डोंगरी भागांतच राहिली आहे. मध्य प्रांतांत डोंगरी भागांत जमीन आहे परंतु त्यांतील पुष्कळ जमिनींतील जंगल कायम ठेवणें जरूर आहे, ती जमीन सोडली तर लागवडीस मिळण्यासारखी जमीन थोडीच रहाते. बंगाल प्रांतांत डोंगराचे बाजूचे प्रदेशांतच काय ती लागवडिस येण्यासारखी जमीन राहिली आहे. साधारणपणें बिहारांत अतिशय दाट वस्ती झाली आहे, आसामांत लोक जाऊन राहण्यास अजून पुष्कळ सवड आहे, बाकीचे भागांत मध्यम प्रकारची स्थिति आहे.

इंग्रजी राज्यांतील प्रांतांपेक्षां संस्थानांत लोकवस्ती कमी आहे, तेव्हां तिकडे लोकांस राहण्यास जाण्यास सवड आहे असें सकृद्दर्शनीं दिसतें, परंतु थोडा जास्त विचार केला ह्मणजे संस्थानांत ही वसाहात करण्यास विशेषशी जागा नाहीं असें दिसून येईल. इंग्रजी प्रांतांचें लोकवस्तीचे मध्य प्रमाण संस्थानांतलेपेक्षां जास्त येतें तें गंगानदीचे काठचे प्रांतांत जी अतिशय दाट वस्ती आहे त्यामुळें येतें; व संस्थानांतील वस्तीचे सामान्य प्रमाण कमी पडण्याचें कारण राजपुतान्यांतील वालुकामय ओसाड भागांत व काश्मीराजवळील डोंगराळ भागांत वस्ती फार पातळ आहे हें होय; या भागांत वस्ती वाढण्यास फारसा अवकाश नाहीं. हे पातळ वस्तीचे भाग सोडून दिले तर मलबार किनाऱ्यावरील

संस्थानें, बडोदें व गुजराथेंतील संस्थानें, पंजाबांतील शीखांचीं संस्थानें यांतील व अशा इतर संस्थानांतील लोकवस्ती इंग्रजी प्रांतांप्रमाणेंच दाट आहे. ह्मैसूरचे व हैदराबादचे कांहीं भागांत वस्ती पातळ आहे, परंतु तिकडे पर्जन्य अशाश्वत असतो यामुळें वस्ती वाढणें शक्य नाहीं. हैदराबादेपैकीं पूर्वेकडील प्रांतांत, मध्य हिंदुस्थानांतील व ह्मैसूरचे कांहीं भागांत, मध्य प्रांतांतील कांहीं संस्थानांत बाहेरचे लोक जाऊन राहण्यास थोडीशी सवड आहे, तरी या भागांत ही मोकळे असलेले क्षेत्राचे मानानें लागवडीस योग्य जमीन निघेल असें नाहीं.

येथपर्यंत वाढत जाणारे लोकसंख्येचा गुजारा करण्यासाठीं जास्त जमीन लागवड करणें हें एक साधन आहे, त्या बद्दल विचार झाला. दुसरें साधन ह्मटलें ह्मणजे लागवडी जमिनीपासून जास्त पीक येण्याची तजवीज करणें हें आहे व अलीकडे लोकही या साधनाचें जास्त अवलंबन करूं लागले आहेत. जमिनीची सुधारणा केल्यास हल्लींपेक्षां जास्त पीक येईल यांत कांहीं शंका नाहीं. शेतकीचे संबंधानें नवीन पद्धति घेण्यास या देशांतील शेतकरी मागेंपुढें करतात असें नाहीं, त्या नवीन गोष्टी फायद्याच्या आहेत असें त्यांचे प्रत्ययास मात्र आलें पाहिजे. या पूर्वीं अशा प्रकारानें सुधारणा सुरूही झाल्या आहेत. पाणी देऊन गव्हाचें पीक केलें ह्मणजे जास्त येतें असें पंजाबांतील शेतकऱ्यांस दिसतांच, त्यांनीं तसें करण्याचें सुरू केलें; धारवाडाकडे विलायती कापसाचें, बंगाल्यांत जूटचें, कुर्गाकडे बुंदाचें पीक केलें असतां चांगला फायदा होतो असें दिसतांच लोकांनीं तशीं पिकें करण्याचें सुरू केलें. सरकारांनीं कालवे केल्यावर त्यांचाही लोक उपयोग चांगला करून घेऊं लागले आहेत व विहिरींपासून बागाईतही वाढत चाललें आहे. या देशांत विहिरीपासून जें बागाईत करतात तें उत्कृष्ट व युरोपांतले प्रमाणें चांगलें असतें असा डॉक्टर व्होएल्कर यांचा अभिप्राय आहे. बागाइतापासून पीक जास्त होतें हाच एक फायदा आहे असें नाहीं, तर पर्जन्य अनिश्चित आहे असें भागांत बागाईत वाढल्यानें पर्जन्य कमी असतो त्या सालीं ही पीक मिळतें हा मोठा फायदा आहे. गेले ७ वर्षांत बागाईत सुमारें एकपंमचांश वाढलें आहे.

गेले १० वर्षांत जमिनींत दोन पिकें घेण्याचाही प्रघात जास्त वाढला आहे. भात शेती जमिनींत थंडीचे दिवसांत डाळ दाणा किंवा गळिताचीं धान्यें काढण्याची वहिवाट पूर्वीपासून आहे. दुसरे जमिनींत दोन पिकें घेण्याचें अलीकडे चालू झालें आहे. सालोसाल नवीन जमीन जितकी लागवडीस येते, त्याचे दुप्पट जमिनींत दोन पिकें घेण्याची नवीन पद्धति सुरू होत आहे असें दिसतें. दोन पिकें घेतात तेथें जमिनीची मशागतही चांगली करतात, तेव्हां एकंदरींत

जास्त पिकें काढण्यानें तोटा होत नाहीं. या देशांतील जमीन पीक घेत गेल्यापासून कसांत कमी होत नाहीं असा दशवार्षिकी रिपोर्टांत अभिप्राय आहे; डॉक्टर व्होएल्कर यांचा अभिप्राय याहून भिन्न आहे; ते ह्मणतात कीं, जमिनींचा कस जात आहे किंवा नाहीं तें पाहण्यास साधनें नाहींत तरी साधारण मानानें पाहिलें तर जमिनींत पीक केलें ह्मणजे तितके मानानें जमिनीचे पोषक गूण कमी झालेच पाहिजेत. इतर देशांतील जमिनींत जें पीक येतें त्या मानानें पाहतां या देशांत कमी येतें, हें या गोष्टीचें त्यांचे मतें दुसरें प्रमाण आहे. पोषक द्रव्यें जीं कमी होतात तीं खत घालून पुरीं केलीं पाहिजेत, व खताचे पदार्थ परदेशास फार जातात यामुळें व जळणाचे तोट्यामुळें खतास उपयोगी पडण्यासारखे पदार्थ जाळण्याचे कामीं फार लागतात, यामुळें, जमिनीस पोषक द्रव्यें मिळण्याचीं साधनें कमी होत चाललीं आहेत, या साठीं जमिनीस जास्त खत मिळण्याची तजवीज सरकारांनीं केली पाहिजे, या मुद्यावर व्होएल्कर साहेबांचा मोठा कटाक्ष आहे. मोठे शहरांजवळ सोनखताचा व दुसरे प्रकारचे खताचा उपयोग बागाइताचे कामीं पुष्कळ करण्यांत येऊं लागला आहे. पाटबंधारे व विहिरी वाढल्यानें, खतांचा उपयोग उत्तरोत्तर जास्त होत गेल्यानें, व दोन पीकें घेण्याची वहिवाट जास्त वाढल्यानें, जमिनींचे उत्पन्न चांगलें वाढत जाण्याचा संभव फार दिसत आहे.

जनावरें—शेतकीचे वाढीचे मानानें जनावरांचीही संख्या वाढत आहे. या संबंधानें माहिती अपुरी आहे तरी एकंदरींत गेले ६ वर्षांत पूर्वीपेक्षां शेतकीचे व दुभते जनावरांत ३० टक्के वाढ झाली आहे असें दिसतें. शेतकीचे गुरांची किंमत वाढली आहे.

पिकें व अन्न सामुग्री—शेतकीचे भागांत कोणतें पीक किती जमिनींत लागवड करण्यांत येतें हें सांगितलेंच आहे. बंगाल्यांतील माहिती अजमासाचीच असते, तेव्हां तो प्रांत सोडून देऊन पाहिलें तर लागण जमिनीपैकीं ७८ पासून ९० टक्के जमिनींत खाण्याचे धान्यांचें पीक होतें. वऱ्हाडांत मात्र परदेशांस जाणारे पदार्थांची लागवड फार होते. धान्यें परदेशांत पाठविण्यासाठीं किती जमिनींत व देशांतील खपासाठीं किती जमिनींत करतात हें सांगणें शक्य नाहीं. खालचे ब्रह्मदेशांत तांदुळाचेंच मुख्य पीक होतें व त्यापैकीं निमे परदेशांस जातें. बंगाल, मद्रास व आसाम प्रांतांतून तांदूळ परदेशीं थोडा जातो. पंजाब व वायव्य प्रांताचे भागांत खाण्याचें मुख्य धान्य गहूंच आहे व देशांत पुरून उरण्यासारखा संग्रह असेल तरच तो या प्रांतांतून परदे-

शीं जातो. मुंबई व मध्यप्रांतांत परदेशी पाठविण्यासाठींच गहूं करतात. कापूसही देशांत जास्त खपूं लागला आहे व पूर्वींचे मानानें परदेशांस थोडा जातो. या देशांत खनिज तेलाचा जास्त प्रसार होऊं लागल्यानें गळिताचीं धान्यें परदेशीं जास्त जाऊं लागलीं आहेत. ज्या प्रांतांत परदेशीं जाण्याचें धान्यच लोकांचें खाण्याचें मुख्य धान्य असतें, त्या भागांत मात्र परदेशांत धान्य गेल्यानें लोकांस लागणारा धान्य संग्रह कमी होण्याचा संभव आहे, परंतु ब्रह्मदेशांत जेथें अशी स्थिति आहे, तेथें पीक कमी आलें तर परदेशीं माल कमी जातो असा अनुभव आहे. गहूं ज्या भागांत पिकतो त्या प्रांतांतून तो परदेशीं गेल्यानें लोकांचा पुरवठा कमी पडतो असें होत नाहीं, यास दाखला असा आहे कीं, ज्या सालीं गहूं परदेशीं विशेष जातो त्या सालीं इतर धान्यें त्या प्रांतांत विशेष येतात असें दिसत नाहीं. एकंदरींत हीं धान्यें परदेशीं गेल्यानें देशांतील धान्य संग्रह अपुरा होतो असें होत नाहीं परंतु परदेशास धान्यें गेल्यानें जो पैसा रयतेस मिळतो तो त्यांस फार उपयोगी पडतो.

अन्नसामुग्री—आतां लोकसंख्येचे मानानें अन्नसंग्रह पुरेसा आहे किंवा नाहीं याचा विचार करावयाचा आहे. या देशांतील लोकसंख्येपैकीं पुष्कळ लोक फक्त शेतकीवरच अवलंबून असतात, यामुळें पर्जन्य कमी झाला कीं, त्या भागांतील पुष्कळ लोकांचे हाल होतात व अन्नाचे तुटींपासून व तज्जन्य रोगापासून ते मृत्युमुखीं पडण्याचा संभव असतो. तरी साधारण विचार पाहतां धान्यावरच लोकांचा सर्व प्रकारें निर्वाह होत आहे असें नाहीं; शेतकऱ्यांचे वाडग्यांत व मळ्यांतून भाजीपाला पुष्कळ पिकतो व दुभतीं जनावरें असतात त्यांचेपासून दूध निघतें, त्यांची धान्यसंग्रहास जोड असते. ही निखालस वनस्पतिजन्य अन्नच खाणारांची गोष्ट झाली; समुद्राचे व नदीचे काठीं राहणारे लोकांचा माशांवर ही बरेच अंशीं निर्वाह होतो; मांस खाणारे लोकही पुष्कळ आहेत. अंशतः मांस खाणारे लोक जरी सोडले तरी मांसावर निर्वाह करणारे लोकांची संख्या १३ कोटी आहे. तेव्हां अन्नसंग्रहाचा विचार करतांना भाजीपाला दूध व मांस यांची जी अन्नसंग्रहास जोड मिळते त्याचा विचार केला पाहिजे. अन्न संग्रहाचे संबंधानें असावी तशी माहिती मिळत नाहीं; नुस्ते अमुक एकरांत अमुक पीक होतें असें ठरवून त्या मानानें देशांत किती उत्पन्न होतें व एक इसमाचे पोटास किती लागतें याचा हिशेब धरून अमुक लोकांस अन्नसंग्रह पुरेसा आहे व अमुक लोकांस अन्न मिळत नाहीं असा हिशेब काढतात. या संबंधानें

एकरास पीक किती येतें याबद्दल खात्रीलायक प्रमाण अजून ठरलेलें नाहीं हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

एकंदर सगळे देशाचा विचार केला तर उत्पन्न होत असलेलें धान्य लोकांचे उदरनिर्वाहास अपुरें आहे असें नाहीं; त्याची सर्व भागांत सारखी वांटणी झालेली नसते ह्यामुळेंच अडचणी उत्पन्न होतात. पूर्वी देशांत दळणवळणाचे मार्ग चांगले नव्हते यामुळें एकीकडे सुबत्ता तर दुसरीकडे दुर्भिक्ष अशी स्थिति एका वेळींच होत असे, व त्याचा प्रतीकार करणें ही शक्य नसे. आतां रस्ते, आगगाड्या वगैरे सोई झाल्यानें पर्जन्य कमी पडतो असे प्रदेश, पर्जन्य चांगला पडतो असे प्रदेश यांच्यामध्यें दळण वळण चांगलें राहतें व सर्व देशभर धान्याच्या किमती साधारण सारख्या राहतात. सर्व देशभर पर्जन्याचे अवर्षण एका कालीं होत नाहीं, सुमारें दोन तृतीयांश भागांत सारखी स्थिति असते असा अनुभव आहे. आतां एखादे सालीं एखादे भागांत अवर्षण पडलें तर दुसरे भागांतून माल येऊन अन्नाची अडचण तेव्हांच दूर होते.

रस्ते व शेतकीच्या मालाच्या किमती.—रस्ते वाढल्यानें मालाची अदलाबदल पुष्कळ होऊं लागली आहे. सन १८८०-८१ चे मानानें सन १८९१-९२ सालीं आगगाडीचे रस्त्यांत ८६ टक्के वाढ झाली आहे; त्या मार्गानें दुप्पट माल जाऊं येऊं लागला आहे, व लोकांचें जाणें येणें जवळ जवळ अडीच पटीनें वाढलें आहे. आगगाडीचे व दुसरे रस्ते वाढल्यानें, पूर्वी जशी एका भागांत धान्यास किंमत फार कमी व एका भागांत फार जास्ती असे, तसें आतां होणार नाहीं. आतां सर्व देशांत किमती सारख्या होत चालल्या आहेत व त्या एकंदरींत वाढत आहेत. वायव्य प्रांतांत सन १८६१-६५ सालचे मानानें किमती दिढीवर वाढल्या आहेत. मध्यप्रांतांत सन १८५८-६३ चे मानानें तांदुळाची किंमत तिप्पट झाली आहे. ब्रह्मदेशांत तांदूळ १८८१-८२ पासून दुप्पट महाग झाले आहेत; आसामांत त्याची किंमत ४० टक्के व बंगाल्यांत ६-२० टक्क्यापर्यंत वाढली आहे. वऱ्हाडांत धान्याची किंमत दहा सालांतच पावणेदोनपट झाली आहे. मुंबई इलाख्यांतील वेगळाले प्रांतांत किमतींत फारच अंतर असते व तशीच स्थिति बंगाल्यांतही असते. एकंदर या प्रांतांत किमती वाढल्या आहेत. मद्रास इलाख्यांत तांदुळाची किंमत गेले ४० वर्षांत जवळ जवळ २ $\frac{3}{7}$ पटीवर आली आहे व बाजरी जोंधळे यांची दुपटी जवळ आली आहे. खाण्याचे धान्याशिवाय परदेशीं पाठविण्यासाठीं जीं धान्यें तयार करण्यांत येतात, त्यांच्या किमतीही वाढल्या आहेत. कापसाची किंमत मात्र फार कमी जास्त होते व ती वाढली नाहीं.

परकीय मालाच्या किमती—परकीय माल या देशांत येतो त्यांतही वाढ झाली आहे. गेले १२ वर्षांत माल आणण्यास लागणारें भाडें व माल तयार करण्यास मजुरी कमी लागूं लागल्यानें हा माल आतां स्वस्त झाला आहे. पूर्वी जे कांहीं जिन्नस चैनीचे ह्मणून मानले जात असत ते आतां अवश्य वाटूं लागले आहेत. पूर्वीच्या देशी छत्र्यांचे बदलीं विलायती छत्र्या, तेल्याचे तेलाचे बदलीं खाणींतील तेल, मातीचे भांड्यांचेबद्दल धातूचीं भांडीं, ऊंस गाळण्यास लांकडी चरकाबद्दल लोखंडी चरक, असे फरक झाले आहेत. विलायती कापडाचा खप फार वाढला आहे व सूतही विणण्यासाठीं पुष्कळ खपतें. शिवण्याचीं यंत्रें तर गांवोगांव झालीं आहेत. चाकू, कात्र्या, गलासें वगैरे तऱ्हेचे सामानाची दुकानेंही पुष्कळ वाढलीं आहेत. हे सर्व प्रकार चांगली राहण्याची तऱ्हा जास्त आवडूं लागल्यानें, किंवा त्यांपासून पैशाचा फायदा होत असल्यानें झाले असावेत; नाहीं तर ह्या नवीन गोष्टी शेतकरी वर्गासारखे परंपरागत गोष्टीस अनुसरणारे लोकांत शिरल्या नसत्या.

जमिनीच्या किमती–पिकाची किंमत वाढली आहे त्याचप्रमाणें जमिनीची किंमतही वाढली आहे. जमिनीची किंमत ती धारण करण्याच्या ज्या पद्धती चालू असतील त्यांचेवर पुष्कळ अंशीं अवलंबून असते. जमिनीचे मालकांस जमिनीबद्दल जें भाडें मिळतें तें ही पुष्कळ वाढलें आहे. जमिनीची योग्यता व सरकार देण्याचा माफकपणा ह्यांची परीक्षा सारा नियमितपणानें देण्यांत येतो यावरून ही होते. साऱ्यासाठीं जमिनीचे फार क्वचित् लिलाव होतात. जमिनीची किंमत वाढल्यानें तिजवरील आपले हक्क स्थापित करून घेण्याकडे ही मालकांचा कल वाढत चालला आहे. पूर्वी परशत्रूपासून संरक्षण होण्यासाठीं आपले जवळचे लोकांशीं मिळून राहणें त्यांस जसें अवश्य वाटत होतें तसें आतां देशांत पूर्ण स्वस्थता झाल्यामुळें वाटत नाहीं; स्वतंत्र मालकी असावी ही इच्छा जशी बलवान होत जाते त्याच मानानें पूर्वीची गांवकीची व्यवस्था ही ढांसळत जाते. पूर्वी जमीन धारण करण्याचे पद्धतीसंबंधानें सांगते वेळीं या नूतन मनोवृत्तीचा उल्लेख केलाच आहे. जमिनी वांटून घेण्याची वहिवाट फार प्रचारांत आली ह्मणजे कुळांस अगदीं थोडी जमीन पडते व तिचेपासून गुजारा होत नाहींसा होतो; व भिकेची पाळी येते किंवा शेतकीचे जोडीस मजूरीचा धंदा पतकरावा लागतो.

राहण्याची तऱ्हा—आतां लोकांची राहण्याची रीति सुधारली आहे किंवा नाहीं यासंबंधानें पाहूं. यासंबंधानें विचार करण्याचेंही फार कठीण आहे, कारण ज्या गोष्टींवरून अनुमानें काढण्याचीं, त्यांचा खरा भाव

समजणें कठीण असतें. घरें हीं कांहीं संपत्तीची द्योतक असत नाहींत. शहरांबाहेरील लोकांचा बहुतेक व्यापार बाहेरच उघड्यावर होत असल्यामुळें व चांगलीं घरें बांधण्यास साधनें विपूल नसल्यामुळें घरें बांधण्याचे कामांत पैसा कमी खर्ची पडतो; व शहरांतील घरें शिवाय करून इतर घरें जवळचे जवळ मिळत असतील तसे मालमसाल्यानेंच बांधण्यांत येतात. साधारणतः जमीन करणारे शेतकरी लोकांत बायकांचे संबंधानें गोष्याची वहिवाट असल्याशिवाय नौकर लोक ठेवण्याची वहिवाट कमी, काय जे नौकर ठेवतील ते शेतकीचें कामासाठींच; तेव्हां घरकामासाठीं नौकर ठेवण्याची वहिवाट दिसल्यास त्यावरून संपत्ति वाढली आहे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. शेतकरी वर्गाची सांपत्तिक स्थिति सुधारली तरी त्यांचे खाण्यापिण्यांत विशेषसें अंतर पडत नाहीं. दुभतें जनावरांची संख्या वाढली आहे, तेव्हां दूध दूभतें जास्त खाण्यांत येत असलें पाहिजे. जोंधळे किंवा बाजरीच खाण्याचा प्रघात आहे, असे भागांत आतां तांदूळ पुष्कळ खाण्यांत येऊं लागला आहे. तूप, साखर, मसाला, वगैरे जिन्नसही आतां जास्त खपतात; अगदीं गरीब लोक सोडून देऊन बाकीचे लोकांचे घरीं आतां तांबे पितळेची भांडीं पुष्कळ दृष्टीस पडतात. कापसाचीं व लोंकरीचीं वस्त्रें परदेशांतून पुष्कळ येतात, व फलाणीसारखे उंची कापड खेड्या पाड्याचें दुकानांत ही आतां दृष्टीस पडतें. तसेंच परदेशांतून आलेल्या चैनीच्या वस्तूंचाही प्रसार लोकांत फार झाला आहे. पूर्वीपेक्षां आतां सोन्या रुप्याचे दागिने पुष्कळ दृष्टीस पडतात. लोकांत जास्त खर्च करण्याचें सामर्थ्य वाढलें आहे याचें प्रत्यक्ष उदाहरण, आगगाड्यांतून तिसरे वर्गाचे उतारूंची संख्या वाढते प्रमाणावर आहे हें होय.

प्राप्ती—आतां दर माणशीं साधारण प्राप्ती किती होते हें पाहूं. या संबंधानें प्रारंभींच असें सांगितलें पाहिजे कीं याबद्दल प्रत्यक्ष माहिती मिळत नाहीं; प्राप्तीबद्दल सभोंवतालचे गोष्टींवरूनच अनुमानें काढावीं लागतात. साधारण विचार करतां लोकसंख्या व जनावरें यांची वाढ होत आहे, लागवडी जमीन व पीक हीं वाढत आहेत, परदेशाचें मागण्यामुळें नवीन व किफायतीचीं पिकें जास्त काढण्यांत येत आहेत. पूर्वीं ज्या वस्तू चैनीखातर वापरण्यांत येत असत त्या हल्लीं अवश्यक वस्तू झाल्या आहेत. या सर्व गोष्टींवरून शेतकरी लोकांस पुरेशी प्राप्ती आहे व त्यांची स्थिती उत्तरोत्तर सुधारत आहे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. हा एकंदरींचा विचार झाला. विशेष भागाचे संबंधानें विचार पाहतां पाटना व लखनौ यांचे दरम्यानचे भागांत व यमुना नदीचे खोऱ्याचे दक्षिण व पश्चिम भागांत जमिनीचे मानानें लोकसंख्या फार असल्या-

मुळें व दक्षिणेंत व पश्चिम किनाऱ्याचे कांहीं भागांत पर्जन्याचें मान अनिश्चित असल्यामुळें लोकांची स्थिति वर सांगितल्याप्रमाणें चांगली असत नाहीं. सर्वांत विहार प्रांत व समुद्र किनाऱ्यावरचे प्रदेशांत लोकांची स्थिति जास्त वाईट आहे. इतर भागांत एखादे सालीं पीक वाईट आलें तरी लोकांस अडचण न पडतां निभाव करून घेतां येतो. अतिशय दाट वस्ती असलेल्या भागांत कांहीं लोकांचा गुजारा कांहीं महिने कष्टानें होतो. जंगली लोक दोन पिकांचे दरम्यान जो काळ जातो त्यांत जंगलांतील उत्पन्नावर उदरनिर्वाह नेहमींच करतात.

खर्चिकपणा व दिवाणी दावे–येथपर्यंत विचार करते वेळीं खर्चाच्या दोन बाबी ह्मणजे दिवाणी दावे व विवाह वगैरे समारंभ ह्यांचे संबंधानें उल्लेख केला नाहीं. जमिनीची वहिवाट जेथें समुच्चयानें करण्यांत येते किंवा मालकांकडून कुळेंच जेथें तिची लागण करितात असे भागांत दिवाणी दाव्यांची वाढ जास्त दृष्टीस पडते ; इतर प्रांतांत तितकी दृष्टीस पडत नाहीं. विवाह वगैरे समारंभाचे वेळीं जास्त खर्च करण्याची वहिवाट सर्वत्र आहे. त्या खर्चापासून विवाह झालेले जोडप्याचा कांहीं फायदा होतो असें नाहीं, आपलें ऐश्वर्य लोकांत मिरविण्यास सांपडावें हाच त्या खर्चाचा हेतु असतो. हा खर्च शेतकऱ्यांचे निकृष्टावस्थेचीं जीं कारणें आहेत त्यांपैकीं मुख्य कारण आहे.

कर्ज बाजारीपणा.–या देशांतील शेतकरी ह्मणजे सर्व कर्जबाजारी आहेत असें नाहीं. पर्जन्याची शाश्वती नाहीं असे भागांत एखादे वाईट सालीं पुढील पिकावर देण्याचे बोलीनें कर्ज काढण्यास सुरवात होते ; पुढील पीक चांगलें आलें तर बरें, त्यास धोका बसला कीं देण्याचें ओझें बसलेंच. असे भागांत तसे सालीं सारा घेण्याचें तहकूब केल्यानें शेतकऱ्यांस सरकार देण्यासाठीं कर्ज काढावें लागत नाहीं. जमीन बाबीचे बोजामुळें लोक कर्जबाजारी होतात हे संभवनीय वाटत नाहीं. ज्या भागांत पाऊस पडण्याचें अनिश्चित असतें असे भागांत सरकारचें देणें भारी पडतें असें ह्मटलें तर कांहीं तरी शोभेल, परंतु इतर सुपीक भागांत साऱ्याचा बोजा भारी आहे किंवा त्यामुळें रयतेस कर्ज काढावें लागतें असें ह्मणतां येणार नाहीं. कर्जबाजारीपणा हा पर्जन्य कमी असलेले भागांतच आहे व ज्या भागांतील जमीन फार सुपीक आहे असे भागांत त्यापासून रयत सुटली आहे असें नाहीं. साधारणपणें कमी जास्ती प्रमाणानें शेतकरी वर्गांत कर्जबाजारीपणा सर्वत्र आहे. रयत नादार झाली आहे किंवा अगदीं लाचार झाली आहे असा मात्र याचा अर्थ घ्यावयाचा नाहीं ; एखादे दुकानांत चालू खातें ठेवावें व त्यांत खातेदाराकडे जास्त बाकी रहावी यासारखें हें आहे. इंग्रजी राज्य सुरू होण्यापूर्वीं

ही रयतेस कर्ज काढण्याची संवय होतीच, ती इंग्रज सरकारांनीं लावली असें नाहीं. ह्यांचे कारकीर्दीत जमिनीची किंमत व रयतेची पत हीं दोन्हीं वाढलीं आहेत. पूर्वी जमिनीवर मालकी फार थोडे कुळांस असे व ती फरोक्त करून देण्यास पुष्कळ अडचणी असत ; आतां रयतेस जमिनीवरील हक्क दुसऱ्यास फरोक्त करून देतां येतो व तो त्याचे पश्चात् वारसास जातो ; पूर्वी पिकाची व्यवस्था ठिकाणचे ठिकाणींच करावी लागे, आतां तें वाटेल तिकडे पाठवून खपवितां येतें, यामुळें शेतकीचे मालाची किंमत वाढली आहे. या सर्व कारणांमुळें जमिनीची किंमत वाढली आहे, व तिचेवर सावकार ही पूर्वीपेक्षां जास्त ऐवज देतात. जमिनीची किंमत व रयतेची पत हीं वाढल्यानें कर्ज काढण्याची पूर्वीची संवय मात्र गेली नाहीं, उलटी जमिनीवरील स्वत्व बळकट होत गेलें तसतसें कर्ज काढण्याची वहिवाट ही वाढत गेली आहे. जमिनीचे मालकांची ही स्थिति झाली ; कुळांची पत काय ती पिकावरच असते, व तीं मात्र बरेच वेळां अगदीं नादार असतात व त्यांचे सर्व श्रम सावकाराचे भरीस जातात.

जमिनीवरील स्वत्व व तिची किंमत व तिचे मालकाची पत ही वाढल्यानें आजपर्यंत शेतकरी वर्गाचा फायदा झाला आहे ; त्याप्रमाणें सावकरांचाही त्यांचेवरील पगडा बळकट झाला आहे. पूर्वीचे कारकिर्दीत देण्याचे फेडीबद्दल सावकारांस जमीन मिळत नसे. कारण तिचेवरील कुळांचा हक्कसंबंध फारच मर्यादित असे. आतां जमिनीवरील स्वत्व कायम झाल्यामुळें दिवाणी हुकुमनामे व दस्तऐवज यांचे द्वारें ती सावकारांचे घरांत जाण्यास सोय झाली आहे. पंजाब, मध्यप्रांत, दक्षिणप्रांत व झांशी जिल्हा ह्यांत कुळांकडून सावकारांचे ताब्यांत जमिनी गेल्यानें राज्यकर्त्यांस कांहीं वेळां फार अडचणी आल्या होत्या. सावकारांचा पगडा व जमीन मालकांकडून जाणें या गोष्टी फार वाढत गेल्या तर स्थिति वाईट होईल. जमिनी, उत्साहयुक्त व सुशिक्षित जमिनी कसणारे लोकांकडे गेल्या तर स्थिति वाईट होईल असें ह्मणतां येत नाहीं, परंतु ज्या प्रांतांत पुष्कळ जमिनी एका मालकाकडे आहेत असे लोकांची स्थिति पाहिली ह्मणजे श्रीमंत लोकांकडे जमिनी गेल्यापासून फायदा झाला असें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं ; कारण एक तर ते जमिनदार इष्टेटी सोडून बाहेर राहून जमिनींचें उत्पन्न इतरच खर्च करतात, किंवा जमिनिवर राहून उधळेपणानें कर्ज काढून इष्टेटीवर कर्जाचा बोजा वाढवितात. पहिल्या प्रकारचें उदाहरण बंगाल्यांतील व मद्रासेंतील जमिनदार आहेत व दुसरे प्रकारचें उदाहरण अयोध्या व गुजराथ प्रांतांतील तालुकदार आहेत ; या तालुकदारांची स्थिति इतकी वाईट झाली कीं, त्यांचे

इष्टेटींचें संरक्षणासाठीं मुद्दाम कायदे करावे लागले. झांशी प्रांतांत व महाराष्ट्रांत जमिनीचे मालकांची वाईट स्थिति होण्यास कांहीं विशेष कारणेंही झालीं होतीं. साधारणतः ज्या ठिकाणीं परदेशांस जाणारें पीक विशेष होतें असे ठिकाणीं जमिनीची किंमत वाढली आहे व जमिनीचे मालकींत फेरफार होत आहे. हा प्रकार इतर प्रांतांत सर्वसाधारण असा नाहीं. जमीन धारण करणारे सावकारांची संख्या संस्थानांपेक्षां इंग्रजी मुलखांत जास्त वाढली असे गेले मनुष्यगणतींत दिसून आलें आहे.

शेतकरी लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं विशेष कायदे—शेतकरी वर्गाची स्थिति सुधारण्यासाठीं कायदे झाले आहेत ; त्यांत दक्षिणेंतील शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचा कायदा हा विशेष महत्वाचा आहे. ह्या सर्व कायद्यांपासून शेतकऱ्यांची कर्जापासून पूर्ण मुक्तता झाली नाहीं तरी त्यांचा पुष्कळ फायदा झाला आहे. हा कायदा पंजाब व मध्य प्रांतांत लागू करावा असें कांहीं लोकांचें ह्मणणें आहे. कुळांस जमिनी गहाण किंवा फरोक्त करण्यास परवानगी आहे ती काढून घ्यावी अशीही कांहीं लोकांची सूचना आहे. कुर्ग व वायव्य प्रांतांत ह्याप्रमाणें थोडीशी वहिवाट चालू झाली आहे व तिचा कसा काय परिणाम होतो तें सरकार पहात आहेत.

मजूरदार--येथपर्यंत शेतकरी वर्गाचे स्थितीसंबंधानें मुख्यत्वें करून विचार झाला. आतां मजूरदार वर्गाचे संबंधानें पहातां त्यांची स्थिति पुष्कळ सुधारली आहे असें दिसतें. धान्यांचे दरांत वाढ झाल्यानें त्यांचें नुकसान झालें नाहीं, कारण शेतकीकडे जे मजुरी करतात त्यांस मजुरीबद्दल धान्यच मिळतें. शहरांचे जवळ मात्र मजुरीबद्दल पैसा देतात व तेथें मजुरीचे दरांत वाढ झाली आहे. आगगाड्या, कारखाने, पब्लिक वर्क्सचीं कामें वगैरे वाढलीं आहेत. व त्यांपासून मजुरीवर निर्वाह करणारे लोकांस चांगली मदत होते.

करागीर व धंदेवाले लोक—आतां इतर कारागीर लोकांचे संबंधानें विचार करावयाचा आहे. सुतार व लोहार यांचे स्थितींत विशेषसा फरक झाला नाहीं. धातूचीं भांडीं जास्त झाल्यानें कुंभाराचे धंद्यास कांहीं हिसका बसला असावा, तरी घरांसाठीं पूर्वीपेक्षां जास्त विटा कौलें लागूं लागल्यानें त्यांनाही कांहीं मोबदला मिळाला आहे. तेल्याचे धंद्यास परकीय केरोसीन तेलानें फारच पडती कळा आली आहे ; या लोकांचीं शेतें असतात व तीं ते करतात किंवा परदेशीं पाठविण्यासाठीं गळिताचीं धान्यें गोळा करून देतात. कोष्ट्यांची स्थिति वाईट झाली आहे. त्यांचा धंदा परकीय कापडाचा प्रसार झाल्यानें खालावला आहे. ही स्थिति आजचीच नाहीं. हल्लीं हे लोक परकी सूत

घेऊन पुष्कळ माल तयार करतात व लोकांत त्या कपड्यांचा खप व आवड आहे. सध्यांचा काळ त्यांस आणीबाणीचा आहे.

इतर धंदेवाले लोकांत व्यापारी व सावकार यांचे खालोखाल प्राप्तीचा धंदा ह्मणजे वकीलीच आहे. विद्याव्यासंगी वर्गास विद्याविषयक धंद्याशिवाय इतर धंदे करावेसे वाटत नाहींत; यामुळें वकीलींत व नोकरींत लोकांची गर्दी झालेली आहे. वरिष्ठ वर्गाचे लोक आधुनिक वैद्यकांत थोडे कमी पडतात. डाक्तर लोकांचा धंदा शहरांतून चांगला चालतो व त्यांची उपयुक्तता लोकांस जास्त समजूं लागली आहे. एंजिनियरी ज्ञानाचे लोकांचा गुजारा आगगाड्या, कारखाने व सरकारी पब्लिक वर्क्सचीं कामें यांचे वरच चालतो. याशिवाय बिनपगारी धंदेवाले लोक ह्मणजे भिक्षुक वर्ग, यांचे स्थितींत महागाईमुळें, यजमान वर्गाची दातृत्वबुद्धि जशी कमी झाली असेल त्या मानानें, कांहीं कमीपणा आला असावा. पगारदार व नियमित प्राप्तीचे लोकांविषयीं पाहिलें तर नेटिव लोकांचें महागाईमुळें व युरोपियन लोकांचें रुप्याचा भाव उतरल्यामुळें नुकसान झालें आहे. नौकरीसाठीं तयार असणारे लोकांची संख्या फार वाढली आहे.

लोकस्थितीचे संबंधानें सामान्य सर्वसाधारण मुद्यांचें हें अल्प विवरण झालें; आतां प्रांतवार वर्णन करावयाचें तेंही अधिक संक्षिप्त रीतीनें करण्यांत येईल.

पंजाब प्रांत.—पंजाब प्रांतांत हवेमध्यें वेगळाल्या ऋतूंत फार फरक पडतो, यामुळें लोकांस खाण्यापिण्यास अन्नपाणी, राहण्यास घरें, व वापरण्यास वस्त्रें प्रावर्णें चांगलीं असावीं लागतात. या प्रांतांत पांचसहा मोठीं शहरें आहेत व त्यांत एकंदर वस्तीपैकीं शेंकडा साडेअकरा लोक राहतात. शहराचे बाहेर राहणारे लोक बहुतेक शेतकीवर निर्वाह करणारे आहेत. सन १८९१-९२चे पूर्वीचे दहा वर्षांत २२ लक्ष एकर जमीन नवीन लागवडीस आली. पाटबंधाऱ्याचीं कामें झाल्यानें बागाईत वाढलें आहे. पाटबंधाऱ्याची सोय वाढत जाईल तशी पड असलेली जमीन लागवडीस येईल. दोन पिकें घेण्याची वहिवाटही वाढली आहे. बागाइतानें पीक जास्त मिळतें इतकेंच नाहीं, तर चांगली मौल्यवान पिकेंही करतां येतात. या प्रांतांत मोठें महत्वाचें पीक ह्मणजे गव्हाचें आहे. पुष्कळ गहूं परदेशास रवाना होतो, तरी वाईट पिकाचीं सालें शिवाय करून इतर सालीं पुरेसा धान्य संग्रह या प्रांतांत राहतो. सुमारें $\frac{1}{3}$ जमिनींत बागाईत असल्यानें पीक अगदीं नाहीं असें होत नाहीं. अलीकडे १०।१२ सालांत आगगाडीचा रस्ता दुप्पट झाला आहे, व दुसरे गाडीरस्तेही पुष्कळ वाढले आहेत; यामुळें शेतकीचा माल खपण्यास चांगली सोय झाली आहे. आतां शेतकरी

लोक बाजाराचे ठिकाणीं धान्य स्वतःच नेऊन विकतात. एकंदरींत शेतकऱ्यांची प्राप्ती दीडपट वाढली आहे.

सारा व कुळें—साऱ्याचे ठरावांत अलीकडे फेरफार झाल्यामुळें साऱ्याची वाढ सुमारें ८½ टक्के झाली आहे. शिक्षण, रस्ते, सफाई, गांवकामगारांचा पगार याबद्दलचे स्थानिक कर आहेत तेही वाढले आहेत. त्यांचा आकार साऱ्याचे रकमेचे संबंधानें सुमारें ११ टक्क्यांपर्यंत आहे. जमिनीपैकीं ५४ टक्के जमिनीची लागण मालकाकडूनच होते, व बाकी ४६ टक्के जमीन कुळांकडे आहे. कुळांची स्थिति १८८७ चे कायद्यानें सुधारली आहे. कुळें व मालक यांचे दरम्यान चांगला सलोखा आहे.

कर्जबाजारीपणा—शेतकरी वर्गाची कर्जासंबंधानें स्थिति चांगली नाहीं. त्यांस कर्ज काढण्याची हौस फार असते. जमिनी विकत देण्याचा अधिकार असल्यामुळें सावकार जमिनी आपल्या ताब्यांत घेण्याकडे जास्त लक्ष ठेवतात, यासाठीं जमिनी सावकाराकडे जाण्याचें कसें बंद करतां येईल याबद्दल स्थानिक सरकार विचार करीत आहे. चिनाव पाटाचे संबंधाच्या जमिनी सरकारांनीं देतांना त्या गहाण किंवा फरोक्त देण्याचा अधिकार ठेवला नाहीं व त्याचा परिणाम कसा होतो हें अजून पाहण्याचें आहे. दक्षिणेंत शेतकऱ्यांसाठीं जसा कायदा करण्यांत आला आहे तसा कायदा करावा अशीही सूचना झाली आहे. सुमारें ६ पासून ८ टक्के जमीन मालकांकडून, जमिनीची लागण करणारे लोकांकडे गेली आहे, ही स्थिति चांगली नाहीं.

धान्याच्या किमती—अलीकडे दहाबारा सालांत धान्याची किंमत सुमारें तीस टक्के वाढली आहे, यामुळें पगारावर किंवा नियमित नेमणुकीवर उदरनिर्वाह करणारे लोकांस अडचण पडते.

मजुरदार व धंदेवाले लोक—शेतकीचे मजुरदार व गांवगन्नाचे शिल्पकार लोक यांस मजुरीबद्दल धान्यच मिळेत. कोष्ट्यांचा धंदा बसत चालला आहे असें ह्मणतात, तरी ते लोक गिरण्यांतील सूत घेऊन विणतात, व त्या कपड्यांचा खपही पुष्कळ होतो. लोंकरीचे कपडे पूर्वीपेक्षां आतां जास्त चांगले तयार होतात व त्यांचा खपही वरचे दर्ज्याचे लोकांत चांगला होतो. सुतार व लोहार यांचा धंदा चांगला चालत आहे. महार व चांभार लोक परदेशांस पाठविण्यासाठीं कातडीं तयार करतात व त्यांपासून त्यांस चांगला फायदा मिळतो. एकंदरींत खाण्यापिण्याचे संबंधानें सुधारणा करण्याकडे जास्त पैसे खर्च करण्यापेक्षां भांडीं कुंडीं खरेदी करणें, बायकांस दागिने करणें व लग्नकार्यांत उधळेपणानें खर्च करणें यांतच लोक जास्त पैसा घालतात.

वायव्यप्रांत व अयोध्याप्रांत—या दोन्ही प्रांतांत हवा व पर्जन्य यांचे संबंधानें फरक आहे. अयोध्याप्रांत व वायव्यप्रांतापैकीं हिमालयाच्या पायथ्याशीं असलेले दोन जिल्ह्यांत पर्जन्य नियमानें पडतो; बाकीचे भागांत त्याचें मान फार अनियमित असतें; त्याचा परिणाम लोकवृद्धीवरही दृष्टीस पडतो. पर्जन्य चांगला पडतो असे भागांत, तो बरोबर पडत नाहीं असे भागापेक्षां लोकसंख्या जास्त प्रमाणानें वाढल्याचें दृष्टीस पडतें. या प्रांतांत शेतकरी व शेतकीवर उदरनिर्वाह करणारे मजुरदार आदिकरून सर्व लोक प्रांतांतील एकंदर लोकवस्तीपैकीं $\frac{3}{4}$ आहेत.

शेतकीची वाढ—या दोन्ही प्रांतांत नवीन जमीन लागवडीस विशेष आली नाहीं, तरी जमिनींत दोन दोन तीन तीन पिकें करण्याची वहिवाट फार वाढली आहे. ही वहिवाट वाढण्यास धान्यास व उसाचें पिकास चांगला दर येतो हें कारण आहे. खाण्याचे धान्याचीं पिकें पूर्वीपेक्षां आतां कांहीं जास्त जमिनींत करण्यांत येतात. इतर प्रकारचीं पिकें होत असलेले जमिनीचें प्रमाण थोडें कमी झालें आहे. याचें कारण मुख्यत्वेंकरून कापूस व नीळ यांची लागवड कमी करतात हें आहे. पर्जन्य चांगला पडत असल्यानें तांदूळ व ऊंस यांची लागण जास्त होत आहे. गेले १० सालांत बागाइताची बरीच वाढ झाली आहे.

अन्नसंग्रह-या प्रांतांतील लोकांस पुरेसा धान्यसंग्रह आहे किंवा नाहीं यासंबधानें विचार पहातां असें दिसतें कीं, चांगलें पीक आलें ह्मणजे या प्रांतांत उत्पन्न होणारें धान्य लोकांस पुरून कांहीं उरतें. चांगलें पीक आलें ह्मणजे सहा लक्ष टन धान्य शिलक राहतें. असा फयामीन कमिशननें अंदाज केला होता; तेव्हांपासून अलीकडील लोकवृद्धीचे मानानें पाहतां आतां त्याचे निम्यानें धान्य शिलक राहील असें दिसतें.

मार्ग व माल नेणे आणण्याच्या सोई—या प्रांतांत गेले १० सालांत आगगाडीचा रस्ता पूर्वीपेक्षां दुप्पट झाला. दुसरे रस्तेही चांगल्या स्थितींत आहेत. १८८१–८२ चे मानानें पाहतां आगगाडीनें जाणारे मालाचें वजन दिढीनें व किंमत सवाईनें वाढली आहे. नेपाळ व तिबेट ह्यांशीं होणारा व्यापार बराच वाढला आहे. आगगाडीनें जाणाऱ्या लोकांची संख्या जवळ जवळ दुप्पट झाली आहे.

शेतकीचे मालाच्या किमती—मार्गक्रमणाची सोय चांगली झाल्यानें या प्रांतांत धान्याच्या किमती पूर्वीप्रमाणें कमी जास्त होत नाहींत. १८६१ चे मानानें पाहतां धान्याच्या किंमती आतां शेंकडा ३७ टक्के व १८८० चे मानानें पाहतां २५ टक्के वाढल्या आहेत.

जमिनीचा सारा—जमिनीवरील कर व दुसरे कर मिळून दर माणशीं रु० १-८-० पडतात व एकराचे मानानें लागवडी दर एकरास रु० १-१५-६ पडतात. सारा वसूल करण्याच्या संबंधानें पूर्वींपेक्षां आतां सक्ती जास्त करावी लागते; याचें कारण पूर्वीं साऱ्याची जबाबदारी सर्वांची मिळून असे, ती स्थिति कमी होत चालली आहे हें असावें.

जमीन लागवड करणारे कुळांची स्थिति—या प्रांतांत जमीन लागवडीस मिळण्यासाठीं कुळांच्या फार उड्या पडतात. ही चढाओढ इतकी वाढली आहे कीं एकाच कुळाकडे जमीन तें सारा बरोबर देत आहे तोंपर्यंत कांहीं मुदत तरी कायम रहावी असें करण्यासाठीं सरकारास तजवीज करावी लागली आहे. सन १८९१-९२ सालीं मूळ मालकांकडे शेंकडा तेवीस टक्के, हक्कदार कुळांकडे ३६ टक्के व उपरी कुळांकडे ३० टक्के अशी जमीन लागवडीस होती. अयोध्या प्रांतांत कुळांस वहिवाटीवरून हक्क नव्हते, ह्मणून त्यांचें संरक्षणासाठीं सन १८८६ सालीं कायदा झाल्याचें जमीन बाबीचे भागांत सांगितलेंच आहे. (पान १७७) या प्रांतांत सन १८९१-९२ सालीं मालकांकडे शेंकडा ११ टक्के, ७ टक्के हक्कदार कुळांकडे व ८२ टक्के जमीन नवीन कायद्यावरून हक्क प्राप्त झाले आहेत असे कुळांकडे लागवडीस होती.

राहण्याची तऱ्हा—शेतकरी वर्गाची स्थिति खाणेंपिणें वस्त्रप्रावर्ण या संबंधानें सुधारली आहे, व जमिनीचे मालकानें दांडगाई केली तर त्याचे विरुद्ध आपला हक्क स्थापित करण्याचें त्यांस जास्त सामर्थ्य येत आहे. मीठ, पितळेचीं भाडीं, व केरोसीन तेल हीं स्वस्त झालीं आहेत, व त्यांचा उपयोग जास्त करण्यांत येतो. पूर्वींपेक्षां आतां घरें चांगलीं असतात.

कर्जबाजारीपणा—या प्रांतांत शेतकरी वर्ग साधारण कर्जबाजारी आहे. जमिनदार लोकांस ही स्थिति प्राप्त होण्यास दिवाणी दावे व उधळेपणा हीं कारणें आहेत. खालचे वर्गाचे शेतकरी लोकांस कर्ज होण्याचीं कारणें पर्जन्याची तूट, लग्नकार्यांत उधळपट्टी, वडिलार्जित कर्ज आंगावर येणें, व सावकारांचें हातीं धान्याचा व्यापार असणें हीं आहेत. सरकारांनीं हप्ते भरण्यास सवड दिल्यानें पहिलें कारणाचा त्रास कमी होतो. पण दुसरे व तिसरे कारणांचा विचार करणें सरकारचे अधिकाराबाहेर आहे. परकीय व्यापार वाढल्यानें व धान्याचे बाजार सोईवार ठिकाणीं झाल्यानें व आगगाडीचे रस्ते वाढल्यानें तिसरे कारणाचा परिणाम कमी होत जाईल. एकंदरींत कर्जाचा बोजा फार पडत नाहीं.

कारागीर व धंदेवाले लोक—धान्याचा भाव वाढल्यापासून शेतक-

री वर्गाचा जसा फायदा झाला आहे तसा इतर वर्गाचा तोटा झाला आहे. नियमित प्राप्तीवर निर्वाह करणारे लोकांची स्थिति त्यामुळें वाईट झाली आहे. कारागीर लोकांची स्थिति एकंदरींत सुधारली आहे. सुतार, लोहार व गवंडी यांस आतां पूर्वीपेक्षां काम जास्त मिळतें. कोष्टी लोकांची स्थिति मध्यंतरीं वाईट होती, परंतु अलीकडे कानपूर वगैरे ठिकाणचे गिरण्यांतील सूत त्यांस मिळूं लागल्यानें व त्यांनीं विणलेले कपड्यांचा खप होत असल्यानें त्यांची स्थिति सुधारली आहे. सोनारांची स्थिति सुधारली आहे. मजुरदार लोकांस पब्लिक वर्क्सचीं कामें, कानपूर येथील कातड्याचे व कापसाचे कारखाने, आगगाडीचे द्वारें हो- णारा धान्याचा व्यापार यांत पुष्कळ काम मिळतें. त्यांचे मजुरीचा दर सा- धारण दिढीनें वाढला आहे व कारागीर लोकांचा दर याही पेक्षां जास्त वाढला आहे. धान्य महाग झाल्यानें या लोकांचे स्थितींत जसें अंतर पडलें असतें तसें मजुरीचा दर वाढल्यानें पडलें नाहीं.

बंगाल—या प्रांतांत पर्जन्य पुष्कळ नियमितपणें व सगळीकडे सारखा वांटून पडतो. बिहार प्रांताचे दक्षिण प्रदेशांत मात्र पर्जन्याची कमताई पडते. डों- गरी भाग व कलकत्ता शहर शिवाय करून बाकीचे भागांत जशी दाट लोक- वस्ती आहे तशी या देशांत इतर कोठेंही नाहीं. डोंगरी भागांत वस्ती मैलीं १२२ आहे व शहरें शिवाय करून बाकीचे प्रांतांत अतिशय दाट वस्ती म्हणजे सरण जिल्ह्यांत आहे. तेथें ती मैलीं ९३० आहे. सन १८९१ चे मनुष्यगण- तीचे पूर्वीचे दहा वर्षांत शहरांत वस्ती शेंकडा ७ व बाहेरील प्रांतांत ६ टक्के वाढली.

शेतकी—शेतकरी व शेतकीवर मजुरी करणारे लोक शेंकडा सुमारें ७० आहेत. किती जमिनींत लागवड झाली आहे व लागवडीस योग्य जमीन कि- ती शिलक आहे, तें शेतकीचे भागांत सांगितलेंच आहे. या प्रांतांत बरीच ज- मीन कायमचे दरठरोती प्रमाणें दिली असल्यामुळें इतर प्रांतांत शेतकी संबंधानें बरोबर माहिती मिळते तशी या प्रांताबद्दल मिळत नाहीं. बंगालचे पूर्वेकडील भागांत, बिहारपैकीं उत्तरेकडील एका जिल्ह्यांत व समुद्राचे कांठचे भागांत लागवडी लायक कांहीं जमीन अजून शिलक आहे. या प्रांतांतील कांहीं भागांत नद्यांचे ओघ फिरल्यानें व कालवे झाल्यानें जमिनींत पाणी फार सांचून हवा वाईट झाली आहे, व त्या कारणानें दोन जिल्ह्यांत लोकवस्तीही कमी झाली आहे.

जमीन धारण करण्याच्या पद्धति व सारा—या प्रांतांत जमिनीवर सरकार देणें फारच हलकें आहे. तें दर माणशीं रु० ९–८ व दर एकरास रु० ८–८

असें पडतें. कायमचा सारा ठरलेले भागांत सन १८८१–८२ सालांत जमीन बाबीपासून सरकारास ३ कोटि ५२ लक्ष वसूल आला व १८९१–९२ सालीं ३ कोटि ४१ लक्ष आला. जमीन बाबीशिवाय दुसऱ्या बाबींचें उत्पन्न अलीकडे वाढलें आहे. जमिनीवरील सारा व जमिनीवरील इतर करांचें उत्पन्न सन १८८१-८२ सालीं ३ कोटी ७८ लक्ष झालें होतें व सन १८९१-९२ सालीं ३ कोटी ८१ लक्ष झालें. कुळांकडून जमिनीचे मालक भाडें घेतात तें वेगळाले प्रदेशांत कमी जास्त असतें, तरी साधारणपणें पूर्वेकडील भागांतील जमिनीचे मालक दूर राहणारेच आहेत व तेथील रयत जमीनदारांचा पगडा आपलेवर चालू न देण्यासारखी खबरदार आहे. बरद्वान भागांत साऱ्याचा दर जास्त आहे. बहार प्रांतांत कुळें व पोटकुळें यांच्यांत जमीन फार वांटली गेल्यानें ती लागवडीस मिळण्यास अडचण पडते ; त्यामुळें भाडें फार वाढलें असून एकंदरींत कुळांची स्थिति वाईट झाली आहे. ओरिसा व छोटा नागपूर प्रांतांत कांहीं जमिनीसंबंधी साऱ्याचा दर कायमचा ठरलेला आहे. या भागांत कुळांचा व जमिनीचे मालकांचा सलोखा नाहीं.

रस्ते वगैरे—या प्रांतांत रस्ते वगैरे पुष्कळ वाढले आहेत. मोठाल्या नद्यांतून पूर्वींपेक्षां जास्त आगबोटी चालतात. आगगाडीचे रस्त्यांची लांबी गेले १० सालांत दुप्पट झाली आहे. कालव्यांतून पुष्कळ माल नेण्याआणण्यांत येतो. या प्रमाणें दळणवळणाची सोय चांगली झाल्यानें सर्व प्रांतांत धान्याची किंमत सारखी झाली आहे, व ती पहिल्यापेक्षां वाढली आहे.

हा ह्या प्रांतासंबंधानें सर्वसामान्य विचार झाला ; आतां—त्याचे वेगळाले भागांबद्दल थोडा विचार करण्याचा आहे. बंगालचे पूर्व भागांत दुष्काळाची मुळींच भीति नसते. या भागांत लागवडीलायक जमीन अजून शिलक आहे. साऱ्याचा दर कमी आहे व जमीन करणारे लोक चांगले मेहेनती व हुषार आहेत. या भागांत मुख्यत्वेंकरून तांदूळ पिकतो तरी जूटचे (तागाचे) पिकानेंही रयतेस पुष्कळ मदत होते. रयतेची स्थिति चांगली आहे व त्यांची राहण्याची तऱ्हा सुधारली आहे. लोक खर्चिक आहेत तरी, जमिनीचें पीक चांगलें येत असल्यामुळें, त्यापासून कांहीं अपाय होत नाहीं. बंगाल्यांतील उत्तर भागांतील रयतेची स्थिति पूर्व भागांतील रयतेच्या स्थिती इतकी चांगली नाहीं. या भागांत चहा, ऊंस, तांदूळ, जूट (ताग) भांग वगैरे पिकें होतात. जमिनीवरील सारा हलका आहे. या दोन भागांतील रयतेच्या स्थितीप्रमाणें या प्रांताचे मध्य भागांतील रयतेची स्थिती चांगली नाहीं. त्या भागांत लागवडी लायक जमीन फार थोडी राहिली आहे. पाऊस नियमितप-

णानें पडत असल्यामुळें जमिनीचें भाडें जरब आहे तरी तें व सावकाराचें कर्ज हीं देतां येतात. जूटचे व निळीचे पिकाची स्थिति अलीकडे वाईट झाली आहे. गळिताचीं धान्यें जास्त करूं लागले आहेत. रयत लोक कर्ज काढतात ते लग्न-कार्यासाठींच काढतात, व एखादे सालीं पीक कमी आलें तरी त्यांस अडचण न पडतां राहतां येतें. पश्चिमेकडील भागांचें कलकत्त्याशीं सांनिध्य असल्यामुळें भाजीपाला पुष्कळ होतो. जमिनी कुळांस व त्यांचेकडून पोटकुळांस अशा परंपरेनें लागत जात असल्यामुळें जमिनीचें भांडें एकंदरींत फार वाढतें. भाडें जबर आहे व लग्नकार्यांचा खर्च मोठा असतो तरी या भागांत सावकाराचे प्राबल्य ह्मणण्यासारखें नाहीं. ओरिसा प्रांतांत स्थानिक खपास हवा त्यापेक्षां तांदूळ पुष्कळ पिकतो; व तो सिलोन व मारिशस बेटांत पाठविण्यांत येतो. या प्रांतांतलि हवा बंगाल्यांतले पेक्षां चांगली आहे व रयतेचीं राहण्याचीं घरें चांगलीं असतात. सावकारांचें प्राबल्य पुष्कळ आहे. चांगले स्थितीचे लोकांपैकीं दोन तृतीयांश लोक कर्जबाजारी आहेत. लग्न कार्यांत उधळेपणानें खर्च करतात. छोटा नागपूर प्रांतांतील रयत पूर्वीची रानटी असून आतां सुधारली आहे; त्यांच्या गरजा थोड्या आहेत व त्यांचें खाणेंपिणें चांगलें असतें. सुधारलेले रितीभातीचें अनुकरण झालें नाहीं, असे भागांत लग्नकार्यांत फारसा खर्च होत नाहीं. तसें अनुकरण करण्याचें ज्यांनीं सुरूं केलें आहे त्या लोकांत कर्जबाजारीपणा शिरला आहे. या भागांत जमिनीचे मालक व कुळें यांचे दरम्यान सलोखा नाहीं व त्यामुळें रयतेची स्थिति सुधारण्यास हरकत येते असें ह्मणतात. रयतेचा कर्जबाजारीपणा बराच वाढला आहे. व त्याचें कारण लग्नकार्यांत जास्त खर्च करणें हेंच आहे. संथळ परगण्यांतील लोक चांगले मेहनती व व्यवस्थितपणानें खर्च करणारे असे आहेत. हे लोक पहिले डोंगरी जातीचे असून आतां चांगले सुधारले आहेत. डोंगरांत रहाणारे पहाडिया जातीचे लोकांची स्थिति चांगली नाहीं ; ते जंगलांतच राहतात व पारधीवर व थोडी शेतकी करून निर्वाह करतात. बिहार प्रांतांत पूर्वेकडील भागांतील रयत पश्चिमेकडील भागांतील रयतेपेक्षां जास्त चांगले स्थितींत आहे, पश्चिमेकडील भागांत जमीन वाईट आहे किंवा रयत उद्योगी नाहीं असें नाहीं. या भागांत रस्ते चांगले आहेत ; गहूं, मका, व अफू हीं मौल्यवान पिकें होतात. असें असूनही रयतेची स्थिति वाईट असण्यास कारणें पर्जन्याची कमताई, जमिनींचे अतिशय विभाग होणें, जामिनींचें भाडें जरब असणें हीं आहेत. " बंगाल टेनन्सी आक्ट " या कायद्याचा अंमल झाल्यापासून रयतेचे व जमिनींच्या मालकांचे संबंध सुधारतील अशी आशा आहे. रयत लोक कर्जबाजारी आहेत.

या भागांतील लोकवस्तीपैकीं एक पंचमांश लोकांस अपुरे अन्नावर दिवस काढावे लागतात असा अजमास आहे.

मजुरदार व धंदेवाले लोक.–आगगाड्या, गोद्या, व दुसरीं सार्वजनिक कामें, तशींच कोळशाच्या खाणी, लोखंडाच्या खाणी, जूटचे कारखाने यांवर पुष्कळ मजूर लाकांचा निर्वाह चालतो. कोष्टी लोकांची स्थिति वाईट आहे व ते शेतकी करूं लागले आहेत. कुंभारांची बहुतेक तशीच स्थिति झाली आहे. सुतार, लोहार, सोनार यांची स्थिति चांगली सुधारली आहे. धान्याचे दर वाढल्यानें पगारदार लोकांस त्रास होतो. वकील डाक्तर वगैरेंची स्थिति चांगली आहे. एकंदरींत बंगाल, ओरिसा व छोटा नागपूर या भागांतील लोकांची स्थिति पुष्कळ सुधारली आहे व जसजसें पूर्वेकडे जावें तसतशी जास्त सुधारलेली स्थिति दृष्टीस पडते. बिहार प्रांतांत मध्यम वर्गाचे लोकांचीही स्थिति बरी आहे.

आसाम— आसाम प्रांतांत डोंगरी प्रदेश व खोऱ्यांतील प्रदेश यांचा पृथक विचार केला पाहिजे. खोऱ्याचे भागांत जास्त उद्योगी लोकांची जरूर आहे. चहाचे लागवडीसाठीं परठिकाणांहून लोक आणावे लागतात.

शेतकी व सारा–ब्रह्मपुत्रा व सुर्मा या खोऱ्यांत सन १८९१-९२ सालीं ६९ लक्ष एकर जमीन लागवडीस होती व सन १८८१-८२ सालीं ६४ लक्ष होती. या प्रांतांत १८८१ सालीं १५८ हजार एकर जमीन चहाचे लागवडीस होती, व ती वाढत जाऊन सन १८९१-९२ सालीं २४१ हजार एकर झाली. जमीन बाबीचा बोजा सन १८८१-८२ सालीं दर एकरीं रु० ०-८-१० होता व १८९१-९२ सालीं रु. ०-९-११ झाला. सारा कायमचा ठरलेला आहे असें भागांत कूळभरणा थोडा असल्यामुळें जमिनींचें भाडें थोडें येतेंच व मालकाकडून बहुतेक लागवड होते. या प्रांतांत मालक व कुळें यांमध्यें सलोखा आहे.

राहण्याची रीति—धान्याच्या किमती–लोकांचे राहण्याचे रीतींत सुधारणा झाली आहे. भांडीं दागदागिने व रेशमीवस्त्रें दृष्टीस पडतात. वरचे दर्जाचे कुळांचे दागिने सोन्याचे असतात. ब्रह्मपुत्रा व सुर्मा नद्यांतून येण्याजाण्याची सोय चांगली झाल्यानें, व रस्ते वाढल्यानें, व्यापार वाढला आहे. धान्याच्या किमती शेंकडा ४० टक्के वाढल्या आहेत.

कर्जबाजारीपणा—या प्रांतांत रयत कर्जबाजारी आहे. आसाम खोऱ्यांत मात्र सावकाराचें प्राबल्य अगदीं कमी आहे; त्याचे उलट स्थिति सिल्हेट व सुर्मा खोऱ्यांत आहे. या प्रांतांतील डोंगरी लोक बहुतेक शेतकीवरच निर्वाह करणारे आहेत.

धंदेवाले व इतर शेतकी न करणारे लोक—या प्रांतांत धंदेवाले लोक व कारागीर लोक यांस पुरेसें काम मिळत नाहीं. दुसरे भागांतून मजुरीसाठीं मजुरदार लोक पुष्कळ येतात व त्यांचा मजुरीचा दरही वाढला आहे. एकंदरींत या प्रांतांत शेतकरी लोकांची स्थिति चांगली आहे असें दिसतें.

ब्रह्मदेश--या प्रांताचे खालचा ब्रह्मदेश व वरचा ब्रह्मदेश असे दोन भाग आहेत. या दोन्ही भागांचे हवा पाण्यांत फरक आहे. खालचा ब्रह्मदेश चांगला सुपीक असून त्यांत पाऊस नेहमीं चांगला पडतो; वरचे ब्रह्मदेशांत पर्जन्याची वारंवार तूट पडते. दोन्ही भागांत तांदूळ हेंच मुख्य पीक आहे; त्या शिवाय वरचे ब्रह्मदेशांत गहूं, जोंधळे, मका, व डाळदाणा वगैरे पिकें होतात. खालचे ब्रह्मदेशांत तांदुळाशिवाय ऊंस, तंबाखू व भाजीपाला होतो. या प्रांतांत शहर गांवांत राहणारे लोकांचें प्रमाण मोठें आहे, व बंगाल्यांतून व मद्रासेंतून या प्रांतांत पुष्कळ लोक येतात.

शेतकी—खालचे ब्रह्मदेशांत गेले १० सालांत शेतकी सुमारें दिढीनें वाढली आहे. सन १८९१–९२ सालीं $\frac{९}{१०}$ जमिनींत तांदूळ पिकत होते. लागवडीस असलेले व पड जमिनिबद्दल शेतकीचे भागांत सांगितलेंच आहे.

धान्यसंग्रह—या दोन्ही प्रांतांत तेथील खपास पुरून पर देशास पाठविण्यास पुष्कळ धान्य पिकतें. खालचे ब्रह्मदेशांतून वरचे ब्रह्मदेशास व इतर देशांस पुष्कळ तांदूळ जातो. वरचे ब्रह्म देशाची स्थिति सुधारेल त्या मानानें त्यास धान्यसंग्रहासाठीं खालचे ब्रह्मदेशावर अवलंबून रहावें लागणार नाहीं. ब्रह्मी लोकांची द्रव्यसंचय करण्याकडे प्रवृत्ति फार कमी आहे; उदरनिर्वाह होऊन पैसा उरेल तो चैनींत किंवा पुण्यसंचय करण्यांत खर्च करतात. या प्रांतांत आगगाडीचा व नुस्ता रस्ता पुष्कळ झाला आहे व इरावती नदींतून आगबोटीही चालतात.

जमिनीवरील सारा—खालचे ब्रह्मदेशांत जमीन बाबीशिवाय स्थानिक सुधारणेसाठीं जमीन बाबीचे आकारावर शेंकडा १० टक्के कर आहे. व शिवाय मनुष्यावरही कर घेण्यांत येतो. वरचे ब्रह्मदेशांत जमीन बाब व मनुष्यावर कर यांचेबद्दल घरपट्टीच घेण्यांत येते. हा कर अनेक कारणांनीं सर्वांवर सारखा बसवितां येत नसल्यामुळें, जमीन बाब सुरू करण्यासाठीं सर्व्हे करण्यांत येत आहे.

या प्रांतांत जमीन धारण करणारेच बहुतकरून जमीन करतात. खालचे ब्रह्मदेशांत शहरांचे जवळ, सावकार किंवा मध्यस्थ यांचे हातीं जमीन जाऊन, त्यांचे पूर्वीचे मालकांनीं कुळाप्रमाणें तिची लागण करण्याची पद्धति सुरु केली आहे. जमीन सुपीक असल्यामुळें सारा देण्याची अडचण पडत नाहीं.

धान्याच्या किमती–ब्रह्मी लोकांस लागणारे जिनसांपैकीं मुख्य तांदूळ, मीठ

व मासे हे आहेत. तांदुळांची किंमत व मिठाची किंमत वाढत आहे. पूर्वी ब्रह्मी लोक आपल्यास लागणारा धान्याचा सांठा ठेवून बाकीचें विकीत असत ; परंतु अलीकडे सर्व पीक पहिल्यानें विकून टाकून पुढें लागेल तसा माल बाजारांत विकत घेण्याची चाल पडत आहे. माशांचे किमतींत कांहीं अंतर पडलें नाहीं. ब्रह्मदेशाचा व्यापार वाढला आहे, त्याबद्दल व्यापाराचे भागांत सांगण्यांत आलेंच आहे.

कर्जबाजारीपणा.—या प्रांतांतही शेतकरी कर्जबाजारी आहेत, तरी इतर प्रांतांतील शेतकऱ्यांप्रमाणें ते कंगाल झालेले नाहींत. ब्रह्मी लोक चैनी आहेत. इतर देशांतून या देशांत लोक येऊन राहूं लागले आहेत व तेथील वस्ती वाढत आहे.

धंदेवाले व कारागीर—या प्रांतांत कारागीर लोकांची संख्या वाढलेली नाहीं. सुतार व सोनार यांचा धंदा चांगला चालतो. मजुरदारांस सरकारी व व्यापाऱ्यांचे कामावर मजुरी चांगली मिळते व गेले १० सालांत मजुरीचे दर पुष्कळ वाढले आहेत.

मध्यप्रांत—हा प्रांत बंगाल, वायव्यप्रांत व महाराष्ट्र देश यांचे मध्येंआहे व ह्या प्रांतांचे सन्निद्ध असलेले भागांची स्थिति शेजारचे प्रांताप्रमाणें आहे. या प्रांतांतील जमिनीचे तीन वर्ग आहेत. (१) भात पिकाची जमीन (२) काळी जमीन (३) डोंगरी जमीन. भात पिकाची जमीन पूर्व बाजूस आहे. काळी जमीन उत्तर व पश्चिम बाजूस आहे, डोंगरपट्टी मध्यभागांत आहे. या प्रांतांत मोठालीं शहरें काय तीं दोनच आहेत, यामुळें खेडेगांवांत राहणारे लोकांचें प्रमाण इतर प्रांतापेक्षां फार मोठें आहे. साधारण क्षेत्राचे मानानें लोकवस्ती कांहींशी कमी दिसते,—तरी जंगली प्रदेश वजा केले तर लागवडीस असलेले जमिनीचे दर मैलास लोकवस्ती सुमारें ३९५ बसते. आतां दुसरें प्रांतांतून लोक येऊन या प्रांतांत राहाण्यास बहुतेक सोय नाहींसारखी झाली आहे.

शेतकी.—सन १८६७–६८ चे मानानें पाहतां लागवडी जमिनीची वाढ एकंदरींत २८ टक्के झाली आहे. भातशेतीची जमीन पूर्वीपेक्षां १८ टक्के वाढली आहे. गव्हांची लागण २४ टक्के व दुसऱ्या धान्याची १४ टक्के वाढली आहे. गळिताचे धान्याची पूर्वीपेक्षां आतां दुप्पट लागवड होते. अजून लागवडीस न आलेली जमीन बरीच आहे ; ती लागवडीस असलेले जमिनीपेक्षां कमी कसाची आहे. हल्लीं लागवडीस असलेले जमिनीपासून उत्पन्न बरोबर रीतीनें होत नाहीं, व या कामांत हल्लींपेक्षां थोडें जास्त लक्ष घालून शेतांची

लागवड झाली तर हल्लींपेक्षां पुष्कळ जास्त पीक येईल असा पूर्ण संभव आहे, असें शेतकीसंबंधी पूर्ण माहितगार लोकांचें मत आहे. जमिनींत दोन पिकें घेण्याची वहिवाट अलीकडे बरीच वाढत आहे.

धान्यसंग्रह व धान्याच्या किंमती--या प्रांतांत उत्पन्न होणारे धान्यांतून प्रांतांतील लोकांस लागणारें धान्य व परदेशीं जाणारें धान्य वजा केलें तरी पुष्कळ धान्य शिलक राहतें. गेले ३५ वर्षांचे मानानें पहातां धान्याच्या किमती ही पुष्कळच वाढल्या आहेत. तांदुळाची किंमत तिप्पट, गव्हांची जवळ जवळ पावणेतीनपट, ज्वारीची सवादोनपट, व डाळ दाण्याची किंमत दुप्पट, अशा किमती वाढल्या आहेत. शेतकीस पूर्वीपेक्षां खर्च जास्त लागतो, तरी मालाचे किमतीचे वाढीचें मानानें खर्चाची वाढ झालेली नाहीं. धान्याशिवाय इतर माल ह्मणजे कपडालत्ता, भांडीं व मीठ यांची किंमत पुष्कळ उतरली आहे.

रस्ते—रस्ते ह्मणण्यासारखे वाढले नाहींत. उत्तरेस इंडियन मिडलंड व पूर्वेस बंगाल नागपूर हे रस्ते झाल्यानें आगगाडीचा प्रसार बराच झाला आहे. १० वर्षांपूर्वी ५७७ मैल आगगाडी होती तेथें आतां (१८९१-९२ सालीं) ११३३ मैल झाली आहे.

व्यापार--व्यापार संबंधानें सुमारें २५ वर्षांचे पूर्वीची व हल्लींची स्थिति पाहतां, आयात व्यापार जवळ जवळ दुपटीवर व निर्गत व्यापार तिपटीवर गेला आहे. सन १८७८ सालापासून आंत येणारे मालापेक्षां अधिक माल बाहेर जाऊं लागला.

जमिनीचे मालक व कुळें—या प्रांतांत जमीन धारण करण्याच्या पद्धति कशा आहेत हें पूर्वी सांगितलें आहे. जमिनीचे मालक व त्यांचीं कुळें यांचा परस्पर संबंध पाहिला तर, सुमारें निम्मे कुळांसंबंधीं सारा वाढविण्याचा किंवा त्यास काढून टाकण्याचा जमिनीचे मालकास कांहीं अधिकार नाहीं. शेंकडा सुमारें २८ टक्के कुळांवर व त्यांचे स्वतःचे मालकीचे व वहिवाटीचे जमिनीसंबंधानें मात्र मालकांचा पूर्ण अधिकार चालतो. एकंदर प्रांताची स्थिति जशी सुधारली आहे, त्या मानानें कुळांकडून घेण्याचा साराही वाढला आहे. या प्रांतांचे कांहीं भागांत मात्र जमिनीचे मालक कुळांकडून जास्त सारा घेतात व ही स्थिति जेथें जमिनीचे मालक जमिनीची लागवड स्वतः करीत नाहींत किंवा जेथें जमिनीची चणचण झाली आहे असें ठिकाणीं दिसते. ही स्थिति सरकारचे लक्षांत आली आहे.

कर्जबाजारीपणा—या प्रांतांतील जमिनदार किंवा जमिनीची लागवड

करणारे लोक यांमध्यें कर्जबाजारीपणा पुष्कळ झाला आहे. जमिनीवरील मालकी ज्या प्रमाणानें जास्त चांगली असेल, त्या मानानें जमिनदार लोक कर्ज काढण्यास जास्त प्रवृत्त होतात ; हा जो इतर प्रांतांतील अनुभव, तो या प्रांतासही लागू पडतो. सुमारें ⅕ जमीन शेती न करणारे लोकांचे हातीं गेली आहे असें अलीकडील सेटलमेंट चौकशीचे वेळेस दिसून आलें आहे. जेथें कुळास हक्क जास्त व जमिनीचे मालकाचे हक्क कमी असतात त्या भागांत, कर्जबाजारीपणाही त्या मानानेंच कमी असतो. कुळांतही असाच प्रकार दिसून येतो. ज्या मानानें त्यांचा जमिनीवरील हक्क दृढ असेल त्या मानानें त्यांचीही कर्ज काढण्याकडे जास्त प्रवृत्ति असते. या प्रांतांतील उत्तरेकडील जिल्ह्यांत व नर्मदेचे खोऱ्यांतील प्रदेशांत जमिनदार व रयत हे जास्त कर्जबाजारी आहेत. या भागांत व नागपूर व वर्धा जिल्ह्यांत पुष्कळ जमीनी कुळांकडून सावकारांकडे गेल्या आहेत.

शेतकीची मजुरी—पूर्वेकडील भागांतील कुळांची व शेतकीसंबंधी मजुरी करणारे लोकांची स्थिति चांगली आहे. मजुरी कांहीं ऐनजिनशीं व कांहीं नक्त अशी देण्यांत येते. नागपूरचे आसपासचे भागांत नक्त पगाराची वहिवाट पडत चालली आहे व तिचा दर पूर्वीचेपेक्षां वाढला आहे. एकंदरींत रोज मजुरी करणारे लोकांस काम कमी मिळतें असें नाहीं. मजूरदार लोकही कर्जबाजारी आहेत.

जंगली लोक—गोंड लोक व तशा प्रकारचे दुसऱ्या जातीचे लोक हे या प्रांतांतील मूळचे रहिवाशी होत; त्यांस सुपीक सपाट प्रांतांतून हांकून दिल्यामुळें ते जंगलांत जाऊन राहिले. ही गोष्ट १५० वर्षांचे आंतील आहे. हे लोक शेतकीवर उपजीविका करणारे आहेत व गेले मनुष्यगणतविरून या लोकांची संख्या कमी झाली असें दिसत नाहीं. हे लोक लग्नकार्यासाठीं व मद्यपानासाठीं पुष्कळ कर्ज काढतात ; व सर्व सावकारांत दारू विकणारा सावकार त्या लोकांस मोठा कठीण जातो. तरी कर्जबाजारीपणामुळें यांचे सुधारणेस व्यत्यय आला असें दिसत नाहीं. हे लोक राहतात त्या भागांत जास्त जमीन लागवडीस आलेली आहे व कांहीं भागांतील शेतकीची पद्धतही सुधारलेली आहे. अगदीं डोंगरांत राहणारे लोक अजून रानटी स्थितींत आहेत. त्यांस चांगली शेतकी करतां येत नाहीं, व ते आपला उदरनिर्वाह रानांतील फळें, पारध, व घुशी उंदीर यांजवर करतात.

धंदेवाले व कारागीर लोक—शेतकीवरच केवळ अवलंबून नाहींत अशा धंदेवाले लोकांपैकीं सुतार व लोहार यांस साधारण मजुरी मिळते व त्यांस

आगगाडी व कारखाने यांतही काम मिळतें. कुंभार व मोची व तेली यांची स्थिति वाईट आहे. कोष्टयांची स्थिति तर पूर्वीपासूनच वाईट आहे व त्यांचा बारीक कापड विणणाऱ्यांचा रोजगार अगदींच बसला आहे. वकील व सावकार यांचेच धंदे काय ते बरे चालतात.

वऱ्हाड—या प्रांतांत ब्रिटिश सरकारचा अंमल प्रथमतः सुरू झाल्यावर कांहीं दिवस इतर प्रांतांतून पष्कळ लोक या प्रांतांत राहण्यास आले, व दक्षिणे कडील दुष्काळाचे वेळीं या प्रांतांत बाहेरून पुष्कळ लोक आले. गेले १० सालांत दुसऱ्या प्रांतांतून लोक येथें येऊन राहण्याचें कमी झाल्यासारखें दिसतें.

शेतकी व सारा—सन १८८१-८२ चे मानानें पाहतां लागवडी जमिनीची वाढ फारच थोडी झाली आहे. इतर प्रांतांचे मानानें पाहतां या प्रांतांत खाण्याचे धान्याशिवाय इतर पिकें जवळ जवळ निम्मे जमिनींत आहेत, व सन १८८१-८२ चे मानानें पाहतां या प्रमाणांत अंतर झालें नाहीं. खाण्याशिवाय जिनसांचे पिकांत कापूस व गळिताचीं धान्यें हींच मुख्य आहेत. परदेशांस रवाना होणारे धान्यांत कापूस व गहूं हीं मुख्य आहेत. मुंबईहून, नागपुरास जाणारा रस्ता या प्रांतातून जातो, व त्यास मिळणारे पाय रस्ते पुष्कळ झाले असल्यामुळें शेतकाऱ्यांस माल विकण्यास सोय झाली आहे.

रयातवारी पद्धतीनें जमिनी लागवडीस दिलेल्या आहेत. सन १८८१-८२ चे मानानें सुमारें पांच टक्के जमीन नवीन लागवडीस घेण्यांत आली आहे. शेताचा सारा सरासरीनें दर एकरास १४ आणे पडतो. तो वसूल होण्यास सरकारास बिलकूल अडचण पडत नाहीं.

कर्जबाजारीपणा—इतर प्रांतांप्रमाणें या प्रांतांत ही शेतकरी कर्जबाजारी आहेत. सावकार लोक हे गुजराथी व मारवाडी वर्गाचे विशेष आहेत. ते लोक जमिनी करीत नाहींत किंवा घेतही नाहींत, तर कुळांकडूनच निघतील तितके पैसे काढतात.

मजुरी व धान्याच्या किमती—या प्रातांत मजुरदारास मजुरी रोकड मिळते हें इतर प्रांतांचे मानानें विशेष जाहे. सुधारणेंत मागसलेले भागांत मात्र मजुरी ऐनजिनशी देतात. धान्याच्या किमती या प्रांतांत फार वाढल्या आहेत. ज्वारी व बाजरी यांची किंमत जवल जवळ दुप्पट, डाळ दाणा व गहूं यांची किंमत दीडपट वाढली आहे. गव्हाची किंमत परदेशांत मागणी असेल त्या मानानें असते. एकंदर लोकांची स्थिति चांगली आहे.

मुंबई इलाखा—या इलाख्याचे सिंध, कोंकण, गुजराथ, व दक्षिण प्रांत, असे चार मुख्य भाग आहेत.

सिंध प्रांत—सिंध प्रांताची स्थिति पंजाब प्रांतांतील स्थितीसारखी आहे. लोकांची स्थिति चांगली आहे. शेतकी सिंधु नदीचे पुरावर चालते, तेव्हां पूर ज्या मानानें पसरेल त्या मानानें शेतकी कमी किंवा जास्त वाढते. सन १८८१-८२ सालीं २१२१ हजार एकर जमीन लागवडीस होती, त्या पैकीं १६०२ हजार बागाइत होती. सन १८९१-९२ सालीं २९४५ हजार एकर जमीन लागवडीस होती, त्यापैकीं २६०१ हजार एकर बागाइत होती. जमिनीवर सारा दर एकरास रु० १-४-८ पडतो व पाण्याचा आकार मिळविला तो दर एकरास रु. ३-८-५ पडतो. हा सारा वसूल होण्यास अडचण पडत नाहीं. सन १८९१-९२ सालीं २३५ हजार एकर जमिनींत दोन पिकें करण्यांत आलीं होतीं. सन १८८१-८२ चे मानानें हीं पिकें आतां दुप्पट जमिनींत होतात. बहुतेक जमिनींत खाण्याचे धान्य पिकतें. या प्रांतांतील शेतकऱ्यांची स्थिति चांगली आहे.

मुंबई इलाख्याचे इतर भाग—या इलाख्यांत सन १८७७ सालीं दुष्काळ पडला होता. दुष्काळ पडलेले सात जिल्ह्यांत लोकवस्ती सुमारें १९½ टक्के वाढली आहे, व इतर भागांत ती सुमारें १०½ टक्के वाढली आहे; ही वाढ जशी खेडेगावांत झाली आहे तशी शहरांतून झाली नाहीं. या प्रांतांत धंदे रोजगार करणाऱ्यांचें प्रमाण थोडें जास्त आहे.

शेतकी—गेले १० सालांस सुमारें सवा दहा लक्ष एकर जमीन नवीन लागवडीस आली, व दुपिकी जमिनींत ही सुमारें १ लक्ष एकराची वाढ आहे. विहिरीचे पाण्यान व तळयाचें पाण्यानें बागाइत वाढत आहे. सन १८८१-८२ चे मानानें सन १८९१-९२ सालीं दुप्पट जमिनींत बागाइत होतें. लागवडीस येण्यासारखी पड जमीन पंचमहाल, खानदेश, सोलापूर व विजापूर जिल्ह्यांत मिळून सुमारें १०½ लक्ष एकर शिलक आहे; परंतु ती हल्लीं लागवडीवर असलेले जमिनीसारखी चांगले मगदुराची नाहीं. शेंकडा सुमारें ७९ एकर जमिनींत खाण्याचीं धान्यें पिकतात. कोंकण व गुजराथ यापेक्षां दक्षिणेंत व कर्नाटकांत, पर्जन्याचे मान अनिश्चित असल्यामुळें, सारा थोडा हलका आहे. एकंदर सारा सुलभ रीतीनें वसूल होतो.

रस्ते व धान्याचे दर—या प्रांतांत गेले १० सालांत आगगाडीचा रस्ता दीडपट वाढला आहे, व सर्व प्रांतांत रस्त्याची सोय चांगली झाली आहे. धान्याचे दर गेले १० सालांत शेंकडा १० पासून २५ टक्केपर्यंत व कर्नाटकांत

३९ टक्केपर्यंत वाढले आहेत. कोंकण प्रांताशिवाय इतर प्रांतांत लोकांस पुरेसें धान्य उत्पन्न होतें. कोंकणांत मात्र पुरेसें धान्य होत नाहीं, ह्मणून तेथील लोकांस दरसाल परठिकाणीं पोट भरण्यास जावें लागतें.

कर्जबाजारीपणा--या प्रांतांतील शेतकरी इतर प्रांतांप्रमाणेंच कर्जबाजारी आहेत. जेथें गुजराथेप्रमाणें जमीन चांगली आहे व पर्जन्य नियमानें पडतो तेथें जमीन करणारांची स्थिति चांगली असते, व मधले वर्गांचे लोकांस पैसा सांचविण्यासही सांपडतो. खालचे वर्गांचीं कुळें दारूचे व्यसनानें किंवा उधळपट्टीचे संवयीनें सावकारांचे तावडींत सांपडतात. आतां आगगाड्या व रस्ते यांची वृद्धि पुष्कळ झाल्यानें या लोकांस परठिकाणीं जाऊन उदरनिर्वाह करण्यास सांपडतो. दक्षिण कोंकणांत जमीन थोडी व डोंगराळ असल्यामुळें त्या प्रांतांत पुरेसें धान्य उत्पन्न होत नाहीं. घाटांवरून धान्य आणावें लागतें. या प्रांतांतले लोक मितव्ययी असल्यामुळें ते कर्जबाजारी कमी आहेत. या प्रांतांतून सुमारें $\frac{१}{१०}$ लोक मुंबई वगैरे ठिकाणीं पोट भरण्यासाठीं जातात. महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतांत पर्जन्य नीट रीतीनें योग्य वेळीं पडत नाहीं व तेथील व विशेषेंकरून या प्रांतांचे मध्यभागांतील रयत गरीब स्थितींत आहे.

दक्षिणेंतील शेतकऱ्यांस कर्जांतून मुक्त करण्यासाठीं कायदे— रयतेस सावकारांचे पेंचांतून सोडविण्यासाठीं मुद्दाम कायदे करण्यांत आल्यामुळें, तिचे स्थितीचे संबंधानें, इतर प्रांतांतील रयतेपेक्षां जास्त विचक्षणा झाली आहे. शेतकरी लोकांचे स्थितीचे संबंधानें सन १८७५ सालीं प्रथमतः चौकशी झाली, व त्यानंतर पुढें त्या कमिशनाचे सूचनांप्रमाणें सन १८७९ सालीं पहिल्यानें कायदा झाला. या कायद्यांत व्याजाचा दर जबर असेल तेथें तो कमी करण्याचा अधिकार कोर्टांस दिला आहे; प्रतिवादीचे गैरहजरीनें निकाल न करतां, त्यास हजर करण्यासंबंधानें तजवीज करून, त्याचे तक्रारीचा विचार करून, मुकदम्याचा निकाल व्हावा असें ठरविलें आहे; हुकुमनामे बजावण्यासंबंधानें हुकुमनामेवाल्यास कायद्यांत सवलती आहेत, तितक्या या कायद्यांत ठेवल्या नाहींत; दावा करण्याची मुदत वाढविली आहे व खोटे व लबाडीचे व्यवहार चालूं नयेत ह्मणून कोर्टांस ते तपासून पाहण्याचे विशेष अधिकार दिले आहेत; शेतकऱ्यांचे व्यवहारांचा दाखला राहण्यासाठीं ते नोंदण्यासंबंधानें विशेष तजविजी करण्यांत आल्या आहेत व तंट्याचे आपसांत तोडजोडीसाठींही विशेष तोडजोड करणारे लोक नेमले आहेत. ही व्यवस्था चालू केल्यापासून किती हित झालें आहे, व अशा प्रकारच्या तजविजी इतर प्रांतांत करणें कितपत इष्ट आहे या संबंधानें चौकशी करण्यासाठीं हिंदुस्थानसरकारानें एक कमिशन

नेमलें होतें; या कमिशनानें, या कायद्यापासून रयतेचा फायदा झाला आहे, व इतर प्रांतांतही जरूर असेल तेथें तो लागू करावा असा अभिप्राय दिला आहे; व सारा वसूल करण्याचे पद्धतींत कांहीं सवलती असाव्या असेंही सुचविलें आहे. याशिवाय आणखी कांहीं महत्वाच्या सूचना केल्या आहेत. या कमिशनाचे सूचनांस अनुसरून शेतकीचे कायद्यांत नुकतीच दुरुस्ती करण्यांत आली आहे, व साऱ्याचे पद्धतीविषयीं केलेल्या सूचनांसंबंधानें सरकारांत विचार चालू आहे.

इतर प्रांतांत लोक कर्जबाजारी होण्यास उधळपट्टी, अव्यवस्थितपणा, निरुद्योग, निरुत्साह वगैरे जीं कारणें आहेत तीं या प्रांतांतील रयत लोकांसही लागू आहेत, परंतु त्यांशिवाय या प्रांतात पर्जन्य नेमानें पडत नाहीं हेंही एक विशेष कारण आहे. या प्रांतांत कृत्रिम उपायानें पाणी आणण्यास सवडी थोड्या आहेत. सन १८७६–७७ चे दुष्काळापासून अलीकडे पीक बरें येतें. दौंड–मनमाड व सदर्न मराठा ह्या आगगाड्यांचे व दुसरे रस्ते वाढले आहेत त्यामुळें व्यापार वाढला आहे, व मजुरी मिळण्यास जास्त सोई झाल्या आहेत. तळीं व पाटबंधारे यांपासून जास्त जमिनीस पाणी मिळूं लागलें आहे, यामुळें शेतकरी लोकांची स्थिति पूर्वीपेक्षां कांहीं सुधारली आहे; व या सुधारणेपासून होणारा फायदा रयतेच्या पदरीं पडण्यास शेतकीचे कायद्यानें मदत झाली आहे. तरी पीक कमी आलें तर लहान लहान जमिनी करणारे लोक व शेतकीची मजुरी करणारे लोक यांची धांदल उडतेच.

धंदेवाले व कारागीर—इतर प्रांतांचे मानानें या प्रांतांत कारागीर लोक जास्त आहेत. कापूस पुष्कळ पिकत असल्यानें या प्रांतांत विणकरीचा धंदा जास्त चालतो. विलायतेहून कापड येऊं लागल्यानें या लोकांचे धंद्यास कमीपणा आला आहे, तरी गिरणीचे सूत घेऊन कापड विणल्यानें या लोकांस, इतर प्रांतांप्रमाणेंच, गुजाऱ्यास कांहीं साधन होत असेल. दुष्काळ पडला ह्मणजे अंमल याच लोकांवर प्रथमतः होतो. मोठालीं शहरें व कारखाने असलेलीं गांवें शिवाय करून बाकीचे भागांत मजुरी बहुतेक ऐनजिनसींच देण्यांत येते. यामुळें व धान्याचे किमतीचे चढामुळें या लोकांचे स्थितींत बदल होत नाहीं. दुष्काळाचे दिवसांत मात्र यांची स्थिति वाईट होते. इतर वेळीं जरी त्यांस गरिबीनें रहावें लागतें तरी, त्यांची स्थिति संकटाची नसते. एकंदरींत रत्नागिरी जिल्ह्याशिवाय बाकीचे भागांची पर्जन्य चांगला पडत असला ह्मणजे स्थिति चांगली असते. रत्नागिरी जिल्ह्यांत मात्र जमिनीपासून लोकांस पुरेसें धान्य उत्पन्न होत नाहीं.

अजमीर मेरवाड—या प्रांतांत पर्जन्य नेहमीं कमी पडतो व फार वेळां

तो मुळींच पडत नाहीं असेंही होतें. तसें झालें म्हणजे पीक व चारा होत नाहींत इतकेंच नाहीं, तर पिण्याचे पाण्याचेंही दुर्भिक्ष होतें. सन १८९१-९२ सालचे पूर्वींचे १० वर्षांत पहिलीं सहा वर्षें चांगलीं गेलीं व त्या सालांत पुष्कळ धान्य परदेशांस जात असे. त्याचे पुढील ४ सालांत या प्रांतांत परदेशांतून धान्य आणावें लागलें. या दहा सालांत अजमीरची वस्ती १७½ टक्के व मेरवाड्यांतील वस्ती १८¼ टक्के वाढली आहे. अजमीर प्रांतांत दर एकरास सारा रु. १-८-९ व मेरवाड्यांत रु. २-२ पडतो. पर्जन्याचे कमताईमुळें, व लग्नकार्यें व उत्तरविधि यांचे संबंधानें खर्च फार करण्याची वहिवाट असल्यामुळें शेतकरी लोक कर्जबाजारी आहेत. या प्रांतांत मोठाल्या इष्टेटी एकेका मालकाच्या असून, ते त्या कुळांस देतात व त्या कुळांवर धारा फारच जबर असतो. जमीनदार लोकांच्या इष्टेटीही सावकाराकडे जाण्यास सुरुवात झालेली आहे; या प्रांतांत आगगाड्या पुष्कळ असल्यामुळें धान्याच्या किमती फारशा चढत नाहींत. मेरवाडा प्रांतांतील रयत अजमिरांतील रयतेपेक्षां थोडी बरी आहे, तरी त्या लोकांसही कर्ज काढण्याचे प्रसंग फार येतात.

कुर्गप्रांत--या प्रांतांत पर्जन्य पुष्कळ व नियमानें पडतो; उत्तर भागांत सुमारें १३६ इंच व दक्षिण भागांत सुमारें ७० इंच पडतो. हा प्रांत अगदीं डोंगरी असल्यामुळें सगळीकडे एकसारखी शेतकी होत नाहीं. ठिकठिकाणीं जमीन असेल तेथें भाताचें व काफीचें पीक होतें. वेलदोड्याचें पीक जंगलाचे प्रदेशांत होतें. या प्रांतांत शहरें फार थोडीं आहेत व तींही अगदीं लहान आहेत. लोकवस्तीची वाढ फार कमी दिसते, कारण काफीचे लागवडीचे कामासाठीं आलेले लोक सर्व सालभर या प्रांतांतच न राहतां काम सरतांच परत जातात. सन १८९१ सालचे मनुष्यगणतीचे वेळीं हे सर्व मजुरदार लोक परत आपले देशास गेले होते. यामुळें लोकसंख्या कमी भरली. या प्रांतांतील कायमची लोकवस्ती १६ पासून २२ टक्केपर्यंत वाढली आहे असें दिसतें.

पिकें--या प्रांतांतील मुख्य पिकें तांदूळ, काफी, व वेलदोडे हीं आहेत. सन १८८२ पासून १८९२ चे दरम्यान खाण्याचीं धान्यें लावण्याचे जमिनींत कांहीं वाढ झालेली नाहीं; इतर पिकांचे जमिनींत २९ टक्के वाढ झाली आहे. तांदुळाचे पीक होतें तें कायमचे रहिवाशी लोकांस पुरेसें होतें. परदेशांहून आलेले लोकांसाठीं बाहेरून पुष्कळ धान्य आणावें लागतें. काफीचे पीक करण्यास युरोपियन लोकांनीं सुरुवात केली, परंतु आतां तिची लागवड सर्व लोक करतात. हें पीक हवापाणी, रोग, वगैरे अनेक कारणांनीं कमीजास्त होतें.

जमीनधारण करण्याची पद्धति—या प्रांतांत रयतवारीची पद्धत चालू

असून सारा दर एकरास २ $\frac{१६}{१००}$ रुपये पडतो. या प्रांतांत कांहीं जमीन करणारे लोकांस लष्करी किंवा पोलिसची नौकरी करावी लागते, व असे लोकांकडे निम्मे साऱ्यानें जमिनी चालतात.

रस्ते व व्यापार—या प्रांतांत आगगाड्या नाहींत. गाडीरस्ते मात्र पुष्कळ झाले आहेत. लोकांची राहण्याची तऱ्हा ही सुधारली आहे. मीठ, दारू, व परकी कपडा यांचा खप वाढला आहे.

कर्जबाजारीपणा—चैनीनें राहण्याची संवय वाढल्यापासून कर्ज काढण्याची प्रवृत्ति, व दारूचा प्रसार हीं वाढत आहेत; या कारणानें एखादे सालीं पीक चांगलें आलें नाहीं तर कर्ज काढल्याशिवाय तसे लोकांचा निर्वाह लागत नाहीं. पाऊसपाण्याची वगैरे स्थिति चांगली असल्यानें जमीन करणारे लोक आळशी राहतात. जमिनीची वांटणी होऊं नये असा १८५८ सालीं कायदा झाला आहे; तरी आपसांत वांटण्या नेहमीं होतात; व त्यापासून जमिनीचे लहान लहान तुकडे होऊन जमीनदार लोकांची सुधारणा होण्यास अडचण होते.

धंदे व मजुरी—दसरे प्रांतांतून काफीचे बागांत काम करण्यासाठीं त्या प्रांतांत ४५ हजारपासून ६० हजारपर्यंत मजूरदार येतात; या लोकांस मजुरी ही चांगली मिळते. कुर्गचे कायमचे राहणारे मजूरदार भातशेतांतच गुंतले जातात. कारागीर लोकांची संख्या मोठी नाहीं, त्यापैकीं कोष्टी लोकांची स्थिति वाईट झाली आहे; हवा चांगली, जमीन चांगली, लोक वस्ती पातळ, असें आहे तरी, शेतकरी वर्गाची स्थिति चांगली नाहीं. काफीचें पीक करण्याकडे या लोकांचें जास्त लक्ष लागलें आहे हें एक तशी स्थिति होण्यास कारण आहे; तें असें कीं, काफीचें पिकापासून जरी चांगला नफा होतो तरी तें पीक चांगलें येणें फार अनिश्चित असतें. जमिनीची वांटणी फार होते व लोक चैनी व निरुद्योगी आहेत हीं त्यांच्या वाईट स्थितीचीं कारणें आहेत.

मद्रास इलाखा—मद्रास इलाख्यांतील कांहीं भागांत पर्जन्य नेहमीं कमी पडतो; कांहीं भागांत पर्जन्याची कधींच तूट पडत नाहीं; पूर्वेकडील भागांत पर्जन्य बहुतकरून चांगला असतो, तरी कधीं कधीं त्या भागांतही त्याची तूट पडते. सन १८९१ सालचे मोजणीवरून असें दिसतें कीं सन १८७६-७७ चा दुष्काळ ज्या भागांत पडला होता त्या भागांत लोकवस्तीची वाढ शेंकडा वीस टक्के झाली आहे व या भागांतील रयत दुष्काळांत जी परागंदा झाली होती ती सर्व परत आली आहे. इतर भागांत लोकवस्तीची वाढ शेंखडा ११ $\frac{१}{२}$ टक्के झाली आहे.

शेतकी व सारा—या प्रांतांत सुमारें $\frac{1}{3}$ भागांत कायमचे साऱ्याची पद्धति चालू आहे; त्या भागांतील लागवडी जमिनीसंबंधानें माहिती मिळत नाहीं. त्या जमीनदार व इनामदार लोकांची स्थिति इतर प्रांतांतील त्यांचे बंधुवर्गाहून भिन्न नाहीं.

सन १८९१-९२ चे पूर्वींचे चाळीस वर्षांत शेतकीची स्थिति किती सुधारली, हें पाहतां असें दिसतें कीं, ज़िराईत शेती तिसरे हिशानें वाढली आहे, सरकारी पाटबंधाऱ्यापासून होणारी शेती दीडपट वाढली आहे; व विहिरीपासून होणारें बागाईत २ $\frac{1}{2}$ पट वाढलें आहे. बागाईत वाढल्यानें दोन पिकें घेण्याची वहिवाट गेले दहा सालांत पुष्कळ वाढली आहे. १० वर्षांचे पूर्वींचे प्रमाणानें आतां दुप्पट जमिनींत दोन पिकें होतात. खाण्याची धान्यें ७९ पासून ८० टक्के पर्यंत जमिनींत होतात; सन १८८१ चे मानानें हीं पिकें होणारे जमिनींची वाढ एकपंचमांशावर झाली आहे. गळिताचे धान्याचे लागवडीची जमीन दुप्पट वाढली आहे, व कापसाची लागवड सुमारें $\frac{1}{3}$ जास्त वाढली आहे. शेतकीचीं जनावरें व नांगर-गाड्या वगैरेंची चांगली वाढ झाली आहे. या प्रांतांत लागवडीलायक जमीन पुष्कळ शिलक आहे व ती लागवडीस असलेले जमिनीपेक्षां हलकी नाहीं.

जिराईत जमिनीपासून साऱ्याचे चौपट भाडें येतें व कांहीं जमिनींचें भाडें तर दसपटही येतें. जमिनीच्या किंमती पूर्वींपेक्षां जास्त येतात. विहिरीही वाढत आहेत.

रस्ते.—सन १८५२ सालीं सुमारें तीन हजार मैल रस्ता साफ केलेला असा होता, आतां त्याची लांबी २५ हजार मैल आहे. याशिवाय १९०० मैल आगगाडीचा रस्ता आहे व १५०० मैल कालव्यांतून जातां येतां येतें. रस्ते वाढल्यामुळें व्यापारांतही चांगली वाढ झाली आहे.

धान्याच्या किंमती—जिकडे तिकडे रस्ते झाल्यानें सर्व प्रांतांत किमती साधारणपणें सारख्या राहतात. गेले चाळीस वर्षांत धान्याच्या किमती दुप्पट झाल्या आहेत.

मजुरी.—मजूरदार लोकांस मजुरीबद्दल बहुतकरून धान्यच मिळतें, व कनिष्ट जातीचे लोकांपेक्षां वरचे जातीचे लोकांस मजुरी जास्त मिळते. याचें कारण वरचे जातीचे लोकांस शेतकऱ्याचे घरांतही नौकरी करण्यास सांपडते, तशी कनिष्ट जातीचे लोकांस सांपडत नाहीं. गोदावरी व कृष्णा यांचे दुबेळक्यांत दक्षिण व उत्तर हिंदुस्थानांतून मजूरदार येतात. गेले वीस वर्षांचे मानानें पाहतां मजूरदारांची स्थिति सुधारलेली दिसत नाहीं. शहरांत मजुरीचे

दर वाढले आहेत. घरगुती चाकरीचे लोक, सुतार, सोनार वगैरे कारागिर लोक, यांचे मजुरीचे दर वाढले आहेत. इतर कारागिरांचे धंदेही चांगले चालतात. कोष्ट्यांची स्थिति मात्र फार वाईट आहे, तरी ती इतर प्रांतांतील कोष्ट्यांचे स्थितीइतकी वाईट नाहीं. तलम कापड, बायकांचीं लुगडीं वगैरे माल ते तयार करतात व त्याचा खपही चांगला आहे.

एकंदरींत पर्जन्य चांगला पडतो असे भागांतील रयतेची स्थिति चांगली आहे. तो बरोबर पडत नाहीं असे भागांत पीक गेलें तरी रयतेची स्थिति वाईट होत नाहीं. अशी आपत्तीचीं सालें लागोपाठ दोन तीन आलीं तर त्यापासून सुधारणेस मोठा व्यत्यय येतो.

लोकमत–येथपर्यंत या भागांत हिंदुस्थानांतलि लोकस्थिती संबंधानें दशवार्षिक रिपोर्टांत जे आभिप्राय प्रदर्शित केले आहेत त्यांचा सारांश दिला. आतां त्याच विषयावर लोकमत काय आहे तें अगदीं थोडक्यांत देतों.

इंग्रजांचा अंमल या देशांत सुरू होण्याचे पूर्वीं समाजाची घटना हल्लींप्रमाणें एकदेशी नव्हती; तेव्हां सर्व धंदे सारखे चांगले चालत असलेमुळें ती फार व्यवस्थेशीर होती. शेतकी जरी उदरनिर्वाहाचें मुख्य साधन होती तरी इतर धंदेही चांगले चालत असत व या देशास जरूर ते पदार्थ सर्व येथले येथेंच पैदा होत असत; व तसेंच भांडवल व नफा देशांतले देशांतच खेळतीं असत. हल्लीं ही सर्व स्थिति पालटली आहे. देशातील सर्व उद्योगधंदे बसले आहेत, व त्यामुळें कारागीर व धंदेवाले लोक पंगू व निर्धन झाले आहेत व त्यांची इतर कोणतेही राष्ट्रास ठाऊक नाहीं अशी विलक्षण व सार्वजिक निकृष्ट स्थिति झाली आहे. ह्या निकृष्टावस्थेचीं कारणें अशीं देतां येतील:– (१) देशांत सर्वत्र दारिद्र्य वाढत चाललें आहे. (२) कानिष्ठ प्रतीचे लोक विपद्ग्रस्त झाले आहेत. (३) साधारण प्रतीचे लोकांत धनसंचय होत नाहीं व त्यांस द्रव्याचे अभावामुळें प्रसंग पडला असतां टिकाव धरण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें आहे.

या विषयाचा विचार करतांना प्रथमतः लोकांचे प्राप्तिबद्दल विचार केला पाहिजे. या देशांत प्राप्ती किती होते याबद्दल मि. दादाभाई नवरोजी यांनीं हिशेब करून ती दरसाल रु. २० पडते असें काढलें आहे. सन १८८२ सालीं सरकारांनीं केलेले चौकशींत सालास दरमाणशीं प्राप्ती रु० २७ पडते असें निष्पन्न झालें व त्यावरून हिंदुस्थानचे फडणीस यांनीं कर देणारे लोक फारच गरिबींत आहेत असें कायदे कौन्सिलांत बोलून दाखविलें. हें प्राप्तीचें मान इतर सुधारलेले देशांचे प्रमाणानें फारच कमी आहे. या देशांतील लोकांपेक्षां विलाय-

तेंतील लोकांची प्राप्ती वीसपट जास्त आहे व रशियांतील लोकांची प्राप्ती देखील चौपट आहे.

प्राप्तीचे विचारानंतर पुढें विचार करण्याची गोष्ट ह्मणजे त्या प्राप्तीपैकीं खर्च किती होतो ही आहे. दरमाणशीं खर्च किती लागतो हें काढण्यास साधनें नाहींत, तरी तुरुंगांत कैद्यास व लष्करांत शिपायांस व त्यांचे नौकरांस जो खर्च लागतो त्यावरून माणशीं खर्च किती लागत असेल याबद्दल ठोकळ अनुमान काढतां येण्यासारखें आहे. तुरुंगांत दरमाणशीं सालाचे रु० २३ लागतात, लष्करांत दर शिपयास रु. ४२ व त्यांचे नौकरांस माणशीं रु. ३० खर्च लागतो; फ्यामीन कमिशनचे वेळीं सर. पील साहेबांनीं माहिती मिळविली होती तीवरून शेतकऱ्यांस माणशीं रु. ४० पोटास लागतात असें त्यांस दिसून आलें. हा खर्च पूर्ण वयास आलेले मनुष्यास लागणारा आहे, तेव्हां मोठें व लहान वयाचीं मनुष्यें धरून सरासरीनें दर माणशीं, पूर्ण वयास आलेले मनुष्यास लागेल त्याचे पाऊणपट खर्च लागेल असें धरलें ह्मणजे चालेल. या मानानें वरचे खर्चाचे तीन चतुर्थांश केले तर तुरुंगातील कैद्याचे खर्चाचे मानानें माणशी रु. १७·२, लष्करांतील शिपायाचे मानानें रु. ३१·५ व त्याचे नौकरांचे मानानें रु. २२·५ लागतील असें दिसतें. वर प्राप्ती सांगितली आहे तींतून वजा करण्यास शिपाई किंवा त्यांचे नौकर यांचेच मानाचा खर्च घेणें शक्य आहे; आपले अजमासासाठीं नौकराचे मानानें ह्मणजे दरसाल माणशीं रु. २२·५ लागतील असें घेऊं. या खर्चाशिवाय सरकार देणें माणशी रु. २.८ किंवा रु. २.१० पडतें. कपड्यालत्त्यास माणशी दीड रुपया, व किरकोळ खर्च आठ आणे तरी लागतो. हे सर्व खर्च वजा जाऊन माणशीं शिलक काय ती तीनच आणे राहते. शेतकीचीं आउतें झिजतात, गुरें मरतात, त्याबद्दल खर्च लागतो, घरदारास, सामान सुमानास, व लग्नकार्यांस खर्च लागतो, या खर्चाचा वरचे हिशेबांत विचार केला नाहीं; हे खर्च वजा केले तर शिलक किती राहील ती उघडच आहे. ही शिलक इतर सुधारलेले राष्ट्रांचे शिलकेचे पासंगासही लागत नाहीं. वर जे खर्चाचे मान धरलें आहे तें अगदीं कमींत कमी धरलें आहे; अशा प्रकारच्या खाण्यानें शरीराची आरोग्यता व काम करण्यास शक्ति ती कशी राहणार !

सन १८८८ सालीं हिंदुस्थान सरकारांनीं लोक स्थितीबद्दल तपास करून अभिप्राय दाखल केला आहे तो असा कीं, या देशांतील सर्व भागांत ज्यांचा चरितार्थ हातावरचे हातावर चालतो, जे नेहमीं कर्जांत बुडालेले असतात, ज्यांचे जवळ शिलक कांहीं रहात नाहीं व महर्गता झाली कीं ज्यांचे हाल होऊं लागतात, असे लोक पुष्कळ आहेत. सर चार्लस ईलियट

साहेब ह्मणतात कीं शेतकऱ्यांपैकीं निम्मे लोकांस पोटभर अन्न ह्मणजे कसें तें माहीत नसतें. सर हंटर साहेबांचा अभिप्राय असा आहे कीं, चार कोटी लोक अपुरे अन्नावर असतात. एकंदरींत लोकांची प्राप्ती अगदीं थोडी आहे, त्यांस खर्च करण्यास साधनें नाहींत, शिलकेचें मान अगदींच मानसिक, अशी स्थिति आहे ; पर्जन्याची आप्ति झाली कीं असे स्थितीचे लोकांचे फारच हाल होतात. लोकांस चांगले प्रकारें राहण्याचें सामर्थ्य नसलेमुळें त्याचा परिणाम त्यांचे शरीरसामर्थ्यांवर होत आहे व वाईट अन्नावर निर्वाह करावा लागत असलेमुळें फार लोक रोगोद्भव होऊन मृत्युमुखीं पडतात. या देशांतील मृत्यूचें प्रमाण युरोपांतील सुधारलेले सर्व राष्ट्रांपेक्षां शेंकडा २५.३० टक्के जास्त आहे. यापेक्षां संस्थानिकांचे ताब्यांत असलेले मुलखांतील शेतकऱ्यांची स्थिति चांगली आहे. फयामीन कमिशनचे चौकशीचे वेळीं सर. पील साहेबांनीं इंग्रजी अमलांतील व संस्थानिकांचे अमलांतील शेतकऱ्यांचे प्राप्तीचा अजमास केला होता त्यावरून ही गोष्ट सिद्ध झाली आहे.

अशी स्थिति होण्यास काय कारणें झालीं असावीं, अंतर्यामीं कोठें बिघड झाला आहे कीं ज्याचेमुळें हे परिणाम होत आहेत, हे प्रश्न स्वाभाविक रीतीनें पुढें उभे राहतात. ही स्थिति होण्यास बालविवाहादिक कारणांनीं लोकसंख्या फार झपाट्यानें वाढते हें कारण आहे असें पूर्वी प्रतिपादन करण्यांत येत असे, परंतु त्याचे अयथार्थत्व खानेसुमारीचे दाखल्यावरून स्थापन झालें आहे. या संबंधानें पहिले भागांत कांहीं माहिती दिली आहे, तेव्हां त्याबद्दल फिरून येथें विचार करण्याचें कारण नाहीं ; तरी साधारण लोक जास्त वाढतात असें ह्मणण्यापेक्षां, लोकांचे उपजीवनाचीं साधनें कमी उत्पन्न होतात हें ह्मणणें जास्त सयुक्तिक दिसेल. दुसरा आक्षेप असा आहे कीं अशी वाईट स्थिती असण्यास लोकांचा उधळेपणा हा कारण आहे. उधळेपणा व मितव्यय यांस कांहीं ठरीव प्रमाण नाहीं. शेतकरी कांहीं प्रसंगीं प्राप्तीचे मानानें जास्त खर्च करतात हें जरी खरें आहे तरी, तो खर्च चांगले प्रकारानें राहणारे लोकांचे मानानें विशेष असा कांहीं होत नाहीं. खर्च जास्त होतो असें ह्मणण्यापेक्षां प्राप्ती हवी तितकी नाहीं हें ह्मणणें जास्त सयुक्तिक आहे. हिंदुस्थानांत शेतकीवर मजुरी करणारे लोकांस विलायतेस किंवा फ्रान्सांत जितकी मजुरी मिळते त्याचे द्वादशांशानें मिळते. या देशांतील कारागीर लोक उधळे, अविचारी सुस्त आहेत असें पूर्ण माहिती नाहीं असे लोक ह्मणतात ; परंतु हें कांहीं खरें नाहीं. कारागीर मोठें स्वकार्यदक्ष, काटकसरीनें खर्च करणारे, अल्पसंतुष्ट, दीर्घोद्योगी असे आहेत ; असें असून ही इतर देशांतले पेक्षां

१० मजुरीही त्यांस पडत नाहीं अशी स्थिति आहे, परंतु त्यांत ह्यांचा कांहीं दोष दिसत नाहीं.

या लोकांचे उत्कर्षाचे आड ज्या गोष्टी येतात त्या ह्या आहेत :—त्यांचेबरोबर परकीयांची फार जबर चढाओढ चालू आहे व तींत या देशांतील लोकांचा टिकाव लागत नाहीं, यामुळें इकडील उद्योग धंदे बसत आहेत ; ते धंदें परकीयांचे हातीं जात आहेत व धंदेवाले व कारागीर लोक मोडकळीस येत चालले आहेत. परकीयांशीं चढाओढ करून टिकाव धरण्यासारखी त्यांस अनुकूलता नाहीं. हे प्रतिस्पर्धा करणारे परकीय लोकही सामान्य नाहींत, त्यांस भांडवल, यंत्रें, शास्त्रीयज्ञान व जुटीनें व व्यवस्थेनें काम करण्याची संवय या गोष्टींची अनुकूलता आहे. यांपैकीं कोणतेच गोष्टींची या देशांतील कारागिरीस अनुकूलता नाहीं. एकंदरींत या दोघांची चढाओढ ही राक्षस व मनुष्य यांतील लढाईसारखी आहे.

कारागीर लोकांबरोबर दोन प्रकारानें चढाओढ होत आहे. एक परराष्ट्रीयांची–परदेशांतून तयार माल आल्यानें तसा माल या देशांत तयार करणारे लोक उद्योग रहित् होऊन बसले आहेत व आतां कारागीर लोकांस कच्चा माल पैदा करून विकावा हेंच काम राहिलें आहे. देशांतील चढाओढ– या देशांत परकीय तऱ्हेचे कारखाने चालू झाल्यानेंही इकडील कारागिरांचे धंदे बसत जात आहेत; या कारखान्यांत लोकांस मजुरी मिळते एवढाच कायतो फायदा आहे. ही परकीयांकडून होत असलेली चढाओढ कमी होण्याचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं. जसजशी हिंदुस्थानांत आगगाडी प्रसार पावत आहे, व तिचे योगानें व्यापारास सोय होत आहे, तसतशी परकीय व्यापाराची उन्नति व या देशांतील कारागिरांची अवनति होत चालली आहे व त्यांस परकीयांचे बरोबर टक्कर मारण्याचें सामर्थ्य नाहींसें होत जात आहे. या लोकांची स्थिति सुधारण्यास सरकारची मदत पाहिजे, परंतु ज्या शास्त्रीय तत्वांस अनुसरून (तीं या देशास उपयुक्त आहेत किंवा नाहींत याचा विचार न करतां) सरकार राज्यव्यवस्था चालवितात त्याचे योगानें परकीय व्यापाऱ्यांसच उत्तेजन मिळतें.

याप्रमाणें अर्धशतकापेक्षां जास्त कालस्थिति असल्यानें, या देशावर परिणाम असा झाला आहे कीं, (१) पूर्वी जसे सर्व धंदे व्यवस्थितपणानें व प्रमाणशीर चालत असत तसे चालत नाहींसे झाले, (२) एकामागून एक धंदे परदेशीयांचे हातीं गेले, (३) व या देशांतील लोकांस स्वतःच्या उद्योगानें व श्रमविभागानें व्यापारधंदे करून आपली स्थिति सुधारण्यास आशा नाहींशी झाली. एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ८६ लोक शेतकीवर, १२ धंद्यावर व २

व्यापारावर निर्वाह करतात. (हें मान सन १८८१ चे खानेसुमारीप्रमाणें आहे. सन १८९१ चे खानेसुमारींत कामकरी व त्यांचेवर अवलंबून असणारे लोक यांची संख्या सन १८८१ चे खानेसुमारींत दाखविलेप्रमाणें वेगळी दाखविलेली नाहीं, यामुळें पूर्वीचे खानेसुमारीचे व हल्लींचे खानेसुमारीचे आंकड्यांची तुलना करून पाहण्यास मार्ग नाहींसा झाला आहे. हल्लींचे खानेसुमारीप्रमाणें कोणते धंद्यांत किती लोक आहेत त्याचें प्रमाण या भागाचे प्रारंभीं दिलेंच आहे; त्याप्रमाणें शेतकी व शेतकीची मजुरी करणारे लोक शेंकडा ५९.७९ व शेतकीशीं संबंध असणारे इतर धंदेवाले लोक शेंकडा २५·०५ आहेत असें दिसतें. व्यापारांत शेंकडा १.६३ आहेत.) यावरून हिंदुस्थान देश हा प्राधान्येंकरून शेतकरी देश आहे असें ह्मणणात तें खरें आहे. पूर्वी इतर धंद्यांत असलेले लोक आतां शेतकीवरच पडल्यामुळें शेतकीची कांहीं वृद्धि झाली आहे, परंतु ती वृद्धि स्वाभाविक नसून इतर धंदे बसल्यामुळें झाली आहे; शेतकीवरच फार लोकांचा मारा पडल्यामुळें प्रत्येक मनुष्यास लागवड करण्यास शेत फार थोडें मिळतें व त्यामुळें नफ्याचें मानही कमी पडतें. इंग्लंडांत व्यापारधंदे व शेतकी यांत लोक कशा प्रमाणानें आहेत तें पुढील आकड्यांवरून दिसून येईल. शेतकींत शेंकडा १४·६, कारखान्यांत ३०·४, इतर धंद्यांत ५५ असे आहेत. यावरून व्यापार व धंद्यांत व शेतकींत असलेले लोकांचें प्रमाण दोन्ही देशांत किती भिन्न आहे तें दिसून येतें.

याप्रकारची स्थिति होण्यास इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वी जीं आपसांत युद्धें चालू होतीं तीं अंशतः कारण आहेत; तरी पुढें हा देश इंग्रजांचे ताब्यांत आल्यावर ही स्थिति सुधारण्यास योग्य प्रयत्न त्यांचेकडून झाले नाहींत हेंही निर्विवाद आहे. इंग्रजांचें राज्य या देशांत झाल्यावर या देशाचें व युरोप व अमेरिका वगैरे खंडांतील लोकांचें दळणवळण सुरू झालें. परंतु या देशांतील कारागिरांस यांत्रिक ज्ञान नसून त्या देशांतील लोक कलांत निष्णात असलेमुळें त्यांचे बरोबर या देशाचा टिकाव लागला नाहीं. त्यावेळीं या देशांतील उद्योगधंदे व व्यापारयंत्रादि उपकरणांचे अभावामुळें युरोपांतील देशांचे मानानें हा बाल्यावस्थेंत होता ह्मणून त्यास टक्कर देण्यासारखें सामर्थ्य येईपर्यंत सरकारचे मदतीची जरूर होती; परंतु ती त्यांजकडून मिळाली नाहीं इतकेंच नाहीं तर " व्यापाराची सार्वत्रिक मोकळीक " या अर्थशास्त्रांतील तत्वाचा त्यांनीं अंगिकार केल्यानें व आगगाड्यांचा वगैरे प्रसार करविल्यानें अन्यदेशीय व्यापारासच त्यांचेकडून मदत झाली. परदेशीय बलवान प्रतिस्पर्ध्यांशीं शस्त्रहीन व एकाकी सामना करण्याचें हिंदुस्थानचे लोकांचे आंगावर पडल्यामुळें त्यांत त्यांचा चुराडा झाला व ते व्यापार धंद्यांत पुढें

न येतां कोपऱ्यांत पडल्यासारखे झाले आहेत. अजून देशी व्यापार व कलाकौशल्यांचें पूर्ण निर्मूलन झालें नाहीं तों पर्यंत त्यांची स्थिति सुधारण्यास प्रयत्न झाल्यास उपयोग होण्यासारखा आहे.

आतां परकीयांचे हातीं इकडील धंदे किती गेले आहेत तें पाहण्याचें आहे. (१) परकीयांचा प्रवेश ज्यांत विशेषसा झाला नाहीं असा धंदा फक्त शेतकीचाच उरला आहे. या धंद्यांत ही इंग्राजांनीं जमीनदाऱ्या खरेदी करून पडावें असें सर जे. केअर्ड यांनीं सुचविलें आहे, तेव्हां या बाबतींत ही भीति बाळगण्यास कारण झालें आहे. शिवाय या धंद्याचीही स्थिति उमेद येण्यासारखी नाहीं. कांहीं भाग शिवाय करून सर्व प्रांतांत लागवडीस येण्यासारखी सर्व जमीन लागवडीस आली आहे. मध्यप्रांत, सिंध, ब्रह्मदेश व पंजाब या प्रांतांत मात्र ह्मणण्यासारखी लागवडी लायक जमीन शिलक आहे. साधारणपणें सर्व प्रांतांत लागवडीस येण्यासारखी जमीन शिलक आहे ती हल्लीं लागवडीस असलेले जमिनीचे प्रतीची नाहीं. यापुढें पड जमीन जास्त लागवडीस असल्यानें-ही तोटेच आहेत; कारण त्यामानानें गुरचरणीस जमीन कमी राहत जाईल व जंगल ही कमी होत जाईल. इतर धंदे नाहींसे होऊन शेतकीकडे लोकांची ओढ झाल्यानें प्रत्येक कुळास जमीन फार थोडी पडते व तिचे पासून उत्पन्न होतें त्यांतून परदेशास धान्य रवाना होऊन बाकी शेतकऱ्याचे खर्चास पुरेसें धान्य शिलक रहात नाहीं. शेतकीवर तरी सर्व मजुरदार लोकांस मजुरी मिळते असें नाहीं. या संबंधानें सर जेम्स केअर्ड, फ्यामिन कामिशनपैकीं एक सभासद असें ह्मणतात कीं– " दुसऱ्या देशांचे मानानें हिंदुस्थान देश पूर्ण शेतकीवर अवलंबून राहणारा आहे, परंतु वस्तीचे मानानें लागवड फार कमी आहे. इंग्लडांत व्यवस्थित रीतीनें लागवड होते तेथें एक चौरस मैलास बायका, मुलें, पुरुष मिळून ५० इसमांस काम मिळतें; हिंदुस्थानांत एक चौरस मैलास त्यांच्या चौपट ह्मणजे दोनशें मनुष्यें धरलीं तरी एकंदरीपैकीं एक तृतीयांश लोकांसच काम मिळतें." "काम करण्याचे वेळीं ह्मणजे दिवसां, हिंदुस्थानांत जितके आळशी लोक दृष्टीस पडतात तितके दुसऱ्या कोणत्याही देशांत दृष्टीस पडत नाहींत; रस्ते, सरकारी कचेऱ्या, चौक वगैरे ठिकाणीं जिकडे तिकडे उनाड व आळशी लोक आहेतच; आगगाड्यांचे स्टेशनावर देखील तमासगीर उभे असतात. दिवसां कोणतेही खेड्यांत जा, तुमच्या भोंवतीं आळशी लोक जमतील; अशी स्थिति असण्यास कारण लोकांस काम नसणें या शिवाय काय असणार ? " या साहेबांचे अजमासाप्रमाणें शहरें शिवाय करून बाकीचे प्रांतांत जे लोक राहतात त्यांपैकीं $\frac{२}{३}$ लोक ह्मणजे १२ कोटी लोकांस उद्योग मिळत नाहींत;

यावरून किती लोकांचें सामर्थ्य व्यर्थ जात आहे याची कल्पना होण्यासारखी आहे. या निरुद्योगीपणाचा परिणाम असा होत आहे कीं, लोकांत आलस्य भरत आहे व तो दुर्गुण एकदां शिरला म्हणजे निघण्यास फार जड जातें. वाढत जाणारे लोकसंख्येस अन्नसंग्रहाची वाढ कशी होईल हा प्रश्न तर महत्त्वाचा आहेच, परंतु यापेक्षांही रिकामे लोकांस कामधंदा कसा मिळेल हा प्रश्न विशेष महत्वाचा आहे. शेतकी वाढण्यास विशेषशी सवड नाहीं, तेव्हां आतां पिकें करण्याची तऱ्हा पालटून जमिनीपासून जास्त उत्पन्न येईल असें करून शेतकीची वाढ केली पाहिजे. देशाचे बरेच भागांत पर्जन्याचें मान कमी आहे व त्यामुळें दुष्काळ वारंवार पडतात. व त्यांचा परिणाम लोकांवर विशेष जबर होतो तो फार लोक कामधंद्यावांचून रिकामे असल्यामुळें होतो, असा फ्यामिन कमिशनचा अभिप्राय आहे. शेतकी वाढणें ती बागाईत वाढून झाली पाहिजे. ज्या भागांत पर्जन्याचे अनिश्चितपणामुळें जमिनीस कृत्रिम उपायांनीं पाण्याची सोय होणें जरूर आहे असे जमिनीपैकीं सुमारें एक पंचमांश जमिनींत बागाईत होत आहे. यासंबंधानें ही लोकांचा स्वपराक्रम कांहीं दिसत नाहीं; बागाईत होत असलेले जमिनीपैकीं कायते जमिनींत खासगी विहिरींतून पाणी मिळत आहे; बाकीचे सर्व बागाईत सरकारांनीं प्राप्त करून दिलेले पाण्यानें होत आहे. जमिनींतून पिकें काढून घेतलीं व तींत खत वगैरे घातलें नाहीं तर तिचा कस कमी होत जातो. जमिनीची सुधारणा करण्यास शेतकरी लोकांस सामर्थ्य नाहीं व सुधारणा करण्यास त्यांस उमेद येण्यासारखीं कांहीं कारणें नाहींत. सुधारणा केल्यानें जो फायदा होतो तो सर्व आपल्यास अनुभवण्यास सांपडेल असा भरंवसा असल्याशिवाय कोणासही ती करण्यास इच्छा होणार नाहीं. तसा फायदा पूर्णपणें मिळण्याचा संभव किंवा भरंवसा साऱ्याचे दर जेथें वारंवार पालटणार तेथें राहणें कठीण आहे. ज्या प्रांतांत जमिनदारी पद्धती चालू असून जमिनीवरील स्वत्व खासगी इसमांचें आहे असे बंगाल प्रांतांत जमीन करणारे फार झाल्यानें त्यांस लहान लहान पट्या मिळतात व चढाओढीनें साराही फार चढतो; याचाही परिणाम वरचे सारखाच होतो. या कारणांमुळें जमिनीची सुधारणा होण्यास हरकत होते. एकंदरींत शेतकी जी परकीयांचे हातीं न जातां शिलक राहिली आहे, तिची ही स्थिति समाधानकारक नाहीं.

(२) खाणींचा सर्व धंदा परकीयांचे हातीं आहे. पूर्वी तो धंदा करणारे धावड वगैरे लोक होते ते सर्व नाहींसे झाले आहेत. कोणतेही धंद्यांत परकीयांस चढा ओढीची भीति राहिली नाहीं, कारण इकडील लोकांस ते चालवि-

ण्यास जें ज्ञान व ऐपत पाहिजे तीं अनुकूल नाहींत. कोळशाच्या खाणी सर्व परकीयांचे हातीं गेल्यास, हल्लींचे मन्वतरांत देश सधन होण्यास जें एक मुख्य साधन कोळसा तो नाहींसा होईल. (३) व्यापारासंबंधानें पाहूं गेलें असतां तो मूळ परकी यांनींच वाढविला असल्यामुळें, तो सर्व त्यांचेच हातांत आहे; फक्त एक दशांश व्यापार मात्र एतद्देशियांचे हातांत आहे. परदेशांस जलमार्गानें माल नेण्या आणण्याचीं यानें ही परदेशीय लोकांचींच आहेत. देशांतले देशांत व्यापार कसा चालतो तें पाहूं गेलें असतां असें दिसतें कीं, आगगाड्यांचे द्वारेंच हा सर्व व्यापार चालतो; त्या चालू करण्यास भांडवल बहुतांशीं परदेशीयांचेंच आहे, त्याचें व्याज व होणारें उत्पन्नही सर्व परकीयांसच मिळतें. बंदरोबंदरीं व्यापार करणारे परदेशीय व्यापारी देशांतही व्यापार करूं लागले आहेत व या देशांतील लोकांत एकीचा अभाव व भागीनें व्यापार करण्याचें अज्ञान आहे या मुळें त्यांचा (परकीयांचा) व्यापार वाढत आहे. या संबंधानें जास्त विचार पुढें करण्याचा आहे. (४) परकीयांचे चढाओढीचा परिणाम विशेषतः इकडील सर्व प्रकारचे कारागिरांचे धंद्यावर झाला आहे. परकीय तयार माल इकडे येण्याचे योगानें इकडील धंद्यांचा ऱ्हास झाला आहे व त्या तयार मालाचा व्यापार जसा वाढत गेला त्या प्रमाणानें देशी कारागिरांचे धंदे बसत गेले आहेत. हे धंदे बसल्यामुळें परकीय लोकांस या देशांत कारखाने काढण्यास मदत झाली आहे. ही दोन प्रकारानें झाली आहे. एक तर इकडील कारागीर लोक मोडले गेल्यानें त्यांचेबरोबर चढाओढ करण्यास कोणी राहिलें नाहीं व दुसरे कारागीर लोक मोकळे झाल्यानें मजुरी स्वस्ती झाली आहे. ह्या परकीय पद्धतीचे कारखान्यांनीं मजुरी मिळते हा एक फायदा आहे, तरी तो फायदा फार थोडे किमतीचा आहे, कारण तसे कारखान्यानें फार कारागीर धंदेवाल्यांचे धंदे बसतात व त्याप्रमाणें मजुरदार वर्गास मजुरीही मिळत नाहीं. या कारखान्यांपासून एक फायदा आहे तो मात्र महत्वाचा आहे, तो असा कीं, परकीयांचे कारखाने इकडे झाल्यामुळें त्यांचे अनुकरणानें इकडील लोक इकडील भांडवल घालून तसे कारखाने काढूं लागले आहेत.

इकडील व्यापारधंदे बुडाल्यानें व ते सर्व परकीयांचे हातीं गेल्यामुळें धंदेवाले व कारागीर लोक मोडकळीस आले आहेत असें वर सांगितलेंच आहे, त्या संबंधानें आतां विचार करण्याचा आहे. धंदे गेल्यामुळें स्थिति मोठी विपरीत झाली आहे—लोक तर वाढत आहेत व त्यांस धंदेरोजगार कमी होत जात आहेत. धंदे कमी झाले तरी त्यांत सुधारणा होऊन थोड्या कामापासून जास्ती प्राप्ती होण्याचें साधन झालें असतें, तर ठीकच परंतु तसें कांहीं झालें नाहीं.

शहरांत जे धंदेवाले लोक आहेत त्यांस साधारणपणें काम मिळतें, परंतु खेडेगांवांतील कारागीर व धंदेवाले लोक यांचें काम गेल्यामुळें त्यांस सालांतून पुष्कळ दिवस मोकळें रहावें लागतें. व्यापारी व दुकानदार यांचें साधारण बरें चालतें. मजुरदार लोकांची स्थिति वाईट आहे, त्यांस शेतकीचे मजुरीशिवाय दुसरा मोठा धंदा राहिला नाहीं व तो धंदा सालांतून कांहीं मुदतच चालतो. बागाइतीवर मात्र सारें साल मजुरी मिळण्यासारखी असते व शेतकरीही सर्व वेळ कामावर राहतात; परंतु जिराईती शेतकी करणारे शेतकरी व मजूरदार हेही सालांतून बरेच दिवस मोकळे राहतात. कांहीं गाडीचा धंदा करतात, परंतु तो फार थोडे लोकांस पुरतो. याप्रमाणें धंदेवाले व मजुरदार लोक काम करण्यास समर्थ असूनही काम नसलेमुळें रिकामे राहतात. एकाच धंद्यांत जास्त लोक झाल्यानें नफ्याचे मान उतरतें, लोकांची उमेद कमी होते व धंदे करणारे लोकांचे आंगचे गुण कमी होतात. धंद्यांत लोक फार झाले एवढीच धंदेवाले व कारागीर लोकांस अडचणीची गोष्ट आहे असें नाहीं त्यांच्या अडचणी अनेक आहेत. त्यांस शास्त्रीय ज्ञान नाहीं, चांगल्या यांत्रिक उपकरणांचें अनुकूल्य नाहीं; त्या अडचणी शेतकरी, सुतार, लोहार, कोष्टी, कुंभार वगैरे सर्व लोकांच्या आहेत; या लोकांची स्थिति वाईट होण्यास दुसरें महत्वाचें कारण ह्मणजे भांडवलाची कमताई हें आहे. भांडवल कमी आहे तें, एक तर देशांत संपत्ति कमी आहे त्यामुळें व दुसरें पतीचे कमताईमुळें. धनसंचय कमी असण्यास इंग्रजांचें राज्य होण्यापूर्वी जो गडबडीचा काळ होता त्यांत धनवित्ताला सुरक्षितपणा अगदीं नव्हता व व्यापारही नीट चालत नसे हें कारण आहे. इंग्रजांचें राज्य झाल्यापासून या देशांतील पैसा विलायतेस फार जात आहे; साधारण अजमासानें देशांत जी निव्वळ शिलक राहते तिचा तिसरा हिस्सा विलायतेस जातो व त्याबद्दल व्यापारी तऱ्हेचा कांहीं मोबदला येत नाहीं. वारंवार दुष्काळ पडतात त्यामुळेंही धनसंचय होण्यास हरकत होते. सरकारी देण्यांतही बरीच रक्कम ह्मणजे निव्वळ शिलक राहते त्यांतील सुमारें निम्मे जाते. द्रव्यसंचय करण्यास समर्थ असे जमीनदार वगैरे मोठाले इष्टेटवाले, जास्त पगाराचे सरकारी नौकर, वकील, डाक्तर, परदेशावरोबर व्यापार करणारे व्यापारी, पेढीवाले, मोठे कारखानदार व चांगले उंची कारागीर हेच आहेत. या लोकांची संख्या लहान आहे. कारागीर व मजूरदार लोकांची व शेतकऱ्यांची स्थिति वर सांगितलीच आहे, त्यांचे जवळ धनसंचय होणें मुळींच शक्य नाहीं. या लोकांस धंद्यांत घालण्यास स्वतःचे पैसे नाहींतच व त्यांस लोकांकडून ही पैसे जबर

व्याज दिल्याशिवाय मिळत नाहींत. भांडवल थोडें, आहे त्याचा उपयोग व्यापारधंद्यांत होत नाहीं; कारण समाईक भांडवलाच्या पेढ्या काढून पत वाढविण्याची वहिवाट नाहीं. या बाबतींत मद्रास इलाख्यांत ब्यांका काढून पैशाची देवघेव करण्याची वहिवाट चांगली सुरू झाली आहे. कारागीर धंदेवाले लोकांसही समुच्चयानें काम करण्याची संवय नाहीं ; त्यांस आश्रय नाहींसा झाला आहे. एकंदरींत देशाची विपन्नावस्था होण्यास उद्योगधंद्यांचा ऱ्हास हेंच एक प्रधान कारण आहे.

येथपर्यंत शेतकी व उद्योगधंदे यांचे संबंधानें देशाची स्थिति कशी आहे तें सांगितलें. आतां व्यापाराचे योगानें देशस्थितीवर कसे परिणाम झाले आहेत त्याबद्दल कांहीं विशेष लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत व ज्यांचेमुळें देशस्थितीवर विशेष प्रकारचे परिणाम झाले आहेत त्या देतों.

चवदावे भागांत व्यापाराची हकीकत दिली आहे, तीवरून व्यापाराची अतिशय वृद्धि झाली आहे व व्यापार सर्व देशांबरोबर होत आहे हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. व्यापाराचे दृष्टीनें ही गोष्ट फार मोठी महत्वाची व अतिशय फायद्याची झाली आहे व ती घडून येण्यास या देशाच्या व्यापारांत निष्णात असा जो इंग्लंड देश त्याशीं संबंध होणें हेंच मख्य कारण आहे ; त्या देशाचे मदतीशिवाय ह्या गोष्टी घडून येण्यास फार काळ लागता. या देशाचा सर्व देशांशीं व्यापाराचे बाबतींत संबंध राहिल्यानें सर्व जगाचे व्यापारांत या देशासही भाग मिळतो. ही गोष्ट राष्ट्रोन्नतीस महत्वाची आहे, कारण कोणतेही देशाची ऊर्जित दशा होण्यास एकलकोंडेपणानें राहून चालत नाहीं. या देशांत फ्री ट्रेडची (अप्रतिहत व्यापाराची) तत्वें लागू असल्यानेंही व्यापारास (फक्त व्यापाराचे दृष्टीनेंच पहातां) फार उपयोग झाला आहे. परदेशांत ज्यांचा खप विशेष आहे असे नवीन पदार्थ चहा, काफी वगैरे यांची लागवड इकडे इंग्लिश लोकांचे भांडवलानें व कर्तृत्वानें सुरू झाली आहे. गाडीरस्ते व आगगाड्या यांचा विस्तार झाल्यानें ही व्यापाराचे वृद्धीस मदत झाली आहे. या सर्व कारणांमुळें व्यापाराची वृद्धि होऊन या देशांत उत्पन्न होणारे कच्चे व तयार झालेले मालाचे खपासंबंधानें हा देश मोठाले राष्ट्रांचे बरोबरीनें टक्कर देऊं लागला आहे. हा व्यापार वाढण्यास कारणें काय झालीं तीं व्यापाराचे भागांत सांगितलींच आहेत. आतां या व्यापारापासून या देशावर कसा परिणाम झाला आहे तें पहाण्याचें आहे. या देशाचा परराष्ट्रांशीं जो व्यापार होतो तो सर्व माल तयार होतो त्या ठिकाणापासून तों ज्या देशांत खपतो त्या देशांत जाईपर्यंत परकीयांचे हातीं आहे.

या देशांतील आगगाडीचे रस्ते एतद्देशियांचे नाहींत, त्यांतील फार थोडें भांडवल मात्र या देशांतील आहे. माल नेण्याआणण्यास जीं समुद्रांतील यानें आहेत तींही बहुतेक परकीयांचीं आहेत. एतद्देशीयांचे गलबतांचें टनेज (गलबतांत किती टन माल राहील त्याचें मान) एकंदरीपैकीं शेंकडा २.१४ असें आहे. बाकी ९७.८६ भाग टनेज इंग्रजांचे व इतर राष्ट्रांचे गलबतांचें व आगबोटींचें आहे; तसेंच आगबोटी वाढत आहेत व त्या मानानें एतद्देशीयांचीं गलबतें कमी होत चाललीं आहेत; परदेशाशीं व्यापार करणारी एतद्देशीयांची एकही आगबोट नाहीं. याप्रमाणें या बाबतींत परकीयांचें पाऊल झपाट्यानें पुढें पडत आहे व एतद्देशीयांचें तसेंच मागें जात आहे. एतद्देशीयांचे हातीं सुमारें एक दशांश व्यापार आहे व त्यांस त्या मानानेंच फायद्याचा अंश येतो. या देशाचे राज्यव्यवस्थेसंबंधानें विलायतेस पुष्कळ पैसा पाठवावा लागतो व त्याबद्दल व्यापारी मालच जातो, यासंबंधानें व्यापाराचे भागांत सांगितलेंच आहे. या कारणांसाठीं आयात मालापेक्षां निर्गत माल जास्त पाठविणें नेहमीं भाग पडतें व आयात मालाचे बदलीं माल पाठविणें जरूर नसतां सरकारी खर्चासाठीं विलायतेस जास्त माल पाठविणें अगत्य पडल्यानें व्यापाराचे नेहमींचे क्रमांत फरक पडतो व मालाचे किमतीसंबंधानेंही नुकसान होतें. ह्या सर्व बाबतींत होणारे तोटे हे या देशांतील लोकांस सहन करण्यास जड जातें, याचें कारण या देशांतील धंदेरोजगार बसले आहेत हें आहे. या देशांतून माल जातो तो सर्व कच्चा माल व धान्यें असा असतो ; तयार माल फार थोडा जातो. येणारा माल तयार केलेला असतो ; तयार माल जितका जास्त येत जातो त्या मानानें इकडील धंदे बसत जात आहेत, हें वर सांगितलेंच आहे. सर्व उद्योग व कारागिरीचे धंदे जाऊन शेतकी हाच एक धंदा राहिल्यानें लोकांची हल्लींची निकृष्ट स्थिति झाली आहे हें फयामिन कमिशननें फार स्पष्टपणानें सांगितलें आहे. कमिशनर असें ह्मणतात कीं "हिंदुस्थानांतील लोकांची दरिद्रावस्था असण्यास व दुष्काळाचे वेळीं त्यांचे फार हाल होतात त्याचें मूळकारण बहुतेक सर्व लोकांस शेतकी हाच एक धंदा राहिला आहे हें आहे ; ह्या लोकांवरचीं संकटें टाळण्यास मुख्य उपाय ह्मणजे शेतकीवर न लागतां रिकामे राहिलेले लोकांस उद्योगधंदे किंवा कामें मिळण्याची सोय झाली पाहिजे. ही सोय झाल्याशिवाय दुसरे कोणतेही धंदे उपाय केले तरी हल्लीं होत असलेले लोकांचे दैनेचा पूर्ण प्रतिकार होणार नाहीं." आयात मालाची यादी तपासली ह्मणजे किती विविध प्रकारचा तयार माल येत आहे व किती गोष्टींचे संबंधानें (आगकाड्या, चटयापासून तों यांत्रिक सामानापर्यंत) हा देश परतंत्र झाला

आहे तें दिसून येईल. हा माल तयार करण्यासाठीं कच्चा मालही बराच या देशांतून गेलेला असतो. असे प्रकारची व्यापाराची स्थिति झाल्यानें किती नुकसान होत आहे त्याचें अनुमान करणें कठीण आहे. फक्त कापूस जातो त्याचे बदला त्या कापसाचें कापड पाठविलें तर या देशास ३० कोटी रुपये नफा राहील असा अजमास आहे. एकंदरींत तयार करण्यासाठीं कच्चा माल, ताग, रेशीम वगैरे सारखा पाठविण्यांत येतो त्याचा पक्का माल करून पाठविला तर नफा सुमारें ५० कोटी रुपये होईल असें धरलें तरी चूक होणार नाहीं. या परस्वाधीनतेनें पैशाचेंच नुकसान होतें असें नाहीं. एकंदर देशांतील लोकांत सर्व प्रकारें दुर्बलता व निरुत्साह शिरला आहे हें मोठें घातुक नुकसान होत आहे; पूर्वी जसें सर्व धंदे प्रमाणशीर व्यवस्थेनें चालत असत ती स्थिति नाहींशी झाली आहे, सर्व लोकांस कायतो एकच धंदा आश्रय करण्यास राहिला. कारागीर लोकांस ज्यांत त्या ज्ञानाची जरूर नाहीं असे शेतकीचे धंद्यांत जावें लागल्यामुळें त्यांची प्राप्ति कमी झाली, व त्याचा परिणाम असा झाला कीं, मध्यम वर्गांत द्रव्यसंचय होण्याचा मार्ग खुंटला, व वाढत जाणारे प्रजेचे जीवनाचा मार्ग संकुचित झाला व एकंदरींत देशाचे सामाजिक, सांपत्तिक व नैतिक स्थितीवर फार अनिष्टकारक असा परिणाम झाला आहे. ह्या प्रमाणें सर्व लोकांची शेतकीवर भिस्त पडल्यानें शेतकी कांहीं वाढली आहे, परंतु हा क्रम बरींच वर्षें चालला आहे तरी शेतकी रीतींत कांहीं सुधारणा सांगण्यासारखी झालेली नाहीं. शेतकीचा माल परदेशीं जातो त्यापासून शेतकऱ्यांस सुमारें चार कोटी रुपये फायदा राहतो असा अजमास आहे, परंतु शेतकऱ्यांची जी मोठी संख्या वाढली आहे तीवर हा नफा वाढला ह्मणजे माणशीं चार आणे पडतील किंवा नाहीं याचीही शंका येते. इकडील मालाची परदेशांत छाप बसली हाच कायतो या व्यापारापासून खरा फायदा झाला आहे.

एकंदरींत सर्व देशांशीं संबंध जुळणें, व्यापाराची वृद्धि होणें, इकडील मालाची परदेशांत छाप बसणें वगैरे गोष्टी व्यापारासंबंधानें फायद्याच्या झाल्या आहेत; दुसरे बाजूनें हा व्यापार परकीयांचे हातीं असणें, या देशांतील सर्व उद्योगधंदे बुडणें व त्यामुळें दारिद्र्य वाढणें ह्या तोट्याच्या गोष्टी आहेत. अलीकडे या तोट्याच्या बाजूकडे लोकांचें लक्ष लागत चाललें आहे व कच्चया मालाचा तयार माल होऊन पूर्वीपेक्षां आतां जास्त जाऊं लागला आहे ही गोष्ट समाधान मानण्यासारखी आहे. व्यापाराचे उन्नतीचे कामांत इंग्रजांचे सारखे व्यापाराचे, कारागिरीचे, जुटीचे, दीर्घोद्योगाचे व छातीचे कामांत निष्णात असे लोकांचें उदाहरण अनुकरणास पुढें आहे हीही या देशांतील लोकांस असामान्य सुदैवाची गोष्ट आहे.

भाग एकविसावा.

एतद्देशीय संस्थानें.

येथपर्यंत हिंदुस्थानचे एका भागाचें ह्मणजे इंग्रजांचे खास अमलांतील प्रांतांचे राजकीय व सांपत्तिक स्थितीचें संक्षिप्तसें वर्णन झालें. आतां एतद्देशीय संस्थानांचा विस्तार, त्यांची लोक संख्या व जमाबंदी या संबंधानें माहिती देतों. प्रथमतः हिंदुस्थानचे सरहद्दीवर असलेले संस्थानांचे संबंधानें थोडी हकीकत देऊन, नंतर एतद्देशीय संस्थानांचे संबंधानें कोष्टक देण्यांत येईल.

हिंदुस्थानचे वायव्य सरहद्दीवर अफगाणांचें राज्य आहे. ह्या राज्याबरोबर इंग्रज सरकारचें जें वर्तन आहे त्याचें मूलतत्व ह्मणजे, रशियाचे या देशास येण्याचे वाटेवर एक चांगलें शूर, बलाढ्य व आपल्याशीं स्नेहानें वागणारें असें एक स्वतंत्र राज्य ठेवावें हें आहे. प्रसंग पडल्यास हिंदुस्थानचे वतीनें शत्रूंशीं लढण्यास तयारी असावी ह्मणून सैन्याची जैयत तयारी ठेवण्यासाठीं अमीरास कांहीं मदत देण्यांत येते. अफगाणिस्थानाचे दक्षिणेस बलुचिस्थानांत खिलात हें संस्थान आहे; त्याचे खानाबरोबर तह झाले आहेत. त्यांत त्यानें इंग्रज सरकारचें वर्चस्व कबूल केलें आहे व परराज्याबरोबर संबंध इंग्रज सरकारचे मार्फतीनें ठेवण्याचेंही पतकरलें आहे. लासबेला खरण हीं संस्थानें व मक्राण प्रांतांतील केज, पजगर हीं संस्थानें खानाचे आश्रित आहेत. बलुचिस्थानापैकीं कांहीं प्रांत, ज्यास ब्रिटिश बलुचिस्थान असें ह्मणतात, तो इंग्रज सरकारचे ताब्यांत आहे; यापैकीं कांहीं भाग खिलातचे खानापासून कांहीं शर्तीवर इंग्रज सरकारांनीं वहिवाटीस घेतला आहे व कांहीं भाग अफगाणिस्थानाचे लढाईत मिळाला आहे. ब्रिटिश बलुचिस्थान व पंजाब यांचे दरम्यान मरीं व बगटी जातीचे लोक रहातात. ते इंग्रज सरकाराबरोबर केलेले करारा प्रमाणें वागत आहेत. वायव्येकडील सरहद्दीवर पंजाब व अफगाणिस्थान यांचे दरम्यान जो डोंगरी भाग आहे, त्यांत उत्तरेस पेशावर, सरहद्दीवर स्वाती, युसफझई, गडुन, मोहमंड, अफ्रिडी, ओरकझई, झैमुक्त व तुरी या जातीचे लोक रहातात; सरहद्दीचे दक्षिण भागांत वझिरी, दवारी, बटंनी, शिराणी या जातीचे लोक राहतात. या लोकांचे मुख्यांपासून गुन्हे न करण्याविषयीं व इंग्रजांचे शत्रूंस आश्रय न देण्याविषयीं करारनामे करून घेतले आहेत. आफ्रिडी, ओरकझई, वझिरीपैकीं महसूद, बटंनी

व शिराणी या जातींचे लोकांवर खैबर, कोहात, गोमळ ह्या घाटांत बंदोबस्त ठेवण्याचें सोंपविलें आहे व त्यांस त्याबद्दल कांहीं नेमणुका मिळतात. या भागास लागून काश्मीर व त्याची अंकित संस्थानें (गिलजित, चित्रळ, शिन याघिस्थानांतील चिलासबदरेल) हीं आहेत. दीर संस्थान व याघिस्थानांपैकीं तंगीर संस्थान हीं आतां काश्मीरचें अंकितत्व कबूल करीत नाहींत. उत्तरेस नेपाळ, भूतान व सिक्कीम ही संस्थानें आहेत त्यांपैकीं नेपाळ व भूतान हीं स्वतंत्र आहेत. सिक्कीमही इंग्रजांचे आश्रित संस्थानांपैकीं आहे. पूर्वेकडे मणिपूरचें संस्थान आहे तें ही आश्रित वर्गांपैकींच. आसपासचे सरहद्दीवर सात मुख्य जातींचे ताब्यांत असलेला प्रांत आहे, त्या जातींची नांवें–अका, डफळा, मिरी, अभोर, मिश्मि, खांपतीवनागा. हे लोक इंग्रजी राज्यांतील सरहद्दीवरील भागांत वारंवार त्रास देतात व त्यांचे बंदोबस्ताबद्दल व्यवस्था चालू आहे. नागा लोकांचा प्रांत मात्र इंग्रजी राज्यास जोडला गेला आहे. आसाम व बंगालचे सरहद्दीवर लुशाई लोक राहतात, त्यांचा बंदोबस्त १८९२ सालीं करण्यांत आला. ब्रह्मदेशाचे हद्दीवरील संस्थानांचा संबंध उत्तर ब्रह्मदेश घेतल्यावर सुरू झाला. यांपैकीं कांहीं खालसा करण्यांत आलीं आहेत, व बाकीच्यांनीं इंग्रजांचें वर्चस्व कबूल केलें आहे.

आतां एतद्देशीय संस्थानांचे संबंधानें वर सांगितलेले बाबतींची माहिती देतों. ही पार्लमेंट सभेस सादर झालेले दशवार्षिक रिपोर्टावरून घेतलेली आहे.

संस्थानांची नांवें.	विस्तार चौरस मैल.	लोकसंख्या १८९१ चे खानेसुमारीप्रमाणें.	उत्पन्न रुपये.
हैदराबाद.	८२६९८	११५३७०४०	३०००००००
म्हैसूर.	२७९३६	४९४३६०४	१४९११९०३०
बडोदें.	८२२६	२४१५३९६	१३३५०९००
रजपुतान्यांतील संस्थानें.			
उदेपूर (मेवाड).	१२८६१	१८६२४७८	२५९६३००
डोंगरपूर.	१४४०	१६५४००	१७६४००
बांसवाडा.	१९३७	२१२२६९	२०४०००
प्रतापगड.	९५९	८७९७५	१९२४००
जयपूर.	१५३४९	२८३२२७६	६१९१३००
किसनगड	८७४	१२५५१६	३४५९००
जोधपूर (मारवाड).	३७४४५	२५२१७२७	४३०००००

जसलमीर.	१६०३९	११५७०१	१५६०००
सिरोही.	१९६६	१८८९७७	२५८०००
बिकानेर.	२३०९०	८३१९५५	१९९७७००
बुंदी.	२२२५	२९५६७५	६८१९००
टोंक.	१४१५	१९८९३४	१५३९०००
शाहापूर.	४०६	६३६४६	२८६०००
भरतपूर.	१९६१	६४०३०३	२७१७९००
धोलपूर.	११५६	२७९८९०	९५९०००
करौली.	१२२९	१५६५८७	५२६५००
अलवाड.	३०५१	७६७७८६	२८२०२००
कोटा.	३८०३	५२६२६७	२३५२८००
झालवार.	३०४३	३४३६०१	१५१४६०
सेंट्रल इडियांतील संस्थानें.			
ग्वालेर.	२९१००	३३६६४९८	१३७७९०००
इंदूर.	८४००	१०९४१५०	७६०००००
भोपाळ.	६९००	९५२४८६	२७०००००
देवास थोरली पाती.	३००	८२३८९	३२५०००
— धाकटी पाती.		६९६८४	३२५०००
धार.	१७५०	१६९४७४	८०००००
जावरा.	६००	११७६५०	९६००००
रतलाम.	७२९	८९१६०	१३०००००
बुंदेलखंडांतील संस्थानें.			
उर्चा.	२०००	३३३०२०	९०००००
दतिया.	८५०	१८६४४०	१००००००
संपथर.	१७०	४०५४१	४०००००
वाघेलखंडांतील संस्थानें.			
रेवा.	११३३०	१५०८९४३	१३०००००
पंजाबांतील संस्थानें.			
पतियाळा.	५९५१	१५८३५२१	५७८१३००
झिंद.	१२६८	२८४५६०	६११०००
नभा.	९३६	२८२७५६	७०००००
कलशिया.	१४९	६८६३३	१७५३००

फरीदकोट.	६४३	११५४०	३०००००
मलेरकोटला.	१६२	७५७५५	३१४०००
कपूरथळा.	५९८	२९९६९०	१२०००००
चंबा.	३१२६	१२४०३२	३५००००
मंदी.	११३१	१६६९२३	४०६०००
सुकेत.	४०४	५२४०३	१०५०००
भावलपूर.	१७२८५	६५००४२	१६०००००
बंगालप्रांतांतील संस्थानें.			
कुचबिहार.	१३०७	५७८८६८	१३३७५००
डोंगरी टिपरा.	४०८६	१३७४४२	३१२५००
मध्यहिंदुस्थानांतलि संस्थानें.			
खैरगड.	९३१	१८११८४	१६३०००
नांदगांव.	८७१	१८३८६६	२२३३००
कलदेडी.	३७४५	३२६२९५	१२२५००
वस्तार.	१३०६२	३१०८८४	१६८३००
मद्रास इलाख्यांतील संस्थानें.			
त्रावणकोर.	६७३०	२५५७७३६	७८४८०००
कोचीन.	१३६२	७२२९०६	१७०००००
पुडुकोटा.	११०१	३७३०९६	७०००००
बंगनपल्ली.	२५५	३५४९६	२७२५००
सोंडूर.	१६१	११३८८	४५०००
मुंबई इलाख्यांतील संस्थानें.			
खैरपूर. (सिंध).	६१०९	१३११३७	७२९०००
कच्छ.	६५००	५५८४१५	१८०४०००
काठेवाडांतील संस्थानें.			
जुनागड.	३२८०	४८४१९०	२४०००००
भावनगर.	२८६०	४६७२८२	३५०००००
नवानगर.	३७९१	३७९६११	२४०००००
ध्रांगध्रा.	११५६	१०३७५४	७८००००
पोरबंदर.	६३६	८५७८५	५५००००
मोरवी.	८२१	१०५३३५	१०००००
गोंडळ.	१०२४	१६१०३६	१२००००

वांकनेर.	४१४	३९३२९	२३१०००
पालिठाणा.	२८९	६०८४८	५०००००
ध्रोल.	२८३	२७००७	१५००००
लिमडी.	३४४	४८१७६	२६४०००
राजकोट.	२८२	४९९३८	२०००००
वढवाण.	२३६	४२४३८	४२५०००
जाफ्राबाद.	४२	१२३८९	६००००
पालनपूर एजन्सींतील संस्थानें.			
पालनपूर.	३१७७	२७४८६४	६०००००
राधनपूर.	११५०	९८०१७	५०००००
महीकाठ्यांतील संस्थानें.			
ईदर.	१९००	३०२१३४	६०००००
रेवाकाठ्यांतील संस्थानें.			
राजपिंपळा.	१५१४	१७१७७१	७७४०००
च्छोटा उदेपूर.	८७३	९३६३७	२३०६००
लुनवाडा.	३८८	९०१४७	२३५०००
बालसिनोर.	१८९	५३२१५	१३९६००
बरिया.	८१३	१११२६९	२७१०००
सुंथ.	३९४	७४२७५	१५७८००
खंबायत.	३५०	८९७२२	६०४५०
सचीन. (सुरत)	४२	२१२८९	२०००००
वांसदा. (")	२१५	४१३७३	२४५९२६
धरमपूर.(")	७९४	१२०४९८	२६८०९१
सुरगाणा. (नाशिक).	३६०	१२३०८	१३३००
जव्हार. (ठाणें).	५३४	५२८३१	१५००००
जंजीरा. (कुलाबा).	३२४	८१७८०	४७०५००
सांवतवाडी.	९२६	१९२९४८	४२००००
भोर (पुणें).	१४९१	१५५६६९	४२२४००
औंध (सातारा).	४४७	६५१४६	३०६२२२
फलटण. (")	३९७	६६३८३	२३५९२१
जथ (विजापूर).	९७९	७९७८६	१९७०००
अक्कलकोट (सोलापूर).	४९८	७५७७४	२७५०००

सावनूर (धारवाड).	७०	१६९७६	७०६००
कोल्हापूर.	२८१६	९१३१३१	३३०६०००
कोल्हापूरचीं पोट संस्थानें			
विशाळगड.	१२१	१३२४७	१३०६९२
बावडें.	१३७	४३७७०	८७४३१
कागल.	१२८	५३२७२	१८१०१५
इचलकरंजी.	२०७	६६३६५	२०९२५६
कापशी.	३५	१३२२६	४४९७६
तोरगल.	१३०	१३३५९	४३८२६
दतवाड.	५	३०९०	१८५८०
कागल. धाकटी पाती.	१८	५४९४८	३४७५०
दक्षिण महाराष्ट्रांतील जहागिरी.			
सांगली.	१०८३	२३८९४५	१०५२०९९
मिरज.	३३९	८८३४३	३११९१९
मिरज मळा.	२२५	३५४८७	२१२१३१
जमखिंडी.	५५५	१०२१६२	४६२१४२
कुरुंदवाड थोरली पाती.	१७४	४३८०९	१३१४५०
——धाकटी पाती.	१३४	३२५२८	१३०८२१
रामदुर्ग.	१६९	३६१८१	१५१८१३
मुधोळ.	३६१	६१८१५	२६३००९

Printed at the 'Arya Vijaya' Press, Poona.

शुद्धिपत्र.

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
२	१०	सरणांत	सरण जिल्ह्यांत
६	२५	१०-१७	१०-९७
७	२५	६-७	६-८९
—	३०	३४-७४	१०-७४
११	२२	१८३२	१७३२
१३	१	तोडून दिला–	वहिवाटीस लाऊन दिला.
२३	७	दिवाणी–	सिव्हिल (लष्करी शिवाय इतर)
२४	२७	——	——
३१	२८	८४	७४
३२	१०	धर्माचे हिंदू	धर्माचे होते. हिंदु
३३	१	१७५२८०	१३५२८०
३४	२	२८७५०	७८७५०
—	६	२८५१७	२८५१७०
—	८	२९७१७०	२९२१७०
४५	२१	पाहण्याचें	पाळण्याचें
५१	७	२४४०७६	२४४०७६०
५२	१८	६६२७१००	६६२७१०
५५	१४	२४८	१२४८
५७	११	५३१८७	५३१८७०
६८	१९	३४६९५०	३४६९६०
—	२१	९६—	९१—
७५	२३	१	१८
७७	१५	६६—	४६—
—	१८	६४—	४६—
७८	१२	२२—	३२—
—	२२	१-१९८०	१८९९८०
७९	२२	२०९६७०	२०९६७००
—	२७	७९१७८३	७९१७८३०

८९	१३	३२५४८४	३२५८८४
९५	२३	९७८५१६	११७४८१७
९७	२४	१९८७४	१९८७४०
११३	१२	१८८२।९३	१८९२।९३
११५	११	सव	सर्व
११८	कोष्टकांतील शेवटची बेरीज.	१९६८८५१०	१९६८८५
१२०	९	१३३४४७८	१३३४४७०
१२४	१२	सरहद्दीचा इतर	सरहद्दीचा व इतर
१४२	५ व २९	चालू साला	१८९४-९५त
१५३	१०	१०२९३७५५२	१०२९३७५५२०
—	११	१०७४०४०१४३	१०६६८३७६७०
१७५	३२	ऐके	एके.
१८१	२०	कालोपयोगी	कलोपयोगी
१८६	५वे ओळीतील दुसरा शब्द–ऐंशी–हा ओळीचे शेवटी न्यावा.		
१९२	शेवटची	ता अफू	ती अफू.
१९४	२८	७८०३२२००	७८०३२२१०
२०१	१७	३२२७२	३४२७२
२०५	खालून साहावी	टिवस्ट	ट्विस्ट.
२०८	खालून आठवी	बिलायतचे	विलायतचे.
२२३	२५	* गाई–झशी	+*गाई-झशी.
—	३०	५२८०	५२८६
२२४	१०	* *	+ *
२२८	कोष्टकाचे चवथे खान्यांत ओळ ९	५५	५१
—	—१३	३	४
२३२	शेवटची	एरज्या	एरंड्या
२३५	—	४१	३१
२३६	१८	विद्युल्का	विद्युदुल्का.
२७४	२१	५२२	५५२
२८०	शेवटची	१८८३।४	१८८३।८४
२९०	४	२२३३	२२३६
—	२३	१५०५	१५४५

२९९ खालून चवथे ओळींत येईलचे पुढें–खालील आंकडे हजार रुपयांचे आहेत– असें घालावें.

३००	२	२९८	२९७
—	३	१२९६	१९२६
—	६	६९२	६९५
—	२०	५२०	५३०
३०३	११	लक्ष	९ लक्ष

३१० कोष्टकाचे शेवटचे खान्याचे शेवटचे ओळींत १२८६ बद्दल १३८६ वाचावें.

३१५	खालून ९	हिशे	हिशेब.
३१६	१०	ळांकूड	लांकूड.

—कोष्टकाचे सदरांत आयाताचे ठिकाणीं–निर्गत–व निर्गताचे ठिकाणीं–आयात–असें करावें, व आंकडे हजार रुपयांचे आहेत अशी टीप घालावी.

—	खालून ७	८६६७	८६९७
—	— ३	१४०५	१०४५
—	खालून २	५५७३	५७७३
३१७	९	होते.	होतात.

३३० —ब्रह्मदेशाचे पुढील आंकड्यांतील शेवटचे ९ बद्दल शून्य द्यावें.

३५०	१९	खासगी लोक	खासगी लोक होते.
३५३	११	पाठ शाला	पाठन शाला.

३५८ कोष्टकाचे खालील टिपांच्या फुल्या परस्परें वर खालीं कराव्या ह्मणजे पहिले टिपेचे पूर्वी + अशी फुली व दुसरे टिपे पूर्वी * अशी फुली करावी.

३६९	किरकोळाचे ओळींतील शेवटचा आंकडा.	७९४१६	७९४१६०
३७०	७	कीमशननें	कमिशननें.
३७५	खालून ३	१·६५	१·६६
—	— २	खरणारे	करणारे
३८५	२८	इतरत्व	इतरत्र
३८८	१८	लागण करणारे–लागण स्वतः न करणारे	
३९१	शेवटची ओळ.	रु० ९–८। रु० ८–८	रु०–९–८। रु०–८–८
३९३	२	अलीकले	अलीकडे
३९९	खालून ४	धान्याथ्या	धान्याच्या.
४००	— ६	दक्षिणेंत	महाराष्ट्रांत.

४०४	८	दात्रचा	दारूचा.
४०६	२०	सार्वजिक	सार्वत्रिक.
४०८	१४	विघड	विघाड.
४०९	११	कारागिरीस	कारागिरांस.
४१२	१५	कायतें जमिनींत	कायतें ३ जमिनींत.
४१३	४	व्यांचेच	त्यांचेच.
४१७	२०	वाढला	वाटला.
४१९	४	चिलासबदरेल	चिलास व दरेल.
४२०	२	सिरोदी	सिरोही.

(ह्या शुद्धिपत्रांत विशेष महत्वाचीं अशुद्धें मात्र दाखल केलीं आहेत.)

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

पुणें--सेक्रेटरी डेक्कन एज्युकेशन सोसाइटी.

,, शिराळकर आणि मंडळी.

मुंबई—मि. रामचंद्र गोविंद, म्यानेजर टु राधाबाई आत्माराम सगुण काळकादेवी रोड.